

# श्री दादा जाईक जीवन दर्शन

संपादक

डॉ. वसंत स. जोशी

सद्गुरु प्रकाशन

# श्री. दादा नाईक : जीवन दर्शन

संपादक
डॉ. वसंत स. जोशी

स द् गु रु  प्र का श न,  सं के श्व र

■ प्रकाशक
श्री. सदानंद नाईक
सद्‌गुरु प्रकाशन
गांधी चौक, संकेश्वर
(जि. बेळगाव) - ५९१ ३१३.

■ मुद्रक
श्री. श्री. सि. गोसावी
राजहंस प्रिंटिंग प्रेस,
'ई' नागाळा
कोल्हापूर ४१६ ००३

■ टाईप सेटिंग
श्री. उदय र. गोसावी
अक्षय प्रिंटस्
राहूल अपार्टमेंट, खरी कॉर्नर
कोल्हापूर - ४१६ ०१२.

■ ग्रंथ वितरण व्यवस्था
श्री. अनिल नाईक
८, वेंकटेश्वर अपार्टमेंटस्
२३२ ए/५, ताराबाई पार्क
कोल्हापूर ४१६ ००३.
(फोन : २३२६९.)

■ मूल्य - रुपये पंचाहत्तर फक्त.

■ सर्व हक्क प्रकाशकाधीन
■ आवृत्ती पहिली, २० डिसेंबर १९९१ (श्री दत्त जयंती)

प्रपंच - परमार्थ - समन्वयाचा आदर्श

**ती. स्व. धोंडो श्रीपाद तथा दादा नाईक**

यांना सादर समर्पण

# प्रास्ताविक

प्रत्येक कालखंडात निरनिराळ्या विचारांची, दृष्टीची, प्रवृत्तीची माणसे विद्यमान असतात. त्यांच्या त्यांच्या पद्धतीने ती जीवन जगत असतात आणि काल-चक्रानुसार जीवनचक्रही फिरत राहात असते. या जीवनक्रमाला वेगळे वळण आणि दिशा देण्याचे कार्य ज्ञानी, द्रष्ट्या पुरुषांकडून होत असते. त्यांतील काही सर्वज्ञात असतात, काही अल्पज्ञात, तर काही अज्ञातही असतात. प्रसिद्धीच्या प्रकाशात न येताही अशा ज्ञानी पुरुषांकडून समाजधारणेचे आणि परिवर्तनाचे कार्य होत असते.

सामान्य सांसारिकांच्या सहवासात राहून त्यांचे जीवन उजळण्याचा, सुखमय करण्याचा प्रयत्न ते करीत असतात. ते त्यांच्यापैकीच एक असतात आणि नसतातही. लोकाधारे वर्तन करून विश्व मोहरे नेण्याचे कार्य त्यांच्याकडून होत असते. भारतीय संस्कृतीचा किंवा जीवनसरणीचा एक विशेष हा आहे, की प्रत्येक भारतीय एका विशिष्ट तत्त्वज्ञानसूत्राने जीवन जगत असतो. त्यांचे जीवन ज्ञानी पुरुषाच्या सहवासाने संपन्न बनते. त्याला समाज हवा असतो आणि समाजाला तो हवा असतो. त्याच्या पदचिन्हांवरून वाटचाल करण्यात सामान्यांना धन्यता वाटते आणि आपण योग्य त्या स्थळी पोहचू, याचा मनोमन विश्वासही असतो.

ती. स्व. धोंडो श्रीपाद तथा दादा नाईक हे अशा ज्ञानी पुरुषाचे आजच्या काळातील प्रतीक रूप आहे. प्रस्तुत ' जीवन दर्शन ' ग्रंथात त्यांच्यावर अलोट प्रेम

( की ज्याला भक्तीही म्हणता येईल) करणाऱ्या चाहत्यांच्या अंतरंगातील भावोद्गार त्यांच्या या व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडविणारे आहेत. यातील प्रत्येक लेख वा आठवण ती. स्व. दादांच्या वेगळ्या वेगळ्या पैलूंचे दर्शन घडविते आणि प्रकर्षाने लक्षात येते की, या सर्वांचे भावजीवन जपण्याचे आणि लौकिक जीवन सुखी करण्याचे कार्य ती. दादांकडून झालेले आहे. त्यासाठी त्या त्या व्यक्तीला सुलभ अशा मार्गांचा अवलंब त्यांनी केला आहे. ते मार्ग किंवा ती साधने अंतिम स्वरुपाची असे त्यांनी कधीच मानले नाही. किंबहुना कुलधर्म, कुलाचार हेही एका विशिष्ट पातळीपर्यंत आवश्यक असून त्यानंतर त्यांची गरज राहात नाही, असे त्यांचे मत आहे.

स्वतःशी निष्ठुर राहून स्वतःच्या पलीकडे जाऊन विचार करण्याची त्यांची पद्धत आहे. त्यामुळे प्रस्तुत ग्रंथात आलेल्या आध्यात्मिक किंवा पराविद्याशास्त्रातील कित्येक अनुभवांची चिकित्सा करून त्यांची कारण परंपरा शोधण्याचा प्रयत्न ते करीत असतात. ते श्रद्धावान आहेत, तसेच प्रखर बुद्धिवादीही आहेत. त्यामुळे एकूण जीवनपद्धतींमध्ये अशा अनुभवांचे स्थान काय हा विचारही सातत्याने त्यांचेपुढे असतो आणि त्याची चर्चाही कारणपरत्वे ते करीत असतात. त्यासाठी कठोर आत्म-परीक्षणच नव्हे, तर आत्मटीकाही ते करतात. भूतकाळ विसरायचा, भविष्य काळाचा विचार करावयाचा आणि वर्तमान काळात जगावयाचे, हे त्यांच्या विचारांचे सूत्र आहे. भूतकाळ विसरल्यानंतर तुलना होत नाही आणि स्वाभाविकच दुःखही राहात नाही. ती. स्व. दादांच्याच शब्दांत सांगावयाचे तर

'Don't look before and after and pine for what is not
Live in the present and live couragiously,
For it is not life that matters but the courage you bring to it.'

आणि गांजलेल्या, खचलेल्या, अगतिक झालेल्या प्रापंचिकांना दिलासा देऊन जीवनाला सामोरे जाण्यास लागणारे धैर्य त्यांच्या मनात निर्माण करण्याचा प्रयत्न सातत्याने ते करीत असतात.

सामान्यांपासून असामान्यांपर्यंत, अज्ञांपासून तज्ज्ञांपर्यंत अनेक स्तरांतील व्यक्तींशी ती. स्व. दादांचा संबंध येतो आणि त्या साऱ्यांनाच ते आपले जवळचे असे वाटतात. ' जीवन दर्शन ' मधील प्रत्येक लेखाचा वा आठवणीचा विचार करताना त्या व्यक्ती, त्या घटना आणि ती. स्व. दादांचा त्यांत असलेला सहभाग यांचा विचार चिकित्सकपणे व्हावयास हरकत नाही. किंबहुना तो तसा व्हावा, अशी ती. स्व.

दादांचीही इच्छा असते. त्यातून मानवी जीवनातील गुंतागुंत उलगडणारा धागा मिळाला, तर तो हवा आहे.

' जीवन दर्शन ' या ग्रंथाचे संपादन करीत असताना, सतत जाणवत राहिले, की अशा अनेक थोर पण अज्ञात व्यक्तींच्या जीवनातील घटना त्या त्या वेळी जर शब्दबद्ध करून ठेवल्या, तर समाजशास्त्राच्या दृष्टीने ते एक उपयुक्त कार्य ठरू शकेल. एकूण मानवी जीवनाची वाटचाल लक्षात घेता त्यावर प्रभाव टाकणाऱ्या कार्यकर शक्ती आणि व्यक्तींची नोंद त्यामुळे होईल आणि ते समाजेतिहासलेखनाचे महत्त्वाचे साधन ठरेल.

स्वतः ती. स्व. दादा नाईक आपल्या आयुष्यात कधीही, कुठल्याही व्यास-पीठावर मिरवले नाहीत. प्रसिद्धीची साधने व माध्यमे सहजी उपलब्ध असूनही त्यांनी त्यांचा वापर कधी केला नाही. जिथे साहाय्याची अपेक्षा आणि गरज दिसली, तिथे ते धावून गेले आणि ते सर्वांचे झाले. त्यांच्या सहवासात जे आले, ते त्यांचे बनले. ती. स्व. दादांच्या विषयीचा प्रत्ययकारी स्नेहाचा धागाच या ग्रंथातील लेखकांच्या मांदियाळीस एकत्र आणण्यास कारणीभूत ठरला आहे. महाराष्ट्र आणि कर्नाटकातील व्यक्तींनी आपापल्या मातृभाषेत किंवा इंग्रजीत लेखन करून ती. स्व. दादांविषयीचा आपला आदरभाव व्यक्त केला आहे. भाषा किंवा प्रादेशिकतेची बंधने खऱ्या स्नेहाच्या आड येऊ शकत नाहीत, याचेच हे निदर्शक आहे.

या ग्रंथातील अनेक घटना त्यांचे आगळेपण स्पष्ट करतील आणि वाचकांना अंतर्मुख बनवतील. नव्या साहित्य कृतींची प्रेरणा देण्याचे सामर्थ्य त्यांत आहे. त्यामुळे ज्ञात आणि अज्ञात वाचकांना हा ग्रंथ आवडेल, अशी अपेक्षा आहे.

१ डिसेंबर १९९१ — *वसंत स. जोशी.*

१७३० ई, सहावी गल्ली,
राजारामपुरी, कोल्हापूर.

# निवेदन

आमचे ज्येष्ठ बंधू ती. स्व. धोंडो श्रीपाद तथा दादा नाईक यांनी दि. ८ जुलै १९९१ रोजी आपल्या वयाची ८० वर्षे पूर्ण करून ८१ व्या वर्षात पदार्पण केले. त्यांनी जीवनाच्या अनेकविध क्षेत्रांत केलेल बहुमोल कार्य लक्षात घेऊन एक गौरव ग्रंथ सिद्ध करावा, अशी कल्पना पुढे आली. त्यासाठी एक गौरव समितीही तयार झाली आणि ती. स्व. दादांच्या सर्व चाहत्यांना त्यांच्याविषयीच्या आठवणी, लेख पाठविण्याचे आवाहन करण्यात आले. त्याला उत्तम प्रतिसाद मिळाला आणि आता तो गौरव ग्रंथ ' दादा नाईक : जीवन दर्शन ' या नावाने प्रसिद्ध होत आहे. ती. स्व. दादांचे स्नेही श्री. बापूसाहेब कुलकर्णी यांची सूचना अशा प्रकारे साकार होत आहे.

उपलब्ध झालेल्या साहित्यामुळे ग्रंथाचा विस्तारही मोठा झाला. मुळात तशी आर्थिक तरतूद काहीही नसताना ती. स्व. दादांवरील प्रेमामुळे अनेकांनी आम्हाला आर्थिक सहकार्य केले. त्यांत पुढील व्यक्तींचा सहभाग महत्त्वाचा आहे. श्री. शामराव शेळके (कोल्हापूर) श्री. रामचंद्र कृष्णाजी नवाळे (कोगनोळी), श्री. ए. जी. पै. (ठाणे), श्री. नाना शेटे (साखरपा), सौ. उषाताई देशपांडे (बेंगलोर), श्री. का. रा. गानू (धुळे), श्री. रायप्पा धनगर, श्री. दरी (कोगनोळी), प्रा. नीलकंठ पालेकर (कोल्हापूर), श्री. दिगंबर जोशी (कोल्हापूर), श्री. आर्. एस्. पाटील (कोल्हापूर), श्री. हिंदूराव घोरपडे (कोल्हापूर), श्री. व. के. महादेवकर (सांगली), नाईक कुटुंबीय (संकेश्वर, गडहिंग्लज, कोल्हापूर), श्री. बसवणप्पा कोटगी (संकेश्वर). डॉ. अविनाश शिपूरकर (कोल्हापूर)

या ग्रंथाचे मुद्रण ' राजहंस प्रिंटिंग प्रेस ' चे श्री. श्री. सि. गोसावी आणि त्यांचे सहकारी यांनी अत्यंत आस्थेने व आकर्षकपणे करून दिले. आवश्यक ती छायाचित्रे श्री. सदाशिव कुरबेटी, व्हिदम फोटो स्टुडिओ, संकेश्वर आणि प्रकाश फोटो स्टुडिओ, संकेश्वर यांनी वेळेवर उपलब्ध करून दिली. ती. स्व. दादांच्याविषयी अनुभव / आठवणीवजा लेख अनेकांनी आवर्जून पाठविले.

या सर्वांच्या सहकार्याविना हा ग्रंथ तयार झाला नसता. त्या सर्वांचे आम्ही अतिशय आभारी आहोत. ती. स्व. दादांच्या असंख्य चाहत्यांचा हा लोभ नाईक कुटुंबियांवर सदैव राहावा, अशी विनंती आहे.

**५ डिसेंबर १९९१** — ***श्री. सदानंद नाईक***

गांधी चौक
संकेश्वर (जि. बेळगांव)

# अनुक्रम


| अ.नं. | लेखाचे नांव | लेखक | पान नं. |
|---|---|---|---|
| १ | शुभचिंतन | भालजी पेंढारकर | १ |
| २ | माझे वर्गमित्र | प्राचार्य एम्. आर्. देसाई | २ |
| ३ | माझे अनधिकृत गुरु | मा. ना. कुलकर्णी | ४ |
| ४ | स्थितप्रज्ञ धोंडोपंत | मा. ना. कुलकर्णी | ५ |
| ५ | बहुत जनांसि आधारु | डॉ. वसंत स. जोशी | ७ |
| ६ | ती. दादा एक हिमनग | भाऊ वझे | १२ |
| ७ | दादा - रसिक महायोगी | डॉ. उदय अनंत पुराणिक | १९ |
| ८ | गुरुविण कोण दाखविल वाट | जयवंत कृष्णराव काळे | २२ |
| ९ | जाणकार दादा | सौ. रजनी करकरे - देशपांडे | २५ |
| १० | माझी पहिली मैफल | गुलाबबाई कागलकर | २७ |
| ११ | सुखाचे व्यवहारी | बाळ दांडेकर | २८ |
| १२ | अनंतरूपे कमलावराने | अनंत तेरदाळ | ३० |
| १३ | बहु वाव पोटी समर्थाचे | सुधांशु कुलकर्णी | ३१ |
| १४ | आधार संसारी | संगमेश्वर गुरव | ३२ |
| १५ | रामरंगी रंगले | रामभाऊ विजापुरे | ३३ |
| १६ | जयाचिये दारी सोन्याचा पिंपळ | ज्योतींद्र हसबे | ३५ |
| १७ | चार आंधळे आणि हत्ती | का. रा. गानू | ३८ |
| १८ | असे आहेत आमचे पंत | प्रा. टी. जी. पाटील | ४३ |
| १९ | संकेश्वरचे साधुपुरुष | र. श्री. पुजारी | ४५ |
| २० | ती. दादा - एक आधारवड | प्रा. गं. ना. कुलकर्णी | ४८ |
| २१ | मला भेटलेले वैष्णव | द. र. धर्माधिकारी | ५१ |
| २२ | एक बहुलक्ष्यी कुटुंबवत्सल | डॉ. सुरेश जोशी | ५६ |
| २३ | माझे मनोगत | जी. एस्. गोंधळी | ६३ |
| २४ | एक अलौकिक व्यक्तिमत्त्व | बाळ फडणीस | ६४ |
| २५ | अशा रंगल्या रात्री | दिगंबर जोशी | ६९ |

| | | | |
|---|---|---|---|
| २६ | एक असामान्य व्यक्तिमत्त्व | सविता पारिजात | ७६ |
| २७ | एक प्रसन्न व्यक्तिमत्त्व | प्रा. नीलकंठ पालेकर | ७८ |
| २८ | श्री गुरुः शरणम् | मा. ग. जोशी | ८७ |
| २९ | माझे गुरु धोंडोपंत | ना. ज. जोशी | ९० |
| ३० | विशाल मनाचे शिक्षक | श्री. रा. पाटील | ९६ |
| ३१ | दादा एक ज्ञानदीप | आर्. जी. काकडे | ९७ |
| ३२ | निराशेतील दिलासा | डॉ. जी. एस्. खांडेकर | ९९ |
| ३३ | व्यासंगी व्यक्तिमत्त्व | आप्पासाहेब भिडे | १०० |
| ३४ | माझी श्रद्धा | सौ. सुनिता घोलकर | १०३ |
| ३५ | भाव मनीचे | वैजयंती कुलकर्णी | १०४ |
| ३६ | अक्षर संपदेच दान | सुधाताई जोशी | १०५ |
| ३७ | प्रातःस्मरणीय दादा | कृष्णकांत मुळे | १०६ |
| ३८ | मर्मबंधातली ठेव | एक मानस कन्या | १०८ |
| ३९ | तुळशीच पान | भारत दैनी | १११ |
| ४० | माझे मामा | सुरेखा घोलकर | ११२ |
| ४१ | मला दिसलेले दादा | सौ. इंदिरा नाईक | ११७ |
| ४२ | पूज्य दादा | डॉ. पी. सी. मेहता | ११९ |
| ४३ | संकेश्वरचे भूषण | वि. वि. बापट | १२० |
| ४४ | श्रद्धेय धोंडोपंत | राम कमलाकर | १२१ |
| ४५ | ज्ञानाचं खुलं भांडार | सौ. अनिता जनवाडकर | १२२ |
| ४६ | काही स्मृतिचित्रे | वसंत महादेवकर | १२४ |
| ४७ | माझ्यासारखी मीच भाग्यवान | सौ. अमरजा जोशी | १२६ |
| ४८ | अलौकिक व्यक्तिमत्त्व | जयंत कुलकर्णी | १२६ |
| ४९ | विसाव्याचं ठिकाण | उषा मुद्रस | १२८ |
| ५० | एक विलक्षण अनुभव | सौ. वसुधा कुलकर्णी | १२८ |
| ५१ | संसार हा सुखाचा | सौ. शैला कुलकर्णी | १३२ |
| ५२ | आठवणी व अनुभव | किशोर कमलाकर | १३४ |
| ५३ | माणूसवेडा माणूस | बाळासाहेब जनवाडकर | १३९ |
| ५४ | अद्भुत आणि गूढ | वि. के. फडके | १४१ |

| | | | |
|---|---|---|---|
| ५५ | एक आठवण | जी. जी. जोशी | १४२ |
| ५६ | एक आठवण | सौ. ज्योत्स्ना राजाध्यक्ष | १४३ |
| ५७ | अनंत आठवणी | शहाजी पाटील | १४३ |
| ५८ | मी पाहिलेले प. पू. दादा | डॉ. सुरेश कुलकर्णी | १४७ |
| ५९ | बालसखा धोंडबा | बाबू कामत | १४८ |
| ६० | माझे दैवत | सुकांत माने | १४९ |
| ६१ | आध्यात्मिकतेचा परिस | एस्. जी. होसमठ | १५० |
| ६२ | जीवन संजीवनी | वाय्. डी. केकलेकर | १५५ |
| ६३ | ज्ञानदानाचा सोहळा | आनंद जोशी | १५७ |
| ६४ | कृपावंत दयाघन | सौ. एस्. जी. देशपांडे | १५९ |
| ६५ | दादांची कृपादृष्टी | श्रीमती विजया ग्रामपुरोहित | १६० |
| ६६ | सद्गुरुसारिखा पाठिराखा | श्रीमती सुशीला देशपांडे | १६१ |
| ६७ | माझी प्रॉपर्टी | जी. व्ही. पुराणिक | १६३ |
| ६८ | काही आठवणी | सौ. सुशीलाबाई देशपांडे | १६६ |
| ६९ | मायेची शाल | सौ. सुहास शर्मा | १६८ |
| ७० | जीवनाला कलाटणी | भालचंद्र कुलकर्णी | १७१ |
| ७१ | सतत वाढणारा ज्ञानवृक्ष | डॉ. अविनाश शिपूरकर | १७२ |
| ७२ | सुखद अनुभव | दिनकर पोवार | १७५ |
| ७३ | दादांचे ऋण | डॉ. रमेश शिपूरकर | १७६ |
| ७४ | त्वमेव सर्वं मम देव देव | आर्. के. नवाळे | १७८ |
| ७५ | दीपस्तंभ | अरुण जोशी | १८३ |
| ७६ | एक आठवण | संगमेश्वर गुरव | १८४ |
| ७७ | तस्मै श्री गुरवे नमः | सुधीर जोशी | १८५ |
| ७८ | एक आठवण | प्रा. वसंत नगरे | १८६ |
| ७९ | ती. दादा | श्रीकांत नाईक | १८७ |
| ८० | मला लाभलेला परीस | नामदेव शंकरराव शिरढोणे | १८८ |
| ८१ | वंदनीय दादा | सी. ज. जोशी | १९९ |
| ८२ | अंतःप्रेरणेचा प्रत्यय | डॉ. जी. के. पाटील | २०१ |
| ८३ | माझे वाटाडे | डॉ. द. ना. जोशी | २०२ |

| | | | |
|---|---|---|---|
| ८४ | दादा नाईक - एक असामान्य व्यक्ती | रत्नाकर दुसाने | २०५ |
| ८५ | ती. स्व. दादांची साधना | प्रा. शशिकांत कुलकर्णी | २०६ |
| ८६ | काही पत्रे | | २०८ |
| | पु. ल. देशपांडे, पुरुषोत्तमदास गिंदोडिया, बाबा महाराज सातारकर, विजय शिवराम कोतवाल, भाऊराव शिपूरकर, प्रभाकर पेंढारकर, राजा नाईक, शुक्ल चंद्रशेखर भट. | | |


## English Section


| | | | |
|---|---|---|---|
| 1) | Dada "As I See him - | B. Shankaranand | 1 |
| 2) | A Great Asset- | K. G. Sattur | 2 |
| 3) | Dada : Dedicated, Affectionate, Divine Asset | N. S. Bidi | 4 |
| 4) | Pranamas to a Learned Guru | Nakate Vithal Rao | 5 |
| 5) | My Reminiscences | A. G. Pai | 7 |
| 6) | An experience | A Close Associate | 8 |
| 7) | Intense feelings | N. P. Mangalekar | 9 |


## कन्नड विभाग


| | | | |
|---|---|---|---|
| १ | नेलद नक्षत्र | संगमेश्वर होसमठ | १ |
| २ | नानु कंड - श्री दादा नाईक | | |
| | | १) सुशीला देशपांडे | ९ |
| | | २) एस्. जी. देशपांडे | १४ |
| | | ३) डॉ. सुरेश कुलकर्णी | १७ |
| | लेखकांचे पत्ते | | एक ते सात |



प. पू. नृसिंह सरस्वती स्वामी महाराज




प. पू. श्री वासुदेवानंद सरस्वती टेंबे स्वामी महाराज




पू. दादा



कै. श्रीपादराव  सिताराम नाईक (वडील)



कै. अंबाबाई श्रीपादराव नाईक (मातोश्री)




कै. नारायणराव सिताराम नाईक (काका)







**उभ्या डावीकडून** - श्रीमती इंदिराबाई खोत, श्रीमती लीलाबाई कामत, सौ आनंदीबाई प्रभू, सौ. सुनिता घोलकर (भगिनी)
**बसलेले डावीकडून** - श्री. सदानंद, कै. बाबूराव, ती. दादा, कै. दामुअण्णा, श्री. रामचंद्र, श्री. गोविंदराव, श्री. नागेश मोदी (मावस बंधु), कै. वसंतराव नाईक.




प. पू. दादा नाईक व कै. सौ. आनंदीबाई धोंडोपंत नाईक



डावीकडून - श्री. अनिल, सौ. अनिता (सुपुत्र व स्नुषा), ती. दादा, सौ. सुनिता, श्री. सुरेश विष्णुपंत खोत (कन्या व जामात)
चि. अवधूत - नातू, चि. आनंदमयी - नात

**प. पू. टेंबेस्वामी महाराज पुण्यतिथी उत्सवातील संगीत रजनी कार्यक्रमातील प्रसंग**




पं. पोतदारबुवा, श्री. दामुअण्णा जोशी, श्री. दादा, श्री. रामभाऊ विजापुरे




सोलो हार्मोनीयम - श्री रामभाऊ विजापुरे, तबला साथ - अरुण जोशी, सोबत सौ. रजनी करकरे (देशपांडे) श्री. पोतदारबुवा .




**प. पू. टेंबेस्वामी महाराज पुण्यतिथी**
उत्सवातील पूजेचा प्रसंग - पूजा करतांना श्री. सदानंद नाईक



श्री. एम.  एन. कुलकर्णी, ती. दादा, श्री. एस. जी होसमठ, कै. डी. व्ही. जोशी




मान. रत्नमसाहेब, ती. दादा, मान. सत्तूर साहेब



ती. दादा व कै. महाराष्ट्रकवी यशवंत



मान. भालजी पेंढारकर, ती. दादा, श्री. चित्तरंजन कोल्हटकर



मान. बी. शंकरानंदजी, ती. दादा व कै. बाबुराव नाईक



मान. बी. शंकरानंदजी, ती. दादा, श्री. के. आर. गानू




संकेश्वरातील राहते घर




कै. गोपाळ अनंत कामत, कै. दत्तात्रय अनंत कामत (आतेभाऊ)
कै. कृष्णाबाई धाकप्पा (आतेबहीण)

## ग्रंथ मुद्रण प्रारंभ समारंभ




श्री. श्री. सी. गोसावी, श्री. आ. ज्ञा. सोहनी गुरुजी, चि. पालेकर, डॉ. श्री. वसंतराव जोशी, श्री. नामदेव शं. शिरढोणे गुरुजी, प्रा. श्री. नीलकंठ पालेकर, श्री. सदानंद पोवार

श्री. दादांचा




डावा हात

श्री. दादांचा




उजवा हात

श्री. दादांचा



डावा पाय

श्री. दादांचा



उजवा पाय



श्री. दादांच्या समवेत - श्री. दिगंबर जोशी, श्री. श्री. सी. गोसावी, प्रा. निळकंठ पालेकर, श्री. दादा डॉ. श्री. वसंतराव स. जोशी,
श्री. शिरढोणे गुरुजी श्री. द. र. धर्माधिकारी

॥ श्री कृष्ण ॥

कोल्हापूर, महाराष्ट्र
श्री शिवशक ३१७
सोमवार दि. २१-१-१९९१

**श्री. दादा नाईक गौरव समिती**
संकेश्वर

शुभचिंतन,

माननीय श्री. दादा नाईक यांच्या या वाढदिवसानिमित्त त्यांना, माझी ही अगत्याची ओंजळ अर्पण करताना, मला मनापासून आनंद होत आहे. त्यांच्या जीवनाचे विविध पैलू रसिकांना-सन्मित्रांना-सज्जनांना आणि अध्यात्म क्षेत्रातील मंडळींना पूर्ण परिचित आहेत. विशेषतः त्यांनी शिक्षण क्षेत्रात केलेली कामगिरी शिक्षणसंस्थाद्वारे अनेकजणांना ज्ञात आहे.

योजीहिताप्रति निवारुनि पापकर्मे ।
वर्णी बरेंच गुण झाकुनिया कुकर्मे ॥
दे आपणांस असता व्यसनी त्यजीना ।
सन्मित्र लक्षण असें वदतात जाणा ॥

शारीरिक दुर्बलता आणि डोळ्यांच्या अधूपणामुळें लिहिता-वाचता येणे अगदी अशक्य झाले आहे, तरी या चार ओळी त्यांच्या सन्मानार्थ लिहित आहे. पाल्हाळिक व्याख्यानापेक्षा, भाषेच्या अवडंबरापेक्षा अंतःकरणापासून निघालेला एक शब्दही सज्जनांची खात्री करून देण्यास पुरेसा असतो. त्यांच्या हातून असेंच कार्य घडत राहो ही श्रीचरणी प्रार्थना !

शुभचिंतन !

*- भालजी पेंढारकर.*

# माझे वर्गमित्र

*प्राचार्य एम. आर. देसाई*

श्री. नाईक यांची व माझी मैत्री साठ वर्षाचे तूप झाले आहे. त्याला सुवासं आहे, स्वाद आहे आणि झालेली जखम बरी करण्याचे सामर्थ्यही त्याला प्राप्त झाले आहे. हे घृत अत्यंत गुणकारी आहे.

आम्ही हल्ली वर्षातून अनेक वेळा भेटतो, बोलतो व चर्चाही करतो. बरे वाटते; तेंव्हा आणि नंतरही. मन उल्हासित होते आणि मी कामाला जोमाने लागतो.

एक जुनी आठवण- मी राजाराम कॉलेजमध्ये ज्युनिअर मध्ये शिकत होतो, ते दिवस ब्राह्मण व ब्राह्मणेत्तर चळवळीचे होते. त्यावेळी कॉलेजच्या स्नेहसंमेलनासाठी एक मान्यवर पाहुणे आमंत्रिले होते. ते गृहस्थ ब्राह्मण होते. त्यांनी पूर्वी शाहू महाराजांच्यावर अनेक वेळा कटू टीका केली होती. ते पाहुणे म्हणून येतात म्हणून ब्राह्मणेत्तर विद्यार्थी क्षुब्ध झाले होते. पाहुणा बदलण्याची विनंती प्राचार्यांनी फेटाळली. पाहुणे आणण्यास दरबारचे सर्व लोक अनुकूल होते. तर जनता व बहुजन समाजाचा विरोध होता. त्याला विरोध करण्याचे ठरवून त्या पाहुण्यावरचा राग आम्ही व्यक्त केला. उघड विरोधक म्हणूनं मी जाहीर झालो. हे १९३२ साली असावे. त्यावेळी माझ्यावर जवळ जवळ सर्व ब्राह्मण मित्रांनी बहिष्कार घातला, अपवाद फक्त दोनच. एक अमृतराव घाटगे व दुसरे डी. एस. नाईक.

दोघेही अत्यंत हुषार व दिलदार वृत्तीचे, सामाजिक मतभेदांमुळे मैत्रीत त्यांनी कधीही बिघाड आणू दिला नाही.

मला डी. एस. यांच्या विषयी आदर आहे कारण त्यांचे वाचन खोल, चिकित्सक व अनेक अंगाचे शिवाय आपणाला जे आवडते ते सर्वांना मिळावे व त्याची गोडी सर्व मित्रांनी घ्यावी म्हणून त्यांचे जिव्हाळ्याचे विवेचन सतत चालू असे.

मुक्त व विनामूल्य ज्ञानाचा प्रसार हाच त्यांच्या आनंदाचा बहर. ते विद्यार्थी असतांना खुल्या दिलाचे व मोकळ्या मनाचे चालते फिरते प्राध्यापक म्हणून ओळखले जात. कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजपासून ते बिंदू चौकापर्यंत ते कॉलेज सुटल्यानंतर एक तासभरतरी असायचे. सोबत पंधरा-वीस विद्यार्थ्यांचा घोळका. त्या कोंडीत ते दिसायचे मुक्त विद्येचा आनंद ते फैलावत व इतरांनाही सहभागी करत.

त्यांच्या वसतिगृहापासून त्यांना जाण्यास पंधरा ते वीस मिनिटे अवधी लागे परंतु त्याना तो पार करण्यास एक तासाहून अधिक अवधी लागे.

संकेश्वरच्या जगद्गुरुंच्या परिसरात ज्ञानदानाचे कार्य करणारा हा एक प्रामाणिक उपगुरुच होता.

संकेश्वर हायस्कूलचे संवर्धक म्हणून मी त्यांना पाहिले आहे. शिक्षक व प्रामाणिक कार्यकर्ता म्हणून त्यांचे मानाचे स्थान आहे पण हसतमुख व स्नेहाच्या सहवासात उमलणारा व उमलविणारा हा खरा मित्र आहे.

'समानशीले व्यसनेषु सख्यम्' ही उक्ती आमच्या मैत्रीला लागू पडते. दोघांतही जीवनाला सामोरे जाण्याची जिद्द आहे. जगण्यात आनंद मानण्यात यावा लोकांचे भले व्हावे, ही तीव्र इच्छा आहे. जग सुसूत्र आहे. ही धारणा आहे. या वृत्तीला मधु-विद्या म्हणतात.

ती आमच्या रोमारोमांत भिनली आहे, हे आमचे शील आहे आणि दोघांना व्यसनही एकच आहे, या सगळ्यांच्या पाठीमागे काय आहे ? हे पाहण्यासाठी ते परा-विद्येची कास धरु पाहतात. परा-विद्येत मंत्र आले, विधी, ज्योतिष शास्त्र तत्सम आणि त्याच सारख्या आणखी कितीतरी अनेक गोष्टी आल्या. माझा यात प्रवेशही नाही अथवा रसही नाही. अपरा-विद्येने म्हणजे भौतिक ज्ञानाच्या माध्यमातूनच मी अज्ञात समस्यांचा मागोवा घेतो. माझे उपनिषदे व ऋग्वेद या मधूनच संशोधन चालू आहे.

आम्ही जेव्हा भेटतो तेव्हा खूप चर्चा होते काही गोष्टींवर प्रकाश पडतो, विचारांना चालना मिळते आणि मुख्य म्हणजे प्रत्येक भेटीतून जास्तच आनंद मिळतो. या व्यसनामुळे आमची मैत्री उत्तरोत्तर दृढ झाली आहे.

डि.एस. हे कल्याण मार्गाचे पथिक आहेत. त्यांची वाटचाल अविरत आहे. मी माझ्या स्वार्थासाठी का होईना पण त्यांना पूर्ण शंभर वर्षाचे आयुष्य इच्छितो. हे आयुष्य धडधाकट बुद्धीचे व निरोगी असावे शिवाय त्यातून अध्यात्माचा स्त्रोत जिवंत सारखा असावा अशी माझी परमेश्वराच्या चरणी प्रार्थना.

आम्ही आता थोडेच मित्र उरलो आहोत. नदीकाठच्या वटवृक्षासारखे. माझ्या वीस-एक मित्रांपैकी आता फक्त जिव्हाळ्याचे म्हणून पाच-सातच आहेत. निसर्गामुळे उन्मळून पडलेले वटवृक्ष मी पाहतो आहे परंतु आम्हा दोघांनाही एक समाधान आहे ते हे की आमच्या पारंब्या काठच्या जमिनीत खूप खोलवर गेल्या आहेत त्यातून नवीन वटवृक्ष वर येत आहेत. काही मातृ व पितृ वृक्षापेक्षा जास्त सरस व सतेज आहेत. हीच आमच्या आयुष्याची इति कर्तव्यता. हाच आमचा आनंद आणि हेच आमचे व्यसन.

... ......

# माझे अनधिकृत गुरु

*मा. ना. कुलकर्णी*

श्री. धोंडोपंतांचा परिचय १९३८ मध्ये कै. ती. मामांनी काही काळ संकेश्वरला बिऱ्हाड केले होते त्यावेळी झाला. वयाने ते वडील होतेच शिवाय एका शाळेत ते मुख्याध्यापकही होते. मी त्यावेळी मुंबईला महाविद्यालयाच्या शेवटच्या वर्गात शिकत होतो. त्यांची ऊठबस कै. ती. मामांच्या समवयस्क मंडळींत असे आणि मी सुट्टीत थोड्या दिवसासाठीच आलो होतो. यामुळे त्यावेळचा त्यांचा परिचय केवळ तोंडओळखीचाच होता. काहीं निमित्ताने एकदा माझे स्नेही श्री दादासाहेब गळतगेकर आमच्याकडे आले असताना त्यांचा आणि श्री. धोंडोपंतांचा संगीत विषयावर वादविवाद झाला होता. मी त्यात प्रत्यक्ष भाग घेतला नाही पण तो ऐकून 'हे एक घमंडी गृहस्थ आहेत' असा श्री. धोंडोपंतांविषयी माझा ग्रह झाला. १९४० मध्ये पदवीधर झाल्यानंतर श्री. धोंडोपंतांच्या शाळेत शास्त्रशिक्षक म्हणून लागलो. शाळेचे सूत्रचालक कै. ती. डॉ. जोशी आम्हा दोघांनाही त्या शाळेत आणण्यास कारणीभूत आणि वडिलधारे म्हणून आदरणीय होते. वर उल्लेखलेल्या पूर्वग्रहामुळे आमचे परस्परांशी कितपत जमेल ही शंकाच होती. त्यावेळी मलाही माझ्या वाचनाची घमेंड होती. पण श्री. धोंडोपंतांचे स्वरूप माझ्या लक्षात येऊ लागले. त्यांचे वाचन आणि पाठांतर अफाट होते. इंग्रजी काव्यातीलच काय पण नाटकांतील आणि कादंबऱ्यातील उतारेच्या उतारे ते पाठ म्हणून दाखवत. त्यांच्या घरी गेलो असता अक्षरशः हात घालेल तेथे पुस्तके मिळायची आणि ती श्री. धोंडोपंतांनी सूक्ष्मपणे अभ्यासिलेली असायची. माझी घमेंड खाडकन् उतरली. त्यांचे इतर स्नेही आणि सहकारी वाङ्मयाच्या क्षेत्रात अगदीच अरसिक होते. त्यामुळे माझ्यासारख्या वाङ्मयाशी निदान तोंडओळख असणारा श्रोता या दृष्टीने त्यांनाही माझ्याविषयी जिव्हाळा वाटू लागला पुढे त्यांनी मला हाताखालचा शिक्षक न मानता पाठचा भाऊ समजून हाताला धरून शिक्षणक्षेत्रातला श्रीगणेशा शिकविला. पुढची अडीच वर्षे मी अगदी सावलीसारखा त्यांच्या सहवासात राहिलो आणि त्या अवधीत काठीने धोपटून पाहण्याचा प्रयत्नही न करता या गोरा कुंभाराने माझे मडके घडविले आणि ताप लागू न देता भाजून पक्के केले. ही अडीच वर्षे गुरुसेवेची नसली तरी गुरुसहवासातील तपश्चर्या या स्वरूपाची माझ्या जीवनात झाली. १९४२ च्या चळवळीत भाग घेतल्याने मी वर्षभर शिक्षण क्षेत्रातून बाहेर होतो पण कारावासातून परतल्यावर पुनः शिक्षण क्षेत्रात सोलापूरला जाण्याचा माझा विचार आहे असे कळताच श्री. धोंडोपंत अक्षरशः धावत आमच्या गावी आले आणि पुनः संकेश्वरास घेऊन गेले. यानंतर श्री. धोंडोपंत स्वतः शिक्षण क्षेत्रातून निवृत्त होण्याच्या दृष्टीने आटपाआटपी करू लागले होते. त्यावेळच्या एका प्रसंगाने मला त्यांचे जे दर्शन झाले

त्यामुळे केवळ शिक्षण क्षेत्रातच नव्हे तर एकंदर जीवनात मी त्यांना म. गांधींच्या खालोखाल गुरु मानू लागलो. तो प्रसंग असा -

संकेश्वरांतील शाळा आर्यसमाजाच्या कोल्हापूर शाखेने चालविली होती. स्थानिक लिंगायत समाजाचा आर्य समाजावर रोष होता. त्यामुळे शाळा आर्य समाजाकडून काढून घेऊन एखाद्या लिंगायत संस्थेकडे देण्याचा त्यांचा विचार होता. श्री. धोंडोपंतांनी त्यांना सांगितले, " तुमचा रोष आर्य समाजावर असेल तर शाळा त्यांच्याकडून अवश्य काढून घ्या पण ती बाहेरच्या दुसऱ्या संस्थेकडे देण्यापेक्षा स्वतःची स्थानिक संस्था स्थापन करून आपल्या हाती ठेवा." लोकांना ते पटले आणि " ते कसे करायचे ते तूंच सांग आणि कर" असे त्यांनी श्री. धोंडोपंतांना सांगितले. श्री धोंडोपंतांच्या शब्दाला आर्य समाजात मान होता त्यामुळे श्री. धोंडोपंताना त्यांची समजूत काढणे सोपे गेले आणि संकेश्वरात एक नवी शिक्षण संस्था निर्माण झाली.

त्यावेळी त्यांचे एक स्नेही त्यांचेकडे आले आणि म्हणाले," अरे, हे तू काय चालविले आहेस ? " त्याला श्री. धोंडोपंतांनी दिलेले उत्तर मी स्वतः ऐकले आहे आणि ते माझ्या मनावर कोरले गेले आहे. ते म्हणाले," या गांवात लिंगायत बहुसंख्य आहेत. त्यांच्या मुलांसाठी मुख्यतः शाळेची आवश्यकता आहे या दृष्टीने शाळा त्यांच्या हाती जाणे आणि राहणे आवश्यक आहे. शाळा माझ्यासाठी नसून गावासाठी आहे."

तेव्हापासून श्री. धोंडोपंत हे माझे नित्यगुरु झाले आहेत. त्यांनी स्वतः मला शिष्य मानले नाही पण सख्या भावापेक्षा अधिक प्रेमाने वागविले आहे. ते स्वतः गांधीभक्त नाहीत. त्यांच्या जीवनात अनेक परिवर्तने होत ते प्रथम व्यापारी आणि शेवटी आध्यात्मिक वृत्तीचे झाले. या दोन्ही क्षेत्रांशी माझा संबंध नाही. किंबहुना माझी गांधीभक्ती आणि त्यांची आध्यात्मिकता यावर आम्ही दोघांनी वादच नव्हे तर चर्चाही टाळलेली आहे पण आंतरः कोऽपि हेतुः आम्हां दोघांना जखडून ठेवून गेला आहे.

## स्थितप्रज्ञ धोंडोपंत

*मा. ना. कुलकर्णी*

स्थितप्रज्ञ हे विशेषण अर्थवादात्मक अथवा प्रशंसात्मक नाही. मी ते बुद्धिपुरःसर उपयोजिले आहे. भगवद्‌गीतेतील स्थितप्रज्ञ काल्पनिक अथवा अलभ्य नाही. तो वास्तव आहे पण विरळा आहे. अशा विरळ्या वास्तव स्थितप्रज्ञांमध्ये धोंडोपंतांचा समावेश होतो.

पन्नास वर्षांपूर्वी एका शाळेच्या निमित्ताने मी प्रथम धोंडोपंतांच्या निकट सहवासात आलो. दोन वर्षे त्यांच्या संगतीत सावलीप्रमाणे वावरलो त्यांची अंतर्बाह्य ओळख करून घेतली आणि त्या आधारावरच मी त्यांना स्थितप्रज्ञ म्हटले आहे.

मुळ व्यापारी पेशातल्या धोंडोपंतांना त्यांच्या एका वडिलधाऱ्या हितचिंतकानी एक मोडकळीस आलेली शाळा सावरून धरण्यासाठी बोलावून आणले. सातएक वर्षे धोंडोपंत या क्षेत्रात होते. पहिल्या दोन वर्षात त्यांनी शिक्षणक्षेत्राचा सखोल अभ्यास केला आणि पुढील पाच वर्षात शाळेला सुंदर स्वरूप प्राप्त करून दिले. या काळांत धोंडोपंत अक्षरशः अहर्निश शाळेशी तद्रूप झाले होते. त्यांची 'प्रज्ञा' केवळ शिक्षण विषयात स्थिर झाली होती. या काळातच मला त्यांनी केवळ दोन वर्षांत मातीतून मूर्ती घडवावी तसे उच्छृंखलपणांतून बाहेर काढून शिक्षक केले. मी स्वतः या क्षेत्रात विविध थरांवर तीस वर्षे वावरलो पण त्यांच्यासारखा दुसरा शिक्षणतज्ञ मला पाहायला मिळाला नाही.

शाळा सोडल्यानंतर धोंडोपंत एका वैद्यक ग्रंथाला प्रस्तावना लिहिण्याच्या कामात गुंतले. दोन वर्षात भारतीय तत्त्वज्ञानाचा वैद्यकीय संदर्भांत सूक्ष्म अभ्यास करून त्यांनी एक सुंदर विस्तृत प्रस्तावना लिहून दिली. यावेळी त्यांची प्रज्ञा दर्शनशास्त्रात स्थिरावली होती.

एका उपद्व्यापी व्यापाऱ्याला आपला व्याप सांभाळण्यासाठी एका समर्थ सहाय्यकाची आवश्यकता भासल्याने त्याने धोंडोपंतांना आपल्याकडे व्यवस्थापक म्हणून घेतले. जवळजवळ दहा वर्षे ते या कामात रमले होते पण गुंतले नव्हते. व्यापाऱ्याने व्याप आवरण्याचा निर्णय घेताच धोंडोपंत अंग झाडून मोकळे झाले आणि घरी परतले. आतां काही व्यापारी मित्रांनी त्यांना आपले भागीदार म्हणून घेतले. कापूस, तंबाखू यांच्या व्यापारातील मर्म धोंडोपंतांनी समजावून घेतले आणि भागीदारांना ते समजावून दिल्यानंतर भागीदारीही सोडली. वीस वर्षात चार वेगळ्या क्षेत्रात वावरतांना धोंडोपंत पूर्वीच्या क्षेत्राचे विचारही मनांत आणीत नसत. ही अलिप्तता हे त्यांच्या स्थितप्रज्ञतेचे दुसरे लक्षण आहे.

धाकट्या भावाला कांही साक्षात्कार होऊन त्याने धोंडोपंतांना अध्यात्मात ओढले. 'दृष्टांतवाद' (occultism) आणि 'साक्षात्कारवाद' (Mysticism) यांचा धोंडोपंतानी सूक्ष्म अभ्यास केला. व्यापार बंद झाला पण अध्यात्माचा व्याप फार वाढला. अनेक मान्यवर साहित्यिक, डॉक्टर, उद्योगपती, राजकारणी पुढारी, मंत्री धोंडोपंतांचे 'शिष्य' झाले. त्यांच्या पायाशी बसू लागले. पण धोंडोपंत 'महाराज' बनले नाहीत. अध्यात्म हा त्यांनी अर्थसंपादनाचा मार्ग होऊ दिला नाही. निर्लोभता हे त्यांच्या स्थितप्रज्ञतेचे तिसरे लक्षण होय. संसाराच्या पूर्वार्धांत चुलते आणि वडील यांचा मृत्यू, आर्थिक आपत्ती आणि उत्तरार्धांत आई, पत्नी आणि धाकटे बंधू यांचे मृत्यू असे आघात धोंडोपंतांना सोसावे

लागले. पण ते डळमळले नाहीत. मोहाप्रमाणेच शोकापासूनही ते अलिप्त राहिले आणि धीराने संसार सावरून धरला. ही अक्षुब्धता स्थितप्रज्ञेचे लक्षण नव्हे काय ? धोंडोपंतांचा मित्र परिवार आणि शिष्यपरिवार फार मोठा आहे. त्यांत बौद्धिक, आर्थिक, सामाजिक दृष्ट्या भिन्न-भिन्न पातळीवरचे लोक आहेत. त्या सर्वांशी धोंडोपंत सारख्याच जिव्हाळ्याने वागतात- तो प्रांतीय-केंद्रीय मंत्री असो अथवा त्याचा ड्रायव्हर असो. या समदर्शित्वाचाही स्थितप्रज्ञ लक्षणांत अंतर्भाव होतो. पन्नास वर्षे उलटून गेली असतानाही धोंडोपंतांविषयी माझा आदरभाव किंचितही कमी झाला नाही.

गुरुभ्योनमः

## बहुत जनांसि आधारु-धीमंत योगी

*डॉ. वसंत स. जोशी*

महाराष्ट्र-कर्नाटकातील प्रजेला जीवनदान देणाऱ्या पुण्यसलिला हिरण्यकेशीच्या तीरावरील सुविख्यात शंकरलिंग हा श्रीशंकराचार्यांचा मठ म्हणजे संकेश्वरमधील एक दर्शनीय व वंदनीय स्थान. त्याच पवित्र क्षेत्रात गांधी चौकातील विठ्ठलमंदिराजवळील आजरेकर नाईकांचे घर आणि त्यात वास्तव्य करणारे ती. दादा नाईक हेही अनेकांचे श्रद्धास्थान. एक सांस्कृतिक केंद्र. तेथे कौटुंबिक जिव्हाळा आहे. प्रेमळ आतिथ्य आहे. परमार्थाचा परिमल आहे. संगीताचा सुरेलपणा आहे. अंतरंगातील मित्रांशी होणारा हास्यविनोद आहे. आणि सारे वातावरण स्वागतशील आहे. ते फिरते केवळ दादांना केन्द्रस्थानी धरून. एकदा दादांनी एखाद्याला आपला मानला की तो घरातील साऱ्यांचाच 'आपला' होतो.मग दादा गावात असोत, नसोत. त्याला ते घर परके असे वाटणारच नाही. त्यामुळे दादा ज्या गावी आणि ज्या स्थळी असतील, तेथे त्यांचे चाहते जमतात. क्षेमकुशल विचारले जाते. काही क्षणांच्या सहवासानंतर मिळणारे समाधान घेऊन चाहता परततो. दादांच्या जवळ कोणतीही सत्ता नाही आणि मत्ताही नाही. आहे ते इतरांना धीर देण्याचे, खचलेल्यांना उभे करण्याचे सामर्थ्य ! त्यामुळेच अनेक क्षेत्रांतील लहानथोरांना ओढ असते, ती त्यांच्या भेटीची आणि सहवासाची.

संकेश्वरातील जुनी पिढी त्यांना 'नाईक मास्तर' म्हणून ओळखते. कारण तेथील हायस्कूलचे ते संस्थापक मुख्याध्यापक होते. त्यांचे स्नेही त्यांना 'धोंडोपंत' म्हणून संबोधतात. त्यांची भावंडे आणि मुले त्यांना 'दादा' म्हणतात. आणि असे हे संकेश्वरचे श्री. धोंडो श्रीपाद नाईक आज त्यांच्या चाहत्यांचे आदरणीय 'दादा नाईक' म्हणूनच ओळखले जातात. अलीकडे त्यांचे वास्तव्य कोल्हापुरात त्यांचा सुपुत्र चि. अनिल याचेकडे

असले, तरी संकेश्वरशी असणारा त्यांचा अनुबंध आणि साहचर्य हे अतूट आहे. नाईक घराण्याचा वंशवृक्ष तेथे फुलतो बहरतो आहे. चार सख्खे आणि तीन चुलत भाऊ, बहिणी त्यांची कुटुंबे, मुले, नातवंडे यांनी सारे घर भरून, गजबजून गेलेले असे. या साऱ्यांचा योगक्षेम व्यवस्थित चालू राहण्यासाठी दादांची सतत धडपड असे. एवढ्या मोठ्या कुटुंबात अनेकांच्या आवडी निवडी, राग लोभ, रुसवा, समज-गैरसमज हे स्वाभाविकच असणार. तथापि अंतिम निर्णय दादांचा असे. एकत्रकुटुंबाच्या प्रमुखाला स्वार्थविरहित वृत्तीने वागावे लागते. काही कठोर निर्णय घ्यावे लागतात. त्यासाठी क्षोभही ओढवून घ्यावा लागतो. आणि दृष्टी सदैव संतुलित ठेवावी लागते. आजच्या काळातील असा दुर्मिळ कुटुंबप्रमुख दादांच्या रूपाने पाहावयास मिळतो.

माझे सासरे कै. दामोदर व्यंकटेश जोशी हे दादांचे अंतरंग मित्र. त्या उभयतांनी परस्परांच्या कुटुंबात वेगळेपणा कधी मानलाच नाही. त्यामुळे मीही ती. दादांच्या कुटुंबातीलच एक होऊन गेलो. माझ्या सुदैवाने अनेक थोर पुरुषांच्या सहवासात राहण्याचे भाग्य मला लाभले आहे. 'सतां सद्भिः संगः कथमपिहि पुण्येन भवति' या सुभाषितात म्हटल्याप्रमाणे कदाचित पूर्वजन्मातील पुण्याईमुळे ते प्राप्त झालेले असेल. पण माझ्या आयुष्याच्या वाटचालीत त्यांचा मोठा वाटा राहिलेला आहे. गेली सुमारे चाळीस वर्षे मी त्यांच्या सहवासात आहे आणि त्यातील काही वर्षे तर संकेश्वरातच गेलेली आहेत. त्यामुळे दादांचे बहुविध स्वरूपाचे व्यक्तिमत्व मला जवळून पाहता आले आहे. प्रारंभीच्या काळात (आणि नंतरही) साहित्यविषयक चर्चा त्यांच्याशी होत असे. त्यात विचारांना शिस्त येण्यासाठी कोणत्याही विषयांची व्याख्या करण्याचा त्यांचा आग्रह असे. कोटिक्रमयुक्त प्रश्नोत्तरे होत. विलक्षण स्मरणशक्ती आणि अनेक विषयांचा आवाका स्तिमित करणारा असे. बौद्धिक सामर्थ्यामुळे आव्हान देण्याची त्यांची प्रवृत्ती असली, तरी त्यामागे अस्सल पारखून घेण्याची भूमिका असे. जिथे योग्यता आढळे, तिथे दादा नम्र होत. त्या व्यक्तीविषयी गौरवोद्गार काढीत. 'दुर्जनासी पंचानन । तुका रजरेणू संतांचा' या तुकारामांच्या उक्तीचे स्वाभाविक स्मरण त्यामुळे होई. अनेकविध विषयांवरील मराठी, इंग्लिश, हिंदी, संस्कृत भाषांतील ग्रंथांचे त्यांचे वाचन, सतत चालू असते. त्यामुळे त्यांच्या वृत्तीत आणि चर्चेत ताजेपणाचा प्रत्यय येत राहतो. आपल्या मुला नातवंडांत साहित्य, संगीत, क्रीडा यांची अभिरुची निर्माण करण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. त्यामुळे त्या त्या विषयावरील निवडक ग्रंथांची खरेदी ते करतात. 'मराठी विश्वकोश' किंवा 'भारतीय संस्कृति कोशा' सारखे कोश वाङ्मय आवर्जून त्यांच्या ग्रंथसंग्रहात विराजमान होते. वाचनातील उचित संदर्भ दादांच्या चर्चेत येत राहतात. त्यांना कोणत्याही विषयाचे वावडे नाही. त्यामुळे शेती, व्यापार, वैद्यक, ज्योतिषशास्त्रापासून परमार्थ विचारापर्यंत अनेक विषयांचा त्यांचा व्यासंग चालू असतो. भेटावयास येणाऱ्या त्या त्या क्षेत्रातील व्यक्तीस ते नव्या ग्रंथाची माहिती देतात. किंवा शक्य तर त्यांना वाचावयासही देतात. माझ्या स्वतःच्या एम्. ए. च्या आणि नंतरच्या

अध्ययनातही त्यांचे साहाय्य अनेक प्रकारे झालेले आहे. पुढे ज्यावर मी पीएच.डी. चा अभ्यास केला आणि ज्यात मुक्तेश्वराने लिहिलेले अप्रकाशित 'उत्तरकांड' मिळाले, त्या 'भावार्थ रामायणाची' हस्तलिखित प्रतही दादांनीच मला मिळवून दिली होती. इतरांच्या बोलण्यातून नव्या विषयांची किंवा ग्रंथांची माहिती मिळाली, तर ते मिळवून वाचल्या-खेरीज त्यांना स्वस्थता वाटत नाही.

त्यांचा ज्योतिष विषयाचा अभ्यास असल्याने पत्रिका पाहणे, तयार करणे, उपाय सुचविणे, भूत-भविष्याविषयी निदान करणे इ. आनुषंगिक गोष्टी ते करतात. परंतु त्यावर त्यांचा भर असत नाही. त्यांच्या सांगण्याप्रमाणे केलेल्या गोष्टी सफल झाल्याचा मात्र अनेकांचा अनुभव आहे. स्वत: दादांचा या ठोकताळ्यापेक्षा इन्टियूशनवर विश्वास आहे. आणि ती 'श्रीमहाराजांची कृपा' आहे, अशी त्यांची श्रद्धा आहे. भारतीय व पाश्चात्य वैद्यक शास्त्राचाही त्यांचा अभ्यास असून अनेक रोग, त्यांचे स्वरुप, व त्यावरील उपाययोजना यांची चर्चा ते तज्ज्ञांशी करीत असतात. शस्त्रक्रियेच्या संदर्भात अनेक नामवंत शल्य-विशारदांना दादांच्या आश्वासक दिलाशामुळे धीर वाटला आहे व त्या शस्त्रक्रिया यशस्वी तरी झाल्या आहेत किंवा टाळल्या गेल्या आहेत. राजकारणातील आमदार, खासदार, मंत्री, सहकार क्षेत्रातील पदाधिकारी व कार्यकर्ते, शेती, बँकिंग, उद्योग, चित्रपट या क्षेत्रातील अनेकांना त्यांचा सल्ला व मार्गदर्शन प्रेरक ठरलेले आहे. शिक्षण हे तर त्यांच्या आवडीचे क्षेत्र. संकेश्वर, निपाणी, अकोळ या ठिकाणच्या संस्थांच्या उभारणीत त्यांचा सहभाग होताच. तथापि कोल्हापूर वा अन्यत्रच्या शिक्षणक्षेत्राशी संबंधित व्यक्ती व संस्थांनाही त्यांचे मार्गदर्शन होत असते. कौटुंबिक कलह, कायदे कानूंच्या कटकटीत सापडलेली प्रकरणे यामुळे त्रस्त झालेली माणसे दादांकडे येतात आणि दादाही न कंटाळता तास न् तास नव्हे दिवस न् दिवस त्यांचेसाठी खर्ची घालतात आणि हे करताना स्वत:च्या प्रकृतीचाही विचार त्यांना रहात नाही. कुटुंबाच्या उपजिविकेसाठी त्यांनी कापूस, मिरची, तंबाखू यासारख्या पदार्थाचा व्यापारही काही काळ केला. एकत्रकुटुंबाचा भार वाहताना इतरांना तोशीस न लागता प्रपंच चालविण्याची त्यांची भूमिका असे. अर्थार्जनाचे साधन संपुष्टात आले, तरी विचलित न होता, ते सहजतया दुसऱ्या क्षेत्राकडे वळत. तंबाखूच्या व्यापारातही ते व्यापारी असे राहिले नाहीत किंवा वाटलेच नाहीत. या क्षेत्रातील श्रेष्ठांशी संबंध आला, तरी त्यांच्यावर छाप असे ती दादांच्या विद्वत्तेची, बहुश्रुततेची आणि ऋजुतेची. त्यामुळे त्याही क्षेत्रात ते आदराचा विषय बनून राहिले. कित्येकवेळा वैयक्तिक सल्ला-मसलतीसाठी ते दादांकडे धाव घेत, पण तेथे व्यापार व्यवहाराचा संबंध बिलकुल नसे. संगीताची आवड त्यांना मूलत: आहे आणि जाणही आहे. अनेक गायक/वादकांना दादांच्यासाठी गाण्या-बजावण्यात आनंद वाटतो. कारण एका दर्दी रसिकांची दाद त्यांना मिळतेच, पण त्यांच्या प्रेमळ सहवासाचा लाभही होतो. संगीतशास्त्राचा केवळ पुस्तकी अभ्यास नसून आस्वाद घेण्याची रसिकता त्यांच्या ठिकाणी आहे. कविवर्य भा. रा. तांबे यांच्या कविता त्या त्या

रागानुसार गायल्याने होणाऱ्या भावाविष्काराचे दर्शन त्यांनी तांब्यांची ' घाबरू नको । बावरू नको । क्षण भीतीने गांगरू नको' ही कविता स्वत: गाऊन आम्हाला घडविले होते. १९६० साली मी धारवाडच्या कर्नाटक कॉलेजमध्ये असताना धारवाडात ख्यातनाम गायिका श्रीमती केसरबाई केरकर यांचा गाण्याचा कार्यक्रम होता. त्यावेळी 'त्यांचे गाणे जरूर ऐका' असे दादांनी पत्राने मला कळविले. त्यानंतर थोड्याच दिवसात केसरबाईंचे देहावसान झाले. संकेश्वरास गेल्यावेळी दादांनी केसरबाईंची एल्.पी. रेकॉर्ड मला ऐकवली. उत्तम गाण्यांच्या जुन्या रेकॉर्डस् आणि कॅसेटसचा त्यांचा चांगला संग्रह आहे. अलीकडे विचारले असता केसरबाई, बालगंधर्वादींच्या रेकॉर्डस् त्यांनी सुप्रसिद्ध गायक संगमेश्वर गुरव यांना दिल्याचे सांगितले. संगीतास्वाद कसा घ्यावा, याविषयीच्या कॅसेट्सही त्यांच्या संग्रहात आहेत आणि त्यावरील त्यांच्या चर्चाही गायनाच्या मैफलीसारख्या रंगतात.

गूढविद्या हाही दादांच्या अभ्यासाचा, प्रत्ययाचा विषय आहे. श्री नृसिंहसरस्वतींवरील प्रगाढ श्रद्धा आणि अंत:प्रेरणा यामुळे त्यांनी अनेकांच्या जीवनातील दु:खे दूर केलेली आहेत. भस्मधारणेमुळे आणि दादांनी सांगितलेल्या उपायांमुळे अनेकांना आलेले अनुभव मुक्तकंठाने सांगितले आहेत. माझ्या परिचयातील कमलाकर किंवा माझ्या सासूबाई यांना झालेल्या बाधेचे अनुभव तर विलक्षण आहेत. संचाराच्या आवेशात उर्दू, फारसी, किंवा कन्नड अशा अज्ञात भाषात बोलणे. एरव्ही कल्पनाही करणार नाहीत अशा पदार्थांची मागणी करणे अशा गोष्टी घडत. त्या संदर्भात दादांनी सांगितलेले उपाय केल्यानंतर बाधा नाहीशी होऊन पूर्ववत कौटुंबिक जीवन चालू राहिल्याचे अनुभव आहेत.

'गुरूचरित्रादि' ग्रंथांचे पठन हे विशिष्ट कामनापूर्तीसाठी केले जात असले, तरी त्याच्या पारायणाच्या कालावधीत प्राप्त संकटाची तीव्रता कमी होऊन आत्मविश्वास निर्माण होऊ शकतो, अशी माझी धारणा आहे. दादांनी मला 'देव्यपराधक्षमापनस्तोत्राचे' पठन करण्यास सांगितले होते, परंतु ते एके दिवशी म्हणत असतानाच माझ्या वडिलांच्या देहावसानाची वार्ता मला समजली. त्यामुळे स्तोत्राविषयीची माझी भावना विचलित झाली. त्यावेळी 'सृष्टिक्रमानुसार घटना घडत असतात, त्यांचा आपल्या उपासनेत व्यत्यय आणू नये,' असे दादांनी सांगितले. दुसरे दादांनी आणि माझे सासरे ती.स्व. अण्णा यांनी सांगितलेले 'अघोरकष्टनिवारण' हे स्तोत्र आजही माझ्या पठनात आहे. त्या विषयीचा माझा एक अनुभव येथे सांगण्यासारखा आहे. जळगावची माझी मुलगी दुसऱ्यावेळी गरोदर असताना अचानक एका सायंकाळी 'ती काविळीने आजारी असून तिला हॉस्पिटलमध्ये ठेवले आहे. ताबडतोब निघा' अशी तार आली. आधीच गरोदरपण ,त्यांत काविळीचा आजार यामुळे एक चिंताजनक स्थिती आम्हा उभयतांची झाली. वाईहून निघून जळगावला पोचेपर्यंत मी अन्य कोणताही विचार न करता स्तोत्रपठन करीत राहिलो होतो. सकाळी घरी पोचताच मुलगी सुखरूप बाळंत झाली आहे आणि तिला मुलगा झाला आहे अशी सुवार्ता कानावर पडली . मनावरचा ताण एकदम दूर झाला. डोळे पाणावले. हॉस्पिटलमध्ये

गेलो. बाळ-बाळंतिणीची भेट घेऊन घरी परतलो. परतत असताना मागे हॉस्पिटलकडे वळून पाहिले, तर मुलीला ज्या खोलीत ठेवली होती, तिच्यावर औदुंबराची एक फांदी डुलत असलेली दिसली ! या अनुभवाचे विश्लेषण कसे करावयाचे ?

श्रद्धा आणि तार्किकता / बुद्धिवाद यांचे विलक्षण मिश्रण दादांच्या स्वभावात दिसून येते. अनेकांची दु:खे जाणून घेण्याचा, ती निस्तरण्याचा त्यांचा प्रयत्न सतत चालू असतो. एखाद्याकडून झालेल्या अधिक्षेपाकडे किंवा विस्मरणाकडे ते दुर्लक्ष करतात. रामदासांनी 'देव ओळखावा' हे सांगितले, तर दादांनी 'माणूस जाणावा' हे शिकविले. माणसाचे शारीरिक मानसिक दुबळेपण त्याला अगतिक बनविते. अशावेळी दादांची भूमिका त्याला दिलासा देण्याची, मार्गदर्शनाची असते. संस्कृत आणि इंग्लिश भाषातील अनेक तत्त्वज्ञानपर ग्रंथांचा आणि जागतिक कीर्तीच्या तत्त्ववेत्त्यांचा त्यांचा अभ्यास आहे. त्यांच्या विचारसरणीचे यथार्थ आकलन आणि तुलनात्मक विवेचन यांतून दादांच्या व्यक्तिमत्वाचे आगळे दर्शन घडते. त्यातूनही त्यांचा स्वत:चा जीवनविषयक दृष्टिकोण प्रभावीपणे प्रकट होत राहतो. कोणत्याही विषयाची दुसरी बाजू पाहण्याच्या त्यांच्या तरल दृष्टीमुळे विचारांना एक वेगळी दिशा सहजपणे लाभते. एकारलेपणा दूर होण्यास मदत होते. कोणताही विचार किंवा माणूस यांचेकडे झापड लावून न पाहता त्याला जाणून घेण्याचा व जवळ जाण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. त्यामुळे एरव्ही टीकेचा किंवा विनोदाचा विषय झालेल्या व्यक्तींच्या आगळेपणाचे लख्ख दर्शन घडू शकते.

दादांच्या सहवासात आलेली कोणतीही व्यक्ती त्यांना गौण नसते. त्यांना उपेक्षेने वा तुच्छतेने न वागविता समजून घेण्याकडे त्यांचा कल असतो. आपल्या जीवनात होईल तितके दुसऱ्याच्या उपयोगी पडावे, ही दृष्टी असल्यामुळे काही वेळा व्यावहारिक दृष्टीने अयोग्य किंवा न पटणाऱ्या गोष्टी करण्याचीही त्यांची तयारी असते. कोणाचे त्यामुळे भले होत असले तर त्यासाठी टीकाही सहन करण्यास ते सिद्ध असतात. त्यामुळे अज्ञ आणि तज्ज्ञ यांच्या गराड्यात ते सदैव असलेले दिसतात. दादांचे राग व लोभ दोन्ही तितकेच तीव्र आहेत. परंतु अनुचित वर्तनाने क्षुब्ध होणारे दादा त्याच व्यक्तीच्या हितासाठी धडपडतानाही आढळतात. विविध क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींनाही दादांचा आधार वाटतो. कारण प्रत्येक तज्ज्ञ हा शेवटी 'माणूस' असतो. त्याच्यातील 'माणूसपणाला' हळुवार स्पर्श करण्याची दादांची वृत्ती स्वाभाविकपणे त्याला त्यांच्याकडे खेचून घेते. त्यामुळे त्यांच्या सहवासात आलेली प्रत्येक व्यक्ती ही त्यांची होतेच, पण त्याचे सारे बायकोमुलाबाळादि कुटुंबच त्यांच्या वात्सल्याचा, प्रेमाचा विषय बनते. भेटणाऱ्या व्यक्तीच्या कौटुंबिक जीवनाची आणि त्यातील अडचणींची चांगली जाणीव असल्याने ते साऱ्यांची अगत्याने चौकशी करतात. त्यांची कामे व्हावीत म्हणून शक्य त्या ठिकाणी शब्द टाकणे, पत्र पाठविणे, फोन करणे अशा अनेक मार्गांनी स्वत:हून ते प्रयत्न करीत राहतात. आणि हे करताना एखादा सामान्य माणूसही त्यांच्या आस्थेचा, सहानुभूतीचा विषय असू शकतो.

जीवनातील कठीण प्रसंगांत दादांनी दिलेला धीर, केलेली मदत, सहकार्य यांचे ऋण तो सतत उराशी बाळगतो. त्यांचेकडे येणाऱ्या व्यक्तींच्या मनातील श्रद्धाभाव हा वरपांगी नसतो. त्याचा चेहरा त्याच्या अंत:करणातील भावना बोलून दाखवीत असतो. त्यांना शब्दरूप हवे असतेच असे नाही. ती. स्व. दादा नाईकांसारखे सत्पुरूष समाजाचे जीवन समृद्ध करीत असतात. त्यांचे केवळ अस्तित्वही संजीवक असते.

## ती. दादा- एक हिमनग

*भाऊ ऊर्फ विद्याधर नरहर वझे, कोल्हापूर.*

आमच्या दादांना हिमालयाची उपमा दिली तरी फारसे चूक होणार नाही. मग हिमनगावर का आलो- कारण दादांचे बहुस्तरीय, विविधढंगी व्यक्तिमत्त्व-सगळ्यांना माहित असेल की नाही शंका आहे. ज्या त्या व्यक्तीचा दादांशी त्याच्या विषयापुरता संबंध ! प्रत्येकजण आपापल्या व्यवसायात गुंतल्याने कदाचित दादांच्या इतर पैलूकडे लक्ष द्यायला वेळ नसेल किंवा ती नजरही नसेल. कांहीही असो, दादांच्या आठवणींच्या मधाच्या पोळ्याला स्पर्श झाल्याबरोबर क्षणभर सुचेनासे झाले. अश्रूंनी डोळे तर भरलेच आहेत. त्या बाष्पाने समोरचे काही दिसेना.

दादा माझ्या आयुष्यात मृगाच्या सरीचा मृद्‌गंध घेऊन आले व स्वातीच्या शिंपल्यातील अनमोल मोती बनून काळजाच्या कप्प्यात कायमचे बसले.

सन - १९६९ - जुलैमधील एका धुवाँधार रात्री, अरुण जोशींच्या कॉमर्स कॉलेजसमोरील घरी दादा प्रथम भेटले. पिवळा झब्बा, धोतर, उघडे डोके, शांत कानडी चेहऱ्याचे, हळू आवाजात बोलणारे दादा दिसले. आपुलकीने बोलत दादानी मला केव्हांच आपलेसे करून टाकले. त्यानंतर अनिलचा कोल्हापुरात संसार थाटेपर्यंत दादांचा सहवास माझ्या घराला मिळाला हे माझे भाग्यच म्हणायचे. मनुष्य स्वभाव कोणाला आकळला नाही. तरी देखील जवळ जवळ दोन दशकांच्या सहवासात दादा मला बरेच जवळून पहायला मिळाले. त्यामुळेच दादांच्या उमजलेल्या बहुस्तरीय व्यक्तिमत्त्वाचा एक एक पदर उलगडून तुमच्यासमोर ठेवण्याचा प्रयत्न करीत आहे.

### श्री दत्त उपासक

घरातील धार्मिक संस्कारात वाढून सुद्धा दादा आस्तिक-नास्तिकत्वाच्या सीमेवर होते. काही वैयक्तिक घटनानी त्यांची देवावरची श्रद्धा उडाली. घरातील जमीन करताना परत ती उकरावी, खोदावी लागते. त्या मानसिक पडझडीच्या काळात, दादानां काहीं दैवी अनुभव, साक्षात्कार झाले. श्री नृसिंहसरस्वती महाराजांचा साक्षात्कार ही घटना त्यांच्या

भावी आयुष्याला वळण देणारी ठरली. दादा श्री दत्त उपासक झाले. तसे नृसिंहवाडीला, औदुंबरला किंवा गाणगापूरला दादांच्या वाऱ्या फारच कमी झाल्या आहेत. एवढे कशाला, कोल्हापुरात महालक्ष्मीच्या दर्शनाला ते अगदी क्वचित प्रसंगी जातात. देवाचे दर्शन, पूजा सतत करतो, तो देवभक्त- या सर्वसाधारण धारणेत दादा बसत नाहीत. महाराजांच्या सतत मार्गदर्शनामुळे दादानी सप्ताह, नित्य जप, अन्य उपासना भरपूर केली.

अनेक दत्त उपासकांच्या दादांशी गाठीभेटी झाल्या. त्यांच्यात दादांना मानाचे स्थान आहे. बऱ्याच दत्त भक्तांना महाराजांच्या जागी दादा दिसतात, अशा आशयाची अनेक पत्रे माझ्या वाचनात आली. सांगोवांगी नाही. मलाही एकदां तसे दर्शन झाले आहे.

अर्थात, दादांनी स्वतःला तसे कधी समजले नाही किंवा तसा प्रचारही करु दिला नाही. कारण दादांना बुवाबाजी मंजूर नाही. दत्त संप्रदायावरील त्यांचा अभ्यास त्यांचा अधिकार सांगणारा आहे. त्यावरील सर्व पुस्तक ग्रंथ संग्रह, त्यांच्याजवळ आहे. त्यातील संदर्भ पान-ओळीनिशी त्यांच्या जिभेवर आहे. दादांचे सर्वात धाकटे भाऊ, ती. अप्पा हेही एक थोर उपासक आहेत. श्री वासुदेवानंद टेंबे स्वामींची पुण्यतिथी ते दरवर्षी साजरी करतात. त्यापाठची प्रेरणा दादांचीच ! टेंबेस्वामी महाराजांचे " घोरकष्टोद्धारण स्तोत्र " दादाना अतिशय आवडते. त्याच्या प्रती काढून दादा त्या सर्वांना भेट देतात. या स्तोत्र पठनानंतरचे अनुभव दादांच्या तोंडून ऐकावेत.

आमच्या घराण्यात दत्तभक्ती वंशपरंपरागत आहे. नवल म्हणजे श्री गुरुचरित्र सप्ताह दादांच्या मार्गदर्शनाखाली पहिल्यांदाच मी केला. अनुभूतिसारखा वाटाड्या नाही. दत्त प्रीतीमुळेच मी दादांकडे आकर्षिलो गेलो.

**तत्वज्ञानाचे गाढे अभ्यासक**

दादांचा याबाबतीत व्यासंग फार मोठा आहे. भारतीय व विदेशी तत्वचिंतकांच्या-बरोबर प्रत्यक्ष सहवास व त्यांच्या लेखनावर विवेचन चर्चा ही मोठी ऐकण्यासारखी आहे. या तात्त्विक चर्चेतून जे बोधामृत निघते, ते चिंतनीय असते. बायबल, कुराण, उपनिषदे यांचा तौलनिक अभ्यास त्यानी केल्याने दादांचे सटीप विवेचन फारच उद्बोधक वाटते. दादांचा मूळचा पिंड शिक्षकाचा असल्याने अतिशय सोप्या शब्दात " जे कृष्णमूर्ति " ते समजावून सांगतात, तेव्हां बालगंधर्वांच्या गाण्यासारखे ऐकायला सहज सोपे वाटते. दुर्दैवाने, अशी रंगलेली चर्चात्मक विवेचने गद्यलेखात अजून तरी उतरली नाहीत. उर्वरित आयुष्यात याविषयी काही लिखाण करावे, असा त्यांचा मानस आहे. जे कृष्णमुर्ती, यु. जी. कृष्णमूर्ति दिलीपकुमार, अरविंद घोष ते सोनोपंत दांडेकर, रा. शं. वाळिंबे यांची पुस्तके वाचायला दादा सांगतात.

## ज्योतिषी

पंचांगाच्या ढिगाऱ्यात, उघडे बोडके, नाकावरचा चष्मा सावरणारे, दहा-पंधरा पत्रिका पसरलेल्या, उत्कंठित, आशामय चेहऱ्यांची गांजलेली माणसे, देवादिकांचे फोटो, उदबत्त्यांचा मंद सुवास, पेढ्यांचा पुडा, नारळ - या अशा गराड्यात ज्योतिषी ही असामी आसन जमवून बसलेली दिसते. दादांचा ज्योतिषविषयक दृष्टिकोणच निराळा असल्याने, वरच्या चौकटीत दादा बसत नाहीत. ज्योतिषाच्या आवडीने लोकांना अपेक्षित असलेली प्रश्नांची उत्तरे ते देतात. पण मला नाही वाटत ज्योतिषातील सूक्ष्म अंगाचा, गणिती भागाचा त्यांचा खास अभ्यास आहे. जीवनातील त्रिविध तापानी पोळलेल्या व्यक्तीला कसला विचार पाचार उरलेला नसतो. जो कोणी मार्ग दाखवेल, तेथे जायचे. भविष्याचा कानोसा घेणाऱ्या व्यक्तिला " ज्योतिषी " ही उपाधी समाज चिकटवितो, त्याची चूक नाही.

" ज्याला ज्योतिष विषयाचा अभ्यास करावयाचा आहे, त्याने फलज्योतिष, हस्तसामुद्रिक, अंकशास्त्र, चेहरेपट्टी विषयक ज्ञान इ. सर्व अंगाचा अभ्यास केला पाहिजे. पुस्तके वाचली पाहिजेत, चर्चा केली पाहिजे, कुंडल्या, हात बघितले पाहिजेत, त्यांची रेकॉर्डस् ठेवली पाहिजेत, गरजूंच्या प्रश्नावर तोडगे सांगता यायला हवेत, त्यासाठी त्यांचा अनुभव घेतला पाहिजे, सर्वात शेवटी, अंतःस्फूर्तीची शक्ती सतत जागृतावस्थेत पाहिजे, नाहीतर कितीही विद्वान ज्योतिषी असला तरी त्याची फलिते वरील शक्ती नसेल, तर चुकतात," हे दादांचे विचार मला आज मार्गदर्शक ठरले.

दादांच्या ज्योतिषविषयक पोतडीत एक खास चीज आहे. बऱ्याचजणांजवळ कुंडली नसते, वेळ नमूद केलेली नसते, तारीख-वार माहित नसतो. पण प्रश्न तर असतात. अशा वेळेला, त्यांच्या सहाय्याला धावून आली-स्पंदन कुंडली ! (Vibration Hora-scope) या स्पंदन कुंडलीची भाकिते आश्चर्यकारकरीत्या अचूक ठरली आहेत. ही दादांची एक देणगी आहे. त्याचा उल्लेख कोणत्याही ग्रंथात नाही. " जमले तर लोकांच्या अडचणींचे निवारण या द्वारे करावे, नाहीतर उगाच कांहीतरी मधाचे बोट लावून लोकांना आशेला लावू नये. जे पोटार्थी आहेत, त्यानीच हा व्यवसाय करावा. कांहीतरी सोंगे काढून, पैसे मिळविण्याचे साधन म्हणून अभ्यासूनी या विषयाकडे पाहू नये," असे दादा सर्वांना सागंतात.

रुढार्थाने दादाना "ज्योतिषी" समजणे म्हणजे दादांवर अन्याय आहे. कारण, त्यामुळे दादांचे व्यक्तिमत्तव सीमित होते.

## घरातील ज्येष्ठ व्यक्ती

बरेचजण दादांच्या भेटीसाठी येतात. तथापि, दादांच्या घरातील, जवळपासचे नातेवाईक, कांही मित्रमंडळी, हे दादांकडे घरगुती नात्यानेच बघतात- एक ज्येष्ठ, अनुभवी, वडिलधारी व्यक्ती म्हणून ! भांडणे सोडविणे, मध्यस्थी करणे हा दादांचा एक खास

स्वभाव विशेष ! पदराला खार लावून, वाईट दूषणे ओढवून घेऊन, शारीरिक क्लेश सहन करून, दिवसरात्र काथ्याकूट करीत स्वतःचा अमूल्य वेळ खर्च करून- दादा या विषयात रंगतात. स्वतःच्या घरातील कुरबुरी-धुसपुशीपासून ते प्रॉपर्टीची वाटणी, नवरा बायकोची भांडणे, बाप-लेकातील आचार विचाराची दरी, घरमालक-कूळ यांचे विकोपाला गेलेले संबंध, गावातील नगरपालिकेतील भांडणे, शाळा-विद्यालये यातील चालकांचा अंतस्थ कलह - अशा विविध भानगडीत दादांना ओढले जाते, ते ओढून घेतात. मग, शेवट गोड झाल्यावरच दादांच्या चेहऱ्यावर श्रमांचे सार्थक झळकते. वरील कटु विषयांशिवाय, लग्न जमविणे, घरच्या व मानलेल्या मुलीबाळींचे माहेरपण करणे, नाना तऱ्हेच्या पेशंटसना त्या त्या विभागातील तज्ज्ञ डॉक्टरांकडे नेऊन, पेशंटसच्या बरोबरीने क्वचित प्रसंगी डॉक्टरनाही मार्गदर्शन करणे, शाळा-कॉलेजच्या ॲडमिशनसाठी शब्द टाकणे, तर कधी श्री. शंकरानंदजी सारख्या मंत्रीमहोदयाला पत्र लिहिणे - हेही उद्योग दादा करत आले-करत आहेत. अशा हरकामी व्यक्तीला स्वस्थ कोण बसू देणार ?

**संगीताचे रसिक भोक्ते**

दादा खरे रमतात ते संगीत व संगीतविषयक चर्चेत ! संकेश्वर येथील विठ्ठलाच्या देवळातील टाळ, मृदंग, कै. ती. आईंच्या स्वरातींल स्तोत्रे, श्लोक, ओव्या यांनी त्यांचा पिंड पोसला गेला. शिवाय दादांच्या तरुण वयात संगीत मेळे, भजनी मंडळ, कीर्तने व कंपन्यांची नाटके पुष्कळ असत. त्यातील बरेच दर्जेदार कलावंत - ज्यांनी मोठेपणी फार नाव कमविले - दादानी मनसोक्त ऐकले. त्यातील कांही दादांचे मित्र बनले. कॉलेज विश्वानंतर बेळगाव आर्टस् सर्कलशी त्यांचा घनिष्ट संबंध आला. " पु. लं "ची ओळख तेव्हापासूनची ! मरहूम पै. खाँसाहेब अमीर खाँसाहेब (तबलजी), बाळूभाई रुकडीकर, कागलकर बुवा यांच्यावर दादांचे फार प्रेम !

अशा त्या मंतरलेल्या चैत्रबनात, बालगंधर्वांची भेट व त्यांचे संकेश्वर येथील घरात वास्तव्य, या प्रसंगाने दादा आजही रोमांचित होतात. दादा सांगतात, " आमचे भाग्य थोर म्हणून अशी माणसे भेटली. त्यांचे संगीत महान, तसाच त्यांचा बालसदृश निर्व्याजपणा व मोकळेपणा महानच होता. बालगंधर्व समाजातील सर्व थरात लोकप्रिय होते. दादांनी सांगितलेला बालगंधर्वांच्या हैद्राबाद येथील मुक्कामात प्रत्यक्ष घडलेला किस्सा संस्मरणीय आहे.

स्वयंवराचा प्रयोग होता. थिएटर हाऊसफुल्ल ! एका रसिक हैद्राबादी टांगेवाल्यानेही हजेरी लावली होती. एक रुपयाचे तिकीट काढून ! पदे एकापेंक्षा एक रंगतदार होत होती. पहिले पद संपल्यावर, टांगेवाला शेजारच्या रसिकाला सांगत होता, चार आना वसूल हो गया ! करत करत, चार पदे संपली. याचा बंदा रुपया वसूल ! पांचव्या पदाच्यावेळी महाशय उठायला लागले. शेजारच्याने आश्चर्याने विचारले, " जनाब, अभी

तो सुननेमे मजा आ रहा है, ये जन्नत छोडकर कहाँ जा रहे हो ? " रसिला, दिलदार टांगेवाला रुद्ध कंठाने उत्तरला, " भाईसाब, मैं अब बैंठ नही सकता, अभी तो कर्जा होने लगा ।" धन्य ती गायकी, धन्य तो रसिकपणा !

पं. संगमेश्वरबुवा, पोतदार बुवा, रामभाऊ विजापुरे, अरुण जोशी, अप्पासाहेब देशपांडे, सौ. रजनी देशपांडे (करकरे) हे दादांच्या नित्य सहवासातले ! दादांची अपार माया आहे त्यांच्यावर, अभिमान आहे त्यांचा कलेचा व दादांचा शब्द झेलण्यात त्यानाही धन्य वाटते. प. पू. श्री वासुदेवानंद सरस्वती उर्फ टेंबे स्वामी महाराज, यांची पुण्यतिथी दरवर्षी संकेश्वर येथे साजरी होत असते. तेंव्हा, तेथील संगीत सोहळ्यात, आपली सर्व कामे बाजूला टाकून, भक्तिभावाने ते हजेरी लावायला येतात.

" स्थळकाळाचे भान हरपविणारे, भाषेचा अडसर दूर करणारे व्यक्ती- समष्टी दुवा सांधणारे, माणुसकीला, प्रेमाला आवाहन करणारे व सुरांच्या उपासनेने देवत्वाचा साक्षात्कार करविणारे असे हे संगीत, मनुष्य जातीला एक वरदान मिळाले आहे," असे दादा जेव्हा सांगतात, तेव्हा, " दिक्कालाही अतीत झाले, ागमी, विलयी अनंत उरलो," या दिड्दा दिड्दाच्या विश्वात ते स्वतःला झोकून देतात. हाच दादांची ममसुखाची ठेव !

**साहित्यिक टीकाकार**

संगीताचे कोणाला ज्ञान असो वा नसो, ते मनोरंजन करतेच. मासिके, रहस्यमाला, साप्ताहिके वाचणे म्हणजे मनोरंजनाचे एक साधन. एक छंद. पण, साहित्याची जाण असणे, हा दुर्मिळ गुण सहजासहजी सर्वांना अवगत नसतो. साहित्यिक टीकाकारामध्ये, पूर्वग्रह विरहित बैठक असणे, निरक्षीर न्यायवृत्ती असणे, सर्वंकष साहित्य प्रकारांचे सखोल ज्ञान असणे, भाषेवर प्रभुत्व असणे, गुणांचे मूल्यमापन करताना कंजुष वृत्ती सोडून व्यावसायिक शत्रूचेही दिलदार कौतुक करणे, यासारख्या अनेक गुणांचा वास एकत्र असणे, हा हेवा वाटण्यासारखा भाग आहे. दादांचा एक ठळक स्वभावविशेष ! खरं पहता, दादानी साहित्यालाच वाहून घ्यायला पाहिजे होते. इंग्रजीप्रमाणे फ्रेंच भाषेवर प्रभुत्व असणारे, तांबे, कुसुमाग्रज, यशवंत, अनिल, अत्रे, पु.ल., गदिमा, पु. भा. भावे, विश्राम बेडेकर, क्षीरसागर या मराठी साहित्यिकांच्या कलाकृतींचे मर्मज्ञ रसग्रहण करणारे, कालिदास, भवभूती, व्यासांची वचने सहजपणे उदधृत करणारे - दादा साहित्याचा एनसाक्लोपीडियाच आहेत.

अचाट स्मरणशक्ती व तरल बुद्धिमत्तेच्या जोरावर, जेव्हां प्रत्येक शब्दाशब्दाचा कीस पडायला लागतो, तेव्हां भल्याभल्यानी नांगी टाकलेली मी स्वतः पाहिले आहे. अशा साहित्यिक कुस्तीत दादा कायम जिंकावेत, असा बालिशपणा मला व माझ्या मित्राना नेहमीच वाटत आला आहे.

दादांना आपली एक छानशी लायब्ररी असावी, असे पहिल्यापासून वाटत आले आहे. लायब्ररी आता झाली आहे. पण, " तैलात रक्षेत्, जलात् रक्षेत्, रक्षेत् शिथिल

बंधनात.मूर्ख हस्ते न दातव्यं, एतद् वदति पुस्तकम् " हे वचन दादांनी आपल्या कपाटांवर लिहिल्याशिवाय. लायब्ररीचे रुपडे रहाणार नाही. दादांच्या पुस्तक प्रेमावर माझ्यासारख्या असंख्य भुरट्या वाचकांच्या वाचन प्रेमाने मात केली आहे. दादांचे पुस्तक ते आपलेच पुस्तक, इतके साधे समीकरण आहे. आपपरभाव नाही. वाचक या सवयीचे तर दादा त्यांच्या सवयीचे गुलाम ! रात्रीच्या नीरव शांततेत, शेंगदाणे व मसालेदार चुरमुऱ्यांची फक्की मारत, अर्धा कप चहा असे दर अर्ध्या तासाने सांगणारे उघडेबंब दादा, जेव्हां ' बेगरमेडचे' रसग्रहण सुरु करतात, ऑथेल्लो, हॅम्लेट, मॅकबेथ यातील पान ओळीगणिक बातचीत सुरुं करतात, फ्रेंच लघुकथा- कथन करतात, तांब्यांचे व्यक्तिमत्व सांगू लागतात, पं. महादेव-शास्त्री जोशीबुवांच्या बरोबर झालेल्या गप्पांच्या फैरीतील एखादा प्रसंग वर्णन करतात, सिनेसृष्टीतील भीष्माचार्य पू. भालजीबाबांच्या लेखन शैलीचे एकेक कौतुक करतात, गदिमांच्या गीतरामायणाचे रसग्रहण करतात. पु. लं. च्या शैलीचे एकेक मासलेवाईक, शब्दबद्ध न झालेले चुरचुरीत किस्सें सांगतात, तेव्हा वाटते, ते क्षण असेच फ्रीज व्हावेत, अमर व्हावेत. हीच दादांची असली पहेचान !

**एक माणूस**

वरीलपैकी कुठल्याही एका प्रकारात कोणी पारंगत असले, तर सर्वसाधारणपणे असा समज असतो की इतर बाबतीत ती व्यक्ती ढिली असते, कमजोर असते — याला अपवाद अर्थात दादा !

दादा एक माणूस म्हणून वैचित्र्यपूर्ण आहेत. माणसांचे अतिशय लोभी, एकसारखे कुणीना कुणीतरी पाहिजे. आताशा, वयापेक्षा प्रकृतिअस्वास्थ्यामुळे ते प्रवास करत नाहीत. नाहीतर, आज हुबळी तर उद्या निपाणी, परवा कोल्हापूर - बॅक टू संकेश्वर, असा कंटाळवाणा प्रवास ते नियमितपणे करत आले आहेत.

दादा व गप्पा यांचा अतूट संबंध आहे. एकवेळ खायला मिळाले नाही तरी चालेल. खात खात त्यांना गप्पा मारायची संवय आहे, त्यांचे तोंड झोपच बंद करू शकते. त्यांची आई सांगायची की झोपेतसुद्धा दादा जाबडतो. गप्पा हा त्यांचा विरंगुळा नव्हे छंद आहे. माझ्या पत्नीला, सौ. विजूला कोकणांतील व्यक्ती आणि वल्लींच्या नकला, शेतावरील अनुभविलेले विनोदी प्रसंग, यांची हटकून फर्माईश होत. मग काय, मिनिटांचे तास, दुपारची संध्याकाळ केव्हां होते तेच कळत नाही. दादाही, लहान बालकाप्रमाणे, " काय म्हणालीस, परत सांग," म्हणून सुरु करतात. आता पुरे, म्हणण्याची पाळी येते. त्यावर दादांचे उत्तर, 'अहो, टवाळा आवडे विनोद !' एक हंशा, पिकतो.

पुनर्जन्मावर एकदा विषय निघाला. तत्काळ दादा उद्गारले. ' शुचीनां, श्रीमंतांगेहे ' असा पुनर्जन्म न मिळता, जसा हा जन्म, आयुष्य गेले तसाच पुढील जन्म असूंदे. कानामात्रा, आकारउकार, वेलांटी, स्वल्पविराम व उद्गार चिन्हांसकट - अगदी तसाच.

दादांचे पत्रलेखन, हा एक दांडगा विषय आहे. पत्राची तत्काळ पोच, पत्राच्या पत्त्यावर इंग्रजी व मराठी असा द्विभाषिक मजकूर व तोही लाल पेनने अधोरेखित केलेला ! असे पत्र दुरुनसुद्धा ओळखता येते. संकेश्वरहून येणार असले की कोल्हापुरांतील झाडून सर्वांना पत्रसंदेश ! दादाना कंटाळा कसा येत नाही, देव जाणे ! टपाल खात्याने दादांचा गौरवच केला पाहिजे. मला ' एक ' पत्र लिहिणे म्हणजे दिव्य वाटते व ते पोष्ट बॉक्समध्ये ज्या त्या दिवशी टाकणे, हा जुलूम वाटतो. केवळ दादांची पत्रे म्हणून नाइलाज होतो. सुटका नाही. गुढघे मुडपून, जीभ सारखी बाहेर काढत दादांची पत्रे लिहिताना समाधी लागली की वाट लागली असे समजून वरकरणी हसतमुखाने दादांसमोर बसण्याशिवाय गत्यंतर नसते.

दादा, तसे व्यवहारी ! " आजच्या जमान्यात प्रत्येकाने व्यवहारी राहिल्याशिवाय तो संसारात यशस्वी होणार नाही. प्रत्येक गोष्ट, आपसातील असो, नातेवाईकातील असो की मैत्रीतील असो - व्यवहाराचे भान सुटता कामा नये. वेळच्यावेळी ठराविक गोष्टी व्हायलाच पाहिजेत. ठराविक पद्धतीने व्हायलाच पाहिजेत. कांही बंधने पाळली नाहीत तर सर्वकांही करून सुद्धा, वाईटपणा पदरी पडतो. माझे हात पोळले आहेत, दूषणे मिळाली आहेत. तेव्हा, निदान तुमच्यासारख्या तरुण पिढीने यातून शिकावे, असे वाटते " ही दादांची मते कोण अमान्य करेल ?

दादांच्या ओळखी जगभर ! कॅलिफोर्निया ते कागलपर्यंत. कुणाचे नाव सांगितले की दादा त्याला, त्यांच्या वडिलांच्यापासून ओळखत असतात. मला फार गंमत वाटते, दादांच्या एवढे सारे लक्षात कसे रहाते ? उत्तर एकच - झाले बहु, होतील बहु !

दादा - मैत्रीला जागणारे ! एक ठळक उदाहरण म्हणजे धुळ्याचे श्री. अप्पा गानू ! फार जुने स्नेही, नामांकित हस्तसामुद्रीक व अंकशास्त्रावर प्रभुत्व असलेले ! या मितभाषी व प्रसिद्धी पराङ्मुख व्यक्तीच्या विद्वत्तेचा परिचय महाराष्ट्राला दादानी पुस्तकरुपे करून दिला. हिरा खाणीत खितपत पडलेला. दादांना राहवले नाही. याला सांग, त्याला सांग करून, केवळ दादांच्या वजनामुळे अंकशास्त्रावरील गानूंचे पुस्तक प्रसिद्ध झाले. आज अनेकजण त्याचा लाभ घेताहेत. त्याचप्रमाणे, श्री संत ज्ञानेश्वर महाराज, श्री संत रामदास यांच्या ग्रंथनिर्मितीचे आटोपशीर, वेचक स्वरुप - एका अनामिक मित्राकडून लिहवून घेऊन- पुस्तकरुपाने प्रसिद्ध करण्यात दादानी समाजसेवेची रीत दाखवून दिली.

संकेश्वरचे नागरिक या नात्याने तेथील हायस्कूलचे पहिले मुख्याध्यापक होऊन आजुबाजूला नवीन शाळा उघडण्यात, त्यांनी मोठे पाऊल उचलले. तेथील शैक्षणिक वाढ होण्यास, दादांच्या प्रामाणिक व तळमळीच्या प्रयत्नांची जाणीव संकेश्वरातील नागरिक कसे विसरतील ?

ती. आई, पत्नी, पाठीवरचे भाऊ, जिवलग मित्र - यांच्या मृत्यूंच्या मालिकेने दादांसारखा तत्त्वज्ञानी माणूस विचलित झाला. त्यानी आजारपणाचा धसका घेतला आहे. साधा ताप व घाम आला की ते नर्व्हस होतात. डॉ. भूपाली, डॉ. शशिकांत कुलकर्णी - दादांना अधिकारवाणीने, ' विडी कायमची सोडा, चहाचे प्रमाण कमी करा, जागरण करू नका, नियमित वेळी मोजके जेवा, वावड्या गोष्टींचा मोह टाळा, इ. सांगताना ऐकले की, दादासुद्धा जगरहाटीतून सुटले नाहीत, याची परखड जाणीव होते. कधीकधी, ' शिष्टागमने अनध्याय:, असे म्हणून आहाराचे नियम मोठ्या शिताफीने झुगारुन देतात. आमच्यासारखी मात्र " कष्टत्रास भागूनच संपवायचे असतात. देवाचे स्मरण फक्त धैर्य मिळविण्याकरताच उपयोगी पडते. ईश्वरीकृपा झाल्यास शेवट गोड होतो," इ. तात्त्विक विचारानी मनाची बैठक तयार करु लागतो. दादा बंडखोरपणे हंसतात, " उद्याचे उद्या बघू या. आजचा दिवस निघाला तर उद्या येणार ना ?"

खरोखरच, अशा व्यक्तींचा सहवास जन्मांतरीचे लागेबांधे असल्याशिवाय मिळणे दुरापास्त ! कांही तरी आंतर ; कोपि हेतु असल्याशिवाय कां, मी दादांच्या जवळ आलो. आमच्या घरातील प्रत्येकाला दादांशिवाय चैन पडत नाही. माणूस एखाद्याच्या फार जवळ गेला की त्याची किंमत कळेनाशी होते. मी दादांशी वाद घालतो, माझी पत्नीही घालते. या विषयातले दादा तुम्हाला समजत नाही ' असेसुद्धा त्याना म्हटले. माणसाच्या सहनशीलतेमुळेच त्याला सुधारायचीही संधी मिळते. कांहीही न बोलता आमची चूक समजली. माझ्या वडिलाना मी ' दादा ' असे संबोधीत होतो. त्यामुळे त्यांच्यानंतर दुसऱ्या दादांनी जागा घेणे, याचा आनंद विलक्षण ! मला माझे दादा मिळाले.

दादांनी एकदा ऐकविलेल्या आंग्ल कवितेतील कडव्यांने दादांचे जीवनाबद्दलचे अलिप्त तत्त्वज्ञान सांगून लेखन समाप्ती करतो.

" When I am dead my dearest,
Sing no sad songs for me.
Plant thou no roses at my head, nor shady cyfras tree.
Let the green grass be above me, with showers and dew drops wet,
And, if thou will, remember
And, if thou will, forget.

---

## दादा - रसिक महायोगी

*डॉ. उदय अनंत पुराणिक*

---

सकाळची वेळ असावी. बाहेर उन्हाचा तडाखा आणि व्यंकटेश्वर अपार्टमेंटस्‌मध्ये दादांचा शीतल सहवास. वेळ कसा जातो समजत नाही.

विविध क्षेत्रातील नामवंत व्यक्तिमत्त्वे येत असतात. संगीत, साहित्य, अध्यात्म वगैरे अनेक विषयावर गप्पा झडत असतात.

अधून मधून चहाचे कप येत असतात. खूप उशीर झाला असेल तर दादांच्या पंक्तीचा लाभ असतो. पार्टनर बदलून खेळ पुढे चालू रहावा तसे असते. म्हणजे दादा आपल्या जागी स्थिर असतात. बाकीचे भिडू बदलत असतात. बैठकीचा केंद्रबिंदू मात्र दादाच. दादांच्या व्यक्तिमत्त्वाला अनेक पैलू आहेत. एखाद्या कॅलिडोस्कोपप्रमाणे त्यांचे जीवन आहे. विविध रंगांनी रंगून गेलेले दादा मात्र आतून कशातच नाहीत. त्यांचा लोकसंग्रह किती ? मंत्र्यांपासून शिक्षक, मोठ्या गवयापासून पानपट्टीवाला, मोठ्या डॉक्टरपासून ते किराणा दुकानदार. त्यात समाजात प्रतिष्ठेचे स्थान नसलेले अनेकजण आहेत. एकदा दादांनी त्यांना आपले म्हटले की सर्वजण एकाच बैठकीवर. एकदा दादा मनाला भिडेल असे बोलले. 'चांगल्या माणसांना कोणीही जवळ करेल. वाईट माणसांना जवळ करण्यात तुमचा मोठेपणा.' शब्दात थोडाफार फरक असेल पण भावार्थ अगदी हाच.

दादांच्या जवळ बसले की जीवनातले वैविध्य उलगडत जाते आणि क्षणभर स्वत:चा विसर पडतो. दिव्यत्वाच्या प्रकाशाने जीवन उजळले जाते.

दादाना कशाचेच वावडे नाही, बडे गुलाम अलीचा ख्याल असो किंवा गुलाम अलीच्या गझला तितक्याच उत्कटतेने ऐकणे. काव्य असो वा गद्य दादांच्या आस्वादात काहीही उणेपणा येत नाही.

दादांचा ग्रंथसंग्रह विपुल आहे. त्यांचे जीवन म्हणजे लायब्ररीच आहे. सर्वच विषयावरील पुस्तके, चरित्रे, आत्मचरित्रे पातंजलीपासून, रजनीश कृष्णमूर्ती वगैरे अनेकांची पुस्तके, त्यात ज्योतिषशास्त्र, तत्त्वज्ञान कोश, संगीतावरील पुस्तके, पुस्तकांचा संग्रह करण्याचा त्यांचा शौक. या सर्व विषयावरील त्यांची मते अगदी ठाम असतात.

पुस्तके वगैरे वस्तू दुसऱ्यांना देण्यात त्याना फार आनंद. काहीतरी निमित्ताने फोटो, पुस्तके इ. सदैव देत असतात. एखादे नवीन पुस्तक प्रकाशित झाल्यावर ते संग्रही येईपर्यंत त्यांना चैन नसते.

समोरच्या माणसाला दादा आपले निकटवर्तीय वाटतात, आपली रुखरुख त्यांच्यासमोर बोलल्याशिवाय तो जाऊच शकत नाही.

या बाह्यजीवनाशिवाय दादांचे एक विलक्षण अंतर्जीवन सुरू आहे. एका वेगळ्याच ठिकाणी ते असतात. क्वचितप्रसंगी त्यांच्या बारीक झालेल्या डोळ्यातून ते व्यक्त होते. त्यांच्याकडे ज्या शक्तीचे अधिष्ठान आहे त्यांची त्यांना पूर्ण जाणीव असून त्याबद्दल कसल्याही प्रकारचा खोटा विनय नाही पण कुतूहलमिश्रित अभिमान आहे.

बऱ्याच वेळेला एखाद्याची कुंडली बघताना त्यांना एकदम फ्लॅश म्हणा किंवा व्हिजन होत असते. कुंडली फक्त निमित्तमात्र. त्या व्यक्तीचा भूतकाळ वगैरे गोष्टी अचूक सांगत असतात. पुढील घटनाबाबत सुद्धा योग्य दिशा दाखवत असतात.

दादांचा परिवार फार मोठा आहे. त्या सर्वांना अडचण मग ती व्यावहारिक, आर्थिक वा आधिभौतिक असो. योग्य तो मार्ग दादा दाखवणारच.

अनेक कुटुंबामध्ये दादांना कुलपुरूषाचे स्थान आहे. अनेकांचे संसार, व्यवसाय दादांच्या कृपेने सुरळीत चालू आहेत. दादांच्याशिवाय त्यांचे कुठलेही कार्य पुढे जात नाही.

दादा आहेत ही कल्पनाच मोठा आधार आहे. त्यांच्याबद्दल जेवढे लिहावे तेवढे थोडेच आहे. आता थोडे वैयक्तिक..........

अशा दादांचा परिचय सुमारे १०-१२ वर्षापूर्वी झाला. त्यावेळी वडिलांच्या नोकरीमुळे आम्ही पणजी (गोवा) येथे रहात होतो. त्यावेळी अनिलच्या सांगण्यावरून ते आमचेकडे आले. रात्री पत्रिका बघितल्या, दोष निवारणार्थ काही विधी करवून घेतले.

रात्री मी व दादा बोलत असताना अचानक काही vibrations जाणवू लागली. लगेच दादानी त्याचे स्वरूप सांगून पूर्वी तो अनुभव एका दत्तमंदिरात आला आहे असे सांगितले. आठवून पाहिले तेव्हा काही वर्षापूर्वी सावंतवाडीला श्रीटेंबे स्वामीनी स्थापलेल्या मंदिरात तो अनुभव आला होता.

नंतर रात्री उशीरा झोपलो. एकदम सर्व शरीर हलके होऊन, देहरहितता किंवा वजनरहित झाल्याचा अनुभव आला. पण मी त्याकडे लक्ष न देता झोपी गेलो. दुसऱ्या दिवशी दादा स्वत: जप करताना मला म्हणाले रात्री काही दिसले का ? किंवा काही अनुभव आला का ?

मी रात्रीची सर्व घटना विसरून जाऊन नाही म्हणून सांगितले. त्यांनी खोदून विचारले तेव्हा मग एकदम ध्यानात आले. माझा कल निराकाराकडे असल्यामुळे काही न दिसता, फक्त जाणवले असावे.

एक-दोन वेळा दादांच्या डोक्याभोवती निळ्या रंगाचा Aura दिसला होता. एकदा कागलला माझ्या मामाकडे रात्री आम्ही बसलो असताना. दादा म्हणाले, 'मारूती शंकराची पिंड उखडून काढल्याचे दिसतेय.' तेव्हा मामाने नुकतेच हनुमान मंदिराचे जीर्णोद्धाराचे कामात पुढाकार घेतला होता व मामाचा जन्म हनुमान जयंतीलाच झाला होता. व त्या मंदिरात मारूतीच्या मूर्तीसमोर छोटीशी शंकराची पिंडी पण होती. अशा विलक्षण घटनांची सांगड कशी घालणार ?

दादांच्याकडे असलेली ही संवदेनक्षमता किंवा बुद्धीच्या पलिकडले हे इंद्रिय त्याच्या संदर्भात काहीच गणित मांडता येत नाही.

श्री. दादांच्या अनुज्ञेने केलेले कुठलेही काम अयशस्वी होत नाही.

माझ्या भावाच्या फ्लॅटसंदर्भातील अनुभव दादांच्या (अतिंद्रिय शक्तीचा) अंतर्साक्षित्वाचा खात्रीच पटवतो. एका ठिकाणी जागा नक्की केली होती. फक्त दादांचा होकार आला की पुढील व्यवहार होणार होते. दादांना विचारले तर १५ दिवस थांब मग बघूया असे म्हणाले. ४-५ दिवसातच सर्व प्रकारात काही तरी गडबड असल्याचे कळाले व १५ दिवसानंतर दुसऱ्या ठिकाणी जागेचे ठरले.

अशा किती घटना सांगाव्या.

अलीकडे ५-७ वर्षात दादांच्या खूपच निकट जाण्याचे भाग्य लाभले. माझ्या मानसिक चढ उतारात त्यांचे मार्गदर्शन फारच मोलाचे ठरले. थोडे दिवस भेट झाली नाही तर चुकल्यासारखे वाटते.

दादांच्या सहवासात असताना एकप्रकारचे आंतरिक निःशब्द संभाषण किंवा communion असते.

अनेक लोकांना वेगवेगळ्या दैवतांची दर्शने दादांच्या ठिकाणी झाली आहेत. तीच चित्शक्ती दादांच्या माध्यमातून कार्य करत असावी.

दादांच्याबरोबर अनेक ठिकाणी फिरलो. पारिशवाडचा उत्सव तर अविस्मरणीय.

माझ्या दवाखान्याचा उद्घाटनाचा मुहूर्त दादांनीच ठरवला. त्यादिवशी लवकरच ते आले. नंतर खूप माणसे आली पण फराळाचे पदार्थ पुरून उरले. माणसे वाढली पण फराळ काही वाटून सुद्धा संपला नाही.

एक दिवस कागलला आले आणि माझ्या हातात पैसे देऊन माझी पत्नी, मुलगी व मला कपडे करायला सांगितले. त्यांच्या निर्व्याज प्रेमाने आम्ही सर्व भारावून गेलो. अशा दादांचे माझ्या जीवनात एक आगळेच स्थान आहे. अशा सात्विक रसिक महायोग्याला उदंड आयुष्य लाभावे अशी परमेश्वराकडे प्रार्थना.

## गुरुविण कोण दाखविल वाट

*जयवंत कृष्णराव काळे*

ती. स्व. दादा यांची माझी पहिली भेट १९६३ साली झाली. त्यावेळी माझ्या पत्नीला एका असाध्य व्याधीने पछाडल होते. जवळ जवळ दहा वर्षे पर्यंत व्याधीने तिची शरीरप्रकृती रोडावली होती. त्यावेळेस आमच्या आयुष्यात ती. स्व. दादांनी श्री दत्तगुरुमहाराजांच्यावरील दृढ श्रद्धा वाढविण्याचे कामी बरेच मार्गदर्शन केले व त्याच बरोबर माझ्या पत्नीची ती व्याधी आपोआपच कमी कमी होत नाहीशी झाली. आमचे लग्न झाले ते १९५२ साली. आम्हाला चार वर्षेपर्यंत अपत्य नव्हते. माझी फिरतीची नोकरी असल्याने

कामानिमित्त दर महिन्यात ८-१५ दिवस बाहेरगावी जावे लागत असे. १९५३ सालापासून माझ्या पत्नीला अचानक डोके दुखून चक्कर येण्याची व्याधी सुरू झाली. अधून मधून आणि विशेषत: अमावास्या किंवा पौर्णिमेच्या वेळी डोके दुखण्याचे प्रमाण वाढत असे. वारंवार डोके दुखून घरातच ती बेशुद्ध होऊन पडून रहात असे. साधारण अर्धा तास ते कधी कधी तीन तास पर्यंत बेशुद्धच असायची. अशा अवस्थेत तिची व मुलांची काळजी घेण्यास वा सांभाळावयास घरात दुसरे कोणीही नव्हते. असा परिस्थितीत तिला १९५६ साली मुलगा व १९६० साली मुलगी अशी दोन अपत्ये झाली. पण दैवयोगाने तिला घरात कुठल्याही प्रकारचा अपघात किंवा शारीरिक इजा झाली नाही.

माझे वडील व बंधू दोघेही डॉक्टर असून त्यांचा ॲलोपेथीवर व्यवसाय होता. पण त्याना चक्कर येण्यामागे त्या व्याधीचे काय कारण असावे याचे निदान लागू शकले नाही. त्यांच्या सूचनेप्रमाणे एका प्रख्यात मानसिक रोग तज्ञाचा सल्ला घेतला व उपायही केले. के.ई. एम्. हॉस्पीटल मुंबई यांच्या प्रख्यात तज्ञांना व्याधीचे कारण समजू शकले नाही. त्याच वेळी वैद्याचा सल्ला व औषधे देऊन पाहिली. कुणीतरी भूतबाधा झाल्याचे सांगितल्यावर ते उतरविण्याचे प्रयत्नही झाले. पण कशाचाही उपयोग झाला नाही. व्याधी जास्त झाल्याने माझ्या पत्नीला पुण्याच्या दवाखान्यात वैद्यकीय तपासणी करण्यासाठी मणक्यातील पाणी एक सुईद्वारे काढण्यात आले (लंबर पंक्चर) याचाही व्याधीचे निदान करण्यास मदत झाली नाही.

अशा सर्व उपायानंतर १९६३ साली माझ्या मित्रांच्या सांगण्यावरून ती. स्व. दादा नाईक याना संकेश्वर येथे त्यांच्या घरी भेटण्यास गेलो. संध्याकाळच्या वेळी आम्ही तेथे पोचलो. श्री. दादांची प्रसन्न मूर्ती पाहून आम्हा उभयतांना फार आनंद झाला. ते आम्हाला व्याधीवर काय उपाय सांगणार या विषयी कुतूहल निर्माण झाले. त्यानी श्री दत्तगुरुमहाराजांच्या फोटोकडे उदबत्ती पेटवून लावली. समोर आसनावर आम्हा सर्वांना बसायला सांगितले. त्यांनी आम्हाला अनेक प्रश्न विचारले व व्याधी आणि त्यावरील उपाय यांची आमचेकडून सबंध माहिती घेतली. एक पाच मिनिटे ते स्वस्थपणे डोळे मिटून ध्यानस्थ राहिले. योगसाधनेद्वारा त्यांनी श्री दत्तगुरुमहाराजांना विचारणा करून यावर कसला उपाय करता येईल का याच्या उत्तराची अपेक्षा करीत होते. सर्वच प्रश्नांना श्रीगुरुमहाराजांचे उत्तर येतेच असे काही नाही. अनेक वेळा उत्तर येत नाही. काही वेळेला उशीर म्हणजे काही दिवसांनी किंवा आठवड्यांनी उत्तर येते. असे श्री. दादांच्या अनुभवावरून त्यांनी आम्हाला सांगितले. आपल्या बऱ्यावाईट इच्छा आपले बरे-वाईट संकल्प आणि आपण केलेले बरे वाईट कर्म हे आपलेच आहे. त्यानुसारच ते ते फल आपल्याला मिळावयाचे आहेत हे मानवी बुद्धीला मोलाचे विचार आहेत.

श्री. दादांनी आम्हा उभयतांना ईशकृपेने उत्तर तेव्हाच आल्याचे सांगितले व ते म्हणाले,'तुम्हाला मी काही गोष्टी करावयास सांगतो आहे त्या तुम्हाला कराव्या लागतील. श्री दत्तगुरुमहाराज आज्ञेप्रमाणे तुम्हा उभयताना काही देवादिकांची फलदायी कार्ये करवून घ्यावयाची आहेत. एक म्हणजे औंध या ठिकाणी एका डोंगरावर उंच जागी श्री यमाई देवीचे देऊळ आहे. त्या देवीची खणा नारळाने ओटी भरावी व अभिषेक करावा. त्या नतर श्री क्षेत्र गाणगापूर येथील श्री दत्तगुरुमहाराजांचे दर्शन घ्यावे, महाराजांच्या नावे अभिषेक करावा, तेथील निर्गुण पादुकांचे दर्शन घेऊन महापूजेचा नारळ घरी आणावा. त्या नारळाची रोज पूजा करावी व पूजेनंतर सौ. शांताताईने तो नारळ ताम्हनात ठेवावा व त्यावर पाणी सोडावे व ते पाणी तीर्थ म्हणून रोज प्राशन करावे. गाणगापूर येथून आणलेले भस्म रोज पूजा झाल्यावर लावावे. भस्मलेपन करावे. सौ. शांताताईना होणारा त्रासही हळू हळू कमी होईलच."

त्यानंतर त्यांनी कळविले, श्री नृसिंहवाडी येथे श्रीदत्तगुरुमहाराजांच्या पादुकांची गुरुवारी किंवा शनिवारी महापूजा करावयाची. घरी आल्यानंतर श्री दत्तगुरूमहाराजांच्या मूर्तीची विधिपूर्वक प्राणप्रतिष्ठा करावी, श्री गुरुचरित्राचे नित्य वाचन करावे.

१९६४ ते १९७८ पर्यंत आणि त्यानंतरही आजपावेतो श्री. दादांच्या मार्ग दर्शनाप्रमाणे श्री दत्तगुरुंची सेवा नियमित करीत गेलो. मार्गदर्शन पत्राद्वारे आणि प्रत्यक्षात भेटीनंतर नेहमीच होत असे. माझ्या पत्नीच्या प्रकृती बद्दल ते वारंवार विचारपूसही करीत. त्यांनी पत्रातून कळविलेले आपले अनेक विचार आम्हा उभयतांना फार मोलाचे होते. त्यातील काही मजकूर असा होता -

"श्री दत्तप्रभूंच्या कृपाशीर्वादाने आपल्या पत्नीची प्रकृती पूर्णपणे बरी झाल्याचे समजून संतोष झाला. त्यांच्या लीला अगाध व अतर्क्य आहेत. त्यांच्या ठिकाणी दृढ निष्ठा रहावी. सर्वकांही मंगलच होत राहील. कसलीही काळजी करू नये. श्री प्रभुचरणी आपली वाढती भक्ती पाहून अत्यंत आनंद झाला."

संवेदनाशील व्यक्तिमत्त्वाला जरूरी आहे, मनोनिग्रहाची श्रद्धेची आणि भक्ती व प्रेमाची, चिकाटी व प्रामाणिकपणाचीही आवश्यकता आहे. या गुणांसह डोळस व अभ्यासू दृष्टीने वाटचाल केल्यास योग्य गुरु लाभू शकेल आणि मगच ध्येयप्राप्ती दृष्टिपथात येऊ शकेल. ईश्वरावर दृढश्रद्धा व आपल्या कार्यक्षमतेबद्दल आत्मविश्वास बाळगणे जरूरीचे आहे. श्री. दादांच्या अमाप ममतेचे गुरुछत्र मला लाभले.

आज समाजाच्या कोणत्याही क्षेत्रात कीर्तिशिखरावर विराजमान झालेल्या व्यक्तीचा इतिहास पडताळून पाहता त्याच्या यशाचे खरे रहस्य हे त्याच्या अचूक गुरुप्राप्तीत असल्याचे आढळून येईल. आणि म्हणूनच हे सत्य आहे की..... गुरूविण कोण दाखविल वाट ?

# जाणकार दादा

सौ. रजनी करकरे- देशपांडे

पूज्य श्री. दादा नाईक व माझा परिचय होण्याचा योग अगदी आगळा वेगळा असा त्यामुळे तो चिरस्मरणात राहिला आहे. ती. दादांच्या एकसष्ठी समारंभाचे निमित्ताने माझ्या गायनाचा कार्यक्रम सुप्रिसद्ध तबलावादक श्री. अरूण जोशी यांनी १९७१ साली प्रायव्हेट हायस्कूल कोल्हापूर येथे आयोजित केला होता. त्याच वेळी मी ती. दादा नाईक ह्यांना प्रत्यक्ष असे प्रथम पाहिले. कोणत्याही नवीन व्यक्तीशी ओळख होताना एकमेकांच्या मध्ये असलेल्या वैशिष्ठ्याद्वारे परिचय होण्यात एक वेगळेपण असते व ते माझ्या वाटणीला आले. ती. दादांना माझा परिचय माझ्या गाण्यातून झाला हे मी माझे वेगळ्या अर्थाने भाग्य समजते. नाहीतर औपचारिक भेटी व परिचय बरेच होत असतात व विस्मृतीतही जात असतात.

ह्यापूर्वी ती. दादांबद्दल मी दुरूनच ऐकून होते. प्रायव्हेट हायस्कूलमध्ये माझी तिन्ही भावंडे शिकल्यामुळे हायस्कूलमधील शिक्षकांशी आमचा जवळून परिचय होता. त्यापैकी श्री. खरे सर ह्यांचे कडूनच मी संकेश्वरला रहात असलेल्या दादांबद्दल ऐकत असे. ते खूप वाचन करतात. गाढे अभ्यासक आहेत. खूप लोक त्यांच्याकडे निरनिराळे प्रश्न, अडचणी घेऊन सल्ला घेण्यास, शंका निरसन करून घेण्यास जातात. दादा त्यांना काही धार्मिक उपाय सुचवितात. एखाद्या विषयावर साधक बाधक चर्चा करतात. त्यांच्या चर्चा रात्री उशीरा सुरू होऊन पहाटे पर्यंत चालतात. चर्चेत रंगून गेलेल्या श्रोत्यांना कधी कधी विशिष्ट सुगंध जाणवतो वगैरे वगैरे. अशामुळे ती. दादांना प्रत्यक्ष पहाण्याची उत्सुकता मनात होतीच. ती इच्छा अरूण जोशींमुळे फलद्रूप झाली. आणि २० वर्षापूर्वी झालेली ही ओळख आजतागायत अधिकच दृढ होत गेली.

दादांचे घर, सर्व नातेवाईक, सर्वांचे मनमोकळे स्वभाव, प्रेमळ वागणूक ह्यामुळे मी त्यांच्या घरातीलच एक व्यक्ती बनून गेले, दादांची लेक मी कधी बनले ते माझे मलाच कळले नाही. ती. दादांच्या अनेक मानस कन्यात माझाही समावेश झाला.

दादांच्या घरी संकेश्वर गांवी प. पूज्य श्री. टेंबे स्वामी यांची पुण्यतिथी फार मोठ्या प्रमाणावर दरवर्षी साजरी होत असते. दिवसभर भजन-पूजन महाप्रसादाचे भोजन वगैरे भरपूर कार्यक्रम असतातच. पण सर्वांना आकर्षण असते ते ह्यानिमित्ताने होणाऱ्या संगीत रजनीचे दिवसभर निरनिराळ्या गांवाहून व स्थानिक ही मंडळी येत असतात. पण खास गायन वादन कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी ही कलाकार मंडळीही संध्याकाळपर्यंत हजर होतात. इतक्या सर्वांचा ऊठबस स्वागत, अगत्य इतक्या प्रेमाने आत्मीयतेने होत

असते की येणारा पाहुणा न राहता घरचाच एक होऊन जातो. रात्री ९-९ ॥ वा. सुरू होणारी संगीत सभा दुसरे दिवशी सकाळपर्यंत अव्याहत चालू राहते. लहान/मोठे कलाकार प्रेमाने आपली कला सादर करण्यास उत्सुक असतात. इथला श्रोता खूपच रसिक व समझदार असतो. त्यामुळे कलाकार स्वत:ला विसरून कलाप्रदर्शन रंगून करतो. ती. दादांना आता ८० वर्षे पूर्ण होणार आहेत. हल्ली त्यांना फार वेळ बसवत नाही. पण दोन वर्षापूर्वीपर्यंत ते ह्या संगीत श्रवणासाठी रात्ररात्र बसलेले व न थकलेले मी पाहिले आहेत.

संगीताची आत्यंतिक आवड ही त्यांच्याठायी असलेने हे घडू शकते. दादांनी खूप कलाकार खूपदा ऐकले आहेत. संगीताची उत्तम जाण त्यांना असल्याने त्यांना काही ऐकवणे व त्यांच्याकडून अभिप्रायादाखल काही प्राप्त करणे हे कलाकाराला हवेसे वाटते. दादांना कलाकाराच्या गुणाचे फार कौतुक आहे. योग्य ते मार्गदर्शन, प्रसंगी आवश्यक तो स्पष्टपणा दाखवून ते करतात. त्यामुळे कलाकार प्रगतीकडे वाटचाल करताना आंधळेपणाने चालायचे टाळू शकतो. परिचित कलाकारांना मुद्दाम कुठल्याना कुठल्या निमित्ताने कार्यक्रम मिळवून देणे त्यासाठी स्वत: खटपट करणे, सर्व व्यवस्था चोख करणे ह्यातही दादांना अनिवार आनंद होतो. त्यांचा लोकसंग्रह जितका मोठा आहे त्याहीपेक्षा त्यांचा पत्रव्यवहार अधिक व्यापक आहे. पत्रोत्तरे जितक्या तत्परतेने ते पाठवतात. तितक्याच उत्सुकतेने उत्तराची वाटही पाहतात. लांबलांबच्या कलाकार, विद्वान, साहित्यिक रसिक लोकांशी सतत संबंध ठेवून त्यांना एकत्रित आणण्याचे आखीव रेखीव काम दादांनाच जमू शकते. त्यांचा अधिकार सर्व लोक मानतात. कारण तो त्यांनी स्वकष्टाने, विद्वत्तेने, रसिकतेने मिळवला आहे. काही चांगले वाचले किंवा ऐकले की प्रत्यक्ष भेटीत ते दुसऱ्याला ते सांगतात, वाचायला ऐकायला देतात. त्यातही एक अनामिक आनंद असतो व त्याचे ते भुकेले आहेत. नुकतीच त्यांनी मला ज्ञानेश्वरीची प्रत भेट दिली आहे. ज्ञानेश्वरी सप्तशताब्दी निमित्त काही ज्ञानेश्वरींच्या प्रती त्यांनी विकत घेऊन हे काम केले. मध्यंतरी ज्ञानेश्वरांच्या प्रतिमेचे रंगीत व कृष्णधवल चित्र त्यांनी श्री. रविंद्र मेस्त्रीकडून काढून घेऊन त्याची उत्तम छपाई करून घेतली. काही ही नवीन व चांगली गोष्ट केली की दादा आवर्जून मला सांगतात.. ह्यामुळे आमचा सारख्यांच्या ज्ञानात नक्कीच भर पडत असते.

ती. दादांनी एखादी गोष्ट सांगितली की ती करायला आम्हालाही नेहमीच आनंद वाटतो. दादांकडे एक शिस्त आहे. त्यामुळे बसल्या जागेवरून व एखादा फोन करूनही ते अवघड काम चटकन करू शकतात. दुसऱ्याची दिरंगाई अव्यवस्थितपणा त्यांना अजिबात सहन होत नाही. कारण ते स्वत: तसे वागत नाहीत.

अलिकडे २-४ वर्षे त्यांचे वास्तव्य कोल्हापुरातच चिरंजीवाकडे आहे. त्यामुळे अधूनमधून जाणे घडते. दादांना भेटल्यावर गप्पा अशा काही रंगातत की वेळेच भान गळून पडते. त्यांच्याकडे बसले असताना नाना तऱ्हेचे लोक येत जात असतात. त्यामुळे अनेक थोर लहान लोकांच्या भेटी होतात. विचारांची देवाण घेवाण होते.

# माझी पहिली मैफल

*गुलाबबाई कागलकर*

"मागे उभा मंगेश, पुढे उभा मंगेश" या काव्यपंक्तीप्रमाणे गेली ४७ वर्षे पूज्य ती. दादांचा आशीर्वादाचा हात माझ्या पाठीशी आहे. आणि समोर त्यांची मला धीर देणारी सात्त्विक मूर्ती आहे.

माझ्या गाण्याची पहिली मैफल पूज्य दादांच्या समोर संकेश्वर येथे १९४३ मध्ये केली. योगायोगानेच तो कार्यक्रम मला मिळाला. मात्र त्याची सुरूवात ती. दादांच्या समोर व्हावी हाही एक संकेत असावा असे मला वाटते.

उस्ताद बाळूभाई रूकडीकरांचा सोलो तबला हेच त्या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण होते. परंतु माझ्या पहिल्या वहिल्या मैफलीला तबलासाथ उस्तादजींनी केली हे विशेष.

पूज्य दादा संगीताचे गाढे अभ्यासक, विशेषत: तबल्यावर त्यांचे अधिक प्रेम, त्यांच्या समोर गाण्याचे धाडस मी, केवळ कै. बाबूदादा कलावंत यांच्यामुळेच केले होते. सात आठ गाणी मला त्यावेळी येत होती. आधी चार, नंतर चार मध्ये तबला (सोलो) असा कार्यक्रम झाला. एका नामवंत गायिकेचा तो कार्यक्रम, त्यांच्या दाढदुखीमुळे ऐनवेळी मला मिळाला. परंतू पूज्य दादांनी त्यावेळी माझे ते जुजबी गाणे ऐकून त्यावेळी एक भाकीत केले; ते म्हणाले,'उस्ताद ही मुलगी जर मनापासून मेहनत करून चांगली तालीम घेईल तर नक्कीच नावलौकिक मिळवेल. आवाज चांगला आहे. वाणी शुद्ध आणि स्वच्छ आहे. हिच्या घरी सांगा. पूज्य दादांचे शब्द फार ना थोडे आज खरे ठरले आहेत. हा त्यांचाच आशीर्वाद आहे.

या कार्यक्रमावेळी ती. दादांनी १०० रु. बिदागी म्हणून मला दिले; आणि सांगितले, की येत्या चार-पाच वर्षात तुझ्या बिदागीत चार-पाच पटीने वाढ व्हायला पाहिजे, अशी मेहनत कर. आणि नंतरच्या आठदहा वर्षानी, पूज्य दादांनी मला ५०० रु. बिदागी देऊन बेळगाव आर्ट सर्कल मध्ये बोलावले. केवढा हा त्यांचा आत्मविश्वास, त्याच्या वाणीचे सामर्थ्य केवढे. आज मागे वळून पाहता अनेक घटना आठवतात.

ते शंभर रुपये घेऊन मी घरी आले आणि ज्या माझ्या आजीने मला गाणे शिकविण्यासाठी अत्यंत कष्ट घेतले होते तिच्या पायावर ठेवून ती. दादांनी काढलेले उद्‍गार तिला सांगितले. त्या पैसारुपी प्रसादावर आम्ही दोघीही आनंदाने पोटभर रडलो. माझी आजी म्हणाली, "आज माझे सार्थक झाले. " तू स्वत:च्या पायावर उभे राहून जगू शकशील. मेहनत करून चांगली गाशील ही माझी खात्री झाली आहे. आता मी मरायला

मोकळी झाले, आणि माझ्या ९९ वर्षाच्या आजीने मे महिन्यात बोललेले शब्द ऑगस्ट-मध्ये खरे केले.

गेली ४७ वर्षे पूज्य दादांचा आशीर्वाद मला अनेकवेळा माझ्या दु:खी, कष्टी मनाला मातेच्या रूपाने धीर देऊन गेला. आम्हा सामान्य जनाना त्यांची आठवण पावलो-पावली होतेच. पण त्यांनाही आमची आठवण येते हे केवढे भाग्य. दरमहा एक पत्र येतेच. 'येऊन भेटून जाणे' एवढीच अपेक्षा त्यात असते. मला त्यांचे अनेक अनुभव 'चमत्कार' या सदरात मोडावेत असे आले आहेत .

१) गेल्या दोन वर्षापासून मी खूपच आजारी होते आणि माझा मुलगा मला कानपूरला ये म्हणून सारखे बोलावत होता. तेव्हा मी पूज्य दादांना विचारले की, '.मला सध्या थोडे बरे वाटतय जाऊ का नागपूरला ?'. तेव्हा ते म्हणाले, ' कशाला जाताय तिकडे तोच इथं येईल तुम्हाला भेटायला' आणि महिनाभरात माझा मुलगा मला भेटायला आला, केवढ आश्चर्य हे.....

२) माझ्या मुलीच्या लग्नाच्या वेळी पूज्या दादा मला म्हणाले, ' काळजी करू नकोस, हे लग्न होणारच त्यात बदल होणार नाही ' लौकरच त्यांचे शब्द खरे ठरले आणि लग्नात आशीर्वाद देण्यासाठी स्वत: ती. दादा हजर होते.

पूज्य ती . दादांना परमेश्वराने उदंड उदंड आयुष्य व उत्तम आरोग्य देऊन आमचे कृपाछत्र अबाधित ठेवावे. ही माझी त्याच्या चरणी विनम्र प्रार्थना.

## सुखाचे व्यवहारी सुखलाभ झाला.

*बाळ दांडेकर*

ती. श्री. धोंडोपंत नाईकांची भेट म्हणजे वरील उक्तीतील अनुभव असतो. महाराष्ट्र संत शिरोमणी श्री तुकाराम महाराजांचा हा अभंग आहे. "सुखाचे व्यवहारी सुखलाभ झाला आनंद कोंदला मागेपुढे" हा अनुभव मी ती. दादांच्या प्रत्येक भेटीत घेतला आहे.

माझे परममित्र श्री. संगमेश्वर गुरव यांचेमुळे ती. दादांची भेट सन १९८१ साली झाली. प्रथम भेटीतच मला माझ्या वडिलांचीच भेट झाली. अशी भावना झाली. आज-तागायत ती भावना तशीच आहे. अनेक प्रसंगी ती. दादांनी मला वडिलांनी जसे सांभाळले असते तसे सांभाळले आहे. माझेवर पुढे येणाऱ्या अनेक संकटांची पूर्वसूचना त्यांनी दिली आहे. त्यातून बाहेर पडण्याकरता त्यांनी मार्गदर्शनही केले आहे. या सर्व प्रसंगी इतके

मोलाचे व समतोल मार्गदर्शन मिळाले आहे की केवळ या मुळेच आपण अशा प्रसंगांमधून पार पडलो याची जाणीव मला आहे.

ती. दादा स्पष्टवक्ते आहेत. त्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्व पूर्ण पारदर्शक असे झाले आहे. त्यांचे मनात व ओठात एकच आशय असतो. मनात एक व बाहेर एक असा प्रकार कधीही नसतो. त्यामुळे त्यांचा सल्ला म्हणजे एक रोखठोक आश्वासनच असते. आपल्या द्विधामनाला एक आश्वासक शक्ती त्यांचे परखड, स्वच्छ सल्ल्याने प्राप्त होते व संकटातून मार्ग निघतो.

ती. दादांचे वाचन, अफाट स्मरणशक्ती अचाट अशी आहे. त्यामुळे साहित्य, काव्य, शास्त्र, अध्यात्म, तत्वज्ञान यापैकी कोणत्याही विषयावर चर्चा सुरू झाली तरी सर्व संभाषणाची सूत्रे आपोआपच ती. दादांकडे जातात. अर्थात यातील कुठल्याही विषया-वरील त्यांच्या वाचन ज्ञान व चिंतनाचा प्रत्यय संपर्कात येणाऱ्या व्यक्तीला येऊन ती व्यक्ती प्रभावित होते. ती. दादा अशा वेळी आपले एक एक बुद्धिवैभव उघड करतात. त्याने आपले डोळे दिपून जातात. त्यांच्या ज्ञानभांडारातील अशा अनेक अनमोल रत्नांचे दर्शन माझ्या दैवयोगाने मला झालेले आहे. बरे हे सर्व अगदी सहजगतीने होत असते. त्यात कोठेही कसलाही अभिनिवेश अगर कसलाही मुखवटा नसतो. उपदेशक अगर कमीची भावना अशी भूमिका ती. दादांची नसते. सहज वातावरणात खेळीमेळीची अशी चर्चेची मैफल असते. अशा अनेकानेक मैफलीतून मी अनेकवेळा अशी अमृतकिरणे साधली आहेत. अनुभवली आहेत.

ती. दादांची संगीतानुभूती अफाट आहे. बालगंधर्व, बाळुभैय्या रूकडीकर, मंजीखाँ भुर्जिखाँ अशा बुजुर्गांपासून सवाई गंधर्व, कागलकरबुवा, वझेबुवा, व इतर अनेक थोर मंडळींपासून आजच्या पिढीतील डॉ. सुधांशु सारख्या सर्व चांगल्या कलावंतांवर त्यांनी प्रेम व प्रेमच केले. अगदी त्या सर्वांचे व्यक्तिगत गुणदोष आहेत तसे स्वीकारून ती. दादांनी खूप संगीत अगदी खुल्या मनाने ऐकले. विलक्षण रीतीने स्वतःला झोकून देऊन ऐकले. कोणतेही पूर्वग्रह न ठेवता ऐकले. यामुळे त्यांची संगीताची जाण सघन अशी आहे. तबला हा त्यांचा आवडीचा विषय ताल व लयीची जाण तबल्याच्या सीमित अशा विस्ताराने सौंदर्याची दृष्टी कशी जादू करते याचे किस्से ऐकावे ती. दादांकडूनच. ती. दादांनी अनेक कलाकारांना प्रोत्साहन व आधार दिलेला आहे. याबाबत त्यांचे स्नेही संवादिनीपटू श्री. रामभाऊ विजापूरे खूप काही सांगतात. ती. दादांच्या संयोजनाने सजलेली श्री. टेंबेस्वामी पुण्यतिथीची संकेश्वरातील संगीतरजनीतील कलाकाराची उत्स्फूर्त हजेरी ते कसा जुन्या नव्याचा संगम, घडवतात याची साक्षच असते. ती. दादांच्या या संगीत दरबारात धारवाड, बेळगाव, कोल्हापूर, निपाणी इत्यादी ठिकाणचे मान्यवर व नवोदित कलाकार आवर्जून प्रेमाने हजेरी लावतात. हे पाहिले म्हणजे याही क्षेत्रातल्या ती. दादांच्या लोक-संग्रहाची कल्पना येते.

ती. दादांचा एकूणच लोकसंग्रह फार मोठा. शाळामास्तरांपासून ते मंत्र्यांपर्यंत लोकांची सतत वर्दळ त्यांचेकडे असते. त्यांचेकडे रंजले गांजलेही आपले प्रश्न घेऊन येतात. विद्वान चर्चेला उत्सुक असतात. संगीतप्रेमी, संगीत कलाकार आपला संगीतानंद ती. दादांचे संगतीत द्विगुणित करतात. एकूण सर्व अतिथी सुखाकांक्षेने ती. दादांकडे येतात व सुखी होऊन परत जातात. म्हणून मला ती. दादांचे भेटीत श्री तुकाराम महाराजांच्या अभंगाप्रमाणे अनुभूती येते.

सुखाचे व्यवहारी सुखलाभ झाला ।
आनंद कोंदला मागेपुढे ॥
संगतीपंगती देवासवे घडे
नित्यानित्य पडे हेची साचा
समर्थाचे घरी सकळ संपदा
नाही तुटी कदा कासयाची
तुका म्हणे येथे लाभाचीया कोटी
बहु वाव पोटी समर्थाचे ॥

## अनंत रूपे कमलावराने

*अनंत तेरदाळ*

ती. धोंडोपंत नाईक यांचे कडून मला प्रेम हे असेच "देता किती घेशील दो कराने" असे सतत २० वर्षे मिळाले. या प्रेमाचा महिमा अगाध आहे.

मी गोकाक येथे रहात होतो. संवादिनी सम्राट रामभाऊ विजापुरे यांनी सौ. मालिनी राजूरकर यांचे गाणे तेथे ठरवले होते. ते ती. दादांना माझे घरी घेऊन आले व त्यांचा परिचय करून दिला. त्यावेळी ती. दादांना मी देखील गातो असे कळले. तेव्हापासून ती. दादांनी माझेवर व माझ्या अल्पशा गायनकलेवर प्रेम व प्रेमच केले. यानंतर बहुतांशी दरवर्षी मी संकेश्वर येथील संगीतोत्सवात गाणे गायलो. ती. दादांनी माझ्या संगीतप्रवासाला सतत प्रोत्साहन दिले. ती. दादांचे पाठबळ लाभल्याने माझ्या संगीतोपासनेला बळ आले. या नंतर अनेक वेळा ते गोकाक येथे श्री. आप्पासाहेब देशपांडे, श्रीमती रजनी करकरे यांचे गायनाचे वेळी आले व मला त्यांचा सहवास लाभला.

आठ दहा वर्षांपूर्वीचा एक प्रसंग - गवयाचा आवाज हेच त्याचे सर्वस्व, आवाज चालला तरच गाणे ! नच तर रडणेच ! माझा आवाज खराब झाला. दुसरी (रडण्याची)

अवस्था आली. आता काय करावे ! वैद्यकीय इलाजांचेही काही चालेना. ती. दादांनीच भेट घेतली. सर्व हकीगत ऐकून घेऊन मला त्यांनी धीर दिला. मजसाठी श्री दुर्गासप्त-शीतीचे बारा पाठ करून घेतले. मला अंगारा दिला. तो रोज वापरणेस सांगितले. त्यांचे आशीर्वादाने व परमकृपेने माझा आवाज पुन: माझे ताब्यात आला. मी पुन: गाऊ लागलो. असे माझे जीवनसत्त्व असलेला माझा आवाज ती. दादांनी मला परत दिला. हे कुणाला पटो न पटो सत्य आहे. व हे ती. दादांचे अधिदैविक सामर्थ्य आहे. असे मी समजतो. मी अनंत तेरदाळ गातो असे ती. दादा गाऊन घेतात.

१९८० मध्ये सुरसिंगार संसद मुंबई ने मला 'सूरमणी' केले. या नंतर दादांनी संकेश्वर मुक्कामी माझा हृद्यसत्कार केला. तेव्हा माझे गायन ऐकून माझे जे कौतुक ती. दादांनी केले त्यामुळे या सूरमणीला कोंदण लाभल्यासारखे झाले. अशा तऱ्हेचे दिलखुलास गुणग्राहकत्व आज दुर्मिळ होत चालले आहेत.

## बहु वाव पोटी समर्थांचे

*सुधांशु रा. कुलकर्णी*

ती. दादांचे बाबतीत अक्षरश: हे खरे आहे. माझ्या संवादिनी क्षेत्रातील जे काही यश मला मिळाले आहे. त्याला खरोखरी ती. दादांचे मार्गदर्शन व सततचे प्रेमळ प्रोत्साहन हे कारण आहे. मी तसा पत्रे लिहिण्यात आळशीच आहे. परंतु ती. दादा मात्र मला सतत पत्रे लिहून माझ्या कलेला प्रोत्साहन देत आले व देत आहेत.

माझे संगीत प्रवीण (संगीतातील डॉक्टरेट) पदवीसाठी प्रबंध व मौखिक परीक्षेच्या तयारीचे काळात मला दादांनी वारंवार प्रोत्साहन दिले. वेळोवेळी मला पत्रे लिहूनही तयारी कुठपर्यंत आली या संबंधीची विचारपुस करीत. तसेच कुठेही संगीताची नवी माहिती मिळाल्यास ती मला कोठून, कुणाच्या पुस्तकातून मिळेल हे पत्राने कळवीत. काही अपरिचित राग पूर्वी कोण गात अगर वाजवत होते त्या रागांची माहिती कुठल्या ग्रंथात सापडेल वगैरे मौलिक सल्ला देत आले.

ती. दादांना पूर्वकाळात अनेक महान गायक वादक कलाकारांचा सहवास झाला. सवाई गंधर्व वझेबुवा पितापुत्र, कागलकरबुवा, बालगंधर्व इ. अनेक थोर गायकवादकांकडून दादांना अनेक रागांची, तालांची अशी माहिती मिळाली. तसेच अनेक दुर्मिळ व मुष्किल अशा चिजा व बंदिशी मिळाल्या यामुळे ती. दादांचे संगीताचे ज्ञान अभिजात व संपन्न झाले व याचा लाभ आम्हासारख्याना होतो. ती. दादांची गुणग्राहकता व त्यांचे खुल्यामनाने व मोकळेपणाने कौतुक करण्याची प्रवृत्ती केवळ विस्मयकारक आहे. येथे

त्यांच्या काही आठवणी सांगितल्याखेरीज राहवत नाही. मला 'सूरसिंगार' संसद मुंबई यांच्यातर्फे संवादिनी सोलो वादनासाठी 'सूरमणि' हा किताब दिला. ती. दादांनी मला संकेश्वरला बोलावून माझा सत्कार केला. पुढे १९८८ मध्ये मी माझे संगीत प्रवीणचे प्रबंध व परीक्षा पूर्ण करून प्रवीण परीक्षा पास झालो. ती. दादा आता प्रकृती अस्वास्थ्यामुळे कोल्हापूरला रहात आहेत. ती. दादांनी मी, माझे पू. गुरुवर्य श्री. रामभाऊ विजापुरे, तसेच माझे व दादांचेही स्नेही श्री. बाळासाहेब दांडेकर अशा तिघांना कोल्हापुरात बोलावून घेतले. तेथे दुपारी घरीच पंचपक्वान्नांचे भोजन, सायंकाळी त्यांच्या चार स्नेहीमंडळींच्या उपस्थितीत आम्हा तिघांचा कार्यक्रम व सत्कार केला. माझा सत्कार मी सं. प्रवीण झाल्याबद्दल केला. ती. रामभाऊंचा सत्कार केला तो ते माझे गुरु म्हणून, श्री. बाळासाहेब दांडेकरांचा सत्कार केला कारण त्यांनी मला सतत तीन वर्षे तबलासाथ करून मला रियाझ करण्यास मदत केली. केवढी ही गुणग्राहकता व विचक्षण बुद्धी पहा ! 'प्रवीण' ही पदवी मला मिळाली पण ती मिळताना मला ज्यांचे मार्गदर्शन व सहाय्य झाले त्यानाही ती. दादा विसरले नाहीत. हा प्रसंग माझे आयुष्यात कायम स्मरणात राहील. यानंतर मला अनेक मानसन्मान व कौतुकाचा लाभ झाला परंतु माझ्या यशाचे खरे मूल्यमापन व कौतुक झाले ते ती. दादांच्या दरबारातच.

गेली कित्येक वर्षे ती. दादा आपले आध्यात्मिक गुरु श्री टेंबे स्वामी महाराज यांचा पुण्यतिथी उत्सव संकेश्वर येथे करतात. या उत्सवात पूजा-अर्चा, सोहळा, अन्नदान फार मोठ्या प्रमाणात होते. ती. दादा या उत्सवात एक संगीतोत्सव करतात. या उत्सवात अनेक नामवंत कलाकार हजेरी लावतातच. पण ती. दादा या उत्सवात निवडक अशा नवोदितांना आवर्जून बोलावून घेतात व त्यांना संधी देतात. ही या परिसरातील नवोदितांचा एक पर्वणीची संधीच असते. याचा लाभ आज प्रथितयश अशा अनेकांना झाला आहे. हे एक महान कार्य आहे. ती. दादांनी हे अनेक वर्षे चालवले. या कार्याला गेली दोन वर्षे खंड पडला आहे.याचे कारण दादांचे प्रकृती अस्वास्थ्य व कौटुंबिक अडचणी हे होय.परंतु मला या निमित्ताने सुचवावेसे वाटते की संकेश्वर ग्रामस्थांनी पुढाकार घेऊन ती. दादांचे हे कार्य पुढे चालवावे. सर्व ती. दादाप्रेमी कलाकारांच्या तर्फे मी आश्वासन देतो की सर्व कलाकार पूर्वीप्रमाणेच आनंदाने आपला सहभाग देतील.

## आधार संसारी !

*संगमेश्वर गुरव*

माझ्या भाग्याने माझ्या वयाच्या १७ वर्षालाच ती. दादांची गाठ पडली. सन १९४८ साली बेळगावला आलो व पुढे लगेचच गाण्याच्या समान आवडीमुळे त्यांची गाठ पडली.

तरुणपणी मी खूपच चढ्या पट्टीत गात होतो. ती .दादानी माझ्या गायनावर सुरवाती-पासूनच फार प्रेम केले. त्यांना आपले गाणे ऐकवणे हा सुद्धा एक अगदी सुखद असा अनुभव असतो, ती. दादांनी दिलेली दाद ही १०० श्रोत्यांनी दिलेल्या दादेपेक्षाही मोलाची अशी मला वाटते. ती. दादांनी फार थोर अशा कलाकारांचे संगीत ऐकलेले आहे. त्यामुळे मला त्यांच्या पावतीचे जास्तच महत्त्व वाटते. माझे गायन ऐकल्यावर मला अशी पावती अनेकवेळा मिळाली आहे. ४०-४२ वर्षात असे बरेच प्रसंग मी अनुभवले आहेत.

माझ्या व माझ्या कुटुंबातील अनेक संकटसमयी व अडचणीचे वेळी ती. दादांचे सहाय्य मिळाले आहे. माझे ती. आईचा डावा पाय दुखत होता. अनेक दिवस अनेक उपाय करूनही काही उपयोग होईना. मी ती. दादांना ही हकीगत सांगितली ती. दादांनी माझे आईला कुंकू दिले. व ते पाण्यातून घेण्यास सांगितले या आशीर्वादपूर्ण उपायाने ती. आईचा पाय बरा झाला. कायमचा !

त्यांचे जवळून जीवनोपयोगी अध्यात्म मी खूपच ऐकले. आम्हाला अध्यात्माकडे वळवावे. म्हणून ती. दादा काही साक्षात्कार घडवीत असत. सहज जमलेल्या मंडळींमध्ये बसून ती. दादा चर्चेबरोबरच वातावरणात सुगंध निर्माण करीत असत हे मी एकदा माझे घरी व एकदा पारिश्वाड येथे अनुभवले आहे.

ती. दादांचे मुळे गायन व अध्यात्म या विषयात मला मार्गदर्शन आले आहे. अनेक भौतिक व अधिभौतिक अडचणीच्या प्रसंगी वडिलांप्रमाणे आधार त्यांनी मला दिला आहे. एखाद्या दीपस्तंभाप्रमाणे माझे जीवनात ते मार्गदर्शक झाले आहेत. माझे कुटुंब व परिवारावरही ती. दादांनी असाच दया लोभ दाखविला आहे.

---

## रामरंगी रंगले !

---

*- श्री . रामभाऊ विजापुरे (सं. अलंकार) , बेळगाव.*

---

माझे परमस्नेही व मार्गदर्शक श्री. धोंडोपंत ऊर्फ श्री. दादा नाईक यांचे सत्कार प्रसंगी त्यांचे संबंधी चार शब्द सांगायची संधी मी घेतो. गेली ४०-४५ वर्षे ती. दादांचा व माझा स्नेह आहे. त्यांची गाठ पडली हे माझे भाग्यच !

नुकताच 'रामजोशी' सिनेमा लागला होता. सिनेमा मी व धोंडोपंतानी एकदा बघितला. त्यातील सवाल-जवाब कलगी-तुरा धोंडोपंतांना व मला फार आवडला. मग काय विचारता ! धोंडोपंतांनी आणि मी तो सिनेमा १९ वेळा पाहिला. सवाल जवाब झाले की, आम्ही थिएटरच्या बाहेर मग सुरू व्हायची धोंडोपंतांची रसाळ वर्णने.

धोंडोपंत त्या सवाल जवाबातील सौंदर्यस्थळे अगदी खुलवून खुलवून सांगायचे ! मला तर त्यातून थोडा नवा नवा अर्थ जाणवू लागायचा समजायचा.

याच सोनेरी काळात धोंडोपंतानी माझे पुढे एक मराठी लावणीचे सोनेरी दालन उघडले ! धोंडोपंतानी या काळात मला रामजोशींच्या अनेक दर्जेदार सुंदर लावण्या त्यांच्या चाली मजकडून करून घेतल्या. पेटीवर त्या बसवून घेतल्या आजही मला याचा उपयोग होतो. सुगम संगीताला चाली देताना त्यातील चांगल्या जागा फार उपयोगी पडतात.

१९४७ च्या दरम्यान श्री. रातंजनकर प्रकृती अस्वास्थामुळे त्यांचे पट्टशिष्य श्री. के. जी. गिंडे यांचेकडे 'बैलहोंगल' येथे आले पण तेथे चार दिवसच राहून बेळगाव येथे आले. त्यावेळी धोंडोपंत डॉ.जठार यांचेकडे रहात होते. तेथे आम्ही म्हणजे कै. कागलकरबुवा मी, श्री. गिंडे व श्री. रातंजनकर असे रोज रात्री ९ च्या दरम्यान गुळाला मुंगळे असावे तसे जमा होत असत ! संगीतप्रेमी धोंडोपंत आम्हा सर्वांची खातीर (चहा-फराळ, जेवण व जे लागेल ते) करायचे. कशासाठी तर श्री. रातंजनकरांनी त्यांचे जवळील उत्तम बंदिशी, चिजा, राग आम्हास सांगावे म्हणून रातंजनकरांना धोंडोपंतानी चतुराईने बोलते करावे. मग त्यांनी निरनिराळे राग, बंदिशी सांगाव्या व त्या आम्ही आत्मसात कराव्या. हा सर्व खजिना आम्हाला धोंडोपंतानी मिळवून दिला. अशी ही मैफल रात्री ९ ते सकाळी चार पाच वाजेपर्यंत चालायची असा कार्यक्रम १५ दिवस चालला होता. धोंडोपंत न कंटाळता हे ज्ञानसत्र (अन्नछत्र) सांभाळत होते. धोंडोपंताना कुठे बैठक मारायची होती ? आमच्या मैफलीत मात्र यांच्यातल्या एखाद्या बंदिशीचा उपयोग करून आम्ही वाहवा मिळवतो. संगीत व संगीतकारावर असे दिल खोलून प्रेम करावे धोंडोपंतानीच !

धोंडोपंतांचे माझ्यावर फारच प्रेम त्यांनी सतत मला पत्रे लिहावी. मी मात्र पत्र पाठवू नये. तरीपण पुन्हा धोंडोपंताचे पत्र यावेच. असा क्रम गेली ४० वर्षे सतत चालू आहे. याचे कारण धोंडोपंत संगीतावर मनस्वी प्रेम करतात ! एकदा ते रात्री १० वाजता घरी आले. मला व कागलकरबुवांना धमणीत तंबोरे, पेटी, तबल्यासह बसवून मग्मावी वकिलसाहेबांकडे घेऊन गेलो. त्यांना झोपेतून उठवून तेथेच पहाटेपर्यंत गाणी ऐकली. असे गाण्यावर प्रेम !

धोंडोपंतांची फार इच्छा आहे की, माझी सोलो हार्मोनियम वादनाची कॅसेट व्हावी, बाजारात यावी, रसिकापर्यंत माझे वादन पोचावे. यासाठी धोंडोपंत फार खटपट करीत आहेत. आता लवकरच तो योग येईल असे वाटते. मी आता गंभीरपणे हे काम करणार आहे.

माझ्या पेटीवर त्यांचे अतोनात प्रेम ! मी मात्र जातोच असे नाही पण माझी पेटी ऐकून खूपदा धोंडोपंत प्रसन्न झालेत. तो समाधानी चेहरा नेहमी डोळ्यापुढे दिसतो. त्यांना माझी पेटी ऐकताना रंगलेले पाहून आमचे एक स्नेही बाळासाहेब दांडेकर म्हणतात -

'राम(भाऊ) रंगी रंगले' !

## जयाचिये दारी सोन्याचा पिंपळ

*ज्योतिंद्र गुंडू हसबे*

गेल्या तीस-चाळीस वर्षात जग कितीतरी बदलले आहे; जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात अव्याहतपणे बदल होत आहेत, बदल झाले आहेत. याला अपवाद आहे, तो ती. दादा यांच्या सेवावृत्तीचा आणि त्यांच्या वास्तूचा. नाईकांची वास्तू गेल्या चाळीस वर्षापूर्वी जशी होती, तशीच आजही ती वास्तू अगदी स्थितप्रज्ञ व्यक्तीसारखी अगदी निश्चल उभी आहे. क्वचित प्रसंगी कधी आंब्याच्या डाहळया वा झेंडूची तोरणे लागली असतील तेव्हढीच. जसा त्यांच्या वास्तूत बदल नाही तसाच बदल ती. दादा यांच्या सेवावृत्तीत व त्यांच्या पोषाखात आजपर्यंत झालेला नाही. त्यांची सेवावृत्तीची सरिता अखंड वाहतच आहे. क्षणभर उसंत नाही विराम नाही. ती. दादा म्हणजे श्री. धोंडोपंत श्रीपाद नाईक हे सर्वांनाच माहिती आहेत. गावातील सर्वच जुने लोक नाईकांच्या घराण्याला आजरेकर या नावांनेच ओळखतात. आमच्या छोट्या गांवात तशी सारस्वतांची फार तर चार सहा घराणीच असतील. त्यामध्ये शांत, एकसंबेकर, कामत या सारखी मोजकीच घराणी मलातरी माहित आहेत. या सर्व घराण्यांना एक इतिहास आहे. एक पूर्वपुण्याईचा वारसा आहे. तसाच थोर वारसा नाईक ऊर्फ आजरेकर यांच्या घराण्यास आहे. हा उज्ज्वल वारसा-इतिहास, ती. दादांच्या रूपाने आजही पहावयास मिळतो. धोंडोपंत वा धोंडूमास्तर हे दादांचे परिचयातील नांव, सलगीचे सर्वच लोक दादांना धोंडूमास्तर याच परिचित नावांने ओळखतात.

नाईकांच्या वास्तूसमोर एक प्रचंड पिंपळाचा पार आहे आणि या पारावर तेवढाच प्रचंड पिंपळवृक्ष आहे. नाईकघराण्याचा हा साक्षीदार किती जुना असावा याची दादानांही कल्पना नसावी कदाचित ! आंळंदीस जसा ज्ञानियाच्या समाधीसमोर प्रचंड वृक्ष उभा आहे. तसा हा सोन्याचा पिंपळ, कितीतरी शतके दादांच्या खोली-अभ्यासिकेसमोर उभा आहे. त्या विशाल पिंपळासारखेच त्यांचे मन विशाल आहे. याची माझ्या- प्रमाणेच अनेकांना प्रचिती आली आहे. या प्रचंड वृक्षाखाली रस्त्यावरची रहदारी तुरळक झाल्यावर रात्री दीडदोन वाजेपर्यंत गप्पा मारण्यात काय सुख असते याचा अनुभव घेतल्याशिवाय कळणार नाही. माझ्या कमी वयामुळे मला हे सुख कधी अनुभवता आले नाही. याची

कायमची खंत माझ्या उरी बसली आहे. आजकाल दादांचा मुक्काम क्वचितच संकेश्वरला असतो. त्यामुळे आता मी त्यांच्या इतर बंधूंशी गप्पा मारत या पिंपळाच्या पारावर रात्री दीड-दोन वाजेपर्यंत बसतो. जवळपास दादांचे पदरव वा सुगावा नसल्यामुळे गप्पा मनसोक्त रंगतात. पण पंचवीस-तीस वर्षापूर्वी ही स्थिती नव्हती. दादांच्या समोर जाण्याची भीती वाटायची. दादांच्याबद्दल एक भीतीयुक्त आदर माझ्या मनात होता व आजही तोच आदर, तिच भीती माझ्यासमोर असते.

गेल्या वर्षी कोल्हापूर येथील ज्योतिष अधिवेशनास गेलो होतो. त्यावेळी सम्मेलनातील माझ्या भाषणाच्या आगोदर कितीतरी तास बसून दादांशी मनसोक्त गप्पा मारल्या. गेल्या पंचवीस वर्षाची वजावट केली. मी ज्योतिषशास्त्राचा विद्यार्थी झाल्यापासून माझ्यातील व दादांच्यातील वयाचे अंतर कधी गळून पडले हे समजले नाही. दादांनी किती अनुभव सांगितले याला गणतीच नाही. माझ्या मागे पोटाचे व्याप नसते तर मी नेहमीच त्यांच्या सहवासात राहिलो असतो या शास्त्रातील प्रचंड ज्ञान आणि अनुभव दादांच्या ठायी आहे. हा आनंद लुटणाऱ्यांनी भरभरून लुटावा. तो कधीच कमी होणार नाही. गंगा कधी मलिन होते ? चंदनाने कधी सुवास सोडला आहे ? तद्वत ज्ञानदानाचे महापुण्य माझ्या जन्माच्याही अगोदरपासून ती. दादा करत आहेत. या ज्ञानयज्ञात कधीच खंड नाही. आमचे एस.डी. हायस्कूल हे दादांच्या कर्तृत्वाचे प्रतीक आहे. हा फोफावलेला हायस्कूलचा प्रचंड वटवृक्ष पाहण्यास दादा समर्थपणे उभे आहेत. ही गोष्ट सोन्याला सुगंध प्राप्त होण्यासारखीच आहे.

मला माझ्या जन्मापासूनच दादा ओळखतात. दादांच्या घरालगत मोठे विठ्ठल मंदिर आहे.त्या मंदिराच्या पिछाडीस आम्ही लहानमुले कधी विटीदांडू तर कधी गोट्या खेळत असू. त्यावेळी क्वचित कधी दादा दिसले की आम्ही पळून जात होतो. ही स्थिती मी हायस्कूलला जाईपर्यंत होती. त्यानंतर सोबती बदलले आवडही बदलली आणि मी अभ्यासाकडे वळलो. पण दादांच्या बद्दलची भीती वा आदर कधीच कमी झाला नाही. उलट तो वाढतच गेला. त्याला कारणेही तशीच आहेत. आज मी जीवनांत जे यश मिळवले. मान मिळवीला. ज्योतिषशास्त्रांतील सर्वोच्च बहुमान मिळविले. या सर्वांच्या मागे अनेकांची प्रेरणा, प्रोत्साहन आणि पालकांची दृष्टी याचे कवच माझ्या मागे आहे. माझ्या अनेक उपकार कर्त्यात कै. धोंडो दशरथ शांत, धोंडूमास्तर आणि माझ्या हायस्कूलचे त्यावेळचे हेडमास्तर एस्. जी. हिरेमठ यांचे अनंत उपकार माझ्या पाठीशी आहेत. या मंडळीना मी परका कधीच वाटलो नाही. त्यांच्याच कुटुंबातील एक, हे भाग्य साधे नाही. ही संचिताची ठेव आहे. जन्मोजन्मी ' हेचि दान देगा देवा ' ही जगन्नियंत्याकडे माझी प्रार्थना आहे.

दादा उर्फ डी. एस्. नाईक यांना मी पूर्ण पोशाखात कधीच पाहिलेले मला आठवत नाही. मी नेहमीच त्यांना घरगुती वेशात पाहिलेले आहे, त्यांचा पोशाख ठरलेला असे.

थोड्याफार फरकाने आजही तसाच आहे. कमरेला आखूड पंचा आणि मोठ्या पोटावर रुळणारे जानवे. हा दादांचा घरगुती पोषाख. क्वचित प्रसंगी तोंडात विडीचे थोटूक ! याच पारंपारिक वेशात मला समजते तसे मी दादांना पहात आलो आहे. अगदी कोल्हापूरच्या व्यंकटेशदर्शन मध्ये सुद्धा ! वरील सर्वच लोकांच्या बद्दल मला भीतीयुक्त आदर असल्यामुळे मी सहसा कधी कारणाशिवाय यांच्या समोर जात नसे. माझ्या शालेय जीवनाच्या वेळी दादा नेहमीच त्यांच्या अभ्यासिकेत लोडाला टेकून बसलेले असत. माझा रस्ता तोच असल्यामुळे त्यांचे दर्शन रोजच व्हायचे. त्यामुळे त्यांचा हा पोषाख माझ्या मनी कायमचा राहिला आहे. संकेश्वरला दादांची बैठकीची खोली ठरलेली होती. ती आजही तशीच आहे. त्या खोलीत कधीतरी एकदा दादांचे बंधू कै. बाबूतात्या यांनी रेडिमेड कपड्याचे दुकान थाटले होते. एरव्ही ही खोली दादांची बैठक. पंचा नेसून पहुडलेले दादा कधी अक्कलकोटचे स्वामी तर कधी पंत बाळेकुंद्री महाराज वाटायचे. नाईकांच्या वास्तू समोर कधी कार, जीप दिसली तर दादांचा मुक्काम घरी आहे हे निश्चित समजावे. दादांच्याकडे येणाऱ्या मंडळीत कधी, मौनी विद्यापीठ गारगोटीचे जे. पी. नाईक तर कधी भालजी पेंढारकर या सारखी अद्वितीय माणसे असत. अलिकडे ही वर्दळ थोडी फार त्याच प्रमाणात असावी.

कामाशिवाय दादांशी बोलण्याची वेळ क्वचित यायची. तरी पण वर्षातून एकदा त्यांना भेटावेच लागे. त्यावेळी भीतभीत मी त्यांच्याकडे जात असे. जून मध्ये हायस्कूल सुरू झाले की, फी माफी साठी अर्ज करावा लागत असे. त्या अर्जावर दोन तीन प्रतिष्ठितांच्या सह्या घ्याव्या लागत. त्यावेळी मला दादांना भेटावेच लागायचे. वर्षानुवर्षे माझ्या फी माफीच्या अर्जावर काही ठराविक प्रतिष्ठितांच्या सह्या ठरलेल्या असायच्या. या अर्जावर सर्वश्री महादेवाप्पा मेंडगुदली, तर कधी आर्. एस्. कणगली, तर कधी चनबसापआण्णा केस्ती. पट्टणशेट्टी सावकार आणि दादांची सही असे. दादा गावांत नसतील तर मग भिमगौंडा लिंगोंडा पाटील यांची सही असे वरील सर्वच मंडळी मला नव्हे पण माझ्या वडिलांना ओळखणारी होती, त्यामुळे मला सह्या झटकन मिळत. त्यावेळी जातीय वादाचे खूळ कोणाच्याही डोक्यात नव्हते. ही सर्व मंडळी आचाराने आणि विचारानेही थोर होती. यांच्या मोठेपणावर माझ्या सारख्या एका होतकरु तरुणाचे शिक्षण झाले. अर्जावर दादांची सही घ्यायची म्हणजे सोबत प्रगती पुस्तक घेऊन जावे लागे. मार्क उत्तम असले तरच सही मिळणार. मला कधीच विन्मुख यावे लागले नाही. आकाशातील असंख्य ताऱ्यांची गणती कधी कोणी केली आहे ? आभाळ कुणी कवेत घेतले आहे ? हे कोणासही शक्य नाही. तद्वतच दादांनी शैक्षणिक, सामाजिक-राजकीय क्षेत्रात जे प्रचंड कार्य केले आहे त्याची गणती कधीच होणार नाही.

## "चार आंधळे आणि हत्ती"

*काशिनाथ रामचंद्र गानू*

या गोष्टीची आठवण दादा नाईक यांच्याबाबत विचार करु लागले म्हणजे होते. माझे एक हितचिंतक आणि मित्र विश्वनाथ कुंभोजकर हे दादा नाईक यांचे बद्दल फारफार सांगावयाचे. विश्वनाथ कुंभोजकर हे संकेश्वरचेच राहाणारे दादा नाईक संकेश्वरचेच. आपल्या जागेवरून न हलणारे पण अनेकांना आकर्षित करणारे, नाना प्रकारे सल्ला देऊन समाधान देणारे, असे दादांच्या बाबतीत कुंभोजकरांचे सांगणे असावयाचे प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय व अनुभवल्याशिवाय कळणार नाही तरी दादांना एक इंग्रजीमधून पत्र लिहा आणि तुमच्याच विषयाच्याद्वारे त्यांचे थोडक्यात भविष्य कथनात्मक वर्णन करा. त्यांची जन्म तारीख ८ जुलै १९११ आहे. तुमचे विचार त्यांना पटले तर तुम्हासही ते एकदा मार्ग सुचवतील. त्यांचा परिचय तुम्हास उपयोगी पडेल ! वगैरे.

कुंभोजकरांच्या या बोलण्याचे मला आश्चर्य वाटे ! आपली जागा न सोडून नाना प्रकारे लोकांना आकर्षित करणारे असे हे कोण गृहस्थ असावे हे एकदा पहावे तरी म्हणून मी दादांना एक पत्र पाठविले. ८ जुलै १९११ या दिवशी शनिवार होता. धोंडोपंत श्रीपाद नाईक हे नांव आणि वरील तारीख यांचा धागा धरून मी ईश्वराची प्रार्थना करून सुचले ते लिहून काढून टाईप करून पाठवून दिले.

ताबडतोब त्यांचे उत्तरही आले आणि त्यानी कळविलेही की 'रीडिंग चांगले आहे आवडले या बाजूला येणार असाल तर अवश्य यावे'. असेंही लिहिले. त्यांचेकडे माझे पहिले जाणे एप्रिल १९६६ स्वतः अलिप्त आणि निर्लेप (कसलाही लोभ न करणे) राहून गरजूंना ज्याच्या त्याच्या विषयांत आणि कामांत सल्ला देणारा आणि मदत करणारा हा माणूस दिवस नाही रात्र नाही, आळस नाही, भूक नाही, तहान नाही कशाचीही काळजी न करता व्यवहार आणि परमार्थ या परस्पर विरोधी वृत्तीची सांगड घालून नाना श्रेणीच्या माणसांना उत्साहित अंतःकरणाने परत पाठविताना समाधानात पाहून मी तर स्तिमित झालो. चार पांच दिवसातच बरीच कल्पना मला येऊन गेली. माझ्या अभ्यासाबाबत त्यांचे मत मला आजमावयाचे होते. चार-पांच दिवसांनी मला ते म्हणाले की, आता आपण बेळगांव, निपाणी, गडहिंग्लज इ. ठिकाणी जाऊन येऊ. मी म्हटले की, 'दादा मला सांभाळून घ्या.' त्यावर लगेच म्हणाले मग चार-पाच दिवस मी काय पाहिले. तुमची तयारी चांगली आहे. त्या वेळी माझी खात्री झाली की कुंडली अंकशास्त्र आणि हस्तसामुद्रिक या तीनही शास्त्रात त्यांची चांगली तयारी आहे. ते हा अभ्यास दाखवत नाहीत. मात्र अभ्यासूंना नाना

प्रकारे प्रोत्साहन देऊन उत्तेजन देतात. आर्थिक मदतही हस्ते परहस्ते करून देतात. पुन्हा आपण अलिप्त.

राजकारणांतील अधिकारी माणसे, मंत्री, निरनिराळ्या संस्थांचे पदाधिकारी आणि अधिकारी, कारखानदार, वैद्यक व्यवसायामधील फार मोठ्या मान्यतेची माणसे , न्याय-शास्त्री, वकील, व्यापारी अशा प्रकारे अगदी वेगवेगळ्या व्यवसायामधील वरच्या श्रेणीच्या व्यक्ती त्याच प्रमाणे सामान्य दर्जावर असणारी ही सर्व दादांनी पूज्य मानून ज्या प्रकारे आपली श्रद्धा व आदर दर्शवितांत ते कित्येक वर्षे मी पाहात आहे. एवढ्या अमाप अमर्याद व्यक्तीचे वैयक्तिक स्मरण ठेवून त्यांचे बिकट प्रश्न सोडविण्याचा आळस दादांकडून कधीही झालेला मी पाहिला नाही अति लांब अंतरावरून आलेली मंडळी रात्री उशीर झाला तरी भेट घेतल्याशिवाय परत गेलेली मी पाहिली अगर ऐकली नाही.

गायन आणि सिने सृष्टीमधील फार मोठ्या मानाची मंडळी जेंव्हा त्यांना भेटतात तेंव्हाचे दृश्य पाहिले म्हणजे वाटते की, अभ्यासाचा दादांचा व्यासंग मोठाच असल्या-शिवाय हे शक्य नाही आणि तो खुलासाही मला प्रत्यक्षच पहावयास मिळाला. यावर दादा म्हणतात की प्रभूची इच्छा तशी दिसते ही त्याची कृपा आहे.

दिवंगत श्रेष्टी अधिकारी डॉ. आर. व्ही. साठे यांच्याशी झालेल्या एका भेटीचे वेळचे दृश्य मी पाहिले तेव्हा खात्री झाली की, दादाही एक हाडामासाची मूर्ती आहे हे खरे पण यांतली चेतना फार मोठी आहे. दादांना ही मंडळी का मानते तर त्यांच्यातील दिव्य शक्ती मुळेच. 'गुणाः पूजास्थानं गुणिषु नच लिंगम् नच वयः' दादांचा, धोतर, सदरा आणि काळी टोपी, पायात वाहणा हा अगदी नेहमीचाच साधा पोषाख पाहिला म्हणजे खात्री होते की त्यांची ती साधी राहणी आणि उच्च विचारसरणी कोठे पहावयास लांब जावयास नको.

कित्येक दिवस मला उलगडा होईना की, या नानाविध उद्योगातील आणि नाना अभ्यासातील सखोल माहिती दादांना कोठून प्राप्त झाली असेल. आज पंचवीस वर्षे त्यांच्याशी माझा संबंध येतो आहे आणि सहवास घडून आहे. मी पाहतो की त्यांचा बराच वेळ भेटी-गांठी आणि अत्यंत नियमित असा पत्रव्यवहार यातच जातो. मग हा नानाविध अभ्यास होतो केंव्हा आणि कसा. नीट उलगडा होईना. अखेर मी एकदा विचारलेच की हे सर्व कसे शक्य होते. त्यांनी सांगितले की रात्री उशीरापावेतो नाना विषयांचे वाचन असते. तरीही ही पाहता शंका फिटेना. मी त्यांच्याकडील मुक्कामांत अखेर पाहिले की, त्यांचे वाचन म्हणजे एक प्रकारची ती समाधी अवस्थाच असते. पूर्ण एकतानता त्यावेळी असते. कसलाही आवाज नाही की, कोणी मध्ये अडथळे करीत नाही त्यांची आरती करताना अवस्था पहावी. त्या पाच मिनिटातच आपले ध्यानी येईल. आवाज आणि शब्दांचे कंप कसे होतात. पहावे. ती एकतानता तशीच वाचनाचे वेळी पहावयास मिळेल. मी झोपलो असताना जागृत राहून हे पाहिले आहे. प्रत्यक्षचाच अनुभव पुरेसा आहे.

त्यांची स्मरणशक्ती जबरदस्त आहे याची प्रचीती वेळोवेळी येते. किती तपशीलासह ते सांगतील.

ज्ञानेश्वरी वरील त्यांची टिपणे अगदी बोलकी आहेत. एवढा सखोल अभ्यास, उत्तम स्मरणशक्ती शिवाय शक्यच नाही.

खुद्द दादा तसे कांही सांगत नाहींत पण मी जी अंकशास्त्र आदि हस्तसामुद्रिक या दोन स्वतंत्र शास्त्रांचा अभ्यास केला आणि अनुभव घेतला त्याचे आधाराने मी तपासून पाहिले आणि खात्री झाली की जन्मतारीख आठ आणि जन्मवार शनिवार या दोनही शक्ती आधिभौतिक आणि आध्यात्मिक प्रेरणा शक्ती पुरविणाऱ्या शनिग्रहाच्या मानलेल्या शक्ती आहेत ऐहिक व पारमार्थिक प्रेरणांचा संगम या माणसामध्ये पूर्ण साधला आहे. हातातील रिंग ऑफ सॉलोमन ही पहिल्या बोटाखालील खूण हे स्पष्ट दर्शविते, प्रेरणा कशी कोठून होते अगर येते हे त्यांच्यासमोर बसलेल्या माणसाच्या ध्यानी येत नाही कारण त्याचा तो विषय नाही. दादा क्षणभर पूर्ण तंद्रीमध्ये असतात आणि त्या क्षणांत त्यांना ते विचार सुचतात. गंमत अशी की ही शक्ती अगर प्रेरणा अगर अभ्यास आहे याचा उलगडा होऊ नये ती गोष्ट गुप्तचं रहावी आणि त्याची चर्चा अगर थट्टा होऊच नये म्हणून दादा समोरच्या माणसाला एक अंक सांगावयास सांगतात आणि त्या अनुरोधाने एक कुंडली मांडतात. समोरच्या माणसाला हे कांही कळत नाही. दादा त्या कुंडलीच्या आधारे बोलत आहेत वाटते. समोरच्या माणसाला काही सूचक प्रश्न विचारतात ठोकताळे म्हणून त्याचे मापन केले जाते आणि प्रश्नाचे उलगडे होऊन योग्य तो इलाज सांगितला जातो. या अशा प्रकारच्या माध्यमांमूळे समोरच्या माणसाला हा एक वेगळा अभ्यास आहे असे वाटून तो ऐहिक पातळीवरील एका विद्येचे जाणकार म्हणून त्यांचेकडे पाहतो. साधुसंत महंत या उपाधी टाळण्याचे हे एक फार मोठे माध्यम यांचा एक प्रकारे बचावच करते म्हटले तरी चालेल.

मग दादा ही शक्ती काय असावी आणि या व्यक्तिला समाजामधील असंख्यांचे सांत्वन समाधान करावे त्यांना व्याधिमुक्त होता यावे म्हणून ही कामगिरी पत्करण्यास कोणी प्रवृत्त केले असावे. त्यांच्या जन्मामागे कांही प्रयोजन असेल का ? कांही असा इतिहास सांपडतो का ? कोण सांगणार ! कृष्ण जन्माचा इतिहास कृष्ण जन्मानंतर काहीं काळ गेल्यावरच माहित झाला.

कृष्णजन्माआधी देवकीचे सात गर्भ कंसाने नाश करून टाकले होते. आठवा टिकला आणि त्याने फार मोठी कामगिरी केली अगदी तसा इतिहास जरी नाही तरी दादांच्या आईची दादांच्या अगोदरची संतती टिकत नसावी अशी परिस्थिती असल्याने दादांचे नाव धोंडू (दगड सहसाभंगणार नाही. कणखर अशी वस्तू) हे नाव ठेवलेले होते असा इतिहास मिळतो आणि आपणास माहीत आहे की, त्यापासूनची संतती स्थिर झाली, टिकली. या जन्माच्या इतिसाहासातच आपणास शोध घेता येईल की दादांपासूनची ही

भक्कम फळी कित्येक वर्षे टिकली. आपण पाहतो की हे नाईक कुटुंब फुटले नांही, दुभंगले नाही, तुकडे तुकडे या कुटुंबाचे झाले नाहींत.

या कुटुंबाशी माझा संबंध आला व अगदी जवळून पाहावयास मिळाले आणि माझ्या पाहाण्यात खानदेशपासून ते बेळगाव तसेच कोकणभाग या भागांत आता फार प्रमाणात विभक्त कुटुंबेच पहावयास मिळतात. एकत्रकुटुंबपद्धती आता दुर्मिळ होत आहे.

दोन्हीमधील चांगली कोणती यावर विचार केला तर दोष दोन्हीमध्ये काढता येतील तसे लाभही सांगता येतील. मी पाहिले ते असे की वैयक्तिक स्वार्थ पाहाणाऱ्यांना विभक्त कुटुंब पद्धती पसंत पडते आणि ते अलग होऊन आपला स्वतंत्र संसार मांडू पाहतात. काहीकाळ बरे वाटते पण पुढे आपल्या मुलांचे संरक्षण, संगोपन, शिक्षण, घराचे संरक्षण, नेहमीच्या हरघडी निर्माण होणाऱ्या अडचणी, आजार, आपणा दोघांपैकी कोणास बाहेर अगर बाहेरगांवी जाणे असेल तर मुलांची व्यवस्था काय ? शिवाय घर बंद करून गेले तर चोराचिलटांपासून भय नाना प्रकारच्या अडचणी पाहिल्या तर वाटते की, एकत्र पद्धती बरी.

पण त्या पद्धतीमध्ये कामाची माणसे कामांतच राहतात धूर्त मतलबी ढोंगी आणि श्रेष्ठ-कनिष्ठ, बोलकी-अबोल यातील कांहींच्या वाट्याला श्रम आणि कष्ट तसेच प्रकाशांत न येण्याचे नशिब येण्याची शक्यता जास्त असते, हे खरे पण एकत्रकुटुंबात जबाबदारी श्रम काळजी आणि आनंद याना भागीदार बरेच मिळतात. एकाकीपणा आणि त्यापासून निर्माण होणारे प्रश्न जाणवत नाही. हा लाभ त्या घरांतील व्यक्तीच्या ध्यानी आला नाही तरी स्वतंत्र अभ्यासू माणसाच्या ध्यानी आल्याशिवाय राहात नाही. कुटुंबामधील कमी बुद्धीचे, शारीरिक असमर्थ अगर व्यंग असलेले, शिक्षणांत प्रगती कमी असलेले, अविवाहित अगर वैधव्य संतती नाही अशी तसेच विधूर, वृद्धावस्था व गलितगात्र होणारे अगर एकंदर कमनशिबी असणाऱ्यांना सामावून घेण्याची ताकद क्षमता या एकत्रकुटुंबात असू शकते. दादांची धडपड त्या दृष्टीने असावी असे दिसते. अलीकडे आपण पाहतो की, शिक्षण पूर्ण होऊन उद्योगाला लागलेला पुरुष असो अगर स्त्री असो आपल्या शिक्षणाच्या आणि उत्पन्नाच्या कधीकधी सौंदर्याच्या दिमाखात, आपले अगदी गर्भांतअसल्या पासून जन्म आणि पुढेही या मुलांचे मलमूत्र, दूध पाजणे, शीतोष्णापासून संरक्षण करून, बोलण्या-चालण्यास शिकविण्यात आळस न करता कर्तव्य म्हणून आपल्या सर्वस्वाचा त्याग करणारी माता अगर अन्य द्रव्य संपत्ती मिळवून मुलांचे जास्तीत जास्त शिक्षण हित पाहणारा पिता अगर अन्य पालनकर्ता यांचे कधीही न फिटणारे उपकार विसरून आपलेच स्वतःचे व नवीन घरांत आलेल्या पत्नीचे एवढेच आपले जीवन समजणाऱ्यांसाठीच. दादांनी हे एकत्रकुटुंबाचे एक प्रत्यक्ष उदाहरण म्हणून सांभाळले आहे. याचा ते प्रचार करीत नाहीत. प्रत्येक विचारी कुटुंबसदस्यांने यावर विचार करणे जरूर आहे. व्यवसायाच्या

निमित्ताने माणूस दूर जाईल पण त्याने मूळ सेंटर विसरू नये. यामुळे एक शक्ती निर्माण होऊन प्रत्येक जीवाला आधार वाटतो, स्वस्थता लाभते. मानावे त्या प्रमाणे नुकसान अगर नफा आहे पण साम्राज्य फार मोठे वाढले म्हणजे तुकडे होणे अपरिहार्य आहे तसे कुटुंबाचेही पुढे होत राहणार हे खरे पण विशिष्ट मर्यादेपावेतो एकत्र राहणे चांगले याची खात्री होते. दूर राहणे अवश्य झाले तरी मूळ घराण्याशी संबंध ठेवणे हिताचे आहे. कुळधर्म आणि कुलाचार यामागील हाच हेतू असावा. पिता पितामह, प्रपितामह येथेपावेतोच कुळाचा संदर्भ कार्यात असतो. स्वतः दादा, तसेच दिवंगत बाबूराव आणि धाकटे सदानंदकाका या व्यक्तींचे जीवन आणि त्यांची तळमळ आणि कर्तव्यनिष्ठा आणि त्याग पाहिला म्हणजे कौतुक वाटते. विशेषतः बाबूराव आणि सदानंदकाका यांनी विवाहाबद्दल विचार सोडून आपले जीवन मुख्य कुटुंबाकारणी लावले तेही आनंदाने यांचे विशेष महत्त्व आहे. सदानंद यांची आईची सेवा चाकरी आणि काळजी घेणे विशेष कौतुकास्पद म्हणावे लागेल.

सदानंदकाकांचे शिक्षण ते ग्रॅज्युएट असून त्यांच्यामधील अतर्क्य प्रेरणाशक्ती आपणांस एरव्ही क्वचित पहावयास मिळेल पण प. पूज्य वासुदेवानंद सरस्वती अगर टेंबेस्वामींच्या पुण्यतिथीचे निमित्ताने दादांकडे जो उत्सव सोहळा होतो तेव्हा पाहावयास मिळतो. त्यांना मिळणाऱ्या अंतःसूचना दादा स्वतःच्या विचारांशी पडताळून पाहतात तेंव्हा हे ध्यानी येते. एरव्ही सदाकाका म्हणजे गिरणीचा व्यवहार पाहणारे अशीच समजूत व्हावयाची.

आता पावेतो दादांचे ऐहिक जीवनावरून आपण विचार केला.

दादांनी शिक्षकपेशा काही काळ केला तसाच तंबाखूचा व्यापारही अनुभवला. माझ्या परिचयाच्या काळापासून ते व्यवसाय असा काही करीत नाही त्या बाबत विचारले असता तसा आदेश आल्याने सर्व सोडले म्हणून उत्तर मिळाले. फार धाडसाचे हे कृत्य म्हणावे लागेल. हा सामान्य निर्णय नव्हे.

ऐहिक पातळीवरून दादा काय आहेत याबाबत माझी कल्पना कायती मी मांडली. दादांचे अध्यात्म विषयक काही सांगता येईल का ? असे कोणी विचारले तर त्या अध्यात्माबाबत माझीच सांगण्याची पात्रता नाही हे मला कबूल करणे अवश्य आहे. एवढे मात्र खरे की, दादांची त्या मार्गातील शिष्य मंडळी बरीच आहेत. रात्रीच त्या विषयाच्या बैठकी होत असतात आणि कितीतरी उशीरापावेतो तो विषय रंगत असतो असे, ती शिष्य मंडळी अगदी आदरयुक्त भावनेने सांगतात. बेळगांव कोल्हापूर येथील मंडळी मजजवळ हे बोललेली मला माहीत आहे.

मी संख्याशास्त्र हा ग्रंथ पूर्ण केला तेव्हा काही महत्त्वाचा मजकूर लिहावयाची जरूरी होती. दादांना मीच विनंती केली की त्यांनीच ही प्रस्तावना लिहावी मला दादा

म्हणाले की तुम्ही सुरवात करा मी येथेच आहे. मी लिहायला सुरवात केली दहाबारा दिवस सौ. शेळकेबाईनीं माझी फारच उत्तम व्यवस्था ठेवली कोणालाही त्या जागेंत येऊ दिले नाही. विषय पूर्ण झाला. ते लेखन एक अप्रतिम लेखन असा त्याचा सर्व वाचक गौरव करतात. माझी खात्री की ती दादांचीच प्रेरणा होती. विषय माझा ही गोष्ट खरी पण त्यांची प्रेरणा हे तितकेच खरे. त्यांच्या मनांतून हा ग्रंथ व्हावा असे होते.

## असे आहेत आमचे पंत !

*- प्रा. टी. जी. पाटील.*

इ. स. १९३४ ते १९३८ पर्यंत मी कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजमध्ये शिकत होतो. त्यानंतर बी..टी. ची पदवी मिळवण्यासाठी कोल्हापुरातच महाराणी ताराबाई टीचर्स कॉलेजमध्ये १९३९-४० या वर्षी होतो. या काळात मला श्री. पंत (श्री. दादा नाईक संकेश्वर) यांच्या सहवासात य़ेण्याचे भाग्य लाभले. तो सहवास उत्तरोत्तर दृढ होत गेला. ५०-५५ वर्षांच्या या प्रदीर्घ सहवासात त्यांचे मौलिक मार्गदर्शन मला लाभत गेले. शिक्षण क्षेत्रात व सरकारी नोकरीत चांगला नावलौकिक मिळवून एक यशस्वी अधिकारी म्हणून मी जे यश संपादन केले, त्याचे सर्व श्रेय श्री. पंतानाच आहे हे मी नम्रपणे नमूद करतो. त्यांच्या सहवासातील काही आठवणी माझ्या स्मृतिपटलावर कायमच्या ठाण मांडून बसल्या आहेत.

बेळगाव जिल्ह्यातील संकेश्वर हे पंतांचे मूळगांव. त्यांचे वास्तव्यही तेथेच होते. हल्ली मात्र वयपरत्वे त्यांची प्रकृती तितकीशी ठीक नसल्याने, ते कोल्हापूर येथे त्यांच्या चिरंजीवांच्या घरी रहातात. त्यांना भेटावेसे वाटले की मी कोल्हापुरास जात असतो. त्यांची कन्या शास्त्रीनगर बेळगाव येथे असते. तेथे आले की आमची भेट ठरलेलीच.

श्री. पंत हे ग्रॅज्युएट आहेत. जुन्या काळातील पदवीधर असल्याने साहजिकच इंग्रजीवर त्यांचे प्रभुत्व आहे. तसेच संस्कृत व मराठी यांवरील प्रभुत्वही असामान्य आहे. इंग्रजी पुस्तकांचे विपुल वाचन त्यांनी केलेले आहे. याची प्रचीती त्यांच्याशी संभाषण करताना कुणालाही येईलच. वेदोपनिषदे मुखोद्गत आहेत व त्यांचे सार ते नेहमी आम्हांस सांगत असतात. विद्वत्ता, वक्तृत्व व नीतिनियमांचे पालन यांमुळे आम्हाला ते साक्षात साधुपुरुषच वाटतात. परंतु प्रसिद्धिपराङमुख, असल्याने त्याचा गाजावाजा होत नाही. बालपणापासूनच अध्यात्माची जबर ओढ असल्याने ऐहिक भरभराटीकडे त्यांचे क्वचितच लक्ष असे.

" जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती
देह कष्टवीती उपकारे "

या तुकाराम महाराजांच्या उक्तीप्रमाणे, श्री. पंत हे इतरांचे जीवन सुसह्य व सुखी व्हावे यासाठी नेहमी प्रयत्नशील असतात. इतरांची दुःखे समजून घेणे, त्यांना मार्गदर्शन करणे, दिलासा देणे व प्रतिकूल परिस्थितीतही मनाचा तोल ढळू नये म्हणून धीर देणे, यामध्ये ते सदैव रत असतात. परोपकार करण्यातच जीवन व्यतीत करतात. यास्तव या अत्याधुनिक जगातील एक थोर विभूती असे त्यांचे वर्णन केल्यास मुळीच अतिशयोक्ती होणार नाही. 'जनसेवा हीच ईश्वरसेवा' असे ते प्रत्येकांस सांगत असतात. स्वतःच्या उदाहरणाने त्यांनी हे सिद्ध केले आहे.

त्यांनी ज्यांना उपकृत केले आहे व त्यांना गुरुस्थानी जे मानतात असे अनेकजण महाराष्ट्र-कर्नाटक व अन्यत्र आपली सेवा रुजू करीत आहेत - शैक्षणिक, सामाजिक राजकीय, वैद्यकीय इत्यादी सर्व क्षेत्रात.

ज्योतिषशास्त्राचे त्यांचे ज्ञानही वाखाणण्यासारखे आहे. उपदेश व मार्गदर्शन कितीही मौलिक असले तरी सामान्य माणूस- जो विचारांपेक्षा विकारांच्या आहारी गेलेला असतो ते स्वीकारण्यास तयार नसतो. ज्योतिषशास्त्राचा आधार देऊन मार्गदर्शन केल्यास ते ताबडतोब स्वीकार्य होते, हा आपला अनुभव आहे. याचा उपयोग करून सामान्य माणसांस मोठा विरंगुळा ते देतात. श्री. पंत गायनकलेतही पारंगत आहेत. सुश्राव्य गायन असले की त्यात ते तल्लीन होतात. अडीअडचणी, संकटे, दुःखे, चिंता यांचा विसर पाडण्यास गायन हे एक रामबाण औषध आहे. " गाण्याचे झाड सर्वत्र फुलले पाहिजे" असे ते म्हणतात.

सर्व धर्मांची शिकवण समान आहे. मानवी कल्याण शांती व स्थैर्य हाच संदेश सर्व धर्मांनी दिला असल्याने धर्माचरणाने सर्वांचे कल्याण होईल ही त्यांची धारणा आहे. सर्वधर्मसमभाव मानणारे व प्रत्यक्षात आचरणारे असे एक थोर विभूती ते आहेत.

श्री. पंत हे अवतारी साधु पुरुष आहेत, असे माझे ठाम मत आहे. त्यांची राहणी, इतरांना मार्गदर्शन करून त्यांची दुःखे हलकी करण्याची त्यांची वृत्ती, रंजल्यागांजल्याना दिलासा देऊन आपलेसे करून सोडण्याचे ब्रीद- या गोष्टी पाहिल्या असता, ते खरोखरीच साधुपुरुष असल्याचा प्रत्यय कोणासही येईल. धर्म म्हणजे कर्तव्यपालन व अद्रोह. धर्माची ग्लानी होते, तेव्हा परमेश्वर साधुपुरुषाचे रूपाने अवतरतो. पंतांच्या जीवनाचा मागोवा घेतल्यास हे खरे वाटते. संकेश्वर व कोल्हापूर परिसरातील अनेक लोक, त्यांना संत मानून नेहमी त्यांच्या सान्निध्यात येतात.

सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातही त्यांनी भरीव कामगिरी केली आहे. पण प्रसिद्धीची हाव नसल्याने त्यांचे नाव कुठेही प्रकटपणे झळकले नाही.

त्यांच्याकडे विश्वासाने जे गेले, त्यांना सतत मार्गदर्शन लाभले. माझ्या कौटुंबिक, प्रापंचिक, आर्थिक अशा समस्या घेऊन मी अनेकदा त्यांच्याकडे गेलो आहे. मी कधीच विन्मुख होऊन परतलो नाही. त्यांच्या कुटुंबियातीलच मी एक समजून त्यांनी मला प्रेमाने सावरले आहे. त्यांच्या सल्ल्याशिवाय महत्त्वाच्या गोष्टीत पाऊल ठेवायचे नाही हे ठरले. त्यानुसार मी त्यांच्याकडे जातो. माझ्या मुलामुलींच्या विवाहप्रसंगी त्यांनी ज्योतिष-शास्त्राच्या आधारे मला अमूल्य सल्ला दिला. तो मी तंतोतंत पाळला. माझी मुले वैवाहिक जीवनात सुखी आहेत, ही त्यांचीच कृपा.

माझा पंतांशी संबंध आला; तो दृढ झाला. त्यांच्या प्रेमाची पखरण माझ्यावर पडली. इतका ऋणानुबंध जो जडला, तो कोल्हापुरातील काही महनीय व्यक्तींमुळे, ज्यांच्याशी माझाही चांगला परिचय होता. त्या व्यक्तींचा उल्लेख मी येथे करीत नाही. पण त्यांचे ऋण मात्र सदैव स्मरतो. त्यांचे माझ्यावर महदुपकार आहेत.

## संकेश्वरचे साधुपुरुष

*र.श्री. पुजारी, पुणे.*

दुसऱ्यांच्या कल्याणाचा भार अहर्निश वाहणाऱ्या ज्या काही थोड्या त्यागी व्यक्ती समाजात आढळतात त्यात संकेश्वरचे गुरुवर्य धों. श्री. उर्फ दादासाहेब नाईक यांची गणना करता येईल.

होतकरू, उदयोन्मुख अशा तरुण व्यक्ती हेरणे, त्यांना जीव लावणे, त्यांची मनोभूमिका शुद्ध करणे, ज्ञानोपासनेचे बीज त्यांच्या मनात पेरणे, लावलेल्या रोपट्यांची सातत्याने निगा राखणे आणि त्यांच्यामधून उत्तम माणसे निर्माण करणे- हेच त्यांचे जीवितकार्य म्हणता येईल.

नियतीच्या प्रवाहामधून वाहता वाहता १९५० च्या मार्चमध्ये संकेश्वरच्या किनाऱ्यावर मी त्यांच्या हाती लागलो ! तीच त्यांची-माझी प्रथम भेट ! त्यावेळी कोणाचीही चिठ्ठीचपाटी माझ्या हाती नव्हती. तरीही त्यांच्या घरंदाज रिवाजाप्रमाणे मी त्यांच्या घरी अभ्यागत म्हणून दाखल झालो. त्याच दिवशी त्यांच्या सहवासातील काही तासात ही एक अलौकिक व्यक्ती आहे हे माझ्या ध्यानी आले.

बेळगांवच्या सुसंस्कृत, शहरी वातावरणातून संकेश्वरच्या जुनाट, व्यापारी संस्कृतीच्या कोंदट वातावरणात मी येऊन पडलो होतो. व्यापारी संस्कृतीविषयी माझ्या मनात एक खोल अढी होती. या गावात माझे कसा निभाव लागणार याविषयी मी तीव्र साशंक होतो. तोच हा अढी पेशाने व्यापारी असलेल्या दादासाहेबांनी आपल्या सुसंस्कृत आचरणाने माझ्या मनातून काढून टाकली.

दादासाहेबांप्रमाणेच सुसंस्कृत, सेवाभावी डॉ. बापूकाका जोशी यांनीही आपल्या आचरणाने माझ्या मनातील रेंगाळणारा उरलासुरला गैरसमज दूर केला. परंतु, त्याहूनही व्यापारी असूनही सौजन्यशील अशा शाळेच्या समितीवरील एक एक सदस्यांशी माझा जसा परिचय आला, तशी माझी भीती अकारण होती हे माझ्या ध्यानी आले.

शाळेची जागा जुनी, मूळ एका पागेची, शिक्षकवर्ग बहुतेक सर्व स्थानिक, शहराच्या तुलनेने कमी प्रशिक्षित, मुख्याध्यापकाचे अधिष्ठान अनिश्चित, असे असूनही शालेय नियामक समितीचे शाळेकडे पूर्ण लक्ष होते. आपली मुले शिकावीत, शहाणी व्हावीत, अशी त्यांना तळमळ होती. त्यामुळे शिक्षकांना गावातील लोक मान देत. यामुळेही आपणास अनुकूल भूमी लाभली असे मला वाटले. नंतर ध्यानी आले की या भूमीची मशागत खुद्द दादासाहेबांनीच केलेली असून तिच्यामधून बाहेर पडणाऱ्या भरघोस पिकाचे मूळ संगोपनकर्ते ते स्वतः आहेत !

दादासाहेबांचे घर खूपच मोठे, जुन्या पद्धतीचे, कुटुंबपरिवार, लहानथोर धरून चाळीस माणसे, त्यात येणाऱ्याजाणाऱ्यांची संख्या पुष्कळ, त्यांचे आदरातिथ्यही त्या त्या पद्धतीचे आणि उत्तम, तरीही घरातील रिकामा कोपरा अद्ययावत पुस्तकांनी भरलेला ! त्यातील प्रत्येक पुस्तक दादासाहेबांनी वाचलेले ! त्याचे अंतरंग जाणलेले ! तो तो संदर्भ बोलण्यात निघताच ते ते पान आणि ओळी किंवा परिच्छेद त्यांना पाठ असलेल्या !

इंग्रजी-मराठी काव्यच नव्हे तर शेस्क्पीयर ची नाटके आणि हर्डीच्या कादंबऱ्या-सुद्धा त्यांना तोंडपाठ ! टागोर आणि जिब्रान त्यांना मुखोद्गत ! हे अध्ययन पाहिल्यानंतर माझ्या ध्यानी आले की इंग्रजी आणि मराठी विषयाच्या कोणत्याही प्राध्यापकापेक्षा तुलनेने दादासाहेबांचे ज्ञान निश्चितपणे अधिक आणि साक्षेपी आहे !

पुढे हळूहळू ध्यानी आले की, केवळ साहित्य आणि शिक्षण या क्षेत्रातच दादासाहेबांची प्रगल्भ बुद्धी अवगाहन करणारी नाही, तर संगीत, नाट्य, ज्योतिष इत्यादी विविध विषयांतही ती मुक्त संचार करणारी आहे ! त्यामुळेच त्या त्या क्षेत्रांत मान्यवर म्हणून अत्युच्चपदी असणाऱ्या व्यक्तींशी त्यांचे संबंध इतके मित्रत्वाचे आहेत ! दादासा-हेब शाळेत फारसे कधी येत नसत. शाळेत येऊन शाळेच्या दैनंदिन व्यवहारात तर त्यानी कधीच ढवळाढवळ केली नाही. परंतु शाळेतील घडामोडींची त्यांना खडान् खडा बातमी असे ! त्यांच्या निरोपावरून मी जेव्हा जेंव्हा त्यांच्या घरी जाई, तेंव्हा शाळेतील विषय ते क्वचितच बोलत. साहित्य आणि शिक्षण हाच विषय बोलण्यात असे. त्यामुळे संभाष-णाच्या निरपेक्ष, निर्मळ तारा जुळत. प्रत्येक गोष्टीचा नवनवीन दृष्टिकोन घेऊन मी त्यांच्या घरून बाहेर पडे.

रात्रीच्या वेळी शिक्षणक्षेत्रातील मंडळींची बैठक जमविणे व रात्रभर शैक्षणिक, साहित्यिक, सामाजिक विषयांची चर्चा अगदी अनौपचारिकपणे करणे हा दादासाहेबांचा

बौद्धिक छंद. यामुळे माझी वैचारिक भूक सहजच शमे. अनेक गोष्टींविषयीची मनातील किल्मिषे आपोआप दूर होत. मन ज्ञानोपासनेसाठी ताजेतवाने होई.

हाच प्रत्यय गुरुवर्य एम.एन. उर्फ बापूसाहेब दुंडगेकर कुलकर्णी यांच्या सहवासात या आधी बेळगांवी मला आला होता. त्या अनुभवाचीच ही सुधारुन वाढविलेली आवृत्ती होती. नंतर बापूसाहेबही मधून मधून संकेश्वरी येऊ लागले. त्यामुळे बापूसाहेब. दादासाहेब आणि मी यांच्यात निकटत्त्वाचा एक नवीन धागा निर्माण झाला. तो आजमितीसही टिकून आहे.

बापूसाहेब दुंडग्यांचे, तर दादासाहेब संकेश्वरचे. हिरण्यकेशी नदीच्या तीरावरील एकाच पंचक्रोशीतील, सारख्याच बुद्धिमत्तेचे चारित्र्याचे हे दोन विद्वान प्रेमळ साधुपुरुष. त्यांच्या सहवासात प्रत्यक्ष किंवा पत्ररुपाने मी यावे आणि त्यांनी निर्माण केलेल्या स्नेहपरिवारातील एक व्यक्ती मी व्हावे, हे मी माझे भाग्य समजतो.

संकेश्वर येथील शाळेत मी दोन वर्षे काम केले. तेथील शिक्षकवर्गातही मी प्रिय झालो. परंतु गांधी, विनोबा, सानेगुरुजी यांच्या तत्वज्ञानावर माझे मन पोसलेले असल्यामुळे बंडखोर वृत्तीने उसळी मारुन तीन तीन वेळा मी शाळेत राजिनामे दिले ! ती सर्व प्रकरणे माझे पाठिराखे, वडीलधारे म्हणून दादासाहेबांनी केवळ वात्सल्यामुळे निस्तरली ! मला शाळेत पुनःपुन्हा कार्यरत केले. परंतु नियतीची इच्छा मी पुण्यास जाऊन स्थिर व्हावे अशी असल्यामुळे अखेरी मी पुण्यास येऊन पोचलो. तेथेच स्थिर झालो.

दादासाहेबांच्या बुद्धीस अविषय नाही, सहानुभूतीस मर्यादा नाहीत, साहित्य-संगीत आदिकावरून कलांचा आस्वाद घेऊनही त्यांचे रसिक मन कायमचे सुखवणारे नाही. त्यांना ध्यास आहे तो एका उच्चतर आध्यात्मिक जीवनाचा ! त्यामधून घडणाऱ्या लोकसेवेचा !

भक्ती हे त्यांच्या जीवनांतील सर्वश्रेष्ठ मूल्य आहे. त्यामुळे त्यांचे मनोव्यापार त्या दिशेने मार्गक्रमण करीत आहेत. इतरांनाही ते त्याच मार्गाने नेत आहेत.

समुद्र विविध प्रवाहांना स्वतःमध्ये सामावून घेतो. दादासाहेबांचे मन तसे समावेशक आहे. आपल्या निकट येणाऱ्या व्यक्तींचे दोष, उणीवा ध्यानी येऊनही त्यांच्यामधील गुणांवर लोभावून ते त्यांना जवळ करतील. त्यांच्यामधील गुणांची वाढ करून त्यांचे दोष पुसून टाकतील. क्षुद्र मनोवृत्तींमधून काढून उच्च मनोवृत्तींचा लाभ त्यांना हळूहळू घडवितील.

आतातर इतर विषयांमधून निवृत्त होऊन केवळ अध्यात्म हाच त्यांचा जिव्हाळ्याचा विषय झाला आहे. त्यामुळे त्यांच्या-माझ्यामधील धागा अधिकच दृढ झाला आहे. त्यांचे मार्गदर्शन माझ्यासारख्या अनेक व्यक्तींना हवे आहे. दीर्घकाळपर्यंत हवे आहे.

# तीर्थरुप दादा - ' एक आधारवड '

*प्रा. गंगाधर नारायण कुलकर्णी.*

**योगायोग -**

माझा आणि ती. दादांचा परिचय हा माझ्या वैयक्तिक जीवनातील अतिशय आनंदाचा क्षण ! मला वाटते की आपण जन्माला येताना अनेक नाती घेऊनच येतो. आई-वडील, भाऊ-बहीण, आप्तेष्ट, भाऊबंद तसेच विविध स्तरावरील मित्र .... आणि हो शत्रू सुद्धा ! कधी कधी एखाद्याशी ओळख असावी असे वाटते पण काही केल्या होत नाही, अन् ध्यानी मनी नसता सहज एखादी व्यक्ती आपल्या जीवनात येते आणि जन्मोजन्मीचे ऋणानुबंध मोकळे होतात. किती बोलावे, किती नको, किती ऐकावे अन् ऐकतच राहावे अशी काहीशी दिङ्मूढ अवस्था तयार होते याला योगायोग म्हणावे नाहीतर काय ?

**मनाचिये अंधाराचा होतसे विनाशू -**

ती. दादांची भेट झालेचा नक्की दिवस, तारीख आठवत नाही. करवीर महालक्ष्मीच्या देवालयात मी व माझी पत्नी सौ. उमा असे दोघे देवीच्या दर्शनाला गेलो होतो. देवळातच आमचे कौटुंबिक स्नेही श्री. प्रभाकर मुंगळे भेटले. दर्शनोत्तर काही बोलणे झाले आणि सर्वप्रथम मी त्यांच्या मुखातून ती. दादांचे नाव ऐकले. गंमत अशी की सौ. उमाने त्याच दिवशी सकाळी तिच्या शाळेतील मैत्रिणीकडून ती. दादासाहेबांच्या विषयी माहिती ऐकली होती. दोघांचीही उत्सुकता शिगेस पोहचली होती.

दुसऱ्याच दिवशी उमा आपल्या मैत्रिणीबरोबर ती. दादांच्या कोल्हापुरातील राहत्या घरी (ताराबाई पार्क) भेटीस गेली. दादा उत्तम ज्योतिषी आहेत, विदग्ध वाङ्मयाचे व्यासंगी रसिक आहेत, आपले विचार दुसऱ्याला पटवून देण्याची त्यांची हातोटी विलक्षण आहे आणि या सर्वांवर म्हणजे ' श्रीनृसिंह सरस्वतींचे ' ते सच्चे उपासक आहेत.

मराठी सारस्वतातील संस्कृतमय ग्रंथाचा अवतार व साक्षात् सरस्वती गंगाधरासारख्या सिद्ध पुरुषाच्या मुखातून अन लेखणीतून स्त्रवलेले गुरुमहिमेचे वर्णन त्यांच्या अभ्यासाने ती. दादांना साक्षात् परमेश्वरी वरदहस्त लाभलेला आहे. ती. दादांच्या बरोबर काही महत्त्वाच्या विषयावर बोलावयाचे होते, थोडे मार्गदर्शन हवे होते म्हणून तर उमानेही मला त्यांची भेट घ्यावी असे सुचविले आणि एक दिवस आम्ही उभयतांनी त्यांच्याकडे वेळ ठरवून भेटीस गेलो.

दिवस सुटीचा व वेळ दुपारची. दादा आपल्या घरी वामकुक्षी घेत असतील तर उठवावे कसे या विचारातच पाऊल ठेवले पण पाहतो तो काय ! चार पाच वेगवेगळ्या स्तरातील व्यक्तींच्या समवेत चक्क आडवे पडूनच त्यांच्या गप्पा रंगल्या होत्या. माणसांच्या गर्दीमुळे खोली थोडी लहानशीच भासली. कॉटच्या पायथ्याशी पुस्तकांचे कपाट, विविध विषयावरची अनेक पुस्तके त्यामध्ये हारीने मांडलेली होती. जवळच्या भिंतीवर श्रीनृसिंह सरस्वतींची तेजःपुंज अशी भली मोठी तसबीर, जणूकाय पावित्र्याची ग्वाही देतच करुणाकर दृष्टीने सर्वांवर देखरेख करीत होती.

ती. दादांच्या सराईत नजरेने, लाघवी व मनकवड्या स्वभावाने प्रथमदर्शनीच त्यांच्या प्रेमात पडलो. काही आधिदैविक, अध्यात्मिक व आधिभौतिक अडचणींचा निपटा त्यांच्या मार्गदर्शनाखाली मला करून घ्यावयाचा होता. आम्ही आमचे प्रश्न व शंका विचारीत होतो. दादा तेव्हढ्याच तत्परतेने उत्तरे देत होते. माझे समाधान झाले असे जरी मी छातीठोकपणे सांगू शकलो नाही तरी मार्गस्थांच्या खुणा स्पष्ट उमटू लागल्या. चातुर्याला शहाणपणाची जोड मिळाली आणि नव्या ओढीचा खळाळ मुक्त झाला.

**ती. दादांच्या गप्पा - एक अनुभव.**

ज्ञानेश्वरीबाबत एक तरी ओवी अनुभवावी असे म्हटले जाते. तद्वतच दादांचे बोलणे हा एक शब्दातील अनुभव आहे. दादांचे मन हे एका महाकवीचे आहे. ज्योतिषा-पासून ते वैज्ञानिक प्रयोगापर्यंत, साहित्यापासून ते शृंगारापर्यंत, अभिजात संगीतापासून डिस्कोपर्यंत दादा अधिकारवाणीने बोलतात. मुळातच त्यांची स्मरणशक्ती तीव्र, त्यातच शब्दांसाठी, प्रतिअर्थासाठी न अडखळणे जणू काही ' मला घ्या, मला घ्या ' म्हणतच शब्द त्यांच्याकडे धावत येतात. वाचेची रसाळता, अनुभवाची संपन्नता, हास्याची निर्व्या-जता, अन् जीवनाची कृतार्थता एकदमच ओसंडून येताना पाहिले की असे वाटते, वाक्‌गंगेच्या पुरावर साक्षात् महेश्वराचे नर्तनच चालू आहे. शब्दांच्या अचूक वापराने पुढचा श्रोता बधिर होत जातो. पण ही बधिरता आंधळी बनवीत नाही तर ऑपरेशनपूर्व बधिरता ही वेदना झेलण्याची शक्ती देते तद्वतच दादा पुढल्या वेदना मऊ करतात.

**विज्ञान व अध्यात्म - नाणे एक, बाजू दोन -**

आजकाल तथाकथित विज्ञानवादी अध्यात्माला नावे ठेवताना आपण पाहतो. विज्ञान आणि अध्यात्म हे कोणी परस्परांचे शत्रूच होत अशी अनेकांनी समजूत करून घेतली आहे. या दोन्ही शब्दांचा नीट अर्थ तरी समजला आहे की नाही हे ही त्या बिचाऱ्यांना माहित नसावे पण वाद घालयचा म्हटला की त्याला उत्तर नसते. वितंडवादाचे दुसरे सुंदर उदाहरण माझ्या तरी पाहण्यात नाही.

अध्यात्म हे ' थेअरी ' सारखे असते तर विज्ञान हे त्याचे 'प्रॅक्टिकल ' प्रथम विचार सुचतो, विचार शब्दरुप होतात, शब्दांना भारीत मंत्रांची महत्तता प्राप्त होते अन् ते पुढे पिढ्यान् पिढ्या अनेकांची जीवने उजळतात. तीच एक धारणा होते म्हणून तर ' धारयेत् इति धर्मः ' असे महाभारतात धर्मराज म्हणाले होते. याच धर्मतत्वांचे जेव्हा बुद्धीच्या भावनेच्या निकषावर घासून पुसून त्याची तार्किकता सत्य होते तेव्हा त्याला आपण विज्ञान म्हणतो. विशिष्टांचे ज्ञान म्हणजेच विज्ञान !

आईन्स्टाईन वा तत्सम अनेक वैज्ञानिक संशोधकांची समीकरणे, ऋषिमुनींची वेदचरणे सज्जन, साधू संतांचे वागणे बोलणे व आचरणे ही एकाच अंतिम सत्याची विविध रुपे होत. सर्व चरअचरांच्या महन्मंगलतेची गाणी गाणे व सर्वांप्रती नियतीचा एकच अदृश्य धागा जोडलेला असतो हे प्रकर्षाने दर्शविणे हेच विज्ञान व अध्यात्माचे मूलभूत कार्य होय. इथे शरण जाण्यास लाज कसली ?

**श्री. दादासाहेब नाईक - एक व्यवहारी संत -**

ती. दादांनी आपल्या बालवयात खूप कष्ट झेललेत. व्यापार उदिम केला, संकेश्वरला हायस्कूल स्थापले, शिक्षक व मुख्याध्यापक म्हणून अजोड कामगिरी बजावली. संकेश्व-रच्या शंकराचार्य पीठाचे ते सन्माननीय कार्यकर्ते. अनेक साहित्यिक, सांगीतिक मैफिलीचे ते एक आधारवड, अनेकांचे हितचिंतक, मुले, बाळे, नातवंडे यांचे लाडके दादा, नशिबाने ठोकरलेल्यांचे मार्गदर्शक व व्यवहाराचे पालन करीत असताना संतत्वाकडे झुकलेले एक मुमुक्षू. त्यांची किती रुपे वर्णावी. ज्याला जे हवे ते ते त्यांच्या ठायी पाहावे त्याला ते हमखास मिळतेच हा अनेकांचा अनुभव.

दादा पूर्णपणे संसारात रमले असते तर अनेकांना अपरिचित राहिले असते. संसार सोडून संत बनले असते तर ... तरीही खूप दूर गेले असते.

दादांचे मोठेपण हे यातच सामावले आहे की जेव्हा ते संसारात असतात तेव्हा त्यांच्यातील संत त्याना मागे खेचतो आणि ते जेव्हा संत बनू इच्छितात (किंवा आम्ही बनवू इच्छितो) तेव्हा संसारी पुरुष त्याना मागे खेचतो म्हणूनच ते आम्हाला आवडतात.

लौकिक अर्थाने त्यांच्या वयाला ऐंशी वर्षे पूर्ण झाली, एक हजार पौर्णिमेचा चंद्र त्यांच्या जीवनाला शीतलता देता झाला अशा वेळी त्या जगन्नियंत्यापुढे कोणते मागणे मागावे ' जीवेत् शरदः शतम् ' हे आपले ढोबळ वाक्य झाले. जन्मतःच दादांना शंभर वर्षांचे ज्ञान होते त्यात पुढच्या आजपावेतो ऐंशी वर्षांच्या ज्ञानामृताची भर पडली म्हणजे गणिती हिशेबाने दादा एकशेहे ऐंशी वर्षांचे झाले, तेव्हा ' शरदः शतम् ' हे केव्हाच पुरे झाले. तेव्हा ' यावदचंद्र दिवाकरौ ' त्यांच्या कार्याचा सुगंध अनेकांची जीवने उजळवीत राहावा हीच प्रार्थना.

# मला भेटलेले वैष्णव ती. दादा

*द. र. धर्माधिकारी*

**प्रथम परिचय**

माझी सासुरवाडी, म्हणजे गृहिणी विद्यालयाचे संस्थापक, कोल्हापूरातील स्त्री शिक्षणाचे पुरस्कर्ते, कै. प्रभाकर बाळाजी भिलवडीकर यांचे घर. ते लक्ष्मीपुरीत आहे. नेहमी प्रमाणे एक दिवस सासुरवाडीला गेलो असता तेथे धुळ्याचे प्रख्यात हस्त सामुद्रिक तज्ज्ञ व संख्याशास्त्र तज्ज्ञ श्री. गानू आलेले दिसले. माझ्या सासूबाईनी व मेहुणीने त्यांना हात दाखविण्यास मला सुचविले. 'काय प्रश्न आहे ?' असे श्री. गानू यांनी विचारता, 'मला साक्षात्कार होईल काय ?' असा थोडासा जगावेगळा प्रश्न मी विचारला, 'मी ऐहिक बाबतीत विशेष विचार केला आहे. या तुमच्या प्रश्नाचे उत्तर हवे असेल तर संकेश्वरचे श्री. धोंडोपंत नाईक यांना भेटा. ते तुम्हाला याबाबतीत सांगतील.' असे श्री. गानू यांनी सांगितले. अशा तऱ्हेने ती. दादांचेकडे जाण्यास श्री. गानू हे निमित्तमात्र झाले.

**संकेश्वर येथील प्रथम भेटीतील अनुभव -**

वरील उत्तरानंतर संकेश्वरला जाण्याची ओढ लागली. एक पत्र लिहून टाकले व शनिवारी जेवण करून ११ वाजता निघालो. १-१ ॥ वाजता पोहोचलो. विचारत विचारत घरी आलो. ती. आप्पाकाका दुकानातील बाकावर बसले होते. त्यांना श्री. दादांचे बाबात विचारले. 'तुम्हाला पत्र मिळाले नाही काय ? उद्या येण्यास कळविले होते. दादा, निपाणीला गेलेत ३-४ वाजेपर्यंत परत येतील.' ते म्हणाले तो पर्यंत चहा आला. तो घेतला. दुकानातील खालील बाजूच्या माळ्यावर तक्याला टेकून थोडा आडवा झालो. दुपारची वेळ, प्रवासात ऊन लागले होते. डोळ्यावर थोडी झापड होती. पण जागा होतो. पूजनीय दादा केव्हाही येतील. त्यावेळी डुलकी लागता कामा नये हा धसका होता.

अशा वेळी प्रथमच प. पू. प. टेंबेस्वामी महाराज, दंड घेऊन सदेह घरात येताना दिसले; आनंद वाटला. आश्चर्य वाटले. समाधान वाटले. की मी योग्य ठिकाणी आलो आहे. प.पू. स्वामी महाराजांची दर्शने त्यानंतर, खूप दिवसांनी पू. केशवराव जोशी यांनी लिहिलेल्या 'थोरले स्वामी महाराज' हे महापुराण वाचताना झाली. पण ती नंतरची गोष्ट.

डुलकी झाली. ऊन्हे कलू लागली. संध्याकाळ जवळ आली. 'आता कसे करावे ?' असा प्रश्न मनात आला. ती. दादा तर आले नव्हते. साधारण ६-६ ॥ वाजता ती. दादा आले माझ्या आगमनाची वर्दी त्यांना मिळाली. लगेच ते दुकानात जेथे मी बसलो होतो तेथे आले. व म्हणाले, 'तुम्ही आज रात्री राहू शकता काय ? म्हणजे रात्री निवांत बोलू.

कारण माझे स्नान, नित्याचे आन्हिक व जेवण व्हावयाचे आहे. पण तेवढी सवड नसेल तर आपण आधी बोलू व नंतर माझे नित्याचे कार्यक्रम मी करीन.' मी राहण्याचे ठरविले. त्यांचे आन्हिक आटोपून ते सोप्यावर आले व चर्चा सुरू झाली.

प्रथम मी काय आहे ? काय वाचले आहे ? याची त्यांनी विचारपूस केली. बहुतेक त्यांची निराशा झाली असावी. रामदास, ज्ञानेश्वर, तुकाराम वगैरे सर्व नावे त्यांनी घेतली व मी नकारार्थी मान हलवली. हे विचारण्याचा उद्देश पण त्यांनी सांगितला. 'आपण ही चर्चा शब्दाने करतो. तेव्हा त्या शब्दांचा एकच अचूक अर्थ उभयताना अभिप्रेत असणे जरूर आहे. म्हणून चर्चेला 'परिभाषा' लागते. '

नंतर त्यांनी दत्तगुरुंच्या बद्दलचे स्वरचित पद म्हणण्यास सुरूवात केली. ते पद फारच छान होते. व ते ऐकता ऐकता त्यामध्ये 'मी' विरघळून गेलो. एकदम समाधी मध्ये, असे का होते हे मला कळत नव्हते.

थोड्या वेळाने समाधी अवस्था उतरल्यानंतर दादा म्हणाले,'हे पद महाराजांनी रचून घेतले आहे. काही साधकांना असा अनुभव येतो. तुझे ठीक आहे.'

रात्री भोजन झाले. ती. दादांचे खोलीत (जेथे त्यांचे आन्हिक चालते) आमच्या दोघांची अंथरुणे घातली होती. माझ्या नेहमीच्या प्रघाताप्रमाणे मला ध्यानाला बसावयाचे होते. (मला प.पू. गुळवणी महाराज, पुणे यांनी शक्तिपात दीक्षा दिली आहे) तेव्हा ती. दादाना त्या बाबत, औपचारिक परवानगी विचारली त्यांनी ती आनंदाने दिली व म्हणाले'आज रात्री तुला स्वामी महाराज (प.पू. नृसिंहसरस्वती दत्तमहाराज) दर्शन देतील असे वाटते.' ध्यान, नेहमीप्रमाणेच उत्तम झाले. विशेष म्हणजे, त्या दिवशी प्रथमच मला ध्यानात हजारो जिवंत गणपतींचे दर्शन झाले. हे गणपती हलत होते, चालत होते, सोंडा हलवत होते, बोलत होते. जणुकाही मी त्यांच्यामध्ये सापडलो होतो. पूर्वी असा अनुभव आला नव्हता. ध्यानामध्ये देवतांचे दर्शन होत असे पण इतक्या प्रचंड प्रमाणावर व संख्येने असे हे पहिलेच दर्शन होय !

ध्यानाचा एक चरण संपल्यावर ती. दादानी 'दर्शना' बाबत विचारले. तेव्हा त्यांना मी हे 'दर्शन' सांगितले. 'तुला आज स्वामी महाराजांचे दर्शन होणारच.' पुन्हा ध्यानाला बसल्यावर प.पू. महाराजांचे कृपेने मला प.पू. स्वामी महाराजांचे (प.पू.नृसिंहसरस्वती दत्तमहाराज) दर्शन झाले. धन्य वाटले. ती. दादांना त्या बाबत सांगितले. त्यानाही आनंद वाटला. अशा तऱ्हेने ती. दादांच्या संपर्कात मी प्रथम आलो.

ती. आप्पाकाका व मी दोघेही राजाराम कॉलेजचे विद्यार्थी. ते माझ्या पेक्षा १-२ वर्षांनी पुढे असावेत. ती ओळख निघाली. पण त्यापेक्षा ते प. पू. वासुदेवानंद सरस्वती टेंबे स्वामी महाराज यांचे शिष्य आहेत हे ती. दादांचे तोंडून ऐकून त्यांचे बद्दलचा आदरभाव दुणावला. मी त्यांच्या घरात पडलो असताना प.पू. स्वामी महाराज (वासुदेवानंद सरस्वती) यांचे दर्शन घडले याचा संबंध जुळला. कारण माझे परमपूजनीय गुरुदेव गुळवणी महाराज

हे देखील प.पू. टेंबेस्वामी महाराजांचे शिष्य. त्यामुळेच माझ्या परमगुरूनी तू कोठे परक्या ठिकाणी आला नाहीस.' हे आपले स्वत:चे दर्शन देऊन जणू काही मला दाखवून दिले.

एकदा ती. आप्पाकाका यांना मी विचारले, 'स्वामी महाराजांचे आपणाला दर्शन होते काय ?' ते म्हणाले, 'मी ध्यानाला मांडी घालून बसलो कीं स्वामी महाराज माझे समोरच बसलेले असतात. तुला जितके स्पष्टपणे मी पाहातो, त्यापेक्षा अधिक स्पष्टपणे ते मला दिसतात. '

अशा तऱ्हेने ती. दादा यांचा व माझा परिचय झाला. त्यांनी मला आपला मानले. माझी पत्नी सौ. अनू हिला आपली मोठी मुलगी मानली. एकमेकांच्या प्रेमाचे धागे इतक्या रीतीने गुंफले गेले की, कुटुंबातील सर्वात जवळचे वडिलधारे प्रेमाचे माणूस म्हणजे ती. दादा झाले.

या आपुलकीचा जिव्हाळ्याचा मुख्य स्त्रोत अध्यात्म व आध्यात्मिक अनुभव हा असल्याने, आज पंचवीस वर्षे झाली तरी ती प्रेमाची ओढ अद्यापि कायम आहे.

त्यानंतर ती. दादांच्याकडे जाण्याचा प्रसंग आला तो कै. सौ. वहिनी भाजल्या त्यावेळी. माझे पितृतुल्य स्नेही कै. आप्पाजी गणेश कुलकर्णी (टिटवेकर) ती. काकू व आम्ही दोघे मिळून गेलो. ती. कुलकर्णी काकांचे काही प्रश्न होते. तेथे गेल्यावर ही अपघाताची बातमी समजली. पण दादा स्थितप्रज्ञ होते. ते म्हणाले, 'तिच्या जिवाला काही धोका नाही. तुम्ही जेऊन घ्या. रात्री बोलू' रात्री बराचवेळ बोलून आम्ही परत आलो.

ती. दादा नेहमी घरी यावेत असे वाटे. मी त्यांना पत्र पाठवून बोलावत असे. आमच्या प्रेमासाठी ते पन्हाळयाला येत. (त्यावेळी मी पन्हाळयाला राहात होतो.) मग रात्रभर गप्पा चालत.आध्यात्मिक चर्चा, वाङमयीन चर्चा चाले. यामध्ये बोलण्याचे काम ती. दादा करत. आम्ही श्रोते होतो. ज्या ज्या वेळी पारमार्थिक चर्चेत भावनोत्कट प्रसंग येत तेव्हा सर्व घरात मोगरा किंवा चंदनाचा सुगंध सुटे. हे हिप्नाटिझम नाही. अत्तर वा उदबत्तीचा वास नव्हे. तो सर्वांना येत असे. ती. दादा म्हणाले,'जेव्हा जेव्हा स्वामी महाराज यांची स्वारी येते तेव्हा असा सुगंध सुटतो.'अशा वेळी ती. दादांच्या अंगाला सुगंध येत असे. एकदा, आम्ही दोघे रिक्षेतून चाललो होतो. बोलणे चालू होते. चंदनाचा वास येत होता. अगदी काखेत देखील चंदनाचा वास होता. मी घेऊन खात्री करून घेतली.' हा आध्यात्मिक वारसा ती. दादाना त्यांच्या आईकडून मिळाला. ती दादांचा श्री गुरुचरित्र सप्ताह पद्धतीने वाचण्याचा कित्येक दिवस नियम होता. या वाचनाचे वेळी, श्रावणासाठी श्री दत्तगुरु येतात. म्हणून एक पाट घालण्याची पद्धत आहे. कै. ती. आई मात्र या सप्ताह श्रवणास बसल्या की वाचनास सुरूवात होण्याबरोबर त्याना खडावाचे आवाज ऐकू येत व श्रीदत्तगुरु पाटावर बसलेले दिसत. असे कै. ती. आई सांगत.

ती. आप्पाकाका यांचे बाबत ही ते टेंबे स्वामी महाराजांचे शिष्य आहेत. त्यांना त्यांचा अनुग्रह आहे ही गोष्ट ते आईच्या पोटात असतानाच ती. दादाना समजली होती. गतजन्मामध्ये ते विवेकानंदांचे निकटवर्तीय होते व त्यांचा बेळूरमठापर्यंतचा प्रवास मानसिकरीत्या कसा झाला ही एक अद्‌भुत गोष्ट आहे. ती. आप्पाकाका हे एका स्वतंत्र लेखाचे विषय असलेने येथेच थांबतो.

ती. दादांना मात्र श्री नृसिंहसरस्वती स्वामी महाराजांचा अनुग्रह आहे व त्या जपाचे आवर्तन सतत मनात सुरू असते. त्यांना अनेक विपरीत प्रसंगी कठीण परिस्थितीत, त्यांनीच (स्वामीमहाराजांनी) समर्थपणे उभे केले.

एकदा पन्हाळा येथे आम्ही सर्वजण जमलो होतो. माझे वेळी मी ध्यानाला सकाळी ६ ॥ ते ७ ॥, संध्याकाळी ६ ॥ ते७ ॥, व रात्री १२ ॥ ते १ ॥ बसत असता, मला ती. दादांचे बद्दल आदेश आला. 'तो महान योगी आहे. त्यांना नमस्कार कर. तो महान भोगी आहे, महान त्यागी आहे' असा आदेश पहिल्या बैठकीला आला. मी नमस्कार केला. दुसऱ्या बैठकीला दुसरा आदेश व तिसऱ्या बैठकीला तिसरा आदेश आला. मी नमस्कार करून ती. दादांना हे आदेश सांगितले. तेव्हा ते म्हणाले, 'हे सर्व खरे आहे' परवा संकेश्वरला एक इसम अचानक आला व म्हणाला,'तुमचे डाव्या तळपायावर त्रिशूळ आहे. तुम्ही गतजन्मी योगी होता. ' ती. दादा म्हणाले, 'खरे तर मलाही माहित नव्हते. पाहतो तो खरेच त्रिशूळ आहे' असे म्हणून त्यांनी ते त्रिशूळ दाखविले. माझे उजवे तळपायावर पद्म आहे.

ती. दादाना परमेश्वराने अंत:स्फूर्ती किंवा 'इंट्यूशन'ची देणगी दिलेली आहे.त्यांना स्पष्ट आदेश येतात. त्यामुळे समोरचा माणूस कोण आहे ? काय आहे याचे ज्ञान त्यांना होते. त्याबद्दलचे अनेक प्रसंग त्यांच्या बरोबर असताना मी पाहिले आहेत. त्यांतील एक सांगण्याचा मोह आवरत नाही.

आम्ही (मी, माझे कुटुंबीय, व ती. दादा) कोल्हापूरला आमच्या घरी गप्पा मारत बसलो होतो. सकाळची वेळ होती. चहा नुकताच झाला होता. इतक्यात अचानक ४/५ माणसे ती. दादांची चौकशी करत आली. पूर्ण अनोळखी माणसे त्याना बसण्यास सांगून, ती. दादा एक क्षणभर एकाग्र झाले. ती माणसे बोलण्यास सुरूवात करण्यापूर्वीच ती. दादा म्हणाले, 'काय हो, तुमचे कुलदैवत त्रिशूळ आहे काय ? तुम्ही तुमच्या कुळदैवताला बरेच दिवसात गेला नाही काय ?'

आलेली माणसे अक्षरश: थक्क झाली, 'होय आम्ही राजस्थान मधील मेहतर जमातीचे आहोत. आमचे कुळदैवत त्रिशूळ आहे. आमचे देव्हाऱ्यात त्रिशूळ आहे. आम्हाला आमचे कुलदैवतास जाणेस झाले नाही. पण आपणास हे कसे समजले ?

ती. दादा म्हणाले, 'तुम्ही आत आलात तेव्हा तुमचे मागे मला त्रिशूळ स्पष्ट दिसले. तुमच्या कुळदैवताचा कोप असल्याने तुम्हाला अडचणी येत आहेत. तरी रु. ११/- काढून देवाचे नावाने बांधून ठेवा. जेव्हा शक्य होईल तेव्हा तिकडे जाऊन या. '

वरील उदाहरणावरून ज्योतिष सांगण्यास ती. दादांना पत्रिका वगैरेंची फारशी आवश्यकता नसते हे लक्षात येईल. काही लोकांना ती. दादा हे ज्योतिषी म्हणूनच माहिती आहेत. पूर्वी त्यांच्या भोवती लोकांचा व पत्रिकांचा गराडा असे. हस्तसामुद्रिक, चेहऱ्यावरून भविष्य, प्रश्न कुंडली मांडून भविष्य, ठराविक अंक मनात धरून भविष्य असे अनेक प्रकार चालत. अक्षरशः रात्र रात्र भर कधी कधी मी दादांना म्हणत असे. (जरी ते माझ्यापेक्षा वयाने, ज्ञानाने सर्वच बाबीने मोठे असले तरी) "दादा हा काय बाजार मांडला आहे. ते म्हणत,"अनंतराव, या जगात दु:ख फार आहे. त्यांचे (आर्तांचे) दु:ख थोडे कमी करण्यात हातभार लागत असेल तर का लावू नये ? या निमित्ताने तरी लोक देवाकडे वळतील. कालांतराने ती. दादांचे लक्षात आले की हे बहुसंख्य लोक पक्के मतलबी आहेत. त्यांना देव नकोच आहे. फक्त गरजेपुरता आपला उपयोग करून घ्यावयाचा आहे; आणि म्हणूनच त्यानी हा सर्व फापटपसारा आता बंद केला आहे.

ती. दादांचे जीवन अनेक तऱ्हेने समृद्ध आहे. पुस्तक वाचनाचे त्यांना जबरदस्त वेड आहे. अनेक नवीन नवीन नुकतीच प्रकाशित झालेली पुस्तके मी त्यांच्याकडेच पाहिली. इंग्रजी विषयावर त्यांचे निरपवाद प्रभुत्व आहे. असामान्य धारणा शक्ती, स्मरणशक्ती यांचे ते उदाहरण आहेत. आजदेखील शेक्सपिअर च्या नाटकातील उत्कृष्ट उतारेच्या उतारे ते म्हणून दाखवितात. अगदी योग्य ठिकाणी थांबून त्यांनी एकदा 'सॉलिटरी रीपर' ही गाजलेली कविता इतक्या अर्थपूर्ण रीतीने म्हणून दाखविली. आणि कविता नुसती वाचून देखील कळू शकते. याचा वस्तुपाठ मिळाला.

संगीताचे जगात ती. दादांचा मान आहे. निपाणी बेळगांव भागात त्यांच्या इतका जाणकार दुसरा कोणी नाही. म्हणून अनेक गायक ती. दादांच्या घरी आपणहून येऊन त्यांचे समोर गाऊन त्यांची दाद मिळताच स्वतःला धन्य समजतात. दरवर्षी प.पू. टेंबेस्वामी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त भरणाऱ्या संगीत सभेत, कै. कागलकर बुवा, संगमेश्वर गुरव, पोतदार बुवा, नूतन गंधर्व या सारखे नामवंत गायक आपली सेवा सादर करतात. व संकेश्वरकरांना संगीताची मेजवानी मिळते. पण या सर्व गायकांना अग्रभागी दादा हवे असतात. त्यांनी डोलावलेली मान, त्यानी दिलेली दाद त्यांना फार मोलाची वाटते.

ती. दादांनी आयुष्यात शक्य असूनही पैसा फारसा जोडला नाही. पण माणसे मात्र अफाट जोडली. माझ्या पहाण्यात इतका माणूस संग्रह असलेली व्यक्ती दुसरी नाही.

ती. दादांचे अंतःकरण अतिशय प्रेमळ आहे. ज्याला आपला मानला, त्याला ते कधीही टाकत नाही. त्याच्यासाठी काहीही करावयास तयार असतात. मी टायफॉईडने आजारी असताना, माझ्या वडिलांनी प्रथम त्यांना तार केली व ते लगेच धावून आले जगरहाटी प्रमाणे आपला मतलब साधल्यावर दादांचा त्याग, प्रेम विसरणारी त्यांचे वरच उलटणारी माणसेही पाहिली. पण दादा मात्र त्यांच्या वागणुकीचा विचार न करता, त्यांच्या हिताचा विचार करणार. एकदा मी त्यांना याबाबत चिडून विचारले, 'दादा तुम्ही असे कसे

हो ?' त्यावर ते म्हणाले,'अरे, ज्याला आपले मानले त्याला त्रास मानावयाचा काय ? शंकरानी अतिजहाल विष कंठात धारण केले. त्याचा दाह सहन केला पण त्याचा त्याग केला नाही.'

ती. दादांनी किती लोकांच्या विचित्र स्वार्थी वागणुकीचा दाह सहन केला असेल ते त्यानाच माहित. तरी देखील या लोकांनी देखील त्याना मदतीची हाक मारली तर हातातील काम बाजूल ठेवून त्यांच्या मदतीला धावून जाताना मी त्यांना पाहिले आहे.

ती. दादांचे अंत:करण सागराप्रमाणे विशाल आहे. त्यांचे प्रेम त्यांच्या कृतीतून बोलण्यातून व्यक्त होते. हात विलक्षण बोलके आहेत. तो हात अंगावरून फिरताना, त्यांचे आश्वासक प्रेम स्पष्ट जाणवते, त्यांचे पाय सुकोमल आहेत.

ती. दादांचे बद्दल कितीही लिहिले तरी अपुरेच आहे. त्यांचा सहवास, प्रेम आम्हाला मिळाले. त्यामुळे आमच्या जीवनाच्या कक्षा रुंदावल्या. नवीन विचारांची नवी जाणीव झाली. पुष्पासंगे मातीस लागे वास या वचनाप्रमाणे आमचे एकसुरी जीवन अधिक समृद्ध अधिक सुसंस्कृत बनले.

## एक बहुलक्ष्यी कुटुंबवत्सल

*डॉ. सुरेश जोशी, देवरुख.*

प्रत्येक प्रदेशाची एक अस्मिता असते. त्या अस्मितेचे अनेक मानबिंदू असतात. संस्था, व्यक्ती, उद्योगव्यवसाय, कृषिसमृद्धी, एवढेच काय त्या परिसरातील निसर्गसृष्टी ही सुद्धा या अस्मितेत समाविष्ट होते. अधोरेखित करावेत असे तिचे अनेक मानबिंदू दाखवता येतात.

कृष्णा-पंचगंगा आणि घटप्रभा-मलप्रभा या नद्यांच्या टापूतील मराठी-कन्नड भाषिक भूप्रदेशाची आपली अशी एक अस्मिता आहे. कोल्हापूर आणि बेळगांव जिल्ह्यांना जोडणारा आणि पुणे-बेंगलोर महामार्गामुळे दुभागलेला हा परिसर सांस्कृतिक पर्यावरणाच्या संदर्भात अनेक मानबिंदूंनी नोंदविण्यासारखा आहे. धर्म, इतिहास, साहित्य, संगीत, शिक्षण, व्यापार, सहकार, शेती अशा संस्कृतीच्या प्रमुख घटकांची छाननी करून काही मानबिंदू दाखविता येतील. तसेच या बहुघटकांना स्पर्श करून सक्षमतेने कार्यरत राहणाऱ्या काही व्यक्तींची ही मुद्दाम दखल घ्यावी लागेल.

या परिसराच्या मध्यवर्ती असलेल्या संकेश्वर या गावातील श्री. धोंडोपंत श्रीपाद नाईक तथा ती. दादा नाईक ही अशीच एक महनीय व्यक्ती आहे. बहुपैलुत्व हा त्यांच्या

व्यक्तिमत्वाचा विशेष आहे; आणि 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' ही सहज लक्षात येणारी त्यांची कार्यनिष्पत्ती आहे.

माझ्या बालपणापासून, गेली सुमारे चाळास वर्षे मी त्यांना ओळखतो, कारण मी त्यांच्या परिवारापैकीच एक आहे. माझे वडील, ती. अण्णां (कै. दामोदर व्यंकटेश जोशी, निपाणी) चे ते बंधुतुल्य स्नेही आहेत. त्यामुळे माझ्या विद्यार्थीदशेपर्यंताचा बराच काळ ती. दादांच्या सहवासात मी वारंवार घालविला आहे. मी, माझी भावंडे, मेव्हणे यांना ते पितृतुल्य आहेत. बालपणी त्यांच्या वडिलकीच्या नात्याने मी कधी दबून गेलो आहे, तर अनेकदा त्यांची बहुस्तरीय कार्यक्षमता पाहून अचंबितही झालो आहे. त्यांचे बुद्धिवैभव आणि स्मरणशक्ती यांचा विस्मयजनक प्रत्यय मी अनेकवेळा घेतला आहे. गंमतीनेच सांगायचे तर दादांच्या बहुस्तरीय गोतावळ्यातील त्यांचे ' अधिनायकपद ' हा आम्हा धाकुट्याचा अनेकदा विस्मयोविषय झाला आहे. परिवारात आणि नाते संबंधात 'अत्युच्चपदी सदा विराजे असे ते आहेतच, पण समानधर्मा अभिरूचि संपन्न बुद्धिमंतांच्या बैठकीतही ती. दादांना आम्ही ' ओपनिंग बॅटसमन ' म्हणून सेंच्युरी झळकवताना प्रेक्षकांच्या गॅलरीत बसून अनेकदा पाहिले आहे ! कसोटीत ते खेळणारा मातब्बरांचा संघ नसेल तर मात्र सर्वमान्य ' अम्पायर ' ही त्यांची भूमिका असे !

ती. दादांच्या गोतावळ्याला बहुस्तरीय, समानधर्म, बुद्धिमंत असे म्हटले आहे ते खरोखरच अनेक अर्थांनी खरे आहे. समान आवडीनिवडी या अर्थाने अनेक समान धर्म त्यांच्या गोतावळ्यात आहेत, तसेच ॲकॅडेमिक क्षेत्रात काम करणारे बुद्धिमंत आहेत आणि बहुस्तरीय म्हणावेत अशा कितीतरी जाति धर्मातील, भिन्न भिन्न व्यवसायातील लोकही त्यांच्या बेठकीत सातत्याने आढळतात. निष्णात ज्योतिषी, वंदनीय साधक सत्पुरुष, फेमस फिल्मवाले, रंगभूमीचे वेडे कलावंत, गानकला निपुण मैफलवाले, ख्यातनाम धन्वंतरी किंवा आयुर्वेदाचार्य, परदेशस्थ डॉक्टर वा इंजिनियर, संशोधक-प्राध्यापक, हौशी लेखक, वाचनप्रेमी सरकारी अधिकारी, व्यवहारग्रस्त धनिकवणिक बाळे, नांगर धरणारे शेतकरी, व्यापतापाने खचलेली गृहिणी, लग्न कार्याचा पसारा ' न आवरे आवरिता ' असा आप्तेष्ट, ' कुठंतरी या पोराला द्या चिकटवून ' असे काकुळतीला येऊन विनवणारी माता भगिनी, मनोस्वास्थ्य हरवलेला एखादा सांसारिक, इंग्रजी वाङ्मयाचे धडे घेऊ इच्छिणारा विद्यार्थी, मुंबई महानगरीत कायमचा निवारा उभारण्याच्या खटाटोपात असणारा आणि सध्या आर्थिक खटपटीत गावाकडे आलेला दोस्ताचा भाचा वा जावई वगैरे, जपजाप्याची सांगता झाली किंवा तत्सम धार्मिक कृत्याची प्रसादाची पुडी घेऊन आलेला सश्रद्ध आप्त, राज्यस्तरावर वा केंद्रीय स्तरावर मंत्रीपद सांभाळूनही घरगुती अगत्याने विनम्रपणे भेटीसाठी येणारा नेता वा आमदार, शिक्षणमहर्षी, वा सहकारमहर्षी, साखरसम्राट अथवा कॉटनकिंग अशी कितीतरी नमुन्याची माणसे ती. दादांच्याकडे वारंवार हजेरी लावताना मी पाहिली आहेत. शिवाय मी न पाहिलेल्या वा नजरेतून सुटलेल्या आणखी कितीतरी

‘व्यक्ती आणि वल्ली ’ नोंदवायच्या तर एक स्वतंत्र अशी ‘ दादास्नेहपरिवार डिरेक्टरी ’ तयार करावी लागेल !

यापैकी अनेकांची केवळ नाममात्र हजेरी लागे अथवा क्षेम समाचाराचीच बोलणी होत असे नव्हे, तास न् तास वा रात्र रात्र त्यांच्या बैठका चालत. बौद्धिके झडत. कागदपत्रे चाळली जात. खटलीखेकटी निस्तरली जात. एखाद्या संस्थेची केस लढवायची पूर्व तयारी चाले. कधी काव्यशास्त्र विनोद, कधी तत्त्वज्ञान, कधी अध्यात्म तर कधी व्यापारी अर्थ व्यवहाराची सल्लामसलत दीर्घ बैठकातून चाले. मंथन होई आणि मतांतरेही प्रकट होत. ‘ वादे वादे जायते... ’ वगैरे काय म्हणतात ते आम्हा मुलांना त्या वयात न उमजे, पण ‘रजनी नाथ नभी उगवला ’की समस्त मंडळी बैठकीत झोपी जात एवढे आठवते.

आम्हा पोरांकडे या बैठकीची काही अनुषंगिक कामे सोपविलेली असत. चहापान, विडीकाडी, निरोप पाठविणे किंवा कधी रात्री मध्यरात्री थिएटर पर्यंत जाऊन चिरमुरे शेंगदाणे यांचा खुराक घेऊन येणे वगैरे. कधी पेंगुळलेल्या अवस्थेत अशा कामांचा रागही यायचा. पण अनेकदा त्या अर्धवट समजणाऱ्या चर्चेत ‘ इंट्रेस्ट ’ वाटायचा. क्वचित कोणा परिचिताची फिरकी घेतली गेली की हसूं यायचे किंवा एखाद्या परिचिताच्या अपरिचित कामगिरीचा, गुणाचा गौरव झाला की त्याबद्दलचा आदर दुणावायचा !

विद्यार्थीदशा संपवून नोकरीच्या निमित्ताने घराबाहेर पडलो तसे ती. दादांच्या या ‘ मल्टिपर्पज ’ बैठकांचा माझा संपर्क कमी झाला. कधीतरी लग्नकार्याच्या निमित्ताने गाठीभेटी होतात, दुरून दृष्टिभेट होते, पण विनम्रपणे चरणस्पर्श करण्यापलीकडे अथवा औपचारिक क्षेमसंवादा पलीकडे विशेष काही घडेनासे झाले. आता जुन्या आठवणींना उजाळा देता देता ती. दादांच्या मोठेपणाचे नव्याने भान येऊ लागते.

माझ्या विद्यार्थीदशेतील ती. दादांच्या संदर्भातील एकदोन आठवणी खोलवर संस्कार करणाऱ्या आहेत. बी. ए. च्या वर्गात शिकत असताना इंग्लिश क्रिटिसिझमची पुस्तके मला कठीण वाटायची. स्वतः वाचून समजण्या पलिकडची वाटायची. मुळातच इंग्रजी वाचनाचा वकुब बेताचा. त्यामुळे प्राध्यापकाखेरीज अन्य कोणी तरी घरगुती पातळीवर एखादा जाणकार मार्गदर्शक हवा असायचा. ती. दादांनी ती गरज अंशतः भागवली आहे. तशी निवांत सवड त्यांना कमीच मिळायची. पण प्रोत्साहन मिळण्याइतके मार्गदर्शन ते करायचे. कधी आमच्या घरी आलेले असता तर कधी संकेश्वरास त्यांच्या घरी मुद्दाम बोलावून घ्यायचे. विल्यम हडसन, ऐबरकोम्बी, स्कॉटजेम्स यांची पुस्तके प्रथम माझ्याकडून वाचून घ्यायचे आणि नंतर समजावून द्यायचे. ‘ मेकिंग ऑफ लिटरेचर ’ हे स्कॉटजेम्सचे पुस्तक स्थानिक बाजारात मिळत नव्हते. तर त्यांनी पुण्याहून मुद्दाम एक प्रत मागवून घेतली आणि आपल्या स्वाक्षरीसह मला भेट दिली. अद्याप ते पुस्तक माझ्या संग्रही आहे.

बी. ए. च्या वर्गात शिकत असतानाची आणखी एक आठवण आहे ती ' एकच प्याला ' या नाटकावरील खडाजंगी चर्चेची. रा. ग. गडकरी यांचे हे नाटक आम्हाला प्रा. कमल देसाई शिकवायच्या. कधी तरी त्यांची या नाटका बद्दलची मते ती. दादा, (कै.) ती. अण्णा आणि ती. बापूसाहेब (एम्. एन्. कुलकर्णी) यांच्या कानावर मी घातली. त्यांच्या प्रतिप्रश्नांनी मी गडबडलो. पुन्हा दुसऱ्या दिवशी बाईंशी बोलून मी त्यांच्या अभिप्रायाचे स्पष्टीकरण देऊ लागलो. या तिघांनी मला पुन्हा पेचात पकडले व मी गोंधळलो. अर्थात् माझी फजिती करावी हा त्यांचा हेतू नव्हता. त्यांना ' एकच प्याला ' बद्दलची वेगळी मते जाणून घ्यायची होती. माझ्या मार्फत त्यांनी बाईंना चर्चा करण्यासाठी निरोप दिला. बाईंनीही आनंदाने तयारी दाखवली. पुढे बाईंच्या खोलीवर ही तीन वडील माणसे व बाई यांच्यामध्ये सतत दोन दिवस खडाजंगी चर्चा झाल्याचे मला आठवते. अनेक दाखले दिले जात होते. उतारे म्हणून दाखवले जात होते. आधार संदर्भ दिले जात होते. सर्वस्वी मतैक्य झाले नाही पण बौद्धिक आनंद मिळाल्याचे समाधान प्रत्येकाच्या चेहऱ्यावर होते.

त्या बैठकीमुळे बौद्धिक चर्चांचे जणू बाळकडूच मला विद्यार्थीदशेत मिळाले. ते संस्कार अद्याप टिकून आहेत. अ-नियोजित अशा अनेक बौद्धिक चर्चा ती. दादांच्याकडे येणाऱ्या विविध स्तरातील व्यक्तींबरोबर झडत. कधी संकेश्वर-निपाणीत वा बेळगाव-कोल्हापुरात उपस्थित राहण्याची संधी मला मिळाली आहे.

ती. दादांच्या वाङ्मय प्रेमाचे, व्यासंगाचे, ग्रंथ प्रेमाचे मोल माझ्या त्या वयात लक्षात यायचे नाही; पण जिज्ञासा वाटायची. अनेक इंग्रजी कविता, नाटकातले उतारे ते सहजपणे म्हणून दाखवायचे. टेनिसनची ' इनमेमोरियम ' किंवा ' ब्रेक, ब्रेक, ब्रेक ' सारखी कविता समजावून देताना कवीच्या चरित्रातील काही घटना सूचित करायचे. ' मर्चन्ट ऑफ व्हेनिस ' नाटकातील न्यायालय दृश्यात पोर्शियाचे आगमन कसे झाले असेल आणि खटल्याला कलाटणी मिळाल्यावर काय वातावरण तयार झाले असेल, ते दादा रंगवून सांगायचे. भा. रा. तांबे यांच्या कविता, पु. य. देशपांडे यांचे ' अमृतानुभव रहस्य ' मधील गूढ अनुभव किंवा पु. शि. रेगे यांच्या ' सावित्री ' ची मीमांसा असा वाङ्मय विवेचनाचा कोणताही संदर्भ असो ती. दादांचे स्वतःचे अभिनव प्रतिपादन ऐकायला मिळे. त्यांच्या स्मरणशक्तीचे, विश्लेषक बुद्धीचे आणि रसज्ञतेचे दर्शन अशा अनौपचारिक वाङ्मय चर्चामधून घडायचे. केवळ वाङ्मयपुरत्याच या चर्चा सीमित नसत तर धर्म, तत्त्वज्ञान, ज्योतिष, वैद्यक वा चरित्रग्रंथ यांचीही मीमांसा व्हायची. दादांच्या एवढी व्यासंगाची विस्तृत क्षितिजे न्याहाळणारी क्वचितच एखादी व्यक्ती अशा चर्चेत उपस्थित असायची. बाकी सारे श्रवणभक्तीनेच बसलेले असायचे.

संगीत आणि गायक-वादक कलावंत हा ती. दादांच्या अनन्यसाधारण आवडीचा आणि जाणकारीचा विषय आहे. या क्षेत्रातील भल्या भल्या बुजुर्गांना दादांची जाणकारी

परिचित आहे. स्वाभाविकच आपले गायन-वादन त्यांच्या उपस्थितीत पेश करायला मिळणे ही अशा कलावंतांना अपूर्व संधी वाटणे स्वाभाविक आहे. कोल्हापूर-बेळगाव परिसरातील कितीतरी गायक-वादक त्यांच्या नित्याच्या बैठकीतले आहेत, शिवाय आकाशवाणी-दूरदर्शन वरील ' ए वन् आर्टिस्ट ' म्हणून मान्यता पावलेले कितीतरी कलावंत दादांच्याबद्दल कृतज्ञता भाव बाळगून आहेत. गानकला निपुण मंडळींना आपला एक हितचिंतक म्हणून दादांच्याबद्दल जो आदरभाव वाटतो तो त्यांच्याठायी असलेल्या सूक्ष्म जाणकारीमुळे, सहृदयतेमुळे आणि परोपकारी वृत्तीमुळे होय.

ती. दादांचे ग्रंथसंग्रह प्रेम अद्याप तेवढेच उत्साहजनक आहे. त्यांच्या संकेश्वरातील घरी पुस्तकांची कपाटे मी लहानपणी जिज्ञासूपणे धुंडाळली आहेत. त्यामध्ये इंग्रजी ग्रंथाचे वैपुल्य असे त्यामुळे अनेकदा शीर्षके वाचण्यापलिकडे काही जमत नसे. संपूर्ण शेक्सपियर, संपूर्ण बर्नाज शॉ, बहुखंडात्मक कोश असे अनेक संच नुसते उचलून ठेवताना, 'मी तो हमाल भारवाही ' असा एक आनंद मिळायचा. कव्हर घातलेली कोरी करकरीत पुस्तके एक वेगळाच परिमल व स्पर्शानुभव द्यायची. कालांतराने त्या अनमोल ग्रंथसंग्रहाचे काय होणार आहे याची मला कल्पना नाही, पण ती पुस्तके जाणकारांच्या हाती गेली नाहीत तर एखाद्या संस्थेची कपाटशोभा वाढण्यापलिकडे अधिक काही घडणार नाही.

ती. दादांचा हा विद्याव्यासंग व ग्रंथप्रेम लक्षात घेतले की लो. टिळकांच्या त्या प्रसिद्ध उक्तीची आठवण होते. " मी जर राजकारणात पडलो नसतो तर गणिताचा प्रोफेसर म्हणून आनंदानं रमलो असतो." ती. दादांनासुद्धा विशिष्ट पार्श्वभूमीमुळे, घरच्या जबाबदारीमुळे अध्यापन क्षेत्रात फार काळ राहता आलेले नाही. आजही जुन्या पिढीतील लोक ' नाईकमास्तर ' म्हणून दादांना ओळखतात पण आमच्या पिढीला त्यांची जी प्रकृती परिचित आहे ती व्यापार उदीमात आणि सांसारिक व्यापतापात गुंतलेला एक बुद्धिमान गृहस्थ अशीच. अविभक्त कुटुंबपद्धती ज्या काळात ढासळत होती, त्या पिढीत एक कुटुंब प्रमुख म्हणून पाचपन्नास माणसांचा राबता असलेला परिवार सांभाळतांना आम्ही त्यांना पाहिले आहे. मध्यमवर्गीय गृहस्थाची सदाची आर्थिक दुखणी आणि नातेसंबंधातील ताणतणाव निस्तरता निस्तरता आणखी एखादा कर्ता पुरुष पार खचून गेला असता, पण आज ऐंशी वर्षांचे वय झालेले असूनही दादा ती जबाबदारी अद्याप सांभाळून आहेत. मुलांचे-पुतण्यांचे संसार मार्गी लावून आता नातवंडांच्या भावी जीवनाबद्दल सक्रिय आहेत. कोणाची शिक्षणे, कोणाची लग्ने, एखाद्यावर ओढवलेली आकस्मिक आपत्ती, कोणाच्या नोकरीसाठी खटपट तर कोणाच्या कोर्टकचेऱ्या असे अनेकविध व्याप सांभाळून आहेत. शिवाय ' राखावी बहुतांची अंतरे ' या न्यायाने लोकसंग्रह जराही उणावू न देता, शरीर थकले असले तरी वाचनप्रेम, संगीतप्रेम अद्याप टिकवून आहेत. ' आहे मनोहर तरी ' सारखे नुकतेच प्रसिद्ध झालेले पुस्तक अथवा बालगंधर्वांचे सचित्र देखणे रंगीत कॅलेंडर संग्रही ठेवण्यास ते उत्सुक असतात. खरोखरच, त्यांच्या काळात दादांना प्रोफेसर होणे

भाग पडले असते तर त्यांच्या हातून लेखन घडले असते. एखाद्या विद्यापीठाची ॲकॅडिमिक शान वाढली असती. इये मराठीचिये नगरी एक व्यासंगी ग्रंथकार अवतरला असता आणि ' ग्रंथोपजीविये विशेषेलोकी इये ' आनंदु आनंद झाला असता. पण तसे व्हायचे नव्हते; पण अवघ्या संसाराकडे साक्षेपाने पाहणाऱ्या दादांना केवळ ग्रंथमग्न राहणे मानवले नसते, हेही खरेच आहे.

ती. दादांच्या व्यक्तिमत्त्वाचे इतर अनेक पैलू आहेत. त्यांचा यथार्थ परिचय करून देण्यास त्यांच्या निकट सहवासात आलेली आणि त्या विषयाची जाण असलेली व्यक्तीच हवी. उदाहरणार्थ ती. दादा हे दत्तसंप्रदायाचे उपासक आहेत. त्या क्षेत्रातील त्यांचा अधिकार मोठा आहे. स्वानुभवाधिष्ठित अशी त्यांची दृष्टी आहे. अशा उपासना पंथाबाबत त्यांचे अनुभव म्हणजे त्यांचे प्रचीतीचे बोलणे आहे. या मार्गावर विश्वास असणारे, त्या मार्गाने आपल्या सांसारिक विवंचना दूर होतील, मानसिक स्वास्थ्य पुन्हा लाभेल असे मानणारे अनेकजण त्यांच्याकडे येतात. त्यांचा सल्ला घेतात. दादा त्यांना काही धार्मिक कृत्ये सुचवतात. ज्याच्यात्याच्या दैवताची पार्श्वभूमी लक्षात घेऊन उपासना वा व्रतवैकल्ये सुचवितात. सल्लामसलतीसाठी आलेली ती माणसे मनोभावे ते स्वीकारतात. ' सत्पुरुष चरणी वंदन ' या भावनेने नमस्कार करून जातात.

मला स्वतःला या उपासना मार्गाबद्दल विशेष जिज्ञासा नसल्याने, किंबहुना थोडा दुरावाच वाटत असल्याने याबाबत अधिक माहिती मी कधी करून घेतली नाही. दादांनीही त्याबाबत कधी आग्रहपूर्वक काही सुचवलेली नाही अथवा माझी नावड पाहून रोषही प्रकट केलेला नाही. हस्त सामुद्रिक, कुंडली या ज्योतिषी विद्येबाबतही माझी अशीच धारणा राहिल्याने दादांच्याकडे येणाऱ्या या क्षेत्रातील नामांकित व्यक्तींबद्दल मला फारसे औत्सुक्य वाटले नाही.

रेशन पूर्वकाळात, खाण्यापिण्याची मुबलकता असलेल्या महागाई पूर्व पिढीत ती. दादांचे उमेदीचे दिवस गेलेले आहेत. हॉटेल संस्कृती अद्याप जोमदार नव्हती, निदान मुंबई पुण्यासारख्या महानगरांबाहेर तिचा सुळसुळाट झालेला नव्हता असा तो काळ. रूचकर खाण्यापिण्याची लज्जत ही गृहिणींच्या हस्तनिपुणतेवर, पाक कौशल्यावर अवलंबून होती; दुधातुपाच्या धारा गायीगोठ्यातून थेट स्वयंपाकघरातच पोचण्याच्या त्या काळात लज्जतदार खाण्याची पेशवाई अभिरुची काही एक और होती अशा आठवणी सांगितल्या जातात.

आमच्या लहानपणी ती. दादा घरी आले, त्यांचा रात्री मुक्काम असला की त्यांच्या खाण्याजेवण्याची एक खासियत अनुभवायला मिळे. तसा त्यांचा आहार बेताचा, मोजकाच असे, पण आवडनिवड चोखंदळ होती. दुधातूपाचे साईच्या दह्याचे, मेतकूट चटणीचे वा फोडणीच्या मिरचीचे आलटून पालटून कॉम्बिनेशन्स करीत मुख्य पदार्थाची

चव घासाघासागणिक वाढवण्याची त्यांची आहारशैली आम्हा पोरांना औत्सुक्याचीही वाटे आणि जिभेला पाणी आणणारीही ठरे. त्यांनी स्वयंपाक घरातून काढता पाय घेताच आम्ही भावंडे मग अनुकरणप्रवृत्त होऊन मातोश्रींना न जुमानता दह्यादुधाची भांडी रिकामी करीत असू.

अभिरुची आहारवस्त्रातील असो वा साहित्य संगीतातील असो ती अभिजात पातळीवरच सतत राखता आली पाहिजे, अशी दादांच्या व्यक्तित्वाची धारणा आहे. नाटक संगीत क्षेत्रातील त्यांची अभिरुची बालगंधर्वांच्या पिढीची आहे; साहित्यास्वादाचे भरण-पोषण अभिजात इंग्रजी - संस्कृत-मराठी - वाङ्मयावर झालेले आहे; लोकसंग्रहाचा रिवाज संस्थांनी वा पेशवाई युगाशी मिळता जुळता आहे; कौटुंबिक नातेसंबंधातील जिव्हाळा आणि कर्तव्यभावना जुन्या इनामदारी वळणाची वाडा संस्कृतीची आहे. त्यामुळे आधुनिक पिढीशी मिळतेजुळते घेणे दादांना कठीण जात असावे, असे एखाद्याला वाटेल, पण ते तितकेसे खरे नाही. कारण बदलत्या काळानुसार स्वतःला जुळवून घेण्याचा त्यांचा स्वभाव आहे.

घरादारासमोरची ऐसपैस लग्ने आता मंगल कार्यालयाच्या तारखेनुसार त्यांच्या हॉलमध्ये चोवीस तासात उरकून घ्यावी लागतात; अंगण, परसदार, विहीर, तुळस असलेल्या घरांची जागा आता फ्लॅटच्या बंदिस्त निवासांनी घेतली आहे; इंग्रजी माध्यमाच्या शाळा नातवंडांना अपरिहार्य ठरत आहेत; चित्रपट आता गावागल्लीतून टी. व्ही. च्या माध्यमातून माजघरात आला आहे. संस्कृतीची ही बदलती रूपे दादांनी तारतम्याने जाणून घेतली आहेत. म्हणून सर्वसाधारण वृद्धासारखा दादांचा स्वभाव किरकिरा आणि कटकटी झालेला नसावा अशी माझी धारणा आहे.

घर ही सुसंस्कृत माणसाची सांसारिक-मानसिक गरज आहे. जो तो आपल्या वकुबानुसार ती भागवत असतो. घर उभे करतो. घरादारात वावरतो. घराघरात डोकावतो. न्याहाळतो. नव्या धारणेने आपल्या घराची पुनर्मांडणी करतो. नवी भर घालतो. घर दिवसेदिवस संपन्न करतो. पण सर्वसामान्य माणूस स्वतःखेरीज इतरांचे घर उभारण्यासाठी क्वचितच धडपडतो. घर म्हणजे घरातील माणसांचे स्वास्थ्य व आर्थिक स्थैर्य. ते सांभाळण्याची क्षमता फार थोड्यांकडे असते. ती. दादांकडे ती क्षमता फार फार मोठी आहे. स्वतःचे आणि इतर अनेकांची घरे सुस्थिर आणि स्वास्थ्यसंपन्न करण्यात त्यांचा फार मोठा हातभार लागला आहे.

ठळकपणे दिसून येणारी आणि तात्काळ श्रेय मिळवून देणारी ही कामगिरी नव्हे, म्हणून सामाजिक -राजकीय कार्यकर्ते या कामगिरीकडे सहसा वळत नाहीत. बहुलक्ष्यी कुटुंबवत्सल माणसानांच ते जमते. ती. दादांकडे ही उदंड वात्सल्यसमृद्धी आहे. एखाद्याच्या सांसारिक योगक्षेमाबाबत जशी ती सक्रिय असते, तसेच स्वयंसेवी संस्थेच्या

संसाराची मांडामांड करतानाही ती आढळते. कितीतरी संस्थांचे ते अनियुक्त सल्लागारच असतात. ना मोबदला, ना अधिकारपद या भूमिकेतून त्यांची सल्लामसलत चालू असते. त्यामुळे परस्परात विपरीत भाव उद्‌भवण्याचा प्रश्न सहसा उद्‌भवत नाहीत.

प्रारंभी मराठी कन्नड भाषिक लोकजीवनाच्या ज्या संस्कृतीचा उल्लेख केला आहे. त्या सीमाभागांतील अनेक कुटुंबात ती. दादांना अ-घोषत सहृदय पालकाचे स्थान आहे राजकीय पक्षांच्या पुढाऱ्यांसारखे प्रसिद्धी लालसेने ते मलिन झालेले नाहीत किंवा एखाद्या मठाधीशासारखे ते केवळ विभूतिपूजेचे नाही. अथवा संस्थेच्या अध्यक्षाप्रमाणे कायदे-कानून सांभाळण्यापुरते मर्यादित नाही. या सर्वांपलिकडे पाहणाऱ्या प्रेमळ अंतःकरण प्रवृत्तीशी जखडलेले हे नातेसंबंध आहेत. " जेथे जातो तेथे तू माझा सांगाती चालविशी हाती धरूनिया" असाच भाव या परिसरातील अनेकांच्या मनात अपरंपार भरून राहिला आहे, ही त्यांच्या आयुष्याची अनमोल कमाई आहे.

ती. दादा शतायुषी होवोत, अशी सदिच्छा आणि विनम्र अभिवादन !.

## माझे मनोगत

*जी. एस. गोंधळी*

D - Destinguished Personality
S - Spiritual Thought, Scientific Attitude
N - Noble by birth, Normal in living
A - Ability to do good deeds
I - Integrity Of higher level
K - Knowledge With Moral Bias

माझे परममित्र नाईक गुरुजी एक ख्यातनाम शिक्षक म्हणून सर्वांना परिचित आहेत. या शिक्षण शास्त्राच्या कलेबरोबर इतरही कला अवगत आहेत. हे फार थोड्या लोकांना माहित आहे. श्री. नाईक गुरुजींना गायन कलेची आवड होती व आजही आहे हे काहींना माहित आहे. परंतु धोंडोपंत संगीतशास्त्राचे जाणकार होते हे मी स्वानुभवावरून सांगतो - जुन्या काळी बेळगांव येथे गायन, वादन या कलेच्या स्पर्धा होत असत त्या वेळी धोंडोपंत स्पर्धक म्हणून नव्हे तर परीक्षक (पंच) म्हणून जात असत. प्रत्येक खेपेला श्री. धोंडोपंत मला मित्र म्हणून घेऊन जात असत. प्रत्येक खेपेला श्री. धोंडोपंत परीक्षा कमेटीचे प्रमुख म्हणून दिलेला निकाल सर्व स्पर्धक मान्य करीत असत. स्पर्धक म्हणून नामांकित मंडळी उपस्थित रहात असत.

या संगीत कलेबरोबर श्री. धोंडोपंतींनी ज्योतिष शास्त्राचा अभ्यास केला आहे. श्री. धोंडोपंत आर्टसचे ग्रॅज्युएट असून देखील त्यांनी व्यापार (कॉमर्स) चा प्रात्यक्षिक अनुभव

मिळवला होता. त्या वेळी श्री.गिरी नावाचे एक व्यापारी होते त्यांनी दक्षिणी संस्थानांना व तेथील जनतेला धान्य पुरवण्याचे कंत्राट घेतले होते. श्री. धोंडोपंत त्यांचे व्यवस्थापक होते. श्री. गिरी हे नावाचे मालक पण धोंडोपंतावर सर्व जबाबदारी होती. हे जनताभिमुखी कठीण कार्य यशस्वीरीत्या पार पाडले. या सर्व कलांचा अभ्यास करण्याचे मुळाशी त्यांचेकडील उपजत असलेल्या ज्ञानार्जनाची आवड होती.

संकेश्वर येथे श्री. दुरदुंडेश्वर हायस्कूल (S.D. हायस्कूल) या नांवाची एक शिक्षण संस्था होती, काही कारणामुळे संस्थेची परिस्थिती खालावली. श्री. धोंडोपंताना आपल्या गावातील संस्थेबद्दल जिव्हाळा होता. अशा परिस्थितीत श्री. धोंडोपंत मुख्याध्यापक म्हणून हजर झाले. श्री. धोंडोपंत वृत्तीने खरे शिक्षक होते व नामांकित प्रशासक असलेने शाळेची संपूर्ण जबाबदारी स्वीकारली. ४-५ वर्षांत त्यांनी शाळेची प्रगती केली. हायस्कूल केले. जनतेशी प्रेमळ संपर्क वाढवून विद्यार्थांची संख्या वाढवली. शाळेच्या शिक्षणात आपल्या विवेक बुद्धीने सुधारणा केली. शाळेचा दर्जा वाढला. S.S.C परीक्षेचा निकाल दिवसेदिवस वाढू लागला. याशिवाय हायस्कूल मध्ये हायस्कूल स्कॉलरशिप परीक्षेकरता विद्यार्थी तयार केले. श्री. धोंडोपंतांनी हेडमास्तर असूनही स्वतः मुलांना मार्गदर्शन केले व त्यांच्या प्रयत्नांना यशही आले. वरील विवेचनावरून धोंडोपंत म्हणजे, धमक, विवेक व चमक या त्रिगुणांचा संगम होय असेच म्हणावे लागेल.

श्री. धोंडोपंतांचे जीवन कार्य बारकाईने निरीक्षण केल्यास असे दिसून येईल की ते मानवता धर्माचे उपासक आहेत. Love is the Law Of Life या सूत्राप्रमाणे सर्वांशी प्रेमाने वागतात म्हणून सर्व लोक धोंडोपंतावर प्रेम करतात. श्री. धोंडोपंत अलीकडे आध्यात्मिक शास्त्राची उपासना करून स्वार्थ, राग, लोभ या सर्वांचा त्याग करून उर्वरित आयुष्य शांततेने व सुखाने घालवीत आहेत. अलीकडे त्यांना पाहिल्या नंतर "जेथे तृप्ती, शांती, नीती असे तेथे देवाची वसती." या संतवाणीची प्रचिती येते.

## प.पू. दादा एक अलौकिक व्यक्तिमत्व

***बाळ फडणीस, धुळे.***

बेळगांव जिल्ह्यात हिरण्यकेशी नदी काठावर वसलेले संकेश्वर हे एक छोटे पण टुमदार गांव. संकेश्वर करवीर पीठाच्या शंकराचार्यांचा मठ असलेले एक क्षेत्रस्थान.

महाराष्ट्र आणि कर्नाटक यांच्या सीमा परिसरातील हा प्रगत ग्रामीण परिसर. प्रगत म्हणजे ते केवळ तालुक्याचे किंवा कुठल्याही प्रशासनाचे ठिकाण नसतानाही शैक्षणिक संस्था, साखर कारखाना व राष्ट्रीय महामार्गावरील (पुणे-बंगळूर महामार्ग) सेवा वृत्तीवर

वाढणारे संकेश्वर हे एक मोठे खेडे. भाषा कानडी आणि मराठी. सीमावादाचा ताप झालेला हा परिसर. याच परिसरात प.पू. दादांचे व्यक्तिमत्त्व घडविले गेले.

या वादग्रस्त ग्रामीण परिसरात वास्तव्य करूनही प.पू. दादांनी आपल्या व्यक्ती विकासाची वाटचाल खंडित होऊ दिली नाही. भाषा भिन्नता, राजकारणातले बदल, आर्थिक आणि सामाजिक परिस्थितीत झालेले अनेक बरे वाईट बदल, झपाट्याने बदलत असलेली समाज-मूल्ये या सर्वांना टोलवून प.पू. दादांनी आपली वाटचाल चालू ठेवली.

**कसे आहेत प.पू. दादा ?**

वेष साधा. स्वच्छ धुतलेले धोतर, सदरा, टोपी व साधी चप्पल. भडकपणा नाही. फॅशन तर कोणत्याही प्रकारची नाही. बोलणे तरी कसे ? साधे, सरळ, व सरळ सरळ मुद्यालाच हात घालणारे. शब्द भांडार भरपूर असूनही साध्या सरळ व सोपा अर्थवाही शब्दांचाच वापर अधिक. व्याख्यान वा प्रवचनापेक्षा प.पू. दादांना चर्चाच अधिक भावते. चर्चा मग ती कोणत्याही विषयावर असो, समस्येवर असो. प.पू. दादा चर्चेत रंगून जातात. चर्चेचे खास वैशिष्ट्य म्हणजे समस्येचा किंवा प्रश्नाची मूलभूत मांडणी साकल्याने विचार करून स्वत: दादाच मांडतात. पण चर्चेत सर्वांचा सहभाग घेऊन सर्वांना विचार करणेस प्रवृत्त करतात. भाग पाडतात. अगदी अल्पावधीत अनेक प्रकारचे संभाव्य प्रश्न विचारून रंग भरतात. त्यामुळे वाद टळून बरेच काही शिकावयास मिळते. चर्चा म्हणजे एक प्रकारची मैफलच वाटायची.

चर्चेत विषय तरी कोणते असायचे ? वाङ्मय, संगीत, आयुर्वेद, संस्कृती, राजकारण, तत्त्वज्ञान, संत मंडळींच्या आठवणी, ज्योतिष, गूढशास्त्र, अध्यात्म, इत्यादी. विविध प्रकारचे जीवन स्पर्शी विषय असत. सामान्यपणे चर्चा रात्री ९-०० चे सुमारास सुरू होई व पहाटे पर्यन्त चर्चेत सहभागी होणारे जागेच असत. चर्चेचा भाग संपला की सुरवात संगीतानेच व्हायची त्यातल्या त्यात रागदारी संगीताकडे विशेष भर असायचा. आहार अत्यंत साधा मित आहार व आवडीही साध्याच. चर्चेच्या मैफीलीत बसले की, पोहे, (अवलेक्की) चुरमुरे, शेव, भाजके शेंगदाणे असले की मस्त चर्चा रंगायचीच अशा बऱ्याच चर्चांच्या मैफलीने प.पू. दादांच्या सहवासात सहभागी होण्याचे भाग्य लाभले. त्या आठवणी अजूनही ताज्या आहेत. त्यामुळे खूप काही शिकावयास मिळाले.

प.पू. दादांचा संगीत हा अत्यंत आवडीचा विषय. स्वत: तबल्याचा अभ्यास आणि “रियाज” बरेच दिवस केलेला. प.पू. दादा संगाताचे (शास्त्रीय संगीताचे) नुसते भोक्तेच नाहीत तर चांगले उच्च श्रेणीचे जाणकार आहेत. संगीतात मार्मिक मार्गदर्शन करणारे आहेत. अनेक लहान मोठ्या संगीत कलाकारांना त्यांनी प्रोत्साहन दिले आहे.

प. पू. दादांनी आयुर्वेदावर लिखाण केले आहे व अनेकांना विविध प्रकारच्या लेखनात, प्रबंधात, मार्गदर्शन केले आहे.

प. पू. दादांचा लोकसंग्रही अफाट आहे. सर्व स्तरावरील लोकांशी त्यांचे संबंध आहेत. विद्वानांचे त्यांना वावडे नाही. पण सामान्य लोकांना ते अधिक जवळचे वाटतात. त्यांच्या लोकसंग्रहात डॉक्टर, व्ही. आर. साठे, मुंबई, डॉक्टर काणे मुंबई, डॉक्टर वैद्य (घटप्रभा) असे तज्ञ नामांकित डॉक्टर असत. काही उद्योजक, काही प्राध्यापक, काही शिक्षक, बँक कर्मचारी, श्री. रामभाऊ विजापुरे सारखे अखिल भारतीय स्तरावर ज्यांच्या हार्मोनियम वादनाची ख्याती आहे असे कलाकार असत. अरुण जोशी सारखे तबला, नाट्य व संगीतावर प्रेम करणारे आहे. व्यापारी आहेत. शेतकरी आहेत. आमदार, खासदार या सारखे राजकारणी आहेत. या सर्वांशी मार्गदर्शनासाठी दादांच्याकडे रीघ लागलेली असते.

असा अफाट लोकसंग्रह जोपासणाऱ्या प. पू. दादांचे व्यक्तिमत्त्व कसे घडले गेले असावे हे जाणण्याची उत्सुकता किंवा जिज्ञासा अनेकांना असणे सहाजिक आहे. यासाठी प. पू. दादांचे जन्मकाळी असलेली देशाची परिस्थिती, कौटुंबिक परिस्थिती माहित असणे जरुर आहे. याचा उपयोग प. पू. दादांचे लौकिक व्यक्तिमत्त्व समजण्याची आवश्यकता आहे. प. पू. दादांचे व्यक्तिमत्त्वाचा दुसरा पैलू म्हणजे त्यांनी अखंड साधनेद्वारे संपादन केलेले आत्मसुख व आध्यात्मिक क्षेत्रात मिळविलेला मोठा अधिकार होय.

प. पू. दादांचा जन्म ८ जुलै १९११ म्हणजे पहिल्या जागतिक महायुद्धाचे ढग जमू लागल्याचा तो काळ. देशावर इंग्रजी सत्तेची पकड घट्ट झाल्याचा, दारिद्रय, मोठे साथीचे रोग, दुष्काळ यांचा जबरदस्त प्रभाव पडलेला तो काळ होता. याच सुमारास इंग्रजी भाषेच्या वाढत्या प्रचारामुळे पाश्चिमात्य आचार विचारांचा इंग्रजी शिकणाऱ्या सुशिक्षित तरुणांवर होत असलेला परिणाम होय. सामाजिक स्थिती तर दयनीय होती. निरक्षरता व यंत्र-संस्कृतीपुढे काहीच न चाललेमुळे आपला देश केवळ अन्न, धान्य शेतीवर जगणारा आर्थिक दृष्ट्या दुर्बल राहिला. जातिभेद, कर्मकांडाचा प्रभाव आणि आर्थिक दारिद्रय यामुळे समाज विस्कळित झाला. पण अशा विपरीत परिस्थितीतही लोकमान्य टिळक, आगरकर, शि. म. परांजपे, कर्नाटकसिंह देशपांडे यांचे विचारांनी व संस्कारांनी प्रभावित झालेली मंडळी प. पू. दादांच्या शालेय व महाविद्यालयीन शिक्षणाच्या काळी, विद्यार्थ्यांवर व समाजावर शिवजयंती गणपती उत्सव वगैरे माध्यमातून संस्कार करीत असत. त्याचा निश्चितच परिणाम प. पू. दादांचे साधे राहण्यात व वैचारिक बैठक तयार होण्यात झाला.

प. पू. दादांचा जन्म सदाचार संपन्न असलेल्या एका नामवंत सारस्वत कुटुंबात झाला. ज्येष्ठ अपत्य म्हणून कोडकौतुकाचा भाग सहाजिकच वाट्यास आला. ध्येयवादी शिक्षकांचा व शिक्षणाचा परिणाम, घरातील सात्त्विक वातावरण यामुळे प. पू. दादांचे शिक्षणास व विचारास दिशा मिळाली. तत्कालीन थोरा मोठ्यांची अभ्यासपूर्ण भाषणे, कीर्तने, प्रवचने, संगीताच्या मैफली इत्यादीमुळे प. पू. दादा प्रभावित झाले असावेत. जवळ असलेल्या बेळगांव व कोल्हापूरला होणारे संगीत जलसे प. पू. दादांना विशेष प्रभावित करीत. त्यांच्या रसिक व्यक्तिमत्त्वाचे संगोपन व वाढ त्यामुळेच झाली असावी.

प. पू. दादांचे शिक्षण काळात गीता, मोरोपंतांच्या आर्या, समर्थांचे श्लोक, संस्कृत वेचे इत्यादींच्या पाठांतरावर भर देणारा तो काळ होता. प. पू. दादांनी ते केलेच. पण त्याच बरोबर विविध प्रकारच्या वाचनावर खूप भर दिला. बी. ए. साठी पाश्चिमात्य भाषांची निवड केल्यामुळे त्यांचा पाश्चिमात्य वाङ्मयाचा अभ्यासही झाला. आंग्लभाषेतही काव्य, नाटके व तत्त्वज्ञानावरील बऱ्याच चांगल्या चांगल्या दर्जेदार पुस्तकांचे वाचन त्यांनी केले. कथा कादंबऱ्यांचाही अभ्यास केला. या वाचनाबरोबर चिंतनही वाढत गेले.

पहिले महायुद्ध संपले तरी इंग्रजांचा भारताविषयीच्या दृष्टिकोनात फारसा फरक पडला नाही. परिस्थिती आणखीच बिघडली नंतर सबंध जगाला भेडसावून टाकणारा १९३० चा मंदी काळ आला. या काळात भारताची खूपच परवड झाली. प. पू. दादांचे शिक्षणही एव्हाना संपत आले होते. त्यानंतरच्या काळात देशात राजकीय वातावरणात खूप बदल झालेत. राजकीय जागृतीसाठी विविध पक्षांनी प्रयत्न केले. १९४२ चा कालखंड, दुसरे महायुद्ध व त्यानंतरची केवळ सत्तेसाठी चाललेली धडपड यांनी देशातील समाजजीवनच ढवळून काढले. समाजमूल्ये बदलली, आदर्श बदलले. जीवनात " अर्थ" ला सर्वात श्रेष्ठ स्थान दिले गेले. स्वदेश, संस्कृती विषयींच्या निष्ठा निष्प्रभ होऊ लागल्या. देश व समाज हितापेक्षा पक्ष, पक्षाची सत्ता व अस्तित्व याला अधिक महत्त्व प्राप्त झाले. व्यक्तिपूजेचे महत्त्व वाढले. अशा बदलत्या काळा बरोबर राहूनही प. पू. दादांनी काही काळ शिक्षकी पेशा पत्करला. काही काळ सचोटीने व्यापारही केला. हे सर्व करीत असतांना प. पू. दादांना एका मोठ्या कुटुंब प्रमुखाची भूमिका करावी लागली व ती त्यांनी चांगली बजावली. घरातील सर्वांचे योगक्षेम बघून, एवढा मोठा लोकसंग्रह सांभाळून, स्वतःच्या साधनेत खंड न पडू देता अनेक अप्रिय प्रसंगांना सामोरे जात, स्वतःचा तोल न जाऊ देता प. पू. दादांनी आपली वाटचाल केली आहे.


संसाराकडे त्यांनी लक्ष दिलेच. परंतु असे करतांना आईची सेवाही मनोभावे खूप केली. वडिलांपेक्षा मातृसुखच प. पू. दादांना अधिक मिळाले. प. पू. दादांच्या वाटचालीत महत्त्वाचा वाटा त्यांच्या धर्मपत्नीचाही आहे. मोठे कुटुंब, रोज कोणी ना कोणी पाहुणा रावळा असायचाच. या सर्वांचे प्रसंगोचित अगत्य ठेवणे कठीण काम असे. ते त्यांनी सांभाळले. सर्व बन्धूनीही प. पू. दादांना वडिलांचे ठिकाणी मानून विनम्र भावाने साथ दिली. श्री. सदानंदांनी तर त्यांच्या अध्यात्मातील शिकवणीचा वारसा जोमाने पुढे नेण्याचे कधीच सुरु केले आहे. प. पू. दादांच्याकडे होत असलेला थोरल्या महाराजांचा उत्सव ही त्याची साक्षच आहे. याच बरोबर विविध धार्मिक पुस्तकाचे प्रकाशनही ते करत असतात.

अत्यंत आर्थिक बिकट काळातही एवढ्या मोठ्या एकत्र कुटुंबाचे धुरीणत्व फक्त प. पू. दादाच शांतपणे करू शकले.

कोठून आली प. पू. दादा मध्ये एवढी शक्ती ? आता पर्यन्त आपण बघितले ते केवळ प. पू. दादांच्या लौकिक जीवनाचे ओझरते दर्शन होय. प. पू. दादांचे व्यक्तिमत्त्व

याही पलिकडचे आहे. अखंड साधनेतून त्यांनी स्वतःची वाटचाल करून ती मिळविली आहे.

**॥ जन्म लग्न कुंडली ॥** ॥ श्री ॥




**॥ शुभं भवतु ॥**

**नांव : श्री. धोंडो श्रीपाद नाईक**
**जन्म :** आषाढ शु ॥ १२ शके १८३३
शनिवार ता. ८ जुलै १९११ सकाळी ७.०० वा.
**जन्म नक्षत्र** - अनुराधा चौथे चरण

प. पू. दादांच्या जन्म लग्न कुंडलीचे थोडेसे अवलोकन केले तरी काही ठळक गोष्टी चटकन लक्षात येतात. त्यांचा जन्म अनुराधा या शुभ नक्षत्रावर झाला आहे. त्यांचे लग्नाचे व्ययभावात मिथुन राशीचे रवि, बुध आहेत. मिथुनेचा रवि जन्मजात सूक्ष्म तरल बुद्धी देतो व स्वगृहीचा बुध त्याला बुद्धिमत्तेची साथ देतो. प. पू. दादांना कोणत्याही विषयात मूलभूत विचार करणेची लाभलेली शक्ती ही व्ययभावातील रवि बुधामुळे मिळाली असावी. प. पू. दादांचे जन्म कुंडलीत कर्क लग्न आहे. त्यामुळे विविध कलागुणांचे कौतुक करणे त्यांचा आस्वाद घेणे हे गुण दाखवतात त्यामुळे प. पू. दादांच्या रसिकतेचा पिंड जोपासला गेला आहे. सुखस्थानी पण चंद्राच्या व्ययात गुरु केतू आहेत. राशी कुंडलीप्रमाणे व्ययात गुरु असणे म्हणजे अध्यात्मात गोडी निर्माण होते, आदर्श गुरु भक्त होतो व व्ययात केतू असल्यामुळे फार मोठ्या अधिकारी संन्याशाची कृपा असणे होय ह्या गोष्टी दाखवितात. गुरु आणि केतू एकत्रित असल्यामुळे लौकिक जीवनापेक्षा आध्यात्मिक बाबीकडे अधिक ओढा निर्माण होतो. प. पू. दादांच्याकडे होणारा प. पू. थोरल्या महाराजांचा (प. पू. टेंबे स्वामींचा) उत्सव हे त्याचे उदाहरणच होय.

परमेश्वरी कृपा बाजारात विकत मिळत नाही. तशी वाटेत अचानक सापडतही नाही. ती अखंड साधनाने मिळवावी लागते. प. पू. दादांनी वर उल्लेख केलेल्या परिस्थितीतून ती मिळविली आहे. त्यामुळे प. पू. दादांचे ममत्व जाऊन सर्वांकडे समभावाने बघण्याची जी शक्ती निर्माण झाली आहे त्यामुळेच ते अनेकांचे प्रश्न हाताळू शकतात. समस्या सोडवू शकतात, माझ्या अल्पमतीप्रमाणे प. पू. दादांचे अलौकिकत्व यातच आहे. स्वतः अगदी सामान्यासारखे राहून संतचरणरज असा विनम्र भाव ठेवून इतरांचा ययोग्य सन्मान करतात. अंशा अलौकिक व्यक्तिमत्त्वाविषयी लिहावे तेवढे थोडेच आहे. त्यांच्या सहवासात असतांना अनेक चमत्कार बघावयास मिळाले. पण चमत्कार करणे हा काही त्यांचा स्थायी भाव नाही. त्यांना ते आवडतही नाही. गूढ विद्या ज्योतिष यांचे चांगले जाणकार असूनही त्यांनी कधी त्याचा बाजार मांडला नाही. काही काळ का असेना प. पू. दादांच्या सहवासात राहण्याचे भाग्य मला मिळाले. त्यामुळेच हे लिहिण्याचे धाडस करीत आहे.

# अशा रंगल्या रात्री !

*दिगंबर बा. जोशी*

' गुरु शिष्याच्या शोधात हिंडत असतो ' त्याप्रमाणे दादांचा आणि माझा परिचय झाल्यासारखे वाटते. त्यांचा माझा परिचय माझ्याच घरी अगदी विनासायास झाला. साधारणपणे १९६५ च्या सुमारास केंव्हातरी दादांची व माझी पहिली भेट झाली. माझा लहान भाऊ अरूण याचा दादांशी संबंध आलेला होता आणि त्याच्या निमित्तानेच आमचे रविवार पेठेतील घर एक दिवस ती. दादांच्या चरणस्पर्शाने पवित्र झाल्याचा आम्हाला अनुभव आला. पुढे पुढे दादांचे येणे-जाणे वाढू लागले. परिचय दृढ होत गेला.

माझा लहान भाऊ कोल्हापूर जिल्ह्यालगतच्या चार पाच जिल्ह्यांत एक नावाजलेला तबला पटू म्हणून प्रसिद्धीस आलेला होता. त्यामुळे त्याचे संगीत क्षेत्राशी व्यापक संबंध होते. संगीत कलाकार मंडळी घरी येत जात असत. दादांचे घरी येणे जाणे वाढले असले तरी ते नेमके काय व्यक्तिमत्त्व आहे हे कळले नव्हते. मात्र कधी संगीत विषयावर ते आपले मत व्यक्त करीत असत. संगीतातील अनेक बाबीवर ते विश्लेषण करीत असत, आणि त्यामुळे दादा त्यांच्यापैकीच- ' संगीत कलाकारांपैकीच ' कोणीतरी ' खाँ ' साहेब, कोणीतरी तबला नवाज असावेत अशी कल्पना होती.

पण हळुहळू दादांचे येणे जाणे वाढू लागले. घरातील सर्वांनाच दादांचा सहवास आपुलकीचा, आनंदाचा वाटू लागला, आणि दादा ' जोशी ' कुटुंबियापैकीच एक होऊन गेले. दादांच्या सारखी एक वडीलधारी व्यक्ती आमच्या कुटुंबात वावरू लागल्याने आम्हालाही दादांचा मोठा आधार वाटू लागला. त्यांच्याशी बोलावे, विविध विषयावर चर्चा करावी आपली सुख दुःखे सांगावीत, दादांनी सांगितलेल्या उपदेशाचा आधार घेत घेत नवे नवे अनुभव घ्यावेत असे दिवस होते ते. दादांच्या वाढत्या परिचयाबरोबर दादांच्या जीवन चरित्राचा एकेक पैलू प्रकाशित होत गेला. दादा म्हणजे अगदी सर्व सामान्य व्यक्ती नाही हे स्पष्ट होऊ लागले आणि त्यामुळेच दादांच्या बद्दलचा आदर वाढत गेला. या आदरभावातूनच दादांचा कोल्हापुरातील मुक्काम हा जोशींच्या घरीच व्हायचा हे जवळ जवळ ठरल्यासारखे होते. त्यावेळी रविवार पेठेतील जोशींचे घर म्हणजे दादांच्या चाहत्यांना एक केंद्रस्थानच वाटू लागले. दादांच्या परिचित व्यक्तीमध्ये सर्व प्रकारचे श्रीमंत-गरीब-मध्यम वर्गीय लोक होते तसेच ते सर्व जातीधर्माचे - ब्राह्मण, स्पृश्य-अस्पृश्य, ख्रिश्चन-मुस्लीम धर्मीय लोक होते. हे सर्वचजण दिवसभर कोणत्या ना कोणत्या कामात, व्यापात उद्योगधंद्यात असल्याने दादांना भेटण्याची निवांत वेळ म्हणजे रात्रीची वेळ. रात्रीची ही शांत निवांत वेळ दादांच्या सुखद सहवासाचे चांदणे अंगावर कानावर

घेत घेत संपून जायची. मन मोकळेपणाने गप्पा मारणे, प्रश्नोत्तरे, विचार-विमर्श करणे, दादांचे अनुभवजन्य विचार ऐकणे अशा विविध प्रकारे मन अतिशय आनंदाने भरून जात असे. कान तृप्त होत असत. विविध विषयावरील दादांचे विचार ऐकता ऐकता ' अशा रात्री रंगून जायच्या ' कधी कधी तर पहाट कधी उलटून गेली हे सुद्धा कळत नसे अन् मग नाईलाजाने, कामाधंद्याच्या व्यापामुळे आलेली मंडळी पुन्हा भेटण्याचा संकल्प करून दादांचा निरोप घेऊन जात असत.

अशी काय जादू होती की रात्रीची पहाट व्हावी ? कोणत्या विषयावर काय बोलायचं, काय चर्चा करायची हे कांही ठरलेले नसे. कोणी तरी एखादा प्रश्न विचारीत असे, एखादा विचार मांडत असे. तो प्रश्न, विचार हाच प्रारंभ-सूत्र समजून चर्चेची प्रस्तावना होत असे आणि मग साहित्य, संगीत, तत्वज्ञान, अध्यात्म, ज्योतिष वगैरे विषयावरून वळणे घेत घेत हा चर्चा प्रवाह शेवटी कुठेतरी विश्राम घेत असे आणि रात्र संपून जायची.

वर उल्लेखिल्याप्रमाणेच सूत्र पकडून सांगायचे झाले तर ' दादा संगीत मंडळी-पैकीच एक ' असे जे मी म्हटले ते अगदीच चुकीचे नाही. कारण दादांनी वेळोवेळी संगीतावर केलेली मताभिव्यक्ती टीका-टिप्पणी लक्षात घेतली म्हणजे दादा संगीताचे चांगलेच जाणकार असल्याचे सहज लक्षात येते.

दादांचा स्वतःचा संगीत व्यासंग मोठा आहे. ते स्वतः संगीत क्षेत्रात ' मोठे कलाकार ' म्हणून प्रसिद्धीस आले नसले तरी संगीताचा उघड्या काना-डोळयांनी त्यानी अभ्यास केला आहे. ते स्वतः तबला शिकलेले असल्याने ताल-मात्रा, लय-लयकारीचे ते जाणते आहेत. चांगलेच डोळस आहेत. अनेक ख्यातनाम तबलापटूंचे तबलावादन साथीचे व सोलो वादन दादांनी कान भरून ऐकले आहे. अगदी थिरकवाँसाो, अल्लारखा शमसुद्दीन, प. सामना प्रसाद, बाळुभाई रुकडीकर, अमीर हुसेन खाँ पासून ते अगदी आजच्या प्रसिद्धीच्या शिखरावर असलेल्या झाकिर हुसेन पर्यंतच्या अनेक तबलापटूंचा तबला रसिकपणे श्रवण केलेला आहे. फक्त तबलाच नाही तर बालगंधर्व, कुमार गंधर्व, छोटा गंधर्व, सवाई गंधर्व, चार ही घराण्याची एकत्र गायकी असलेले पं. कागलकर बुवा, पं. भीमसेन जोशी, पं. मल्लिकार्जुन मन्सूर, बडे गुलाम, पं. जसराज, प्रभुदेव सरदार, शोभा गुर्टू, बेगम अख्तर, प्रभा अत्रे, किशोरी आमोणकर, मालिनी राजुरीकर, हिराबाई बडोदेकर, माणिक वर्मा वैगेरे ख्यातनाम गायक-गायिकांचे कर्णमधुर गायन, दादांनी आकंठ प्राशन केलेले आहे. पं. रविशंकर, पं. विलायत हुसेन यांची सतार गजाननराव जोशींचे व्हायोलिन वादन, रामभाऊ विजापुरे, गोविंदराव टेंबे यांचे हार्मोनियम वादन ऐकून दादांचे कान तृप्त झालेले आहेत. नुसते पाहिले, ऐकले असे नाही तर अभ्यासपूर्ण रीतीने एक चोखंदळ रसिक या नात्याने त्यांनी हे सर्व श्रवण केलेले आहे. दादा जेव्हां संगीतावर मर्मग्राही चर्चा करतात तेव्हा हे अगदी स्पष्ट होते.

संगीताइतकेच दादांचे साहित्यावर प्रेम आहे. साहित्यावर सुद्धा दादा अगदी सहज पण अधिकारवाणीने विश्लेषण करू शकतात. श्री ज्ञानेश्वर, तुकाराम, रामदास इ. संत वाङ्मय दादांनी निरखून पारखून अभ्यासल्याचे दिसून येते. बोलण्याच्या ओघात मराठीतील या थोर संतांचे अभंग, ओव्या दादा सहजपणे उदाहरण म्हणून जेव्हा देतात तेव्हा त्यांच्या या वाचनाची, व्यासंगाची प्रचीती येते. त्यांचा हा व्यासंग आजही चालू असतो हे आणखी एक विशेष. केवळ मराठीच नव्हे तर आजमितीला सुद्धा दादा शेक्सपीअर, शेले, मिल्टन, वर्डस्वर्थ वगैरे इंग्लिश कवींच्या कविता, नाटकांतील उतारे दादांच्या जिभेवर आहेत. दादा १९३२ चे B. A. With English चे विद्यार्थी. तो काळ English at a glance चा गाईड वाचून परीक्षा पास होण्याचा नव्हता. विद्यार्थी दशेत दादांनी जो अभ्यास केलेला आहे तो आज ही त्यांच्या स्मरणांत आहे. दादांच्या बोलण्यात अरविंद घोष, रवींद्रनाथ, जे. कृष्णमूर्ती, रमण महर्षी वगैरे थोर विद्वानांच्या विचारांचा उल्लेख येतो. या थोर कवी, विद्वानांच्या ग्रंथांचा, त्यांच्या वाङ्मयाचा दादांनी बारकाईने अभ्यास केलेला आहे. दादांच्या घरची ग्रंथ संपत्ती पाहिली म्हणजे दादांचा साहित्याभ्यास सहज लक्षात येतो. ग्रंथ खरेदी करून त्यांचा योग्य असा संग्रह करण्याचा दादांचा हव्यास आज सुद्धा टिकून राहिलेला आहे.

दादांच्याकडे येणाऱ्या लोकांत प्रामुख्याने अधिक संख्या असते ती कोणत्या ना कोणत्या तरी समस्येने गांजलेल्या पीडलेल्या लोकांची. त्यात वैयक्तिक, कौटुंबिक प्रश्न अडचणी, आजार, आधी, व्याधी इ. जर्जर झालेले लोक जास्त. आपली दुःखे सांगून त्याला कांही उपाय आहे कां, काही मार्ग आहेत कां ? हे विचारून स्वतःच्या ऐहिक जीवनांत दिलासा शोधणारेच जास्त. अशाप्रकारे अडीअडचणीने त्रस्त, हैराण झालेल्याना दादांनी सांगितलेला उपाय, मार्ग, उपासना म्हणजे मोठाच आधार वाटत असे. ज्योतिष, कुंडली शास्त्राचा अभ्यास म्हणजे दादांचे अगदी अधिकार क्षेत्रच. दादांची ज्योतिष पाहण्याची पद्धतीसुद्धा खासच आहे. कुंडली न पाहता कुंडलीतील ग्रहस्थाने अचूक सांगितल्याचे मी अनुभवले आहे. कुंडली पाहून दादांनी सांगितलेली माहिती, चर्चा ऐकून ज्योतिष शास्त्रावर दादांचा केवढा अधिकार आहे हे सहज लक्षांत येते. संत वाङ्मया इतकाच दादांचा ज्योतिषशास्त्र विषयक ग्रंथांचा निश्चित अभ्यास आहे. एखाद्या प्रश्नाच्या बाबतीत वराहमिहीर काय म्हणतो किंवा अमुक ज्योतिषी काय म्हणतो, अमक्या अमक्या ग्रंथात काय उल्लेख आहे या बद्दल दादा नेमके सांगू शकतात. कोणत्या ग्रंथात कोणता शास्त्राधार आहे हे सांगितल्याने शंकेला स्थान उरत नाही. प्रश्न तो नाही. दादांनी इतक्या डोळस रूपाने ज्योतिषशास्त्र अभ्यासलेले आहे हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे.

पण खरी रंगत येत असे ती दादांचे अध्यात्मावरील विचार ऐकताना. वास्तविक अध्यात्म हा विषयच मुळांत अतिगंभीर, अतिसूक्ष्म, पण दादांची विश्लेषण शैली इतकी सहज सुलभ असे की ऐकताना ऐकणारा पूर्णपणे स्वतःला विसरून जाई. पाप, पुण्य, आत्मा,

परमात्मा, मृत्यूनंतरचे जीवन, पूर्वजन्म, पुनर्जन्म, पूर्व जन्मातील संस्कार, मन,पिशाच्च योनी असा एक ना शेकडो विषयावर रात्रीच्या रात्री रंगून जात असत.

हे सर्व ऐकून पाहून मला मात्र असे वाटत असे की दादा हे सारे केवळ बुद्धी, वाचन, वाक्चातुर्य यांच्याच आधारे सांगत नसावेत. आणखी कांही तरी त्यांच्या ठिकाणी असावे. कांही तरी अदृश्य शक्ती सामर्थ्य त्यांच्या ठिकाणी असावे आणि असा तर्क करण्यास कांही आधार निश्चितच आहे.

मला असा अनेक वेळी अनुभव आलेला आहे. घरी रात्रीची नेहमीप्रमाणे बैठक चालू आहे. लोक येतात जातात, प्रश्न विचारतात, शंका निरसन होत आहे आणि जमलेल्या लोकांतून मधेच कुजबूज ऐकू यायची, ' का हो अत्तराचा वास येतो कां '? कधी मोगऱ्याचा, गुलाबाचा, कधी अत्तराचा मंद सुवास दरवळल्याचा भास, अनुभव लोकांना येत आहे. दादा स्वतःच सांगत असत की त्यांना श्री नृसिंहसरस्वती महाराजांचा अनुग्रह आहे. ज्यावेळी प्रत्यक्ष नृसिंहसरस्वती महाराज अदृश्य रूपाने त्या ठिकाणी वास करीत असतात त्या त्यावेळी अशा प्रकारे सुवास दरवळण्याचा अनुभव येत असे आणि हे दादांच्या रुपाने लोकांच्या प्रत्ययास येत असे.

मी एक स्वत: स्वीकारलेले व्रत म्हणून रोज श्री दत्त भिक्षालिंग स्थानाला दत्तदर्शनाला जवळ जवळ गेली २०-२५ वर्षे दिवसांकाठी सवड सापडेल तेव्हा परंतु रात्री झोपण्यापूर्वी दररोज ज़ात असतो. एक दिवस दादा असेच घरी आलेले होते. मी दत्त दर्शनाला जाणार होतो पण अचानक जाण्याचा बेत रद्द केला. 'का रद्द केला बेत' म्हणून दादांनी विचारले. 'घरीच दत्त असल्यावर तेथे कशाला जायचे ?' असे मी पटकन् म्हणून गेलो आणि त्या दत्तमंदिरात दत्तपादुकावर मला कधी कधी दादांचे पाय दिसतात. असा मी अनुभव सांगितला. त्यावर दादा म्हणाले, 'नित्य दिसत असतील तर ते खरे मानायचे व कधी कधी दिसत असतील तर तो भास' दादांचे हे मन कांहीही असले तरी त्यांच्या ठिकाणी महाराजांचा अनुग्रह याचा अशाप्रकारे मला तरी अनुभव आहे.

एखाद्या प्रश्नासंबंधी दादांनी खुलासा केला की मी कधी कधी त्यांना उलट प्रश्न विचारीत असे,'दादा हे जे काही सांगितले, ते बरोबर कसे सांगितले ? ' ते म्हणत, हे मी सांगत नाही. आतून कोणीतरी त्यांच्या मुखावाटे बोलतो, मी फक्त 'स्पीकर' माध्यम आहे. हा आतला आवाज कोणाचा ? साक्षात महाराज बोलत नसतील ना ? त्यावर दादांचे म्हणणे इतकेच की 'तो महाराजांचा आदेश आहे आणि याचा ही आम्हाला अनेक वेळेला अनुभव आलेला आहे.

जवळ जवळ आठ दहा वर्षापूर्वीची एक घटना. दादा नेहमी प्रमाणे त्या दिवशी आलेले होते. पण त्या दिवशी आमच्या राधेश्याम मंगल कार्यालयात उतरले होते. त्यापूर्वी माझी व दादांची एक दोन वेळेला भेट झाली होती. पण त्या वेळी मी माझ्याबद्दल दादांना

काहीच बोललो नव्हतो. काय झाले होते? मी नेहमीप्रमाणे नोकरीस जायचा. नेहमीप्रमाणेच काम करायचा रजा वगैरे नाही. पण त्यापूर्वीच्या २४ - २५ दिवसात मला पोटांत अन्न म्हणून काही नव्हते. दोन्ही जेवणाच्या वेळेपूर्वी खूप भूक लागल्याचे जाणवत असे. पण पानावर बसले की अन्नाचा एकही घास पोटात जायचा नाही. दिवसातून चहा-दूध थोडेसे घेत असे. पण अन्न म्हणून अजिबात नाही. आणि २४-२५ दिवस गेले. पण त्या दिवशी दादा आल्यावर मात्र मी दादांना हा प्रकार सांगितला. त्यावर दादांनी विचारले,'काही बाहेरचा प्रकार आहे कां? ' मी म्हटले,'अजून पर्यंत तसे काही वाटले नव्हते पण आजच मला तसा भास होत आहे. दादांचे नुकतेच स्नान झालेले होते, त्यांनी मला, 'घेऊन पहा, काही उपाय होतो का पाहा?' असे म्हणत एक भस्माची पुडी दिली. रोज पोटात घेण्यास सांगितले. मी होय म्हणून घरी आलो. त्याच दिवशी (फार थोडे) भस्म मोठ्या श्रद्धेने पोटात घेतले. आणि आश्चर्य असे की कशी बशी अर्धा चतकोर मी भाकरी खाऊ शकलो. दादांनी सात दिवस भस्म घेण्यास सांगितले होते. भस्माशिवाय इतर कोणते ही औषध, टॉनिक नव्हते हे मुद्दाम उल्लेखिले पाहिजे. दररोज रोजच्या आहारात फरक पडत गेला आणि सातव्या दिवशी तर फारच झाले. नेहमी प्रमाणे दुपारचे रात्रीचे भरपूर जेवण घेतले. दुपारचा डबा नेला होता तो संपवला. संध्याकाळी नोकरीवरून आल्यावर भूक लागली म्हणून कांदे पोहे खाल्ले. रात्री झोपताना नेहमी प्रमाणे एक मापभर दूध घेतले. पण रात्री १२-१ सुमारास पुन्हा भयंकर भूक लागली म्हणून काहीतरी खाऊन पुन्हा दूध घेऊन झोपी गेलो. त्या दिवसापासून आजतागायत माझी भूक गेलेली नाही. अन्नावाचून राहण्याचा माझा तो काळ एकूण ३५ दिवसांचा होता. ही सर्व घटना दादाना मी पत्राने कळविली.

त्या काळात शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरूंची ओळख झालेली होती. हे कुलगुरू सत्यसाईबाबांचे नितांत भक्त. दादांची व त्यांची भेट झाल्यावर दादांनी माझे पत्र त्यांना वाचायला दिले. त्यांनी पत्रालाच नमस्कार केला. तेव्हा हा अनुभव प्रत्यक्ष नृसिंहसरस्वती महाराजांच्या कृपेशिवाय घडला असे मलावाटत नाही.

असेच आणखी एकदा कधीतरी नेहमीप्रमाणे रात्री बैठक जमलेली होती. त्यावेळी अदोनीचे (आंध्रप्रदेश) श्री. विठ्ठलराव नखाते म्हणून एक सद्गृहस्थ आलेले होते. रात्रीचे चहापान चालू होते. त्याच वेळी धाकटा भाऊ अरूण याची द्वितीय कन्या हर्षदा आजारी म्हणून दवाखान्यात ॲडमिट केली होती. गप्पा चालू असतानाच निरोप आला. 'मुलीची तब्येत फार बिघडली आहे आणि वाचण्याची शक्यता कमी आहे. डॉक्टरानी तिला दवाखान्यातून घरी हलवण्याची सूचना दिली आहे' इ. त्यावेळी मुलगी जेमतेम ५-६ महिनेही वाचणार नाही म्हणून डॉक्टरानी खात्री दिली होती. अशा वेळी दादांना प्रश्न विचारला. दादांनी क्षणभर विचार केला. त्यांना आतून काय स्फुरले कोण जाणे त्यांनी सांगितले की या क्षणी बदामी देवीच्या पायाला स्पर्श केलेले कुंकू पाहिजे. त्या कुंकवाचा

कण पाण्याबरोबर मुलीच्या तोंडात जरी गेला तरी ती वाचण्याची शक्यता आहे पण बदामीचे कुंकू कोठून मिळणार ?

योगायोग कसा पहा - दोन तीन महिन्यापूर्वी मी एक सहल घेऊन बदामीला गेलो होतो तेथील पुरोहितांचा पाहुणा कोल्हापुरात आहे. त्याला देण्यासाठी देवीचा प्रसाद व देवीच्या पायावरील कुंकू एक अतिशय छोटी पुडी माझ्याकडे दिली होती. त्या पाहुण्यालां तो प्रसाद पोहोचविण्याचा दोन तीनदा प्रयत्न केला पण ते जमले नाही. शेवटी त्यानाच घरी येऊन घेऊन जाण्यास सांगितले. तो प्रसाद व कुंकू घरीच माझ्या कपाटात कुठे तरी कोपऱ्यात पडून राहिले. बरीच शोधाशोध केल्यावर ती पुडी मला सापडली. ते कुंकू दवाखान्यात पाठवले ऑक्सिजनवर असलेली ती मुलगी आयुष्याचे शेवटचे श्वास घेत होती. धडपडत होती. नाडीचे ठोके सुटले होते. ती जाणार नक्कीच झाले होते. शेवटचा प्रयत्न म्हणून कुंकवाचे पाणी द्यायचा विचार झाला. पण द्यायचे कसे ? तिची धडपड इतकी जोरात सुरू होती की तिने एक जोराचा झटका दिला. त्या झटक्याबरोबर ऑक्सिजनची कळ फिरली नळी सुटली नाकातून श्वासोच्छ्वासासाठी तिने तोंड उघडले आणि संधीचा फायदा घेऊन दोन थेंब कुंकवाचे पाणी तिच्या तोंडात टाकले. हजर असलेल्या दाईने गडबड करून पुन्हा ऑक्सिजन सुरू केला आणि पाच दहा मिनिटात मुलीच्या हृदयाचे ठोके नॉर्मल असल्याचे दिसून आले. मरणाच्या दाढेत असणारी मुलगी वाचली कशी हे पाहून खुद्द डॉक्टरांना सुद्धा आश्चर्य वाटले. आता ही मुलगी विशीच्या उंबरठ्यावर जिवंत असून सुदृढ आहे. 'देव तारी त्याला कोण मारी' हेच खरे !

मंगल कार्यालय चालवणाऱ्या आमच्या बंधूच्या डोक्यात एकदा असा विचार आला की कोल्हापूर सोडावे व हैद्राबादला जाऊन तेथे एक कार्यालय काढून तेथेच स्थायिक व्हावे. हैद्राबादला एक मोठा वाडा स्वस्तात मिळण्याची शक्यता होती. सहज म्हणून दादाना याबाबतीत प्रश्न विचारला. दादांनी नकार दिला. का म्हणून विचारले तेव्हा तो वाडा बाधायुक्त आहे असे दादा म्हणाले. प्रथम यावर विश्वास बसला नाही पण कर्मधर्म संयोगाने हैद्राबादचेच एक गृहस्थ पुढे केव्हातरी भेटले त्यांच्याकडे उगीच चौकशी करावी म्हणून विषय काढला तेव्हा त्या गृहस्थानी "त्या वाड्यात गेल्या काही दशकात कोणीच रहात नसल्याचे सांगितले. कारण तेथे जो जो राहिला त्याला कधीही समाधान लाभले नाही. उलट मानहानी, वित्तहानी आणि मनुष्यहानी होऊन मगच तो मनुष्य बाहेर पडला." असे सांगितले. मोहाला बळी पडून जी प्रचंड हानी होणार होती त्यातून दादांच्या मुळेच टळली असे वाटत होते.

याही पेक्षा आणखी एका प्रसंगामुळेच आम्हा जोशी कुटुंबियातील प्रत्येकाचे स्वास्थ्य हरवले होते. आमची आई आम्हा सर्व भावंडांना देवापेक्षाही प्रिय होती हे जोशी कुटुंबियाना ओळखणाऱ्या सर्वांना ठाऊक आहे. अतीव खस्ता खाऊन त्या माऊलीने

आम्हाला वाढविले होते. आई म्हणजे आमच्या घराची शोभा होती. चैतन्य होते. आई जवळ आम्हा पोरांना देण्यासारखे काहीही नव्हते. पण धीर, प्रोत्साहन, साहस, नीती, प्रेम, उदात्त भावना इ. गुणांनी तिने आम्हाला जोपासले होते. अशी आमची कुलदैवत असलेली आई एकदा काविळीसारख्या विकाराने आजारी पडली. कावीळ म्हणजे प्रथम काहीच वाटले नाही पण जीव घेणारा हा भयंकर विकार आईच्या आजारपणाच्या रूपाने जेव्हा पाहायला मिळाला तेव्हा या विकाराची भयानकता जाणवली.

झाले काय, तर आई आजारी पडली. दोन तीन महिने औषधोपचार चालू ठेवले. हॉस्पिटलला ॲडमिट केली. काही झाले तरी प्रकृती आटोक्यात येत नव्हती. एक दिवस तर असा उजाडला की त्या दिवशी आई नक्की जाणार. डॉक्टरांनी पेशंट घरी नेण्याबद्दल घोशा लावला होता. पण जर मरणारच आहे तर शेवटपर्यंत निदान उपचार तरी चालू राहू देत असे आम्ही सांगितले. तेव्हा डॉ.नी नाइलाजाने संमती दर्शविली. घरी आम्ही सर्व अतिशय चिंतामग्न होतो. संध्याकाळची वेळ होती. दादाना बोलावून घेतले. रात्री ९-१० ची वेळ दादांनी विचार करून सांगितले मी सांगतो त्या पाच देवांचा अंगारा रात्री १२ वाजण्यापूर्वी पाहिजे. क्षणाचाही विचार केला नाही. दोन तीन ठिकाणी टॅक्सी पाठवून, सांगवड्याच्या नरसोबाचा, ज्योतिबाच्या डोंगरावरून ज्योतिबाचा, करवीर निवासिनी अंबाबाई, गणपती आणि दत्तभिक्षालिंग स्थान मंदिरातील दत्ताचा असे अंगारे मिळवून आणले. रात्री ११ ॥ वाजेपर्यंत हे सर्व जुळून आले.

क्षणाक्षणाला आईची प्रकृती ढासळत होती. सर्व शरीरभर अंगाची आगआग होत होती. शरीर खाजवून खाजवून शरीरावर ओरखडे उठलेले होते.रक्तबंबाळ झाले होते. असहाय्यतेमुळे डोक्यावरचे केस पिंजून गेले होते. अंगावरचे कपडे अक्षरश: वेड्यापिशा माणसाप्रमाणे फाडून टाकलेले होते. आणि आम्ही सर्व भावंडे अगतिक होऊन निमूटपणे हे फक्त पाहात होतो.

आणलेला अंगारा एकत्र केला. आईच्या सर्वांगावर लावला. डॉक्टरांचे मत तर आई रात्री १२ ते २ वाजेपर्यंत नक्की जाणार. दादांचे मत आई सकाळी ६ वाजेपर्यंत राहिली तर पुढे ५ वर्षे तरी काही होणार नाही.

रात्रीचे बारा वाजले दोन वाजले. आई इतकी थकलेली होती की हळूहळू बेशुद्धावस्थेत गेल्याप्रमाणे शांत होत होत झोपी गेली आम्हाला थोडे बरे वाटले. पण दादांच्यावरील विश्वासामुळे ती ६ वाजेपर्यंत राहणे आवश्यक होते.

आई झोपल्याने थोडी उसंत मिळाली. तशाही अवस्थेत 'हेच पाच अंगारे का' म्हणून दादांना विचारले. 'या क्षणी आईला नेण्यासाठी यमदूत आटोकाट प्रयत्न करीत आहेत. पण या पाच ही अंगाऱ्याचा प्रभाव इतका असेल की त्यांना त्यात यश येणार नाही.' हे ऐकणाऱ्या वाचणाऱ्यांना कदाचित ही थट्टा वाटेल. आम्हाला धीर द्यायचा म्हणून दादांनी

काही तरी सांगितले असेही कोणास वाटेल हे खरे का खोटे संशयी मनाला हा प्रश्न भेडसावीत होता.

काही महिने गेले. आई आता चांगलीच बरी झालेली होती. आम्ही सर्व जण आई जवळ एकत्र बसलो होतो. आईला उगीच सहज विचारले. आई तू 'त्या रात्री इतकी वेड्यासारखी का करीत होतीस ? प्रश्न ऐकून आईचा थरकाप उडाला. आई म्हणाली,'अरे, दृश्य आठवले तरी भीतीने दातखिळी बसते. पाच यमदूत काळे, केस पिंजारलेले, लाल डोळ्याचे, मोठे मोठे दोर माझ्या रोखाने फेकून मला फास लावण्याचे ते प्रयत्न करीत होते मी फार झटापट केली आणि हाकलून दिले. ' एखादे स्वप्न पहावे असे हे घडून गेले आईचे बोलणे ऐकून आम्ही थक्कच झालो. कारण दादांनी सांगितलेले वर्णन आम्ही कधीही आईजवळ बोललो नव्हतो. पण ती दोन्ही वर्णने इतकी तंतोतंत खरी ठरू शकतात. हे तिऱ्हाईत माणसाला कधीही पटणार नाही. एखाद्या अद्भुतरम्य कथेप्रमाणेच असणारा सारा प्रत्यक्ष, खराखुरा प्रसंग पाहून ती.दादांच्या बद्दल मनात असणारा आदर आणखी दुणावला.

असे एक ना दोन किती तरी प्रसंग. घटना, अनुभव पाहण्यात ऐकण्यात आले. कधी घरचे प्रसंग तर कधी दादांच्याकडे येणाऱ्या बाहेरच्या लोकांचे. दादांची सेवा आणि बाहेरच्या लोकांचे स्वागत करताना माझ्या पदरी या अद्भुत घटनांची प्रसंगाची शिदोरी मात्र मोठ्या प्रमाणात पडली.

लोक काही म्हणोत. देव मानोत, न मानोत अंधश्रद्धा निर्मूलन करणाऱ्यानी त्यांचे प्रयत्न जरूर करावेत. बुवाबाजी करणाऱ्यांच्या मुळेच हे अध्यात्म क्षेत्र कलंकित झाले आहे. पण त्याचबरोबर हेही लक्षात घेणे आवश्यक आहे की मानवी जीवनाच्या क्षितिजा-पलिकडे असणाऱ्या अतींद्रिय शक्तीबद्दल मात्र बौद्धिक किंवा तार्किक अंदाज बांधता येणार नाहीत. •

## दादा नाईक- एक असामान्य व्यक्तिमत्त्व

*सविता पारिजात, कोल्हापूर.*

आजकाल महाराष्ट्रामध्ये जुने जाणकार, तत्त्वज्ञ, चिंतक आणि जे अभ्यासक आहेत त्यामध्ये संकेश्वरच्या श्री. दादा नाईक यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. संकेश्वर हा जरी कर्नाटकचा भाग असला तरी दादांचे चौफेर व्यक्तिमत्त्व कर्नाटक आणि महाराष्ट्र या दोन्ही प्रदेशांना जोडणारे आहे.

इंग्रजी वाङ्मयाचे गाढे व्यासंगी म्हणून ते सर्वश्रुत आहेत. त्यातही आध्यात्मिक पुस्तकांचे वाचन हा त्यांचा आवडता छंद. विशेषतः अरविंदांच्या वाङ्मयाचा अभ्यास करण्याच्या बाबतीत अनेक साधकांना नुसते इंग्लिश वाङ्मयावरचे प्रभुत्व उपयोगी पडत नाही तर त्यासाठी एक वेगळा दृष्टिकोन असावा लागतो आणि मनामध्ये एक आध्यात्मिक जाण असावी लागते. दादांच्या ठिकाणी ती असल्यामुळे अरविंदांची " सावित्री " ही त्यांनी नुसती वाचलेली नाही तर त्यांचा त्या संबंधीचा व्यासंग फार मोठा आहे आणि किती तरी संदर्भ पुस्तके त्यांच्या संग्रहात आहेत की ज्यामुळे एखाद्या नवागताचे सुद्धा साहित्यात पदार्पण व्हावे. त्यांचा लोकसंग्रह जसा मोठा तसाच पुस्तक संग्रहही दांडगा आहे त्यामुळे अगदी जुन्या पुस्तकांपासून तो अलिकडच्या नित्यनूतन प्रकाशनापर्यंत दादांचा स्नेह आहे. त्यांचे हे पुस्तकांचे वेड बघितले म्हणजे Robert Southey या इंग्रजी कवीच्या खालील ओळी आठवतात.

My never failing friends are they
With whom I converse day by day .

आणि त्यांचे हे पुस्तकांच्या जगात रमणेही साहजिकच आहे. कारण संकेश्वर-सारख्या आडवळणी शहरामध्ये दररोज नवनवीन चर्चेला मित्रमंडळी त्यांना उपलब्ध नसली तरी या पुस्तक मैत्रीतच ते गढून गेलेले असतात.

अध्यात्मातला मनुष्य हा कधी कधी थोडासा रुक्ष किंवा उदासीन वाटतो. बऱ्याच वेळेला त्याचे जीवनविषयक तत्वज्ञान एका विशिष्ट मर्यादेपर्यंत जाऊन तिथेच थांबते. कित्येकदा तो गर्दीपासून दूर जातो तर अधूनमधुन त्याला लोकांचाही कंटाळा येऊ लागतो.

दादा मात्र त्याला अपवाद आहेत. त्यांच्याकडे होणाऱ्या टेंबे स्वामींच्या उत्सवा-मधून अनेकांनी प्रेरणा घेतलेली आहे. त्यांची श्रीगुरुदेवदत्तावरील भावनिष्ठा अनेकाना भक्तिमार्गाकडे नेणारी आहे. किती तरी मंडळी त्यांना गुरुस्थानी मानून त्यांचे आध्यात्मिक मार्गदर्शन घेण्यासाठी आसुलेली आहेत. परंतु दादांचे मार्गदर्शन केवळ एवढ्यावरच थांबत नाही. ऐहिक आणि व्यावहारिक अडचणीत देखील ते थोरल्या भावाप्रमणे लक्ष घालतात. कित्येकांचा संसार सुखाचा व्हावा म्हणून त्यांची तळमळ चाललेही असते.

ज्याचे ऐहिक धड नाही ।
त्याचे परम पुससी काही ॥

या ज्ञानेश्वरीतील ओवीप्रमाणे प्रत्येकाचा संसार सुखाचा करण्यासाठी त्यांची धडपड चाललेली असते.

" अवघाची संसार सुखाचा करीन
आनंदे भरीन तिन्ही लोक "

हे त्यांचे ब्रीद वाक्य आहे. परंतु सगळ्यांचे संसार सुखाचे करीत असताना स्वतःच्या संसारात त्यानी अनेक चढउतार पाहिलेले आहेत, सोसले आहेत आणि स्थितप्रज्ञाच्या भूमिकेवरून आजही त्यांच्या चेहऱ्यावर

देखे अखंड प्रसन्नता ।
आथी जेथ चित्ता ।
तेथ रिघणे नाही समस्ता ।
संसार दुःखा ॥

ही अनुभूती दिसून येते.

## परमपूज्य दादा नाईक : एक प्रसन्न व्यक्तिमत्व

*प्रा. नीलकंठ पालेकर*

परमपूज्य दादांची व आमची पहिली भेट ही एक मजेशीरच घटना होती. लपंडावच होता म्हणना ! आमचे परमस्नेही शिक्षण महर्षी पद्मश्री डॉ. डी. वाय्. पाटीलसाहेब यांना साधु-संतांची व गुणी जनांची फारच ओढ. अमुक-अमुक ठिकाणी एखादे सज्जन गृहस्थ राहतात, ज्ञानी सत्पुरुष राहतात असे समजले की लागलीच ते त्या सत्पुरुषाकडे आकर्षित होतात. त्या सत्पुरुषाची मनापासून सेवा करण्यात स्वतःला धन्य समजतात.

ही १९८० सालाच्या अखेरची गोष्ट आहे. मी व डॉ. डी. वाय्. पाटीलसाहेब काही कामानिमित्त बेळगावला गेलो होतो. येताना ते म्हणाले, " संकेश्वर आले म्हणजे आठवण करा. तेथे श्री. दादा नाईक म्हणून सत्पुरुष रहातात. त्यांना भेटायचे आहे." आमची कार संकेश्वरजवळ आली तेव्हा मी साहेबांना आठवण करून दिली. आम्ही श्री. दादा नाईकांची चौकशी करीत त्यांच्या घराकडे गेलो. संकेश्वरातील प्रसिद्ध व्यक्ती असल्यामुळे घर सापडायला वेळ लागला नाही. घरात चौकशी केली तेव्हा ते हुक्केरीस श्री. कुलकर्णी यांच्याकडे गेल्याचे समजले. त्यांचा पत्ता घेऊन आम्ही हुक्केरीस गेलो. श्री. कुलकर्णी सापडले. ते टेलिफोन खात्यात नोकरीस होते. ते म्हणाले " दादा आताच संकेश्वरास गेले. ते तुम्हाला तेथेच भेटतील." आम्ही परत संकेश्वरला गेलो. दादांचे दर्शन घडले. दादांच्या-बद्दल जे ऐकले होते त्यावरून ते कोणातरी भगवी वस्त्रे परिधान केलेले, लांब केस सोडलेले साधु-पुरुष असतील अशी माझ्या मनाची कल्पना झाली होती. पण प्रत्यक्षात - डोक्यावर काळी टोपी, अंगात साधा लांब बाह्यांचा शर्ट व कमरेस शुभ्र धोतर. साधु-पुरुषांच्या माझ्या कल्पनेस पहिल्यांदा धक्का बसला. आम्ही नतमस्तक झालो. त्यांनतर त्यांच्या वाड्यातील लहानशा बैठक खोलीत चहापान झाले. साहेबांनी त्यांना

कोल्हापुरास येण्याचा आग्रह केला. तेव्हा साहेबांच्या विनंतीस मान देऊन दादा कोल्हापुरास आले. गप्पांच्या ओघात दादा अनेक विषयावर आपले मौलिक विचार प्रकट करीत. त्यात आपण कोणीतरी तत्त्वज्ञानी आहोत, वक्ता आहोत व समोर आपल्याहून कमी प्रतीचे श्रोते आहेत अथवा शिष्य आहेत असा अभिनिवेश नव्हता. त्यामुळे दादांच्या अल्पशा सहवासातही ते आमच्या जिव्हाळ्याचे झाले. आपले झाले. आमच्यात आप-पर भाव राहिला नाही.

दादा वारंवार कोल्हापुरास येत त्यावेळी ते शिवाजी पार्कातील मेडिकल रिप्रेझेंटिव्ह श्री. वझे यांच्या घरी उतरत अथवा रुईकर कॉलनीतील श्री. शिवाजीराव शेळके यांच्या बंगल्यात रहात. सौ. वझे वहिनी व सौ. उषावहिनी या दादांची पितृवत सेवा करीत. दादांना भेटावयास येणाऱ्यांना चहापान व प्रसंगी जेवावयास घालून त्यांचे आदरातिथ्य करीत.

२५ मे १९८२ चा दिवस असावा. डॉ. डी. वाय्. पाटील साहेबांचा ॲग्रिकल्चर कॉलेजवर फोन आला. " दादा आले आहेत. आपण लगेच या." मी लगेच साहेबांच्या ताराबाई पार्क येथील ' अजिंक्यतारा ' वर गेलो. तेथे दादा व त्यांच्यासोबत एक त्यांच्या समवयस्क व्यक्ती बसली होती. दादांनी ओळख करून दिली. " हे काशीनाथपंत गानू. धुळ्याला रहातात. चांगले ज्योतिषी आहेत." मी त्यांना नमस्कार केला. साहेबांनी त्यांना माझे भविष्य पहावयास सांगितले. श्री. गानू यांनी माझे हात, जन्मवार व तारीख पाहून गणित मांडून स्वतःच्या अक्षरात माझे भविष्य लिहून दिले. या आकड्यावर आधारित नवीन ज्योतिष पद्धतीने मी प्रभावित झालो. नंतर निरनिराळ्या विषयांवर बरीच चर्चा झाली. शेवटी दादा म्हणाले, " श्री. गानू यांना या विषयावर एक पुस्तक प्रकाशित करायचे होते. पैशांची जोडणी झाली आहे. परंतु कोणीही जबाबदारी घ्यावयास तयार नाही." त्यावर डी. वाय्. पाटील साहेब सहज बोलून गेले, " पालेकरांच्यावर सोपवा. ते पुस्तक तयार करतील." दुसऱ्या दिवशी दादांनी मला श्री. शिवाजीराव शेळके यांच्या बंगल्यावर बोलाविले. दुसऱ्या दिवशी मी तेथे गेलो. बंगल्यासमोरील मोकळ्या जागेत खुर्च्या टाकून मी, दादा व श्री. गानू बसलो. दादांनी पुस्तकाचे हस्तलिखित मला वाचावयास सांगितले. त्यावर दादा व गानू यांच्यात चर्चा होऊन दुरुस्त्या सुचवीत. मी त्या लिहून घेई. हा कार्यक्रम तासन् तास चाले. मध्ये-मध्ये सौ. उषाताईंच्या हस्ते चहा-बिस्किटांचा आग्रह सुरु होई. हा कार्यक्रम आठ-दहा दिवस चालला होता. संवडीनुसार डी. वाय्. पाटीलसाहेब व श्री. शिवाजीराव शेळकेही उपस्थित राहत. चहा पिणाऱ्यांना आळस नव्हताच त्याप्रमाणे वेळोवेळी चहा करून देणाऱ्या सौ. उषाताईंना देखील बिलकुल आळस नव्हता. त्या सुहास्य वदनाने व आग्रहाने सर्वांना चहा देत. बऱ्याच वेळा दादांच्याबरोबर जेवणाचाही योग आला. हस्तलिखितावर संपूर्ण चर्चा झाल्यावर दादांनी पुस्तकाची जबाबदारी पूर्णपणे

माझ्यावर टाकली. पुस्तक संपादित करण्याची ती माझी पहिलीच वेळ होती. परंतु दादांच्या व्यक्तिमत्वाच्या प्रभावाने मी अगदी भारावून गेलो होतो. मी ' राजहंस ' प्रिंटिंग प्रेस ठरविला. जनता बझारचे जनरल मॅनेजर माझे स्नेही श्री. के. जी. कुलकर्णी साहेब यांनी माफक किंमतीत इंपोर्टेड कागद देऊन चांगलेच सहकार्य दिले. ' मयूर ' आर्टसचे श्री. ओतारी यांनी अगदी थोड्याच वेळात पुस्तकाचे आकर्षक व अर्थपूर्ण मुखपृष्ठ व आतील आकृत्या तयार करून दिल्या. महालक्ष्मी प्रोसेसचे श्री. जोशी यांनी सुरेख ब्लॉक तयार करून दिले.

जून ८२ च्या पहिल्या आठवड्यात मी पुस्तकाच्या कामास सुरवात केली. त्यावेळी मात्र असे आढळून आले की श्री. गानूंनी लिहिलेली भाषा व वाक्यरचना पुस्तक भाषेसाठी योग्य नाही. म्हणून मी दररोज रात्रौ जागून २५ पाने लिहून काढी व सकाळी बरोबर आठ वाजता प्रेसमध्ये नेऊन देई. कंपोझिंग विभागाचे प्रमुख श्री. मुळे व त्यांची टीम माझी वाटच पहात असे. दररोज सोळा पानांचे कंपोझिंग होई. मी दिवसभर तेथेच बसून चार-पाच वेळा प्रुफे तपासून देई. सायंकाळी सोळा पाने छापून तयार होत. प्रेसचे मालक श्री. गोसावी यांनी या कामी जातीने लक्ष घातले. दादा म्हणाले, " २२ तारखेस टेंबे स्वामींची पुण्यतिथी आहे. त्यादिवशी संकेश्वरास मोठा उत्सव असतो. त्या दिवसापर्यंत पुस्तक तयार झाले तर फारच बरे होईल." मी स्वतःला त्या कामात पूर्णपणे झोकून दिले. परमपूज्य दादांच्या दिव्य प्रेरणेने मी अगदी भारावून गेलो होतो मला कोणत्याही कामात अडचण अशी आलीच नाही. अवघ्या अठरा दिवसात सव्वा दोनशे पानांचे ' संख्याशास्त्र ' तयार झाले. मोहक व अर्थपूर्ण रंगीत कव्हर आणि विषयाची सुबक मांडणी यामुळे पुस्तक सुंदरच झाले. दि. २२ जून १९८२ रोजी संकेश्वर मुक्कामी या पुस्तकाचे त्यावेळचे केंद्रीय शिक्षण मंत्री व दादांचे मित्र श्री. बी. शंकरानंद यांच्या शुभ हस्ते पुस्तकाचे प्रकाशन झाले.

या प्रकाशन समारंभाचा किस्साही मजेशीर आहे. पुस्तक तयार होताच दादांनी श्री. बी. शंकरानंद यांना पुस्तकाच्या प्रकाशनाचे फोनवरून आमंत्रण दिले. त्या दिवशी मंत्री-महोदयांची तब्येत बरी नव्हती. अंगात ताप होता. परंतु प्रकाशन करून लगेच परत जाण्याच्या अटीवर त्यांनी आमंत्रण स्वीकारले. कार्यक्रम रात्रौ नऊ वाजता होता. श्री. बी. शंकरानंदसाहेब साडे आठ वाजता दादांच्या घरी आले. दादांच्या त्या ऐतिहासिक खोलीत आम्हा ठराविक लोकांचे चहापान झाले. दादा बी. शंकरानंदसाहेब यांना माझी ओळख करून देऊ लागले. त्यावेळी शंकरानंदसाहेब म्हणाले, " मी पालेकरांना ओळखतो. मी हायस्कूलमध्ये शिक्षक असताना ते माझे विद्यार्थी होते." त्यावर दादा म्हणाले, " तुमची ओळख आहे हे बरे झाले. मी बोलत नाही. श्री. गानूंना भाषणाची सवय नाही. आता तुम्ही गुरु-शिष्यच आजची सभा सांभाळा." या अचानकपणे पडलेल्या जबाबदारीमुळे मी अगदी भांबावून गेलो. दादांच्या वाड्यासमोरील विठ्ठल मंदिर श्रोत्यांनी भरून असंख्य लोक बाहेर उभे होते. माझ्या उस्फूर्त भाषणात मी मानवी जीवनात ज्योतिष शास्त्राचे स्थान,

कुंडली, हस्तसामुद्रिक, संख्याशास्त्र वगैरे ज्योतिष शास्त्रांचा आढावा घेऊन श्री. गानूंच्या संख्याशास्त्राबद्दल माहिती सांगितली. माझ्या भाषणानंतर श्री. शंकरानंदसाहेब यांचेही उद्‌बोधक भाषण झाले. ' त्यानंतर संगीत सभेस आरंभ झाला. मंत्रि-महोदय या संगीत सभेत इतके मग्न झाले की, आपण आजारी आहोत व आपण लवकर जाणार होतो याचा त्यांना विसर पडला. रात्रौ दोन वाजेपर्यंत ते कार्यक्रमास उपस्थित होते.

मुंबईच्या ' श्री ' साप्ताहिकामध्ये या पुस्तकाचे तीन पानी परीक्षण आले होते. त्याचा परिणाम असा झाला की, आम्ही काढलेल्या एक हजार प्रती हातोहात खपल्या व श्री. गानूंना संख्याशास्त्राची दुसरी आवृत्ती काढावी लागली.

' संख्याशास्त्र ' या पुस्तकाच्या योगाने दादांनी माझ्यावर फार मोठी जबाबदारी सोपविली व त्यांच्याच आशीर्वादाने मी ती जबाबदारी चांगल्यारीतीने पार पाडू शकलो याचा मला अभिमान वाटतो. दादांनी संख्याशास्त्र या पुस्तकामध्ये आग्रहपूर्वक माझा फोटो टाकावयास लावला. त्यामुळे साऱ्या महाराष्ट्रात मला प्रसिद्धी मिळाली.

दादांचे चिरंजीव श्री. अनिल नाईक हे नोकरीनिमित्त शिवाजी पार्कातील श्री. भोईटे यांच्या घरात रहावयास आले. त्यामुळे दादांच्या सहवासाचा लाभ वारंवार होऊ लागला. डॉ. डी. वाय्. पाटीलसाहेबांनी तर त्यांना ताराबाई पार्क येथे विनामूल्य फ्लॅट देऊ केला होता. पण दादांनी आभारपूर्वक नकार दिला. कालांतराने दादांनी टेलिफोन भवन जवळील ' व्यंकटेश्वर अपार्टमेंट ' मध्ये एक फ्लॅट घेतला. दादांचा मुक्काम सध्या तेथेच असतो. सांसारिक अडचणींमुळे किवा इतर व्यापांमुळे जर मन उद्विग्न झाले की मी दादांच्या घरी जाऊन बसतो. परम पूज्य दादांच्या दर्शनाने व त्यांच्या मौलिक मार्गदर्शनाने मी माझ्या व्यथा पार विसरून जातो. बोलता-बोलता माणसाला लौकिकातून अलौकिकाकडे नेण्याचे सामर्थ्य दादांच्या वाणीत व त्यांच्या सदाबहार व्यक्तिमत्वात आहे. माझ्या माहितीच्या ज्या ज्या व्यक्ती दादांच्या सहवासात आल्या, त्यांचा देखील हाच अनुभव आहे. सहज बोलता बोलता ते अनेक विषयावर भाष्य करतात. ते ऐकत असताना आपण स्वतःला विसरून जातो. देहभान हरपून जाते. दोन-दोन, तीन-तीन तास केव्हा निघून जातात ते कळतच नाही. अध्यात्म, ज्योतिष, मेडीसिन, शिक्षण, साहित्य, व्यवहार, संगीत, नाट्य वगैरे सर्व विषयांवर दादा अधिकार वाणीने बोलतात. ते तासन् तास बोलत राहतात व ऐकणारे कान देऊन ऐकत राहतात. घड्याळाचे काटे आपले काम करीत असतात. समाधी भंग पावल्यावर दादांचे हे मूलभूत विचार टेप न करून ठेवल्याबद्दल वाईट वाटते.

एके दिवशी बोलता बोलता दादांनी Sin आणि Crime यातील फरक फार मार्मिक शब्दांत सांगितला. प्रत्येक माणसाच्या मनात वाईट विचार येतात. दुसऱ्याची वस्तू हिरावून घ्यावी असा विचार मनात येतो. त्यालाच ' Sin ' म्हणजे ' पाप ' असे म्हणतात.

जेव्हा हा पाप-विचार कृतीत येतो तेव्हा त्याला Crime म्हणजे ' गुन्हा ' म्हणतात. चोरी करणे हा गुन्हा आहे.

दादा १९३२ साली इंग्रजी विषय घेऊन बी. ए. झाले. राजाराम कॉलेजमध्ये शिकत असताना ते व सुप्रसिद्ध शिक्षणतज्ञ श्री. जे. पी. नाईक एकाच खोलीत राहात. दोघेही अभ्यासू, दररोज तीनशे पाने वाचल्याशिवाय झोपयचे नाही हा त्यांचा कडक शिरस्ता. त्यामुळे इंग्रजी साहित्याचे त्यांनी तुफान वाचन केले होते. दोघानीही इंग्रजी साहित्यावर चांगलेच प्रभुत्व संपादन केले होते. इंग्रजी साहित्याप्रमाणेच मराठी साहित्यवरही दादांचे चांगलेच प्रभुत्व आहे. वाचन हेच त्यांचे व्यसन ! नवनवीन पुस्तके विकत घेऊन ती वाचायची व इतरांना वाचावयास द्यायची हाच व्यासंग. महाराष्ट्र ग्रंथालयाचे प्रा. शशिकांत कुलकर्णी यांनी नवनवीन पुस्तके आणून द्यायची व दादांनी ती स्वतः वाचायची व इतरांना त्यांची शिफारस करायची किंवा आणून द्यायची ही दादांची साहित्यसेवा या वयातही चालू आहे.

चांगल्या गुणांची कदर करणे हा दादांचा स्थायीभाव. श्री. एम्. एन्. तथा बापूसाहेब कुलकर्णी हे दादांचे परमस्नेही. इंग्रजी, संस्कृत व मराठी भाषांवर त्यांचे चांगलेच प्रभुत्व आहे. त्यांनी लिहिलेल्या ' ज्ञानेश्वरी परिचय ' व ' दासबोध परिचय ' या दोन पुस्तकांचे संपादन व प्रकाशन नुकतेच दादांनी करविले आहे.

या वयातदेखील दादांची स्मरणशक्ती अचाट आहे. इंग्रजी व मराठी साहित्याचे त्यांनी अफाट वाचन केले आहे. चर्चेच्या वेळी इंग्रजी कविता व नाटकांतील उतारे त्यांच्या मुखातून उत्स्फूर्तपणे बाहेर पडतात. इंग्रजीप्रमाणे मराठीतील कविताही त्यांना मुखोद्गत आहेत. निरनिराळे संदर्भ ऐकून मतीगुंग होऊन जाते.

संगीत हा दादांचा आवडता छंद आहे. दादांना संगीताची चांगली जाण आहे. म्हणून त्यांनी शास्त्रीय संगीताच्या निरनिराळ्या कॅसेटस् आपल्या संग्रही ठेवल्या आहेत. फावल्या वेळात त्या ऐकत राहणे हा त्यांचा छंद आहे. दरवर्षी श्री टेंबेस्वामींच्या पुण्यतिथी दिवशी संकेश्वर येथे कर्नाटक-महाराष्ट्रातील निरनिराळ्या संगीत कलाकारांची तेथे हजेरी लागते. रात्रभर संगीतोत्सव चालतो-गाजतो.

मनात आले की श्री. अरुण जोशी यांचे तबला वादन घडवून आणायचे. श्रीमती रजनी करकरे यांच्या गायनाचा कार्यक्रम घडवून आणायचा. असेच एकदा त्यांनी रजनीताईंना प्रसिद्ध भक्तिगीते गावयास लावून त्यांच्या कॅसेटस् तयार करून घेतल्या आहेत. बेळगावचे सुप्रसिद्ध हार्मोनियम वादक श्री. राजाभाऊ विजापुरे यांचा हार्मोनियमचा कार्यक्रम घडवून आणायचा. त्याच्या कॅसेटस् तयार करून स्वतः ऐकायच्या व दुसऱ्यांना ऐकावयास लावायच्या हा त्यांचा आवडता छंद आहे.

सुप्रसिद्ध तबला-वादक तिरखवाँ व बडे गुलामअलीखाँ यांच्या सहवासातील काही क्षण व अनुभव सांगताना दादा देहभान विसरून जातात. गेल्या दशकात दादांच्या सहवासात त्यांचे अनेक अनुभव ऐकले. पण ते स्वतःसाठी व पुढील पिढीसाठी संग्रहित करू शकले नाही हे आमचे दुर्दैव ! तरीपण वेळोवेळी ऐकलेले त्यांचे काही अनुभव त्यांच्या तोंडून ऐकले ते शब्दांकित करण्याचा मी प्रयत्न करीत आहे.

**तालीम अपनी अपनी !**

सुप्रसिद्ध तब्बलजी तिरखवां हा एक अवलियाच होता. अत्यंत लहरी त्याचप्रमाणे हजरजबाबी देखील होता.

एकदा नागपुरातील बार असोसिएशनतर्फे त्यांच्या तबला वादनाचा जाहीर कार्यक्रम ठेवण्यात आला. खाँसाहेबानी सोलो अप्रतिम वाजवून उपस्थितांची वाहवा मिळविली. कार्यक्रम संपल्यावर बारच्या सेक्रेटरीने त्यांना बिदागीचे पाकीट दिले व पावती पुढे करून सहीसाठी पेन पुढे केला. तेव्हा तिरखवाँ यांनी डाव्या हाताचा अंगठा पुढे केला. सेक्रेटरीला फारच आश्चर्य वाटले. त्याने खाँसाहेबाना म्हटले, " खाँसाहेब आपण एवढे मोठे कलाकार सर्वत्र तुमचा बोलबाला. परंतु आपण अंगठे बहाद्दर ?" त्यावर तिरखवां म्हणाले, " देखो भाई, नागपूर मे कितने वकील हैं ?"

" होंगे पाँचसो."

" बंबईमें ?"

" करीबन पाँच हजार."

" कलकत्तामें ?"

" वहाँभी करीबन पाँच हजार होंगे."

" याने कि सारे देशमें करीबन एक लाख वकील होंगे ?"

" जी हां."

" अब मुझे बताओ कि पूरे मुल्कमें तिरखवां कितने है ?"

" आप एकही. "

" तो देखो भाई, तुम्हारे बाप-दादाओंने तुम्हे ऐसी शिक्षा दी कि जिसकी वजहसे देशमें लाखों वकील पैंदा हो गए । हमारे बाप-दादाओंने हमें ऐसी तालीम दी कि हम अकेले तब्बलजी पैदा हुए । यह तालीम तालीम का फर्क हैं !"

त्या सेक्रेटरीच्या नजरेला नजर देऊन विचारले,

" क्या आई बात समझमें ?

बिचारे सेक्रेटरी शरमिंदा झाले व त्यांनी पाकीट देऊन अंगठा घेतला.

## तुम दस्तखत कर दो !

बडे गुलाम अलीखाँ म्हणजे एक अत्यंत लहरी मनुष्य ! १९५७ साली बेळगावात त्यांच्या गायनाचा कार्यक्रम ठेवण्यात आला होता. अर्थातच त्याचे संयोजक होते गांधर्व महाविद्यालय !

कार्यक्रम सुरू व्हायचा होता. खाँसाहेब गुणगुणत पडले होते. इतक्यात पलीकडच्या बाजूस त्यांना गोंगाट ऐकू आला. ते खूपच चिडले. ते ओरडून म्हणाले, " कौन है उधर ? क्या चल रहा है ?" त्यावर श्री. विजापुरे म्हणाले, " जनाब, कॉलेजके लडके-लडकियाँ हैं । आपकी सही चाहते हैं ।"

" सही ?" मराठी सहीचा अर्थ त्यांना कळाला नाही. " सिग्नेचर चाहते हैं ।" विजापुरेना हिंदी शब्द सुचेना शेवटी कोणीतरी त्यांना दस्तखत हा शब्द सुचविला. तेव्हा विजापुरे म्हणाले, " खाँसाहब, ये लडके-लडकियाँ आपका दस्तखत चाहते हैं ।''

" दस्तखत चाहते हैं ? तो उसमें कौनसी बडी बात है ? मेरी तरफसे तुम दस्तखत कर दो ।"

## लहरी कलाकार

ही १९४६-४७ सालाची गोष्ट आहे. सुप्रसिद्ध गायक बडे गुलामअलीखां यांच्या गायनाचा कार्यक्रम बेळगाव आर्ट सर्कलमध्ये आयोजित करण्यात आला होता. साथीला होते सुप्रसिद्ध तबला-वादक तिरखवाँ. उस्ताद बाळूभाई रुकडीकर कार्यक्रमाच्या संयोजकापैकी एक होते.

कार्यक्रमाच्या सुरवातीस तिरखवाँ यांचे तबला वादन सुरू झाले. अप्रतिम वादन त्यांनी केले. मध्ये-मध्येच ते बडे गुलाम अलीखाँ यांना विचारीत, " कैसा चल रहा है ?" बडे गुलाम अलीखाँ साहेबांनी देखील " बहुत खूब ! " म्हणून दोन-तीन वेळा त्यांनी तारीफ केली. शेवटी ते तिरखवाँसाहेबांना म्हणाले, " खुदाने तबलेके लिएही आपको बनाया है !"

तिरखवाँ यांच्या तबला-वादनानंतर बडे गुलाम अलीखाँ यांचे गायन सुरू झाले. परंतु काही केल्या सूर आणि ताल यांचा मेळ जमेना. त्यामुळे बडे गुलाम अलीखाँ चिडले. त्याबरोबर तिरखवादेखील तावातावाने काहीतरी बडबडत उठून निघून गेले, झाले. कार्यक्रमाचा विचका झाला. गावी जाण्यासाठी दोघेही मध्यरात्री रेल्वे स्टेशनवर आले. बडे गुलाम अलीखाँसाहेबांना लहर आली व ते गुणगुणू लागले. त्यावेळी तिरखवाँ यांनी देखील नकळत तबल्याची साथ सुरू केली. सूर आणि ताल जुळले. दोघेही ' सुध-बुध ' विसरून स्वतःला संगीतात हरवून बसले. त्या मध्यरात्रीच्या वेळीही रेल्वे प्लॅट फॉर्मावर तुफान गर्दी झाली. त्या स्वर्गीय संगीतात श्रोते अक्षरशः न्हाऊन निघाले. त्या अवचित

आलेल्या स्वर-गंगेच्या प्रवाहात सर्वांनी स्वतःला झोकून दिले. त्यांचे देहभान हरपले.

**ये मालिक तेरे बन्दे हम !**

पूर्वी तिरखवाँ हे बाल गंधर्व नाटक कंपनीमध्ये तब्बलजी म्हणून नोकरीस होते. बालगंधर्वांचा सूर आणि तिरखवाँ यांच्या तबल्याचा ताल यांचा सुरेख संगम घडला असे स्वर्गीय सूर व नाद माधुर्ययुक्त ताल यांच्या जोरावर बालगंधर्वांना वारंवार वन्समोअर मिळत असे.

पुढे गंधर्व कंपनी मोडली व गंधर्वांना फार वाईट दिवस आले. तो काळ १९३५ नंतरचा होता. कोल्हापुरात बनारसच्या प्रसिद्ध गायिका सिद्धेश्वरीय व बालगंधर्व यांच्या गायनाचा कार्यक्रम होता. साथीला होते तिरखावाँसाहेब. सुरुवातीस बनारसच्या गायिकेचे गायन सुरू झाले. तिरखावाँनी तबला-वादन सुरू केले. पण बाईंचे गायन व तबला ताल जमेना. तिरखवाँच्या तबल्याच्या साथीची बरोबरी त्या बाईंचे सूर करू शकत नव्हते. त्यामुळे त्या बाई रडकुंडीस येऊन त्यांनी आपले गायन मध्येच सोडले. नंतर बालगंधर्वांचे गायन सुरू झाले. गंधर्वांचे गायन व तिरखवाँचा तबला यांचा सुरेख मेळ जमला. सूर व ताल एकरूप झाले. सारे श्रोते अक्षरशः नादब्रह्मात न्हाऊन निघाले.

कार्यक्रम पार पडला. संयोजक तिरखवाँना बिदागी देऊ लागले. तेव्हा तिरखवाँ म्हणाले “ कैसी बिदागी ? मालिक क्या कहेंगे ? मैंने तो उनके लिए तबला बजाया था ।”

गंधर्व कंपनी मोडली होती. बालगंधर्व कफल्लक झाले होते. तरीदेखील तिरख-वांसाहेबांची स्वामीभक्ती तिळमात्रही कमी झाली नव्हती !

**अध्यात्माला मांसाहार वर्ज्य आहे का ?**

रविवार दि. ३० डिसेंबर १९९० रोजी मी व कोल्हापूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे जनरल सेक्रेटरी माझे स्नेही श्री. डी. जी. पाटील परमपूज्य दादांना भेटावयास गेलो होतो. श्री. डी. जी. पाटील व दादांची ती पहिलीच भेट होती. चर्चेच्या ओघात गुरु चरित्रासारखे काही धार्मिक ग्रंथ वाचीत असताना काही पथ्ये कटाक्षाने पाळावी लागतात; असे दादांनी सांगितले. “ अध्यात्मवादी लोकांना मांसाहार वर्ज्य आहे का ?” असे श्री. डी. जी. पाटीलांनी विचारले. त्यावेळी दादांनी दिलेले उत्तर अत्यंत मार्मिक आहे. ते म्हणाले, “एखाद्या साधनेचा अनुकूल परिणाम हवा असेल तर काही पथ्ये पाळावीच लागतात. त्याचबरोबर एखादा साधक मुळातच मांसाहारी असेल व त्याची श्रद्धा आणि भक्ती निस्सीम असेल, तर त्या ठिकाणी त्याच्या आहारापेक्षा भावनेला प्राधान्य दिले पाहिजे. कर्नाटकामध्ये बेडर कण्णपा नावाचा एक शिवभक्त होता. तो पूर्णपणे मांसाहारी होता. दररोज शंकराच्या पिंडीला तो मांसाचा नैवेद्य दाखवून नंतरच भोजन करीत असे. त्याची भक्ती उत्कट होती. म्हणूनच त्याने भगवान शंकराला प्रसन्न करून घेतले.”

दुसरी एक गोष्ट आपण लक्षात ठेवली पाहिजे की, आज जगामध्ये ५५ टक्के लोक मांसाहारी आहेत व ४५ टक्के लोक शाकाहारी आहेत. जगात मांसाहारी लोक आहेत म्हणून आहाराचे संतुलन राहिले आहे. जर सर्वच लोक शाकाहारी असते तर जगापुढे फार मोठी अन्न समस्या उभी राहिली असती. आज जे लोकांना पोटभर खावयास मिळते त्याऐवजी त्यांना अर्धपोटी रहावे लागले असते. काही लोकांवर उपासमारीची पाळी आली असती.

त्याचप्रमाणे बर्फाळ प्रदेशात काहीच मिळत नाही तेव्हा एस्किमोसारखे बर्फाळ प्रदेशात राहणारे लोक तेथील प्राण्यांना मारूनच आपले पोट भरीत असतात.

' जीवो जीवस्य जीवनम् ' थंड प्रदेशातील लोकांना आपल्या शरीरात उष्णतेच संतुलन राखण्यासाठी मांसाहार घ्यावाच लागतो.

अशारीतीने दादांनी अत्यंत मार्मिक शब्दात अध्यात्म व मांसाहार यांचा संबंध स्पष्ट केला आहे.

दादांचे व्यक्तिमत्व हे अष्टपैलू आहे. विद्यार्थी दशेत ते एक हुशार विद्यार्थी म्हणून ओळखले जात. पुढे शिकण्याची त्यांची खूप इच्छा होती. परंतु भावांमध्ये ते सर्वात ज्येष्ठ असल्यामुळे घरची सारी जबाबदारी त्यांच्यावर पडली. शिक्षण सोडून ते व्यापारात पडले. त्यांनी कापसाचा व्यापार केला. प्रसंगी दुसऱ्यांच्या पेढीवर नोकरी केली. पुढे संकेश्वर येथे हायस्कूल सुरू केले. ते स्वतः शिक्षक बनले. बेळगावचे सुप्रसिद्ध डॉ. गो. शां. कोवाडकर कोल्हापूरचे श्री. भालजी पेंढारकर, शिक्षण महर्षी प्राचार्य एम्. आर्. देसाई वगैरे निरनिराळ्या क्षेत्रातील नामवंत व्यक्तींशी त्यांचा संबंध आला. प्रतिकूल परिस्थितीतही त्यांनी आपल्या भावांना सांभाळले. वडीलकीच्या नात्याने त्यांनी त्यांच्या मुलां-मुलींची लग्ने लावून दिली. संकेश्वरच्या आपल्या कुटुंबांचे ' दादा ' हे आज त्यांच्या सहवासात येणाऱ्या सर्वांचे ' दादा ' बनले आहेत. प्रत्येकाला त्यांचा सहवास व मार्गदर्शन हवे-हवेसे वाटते. डॉक्टर, वकील, शिक्षक, व्यापारी, नोकर, विद्यार्थी, राजकारणी वगैरे प्रत्येक क्षेत्रातील व्यक्तीला आज दादांचा सहवास हवा आहे. त्यांचा आशीर्वाद हवा आहे. ते प्रत्येकाला गुरुस्थानी आहेत. पण ते स्वतःला गुरु समजत नाहीत. काहीही न करता ते प्रत्येकाचे फ्रेंड, फिलॉसॉफर व गाईड आहेत. कुणालाही जाणवू न देता ते आपली भूमिका बजावीत आहेत.

व्यंकटेश्वर अपार्टमेंटमधील दादांचा फ्लॅट हा नेहमी गजबजलेला असतो. तो कोल्हापूरचे सांस्कृतिक केंद्र बनला आहे. दादांचे कर्तबगार चिरंजीव श्री. अनिल नाईक हे स्वतः एम्. एस्. सी. असून एका फॅक्टरीचे एक कर्तबगार डायरेक्टर आहेत. त्यांच्या पत्नी सौ. अनिता या अतिशय प्रेमळ असून दादांकडे येणाऱ्यांना तीर्थरूपाने चहा पाजीत असतात. दादांना भेटावयास येणाऱ्या प्रत्येकाचे हसतमुखाने स्वागत करीत असतात. एवढा मोठा व्याप सांभाळीत असताना त्यांच्या कपाळावर आठ्या अशा कधी दिसतच

नाहीत ! चि. अवधूत व चि. आनंदमयी यांच्या किलबिलाटामुळे घर भरल्या गोकुळा-सारखे वाटते !

आज दादांचे वय ऐंशी वर्षे आहे. या वयातही आपल्या व्यथा बाजूस ठेवून हसतमुखाने समाजाला मार्गदर्शन करणारे दादा हे ' व्यक्ती ' नसून एक महान ' शक्ती ' आहेत. त्यांच्या घरी येणारा प्रत्येकजण हा जात, धर्म, पंथ यांच्या वहाणा बाहेर ठेवून घरात प्रवेश करीत असतो. परमपूज्य दादाही निष्कामवृत्तीने प्रत्येकाला मार्गदर्शन करीत असतात. लौकिक अर्थाने काही देणे नांही व घेणेही नाही. परंतु दादांच्या घरी रिकाम्या येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला जाताना आपण कोणता तरी अलौकिक खजिना घेऊन जात असल्याचा आनंद होतो. जड अंतःकरणाने येणारी प्रत्येक व्यक्ती समृद्ध मनाने बाहेर पडते. हीच खरी दादांची जादुगरी आहे. संत कबीरांच्या शब्दांत सांगायचे म्हणजे

" साधू ऐसा चाहिए, ज्यों गंधीका बास ।
जो कुछ गंधी दे नहिं, देई बास-सुबास ॥"

---

## श्री गुरूः शरणम्

*पं. माधव गणेश जोशी, निपाणी.*

---

श्री. डी. एस्. नाईक उर्फ दादा नाईक यांचा व माझा परिचय ४८ वर्षापूर्वीचा आहे. त्याचे तात्कालिक कारण म्हणजे शिक्षण सेवा मंडळाची स्थापना.

जेव्हा मी संस्कृत शिक्षण संपवून घरी निपाणीस परत आलो तेव्हा इथून पुढे कोणते कार्य करावे ? समाजसेवा करता आली तर ती कशाप्रकारे करावी ? कोठे राहावे ? वगैरे असंख्य प्रश्नचिन्हे माझ्यासमोर उभी होती. त्यावेळी श्री. व्ही. आर. कणगलेकर, श्री. डी. व्ही. जोशी, श्री. आर. डी. कुलकर्णी इत्यादी माझ्या मित्रमंडळींनी एक शिक्षणसंस्था काढावी व तिच्यामध्ये मी संस्कृत शिकविण्याचे काम करावे हा विचार त्यावेळी निश्चित ठरला व म्हणून शिक्षण सेवा मंडळाची स्थापना १९४३ मध्ये झाली. शिक्षणसंस्था लोकोपयोगी आहे. संस्थेचा उद्देश अत्यंत पवित्र आहे. हे सर्व ठीक आहे. परंतु आर्थिक स्थैर्य असल्याशिवाय संस्था कशी सुस्थिर होईल ?

अशी एक संस्कृतमध्ये म्हण आहे की, सर्व गोष्टींच्या सुरवातीला प्रथम तांदळाची आवश्यकता असतेच. त्याशिवाय कोणतेही कार्य शेवटास जात नाहीच. तेव्हा आता या कार्याचा प्रारंभ कसा करावा म्हणून आम्ही चौघेही सचिंत झालो होतो. कारण आमच्यापैकी कोणीच तसा श्रीमंत नव्हता. त्यावेळी श्री. दादा नाईक यांनी योग्य मार्गदर्शन केले.

प्रत्येकाने एक एक हजार रुपये द्यावेत. व संस्थेची सुरूवात करावी. संस्थेचे ध्येय वाक्य कसे असावे ? संस्थाचालकांनी कोणकोणती पथ्ये कटाक्षाने पाळली पाहिजेत ? जनतेचा संपर्क कोणकोणत्या उपायांनी साधला पाहिजे ? शिक्षणाधिकाऱ्यांशी संबंध कसे ठेवावेत ? संस्था चिरस्थायी व लोकप्रिय कशी होईल ? इत्यादी अनेक समस्या कशा पार पाडाव्यात या विषयी श्री. दादा नाईक यांनी अत्यंत उपयुक्त असेच मार्गदर्शन केले, संस्थेचे संपूर्णपणे हितच होईल. कोणत्याही प्रकारे संस्थेचा विघात होणार नाही. कारण आमचेमध्ये बरेच मतभेद होते. परंतु ते सर्व त्या त्या वेळेच्या परिस्थितीला अनुरूप असे मिटविण्यात आले. त्याचे एक उदाहरण म्हणून असे सांगता येईल की,

१) प्रत्येक संस्था चालकाने निरपेक्ष बुद्धीने विनामूल्य काम केले पाहिजे व जेव्हा आर्थिक स्थैर्य निर्माण होईल तेव्हा अल्प असे वेतन घ्यावे.

२) संस्थेचे ध्येयवाक्य "गुणा: पूजास्थानम्" असे असावे. जर गुणवत्ता असेल तरच संस्था सुस्थिर व लोकप्रिय होईल. केवळ अर्थ सहाय्याने केव्हाही संस्था लोकप्रिय होत नसते. गुणवत्ता हा त्यातील पहिला निकष आहे. म्हणूनच "गुणा: पूजास्थानम्" असे ध्येयवाक्य निश्चित करण्यात आले.

"जर मनुष्याच्या अंगी सद्‌गुण असतील तर ते आपोआपच प्रगट होतील. कस्तुरीचा सुगन्ध हा शपथ घालून सुद्धा झाकून ठेवता येणार नाही.

यदि सन्ति गुणाःपुंसां विकसन्त्येव ते स्वयम् ।
न हि कस्तूरिकामोदः शपथेन विभाव्यते ॥१ ॥

शिक्षण- सेवा - मंडळ हे संस्थेचे नाव असावे.

त्याच्या तीन शाखा - १. शिशु विहार, २. कुमार मन्दिर, ३. विद्या मन्दिर

**श्री. दादा नाईक कुशल संयोजक**

त्यांची बुद्धी अत्यंत सूक्ष्म असून सर्व विषयस्पर्शी अशी आहे. अत्यंत मोठे व अवघड कार्यसुद्धा योग्य मार्गदर्शनाने सुलभ करणे शक्य होते.

जेव्हा शिक्षण सेवा मंडळाचे घटनाकार्य पूर्ण झाले तेव्हा विद्यामंदिर या माध्यमिक शाळेला शिक्षणाधिकाऱ्यांनी पहिली दोन वर्षे शासकीय मान्यता दिली नाही. त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांचे एक वर्ष फुकट जाण्याची पाळी आली. या विद्यार्थ्यांना दुसऱ्या कोणत्याही शाळांत प्रवेश मिळेना. तेव्हा अशा अत्यंत कठिण प्रसंगी श्री. दादा नाईक यांनी धीरोदात्तपणे भिऊ नका. काही काळ वाट पहावी लागेल. ईश्वर कृपेने सर्व व्यवस्थित होईल असे सांगून शिक्षणाधिकाऱ्यांनी परवानगी का दिली नाही ? त्यांच्या अपेक्षा काय आहेत वगैरे सर्व चौकशी पूर्णपणे करुन पुढील वर्षी मान्यता मिळवून दिली. अकोळच्या शाळेची घटना वगैरे तयार करवून स्थानिक मंडळींच्या साहाय्याने ती शाळा स्थापन करवून तिला

श्री. डी. एन. जोशी हे एक मुख्याध्यापक म्हणून विद्यामंदिर मधून तिकडे पाठवण्यात आले.

एक संस्कृत सुभाषितात असे सांगितले आहे की,

"अमन्त्रमक्षरं नास्ति नास्तिमूलमनौषधम् ।

अयोग्यः पुरुषो नास्ति योजकस्तत्र दुर्लभः ॥१ ॥

मंत्रसामर्थ्य नसलेले असे एकही अक्षर नाही. प्रत्येक अक्षराची काही तरी शक्ती आहेच. ज्या वनस्पतीच्या मुळाचा काहीही उपयोग नाही. अशी एकही वनस्पती नाही तिचा काहीतरी उपयोग आहेच. तसेच ज्याचा काहीही उपयोग नाही असा एकही मनुष्य नाही. परंतु त्याची योग्य योजना करणारा मनुष्यच दुर्मिळ असतो. तेंव्हा योजना चातुर्य हा एक श्री. दादांचा विशेष गुण आहे.

श्री. दादा हे रत्नाकर आहेत.

रत्नाकर याचा अर्थ रत्नांची खाण, अथांग समुद्र आहेत. समुद्रातून सर्व रत्ने मिळू शकतात; म्हणून त्याला रत्नाकर असे नाव आहे हे सार्थ आहे. तसेच श्री. दादा हे बहुगुणी आहेत. संगीतशास्त्र हा एक त्यांच्या अत्यंत आवडीचा विषय आहे. त्यामुळे त्यांचे बहुविध संगीतकार, व वाद्यकलाकौशल्याने भरलेले गुणी लोक यांचा त्यांचा फार मोठा परिचय आहे.

## संगीत रजनी

मनुष्य जीवनात संगीतशास्त्राला एक मोठे स्थान दिलेले आहे. एका सुभाषितात असे म्हटले आहे की,

"कलारत्नं गीतं, श्रवणपुटरत्नं हरिकथा ।

सभारत्नं विद्वान गगनतलरत्नं दिनमणिः ॥

महीरत्नं श्रीमान् किलसदनरत्नं शिशुवरः ।

वीरः जयति रघुनाथो नृपवरः ।

संगीतशास्त्र हे एक सर्व कलांमधील श्रेष्ठ रत्न आहे. ईश्वरकथांचे श्रवण घडणे हे कानांना रत्नाप्रमाणे श्रेष्ठ असे मानले आहे. विद्वान मनुष्य हे सभेमध्ये सर्वश्रेष्ठ मानले आहे. सूर्य हा आकाशातील रत्न म्हणून त्याची गणना केलेली आहे. श्रीमंत मनुष्य हे एक पृथ्वीवरील रत्न म्हणून समजले आहे. घरांमध्ये लहानमूल असणे हे एक गृहाचे सर्वश्रेष्ठ भूषण मानलेले आहे.

मोठमोठे कलाकार ' संगीत रजनी ' या नांवाने ओळखल्या जाणाऱ्या रात्रीची म्हणजे 'सर्वश्रेष्ठ संन्याशी टेंबे स्वामी' यांच्या पुण्यतिथीचा दिवस तिची मोठ्या आतुरतेने वाट पहात असतात व रात्री संकेश्वरला श्री. दादांकडे येऊन आपली विनामूल्य संगीत सेवा

समर्पण करून आपणास कृतार्थ समजत असतात. हा एक अपूर्व असा सर्वश्रेष्ठ योग असे त्यांना वाटते. ज्योतिषशास्त्र हा एक श्री. दादांच्या अत्यंत आवडीचा विषय आहे. त्यांची सूक्ष्मबुद्धी पारदर्शी असून ती पुढे येणाऱ्या अनर्थपरंपरेला निवारण करणारी मार्गदर्शक ठरते. शास्त्राचा काय उपयोग असे पुष्कळ लोकांना वाटत असते व त्यात प्रतिकूल घडले म्हणजे शास्त्र चुकीचे आहे असे म्हणून त्यांचा निश्चय ढळतो. परंतु शास्त्राचे मनुष्य जीवनात काय स्थान व महत्त्व आहे हे एका श्लोकांत सांगितले आहे ते असे -

'अनेक संशयोच्छेदी परोक्षार्थस्य दर्शकम् ।
सर्वस्यलोचनं शास्त्रं यस्य नास्त्यन्ध एव सः ॥१ ॥

शास्त्र हे अनेक प्रकारच्या संशयांचा उच्छेद करणारे असून, जे डोळ्यांना दिसू शकत नाही ते दाखविण्याचे काम शास्त्र करीत असते. म्हणून अशा शास्त्रांना ते एक सर्वांचा डोळा असल्यासारखे आहे असे म्हटले आहे. व असे शास्त्र ज्याला समजत नाही. तो डोळे असूनही आंधळाच होय असे म्हटलेले आहे.

## माझे गुरु धोंडोपंत

*ना.ज. जोशी*

ती. गुरु धोंडोपंत (श्री. धोंडो श्रीपाद तथा दादा नाईक) यांना मी अगदी लहानपणापासून म्हणजे गेली साठ वर्षे ओळखतो. त्यांना आमच्या घरी आम्ही सर्वजण धोंडोपंत म्हणूनच संबोधतो. संकेश्वर (जि. बेळगांव कर्नाटक) इथे माझे वडील ती. कै. बापू यांनी १९२२ साली खाजगी दवाखाना चालू केला. त्यांचे (धोंडोपंताचे) घर व आमचे घर अेक फर्लांगाचे आत आहे. धोंडोपंताचे वडील (कै. श्रीपादराव तथा आण्णा) यांचा संकेश्वर येथे अडतीचा व्यापार होता. कै. बापूंचा व त्यांचा खूप स्नेह होता. बापू रोज रात्री जेवण झाल्यावर त्यांचेकडे गप्पा मारण्यास जात. त्यावेळी धोंडोपंत शिक्षणासाठी कोल्हापूर येथे होते. मित्राचा मुलगा म्हणून ते त्यांना धोंडू असे एकेरी संबोधित. पुढे शिक्षण (B.A.Hons.) झाल्यावर व मिरजेला एका व्यापारी पेढीत व्यापाराचा अनुभव घेण्यासाठी काही काळ नोकरी केल्यावर, धोंडोपंत संकेश्वरला येऊन आपल्या वडिलांना व्यापारात मदत करू लागले.

पण त्यांचा पिंड व्यापाऱ्याचा नव्हता. कुशाग्र बुद्धी, असाधारण स्मरणशक्ती, इंग्रजी व मराठी वाङ्मयाची नितांत आवड व अफाट वाचन, शास्त्रीय संगीताची उत्तम जाण, ज्योतिषशास्त्राचे सखोल ज्ञान इत्यादी विविध गुणांनी युक्त असलेले त्यांचे अष्टपैलू मन व्यापारात गुंतणे व संकेश्वरातील व्यापाऱ्यात मिसळणे शक्यच नव्हते. त्यावेळी त्यांचा

बापूंच्याशी खरा स्नेह जमला. कारण बापूंनाही संगीताची व वाचनाची आवड होती. वस्तुत: बापू त्यांच्या वडिलांचे स्नेही, त्यांचेहून सुमारे सोळा वर्षांनि मोठे, पण खऱ्या स्नेहाला वय आड येत नाही हेच खरे. दोघांनाही मित्र जोडण्याची कला साध्य होती. त्यामुळे बापूंच्या मित्रमंडळीत वयाने लहान असूनही, धोंडोपंत अगदी सहज समरस होऊन गेले. ह्याच मैत्रीमुळे धोंडोपंत आमच्या घरच्यापैकी एक होऊन गेले. त्यासर्व मित्रमंडळींची बैठक बापूंच्या दवाखान्यात व त्यानंतर आमच्या घराच्या प्रशस्त माडीवर भरत असे. पुढे पुढे धोंडोपंताचा बहुतेक वेळ आमच्या येथेच जाई. सकाळी आंघोळीला व दोन वेळा जेवणासाठी फक्त ते आपल्या घरी जात.

संकेश्वरला इंग्रजी चवथीपर्यंतच शाळा होती. मी चौथीत गेलो त्यावर्षी धोंडोपंतांनी मला सरकारी शिष्यवृत्तीच्या परीक्षेस बसविण्याचे ठरविले, माझे बरोबर अल्लण नावाचा आमच्या शाळेतील एक हुषार मुलगाही त्यांनी त्यासाठी निवडला. आम्हाला शिकविण्यासाठी त्यांना स्वत:ला खूप तयारी करावी लागत असे. पण त्यामुळे परीक्षेत मी जिल्ह्यात दुसरा, तर अल्लण पाचवा आला. त्यावेळी म्हणजे १९४० साली जातिवार शिष्यवृत्त्या असत. ब्राम्हणांसाठी एकच शिष्यवृत्ती होती. पहिल्या क्रमांकाचा विद्यार्थीही ब्राम्हण असल्यामुळे मला शिष्यवृत्ती मिळाली नाही. तथापि अल्लण मुसलमान होता व मुसलमान विद्यार्थ्यात पहिला असल्यामुळे त्याला शिष्यवृत्ती मिळाली. आम्हाला परीक्षेसाठी तयार करण्याच्या प्रसंगाने त्यांच्यात आत्तापर्यंत सुप्त असलेले उत्तम शिक्षकाचे गुण प्रकट झाले. त्यांनाही शिक्षण या विषयात गोडी वाटू लागली. एव्हाना त्यांनी व्यापारातून आपले अंग पूर्णत: काढून घेतले होते व नंतर त्यांनी आमच्या शाळेच्या मुख्याध्यापकाची धुराच सांभाळली. त्यांच्या व बापूंच्या खटपटीमुळे आमच्या शाळेचे हळूहळू मॅट्रिकपर्यंत शिक्षण असलेल्या हायस्कूलमध्ये रुपांतर झाले. मी ज्यावेळी ५ वीत गेलो त्यावेळी ५वीचा वर्ग सुरू झाला. मी सहावीत गेलो त्यावर्षी सहावीचा व पुढील वर्षी मॅट्रिकचाही वर्ग उघडला. ४२-४३ साली मॅट्रिकची पहिली तुकडी शाळेत तयार झाली.

धोंडोपंताची आमच्या शाळेच्या मुख्याध्यापकत्वाची कारकीर्द गाजली व त्यांनी शाळेत गु. बापूसाहेब कुलकर्णी दुंडगेकर, यांच्यासारख्या उत्तम, चारित्र्यसंपन्न आणि ध्येयवादी शिक्षकांची भरती केली. आम्हा विद्यार्थ्यांना वर्गात न भिता प्रश्न विचारण्यास प्रोत्साहन दिले. आमच्यात सभाधीटपणा यावा म्हणून त्यांनी वर्गावर्गातून आठवड्यातून एकदा वादविवादाच्या स्पर्धा ठेवल्या. आमच्या शाळेचे ग्रंथालय फार मोठे नव्हते. पण त्यात निवडक पुस्तकांची भर घालून त्यांनी आम्हाला अभ्यासाव्यतिरिक्त इतर वाचन करण्यास प्रोत्साहन दिले. मला आठवते की एकदा मूस ह्या नावाचे पारशी गृहस्थ

त्यावेळच्या मुंबई इलाक्याचे मुख्य शिक्षणाधिकारी D.P.I. होते. त्यांनी आमच्या शाळेला भेट दिली असता त्यातील ग्रंथालयातील पुस्तकांची चोखंदळ निवड पाहून फार समाधान व्यक्त केले होते. धोंडोपंतानी शाळेच्या वार्षिक गणेशोत्सवात चांगल्या चांगल्या वक्त्यांची भाषणे ठेवण्याची प्रथा चालू केली.

धोंडोपंताना रात्री जागावयाची सवय होती. रात्री मित्रमंडळींशी गप्पा व नंतर वाचन असा त्यांचा कार्यक्रम असे. त्यामुळे ते सकाळी उशीर उठत. संकेश्वरला शुक्रवारचा बाजाराचा दिवस म्हणून सकाळची शाळा असे व एकदा त्यांच्या इंग्रजीच्या तासाची वेळ झाली तरी ते शाळेत आले नव्हते कारण त्यांना उठण्यास उशीर झाला होता. तेव्हा त्यांनी शाळेत निरोप पाठवून वर्गालाच घरी बोलावून घेतले. ते त्यांच्या अंथरूणावर पडले होते. नुकताच त्यांचा चहा झाला असावा. आम्ही विद्यार्थी (आमच्या वर्गात जेमतेम १०-१५ विद्यार्थी होते.) त्यांच्या अंथरुणाभोवती बसलो. त्यानंतर त्यांनी इंग्रजी भाषेचे बालकवी वर्डस्वर्थ यांची "डॅफोडिल्स" ही गाजलेली कविता शिकवण्यास सुरूवात केली. त्यात ते इतके रंगून गेले व आम्हीही इतके तल्लीन झालो की पुढचा तास संपून गेला तरी इंग्रजीचा तास चालूच होता. वेळेच भान कोणालाच राहिले नाही. इंग्रजी साहित्य हा धोंडोपंतांचा आवडता विषय होता. शेक्सपियरच्या नाटकातील उतारेच्या उतारे ते घडाघडा म्हणून दाखवित. मराठी साहित्या विशेषत: काव्य यांचे ते रसिक जाणकार होते. त्यामुळे त्यांनी आम्हाला ती कविता शिकविताना नुसताच शब्दांचा अर्थ सांगितला नाही तर त्या कवितेचे रसग्रहण कसे करावयाचे ते शिकविले. धोंडोपंतांनी मला व अल्लणला शिष्यवृत्तीच्या परीक्षेसाठी तयार करताना व्याकरणासारखा रुक्ष विषयही इतक्या चांगल्या तऱ्हेने शिकविला की त्यावेळी तयार झालेला माझा इंग्रजी व्याकरणाचा पाया पुढे आयुष्यभर मला व्याकरणशुद्ध इंग्रजी लिहिण्यास फार उपयोगी पडला. मॅट्रिकनंतर जरी मी विज्ञान-शाखेकडे वळलो तरी मराठी व इंग्रजी साहित्याची जी अभिरुची त्यांनी माझ्यात निर्माण केली त्यामुळे कॉलेजमध्ये असताना व नंतर नोकरीच्या दीर्घकाळातही माझी दोन्ही भाषांतली चांगली वाङ्मय वाचण्याची आवड टिकून राहिली. आणि आता निवृत्त झाल्यानंतर वाचन हा माझा दैनंदिन जीवनातील एक मोठा विरंगुळा ठरला आहे.

प्रथमपासूनच धोंडोपंतांचे माझेकडे बारीक लक्ष असे. एकदा शाळेत त्यांनी आम्हाला 'मी राजा झालो तर" ह्या विषयावर निबंध लिहावयास सांगितला. माझ्या दृष्टीने मी चांगला निबंध लिहिला होता. पण दुसरे दिवशी ते तो निबंध घेऊन घरी आले व त्यांनी माझेसमोर बापूंना सांगितले, "वसंतने (मला घरी वसंत या टोपणनावाने ओळखतात.) चांगला निबंध लिहिला आहे. पण त्याने सर्व स्वत:बद्दल लिहिले आहे. राजा झाल्यावर आई वडिलांसाठी भावंडांसाठी काय करेन याचा उल्लेखही नाही !" त्यांचा त्या टीकेमागे माझ्यात स्वत:च्या पलिकडे इतरांचाही विचार करण्याची प्रवृत्ती निर्माण व्हावी ही तळमळ

होती ! मी लांब हाताच्या शर्टच्या बाह्या दुमडत असे शर्टचे वरचे बटण उघडे टाकीत असे, अशा बारीक सारीक गोष्टीही त्यांच्या टीकेचा विषय होत त्यावरून त्यांची माझ्यावर किती सूक्ष्म नजर होती हे दिसून येते. अर्थात असल्या टीकेला मी दाद देत नसे. उलट त्यात गैर काय आहे म्हणून त्यांच्याशीच वादविवाद करीत असे. ते शाळेत माझे मुख्याध्यापक असूनही त्यांचेशी असे वादविवाद करण्यास मला कधीही भीती वाटली नाही. व त्यांनीही त्याबद्दल कधी नाराजी दाखविली नाही. उलट अशा मोकळ्या मतप्रदर्शनाला त्यांनी प्रोत्साहनच दिले.

मला कॉलेजशिक्षणासाठी संकेश्वर सोडावे लागले कारण त्यावेळी संकेश्वरला कॉलेज नव्हते. त्यामुळे मी सुटीत घरी येई त्यावेळी धोंडोपंताचा सहवास मिळे. सुट्टीत रात्रीची जेवण झाली की त्यांच्याबरोबर निरनिराळ्या विषयावर चर्चा करणे, वादविवाद करणे हा आम्हा तिघाही भावांचा आवडता छंद होता. त्यांच्याशी झालेल्या अशा चर्चातून आमची बहुश्रुतता वाढे कारण त्यांचा अनेक विषयांचा गाढा अभ्यास होता. त्यांच्याशी वादविवाद करण्यात आमच्या विधानातील तर्कदुष्टता अनेकदा स्पष्ट होई व त्यामुळे तर्कशुद्ध विचार करण्याचे नकळत व हसत खेळत शिक्षण होत असे. सुटीत बहुतेक रात्री २-३ पर्यंत आमच्या गप्पा चालत. मध्येच चहाचा कार्यक्रम होई.

मी कॉलेजला असताना त्यांच्यातील आध्यात्मिक प्रवृत्ती दृगोचर होऊ लागली. सुरुवातील त्यांना प्लँचेट मध्ये फार रस निर्माण झाला. पण लवकरच त्याच्या नादी लागण्याचा काही उपयोग नाही हे त्यांना उमजले. त्याचवेळी त्यांना काही अतींद्रिय अनुभव येऊ लागले व त्यांना श्री दत्तात्रयाचे अवतार समजण्यात येणारे व गुरुचरित्र ह्या धार्मिक ग्रंथाचे नायक श्री नृसिंहसरस्वती यांचे दर्शन होऊ लागले. त्यांचा आतला आवाज जागृत होऊन त्यांना काही आदेशही येत असत. मला आठवत की मी सुट्टीला घरी आलो की काहीवेळा ते बापूना सांगत. वसंतनं "गुरूचरित्राचा" सप्ताह करावा असा त्यांना आदेश मिळाला आहे. मला चरफड़तच त्याप्रमाणे करावे लागे. कारण मी स्वत:ला बुद्धिनिष्ठ समजत असे व माझी असल्या गोष्टीवर त्यावेळी श्रद्धा नव्हती. तथापि धोंडोपंतांचा आदेश धुडकावून लावणेही मला गैर वाटे. म्हणून त्यांच्या शब्दांचा आदर करण्यासाठी अशा-तऱ्हेने मी 'गुरुचरित्राच्या' वाचनाचा सप्ताह अनेकदा केला. अगदी नोकरीला लागून दहा वर्षे झाली असताना, डहाणूला असतानाही त्यांनी सांगितल्यावरून गुरुचरित्राचा सप्ताह केल्याचे समजते. पुढे मी मुंबईला असताना "गुरुचरित्राची" पोथी विकत घेतली व सप्ताह आपणहून केला, तसेच दिल्लीला असताना निवृत्त होण्यापूर्वीही सप्ताह केला ही गोष्ट निराळी. कारण तोपर्यंत माझे मतपरिवर्तन झाले होते. तथापि कॉलेजमध्ये असताना माझा असल्या गोष्टींवर विश्वास नव्हता हेही खरे, असो.

त्यांनी पत्रिका बघून, व काही वेळा केवळ अंत:प्रेरणेने सांगितलेले भविष्य अनेकदा अगदी अचूक ठरत असे. अशी दोन ठळक उदाहरणे मला अजूनही आठवतात.

१) १९६० साली मी त्यावेळच्या द्विभाषिक मुंबई राज्यातील गुजरात भागात ५ वर्षे काढून दोन महिन्यांच्या रजेवर संकेश्वरला आलो होतो. १ एप्रिल १९६० पासून गुजरात व महाराष्ट्र अशी दोन राज्ये होणार होती. माझी रजा मे १९६० पर्यंत असल्यामुळे ती संपेपर्यंत मला गुजरातमध्ये रहावे लागणार की माझी निवड महाराष्ट्रासाठी होणार हे अर्थातच स्पष्ट होणार होते. संकेश्वरला असताना मला सरकारी पत्र आले की तुमची निवड गुजरातसाठी करण्याचे योजिले आहे, तरी तुमची काही हरकत असल्यास त्वरित कळवावे. कोठेही गेलो तरी माझी तयारी असल्यामुळे काही हरकत घेतली नाही. त्यावेळी मी धोंडोपंताना विचारले की 'ज्योतिष शास्त्राप्रमाणे निवड कुठल्या राज्यासाठी होईल ?' त्यांनी माझी पत्रिका बघून सांगितले की सध्याचा निर्णय २९ एप्रिल नंतर बदलून तुझी निवड महाराष्ट्रासाठीच होईल व ते तुझ्या हिताचे होईल. मी त्यांनी नवीन राज्ये १ एप्रिल पासून निर्माण होणार असल्यामुळे माझी निवड त्यापूर्वीच होणार हे नक्की असल्याचे सांगितले. पण पुढे द्विभाषिक मुंबईच्या विभाजनाची तारीख एक महिन्यानी पुढे ढकलली गेली. मला २७ एप्रिलपर्यंत माझ्या निवडीबद्दल काहीच न कळल्यामुळे मी पुण्यास आमच्या खात्याच्या मुख्य अधिकाऱ्यास भेटलो. त्यांनी मला माझी निवड गुजरातसाठीच झाल्याचे व मी कुठे रुजू व्हावयाचे हे मुंबईत गुजरातच्या वनखात्याच्या भावी मुख्य अधिकाऱ्यांना विचारण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी दुसरे दिवशी मुंबईस गेलो व २९ तारखेस गुजरातच्या मुख्य अधिकाऱ्यास भेटलो ते म्हणाले की माझी बदली गुजरातमध्ये 'राजपिपला' येथे करण्यात आली असून मी तेथे त्वरित हजर रहावे. पण घरी आलो तो मला पुण्याच्या मुख्य अधिकाऱ्याकडून गुजरातला न जाण्याचा तारेने पाठविलेला आदेश मिळाला. मला काहीच कळेना म्हणून दुसरे दिवशी सचिवालयात (हल्लीचे मंत्रालय) जाऊन त्यावेळचे सचिव श्री. बेडेकर I.C.S. यांना भेटलो. त्यांनी सांगितले की गुजरातला तुम्ही हवे होतात पण कालच्याच (२९ तारखेच्या) बैठकीत पुन्हा चर्चा होऊन आम्ही तुमची निवड महाराष्ट्रासाठी करण्यात यशस्वी झालो. अशातऱ्हेने धोंडोपंतांचे भविष्य तंतोतंत खरे ठरले.

२) दुसरे ठळक उदाहरण माझ्या धाकट्या भावाचे तात्याचे आहे. तो उच्च-शिक्षणासाठी जर्मनीला जाणार होता. १९६१ च्या ऑगस्ट महिन्यात तो बोटीने मार्सेलस पर्यंत व पुढे रेल्वेने जर्मनीत हॅम्बुर्ग येथे जाणार होता. मी नांदेडहून माझा मधला भाऊ बडोद्याहून, द संकेश्वरहून आई बापू त्याला निरोप देण्यासाठी मुंबईस आलो. त्यावेळी धोंडोपंतानी सांगितले होते की माझा भाऊ (तात्या) १२ ऑक्टोबर पर्यंत जाण्याचा योग नाही . मुंबईला आम्ही सर्व जमलो पण माझ्या भावाला ठरलेल्या बोटीने जाता आले नाही कारण रिझर्व बँकेने काही कारणामुळे 'P' फॉर्म दिला नाही. तो मिळवून जाण्याची तारीख सप्टेंबरमधली ठरली. पुन्हा आम्ही सर्व मुंबईत त्याला निरोप देण्यास जमलो. पण त्या खेपेला त्याचे तिकीट ज्या ट्रॅव्हल एजंटकडे होते तो, रेल्वे वाहतूक दरड कोसळल्यामुळे

बंद पडल्यामुळे, पुण्याहून वेळेवर परंतु शकला नाही, शेवटी तीही बोट चुकून तात्या अखेर १२ ऑक्टोबर नंतरच्याच बोटीने जाऊ शकला !'

ती. दादा खऱ्या अर्थाने 'स्थितप्रज्ञ' आहेत. वडिलांच्या पश्चात ४० जण असलेले एकत्रित कुटुंब प्रमुख म्हणून त्यांच्या ह्या गुणाची अनेकदा कसोटी लागत असे. त्यातच त्यांना नेहमीच आर्थिक ओढाताणीला तोंड द्यावे लागे. पण "सुखदुःखे समेकृत्वा ....' ह्या वृत्तीने त्यांनी आपल्यावरील जबाबदारी यशस्वीपणे गेली सुमारे ४५ वर्षे पार पाडली आहे. हल्लीच्या काळात प्रत्येक व्यक्ती स्वतंत्र विचाराची असते व लग्न होऊन घरात नवीन येणाऱ्या मुलीही शिकलेल्या असल्यामुळे प्रत्येकीला स्वतःची निराळी आवड निवड असते. अशा परिस्थितीत सख्खे आणि चुलत भाऊ बहिणी त्यांच्या व भावांच्या मुलाबाळांनी गजबजलेले असे एकत्र कुटुंब चालविणे हे येरागबाळ्याचे काम नाही खऱ्या स्थितप्रज्ञालाच ते शक्य होते.

त्यांचा लोकसंग्रहही फार मोठा आहे. कुणाचेही काम असले तरी त्यासाठी स्वतःकष्ट घेऊन त्यासाठी जरूर लागल्यास कुठेही प्रवास करून ते काम करण्याची त्यांची नेहमी तयारी असे. मी अनेकदा त्यांना म्हणे (अर्थात मी नोकरीस लागून एक प्रतिष्ठित गृहस्थ झाल्यावरच) की तुम्ही घरचे खाऊन इतके शारीरिक व मानसिक कष्ट सोसून व प्रसंगी आर्थिक झळ सोसून ह्या लष्कराच्या भाकरी का भाजता ? त्यावर ते फक्त हसत. मला वाटत इतरांच भल जर आपल्या हातून होत असेल तर त्यासाठी जीव तोडून प्रयत्न करताना स्वतःला होणाऱ्या कष्टांना गौण मानण्यास तशी अंतःकरणापासून खरी तळमळ असल्याशिवाय कोणीही तयार होणार नाही.

गेली ८-१० वर्षे त्यांना स्वास्थ्य लाभले आहे. हल्ली बहुतेक दिवस ते कोल्हा-पूरला अनिलकडे (त्यांचा एकूलता एक मुलगा) असतात. वयपरत्वे आता त्यांना प्रवासाचे शारीरिक कष्ट झेपत नाहीत. फक्त अधूनमधून संकेश्वरला किंवा बेळगावला छोटीकडे (एकुलती एक मुलगी) जातात. कोल्हापूरला त्यांचेकडे सकाळपासून रात्रीपर्यंत विविध क्षेत्रातील त्यांचे चाहते व भक्त येत असतात. त्यांच्या पायावर डोके ठेवून हार फुले व पेढे ठेवणारे अनेक भक्त आहेत. त्यांचा भक्त परिवार अनेक शहरातून विखुरलेला आहे. प्रत्येक जण आपल्याअडचणी त्यांच्यापुढे मांडतो व ते त्याला योग्य तो ऐहिक उपाय व त्याबरोबर काही साधना सांगतात. त्याची प्रचीती आली की तो त्यांचा भक्त बनून जातो. एकाकडून दुसऱ्यास त्यांची माहिती कळते व अशातऱ्हेने त्यांचा भक्त परिवार वाढतोच आहे. त्यांचे समवयस्क स्नेही आता फार थोडे राहिले आहेत. पण त्यांचे चाहते व भक्त यामुळे सामान्य माणसाला वृद्धापकाळात भेडसावणारा, एकटेपणाचा शाप त्यांना बाधक होऊ शकत नाही.

मला नोकरीनिमित्त उत्तर गुजरात, मराठवाडा, मुंबई, दिल्ली अशा दूरदूरच्या ठिकाणी जावे लागल्यामुळे त्यांचा प्रत्यक्ष सहवास क्वचितच मिळत असे. तरीही

त्यांच्याशी माझा सतत पत्रव्यवहार असे. ते पत्राला त्वरित उत्तर पाठवण्यास तत्पर असतात. जीवनात कुठलीही समस्या उद्‌भवली तर धोंडोपंत योग्य तो सल्ला देतील हा दिलासा मला नेहमीच मोलाचा वाटला. आता निवृत्त होऊन पुण्यात स्थायिक झाल्यावर, मला वरचेवर कोल्हापूरला माझ्या भावाकडे जाणे शक्य होते. तो धोंडोपंतांच्या घराजवळच रहात असल्यामुळे कोल्हापूर मुक्कामी रोज सकाळ संध्याकाळ त्यांचेशी निरनिराळ्या विषयावर चर्चा करणे हा एक सुखद अनुभव असतो. एखादेवेळी मला जाण्यास उशीर झाला तर त्यांचा फोन येणारच. या वयातही त्यांची चौकस बुद्धी व असामान्य स्मरणशक्ती किंचितही क्षीण झालेली नाही. अजूनही नवीन नवीन ग्रंथ वाचण्याची आवड कमी झालेली नाही हे पाहून अचंबा वाटतो.

मला लहानपणापासून त्यांनी पाहिलेले असल्यामुळे व माझ्या मानसिक जडण-घडणीत त्यांचा महत्त्वाचा वाटा असल्यामुळे मी त्यांना माझे सर्वार्थाने गुरु मानतो. त्यामुळे त्यांच्या ८१ व्या वाढदिवसाच्या निमित्ताने होणाऱ्या सहस्त्र चंद्रदर्शन सत्कार समारंभात प्रसिद्ध होणाऱ्या गौरव ग्रंथातून माझी ही शब्दरूप आदरांजली वाहताना मला अतिशय समाधान होत आहे.

## विशाल मनाचे शिक्षक

*श्रीपती रामचंद्र पाटील*

१९५२ साली मी अकरावीत S.D. High School मध्ये शिकत होतो. मराठीच्या क्लासला दादा काही दिवस येत होते. शिकवत असताना निरनिराळे संदर्भ दादा देत असत. संस्कृत व इंग्लिश भाषेवरील त्यांचे प्रभुत्व व त्यांची सांगण्याची शैली यामुळे संपूर्ण वर्ग ऐकण्यात तल्लीन होत असे.

एकदा असे घडले. दादा सांगत होते. एक व्यक्ती आगगाडीत संडासात गेलेली असते. गाडी सुरू होते. तो माणूस घाईघाईने संडासाहून बाहेर येतो व दुसऱ्या प्रवाशांना सांगतो की मी लवकर बाहेर आलो नसतो तर गाडी गेली असती वगैरे.

सर्व मुले विनोदाने हसत होती. दादा म्हणाले,"पिकली पाने हे पुस्तक कुणी वाचले होते का ? 'मी वाचलेय' मी म्हणालो. 'ही लघुकथा आठवते का ?' दादांनी मला विचारले, 'आठवते पण ही गोष्ट "पिकली पाने या पुस्तकात नाही .' मी म्हणालो, दादा थोडे चिडले, व म्हणाले, 'हे पुस्तक कोणी लिहिले ?' अनंत काणेकर मी म्हणालो. "ही गोष्ट पुन्हा सांगतो लक्ष देऊन ऐक." दादांनी पुन्हा ही गोष्ट सांगितली. नंतर मी उभे राहून म्हणालो, 'ही गोष्ट "पिकली पाने" मध्ये नाही.'

माझ्या या उत्तराने दादा भयंकर चिडले. सर्व वर्ग शांत झाला. सर्व मुले मला म्हणू लागली,'अरे बस बस. पुरे झाले वगैरे ' दादानी पुन्हा मला विचारले, 'काय आठवते का ?' "नाही 'पिकली पाने' पुस्तकात नाही.' मी उत्तरलो. दादा भयंकर चिडले व क्लास बाहेर निघून गेले. ते सरळ लायब्ररीत. सर्व मुले माझ्या भोवती जमा झाली. "शिरप्याची खरडपट्टी निघणार." चांगले शेकणार. माफी माग वगैरे.

मी गप्प बसलो होतो. थोड्यावेळाने एक पाय ओढत कल्लाप्पा शिपाई माझ्याकडे आला व म्हणाला, "नाईक सरांनी तुला बोलवले आहे.' मी टीचर्सरूममध्ये जाऊन दादांना भेटलो. दादा म्हणाले, 'तुझेच बरोबर आहे. ही गोष्ट 'पिकली पाने' मधे नसून तरंग मध्ये आहे. दादांनी आपली चूक कबूल केली.

## दादा एक ज्ञानदीप

*आर. जी. काकडे*

काही माणसांचे व्यक्तिमत्त्वच असे असते की लोकांवर त्या व्यक्तीचा प्रभाव पडतो. दादांचे व्यक्तिमत्त्व तशा अर्थाने प्रभावी नाही. त्यांच्या व्यक्तिमत्वाचे विविध पैलू जसे उलगडत जातील तसतशी त्यांच्या सहवासात आलेली व्यक्ती त्यांच्याकडे ओढली जाते. त्यांच्या मित्रपरिवारापैकी एक बनून जाते.

माझा व दादांचा परिचय तसा जुनाच होता. मी नोकरीला असतानाची गोष्ट, नोकरीतील व्यवस्थापनाचे काही प्रश्न होते. सांसारिक समस्याही जोडीला होत्या. मार्ग-दर्शनासाठी कोणालातरी भेटण्याची आवश्यकता वाटत होती. संकेश्वरातील मोजक्याच बुद्धिवंतांमध्ये दादांचे नाव त्यावेळी घेतले जात होते. मी दादांना भेटण्याचा निश्चय केला. व त्याप्रमाणे भेटलोही. त्यानी सहानुभूतीने माझ्या साऱ्या समस्या समजावून घेतल्या आणि मला श्री वेंकटेशस्तोत्राचा पाठ करणेस सांगितले. ठीक मध्यरात्री हा पाठ करावयाचा होता आणि तोही एकवीस दिवस. मी त्याप्रमाणे पाठ केला. बाविसावा दिवस हा माझ्या दृष्टीने एका नव्या प्रचीतीचा नव्या अनुभूतीचा होता. दादांच्यात व माझ्यात जवळीक निर्माण झाली ती या प्रसंगातून. आमचे संबंध पुढे अधिकच दृढ होत गेले. मी नोकरीनिमित्त परगावी रहात होतो. तरी दादांची भेट घेण्याची ओढ मला लागायचीच. शक्य होईल तेव्हा मी त्यांना भेटायचाच. माझ्या निवृत्तीनंतर तर दादांची भेट हा नित्यक्रम बनला. दादांचे वास्तव्य आता कायमपणे कोल्हापूरला आहे. मला कोणत्यातरी कामी सल्ल्याची गरज लागली तर मी पत्र पाठवून दादांचा सल्ला घेतो.

दादा बुद्धिवंत आहेत, विचारवंत आहेत, शिक्षणज्ज्ञ म्हणूनही ते ओळखले जातात. संगीत, अध्यात्म, ज्योतिष या शास्त्रातले ते जाणकार आहेत. इंग्रजी व मराठी साहित्याचे

ते अभ्यासक आहेत. त्यांचा राजकारणाचा अभ्यासही सखोल आहे. वक्तशीरपणा हा त्यांचा उल्लेखनीय गुण होय. दादांचा लोकसंग्रह मोठा आहे. विविध क्षेत्रातील नामवंत मंडळी त्यांच्या मित्रपरिवारात आहेत. एवढे असूनही प्रसिद्धी, पैसा व सत्ता यापासून दादा अगदी अलिप्त आहेत. दादांनी आपल्या लोकसंग्रहाचा उपयोग कधीही स्वार्थासाठी केला नाही. दुसऱ्यांसाठी आपल्या ओळखीचा फायदा त्यानी करून हे आवर्जून सांगितले पाहिजे.

आपल्या बहुमुखी ज्ञानाचा उपयोग लोकाना व्हावा यासाठी ते तत्पर असतात. अडचणी, शंका, समस्या घेऊन दादांकडे जावे. विषय कोणताही असो दादा त्याचे निरसन करणारच.

दादांच्या कार्याबद्दल खूप लिहिता येण्यासारखे आहे. मी मात्र काही मर्यादा ठरविल्या आहेत. मला ज्ञात असलेल्या कार्यापैकी काही कार्याचा उल्लेख मी त्या मर्यादेत करणार आहे.

लोकानी खूप शिकावे, शहाणे व्हावे ही त्यांची तळमळ. संकेश्वरातील एस.डी. हायस्कूल ही संस्था पूर्णत्वाला नेण्यात दादांचा सिंहाचा वाटा आहे. या संस्थेचे मुख्याध्यापक म्हणूनही त्यानी काम केले. त्यांना या पदावर निवृत्ती पर्यंत राहता आले असते अथवा व्यवस्थापनात एखादे पद मिळविता आले असते परंतु "न धरी शस्त्र करी मी" या वृत्तीने ते अलिप्त राहिले. युक्तीच्या चार गोष्टी मात्र आवश्यक त्यावेळी व स्पष्टपणे सांगत राहिले. लोकांनी शिकावे ही त्यांची तळमळ मात्र अखंड होती व आहे. कुणाची फी भर, कुणाची जेवणाची व्यवस्था कर, कुणाला राहायची व्यवस्था करून दे अशा तऱ्हेने दादा लोकांच्या शिक्षणाचे प्रश्न सोडवीत राहिले. हे मला पक्के माहित आहे.

आध्यात्मिक क्षेत्रातही दादांचा व्यासंग खूप मोठा आहे. दत्तावतार श्री नृसिंहसरस्वतींचे ते भक्त आहेत. उपासनेला दृढ चालवावे. हे तत्त्व ते आचरणात आणतात. श्री नृसिंहसरस्वतींच्या आदेशानुसारच ते लोकांच्या समस्या सोडविण्यास मदत करतात. माझ्या मेहुणीला काही सांसारिक अडचणी होत्या. दादांनी तिला "अघोर कष्टोद्धारण स्तोत्र" वाचावयास सांगितले. त्याप्रमाणे केल्याने तिला प्रचिती आली. माझ्या साडूचे जामात श्री. डी.एस. चिकोर्डे (तहशीलदार) यांच्या बहिणीचे लग्न लौकर जमेना. दादांनी त्याना काही अनुष्ठाने सांगितली. त्याप्रमाणे करताच श्री. चिकोर्डे याना त्याप्रमाणे फल मिळाले.

ज्योतिष शास्त्राचा चिकित्सक अभ्यास दादांनी केला आहे. ज्योतिषाचा बाजार मात्र त्यानी कधीही मांडला नाही. विचारायला गेलेल्याला मार्गदर्शन जरुर करतील पण माझेच खरे असे आग्रही मत कधी मांडणार नाहीत.

अशा दादांची आठवण त्यांच्या मित्र परिवाराला नेहमी होतेच पण एखादा प्रसंग त्यांची आठवण तीव्रतेने करून देतो. १९३७ सालचा डिसेंबरच्या "ज्ञानमंदिर" चा अंक अलिकडेच माझ्या वाचनात आला. "ज्ञानसेवक" या नावाखाली लिहिलेला "सुशिक्षित कोण आणि आशिक्षित कोण ?" हा लेख वाचताना त्यातील एक भाग दादाना पूर्णपणे लागू पडतो. असे मला वाटले. मी दादाना तसे कळविले. त्यावर दादांचे आलेले उत्तर उल्लेखनीय आहे. दि. २४-११-१९९० च्या कोल्हापूरहून पाठविलेल्या पत्रात दादा मला म्हणतात,'आपण माझे वर्णन भलत्याच मातबर शब्दात केले आहे. त्यातील बरेचसे मला लागू पडत नाही असे माझे प्रांजल मत आहे.' त्यांच्या पत्रावरून त्यांचे सौजन्य किती आहे हे समजण्यासारखे आहे.

दादांचा पत्रव्यवहार अत्यंत नियमित असतो. साध्या साध्या पत्रांना देखील ते अत्यंत तत्परतेने व समर्पक उत्तरे पाठवितात.

दादांच्या व्यक्तिमत्वाची सर्वांगीण ओळख होणे कठीण आहे. प्रत्येक बैठकीत त्यांचा नवा पैलू दिसत राहतो. दादा व्यासपीठावर जाहीरपणे क्वचितच बोलले असतील. प्रसिद्धिपराङ्मुखता आणि आपल्या ज्ञानाचा बाजार न मांडण्याची आग्रही भूमिका त्यामागे असावी. घरगुती बैठकीत मात्र दादांची वाक्सरिता अखंड वाहत असते. विविध अनुभव, विविध प्रसंग, वाचनात आलेले उतारे यांचा उल्लेख करीत दादा बोलू लागले की ऐकणाऱ्याने मंत्रमुग्ध होऊन ऐकत रहावे. दादा अलिकडे येथे रहात नसल्याने त्यांचा सहवास सदैव लाभत नाही हे एक मोठे दुःख माझ्या सारख्या अनेकाना आहे हे निश्चित.

थोर साहित्यिक पु.ल. देशपांडे, सिनेतपस्वी भालजी पेंढारकर, शिक्षणतज्ज्ञ एम्. आर. देसाई, संगीततज्ञ - रामभाऊ विजापुरे, संगमेश्वरबुवा गुरव, केंद्रीय मंत्री, बी. शंकरानंद, अनेक वकील, तहशीलदार, हायकोर्टजज्ज व मोठमोठ्या हुद्द्यांवरील दादांच्या मित्रपरिवारात आहेत. हा परिवार वाढताच आहे. संकेश्वरात आलेली व्याख्याते मंडळी व इतर क्षेत्रातील नामवंत मंडळी दादांची भेट आवर्जून घेतात नव्या ओळखी होतात आणि दादांचा मित्र परिवार वाढतच राहतो. एक विशेष म्हणजे नव्या ओळखी झाल्या की दादा जुन्या लोकांना विसरत नाहीत. लहान थोर भेदभाव मानत नाहीत. मोठमोठ्या लोकांपुढे लहानांना तुच्छ मानत नाहीत.

---

## निराशेतील दिलासा

*डॉ. जी.एस. खांडेकर, हुक्केरी*

---

मी संकेश्वरात एस.डी. हायस्कूल मध्ये १९४२ साली प्रवेश घेतला. त्यावेळी ते तिथे मुख्याध्यापक होते. त्यांनी आम्हास शिकविण्याच्या दृष्टीने फारसा संबंध आला नाही

पण ते मराठी फार चांगले शिकवितात असे ऐकले होते. त्यांच्याबद्दल एक प्रकारचा आदर वाटत असे. मध्यंतरी त्यांनी शिक्षण क्षेत्र सोडून इतर बरेच व्याप केले.

गेल्या ८-१० वर्षात मी काही निमित्ताने त्यांचेकडे जाऊ लागलो. सहवास घडत गेला तसतशी त्यांच्याबद्दल पूज्य भावना निर्माण होऊ लागली. मी गेलो म्हणजे इतर बऱ्याच विषयावर चर्चा होत असे. तेच विशेष बोलत असत. मनाला एकप्रकारचे समाधान वाटायचे पुन्हा भेटण्याची ओढ असायची. त्यांच्याकडे बरेच लोक येत असत. आपल्या अडचणी त्यांच्यापुढे मांडत ते त्यांना योग्य सल्ला देत. हे मी प्रत्येकवेळी पहात असे. मला तशी वेळ अद्याप आलेली नव्हती. पण १९८५ साली मलाही एक प्रसंग निर्माण झाला. माझा मुलगा चि. बिपीन C.A. चा कोर्स करत होता. बरेच वेळा प्रयत्न करूनही Intermediate ची परीक्षा एक ग्रुप सुटत नव्हता. त्यामुळे पुढील प्रगतीच खुंटली होती. त्याची CA होण्याची जबर होती पण मीच मनातून निराश होत चाललो होतो पुढे काय ? हा प्रश्न भेडसावत असे. अशावेळी बिपीनच म्हणाला की आपण ती. दादांना भेटू या का ? तुमची ओळखही आहे ? मी त्याच्यासह ती. दादांना भेटलो. सर्व परिस्थिती त्यांना निवेदन केली. त्यांनी पत्रिका मांडून विचार करून आणखी एका गृहस्थाचा (श्री. गानू) सल्ला आपण घेऊ या असे सांगितले. त्यांच्या सल्ल्यानुसार श्री. गानूंना पत्र पाठविले. त्यांचे उत्तर पण आले. त्यांचा सल्ला बिपीनने C.A. चा अभ्यासक्रम सोडू नये. तो C.A. होणारच तरी प्रयत्न करावेत व त्यांनी दत्त उपासना करण्याचा सल्ला दिला. त्यांचे पत्र आल्यानंतर आम्ही ती. दादांना भेटलो. त्यांनी गुरुचरित्राचे ७ सप्ताह करायला सांगितले. उद्धोराष्ट्रक स्तोत्र चि. बिपीनने दररोज म्हणावे असा सल्ला दिला. त्यांच्या सांगण्याप्रमाणे सर्वकाही यथासांग पार पाडले. गाणगापुरास जाऊन दत्तास अभिषेक करून आलो.

नंतरच्या प्रयत्नात चि. बिपीन Inter C.A. पास झाला व पुढे १ वर्षात फायनल पण झाला. त्याने कोल्हापुरातच स्वतंत्र व्यवसाय सुरु केला आहे. मी एका मोठ्या जबाबदारीतून पार पडलो. त्याच्या चिकाटीला यश आले.

मनाच्या निराशा अवस्थेत धीर देणारी व्यक्ती मला भेटली. त्यामुळे मी त्यातून पार पडलो. त्यांचा आधार मला फार मोलाचा वाटतो.

---

## व्यासंगी व्यक्तिमत्त्व

*आप्पासाहेब भिडे, मुंबई*

---

अभिमानाने उल्लेख करावा असा दादा नाईकांचा घराण्याशी आमच्या स्नेही-पणाचा संबंध एका पिढीपेक्षाही जुना आहे. घनिष्ठ आहे.

दादासंबंधी त्यांच्या चौफेर कर्तृत्वासंबंधी लिहिण्यासारखे बरेच आहे. दादांची वाटचाल एकमार्गी कधीच नव्हती. आमचे दादा एक व्यक्ती राहिले नसून संस्थाच झाले आहेत. दादांची कामगिरी निरनिराळ्या स्वरूपात उल्लेखनीय आहे. नाईकांच्या घराण्यातील एक निष्ठावंत, कर्तृत्वसंपन्न सुपुत्र, विद्यार्थीदशेतील अध्यापकांना अनाकलनीय वाटणारा विद्यार्थी, पितृनिष्ठेमुळे शिक्षकाचा व्यवसाय प्राप्त परिस्थितीत स्वीकारणारा व्यापारातही धडाडी दाखवणारा मग तो कापसाचा व तंबाखूचा असो कुशल कारभारी, सल्लागार, मग राजकीय मंडळींचा किंवा व्यापारी वा कारखानदार मंडळींचा अशा अनेक व्यवसायात आपल्या बुद्धिमत्तेचा ठसा उमटलेला दिसेल. इतके सर्व त्यांनी केलेच व तेथे न थांबता इतर आवडीचे छंदही जोपासले. साहित्य, संगीत, ज्योतिष इ. महत्त्वाचे आहेत. असा एकही प्रांत नाही की तेथे दादांची गती नाही. त्यांचे जीवन, किंबहुना व्यवसायगती रेल्वेगाडी जशी रुळ बदलत पुन्हा वेगाने धावते तशी आहे. वरील एकेका पैलूवर लिहावयाचे म्हटले तर तो एक प्रदीर्घ लेख होईल.

मला दादा जवळून माहित झाले ते संकेश्वर येथील त्यावेळी चौथीपर्यंत असलेल्या इंग्लिश शाळेचे कुशल संघटक, व्यासंगी शिक्षक विद्यार्थ्यांच्या आवडी-निवडी ओळखून मार्गदर्शन करणारे संयोजक विद्यार्थ्यांना शालेय अभ्यासाव्यतिरिक्त इतर ज्ञानभांडाराची तसेच आधुनिक खेळाची माहिती करून देणारे. तत्पूर्वी आमच्या वडिलांचे स्नेही कै. श्रीपादआण्णा नाईक यांचे ज्येष्ठपुत्र, राजाराम कॉलेज कोल्हापूर येथे शिकत असलेला हुशार विद्यार्थी इतकीच माहिती होती. शाळा कॉलेजमध्ये असताना एक बुद्धिमान विद्यार्थी म्हणून त्यांचा लौकिक होता. परीक्षेमध्ये वरचा नंबर मिळविण्यापेक्षा सर्वंकष स्वतःची प्रगती करण्याची त्यांची योजना असायची. म्हणून शैक्षणिक जीवनात गुरुजनांनीही त्यांची प्रशंसा केली.

डॉ. बाळकृष्ण शर्मा, प्रिन्सिपल राजाराम कॉलेज, कोल्हापूर यांनी संकेश्वर येथे इंग्रजी शिक्षणाची शाळा चालविली. चौथीपर्यंतचे वर्ग असायचे. पाचवीसाठी विद्यार्थ्यांना परगावी जावे लागे, विद्यार्थ्यांची संख्या ५० च्या पुढे गेली नाही. चौथी पास झाल्यावर आम्हालाही परगावी शिक्षणासाठी जाणे भाग होते. अशा वेळा D.S.Naik म्हणजेच दादा नाईक नुकतेच राजाराम कॉलेज मधून शिकून उत्तीर्ण झाल्यावर आमच्या शाळेचे हेडमास्तर आमचेसाठी पाचवीचा वर्ग काढणार असे शाळेने कळविले. शाळेला उर्जितावस्था आणण्यासाठी दादांनी अतोनात कष्ट घेतले. शिक्षकांचे व्यवसायात किती प्राप्ती होते. हे पाहण्यापेक्षा शाळा कशी चालेल, टिकेल ह्या विचाराने ते नेहमी भारलेले असत. डॉ. बाळकृष्ण शर्मा कोल्हापूर मुक्कामी राहून संकेश्वरची शाळा चालवत असत. पण ही स्थिती कायम स्वरूपी टिकणारी नव्हती. म्हणून दादांनी स्थानिक पुढारी व स्नेही यांनी मिळून शाळेला ऊर्जितावस्था आणली. मॅट्रिक पर्यंत शिक्षणाची सोय करून संकेश्वर ग्रामस्थांची अडचण दूर केली. परगावी न जाता गावातच शिक्षणाची सोय झाली.

आजूबाजूच्या खेड्यातील मुलही दादांच्या शाळेत येऊ लागली. व मॅट्रिकपर्यंत शिक्षण घेऊन उद्योग व्यवसाय करू लागली. हे श्रेय दादांचे अद्यापही त्यांचे शिष्य दादांनी शैक्षणिक आघाडीवर मिळविलेल्या यशाने उपकृत झाल्याचे अभिमानाने सांगतात.

शिक्षणक्षेत्र बदलून आपले कर्तृत्व व्यापारातही ठोस कामगिरी करून दाखविले. कापूस खरेदी व्यवसाय त्यांचा वडिलार्जित परंपरागत धंदा, मुंबईच्या धनिक श्रेष्ठींशी व्यापारी संबंध ठेवून तेथेही आपल्या व्यापारी बुद्धिचातुर्याची चुणुक दाखविली. हे श्रेय अपुरे म्हणूनच की काय त्यांनी तंबाखू खरेदी व्यवसाय सुरू केला. तंबाखूच्या प्रसिद्ध निपाणी पेठेतही त्यांनी आपला ठसा उमटविला.

दादांनी व्यापारात लक्ष घातले तरी शाळेचा संबंध सोडला नाही. सल्लागार म्हणून ते मार्गदर्शन करीत राहिले.

आम्ही शाळेच्या कॉलेजच्या शिक्षणानंतर व्यवसायासाठी पुण्या मुंबईला गेलो. तथापि दादांच्याकडे आमचे अधूनमधून जाणे येणे असते. सल्लामसलत चालते. आप-लेपणाने ते आमची चौकशी करतात. त्यांचे घर आमच्या घराच्या वाटेवर असल्यामुळे असे योग वरचेवर येत.

दादांचा पिंडच मुळी सल्लागाराचा, मार्गदर्शकाचा त्यांच्याकडे लहानमोठे मंत्री, पुढारी, डॉक्टर, अशा अनेक क्षेत्रातील मंडळी मार्गदर्शनाकरिता येत असतात भविष्य व कुंडली पाहणे याही क्षेत्रातील त्यांच्या व्यासंगामुळे त्यांच्या सहवासात एकदा आलेली व्यक्ती कायमची होऊन जाते. दुसऱ्यासाठी काही तरी चांगले करण्याची त्यांची बुद्धी असल्यामुळे दादांची मदत या मंडळींना हवी असते. साहित्याचा प्रचंड व्यासंग त्यामुळे त्यांच्या सहवासात आलेल्या प्रत्येक माणसाला ते आकर्षून घेतात. ते सर्वांचा आदर करतात. आदरातिथ्य हा त्यांचा स्थायीभाव.

सध्या दादा कोल्हापूर येथे असतात. प्रकृतिअस्वास्थामुळे बाहेर जाण्याचे टाळतात. तथापि नातलग, स्नेही यांच्या निकडीच्या कामासाठी प्रकृतीकडे दुर्लक्ष करूनही जातात. परोपकार व लोकसंग्रह वृत्ती हा आणखी एक त्यांचा विशेष. अनेकजण म्हणतात ती दादांना भेटायची ओढ लागते पण एकदा तिथे गेल्यावर पाय काढवत नाही.

दादांना वडील मंडळींच्याबद्दल आदर आहे. तो प्रसंगानुरूप व्यक्त झालेला दिसतो. त्यांच्या एकसष्ठी निमित्त एक छोटा धार्मिक कार्यक्रम केला. त्यानिमित्ताने दादा देवदर्शनाला गेले. परत येताना आमच्या घरी येऊन माझ्या वडिलांना ' काका ' म्हणून त्यांनी हाक मारली व चरणस्पर्श केला व ' जीवेत शरद शतम् ' हा आशीर्वाद घेतला. आपल्या स्नेह्याचा ज्येष्ठ पुत्र आशिर्वाद मागतो आहे हे पाहून त्यांना आनंद झाला.

दादांचे वाचन अफाट आहे. इंग्रजी, मराठी मधील अनेक ग्रंथ त्यांनी चिकित्सकपणे वाचले आहेत. अलिकडे त्यांच्या बंधूनी ' ज्ञानेश्वर परिचय, दासबोध परिचय ' ही दोन पुस्तके प्रकाशित केली.

## माझी श्रद्धा !

*सौ. सुनिता श्रीकृष्ण घोलकर*

खरं तर मला काही खूप सांगायचंय. पण शब्दातून ते साकारतच नाही. ते सगळं इतक उदात्त आहे की शब्दामध्यें ते बांधण केवळ अशक्य !

' दादा ' माझा मोठा भाऊ ! ज्यान मला आकार दिला तो माझा भाऊ. आईनंतर आईचं आणि वडिलांचही प्रेम ज्यान दिल तो दादा. त्याच्या संस्कारातूनच मी घडले - वाढले. माझ्या कोवळ्या निरागस मनाला त्यानंच जपलं आणि माझ्यातला आजचा परिपक्व खंबीरपणाही त्यानंच मला दिला. आज सगळ्या आठवणी.. सगळे अनुभव... नव्यानं गर्दी करत आहेत. त्यांना शब्दांची मर्यादा मी घालूंच शकत नाही. आमच नात शब्दांशिवाय जपण्यातच खरं सुख आहे आणि समाधानही !

माझ्या मनाची घडणंच माझ्या या भावांच्या वात्सल्यात, प्रेमात आहे. माझ्या प्रत्येक प्रश्नाच उत्तर मी नेहमीच दादांच्यात शोधलय आणि ते मला मिळूनही गेलय. कदाचित मांझं प्रारब्धच त्याच्या ममतेतून साकारत असेल. आजचा माझा हा सुखी संसार हा त्याचाच आशीर्वाद आहे. त्याची शिकवण मला पावलोपावली मार्गदर्शन करते. त्याचे संस्कार माझ्या कणांकणात इतके रुजले आहेत की, त्या संस्काराच आणि माझ्यामधल अद्वैतच माझ्या जीवनांच सार बनून राहिलय. दादानी जे भरभरून दिलंय त्याची फेड कधी होण शक्यच नाही. आणि तसा माझा हट्टही नाही. त्यांच ओझ मला कधीच वाटलं नाही. कारण त्याच देणं हे माझ्यासाठी ' देण ' नाहींच - तो - आशीर्वाद आहे.

दादांनी कधीच तुझं माझं मानलं नाही. आज जे आहे ते, आहे तस, आपलं म्हणून जपलं ! सगळ्यांच्या सुखदुःखातच तो स्वतःला शोधत राहिला आणि म्हणूनच आज त्याचं कुटुंब एवढ मोठ आहे आणि आणखिन खूपजणांना समावून घेण्यासाठी एक्यांशीव्या वर्षीसुद्धा तो तितकाच उत्सुक आहे. त्याच्याबद्दल वाटणारा त्याचा आदर, त्याच्या बुद्धीची झेप, त्याचं ज्ञान, त्याची चिकाटी, त्याचा व्यासंग, त्याचा प्रपंच या सगळ्यांच्याही पलिकडचा त्याचा आशीर्वादच मला जास्त चांगला समजला ! मला त्याच्याबद्दल वाटणारा आदर, प्रेम ... माझं सगळं ' अव्यक्त ' माझ्या शब्दाशिवाय दादानं जाणलय. त्याची पावतीही त्याच्या धीर देण्याच्या प्रेमळ स्पर्शातून नेहमीच मिळालीय.

अस शब्दासमोर हरत राहणं मला नको वाटतय. जास्त काय लिहणार ? जीवनांत कुठेतरी श्रद्धा ठेवायची असते. ती मी ठेवण्यापूर्वीच बसलीय ' माझा दादा ' हेंच माझ नितान्त श्रद्धास्थान आहे. माझ्या श्रद्धेतच माझं सुख, चैतन्य, यश आणि सगळं कांही आहे.

श्री दत्तगुरु आणि माझा दादा यांचा आशीर्वाद आणि मायेची पाखर माझ्या बरोबर असतांना मला आणि काय हवय ? आज मी तृप्त आहे माझ्या श्रद्धेतच !

## भाव मनीचे

*वैजयंती कुलकर्णी*

ती. दादांच्या आठवणी लिहायला घेतल्या खऱ्या पण प्रत्यक्ष लिहायला बसल्या-नंतर फारच भीती वाटली. दादांच्याबद्दल मला जे वाटते ते सर्व असे कागदावर लिहून सांगता येईल ? नक्कीच नाही. त्या आठवणी मनातच साठवून ठेवण्यासारख्या आहेत. शिवाय त्या आठवणी लिहिण्याकरिता मी कोणी लेखिका तर नाहीच नाही. त्यामुळे कसे लिहायचे ? काय लिहायचे ? हा एक मोठा प्रश्नच. फक्त लिहिण्याचा प्रयत्न केला.

शेजारी कमलाकरांच्या घरी दादांचा मुक्काम असतो. दादांचा सहवास या आठ दहा वर्षातला. त्यावेळी सुरवातीला अभया, पमा या कमलाकरांच्या मुली दादांच्या बद्दल खूप सांगत असत. ' आज दादा येणार,' ' दादांची आज रात्री बैठक आहे ' हे त्या मुली इतक्या आनंदाने सांगत की आजही मला त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद दिसतो.

एके दिवशी मी पण दादा आलेले असताना त्यांच्याकडे गेले. दादा इतके थोर पुरुष, त्यांच्यापुढे बोलायचा संकोच तर होता. दादानीच विचारले, ' याना काही विचारा-वयाचे आहे का ?' मी सांगितले, ' रात्री मला खूप भीतीदायक स्वप्ने पडतात, घाबरायला होते. आपण अंतराळी भटकत असल्याचे दिसते. त्यांनी सांगितल, ' मी संकेश्वरला गेल्यानंतर कुंकू व अंगारा पाठवून देतो. ७ दिवस लावून पहा. कमी होईल. आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे ते संकेश्वरला गेल्याबरोबर लगेच एक दोन दिवसात त्यांनी पोस्टाने अंगारा व कुंकू पाठविले. दादानी लगेच इतक्या आठवणीने व तातडीने आपल्याला कुंकू व अंगारा पाठवल्याचे पाहून नकळत मला त्यांच्याबद्दल एक आपुलकीची ओढ निर्माण झाली आणि ७ दिवस अंगारा व कुंकू लावल्यानंतर माझी भीतीदायक स्वप्ने पडायची बंद झाली. ही पहिली आठवण.

आता तर ते मला वडिलांच्या ठिकाणी आहेत. आता मला कोणत्याही गोष्टीची काळजी अशी वाटत नाही. कारण जीवनात कोणतीही अडचण आली तर ती निवारण्या-करता दादा आहेत. त्यांनी मला वेळोवेळी आधार दिला आहे. ज्या ज्या वेळी दादाना भेटावे अशी तीव्र इच्छा मनांत झाली त्या त्या वेळी दादा निपाणीला आलेले आहेत. आणि भेट झाली आहे.

माझा मोठा मुलगा बारावीनंतर पुढील शिक्षणाकरतां हॉस्टेलमध्ये राहिला. पहिले वर्ष सुरळीत पार पडले. दुसऱ्या वर्षी कॉलेज सुरू झाल्यावर त्याला अभ्यासाची खूप भीती वाटू लागली, नर्व्हस झाला. मी पण घाबरले. दादांना विचारले, त्यानी उपाय सांगितला. त्याचप्रमाणे त्याने केले. आणि खरोखरच त्याची भीती गेली. आणि दुसरे वर्ष सुरळीतपणे पार पडले ते दादांच्यामुळेच.

दोन वर्षापूर्वी माझे वडील दम्याने खूप आजारी होते. कोल्हापूरला हॉस्पिटलमध्ये ठेवले होते. दादा पण कोल्हापूरलाच होते. रोज संध्याकाळी भेटायला येत होते. धीर देऊन जात होते. एखादे दिवशी जर तब्येतीमुळे भेटायला यायला जमले नाही तर त्यांचा फोन यायचा. इतकी आपुलकीने चौकशी रोज कोण करतं ? आमच्या वडिलांना पण आम्ही दादाच म्हणत असू. नंतर ते गेले. पण वडिलांची माया या दादांच्याकडून मिळते.

त्यांनीही मला मुलगी मानले आहे. मध्यंतरी त्यांनी मला एक साडी घेऊन दिली. ती दिल्यानंतर माझ्या डोळ्यातून घळाघळा अश्रू आले. वडिलांची आठवण झाली. ती साडी हातात घेतल्यावर त्यांत अजूनही प. पू. दादांच्या मायेची उब जाणवते.

आजही केव्हाही ते सौ. गीता कमलाकरांच्या घरी अगदी उभ्या उभ्या पांच मिनिटाकरता जरी आले तरी त्यांचा भेटण्यासाठी निरोप येतो. मन मोकळं होत.

## अक्षर संपदेच दान

*सुधाताई जोशी*

ती. दादांचे नाव आख्या महाराष्ट्रातच नव्हे तर कर्नाटकातही सर्वश्रुत आहे. आणि ते केवळ नावानेच ओळखले जातात असे नव्हे तर त्यांचा दृढ स्नेहसंबंध असलेली मंडळी कितीतरी आहेत, आणि ही सर्व मंडळी ती. दादांना एक थोर, आदरणीय व्यक्ती असेच मानीत आली आहेत.

ती. दादांचा आणि माझा परिचय होण्यास एक कारण म्हणजे माझी मुलगी सौ. मंगला जोशी, संकेश्वरचे डॉ. जोशी यांची सून (डॉक्टरांच्या सर्वात धाकट्या चिरंजीवांची विश्वनाथ यांची पत्नी). जोशी मंडळी आणि नाईक कुटुंबीय संकेश्वरची ! एकाच गांवची राहाणारी असल्यामुळे त्या दोन्ही कुटुंबात एकमेकांशी अतिशय जिव्हाळ्याचे नाते आहे. त्यामुळे आमचे संकेश्वरला जाणे होऊ लागले ते माझ्या मुलीच्या लग्नानंतर !

ती. दादांचा आणि आमच्या घरचा स्नेहसंबंध असाच वाढत गेला. त्यातून आता तर त्यांचे वास्तव्य इथेच कोल्हापुरात त्यांचे चिरंजीव अनिल यांचेकडेच आहे. बहुतेक चार-आठ दिवसांनी त्यांचे आमच्या घरी येणे होतेच. घरात एखादी वडील व्यक्ती असावी

व तिने सर्वांची विचारपूस करावी - किंबहुना घरच्या सर्वांना या व्यक्तीचा मोठाच आधार वाटावा असेच त्यांचे वागणे असते.

साहित्य, संगीताची जन्मजात आवड. नुसती आवड नाही तर त्या त्या प्रांतात एक निष्णात म्हणून ओळखले जातात. ती. दादांची दत्तभक्ती, अखंड साधना, सखोल अभ्यासू वृत्ती, दुसऱ्याचं मन ओळखणं, पारखणं हा त्यांचा विशेष गुण म्हणावा लागेल.

त्यांचा आणि माझा परिचय तसा अलिकडचाच. परंतु मला अध्यात्माची थोडीशी गोडी आहे हे त्यांनी सहज ओळखले आणि आता दरवेळी एक नवीन ग्रंथ मला आशीर्वादासह भेट देतात. माझी आवड जाणून असे हे मौलिक ग्रंथ मला अगदी घरपोच पाठवून देतात. काहीही प्रयास न होता अशी अक्षर संपदा प्राप्त व्हावी याला मी ' देवाची कृपा ' याशिवाय दुसरे काही म्हणूच शकत नाही. ' संतांचे आत्मचरित्र, ' ' आत्मोल्लास,' ' श्री ज्ञानेश्वरी, ' ' श्री दत्तभार्गव संवाद ' हे आणि असे कितीतरी ! ' साधकाची वाटचाल' हे अत्यंत दुर्मिळ पुस्तकही त्यांनी मोठ्या अगत्यानं मला वाचायला दिले.

आपल्या जीवनात अनेक व्यक्ती भेटतात, परंतु ती. दादांच्या सारखी माणसं क्वचितच भेटतील. त्यांना भेटायला केव्हांही त्यांच्या घरी गेल तरी चहा घेतल्याशिवाय परतणे नाही. शिवाय मला वाचायला एखादं नवीन पुस्तक त्यांनी काढून ठेवलेल असते, ते दिलं जातं. म्हणजे रिकाम्या हाताने मी कधीच परतले नाही.

आमच्या बायकांचे एक श्री ज्ञानेश्वरी पारायण होणार आहे, हे कळल्याबरोबर लागलीच त्यांनी मला श्रीज्ञानेश्वरांच्या फोटोच्या प्रती पाठवून दिल्या ५० प्रती तरी नक्कीच असतील त्या व पारायणाला बसलेल्या सर्व बायकांना त्या द्या, असे सांगितले. किती अगत्य आणि जिव्हाळा पहा ! त्यांचे हे ऋण मी कधीच विसरू शकत नाही. त्यांना पाहिल्याबरोबर एका प्रकारची आदराची भावना निर्माण होते, परंतु ती शब्दांत व्यक्त करणे मात्र कठीण आहे.

## प्रात:स्मरणीय - दादा

*कृष्णकांत केशव मुळे, संकेश्वर*

मी मॅट्रीक झालो आणि मला पोस्टांत नोकरी मिळाली. नोकरी तशी साधीच कारकुनाची. पगार जेमतेमच पण सरकारी नोकरी होती आणि रत्नागिरी सारखे नोकरीचे ठिकाण म्हणून जीवनक्रम खुशीत चालला होता. अशाच एका दिवशी गांवाकडून एक तार आली. घाबऱ्या, घुबऱ्या, भांबावलेल्या मनानेच गाडी पकडून मी संकेश्वरला आलो.

पाहतो तो काय ? माझे देवासमान असलेले मामा देवाघरी गेले होते. मला पाहताच मामींनी हंबरडा फोडला. सर्वजण दुःखसागरांत बुडून गेलो होतो. मामा तसे अचानक अनपेक्षितपणे निधन पावलेले. त्यांचा कापडधंदा चालवायला त्यांना मुलगा नव्हता. पुढे काय हा प्रश्न प्रत्येकालाच पडलेला होता. मी त्यांच्या जवळच्या नात्यातला असलो तरी कापड धंद्याला नवखा होतो. दुकानदारीचा ना गंध ना वास, प्रसंग तरी निभावला पाहिजे. साऱ्यांची मती कुंठित झाली होती.

अशावेळी आम्हाला आशेचा किरण दिसला तो दादांच्या रुपाने, मी व माझ्या सासूबाई ती. कृष्णाबाई दादांच्या चरणी विनम्र झालो. दादांनी प्रथम आम्हाला धीर दिला व ताबडतोब आपली सर्व महत्त्वाची कामे सोडून आम्हाला बेळगांवला घेऊन गेले. तेथे कागदोपत्री सर्व व्यवहार पूर्ण केला. मामांच्या जागी दुकानाची सर्व जबाबदारी माझ्यावर सोपविली. मला दुकानदारीचे धडे गिरवायला लावले. " संकटकाळी जो सखा तो गुरु " या न्यायाने दादा माझे गुरु झाले. त्यानी घालून दिलेल्या मार्गावरून वाटचाल करीत मी आज एक उत्तम व्यापारी बनलो. दादा मला पूज्य झाले. छोट्या मोठ्या अडचणीत त्यांचे मार्गदर्शन ही एक आवश्यक बाबच ठरली.

या साऱ्या अडचणीतून आमची गाडी रुळावर येते न येते तोच नवी मानसिक समस्या उभी राहिली. मला पहिल्या मुलगीनंतर मुलगा झाला. तसे पाहता आनंदाची बाब पण बाळाची प्रकृती वारंवार बिघडत होती. त्यामुळे मानसिक समाधान नव्हते. एकदा तर महाकठीण प्रसंग आला. बाळाचा श्वास कोंडला. डॉक्टर आले पण त्यांनीही सांगितले की हे आपल्या प्रयत्नांच्या पलिकडचे आहे. आम्ही आमच्या समाधानासाठी दैवी उपाय करू लागलो. पूज्य दादांची आठवण मला आली. मी त्याना भेटलो. परिस्थिती सांगितली. दादांनी कुंडली पाहिली व भगवान शंकराचा एक लाख जप वैदिकाकरवी करणेस सांगितले. त्याप्रमाणे वे. शा. सं. रघुनाथ गुरुजी (कै. रघुनाथशास्त्री) याना जपाची जबाबदारी सोपविली. तिकडे जप सुरू झाला आणि पाच मिनिटातच चि. राहुल (माझा मुलगा) डोळे किलकिले करून पाहू लागला. त्याची प्रकृती सुधारली. आज तो दहावीत शिकतो आहे. ही दैवी कृपा आहे खरी पण या कृपेचा मार्ग दाखविणारे पूज्य दादा मला फक्त गुरुस्थानीच नव्हे तर देवस्थानी आहेत ते यामुळेच !

अशा अनेक रुपांनी दादांनी आपला ठसा माझ्या जीवनावर उमटविला आहे. दादानी अनेकांवर असे उपकार केले आहेत, केवळ निःस्वार्थी दृष्टीने. ते स्वतः मात्र कोणाच्या उपकारांच्या ओझ्याखाली राहिले नाहीत. राहू इच्छित नाहीत.

माझ्या मामांच्याकडून पूर्वी केंव्हातरी पूज्य दादानी काही रक्कम उसनवार घेतली होती. व्यवहाराची कागदोपत्री नोंद होती. पण मी व माझ्या सासूबाईनी हा व्यवहार संपलेला आहे असे ठरविले होते. दादांचे आमचेवर एवढे उपकार होते की, आम्ही ही रक्कम परत

मागणे म्हणजे आमचा अति क्षूंद्रपणा ठरला असता. आम्ही तो व्यवहार झालाच नाही असे मानू लागलो.

मध्यंतरी दादा जास्तच आजारी पडले. त्याना आपल्या भावी जीवनाचा भरवसा वाटेनासा झाला आणि म्हणूनच की काय त्यानी मला व माझ्या सासूबाईंना भेटायला बोलाविले. आम्ही गेलो दादांना नमस्कार केला. दादांनी आम्हाला बसायला सांगितले. उशाखालचे एक पाकिट काढले. ते माझ्या सासुबाईंच्या हाती ठेवून दादा म्हणाले, 'कृष्णाबाई ! दत्तूकडून मी कांही दिवसापूर्वी उसनवार घेतलेली रक्कम वेळेवर परत करू शकलो नाही. आता माझ्याकडे रक्कम आलेली आहे. मला माझ्या आयुष्याची खात्री वाटेनाशी झाली आहे. तुमची रक्कम न देताच मी गेलो तर माझ्या आत्म्याला शांती लाभणार नाही; तेव्हा ही रक्कम घ्या व माझ्या देण्यातून मला मुक्त करा'

आम्हाला गहिंवरून आले. आम्ही दादांना दंडवत घातले व ते पाकिट तसेच त्यांच्या पायाशी ठेवून त्यांना सांगितले की, ' आम्ही ती रक्कम घेणार नाही. आम्ही तसा निश्चय केला आहे.' दादा आपल्या विचारांशी घट्ट होते. दादानी रक्कम परत घेतली नाही. किती हा करारीपणा ! अर्थात आम्हीही स्वीकारली नाही. शेवटी ती रक्कम व्याजाने ठेवून त्या व्याजाचा उपयोग दादांच्या घरी होणाऱ्या श्री टेंबेस्वामी महाराज पुण्यतिथीसाठी करावा असे ठरले. दोघानांही समाधान वाटले.

दादांच्या आशीर्वादाने त्यांचे भक्त सुखासमाधानांत राहात आहेत, कोणी डॉक्टर, कोणी इंजिनियर, कोणी प्रतिष्ठित व्यापारी तर कोणी राजकारणी पुढारी. दादांनी या साऱ्यांना मार्गदर्शन केले आहे. दादांच्या उपयोगी आपण पडावे असे या साऱ्या भक्तजनांना वाटते. अशी संधी आपल्याला मिळणे म्हणजे आपला सन्मान असे ते मानून आहेत. अर्थात दादा तशी संधी देत नाहीत. त्यांची तशी अपेक्षाच नाही.

गोरगरीबांना मदत करावी, भक्तांना, प्रेमी मंडळीना योग्य सल्ला द्यावा, प्रगतीचा मार्ग दाखवावा एवढेच त्यांना ठावे. चंदनाप्रमाणे आपला देह झिजवून दुसऱ्यांना सुगंध देणारे ते संत आहेत.

## मर्मबंधातली ठेव ही

*एक मानसकन्या*

पूज्य दादा आणि माझा परिचय-स्नेह हा अगदी अलीकडील गेल्या ८-९ वर्षातील. प्रत्यक्ष भेटी पाच सहाच. त्याही तास दोन तासांच्या मर्यादेतील. पत्रभेटी मात्र बऱ्याच. एवढ्या तुटपुंजा सामग्रीनिशी आणि माझ्या लेखनातील उणिवांसह त्यांच्या आठवणी शब्दबद्ध करण्याचा हा अल्पमती प्रयत्न.

मी ती. दादांच्या विद्यार्थी वर्गापैकी नाही. संगीताच्या बाबतीत केवळ श्रोता. माझे आजोबा आणि ती. दादा यांचा बराच परिचय. हे नंतर समजले. आजोबा आता हयात नाहीत. ते गणेशोपासक होते. दररोज प्रातःकाळी ध्यानधारणा-प्राणायाम अनेक वर्षे चालू होती.

सन १९८१ चा मे महिना. आजोबांचे वय नव्वदीच्या जवळपास. थकले होते. नेमका दिवस लक्षात नाही. तर त्या दिवशी आजोबांना निरोप मिळाला की " आम्ही भेटायला येतो." (दुसरी व्यक्ती बेळगांवमधील संगीत शिक्षक विजापुरे मास्तर हे होत.) आल्यानंतर ५ मिनिटे प्रकृतीची विचारपूस झाल्यावर दादा आजोबांना म्हणाले " आता हे सगळे करण्याची जरुर नाही. फक्त अमुक अमुक एवढेच चालू ठेवा. पुढे बोलण्याच्या ओघात उपासना, साधना, त्यात होणाऱ्या चुका, त्याचे परिणाम याचा उल्लेख आला. माझे कान तिकडेच लागले होते. माझा काही अभ्यास होता असे नाही पण कुतूहल ! त्यांचे बोलणे ऐकून माझ्या मनांत विचार आला की, बोलणारी व्यक्ती अनुभवाखेरीज असे सांगू शकणार नाही. हे मनांत आले मात्र ! पुढच्या क्षणी ती. दादांनी मजकडे पाहून एकदम एखादी टेप सुरू व्हावी तसे - आमच्या सांसारिक स्थितीचे वर्णन-समस्या याचा अचूक उल्लेख-आमच्या कुलदैवताचाही उच्चार केला. हे सगळे ३-४ वाक्यात.

ऐकून कोण गार पडणार नाही ? या अगोदर त्यांना मजबद्दल काहीही माहिती नव्हती. असण्याचे कारणही नव्हते. आतापर्यंत असले अनुभव फक्त पुस्तकातून वाचले होते. मी नमस्कार केला. मग त्यांनी जुजबी चौकशी केली. शिक्षण B. Com. असे सांगितल्यावर म्हणाले, " हे बघ, आपल्याला उत्तर झीरो ' O ' हवे. बॅलन्स कुठलाच नको ! प्लस किंवा मायनस. - अकौंटन्सीच्या परिभाषेत कुठले सत्य ते मला सांगत होते ! मग एक रवीन्द्रनाथ टागोरांची कविता (इंग्रजी) ऐकवली. नंतरचे त्यांचे एक वाक्य खुणेसारखे स्मरणात आहे. " अशाश्वताच्या मागे आपल्याला जायचे नाहीये !" काही उपासना सांगितली. ही आमची पहिली भेट.

पुढे दीड-दोन वर्षांनी मी संकेश्वरच्या घरी जाऊन भेट घेतली. कांही नामस्मरण सांगा असे म्हटले - त्यावर त्यांनी " मी कोणाचा गुरु नाही माझा कुणी शिष्य नाही. असे म्हणत थोडे " ब्रेन वॉशिंग " केले. मग म्हणाले, " तुमची उत्तरे तुम्हालाच शोधावी लागतात. ती सापडतीलही. पण अगोदर कुलदेवतेची उपासना होणे जरूर आहे !" ह्या मार्गात चुका होण्याचा संभव, ठेचा फार. एखाद्याची एखादी ठेच चुकवता आली तर तेवढाच माझ्या माहितीचा उपयोग - एवढीच माझी भूमिका -तू मला मुलीसारखी आणि हे नाते सर्व तऱ्हेने त्यांनी अजून निभावले आहे. " गुरुपण न घे " हे एक संतलक्षणच.

मग आमच्या पत्रभेटी सुरू झाल्या. त्यांचे उत्तर नेहमीच उलट टपाली येणार. (दादांचा पत्रव्यवहारही मोठा आहे. इतका व्याप कसा सांभाळतात त्यांनाच माहीत !

त्यांच्या पत्राची एक गंमत अशी जाणवली की ज्या तऱ्हेची शब्दरचना किंवा ' टोन ' आपल्या पत्रात असेल तशाच तऱ्हेचे त्यांचे उत्तर येई. त्यांतून त्यांचे वाचन, व्यासंग अचूक संदर्भ देणारी स्मरणशक्ती सारे काही निराळेच असल्याची जाणीव झाली. पुस्तक वाचून प्रतिक्रिया काय याची विचारणा असे. प्रत्येक पत्रात खुशाली वरचेवर कळवण्याबद्दल लिहिलेले असणारच ! आणि हा कळवळा वरवरचा नाही याचाही अनुभव घेतला आहे. एकदा भेटायला गेलेल्यावेळी माझा डोळा आलेला होता. तसा तो २-३ महिने त्रास देत होता. दादा म्हणाले, " आज रहा. घरी फोन करू आणि eye स्पेशालिस्टला दाखवून टाकू' मी उपचार चालू आहेत म्हटल्यावर मग ठीक असे म्हणाले.

दादांच्या तोंडून किस्से ऐकण्यातली मजा ज्यांनी अनुभवली आहे त्यांना मी वेगळी आठवण करून देण्याची जरुरी नाही. संभाषणाचे बाबतीत त्यांच्या उत्तरात ठामपणा असतो हे जाणवले. पण अट्टाहास कधीच वाटला नाही. विचारणाऱ्याच्या मनांतही गोंधळ नाहीना हे ताडून पहातील.

एकदा बेळगांवला ते आले असताना भेटायला गेले नेहमीप्रमाणे लोकांची गर्दी होतीच. मी गेल्यावर म्हणाले "तुमची जेवणे केव्हां आटोपतात - मी रात्री येईन. बोलू काय हवे ते" - आणि ते आले. पण मजा अशी की, इथेही ते आलेले कळताच दोन्ही बाजूच्या शेजाऱ्यांनी हजेरी लावली. मग गप्पांचा ओघ साहित्य, संगीत इकडे वळला. २ ॥ - ३ तास गेले आणि मग लक्षात आले त्यांना टेकायला तक्क्याही मी दिला नव्हता. त्यांना बसण्याचा त्रास होत होता. या भेटीनंतर मला चुटपुट लागली की जो काही थोडा सहवास मिळतो त्याचा फायदा करून घेता येत नाही. हे नुसते वेळेच्याच बाबतीत होते असे नव्हे. नेमके सांगता येत नाही पण देणाऱ्याचे हात हजारो - दुबळी माझी झोळी - अशी अवस्था.

पुढे पाच-सहा वेळा कांही दृष्यातून, एखाद्या वाक्यातून त्यांच्या अंतःसाक्षित्वची कल्पना आली. त्यांना काही सांगावे, तर त्यांचे उत्तर असे " मी काहीच करीत नाही. कार्य हे शक्ती ठरते. फक्त तुमच्या विश्वासामुळे तुम्हाला ते माझ्या रूपात दिसते इतकेच ! दिसणारी चांगली - वाईट दृष्ये यांतून केवळ तटस्थता, निरपेक्षता यायला हवी - कशाचा अर्थ किंवा कशाशी संबंध लावण्याचे भानगडीत पडायचे नाही हे ते आवर्जून सांगतात.

आमचे प्रश्न ही तसे प्रायमरीच्या विद्यार्थ्यांसारखेच ! त्याचे उत्तर जर एखाद्या पुस्तकात असेल तर, " पुस्तकाचे लेखकाचे नाव - पान क्रमांक, ओळ कितवी इतके झटपट सांगतील. याचाही अनुभव बऱ्याच जणांना असेल.

एकदा मी विचारले, " दादा, Input कांहीही नाही. तर Output चे काय ? (आमच्याकडून प्रयत्न नाही - आळशीपणा) त्यावर त्यांनी वरीलप्रमाणे पुस्तक, पान, ओळ क्रमांक सांगून वाच म्हणाले - त्यात प्रश्नोत्तरे होती. " गुरुच जर मनांत आणतील तर शिष्याला पूर्णत्व देतील. मग साधनेची आवश्यकता काय ?" पुढचे उत्तर असे होते की

हे अनुभव तुमचे स्वतःचे होण्यासाठी साधना हवी. अनुभव गुरुकडून ‘ आदत्त ’ करून घ्यावे लागतात. याला घरगुती किंवा बायकी विश्वातली उपमा विरजणाची. आज घरात लोणी-ताक काही नाही तर ते चमचाभर शेजारून मागता येईल. पण उद्या मला दूध तापवावे लागेल. ते विरजावे लागेल. नाहीतर ते नासून जाईल. म्हणजे हा खटाटोप करायलाच हवा. जर लोणी हवे तर

अशी उदाहरणे किती सांगू ? शब्दांचाच पसारा फार झाला. सांगण्याचे तात्पर्य- असे अनुभव संक्रमित करण्याची ज्यांची क्षमता

सांगता नये ते सांगणे । गोडी कळाया गूळ देणे
ऐसे हे सद्गुरुविणें । होणार नाही. - श्रीमद् दासबोध.

त्यांच्याविषयी काय लिहावे ? ते नेमके कसे आहेत अन् तसे आहेत असले मोजमाप करताच येणार नाही आणि कसला शिक्काही मारता येणार नाही. ते काहीही असो ! अत्यंत सहजता - वागण्याबोलण्यातली आणि अकृत्रिम जिव्हाळा - हे खास वैशिष्ट्य, सुरेश भटांच्या गजलच्या ओळी आठवतात.

रंगुनी रंगात साऱ्या रंग माझा वेगळा
गुंतुनी गुंत्यात साऱ्या, पाय माझा मोकळा !

अशी विचित्र सिद्धि,ज्याचा मालक श्रेयाचा भागीदार कधीच होत नसतो !

---

## तुळशीचं पान

*भरत दैनी*

ती. दादांचा व माझा परिचय तसा हल्लीच झाला. माझे आजोबा ती. श्री. भालजी पेंढारकर व दादा हे एकमेकांचे स्नेही ! श्री. दादा, ती. आजोबांना नेहमी भेटतात. असेच एके दिवशी आजोबांना भेटण्यासाठी दादा आमच्या घरी आले होते. दादांचा अध्यात्म, ज्योतिष इ. क्षेत्रातील अधिकार आम्ही जाणून होतो. त्यांना आपली कुंडली दाखवावी असं वाटलं आणि दादांच्या हातात कुंडली ठेवली. दादांनी कुंडलीकडे एक निसटता कटाक्ष टाकला आणि ते उद्‌गारले, “ तुमच्या अंगावर एक जन्मखूण आहे !”... आणि इतकेच नव्हे, तर त्या खुणेची जागा, रंग व तिचा तुळशीच्या पानाचा आकार हे तपशील अगदी अचूक सांगितले.

या भेटीत दादांची बुद्धिमत्ता त्यांचा अभ्यास त्यांचा आतला आवाज इत्यादी गोष्टी ध्यानात येऊन, त्यांच्याबरोबर आपला संपर्क असला पाहिजे असा विचार मी केला आणि

दादांनीही आपला फोन नंबर देऊन मला घरी येण्याचे सुचविले.

दादांबरोबर नंतर झालेल्या भेटींमध्ये ' Intiuition. ' (आतला आवाज किंवा अंतर्ज्ञान) बद्दल अधिक माहिती समजली. एखादेवेळी अचानक सद्यस्थितीशी संलग्न अथवा असंलग्न असा एखादा विचार मनात चमकतो किंवा व्यक्त केला जातो की ज्याद्वारे एखादी माहिती पूर्वसूचित होते व पुढे तंतोतंत तसे होते. अशा प्रकारची शक्ती अस्तित्वात असून तिच्याबद्दल संशोधन सुरू आहेत. खुद्द दादांकडूनच अधिक प्रकाश पडू शकेल.

दादांनी ८० व्या वर्षात पदार्पण केले आहे. त्यांची व माझी ओळख जुनी नसल्याने त्यांचे पूर्वायुष्य, सामाजिक सहभाग याविषयी मला विशेष कल्पना नाही. परंतु त्यांच्यापाशी असणारे समृद्ध ज्ञानभांडार पाहून एवढे जणवते की सामान्य माणासपर्यंत हे पोचलं पाहिजे. अर्थात हे ज्ञान सहजासहजी मिळत नसून ते मिळविण्याची जिज्ञासा पाहिजे. ज्ञान मिळविण्याचा सोपा मार्ग असणारे ज्ञानवृद्ध अनुभवी लोक आता मिळतात कुठं ? दादांसारखे काही मोजकेच लोक आज अस्तित्वात आहेत. असो.

माझ्यासारख्या २४ वर्षीय युवकाबरोबरही दादांचा स्नेह आहे, ही गोष्ट दादांच्या अहंकारशून्यतेची द्योतक आहे.

## माझे मामा

*सुरेखा घोलकर, मिरज*

काही भावनाच अशा असतात की त्या व्यक्तच करता येत नाहीत. अशावेळी अव्यक्तातच खूप आनंद असतो. एक निखळ, निरामय सुख असतं. आपल ते ' अव्यक्त ' आपल्यापुरतं मनात खोलवर साठवून ठेवण्यात एक समाधान असतं आणि म्हणूनच ते शब्दांच्या पलीकडचं सारं शब्दांत पकडताना कुठेतरी आपणच आपल्या आपलेपणाला मर्यादा घालतोय असं वाटत राहतं. नेमकं हेच मी आज अनुभवतीय. माझं ते अव्यक्त असं शब्दातून मोकळ करताना खूपसं गोंधळल्यासारखं.. अडखळल्यासारखं होतंय. नेमके शब्दच सापडत नाहीत आणि सापडलेच तर ते अपुरे वाटतात. पण तरीही मला लिहायचंय ! सुरुवात कुठून करायची हाच प्रश्न आहे. तेंव्हा थोडेसे गोंधळलेले काहीसे बुजणारे पण तरीही एकमेकांना ढकलून पुढे येण्यासाठी धडपडणारे हे माझे शब्द - फक्त माझ्या मामासाठी !!

माझ्या मामाच्या आठवणी ' आजोळातल्याच ! आजोळच्या आठवणीनी मन कसं हिरवंगार होऊन जातं. मला तरी आजोळची भलतीच ओढ. कधी एकदा वार्षिक परीक्षा संपते आणि मी संकेश्वरला पळते असं होऊन जायचं. सुट्टीची वाट पाहताना, गोड

मनसुबे रचताना ती वार्षिक परीक्षा सुस्त अजगरासारखी लांबलचक वाटायची. खूप राग यायचा तिचा. पण ती संपवून एकदा संकेश्वरला पळाले की काही विचारू नका. तिकडे गेले की माझ्या हट्टाला अगदी उधाण यायच. ते विठोबाच्या देवळात धाप लागेपर्यंत शिवाशिवीनं खेळणं, मठात उड्या मारमारून घंटा वाजविणं कुणाचं लक्ष नाही असं बघून एकटीनंच नदीत पाय धुवून येणं, ते आवळे चिंचा, बोर, ऊस खाणं ... सगळं सगळं अगदी विलक्षण होतं ! कुणी फारसं दटावत नसल्यामुळे मी मोकाटच असायची. त्यातून पडलेच आजारी तर मामाचाच दवाखाना आणि मामाच्याच दुकानातली औषधं. आजीसाठी तरी मी दुधावरची साय ! मग घरच्या दुधावरची साय मी खाल्ली, तर मला कोण बोलणार ? मला चांगल आठवतं - मी ' कोंबडा की कोंबडी ' म्हणत करवंद ओट्यात घेऊन खात उन्हात बसायचे. कुणी कितीही रागवलं तरी लक्षच द्यायचे नाही. मामा-मामींच लटक रागावणं का रागावणं असतं ? पण - " आत ये हं, नाहीतर दादांना सांगते " असं कुणी म्हणालं तर मात्र मी गुपचुप आत जायचे. दादामामाचा धाकच तसा आहे. अगदी लहानांपासून मोठ्यांपर्यंत सगळ्यांनाच !

मी सुट्टीत जाईन तेंव्हा दादामामा संकेश्वरातच असायचाच ! त्याच्याकडे सारख कोणी ना कोणी येत असायचं. त्यांना चहा देण अगदी सारख चालू असायचं. शिवाय दादामामालाही अर्ध्या-अर्ध्या तासानं चहा लागायचा. चहा देताना मामा ' ही सरीची धाकटी मुलगी ' म्हणून ओळखीच्या माणसांना सांगायचा. मग मी पटकन् वाकून नमस्कार करायचा. हे सगळं अगदी सवयीनं होऊन गेलेल ! पण त्यातही एक वेगळेपण - एक आनंद असायचा. चार कपबश्या उचलल्या तरी आपण खूप काम केल्यासारखं वाटायचं. कारण तेवढ्याशा गोष्टीचंही तिथे कौतुक व्हायच. लहान असताना दादामामाची मी नक्कल करायचे. त्याचं ते जीभ बाहेर काढू पत्र लिहिणं, पोटावरून हात फिरवत भाजलेले दाणे खाणं मला अगदी हुबेहुब जमायचं. सगळी आग्रह करायचे आणि मी नक्कल करायची. पण मामा आला की मात्र धूम् पळून जायचे. त्या वयात दंगा करणं, आपले हट्ट पुरवून घेणं एवढेच जमेत असायचं माझ्या ! पण जसजशी मोठी होत गेले तसतसे दादामामातले एकेक पैलू उलगडू लागले. ' इथ ' आपल्याला काहीतरी मिळतंय ... सापडतंय... असं वाटायला लागलं. हळुहळू धाकाची जागा त्याच्याबद्दलच्या आदरानं व्यापली आणि रोज संध्याकाळी ' शुभं करोति ' म्हटल्यानंतर आई सांगते म्हणून मोठ्यांसमोर वाकायचं ही भावना जाऊन त्या नमस्कारातला खरा अर्थ समजला !

तशी मी खूप वेळा त्याच्या सान्निध्यात राहिले असले, तरी मुद्दाम ठरवून त्याच्यात काही शोधायचा प्रयत्न कधी केला नाही. पण जाता-जाता आलेले अनुभव मात्र नक्कीच मला काहीतरी शिकवून गेले. काहीतरी जपून ठेवण्यासारखं देऊन गेले.

मी लहानपणासून आजपर्यंत पाहतीय. मामाकडे सारखी माणसं येतात. त्यांच्या बोलण्यातून, वागण्यातून त्याना मामाबद्दल वाटणारी आपुलकी, आदर नेहमीच दिसायचा.

लहान असतांना वाटायचं - ‘ आपण किती भाग्यवान आहोत नं, की आपल्याला दादामामासारखा मामा मिळालाय ’ खरं तर त्यावेळी या वाटण्याला तसं वाटणं इतकंच महत्त्व होतं. पण आज त्यातलं वास्तव अनुभवल्यानंतर चांगलचं जाणवतंय. हो ! आणि मला वाटायचं - ‘ आलेली माणसं वेगळी वेगळी तसेच त्यांचे बोलण्याचे विषयही वेगवेगळे. पण सगळ्यांशी बोलणारा मामा मात्र एकच ! हा एकटा एवढ्या सगळ्यांशी निरनिराळ्या विषयावर कसा बोलू शकतो ! त्याचा उत्साह बघितला की माझी मलाच लाज वाटते. वाटतं... आपण एवढ्या लहान आहोत तर एवढ्या दमतो, कंटाळतो, पण दादामामा कसा कंटाळत नाही ? त्यातून मला समजलं की दमणं.. कंटाळण हे शेवटी स्वतःच्या मनाचेच खेळ. मनात आणलंच तर नेहमी उत्साहात राहता येतं. आजही तो तितकाच उत्साही बघून आश्चर्य वाटतं !

एकदा मी संकेश्वरला असताना सिनेमा पाहायला गेले होते. सिनेमा पाहून आले. दादामामा बाहेरच बसलेला पाहून हळूच आत जायला लागले. पण मामांनी हटकलच. ! “पपी कोणता सिनेमा पाहिलास ? काय होतं सिनेमात ?” झालं ! मी आपली गप्पच काही नाही... म्हणजे कौटुंबिक कथाच होती. असं काहीतरी उत्तर देऊन मी माझी सुटका करून घेतली. पण रात्री झोपताना मला जाणवलं की त्यावेळी जरी मी माझी सुटका करून घेतली असली, तरी त्या प्रश्नांनी माझा पिच्छा सोडला नव्हता. कदाचित मामांनी कोणत्या उद्देशांनी प्रश्न विचारले नसतीलही. प्रश्नांनी मला विचार करायला लावला. खूप काही शिकवलं !

आपण ज्या गोष्टी करतो, त्या प्रत्येक गोष्टीमागे काहीतरी कारण असतं. ते आपणच शोधायच असतं. प्रत्येक गोष्ट ही आपल्याला चांगलं, वाईट किंवा दोन्ही थोडं थोडं देऊन जात असते. त्या साध्यासाध्या गोष्टी हेच आपले अनुभव असतात. आणि त्या अनुभवातूनच आपल्याला मोठ्ठं व्हायच असतं. खूप मिळालं मला त्यातून. आणि यातूनच माझ्या विचारांना दिशा मिळाली. प्रत्येक गोष्ट आपल्याला काहीतरी सांगून जात असते. हे नव्यान जाणवलं !

त्याच वाचन आणि लिखाण या गोष्टी अगदी आदर्श मानाव्यात अशा. त्याच पत्र पाहिलं की वाटत पत्र लिहावं तर दादामामानीच ! सुवाच्च्य आणि मुद्देसूद. पत्र ‘भावणं’ हा प्रकार तुम्ही कधी अनुभवला आहे काय ? मी अनुभवलाय. माझी आई सासरी गेल्यानंतर पहिल्यांदा मामानी तिला लिहिलेलं पत्र मला अक्षरशः भावलं ! अतिशय विलक्षण पत्र आहे ते ! त्यातला प्रत्येक शब्द इतका भिडणारा आहे की अगदी प्रत्येक मुलीन मनात साठवून ठेवावा. जबाबदारीन चार गोष्टी नक्कीच सांगितल्या आहेत. पण त्याला कुठे सल्ल्याची सर नाहीये. आपल्या बहिणीच्या संस्कारित मनाबद्दल व आपण केलेल्या संस्कारांबद्दल वाटणारा विश्वास त्याच्या शब्दातून चांगलाच जाणवतोय. मला तरी ते पत्र वाचल्यावर शाकुन्तलातल्या चौथ्या अंकात कण्वमुनींनी नवविवाहित

शकुंतलेला दिलेल्या निरोपाचीच आठवण झाली. त्याचे ते प्रेमळ शब्द केवळ अनमोल आहेत.

पत्रलेखनावरून आठवलं मी एकदा दादामामाला पत्र पाठवताना गडबडीत तारीख लिहायचीच विसरले आणि पाकिटाला तिकिटही नव्हत. खरंतर दादामामाला पत्र लिहिताना मी नेहमीच जागरूक असते. पण असं कस झालं कुणास ठाऊक ? पण असं झालं खर. लगेचच दादामामाच माझ्या पत्राला उत्तर देणारं पत्र आलं, त्यात पहिलीच ओळ होती. 'तुझं बिन तारखेच तिकिट न लावलेलं पत्र पोहोचलं !' मला अगदी मेल्याहून मेल्यासारखं झालं. पण तेव्हापासून मामालाच नव्हे पण कुणालाही पत्र लिहिताना माझ्या पत्रात व्यवस्थितपणा यायला लागला.

मी दादामामाची सगळ्यात लहान भाची ! धाकट्या बहिणीची धाकटी मुलगी. मी दोन्हीकडच्या आजोबांना पाहिलं नाही. पण आजोबांच प्रेमही मला याच मामांनी दिल. माझ्या सगळ्या मामांनी माझं कौतुक केलय. अजूनही त्यांना माझ कौतुक आहे. माझा प्रत्येक हट्ट त्यांनी न सांगता पुरा केला. खरंतर माझ्या सगळ्यात लाडका मामा बाबूमामा. पण तो असा मधूनच निघून गेला. आठवणी मात्र पुरून उरणाऱ्या ! लहानपणापासून मला वहिनीच भारी वेड. पण मला सख्खा भाऊच नाही. नाही.. असं मी म्हणूच शकत नाही. कारण तसं अनिलदादानी मला कधी जाणवूनच दिल नाही. माझ्या कल्पनेतली वहिनीही अनितावहिनींच्या रूपात मला भेटली. वहिनींना पाहिल त्यांचा शान्त स्वभाव पाहिला की उगीचच मोठ्या मामींची आठवण येते. छोटी आक्का तरी माझी पहिली सगळ्यात मोठी बहिण. हे जे सगळं मिळालं ते दादामामामुळेच ! या सगळयांच्यात सख्खे मामे अस अन्तर नाहीच. कारण ते मामानी कधी आम्हाला शिकवलच नाही.

कोणतही कार्य दादामामाच्या आशीर्वादाशिवाय नाहीचं ! त्याच्याशिवाय लग्न-घराला सुद्धा भरल्यासारखं रुप येत नाही. त्या सगळ्या गडबडीत दादांना चहा, दादांना ब्रेड भाजला का ? दादांच पाणी काढा. यासारखी वाक्य हवीतच ! त्याचा मोठा आधार वाटतो. दादामामाच कुटुंब खूप मोठ्ठं आहे. अगदी आकाशान कवेत घ्याव असं ! त्यानी खूप माणसं जोडली आहेत. ही सगळी मोठ्या उत्साहानं श्री वासुदेवानंद सरस्वती स्वामींच्या उत्सवाला एकत्र जमायची. त्या एकत्र येण्यात एक वेगळंच सुख, एक आगळाच आनंद असायचा. ते प्रसन्न वातावरण, ती मोठ्ठी पूजा, रात्रभर विविध कार्यक्रम, त्या मोठमोठ्या पंक्ती... सगळीजण अगदी आपलेपणानी कामात गर्क. दादांसाठी एवढी एकच भावना या चार दिशातून येणाऱ्या सगळ्यांना एका कुटुंबाच रुप देण्यासाठी पुरेशी ठरत असावी. !

प्रत्येकाची आस्थेनं चौकशी करणं, त्यांच्या सुखासाठी धडपडण आणि दु:खात आधार देणं हे तरी त्याच्यात उपजतच असावं. असे किती संसार त्याच्या आशीर्वादातून

फुललेत कुणास ठाऊक ? आज मी कधीही त्याच्याकडे गेले तरीही माझ्या पूर्ण अभ्यासक्रमाची, माझ्या अभ्यासाची, इतर क्षेत्रातील प्रगतीची तो नेहमीच चौकशी करतो. एवढच नव्हे तर आठवणीन मला उपयुक्त अशी पुस्तकही पाठवतो. माझ्या अगदी छोट्यातल्या छोट्या यशाच सुद्धा त्याला मोठं कौतुक वाटतं. त्याच्या कौतुकाचा हात पाठीवरून फिरल्याशिवाय माझंही यश अपुरच वाटत राहतं. त्याचे शब्द, त्याची दाद, मला नवा उत्साह देते, हुरूप देते. त्यातून समाधान तरी मिळतच पण नवी जिद्दही निर्माण होते. त्याच्याकडून पदोपदी मला मिळालेलं प्रोत्साहन विसरता येण्यासारखं मुळीच नाही !

माझ्या मामासारखा मामा क्वचितच कुणाला मिळाला असेल. त्याच्याबद्दल वाटणारी ओढच निराळी आहे. लहानपणापासून एक प्रकारचा लळा लागलाय. लहानपणापासून त्याच्या पंक्तिला बसून जेवण्याची जी गंमत आहे ती आजही मी अनुभवते. अगदी नव्यान लहान होऊन ! माझी आजी मला बोलवून बेदाणे, खडीसाखर, मनुके द्यायची. त्यानंतर असा मेवा मला मिळाला असेल तर तो दादामामाकडूनच ! आजही कोल्हापुरात एखादा दिवस घालवला तरी खूप छान वाटतं. परत येताना त्यानी जवळ घेऊन आपलेपणानं 'पुन्हा कधी येणार ?' म्हणून विचारलं की वाटत जाऊच नये. लहानपणी त्यांच वेगळेपण जाणवायचं पण समजलं नव्हतं. आज मोठी झाल्यावर काहीवेळा माझं मलाच त्याच्यासमोर बुजल्यासारखं होतं. एकाचवेळी ताईच B.A.level चं इंग्लिश आणि माझं सहावीतलं इंग्लीश. पुस्तकांशिवाय हा माणूस कसा शिकवू शकतो कुणास ठाऊक ? त्याच्याकडे पाहिलं की वाटतं. आपण कुठे आहोत ? आपल्याला कुठे जायचय. त्याच्या ज्ञानाची छोटीशी झलकही दिपवून जाते. आणि वाटतं-

व्हायचय मला बरंच काही
बरंच काही जाणून घ्यायचय
बरंच काही अनुभवायचय अन्
बरंच काही सांगून जायचय

दादामामा काय आहे ? त्याच मोठेपण मग ते मनाच असो, ज्ञानाच असो किंवा आणखी कुठलं ! मी खरचं पूर्ण जाणलं नाहिये. त्याच्या वेगळेपणाच्या गोष्टी मात्र खूप जणांच्या अनुभवांच्या बोलातून ऐकल्या आहेत. मी त्याला जाणून घ्यायला अजून लहान पडत असेन.... कदाचित मी ते कधीच जाणूही शकणार नाही. पण तरीही त्याच्यातलं जे जाणलय ते माझ्यासाठी खूप आहे. त्यानी खूप माणसं जोडलीयत. सगळ्यांना आपलस केलय आपण सगळ्यांना हवे आहोत. अगदी खूप खूप हवे आहोत. ही जाणीवही माणसाला जगायला पुरेशी असते नं ? यापेक्षा जास्त काय हवं असतं ? आणि इतर

सगळ्या बरोबरच हे नेमक हेच तो त्याच्या परिचयाच्या प्रत्येक व्यक्तीकडून अनुभवतोय.

दादामामा हैं माझ्या छोट्याशा विश्वाला व्यापून उरणारा एक उत्कट ओलावा आहे. माझं सगळं काही असणारी माझी आई ज्याच्या संस्कारातून घडली असं अजोड व्यक्तिमत्त्व आहे ते ! त्याच्यात मला मामाची माया मिळाली. आजोबांच अंत:करण भेटलं, त्याच असामान्यत्त्व जाणवलं, काही तरी सतत करत राहण्यासाठी स्फूर्ती मिळाली. अगदी भरभरून सगळं मिळालं. त्याच्या सहवासातला प्रत्येक क्षण नक्कीच मला काहीतरी शिकवून गेलाय. आईच्या प्रत्येक कृतीतून त्याचीच अनमोल शिकवण मी आत्मसात करतीय. आज मी जी वाढलीय ती त्याच्याच आशीर्वादाच्या स्पर्शातून ! आजी नसली तरी आजोळचा ओलावा आजोळची ओढ त्यानंच जपलीय.

अशीच लिहित राहिले तर लिहितचं जाईन. हे आपलेपण, ही माया अशी शब्दांबरोबर थांबणारी, संपणारी का असते ?

'दादामामा' ही माझ्या श्रद्धेची श्रद्धा आहे !मी. जास्त काय लिहिणार ? माझ्या जीवनाची सुरवात आहे आत्ता कुठे. पण मामाचे संस्कार, त्याचा आशीर्वाद मला नक्कीच कधी पस्तावण्यासारखं काही करू देणार नाहीत. मला नाही माहीत, देव आहे की नाही. माझं वयही अजूनी अर्धवट आहे आणि ज्ञानही ! मला वाटतं देव नाहीही आणि आहेही. पण तरीही तो मला भेटलाय. नक्कीच भेटलाय. माझ्या आईच्या संस्कारातून आणि माझ्या मामाच्या आशीर्वादातून ! कसलीही साधना न करता ! !

---

## मला दिसलेले दादा

*सौ. बाबी नाईक*

---

"दादा" हे शब्दच उच्चारताना मनाला इतकं प्रसन्न वाटतं त्याच्याबद्दल वाटणारी कृतज्ञतेची भावना कोणत्या शब्दात व्यक्त करावी हे कळत नाही. शब्दही अपुरे वाटतात.

माझे वडील व ती. दादा हे फार जुने मित्र त्यावेळी आम्ही संकेश्वरला होतो. मी हायस्कूल मध्ये शिकत होते. तेव्हापासून मी ती. दादांना ओळखते. S.D. हायस्कूलचे ते हेडमास्तर ते आमच्या वर्गावर कधीतरी येत. शिकविण्याची पद्धतही चांगली. ते विद्यार्थ्यांची थोड्यावेळात चांगली पारख करीत. मी ही बऱ्यापैकी विद्यार्थिनी होते. त्यावेळी ते मला म्हणाले होते. "तू जर थोडा प्रयत्न व मेहनत केलीस तर खूप शिकशील. पण मला माझ्या घरच्या परिस्थितीमुळे साध्य झालं नाही.

एक दोन वर्षात त्यांनी शिक्षकी पेशा सोडला. माझ्या वडिलांनीही संकेश्वर सोडले. त्यामुळे ७३ सालापर्यंत त्याचा आमचा फारसा संपर्क जवळ जवळ २०/२२ वर्षे आला नाही. या कालावधीत माझी आई वारली. वडील खूप आजारी पडले. मी मोठी मुलगी धाकट्या ५ बहिणी अशावेळी. मी सोसलेलं कष्टमय जीवन. माझी होत असलेली मानसिक कुचंबणा यांची त्याना पूर्ण कल्पना होती. ते मला अत्यंत कष्टाळू व प्रामाणिक मुलगी म्हणून ओळखीत असत.

लग्नानंतर माझी आर्थिक परिस्थिती फारशी चांगली नव्हती. मी ७१ साली निपाणीत रहायला आले. त्यावेळी पुन्हा ती. दादांची भेट डी. व्ही. जोशी यांच्या घरी झाली. त्यावेळी ते अध्यात्म ज्ञानाचा फार मोठा व्यासंग असलेली एक थोर व्यक्ती म्हणून ओळखले जात एवढच मला कळलं होतं. त्यामुळे मला त्यांच्या बद्दल भीतीही वाटू लागली. व आदरही वाटू लागला. माझी प्रेमाने, आस्थेने चौकशी केली. ज्या ज्या वेळी भेटत त्या वेळी प्रेमाने विचारपूस करीत. माझा आदर वाढू लागला. माझ्या वडिलांनी सुद्धा माझ्या भावनांची कदर केली नाही. प्रेमाने विचारपूस केली नाही. वडील येत असत. परिस्थितीमुळे औपचारिकरीत्या आर्थिक मदत करीत असत. ते माझ्या स्वाभिमानी मनाला ओझं वाटायचं पण इलाज नव्हता. पण ती.दादांच तसं नव्हतं त्याच्या विचारण्यात आस्था होती, प्रेम होतं, सहानुभूती होती. मला वाटणारी भीती कमी झाली. हळू हळू भीडही चेपली व मी माझं कोंडलेलं मन दादांच्या पुढे उघड करू लागले. मी दादांना नेहमी विचारीत असे. की लहानपणापासून मी कष्ट करते सर्वांकरिता माझं मन मारल पण कुणालाच याची जाणीव असू नये. जन्मदात्या वडिलांनासुद्धा माझ्याबद्दल आस्था नसावी. मी सदा उपेक्षितच राहिले हे माझ्या बाबतीत अस का ? दादा म्हणत काही प्रश्न असे असतात की त्या का ला उत्तर नसत. जे येईल ते सोसायचं. अशावेळी दादा आपली स्वत:चे अनुभव सांगत आध्यात्मिक ज्ञानाचे काही प्रसंग सांगत. गोंधळलेलं मन शांत व्हायचे.

माझ्या मुलीच्या लग्नाची मला खूप काळजी वाटे. दादांच्या पुढे गाऱ्हाणं गायचं आर्थिकबळ नाही मनुष्यबळ नाही. कसं होणार ? दादा म्हणायचे ज्याला कोणाचे साह्य नसते त्याला परमेश्वर साह्य करतो तू काळजी करू नकोस. तुझ्यापेक्षाही स्थळ चांगल मिळेल. तुझ्या पाठीशी परमेश्वर आहे. काळजी करू नको. त्याप्रमाणे मुलीचं लग्न झालं. तिची काळजी नाही.

आजही माझ्या प्रपंचात मला मानसिक आघात सोसावे लागतात. सांगताही येत नाहीत मन:स्वास्थ्य असत नाही. आपलं कुठं चुकलं ? हा प्रश्न सतावीत असतो. मनाला एक प्रकारची हुरहूर लागते. आपण काहीतरी हरवलो अस वाटायला लागतं पण ती. दादांची भेट झाली. "तू बरी आहेस ना ?" असं त्यांनी म्हटलं की मन शांत व्हायचं. असं हे बरेच वेळा घडत असे. म्हणून माझ्या या कष्टमय आयुष्यात ते मला ओयासिस प्रमाणे

वाटतात.मला ते आदरणीय व पूजनीय व्यक्ती वाटतात.विखुरलेल्या मनाला दिलासा देणारे दादा दु:खी जीवाला कवटाळणारे दादा तापलेल्या मनाला फुंकर घालणारे दादा. मला त्यांनी आपल्या मुलीप्रमाणे मानलं हे माझं मोठं भाग्य समजते. दादांच्याबद्दल लिहाव तेवढ थोडकं आहे. माझ्या अपुऱ्या ज्ञानामुळे त्यांच्याबद्दल वाटणारी कृतज्ञतेची भावना व्यक्त करण्यास शब्दही अपुरे आहेत. त्यांचे माझ्यावर असेच अखंड प्रेम राहो. त्यांचा आशीर्वाद मला सतत मिळावा. हीच परमेश्वर चरणी माझी विनम्र प्रार्थना.

## पूज्य दादा

*डॉ. पी. सी. मेहता, निपाणी*

तीस पस्तीस वर्षाचा दादांचा सहवास ही एक आयुष्यात लाभलेली अमोल पर्वणी म्हणायला हरकत नाही. मी, माझी पत्नी, मुले व सुना. आम्ही सर्वजण दादांना आमच्या कुटूंबातील वडिलधारी व्यक्ती मानतो. ज्या ज्या वेळी आयुष्यात काही अडचणी (problems) निर्माण झाल्या आणि प्रत्येकाच्या आयुष्यात अनेक अडचणी येत असतात. मन बेचैन होतं अशावेळी मार्गदर्शनाची जरुरी असते. कुणीतरी चार शब्द सांगावेत असं वाटत असत. पाठीवरून हात फिरविणारी माणसं हवीहवीशी वाटतात. अशावेळी आम्ही, मी व माझी पत्नी सौ. कल्पना, आम्ही संकेश्वरला दादांच्याकडे जात असतो. तास दोन तास नुसतं आम्ही बसायच. त्यांच्याशी अनेक गोष्टीवर चर्चा करायची व परत फिरायचं. एक दोन तासाच सान्निध्यसुद्धा आम्हास शांतिदायक वाटतं. आमच मन मोकळं होत व एका नवीन विचारान एका नवीन प्रेरणेन नवीन उत्साहान आम्ही घरी येतो.

अनेक रात्री आम्ही, दादा व मित्रमंडळी आमच्या घरी अथवा अनेक मित्रांच्या घरी जात असू. चर्चेचा विषय कुठला म्हणाल तर खूप विषय, केव्हातरी साहित्य English व मराठी केव्हातरी संगीत अध्यात्म ज्योतिष, केव्हा उजडायच हे आम्हाला कळतच नसे. त्यांची बुध्दिमत्ता, या सर्व विषयांचा अभ्यास तासनतास नुसत ऐकत रहाव अस वाटतं.

एक व्यक्ती अधिकारवाणीनं अनेक विषयावर आपले विचार मांडते व आम्हा सर्वांना एक जागेवर रात्रभर खिळवून ठेवते ती व्यक्ती सामान्य असूच शकत नाही. दादांच्या ठिकाणी असलेली अध्यात्माची बैठक एक वेगळी शक्ती त्यांच्या अंगी वास करते याचा आलेला अनुभव व त्यांच्या अंगी असलेली power हे सर्व पहाण्याचा योग आला. हे आमच भाग्य समजतो.

# संकेश्वरचे भूषण श्री. दादा नाईक

*वि. वि. बापट*

संकेश्वर या छोट्याशा शहराचे भूषण म्हणून ज्यांचा सार्थ उल्लेख करता येईल असे माझे ज्येष्ठ मित्र माननीय धों. श्री. तथा दादा नाईक, यानी ८० व्या वर्षात पदार्पण केले आहे. या निमित्ताने त्यांचा संकेश्वरच्या नागरिकांतर्फे जो सत्कार होत आहे: तो अगदी यथोचित आहे. मीही मूळचा संकेश्वरचाच. माझे भवितव्य ठरविण्याच्या दृष्टीने मी जेव्हा १९३४ च्या जानेवारीत संकेश्वरातून बाहेर पडावयाचे ठरविले तेव्हा डोळ्यापुढे अंधारच होता. जाण्यापूर्वी मी ज्या दोन चार ज्येष्ठ लोकाना भेटलो त्यात श्री. दादा नाईक हे होते. मी त्याना भेटलो व त्यानीही मला एका वाक्यातच आशीर्वाद दिला. ते म्हणाले, 'अवश्य जा तुझे चांगलेच होईल." आणि खरोखरच त्यानी मनापासून दिलेला आशीर्वाद व व्यक्त केलेल्या सदिच्छा खऱ्या ठरल्या.

मी पुण्यात स्थायिक होऊन काही काळानंतर जेव्हा जेव्हा संकेश्वरला जात असे त्या त्या वेळी प्रथम श्री. शंकरलिंगाला व नंतर दादांना भेटावयास जात असे. त्यांचा मराठी वाङ्मयाचा गाढा अभ्यास होता आणि मीही पुण्याला पत्रकारितेचा व्यवसाय करीत असल्यामुळे मी खूप वाचत असे, त्यामुळे दादांच्या व माझ्या भेटीत नव्या साहित्यावर खूप चर्चा होत असे. या चर्चेचा मला खूपच उपयोग होई. पुढे काही वर्षांनी माझी व त्यांची भेट झाली तेव्हा माझ्या असे लक्षात आले की दादांचा अध्यात्माचाही गाढा व्यासंग आहे. मला या विषयात फारसे काही कळत नसे. पण दादांचे अध्यात्मासारख्या विषयावरचे भाष्य ऐकून मीही मोहित होत असे. तथापि या अध्यात्मासारख्या विषयाचा दुरुपयोग करून त्याचे रुपांतर बुवाबाजीत करण्याचा मोह त्याना कधीही झाला नाही. तसे त्यानी केले असते तर लक्षावधी रु. त्यानी मिळविले असते. संकेश्वर येथील आपला व्यावसायिक व कौटुंबिक घ्याप यामुळे त्याना बाहेर पडता आले नाही, पण तशी संधी त्याना मिळाली असती तर महाराष्ट्रातील विद्वानात त्याना नक्कीच वरची श्रेणी मिळाली असती. ते उत्तम शिक्षक होते. आणि संकेश्वरच्या इंग्रजी शाळेत ते मराठीप्रमाणेच इंग्रजीही उत्तम शिकवीत असत.

ते जेव्हा जेव्हा पुण्यास येत असत तेव्हा तेव्हा स्मरणपूर्वक मला फोन करून बोलावून घेत असत व त्याही वेळी आमची अनेक विषयावर चर्चा होत असे. या काळात माझ्या प्रकर्षाने असे लक्षात आले की त्यांची ज्ञानाची कक्षा खूप खूप मोठी झाली आहे. त्यांचा आणखी एक गुण म्हणजे 'विद्या विनयेन शोभते'. हे संस्कृत बोधवचन त्यानी प्रत्यक्ष आचरणात आणले आणि आजपर्यंत ते तसेच वागत आहेत. एरवी अर्ध्या हळकुंडाने

पिवळे होणारे तथाकथित विद्वान मी पुण्यात खूप बघितले आहेत. काही महिन्यापूर्वी मी कोल्हापूरला गेलो असताना त्याना त्यांच्या निवासस्थानी भेटलो होतो. त्याही वेळी आमची अनेक विषयावर चर्चा झाली. त्यानी माझ्यासाठी म्हणून कोल्हापूरचे एक गाढे व्यासंगी व विद्वान पंडित प्राचार्य एम. आर. देसाई याना फोन केला व त्यांच्याकडे मला घेऊन गेले. प्राचार्य एम. आर. व श्री. दादा यांच्यातील महाभारत रामायणावरील विद्वत्तापूर्ण चर्चा ऐकण्यात दोन तास केंव्हा निघून गेले हेही आम्हाला कळले नाही. माझ्या अल्पज्ञानाप्रमाणे मीही या चर्चेत थोडी फार भर घातली आणि प्राचार्यांच्या निवासस्थानातून बाहेर पडताना खूप काही शिकून गेलो.

दादांच्या आणि माझ्या आवडीत आणखी एक समान धागा आहे. आणि तो म्हणजे शास्त्रीय संगीत, संकेश्वरला दादांनी पूज्य टेंबेस्वामींची पुण्यतिथी दरवर्षी संगीत महोत्सव भरवून साजरी केली. त्या संगीत समारोहाचे मला ते न चुकता निमंत्रण पाठवीत पण मला एकदाही उपस्थित रहाता आले नाही. दादांचे हे एक सांस्कृतिक कार्यच होते. मला, पुण्यात असल्याने व भारत गायन समाज या कै. भास्करबुवा बखले यांनी स्थापन केलेल्या संस्थेत भारतातील अनेक नामवंत गायक-गायिकांच्या शास्त्रीय संगीताच्या मैफली ऐकावयास मिळाल्या. त्यात संकेश्वरच्याच पण पुढे कोल्हापुरात स्थायिक झालेल्या गायिका बाई आझमबाई यांच्याही दोन मैफिली मी ऐकल्या. दादांना शास्त्रोक्त संगीताचे बारीक सारीक तपशीलासह खूपच ज्ञान आहे. मला स्वतःला शास्त्रीय संगीत खूप आवडते पण त्यातले तपशील मात्र मोजकेच माहित. मी एकदा पं. भीमसेन जोशींची मैफिल ऐकल्यावर त्याना गमतीने म्हटले 'पंडितजी तुम्ही तानसेन आहात मी फक्त कानसेन आहे" तेंव्हा ते तत्परतेने म्हणाले, 'तुमच्यासारखे कानसेन आहेत म्हणूनच आम्ही तानसेन आहोत." कोल्हापूरच्या दादांच्या भेटीत शास्त्रीय संगीताच्या असंख्य कॅसेटस् मी पाहिल्या.

## श्रद्धेय धोंडोपंत (दादा) नाईक

*राम कमलाकर*

श्रद्धेय दादांची कमलाकर घराण्यावर एवढी कांही कृपा झाली आहे की, त्याबद्दल कृतज्ञता शब्दांत व्यक्त करणे खरोखर कठीण आहे. ऐहिक दृष्टीने आम्हा सर्वांची प्रगती करून आज या सोनेरी दिवसाची प्राप्ती तर करून दिलीच परंतु, त्याहीपेक्षा महत्त्वाच्या परमार्थाच्या उबरठ्यावर आम्हा सर्वांना त्यांनी आणून सोडले व आम्हाला धन्य केले आहे. त्यांच्याच प्रेरणेने व त्यांचे कृपाशीर्वाद पाठीशी घेऊन ही दुर्लभ वाटचाल करण्याचा प्रयत्न आम्ही करीत आहोत.

आमच्या प्रमाणेच अनेक कुटुंबांना त्यांनी धन्य केले आहे. भविष्यात सुद्धा अनेकांना प्रेरणादायक ठरणाऱ्या श्रद्धेय दादांना आमचे कोटिकोटि प्रणाम.

## ज्ञानाचं खुल भांडार

*सौ. अनिता अनिल जनवाडकर*

आमच्या काही कामासाठी मी व माझे पती ती. दादांच्याकडे गेलो होतो. तसे आम्ही कोणत्याच गोष्टीवर अनुभव असल्याशिवाय श्रद्धा ठेवणारे नाही. त्यामुळे प्रथम जाताना केवळ ओळखीतले एक वडिलधारे गृहस्थ याशिवाय कोणतीच भावना मनात नव्हती. पण एकदा तिथे गेल्यानंतर मला वाटत आम्ही त्यांचेच झालो ! त्यांच्या जवळ जवळ सर्वच गोष्टी आदर्शवादी म्हणून स्वीकाराव्या अशा. त्यापैकी एक म्हणजे प्रत्येकाचच काम 'आपलं' म्हणून करण्याची दादांची वृत्ती ! ते काम पुरं होईपर्यंत त्याचा पाठपुरावा ते सोडत नाहीत. त्यासाठी मग ते प्रकृतीला न झेपणाऱ्या अनेक गोष्टी करतात. पुष्कळदा याच कारणासाठी त्यांच्याबरोबर माझं जिव्हाळ्याच भांडणही झालय.

ती. दादांना भेटण्यापूर्वी मनात असंख्य प्रश्नांचे गुंते होते. त्यातून काही आशावादी सूर गवसेल असं वाटतच नव्हत. पण मला आलेल्या वेगळ्या अनुभवानंतर नसत्याच गोष्टींना आपण फार किंमत देतोय याची जाणीव झाली. तो अनुभव लिहिण्याचा मोह आवरत नाही.

"पहाटेची वेळ असावी. मी व माझे पती लहानशा टेकडीवर चढत होतो. बरेच लोक हातात हार व पेढे घेऊन आनंदाने टेकडीवरून उतरताना दिसत होते. आज काय असाव बरं ? या विचारात असतानाच त्यापैकी एकाला मी प्रश्न केला 'आज दादांचा वाढदिवस आहे. त्या सोहळ्यासाठी आम्ही गेलो होतो. असं उत्तर मिळालं.

आपण काहीच आणलं नाही याची खंत मला वाटू लागली. टेकडीवर श्रृंगारलेल्या मंडपात पू. दादा बसले होते. अनेक हार गळ्यात तसेच आजूबाजूला होते. मी पण एक हार घातला आणि भक्तिभावाने नमस्कार केला. दादांना माझ्या डोक्यावर आशीर्वादाचा हात ठेवला आणि एक चैतन्यमय अनुभूती जाणवली. एखादी तेजरेषा शरीरात सामावल्याचा भास झाला. आनंदाश्रूंनी डोळे भरून आले आणि अशा अवस्थेतच जाग आली. पण जागेपणीही हा अनुभव ताजा होता आणि आजही आहे."

या अनुभवानंतर अनेक प्रश्न असले तरी मनान एक छानपैकी तटस्थता स्वीकारली. यामुळ मात्र आताच माझं जीवन अधिकच आस्वादपूर्ण व्हायला मदत झाली.

कोणतीही गोष्ट मग ती आनंदाची असो वा चिंतेची ती सांगण्यासाठी दादांच्याकडे जाव अस वाटतं. वडिलांच्या मायेन त्यानी सांगितलेल्या मार्गान चालण्यातच खरी धन्यता !

दादांच्याकडे गेल्यानंतर किमान तास, दोन तास तरी सहज जातात. कितीही गडबड असली तरी, कुबेराच्या संपत्तीला लाजवेल असं अनेक प्रकारच्या ज्ञानाचं सदा खुलं भांडार, हे त्याच कारणं नवीन आलेली पुस्तकं, वेगवेगळ्या वाद्यांच्या, गाण्याच्या कॅसेटस् असे अनेक विषय बोलायला म्हणण्यापेक्षा ऐकायला मिळतात. श्रोता होऊन आणि थोडसं अज्ञान प्रकट करून अनेक प्रकारच्या ज्ञानात भरपूर भर पाडून घेण्याच कौशल्य आता मला साध्य झालय.

दादांना भेटलेली, भेटणारी अनेक प्रकारची माणसं, हा तर एक वेगळाच विषय, अनेक विषयातील उच्च ज्ञानामुळं अनेक व्यक्ती त्यांच्या संपर्कात येतात आणि मग येतच राहतात. त्यामुळं दरवेळी एखाद्या नवीन व्यक्तीशी ओळख होऊन आमच्या परिवारात भर पडत असते.

---

## मम सुखाची ठेव. . .

मम सुखाची ठेव देवा
राहू दे असाच हा ठेवा
आनंदाचा अन् प्रेमाचा
अखंडित ॥

घर यांचे जसे
भरले गोकुळ
सर्वांसाठी तळमळ
"दादांची" ॥

आल्यागेल्यासाठी येथे
प्रेमाचा पाझर
रहातो वाहत
सदोदित ॥

असावा त्यांचा आशीर्वाद
मिळावा गुणांचा वारसा
जोपासावा आम्हीही तो
मनोभावे ॥

- *"सुकन्या"*

## काही स्मृतिचित्रे

*- वसंत महादवेकर*

१९६४ च्या मे महिन्यात मला एक स्वप्न पडले. त्या स्वप्नात निपाणीचे डी. व्ही. जोशी (आण्णा) हे आपल्या मुलीचे कन्यादान मला करीत असल्याचे दिसले. दरम्यान गावाकडून (चिमगावहून) वडिलांचे पत्र आले व त्यानी डी. व्ही. जोशीना आपली मुलगी कला हिला मला दाखविणेसाठी पाठवत असल्याचे कळवले व दिनांक १५ मे १९६४ रोजी मुलगी दाखवणेचा कार्यक्रम झाला. मी मुलगी पसंत असल्याचे कळवले व दिनांक १२ जुलै १९६४ रोजी माझा विवाह स्वप्नात दिसलेल्या मुलीशी झाला. आश्चर्य म्हणजे स्वप्नांत दिसलेले महावस्त्र वहिनीनी व माझे पत्नीने नेसले होते. लग्नानंतर जेव्हा ती.स्व. दादांची ज्यावेळी ओळख झाली त्यावेळी स्वप्नाचा उलगडा झाला. ती. स्व. दादानी आमचे लग्नासंबंधी ४ महिने अगोदर सांगितले होते व त्यानुसार त्यानी सांगितलेल्या मुहूर्तावर बरहुकूम आमचे लग्न झाले- स्वप्नांचा व दादांच्या भविष्याचा असा हा संबंध होता. ती. दादानी आमचा विवाह पूर्वनियोजित असल्याचे सांगितले व सुखी संसार होईल असे त्यावेळी वर्तवले. ती. दादांचा व माझा परिचय अशाप्रकारे झाला. तेव्हापासून दादा मला जावयाप्रमाणे वागवत आले आहेत व आम्ही दोघेही त्यांचेकडे नेहमी जात येत असतो.

माझ्या मोठ्या मुलाचे जन्माचे वेळी नाशिक मधील डॉक्टर्सनी तपासून सौ. वनिताचे बाळंतपण माहेरी / खेडेगावात करू नका असा सल्ला दिला होता त्यावेळी माझे सासरे आण्णा दुंडग्यास परिश्रम विद्यालयात शिक्षक होते व बिऱ्हाड दुंडग्यात होते साहजिकच सौ. वनिताचे बाळंतपण दुंडग्यांतच करण्याचे त्यानी ठरवले होते. ती. दादांचे व आण्णांचे बोलणे झाले व ती. दादानी मला व सौ. वनिताला पत्र पाठवले व कांही उपासना सांगितली व कळवले ही बाळंतपण दुंडग्यास होईल व ते सुखरूप व मुलगा होईल. डॉक्टरांच्या सल्ल्याला न जुमानता मी सौ. वनिताला बाळंपणासाठी दुंडग्यास पोहोचते केले. आणि आश्चर्य सौ. ची प्रसूती डॉक्टरांचे मदतीविना दुंडग्यांतच घरी झाली व मुलगा झाला. ती. दादांचे सांगण्याप्रमाणे अर्थात मी मुलाच्या बारश्याचे दिवशी संपेल अशा बेताने श्री गुरुचरित्र सप्ताह केला व मुलाचे नांव रविंद्र ठेवले. याला दैवी चमत्कार म्हणायचे काय ?

मी नाशिक मर्चंटस् को-ऑ. बँकेतील नोकरी सोडून १९७७ साली सांगली बँकेत हजर झालो. माझी पहिली नेमणूक कोल्हापुरात महाद्वार रोड शाखेत झाली होती. त्यावेळी

माझेवर फार मोठे संकट आले होते. बँकेत एका खातेदाराने खोटा चेक देऊन मला फसविले होते. मी नाही म्हणत असता माझे ज्येष्ठ सहकाऱ्याने मला भरीस पाडल्याने मी त्या खातेदाराचा चेक Discount करून त्याला ओव्हरड्राफ्ट दिला होता चेक वसुलीला पाठवलेवर तो खोटा असल्याचे निदर्शनास आले. त्याच सुमारास माझे सासरे ती. स्व. आण्णा व ती. दादांचे वास्तव्य माझेकडे होते व त्यांचे सांगणेनुसार मी श्री. गुरुचरित्र पारायण केले होते व त्याचे समाप्ती दिवशीच मला त्या खातेदाराने फसविल्याचे निदर्शनास आले. ती. दादानी (काकानी) पैसे परत मिळतील असे ठामपणे सांगितले होते. माझी सांगली बँकेतील नोकरीची सुरवात होती. वयाच्या ४२ व्या वर्षी मी पूर्वीची नोकरी सोडून सांगली बँकेत आलो होतो त्यामुळे मी फारच घाबरून गेलो होतो पण दादांचेवर पूर्ण विश्वास असल्याने मी वसुलीसाठी खूप प्रयत्न केले व आश्चर्य म्हणजे दादांचे सांगणेनुसार माझे पैसे ४ दिवसांत परत आले व मी मोठ्या संकटातून पार पडलो.

ती. दादांनी आम्हा उभयतां पतीपत्नीला पितृवत वागणूक दिली असून आमचे अनेक सांसारिक अडीअडचणीचेवेळी आर्थिक मदतही केली आहे. आमचे बिऱ्हाड कोल्हापुरात होते. (१९७७/८०) त्यावेळी बऱ्याच वेळा दादांचा मुक्काम आमचेकडेच असायचा. रात्रीच्या रात्री आमचे घरी येणारे जाणाऱ्यांची वर्दळ असायची. अनेक मोठी माणसे त्यावेळी दादांचे निमित्ताने आमचे घरी आलेली आहेत. त्यांचा सहवास सतत हवाहवासा वाटतो. संकेश्वरला आम्ही त्यांचे घरी वर्षातून अनेकदा जात असू त्यावेळी आमची बैठक त्यांचे खास खोलीत असायची व तिथे रात्रभर आध्यात्मिक चर्चा होत असत. दादा कधीही रागवल्याचे आम्ही गेल्या २७/२८ वर्षांत पाहिले नाही.

१९७२ साली ती. स्व. दादा आमचेकडे नाशिकला आले होते त्यावेळी ते आमचेकडेच होते. माझा धाकटा भाऊ त्यावेळी कानदुखीने बराच आजारी होता कानाचा त्रास त्याला वारंवार होत असे. डॉक्टरनी त्याला ऑपरेशन करणे संबंधी सांगितले व ४-८ दिवसात ऑपरेशन करण्याचे ठरवलेही होते. दरम्यान तो रात्री आमचेकडे आला व ती. स्व. दादांना ही गोष्ट सांगितली. त्याचवेळी दादानी ऑपरेशन होणार नाही व त्याचे कारण नाही असे सांगितले व आश्चर्य म्हणजे अजूनपर्यंत तरी त्याचे कानाचे ऑपरेशन झाले नाही कान पूर्ण बरा झाला नसला तरी त्रास खूपच कमी आहे. दादांच्याजवळ असलेल्या सुप्त शक्तीचा असाही अनुभव आलेला आहे.

विज्ञान युगात अशा काही गोष्टींचा अनुभव आला की म्हणावे लागते की खरोखर दादांचे रुपाने परमेश्वर आहे व त्यामुळेच परमेश्वराच्या अस्तित्वाची जाणीव होते. इतरांचे अनुभवही माझेपेक्षा वेगळे असणार नाहीत.

## " माझ्यासारखी मीच भाग्यवान "

*सौ. अमरजा आ. जोशी*

ती संध्याकाळ आठवली की अजूनी माझ्या अंगावर रोमांच उभे रहातात. कंठ सद्‌गदित्‌ होतो आणि भाव दाटून येतात. लग्न झाल्या पासून म्हणजे जवळ जवळ आठ वर्षे मी ह्यांच्या कडून ती. प. पू. दादांच्याबद्दल ऐकत होते. मध्यंतरीच्या काळात एक दोन वेळा त्यांना भेटण्याचाही योग आला होता पण विशेष असं काही घडल नव्हतं. दादांना पाहिल्यावर मन अस्वस्थ व्हायच. पण अस का घडत हे कळत नव्हत.... आणि तो दिवस उजाडला. दादांच वास्तव्य - शहापूर येथे त्यांच्या कन्येकडे म्हणजे सौ. छोटाक्का यांचेकडे होतं. मी माझे मिस्टर व माझी दोन्ही मुले ती. प. पू. दादांच्या भेटीस गेलो. हळूहळू आधी बसलेली मंडळी गेली. मी दादांच्या कडे पहात होते आणि अचानक मला हुंदका फुटला. मी अगदी ओक्साबोक्शी रडत होते, उमाळा आवरत नव्हता. दादांचा मायेचा हात माझ्या पाठीवरून फिरत होता. कितीतरी वेळ तसाच गेला. मी भानावर आले... या मधल्या काळात काय घडलं ते इतराना कळावं म्हणून दादानी मला काय दिसल ते सांगायला सांगितल. ‘ मला दिसला होता नदीचा काठ, श्री नृसिंहवाडीची एकाकी ओवरी, औदुंबराची सावली त्याखालचा पार, शांत वाहणारी कृष्णा, आणि त्या औदुंबरातळवटी ध्यानमग्न बसलेले प. पू. दादा काशाय वस्त्रामध्ये. सन्याशांच्या रूपात, मी अगदी छोटीशी प. पू. दादांच्याकडे हात करून रडते आहे आणि दादा उठून निघून जाताहेत. दादा माझ्या पूर्व जन्मीचे वडील आणि मी त्यांची मुलगी. जन्मांतराने पडलेली ही गाठ !

मी केवढी भाग्यवान मला माझे दादा मिळाले !

अहो याहून परमभाग्य ते कोणते ?

## अलौकिक व्यक्तिमत्त्व

*जयंत कुलकर्णी , संकेश्वर*

दादा हे प्रसिद्धिपराङ्‌मुख आहेत. अत्यंत बुद्धिमत्ता असून देखील त्याबद्दल अहंकार, अभिमान न धरणारे म्हणजे दादा.

आमच्या घरचा व त्यांचा तसा फार जुना संबंध आहे. पण मी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाकडे १९७१ ला ओढलो गेलो. त्यावेळी त्यानी मला एक इंग्रजी कविता म्हणून दाखवली. मला आठवत ती कविता ट्रोजनवॉर संपल्यानंतरच्या घडामोडी बद्दल होती.

कविता सांगण्याची पद्धतच इतकी चांगली होती की, ती सांगत असतानाच माझ इंग्रजी चांगले नसताना देखील मला समजली. त्यामुळे मी फार भारला गेलो. त्यांचा सहवास मिळावा म्हणून मी मग नियमितपणे त्यांच्याकडे जाऊ लागलो. कोणती पुस्तके वाचावीत ह्याची माहिती त्यांच्याबरोबर चर्चा केल्यानंतर सहजच समजून यायची.

त्यांच्याकडे खूप चांगल्या पुस्तकांचा संग्रह आहे. त्या पुस्तकातली पान न् पान त्यांच्या लक्षात ह्याही वयात आहेत. इंग्रजी इतकच त्यांच मराठी भाषेवर पण प्रभुत्व आहे. त्यांना दोन गोष्टींची दैवी देणगीच आहे. एक म्हणजे अफाट स्मरणशक्ती व दुसरी म्हणजे वाचलेली प्रत्येक गोष्ट कोणत्याहीवेळी बरोबर जश्यास तर्शी Reproduce करणे. सतत वाचन असल्याने अद्यावत ज्ञानाचे भांडार म्हणजे दादा !

त्यांच्याकडे आकृष्ट होण्याचे दुसरे कारण म्हणजे त्यांची आध्यात्मिक बैठक व आध्यात्मिक वाचन. आध्यात्मिक पुस्तके वाचण्याची गोडी त्यांच्यामुळेच मला लागली. त्यांचा दुसरा गुण म्हणजे एखाद्याला एकदा आपला समजल कीं, त्याला हरघडीला मदत करणे, उपयोगाला पडणे. कोणतीही समस्या, शंका, काम असल की, त्याना सांगायच बस्स ! मग मी निश्चिंत. कारण त्यावरचा तोडगा ते नक्की द्यावयाचे. कितीही अवघडातल अवघड काम असल तरी ते व्हायच. ते स्वतः सर्बंधिताशी भेटून, बोलावून काम करून द्यायचे व देतात.

मी काही फार मोठा माणूस नाही वयाने व इतर गोष्टीने देखील. पण माझी आई आजारी पडल्यानंतर मी फार नर्व्हस् व विमनस्क झालो होतो. त्यावेळी ती. दादा रात्री दोन - तीन वाजेपर्यंत आमच्या घरी येऊन बसत. त्यामुळे आम्हाला खूप धीर यायचा. आणि दादा घरी आहेत म्हटल की, बाकी सगळ्या गोष्टी झट्-झट् व्हावयाच्या. म्हणजे डॉक्टरना बोलावणे, रात्री औषधाची व्यवस्था होणे वगैरे.

त्यांच्या घरी दत्ताचे अधिष्ठान आहे. दरवर्षी प. पू. टेंबे स्वामींची पुण्यतिथी त्यांच्या घरी मोठ्या प्रमाणात केली जाते. मला लहानपणापासून नृसिंहवाडीची व दत्त ह्या देवतेची ओढ आहे. त्यामुळे नृसिंहवाडीला मी खूपदा जातो. पण आमच्या घरात दत्ताची उपासना करणे किंवा गुरुचरित्र वाचण्यास बंदी आहे. कारण पूर्वी काहीतरी गोष्टी घडल्या असतील. गुरुचरित्र वाचण्याची ओढ व घरी न वाचण्याचा प्रघात ह्यामुळे मनाची फार घालमेल व्हावयाची. गुरुचरित्र वाचण्याची उर्मी मला स्वस्थ बसून देत नव्हती. शेवटी मागच्या वर्षी दादानी मला " तू गुरुचरित्र वाच काही होणार नाही, मी त्याला जबाबदार आहे " म्हणून सांगितल. मी त्यांच्या हस्तेच पोथी घेतली व पारायण केल. हे जे आध्यात्मिक धैर्य त्यानी मला दिल आहे ते विसरण कधीतरी शक्य आहे काय ?

## विसाव्याच ठिकाण

*उषा मुद्रस*

त्यावेळी मी सुमारे ७ ।८ वर्षाची असेन. एके दिवशी मामांनी माझ्या आजोबांनी सांगितल, " उद्या संकेश्वरातून दादा व जोशी डॉक्टर येणार आहेत."

दुसऱ्या दिवशी ते आले. वय साधारण ५० ।५५ च्या आसपास. आल्याबरोबर त्यांनी मामांना वाकून नमस्कार केला. दुपारी जेवण झाली आणि २ ।३ तासांनी ते जायला निघाले. तसाच नमस्कार करून.

ज्या माझ्या आजोबांना आम्ही देवतुल्य मानत होतो त्यांना कौतुक असलेले दादा कसे असतील असा प्रश्न माझ्या मनात होता. ती. मामांना त्यांनी जेव्हा विनीत भावान वाकून नमस्कार केला तेव्हा त्यांच्याबद्दलही माझ तसंच काहींस मत झाल. माझ्या कृश, पंचा नेसलेल्या ऋषितुल्य आजोबांना त्यांनी केलेला नमस्कार अजूनही माझ्या स्मरणात ताजा आहे.

त्या भेटीत आजोबांनी माझी दादांशी ओळख करून दिली आणि मामांसारखच माझ कौतुक करणारं माणूस मला मिळालं.

त्यानंतर ती. मामा गेले. माझी कर्तव्यनिष्ठ आई व स्वच्छ मनाचे वडील गेले. गेल्यावर्षी देवतुल्य मामांना सर्वार्थाने शोभणारा पुण्यश्लोक जावई - माझा सहचर - ऐहिक जगातून निघून गेला.

या एकाहून एक भयंकर, हादरवून टाकणाऱ्या आघातांत टिकून राहिले - एका परमेश्वराच्या शक्तीमुळे आणि दुसर दादांच्या धीरोदात्त सहानुभूतीमुळे.

ती. दादा हे एक माझ विसाव्याच ठिकाण आहे. एवढ्यांन सर्व आलं. त्यांच्या-बद्दलच्या सर्व भावना यथार्थपणे व्यक्त करायचं सामर्थ्य माझ्या शब्दांना नाही. एखाद्या शब्दप्रभूच दादांच अनेक पैलूंच व्यक्तिमत्व दाखवू शकेल.

## एक विलक्षण अनुभव

***सौ. वसुधा विलास कुलकर्णी, सोलापूर***

" दादा " असे नांव उच्चारले म्हणजे मन भरून येणे म्हणतात ना तसे होते. त्यांनी सर्वांना एक प्रकारची आत्मीयता लावली आहे. त्याचे वर्णन शब्दात करणे कठीण आहे.

त्यांना अंतःकरणाची हाक पोचते. आपण मनापासून त्यांचे स्मरण करावे त्याची भेट होतेच. असे हे दादा कोण ? कुठले ?

आमच्या वडिलांचे ते स्नेही. म्हणजे त्यांच्या आयुष्यातील सर्व सुखदुःखाच्या प्रसंगी त्यांच्या पाठीमागे खंबीरपणाने उभे राहणारे व आमच्या वडिलांनाही उभे करणारे. त्यांचा शब्द आमच्या घरी प्रमाण मानला जाई. दादा म्हणतात ना ! मग झाले. प्रथमतः आमची आई त्यांना मानीत नव्हती. पुढे प्रसंगानुसार तिला त्यांच्यातील आध्यात्मिक शक्तीची जाणीव झाली व ती दादामय होऊन गेली. पुढे असे होऊ लागले की तिच्या यातना त्यांना समजू लागल्या व त्यावर ते फुंकर घालण्यास येऊ लागले.

असे होता होता एक दिवस असा उजाडला. तो शुक्रवारचा दिवस होता. आमची सर्वांची जेवणे आटोपली होती. आता सर्वजण झोपण्याच्या तयारीत होते. तेव्हा माझ्या वडिलांनी माझ्या भावाला बिडी बंडल आणण्यास सांगितले. तो थोडा नाराजीनेच गेला. बिडी बंडल घेऊन आला व झोपी गेला. तासाभरातच त्याच्या कण्हण्याचा आवाजाने सर्वजण जागीझाली. तो काही तरी बडबडत होता. " सोड की रे, सोड की रे," अशा प्रकारचे कोणालाच कळेना. डॉक्टरांना बोलावले त्यांनी त्याला झोपेचे इंजेक्शन केले. पण त्याचा काहीच परिणाम झाला नाही. त्याला फारच त्रास होत होता. कुणीतरी धरल्यासारखे त्याला वाटत होते. सकाळी उठल्यावर मग त्याच्या सर्व मित्रांना बोलावले. त्यांच्याबरोबर संध्याकाळ पर्यंत तो चांगला वागल्याचे त्यांनी सांगितले. मग याला झाले तरी काय ? कोण म्हटले उतरून टाका. तोही प्रकार झाला. त्याच्याजवळ ठेवलेल्या चाकूकडे व लिंबूकडे बघून ' ते काढून टाका, ते काढून टाका,' असे बोलू लागला. आम्ही म्हणायचे की ' तू टाक ' तर म्हणायचा ' मला टोचतय ' तो कॉटवर होता तर त्याच्या अवती भवती सगळीकडे आम्ही उशा लावल्या होत्या. कारण हाच सरकत सरकत आपले डोके भिंतीवर आपटून घेत असे. आम्ही रामरक्षा म्हणू लागलो तर त्याने आपल्या कानावर हात ठेवून घेतले. असे दोन तीन दिवस होतच होते. घरात त्याला पहाण्यासाठी माणसे येत होती. वडिलांना काय करावे सुचेना. पुढे बुधवारी अमावास्या येऊन ठेपलेली. मग मात्र माझ्या आईचा धीर सुटला दादाचे हे लक्षण तिला बरे दिसेना व ह्या सर्वांतून तारणारे आपले दादाच हे तिने बरोबर ताडले व ती माझ्या वडिलांना म्हणाली " दादानां बोलावणार की तुम्हाला मुलाला मारायचे आहे ?" हे शब्द उच्चारताच वडिलांनी ताबडतोब दादांना आणण्यासाठी टॅक्सी पाठवली माझा काका व आतेभाऊ त्यांना आणण्यास निघाले. तसे संकेश्वर ते निपाणी हे अंतर फार नाही. टॅक्सी दादांना आणण्यास गेली इकडे दादा आईच्या पाठी लागला. " कोणाला बोलवलीस सांग कोणाला बोलावलीस सांग, आई आमची धीराची ती म्हणाली ' अरे आपले दादा, दादांना बोलावलय ' तो म्हणतो कसा " दादा काय ? तू फार केलीस तर तुला धरीन " आई म्हणाली, " मला धरणार, तर धर, पण माझ्या मुलाला सोड " मुलाचे तळमळणे आता आईला पाहवत नव्हते.

टॅक्सी संकेश्वरला पोहोचली. तेव्हां नुकतेच दादा घटप्रभेहून आले होते व शर्ट काढीत होते. काकाने त्यांना वडिलांचा निरोप सांगितला. त्यांची जेवणाची पाने वाढली होती ते म्हणाले, ' जेऊन जाऊ ' पण वडिलांनी त्यांना तिकडेच जेवणास येण्याचे सांगितल्याने ते तसेच टॅक्सीत बसले आणि जसजशी टॅक्सी निपाणीकडे येऊ लागली तसतसे इकडे दादाचे तळमळणे जास्तच होऊ लागले. त्याला नाचण्यास कॉट पुरे होईना, कोणी जरी धरले तरी त्यांना तो आवरेनासा झाला. अशा प्रकारचा धांगडधिंगा चालू असतानाच कोणीतरी म्हटले, ' दादा आले ' माझ्या आईचा आनंद गगनात मावेना. ती चटकन पुढे झाली व दारांतच तिने दादांच्या पायावर डोके टेकले " दादा तुमच्याकडे लागले म्हणा त्याशिवाय आत पाऊल टाकायचे नाही " दादांना काहीच कळेना कारण फक्त दादाला बरे नाही एवढाच निरोप काकाने त्यांना दिला होता. येथे येताच हा प्रकार ते गोंधळून गेले इकडे आई त्यांचे पाय सोडण्यास तयार नव्हती. त्यांनी शब्द दिला. 'माझ्याकडे लागलं ' झाले दादा आत आले आणि पाहातात तो सगळा प्रकारच निराळा होता. एका क्षणातच त्यांनी सर्व जाणून घेतले व दादाला ताकीद केली की " मी जेवून येतो तोपर्यंत काही गोंधळ करायचा नाही." असे सांगून दादा स्वयंपाक घरांत गेले तो इकडे आमचा दादा त्यांना वेडावून दाखवीत म्हणतो कसा, " म्हणे जेऊन येतो गप्प बैस" चांगला असता तर दादाने असे म्हटले असते का ? त्याच्यावर दुसऱ्याच शक्तीचा प्रभाव होता त्याला तो तरी काय करणार ? दादांनी शांतपणे जेवण केले. घरातील सर्वजणांना जेवण करण्यास सांगितले. मग आम्ही सर्वजण एकत्र जमलो. दादा कॉटवर होता हे दादा त्याच्या समोर एका खुर्चीवर बसले व त्याला त्यांनी हाक मारली ' किशोर इकडे बघ ' आणि त्या हाकेसरशी दादाने त्यांच्याकडे बघितले. दोघांची नजरानजर झाली आणि आमचा दादा एकदम धाडकन खाली कोसळला व ' अकुंदे जोगवा अकुंदे जोगवा ' असे तीनदा त्याने यल्लमाचा मंत्र म्हटला व तेथून आमची आजी चालू झाली. त्याचे असे झाले होते की आमची आजी व आमचा धाकटा काका हे दोघे काशी-यात्रेला गेले होते व वाटेतच आमची आजी देवाघरी गेली तेव्हा तिची इच्छा होती की आपण आमच्या माणसांना भेटावे आपण परदेशांत गेलो. ही तिची जबरदस्त इच्छाशक्ती. तिच्या जोरावर मेल्यावर ६ महिन्यांनी तिला तिचे माणूस सापडले व तिने आमच्या दादाला पकडले. आपण म्हणत असतो की माणूस मेले की संपले पण तसे नसते हे आमच्या घरातील प्रत्यक्ष घडलेल्या उदाहरणावरून कळते. आजी चालू झाली म्हणजे काय असे म्हणाल तर फक्त शरीर आमच्या भावाचे होते पण प्रत्येक हालचाल आमच्या आजीची आणि मजा म्हणजे आता आम्ही जेव्हा रामरक्षा म्हणू लगलो तेव्हा तिने ती स्वतः म्हणण्यास सुरुवात केली. म्हणजे

सगळे न उलगडणारे कोडेच होते ते. पुढे तिने आम्हास आंघोळ घालण्यास सांगितली. कारण तिचे अंग घाण झाले होते म्हणे. काकाला विचारले तेव्हां तो म्हणाला, ' तिची शेवटची आंघोळ शरयू नदीत झाली तेंव्हा तेथे पाऊस पडला होता व ते पाणी गढूळ होते.' असे एकेक चमत्कारिक अनुभव येऊ लागले. तिला भेटावयाचे होते त्या, त्या प्रत्येक माणसाना बोलावणे पाठविले. आमच्या शेजारी जुगुळकर गुरुजी रहात असत. त्यांना जरा ह्या बाबतीतले कळत असे. ते तिला भेटायला आले आणि बोलता बोलताच ' हा गुरुजी हा मंत्र आताच नाही म्हणायचा मी तुम्हाला सांगेन. जायच्या वेळी तुम्हीच तो म्हणायचा." म्हणजे मनातल्या मनात गुरुजींनी म्हटलेला मंत्र तिला कसा कळला व त्यावर लगेच तिने त्यांना उतरून टेवले. सगळेच अघटित. पुढे सुद्धा त्याला डॉक्टरांचे औषधच चालूच होते. तेव्हा पण मजाच झाली. तिने औषध घेण्यास नकार दिला. पण आमच्या वडिलांनी पुत्रप्रेमाने तिला औषध घेणे भाग पाडले. झाले; वडिलांची चूक झाली. चार तास जवळजवळ तिच्या ओकाऱ्या सारखे प्रकार होऊन पुढे तिने ती गोळी आपल्या शरीरातून बाहेर टाकली. तसे पाहू गेल्यास ३ तासात पोटांत गेलेले सर्व पचते. पण चार तासांनी कणभर सुद्धा फरक न पडलेली गोळी बाहेर पडली. अशा प्रकारच्या घटना घडत होत्या व ती म्हणत असे, 'किशोर माझा लाडका नातू आहे मी त्याला त्रास देणार नाही.' वडिलांच्या समजण्या-पलिकडे सर्व गोष्टी गेल्या होत्या. पुढे बुधवारी अमावास्या होती दुपारी बारा वाजता संपणार होती. त्या अगोदर तिच्या सर्व लेकी जावई तिला येऊन भेटून गेले होते. वडिलांना तिने पिंड दान करण्यास सांगितले. 'वडील म्हणाले, ' कावळ्याने पिंडाला शिवले आहे.' त्यावर ती म्हणते कशी ' कावळा पिंडाला शिवेलच कसा. माझी इच्छा तुम्हा सर्वांना भेटण्याचीच होती. कावळ्याने शेणकूट उचलले होते.' तिच्या म्हणण्याप्रमाणे सर्व काही होणे भागच होते. वडिलांनी सर्व तयारी केली. बारा वाजायला आले तशी कॉटवर बसून राहिली व एक आला, दोन आले, तीन आले असे म्हणू लागली. आम्ही विचारले ' हे काय बोलतेस आजी ' तर म्हणते कशी, ' अग कावळे आले.' बाहेर बागेत जाऊन पाहतो तो खरेच की आता तिने त्या गुरुजींना तो मंत्र म्हणण्यास सांगितला. ' हं गुरुजी म्हणा आता तो मंत्र ' व बरोबर बारा वाजता पिंडाला कावळा शिवला. ते सर्व झाल्यावर आजीने तिला आंघोळ घालण्यास सांगितले होते. नंतर तिला आंघोळ घातली तेव्हा दादा रडू लागला. " माझ्या जवळ आजी होती गेली !' सर्वजण म्हणू लागले, ' अरे बाबा तेवढ्यासाठी तर एवढे केले. गेली तर जाऊदे. कावळा पिंड घेऊन जाते वेळी वडील दहादा त्याकडे बघत होते न जाणो परत कावळा शेणकूट उचलायचा व परत आपल्या मुलाला हा सर्व त्रास व्हायचा. म्हणतात ना एकदा तोंड पोळले की माणूस ताक सुद्धा फुंकून

घेतो. तशी वडिलांची अवस्था झाली होती. परत आपल पोर आपणास मिळते की नाही अशी आईवडिलांची अवस्था झाली होती. त्या सर्व प्रसंगातून फक्त दादांच्या मुळेच आमचा दादा वाचला व आजपर्यंत आमचा भाऊ आमच्या डोळयापुढे आहे. जर दादांचा आधार आम्हाला नसता तर आमच्यातील कोणीच सावरू शकले नसते.

एवढा सगळा प्रकार झाल्याबद्दल मग दादांची आमच्या बरोबर चर्चा झाली. तेव्हां ते म्हणाले, की ' माणूस मेल्यावर जर त्याची इच्छा राहिली असेल तर तो अतृप्त आत्मा बनतो. त्यांची एक साखळी तयार होते. आता आमचा दादा ह्याला आजी लागली होती ती ' सोड की रे सोड की रे ' म्हणत होती. ते कोणाला ? असे म्हटले तर आजीला आमच्या दादाचे शरीर मिळाले होते. तिला दुसऱ्या एका अतृप्त आत्म्याने पकडले होते व तो तिला सोडत नव्हता. म्हणून आजी त्याला ' सोड की रे, सोड की रे ' म्हणत होती. अशा प्रकारचा हा विचित्र अनुभव आमच्या घरात येऊन गेला आहे. त्यामुळे आत्मा, परमात्मा ह्यावर लोक विश्वास ठेवत नाहीत त्या सर्व गोष्टीवर आमचा विश्वास आहे. आणि त्या सर्व प्रकारात जर दादांचा आधार नसता तर आमचा दादा आमच्या हाती लागला नसता. त्याच्या वरील कृपेनेच आमच्या आईवडिलांना त्यांचा मुलगा व आम्हाला आमचा भाऊ पाहाण्यास मिळाला. आमच्या आजीला सुद्धा त्यांच्यामुळेच मुक्ती मिळाली. त्यासाठी तिने दादाना बोलावले व त्यांच्या पायावर डोके टेकले व त्यांच्यामुळे मुक्ती मिळाली असे सांगितले.

ज्यावेळी दादाची व दादांची नजरानजर झाली होती त्यावेळी दादांच्या शरीरातून तीन विजेच्या चमका गेल्या असे त्यांनी सांगितले. म्हणजे जी वाईट शक्ती होती ती सर्व दादांनी आपल्याकडे घेतली व त्या शक्तीला पचवले. ही वाईट शक्ती माणसाला आपल्याकडेच घेऊन जाते. आमच्या घराची वेळच चांगली म्हणून दादा आले व त्यांच्या कृपेने सर्व व्यवस्थित पार पडले. असा एकच प्रसंग नव्हे तर किती तरी अनुभव आमच्या गाठीशी आहेत. म्हणून आमच्या घरातील सगळे 'दादामय' होऊन गेलेत.

## संसार हा सुखाचा

*सौ. शैला अनंत कुलकर्णी, सोलापूर.*

लग्नापूर्वी दादा ही व्यक्ती कोण हे मला माहीत नव्हते. माझे पती अनंतराव हे दादांच्याकडे आदराने पाहात होते. मित्राच्या लग्नाच्या निमित्ताने आम्ही दोघेही कोल्हापूरला गेलो. लग्न झाल्यानंतर आम्ही दोघेही प.पू. दादांच्याकडे गेलो हीच दादांची व माझी भेट.

मला पहिल्या बरोबर प. पु. दादांनी माझ्या पोटात दुखते हे ओळखले. भेटून आल्यानंतर मी बाहेरची झाले. लग्नापूर्वीही माझ्या पोटात दुखत होते. लग्नानंतर परत जास्त वाढले.

माझे माहेर बेक्केरी (रायबाग तालुका) सासर सोलापूर (हुक्केरी तालुका) माझ्या पोट दुखीवरून माझे पती व आमच्या सासूबाई यांचे मत असे ठरले की मला मूल होणार नाही. प. पू. दादा संकेश्वरात त्यांच्या राहत्या घरी भेटले. त्यावेळी कुंकू आमच्या लक्ष्मीच्या (बेक्केरीच्या) ओट्यात ठेवून ते बाहेरची झाले नंतर पाचव्या दिवसापासून एकवीस दिवस पर्यंत असे प्रत्येक पाळीनंतर तीन महिने घेणेस सांगितले. होते. तिसऱ्या पाळीपर्यंत पोटात दुखणे थोडे थोडे कमी झाले व माझी चवथी पाळी झाली नाही. या अनुभवावरून प. पू. दादांच्यावर माझी श्रद्धा बसली.

असेच पुढे दिवस गेल्यानंतर पाचव्या महिन्यात मी माहेरी गेले होते. पुढे आठ दिवसानंतर माझे पती बोलवून नेण्यासाठी आले. त्यावेळी प. पु. दादांचे बंधू बाबूराव स्वर्गवासी झाले होते. त्याकारणाने आम्ही भेटण्यासाठी म्हणून प. पू. दादांच्या कडे गेलो. त्यावेळी दादांच्या समोर मला बसणे होईना. काय आहे यांच्यापुढे काय म्हणून बसायच उठून बाहेर जावे असा विचार करून येऊ लागले. त्या महिन्यात माझा गर्भपात होण्याच्या मार्गावर होता. त्यावेळी माझ्या पतीला त्यानी सांगितले हिचा गर्भ स्थिर नाही. गर्भपात होणेची लक्षणे आहेत त्यासाठी गुरुचरित्र सप्ताह करणे आवश्यक आहे. त्यावेळी त्यांचे कडे पैसे नव्हते मी साठवल्यातले पैसे खर्च करून हा सप्ताह करवून घेतला.

दिवस भरल्यानंतर मी माहेरी गेले. आठ दिवसानंतर रात्री अकरा वाजता मला बाळंतपणाच्या वेदना चालू झाल्या. त्यावेळी प. पू. दादांनी दिलेला अंगारा लावून मी व माझा भाऊ स्कूटर वरून रायबाग स्टेशन दवाखान्यात गेलो. डॉ. बाईनी तपासणी केली त्यावेळी माझ्या पोटातले पाणी संपले आहे मी तरी एक जिवंत राहणार अथवा जन्मलेल बाळ जिवंत राहणार हे ऐकून माझा भाऊ घाबरला. त्यावेळी रात्री बारा वाजले होते. नंतर आम्ही मिरजेला मिशन हॉस्पिटलमध्ये आलो त्यावेळी रात्री दोन वाजले. त्यावेळी माझ्या मनात भावना निर्माण झाली की माझे पती प. पू. दादांना इतके मानतात तर मला इतका त्रास होत असताना प. पू. दादांची कृपा दृष्टी माझ्याकडे कशी काय वळली नाही ? असा विचार करत असताना त्यावेळी दोन मिनिटे माझ्या डोळ्यासमोर दादांचा चेहरा दिसला व लगेच माझी डिलिव्हरी झाली व मला मुलगा झाला. या अनुभवावरून प. पू. दादांच्यावर परत माझी श्रद्धा वाढली.

असेच काही दिवस गेल्यानंतर आम्हा दोघांमध्ये वाद सुरू झाला. यावेळी या वादामध्ये माझे पती डायव्होर्स घेण्यास तयार झाले. त्यावेळी ते पोलीस स्टेशनला जाण्याच्या मार्गावर होते. त्यावेळी त्यांना प. पू. दादांची शपथ घातल्या नंतर मागे फिरले

दादांच्या श्रद्धेमुळे आम्ही दोघेही पुन्हा एकत्र आलो. व आज आमचा संसार सुखाचा आहे. याला प. पू. दादांचा फार मोठा आधार आहे.

## परमपूज्य ती. स्व. दादा - आठवणी व अनुभव

*किशोर हेमंत कमलाकर, निपाणी.*

ती. दादा आमच्या घरी अनेकदा येऊन गेले आहेत. जवळजवळ ते आमच्या घरचा एक घटकच बनून गेलेत. त्यामुळे त्यांच्या बद्दलच्या आठवणी सांगावयाच्या झाल्या तर एक ग्रंथच तयार होईल. अनुभव तर इतके आहेत की त्याची गणती करता येत नाही. अनुभव फक्त अनुभवायचे असतात. त्याची जाहीर वाच्यता करू नये. असे असूनही केवळ दादांच्यावरील निःस्सीम प्रेमापोटी मी इथे त्यांच्या दोन आठवणी व दोन अनुभव सांगण्याचा प्रयत्न करीत आहे.

आज बरोबर २५ वर्षे झाली. दादांचा परिचय आमच्या वडिलांच्यामुळे झाला. आमच्या लहानपणी ते आमच्या घरी येत असत. त्यावेळी निपाणीत शिक्षण सेवा मंडळ नावाची संस्था उभी रहात होती व आमचे वडील त्या संस्थेचे सेक्रेटरी होते. संस्था कशी उभी करावी याबाबत चर्चा करण्यासाठी ती. दादा व ती. वडील व त्यांचे स्नेही आमच्या घरी एकत्र येत. ही संस्था उभी रहाण्यात ती. दादांचा सिंहांचा वाटा आहे.

१९६५ ते ७१ सालापर्यंत दादांचा परिचय वाढत गेला. त्या काळात त्यांच्या समवेत गाण्याच्या अनेक मैफिली ऐकल्या व संगीताचा मनसोक्त आनंद लुटला. त्यांच्यामुळेच अनेक मान्यवर गायक व गायिकांचे गाणे ऐकता आले. यावेळेपर्यंत ते फक्त वडिलांचे मित्र म्हणून परिचित होते पण ७१ साली मात्र त्यांच्यामुळेच माझ्या जीवनात नवीन आयुष्याचा उदय झाला.

या नंतर मात्र दादांचे आमच्या घरी कायमचे येणेजाणे सुरू झाले. सायंकाळी ते येत व रात्रभर राहून पहाटे उठून पहिल्या गाडीने संकेश्वरास जात रात्रीच्या बैठकीस एक आगळीच रंगत येत असे. अनेक विषयांवर चर्चा होत असे त्यात काय नसे ? संगीत, अध्यात्म राजकारण, ज्योतिष, घरगुती प्रश्न इ. सर्व पहाट केंव्हा होई ते समजत नसे व यातील मला जाणवलेले एक महत्त्वाचे विशेष म्हणजे या जागरणाचा त्रास अजिबात होत नसे. उलट दुसरा दिवस अतिशय उत्साहामध्ये जात असे.

घरगुती प्रश्नांची उकल करण्यात मात्र त्यानी मला खूपच मदत केली. याबद्दल एक अनुभव सांगण्यासारखा आहे. काही घरगुती प्रश्नापुढे माझे मन अत्यंत अस्वस्थ होते. निराशेने मन ग्रासले होते. काही क्षणच मनात विचार सणकून गेला की दादा आता

इथे आले तर बरे होईल. त्यांच्या व आमच्या मनाच्या तारा अशा जुळल्या आहेत की माझा विचार त्यांच्यापर्यंत कसा गेला माहित नाही पण संध्याकाळी ते घरी हजर. आंतरिक मनाची एक शक्ती असते याची प्रचिती त्या दिवशी अनुभवण्यास मिळाली.

आमच्या घरासाठी ती दादांनी किती कष्ट घेतले आहेत ते माझ्या पत्नीच्या लेखात आलेले आहेच. दुसरा अनुभव मात्र मला नवीन जीवन देऊन गेला आहे.

१९८१ साली मला छातीमध्ये कळा येत होत्या. कोल्हापूरच्या डॉ. नी हार्टचे ऑपरेशन करावे लागेल अशी शंका व्यक्त केली. घरात सर्वच चिंतेत. एकुलता एक मुलगा. लग्न झालेले शिवाय दोन मुले लग्न होऊन ५ वर्षे झालेली अशावेळी माझी पत्नी सौ. गीता हिच्या मनःस्थितीचा विचारच करता येत नव्हता. यावेळी परत ती. दादांच्या चरणी प्रार्थना. त्यानी आम्हा दोघाना आधार दिला. मन शांत ठेवण्याचे शिकविले. कठीण परिस्थितीमध्ये डगमगून न जाता त्यातून योग्य तो मार्ग शोध. त्यांच्या सर्वंकष प्रयत्नामुळे मुंबईला के. ई. एम्. मधील त्यांचे नातलग डॉ. मुद्रस यांच्या सहकार्यामुळे चेकिंग झाले. डॉ. परुळेकर त्यावेळी तिथे होते त्यानी तपासले व मला एकच प्रश्न विचारला. तुला संगीताची आवड आहे काय ? मी म्हणालो होय. त्यानंतर त्यानी सध्या ऑपरेशनची गरज नाही व तुला काहीही झाले नाही असे सांगितले. त्यामुळे खूपच आनंद झाला. आमचा प्रिंटिंग प्रेसचा व्यवसाय असल्याने कामाचा ताण कायम असतो. अशी तीन वर्षे गेली. खूप काम केले दिवस रात्र काम असे. त्यामुळे परत ८४ साली हातातून कळा व छातीत व पाठीत दुखू लागले. परत ती. दादांच्याकडे यावे परत मुंबईला डॉ. मुद्रस यांच्याशी संपर्क. त्यांचे मित्र डॉ. भट्टाचार्य हे ओपन हार्ट सर्जरी करत असत. डॉ. मुद्रस यानी ही केस आमच्या घरची आहे. त्यामुळे डॉ. भट्टाचार्यांनी त्यांच्या विनंतीस मान देऊन कमी खर्चात ऑपरेशनची व्यवस्था करून दिली. परमपूज्य राघवेंद्र स्वामींच्या कृपाशीर्वादाने व ती. दादांच्या अथक प्रयत्नामुळे ऑपरेशन व्यवस्थित पार पडले. ऑपरेशनच्या दुसऱ्या दिवशी इंटेंसिव्ह केअर युनिटमध्ये माझ्यावर उपचार करणारे इतर डॉ. व नर्स यानी हेळसांड केली. त्यांच्या अंतर्गत भांडणामध्ये माझ्याकडे दुर्लक्ष झाले. मला ते जाणवत होते. पण शरीरावर सर्वत्र नळ्या सलाईन चढवलेले. शेवटी पहाटे माझ्या सहनशक्तीचा अंत झाला मी माझ्या शरीरावरील सर्व नळ्या तोडून टाकल्या. रक्त जाण्यासाठी पोटावर दोन भोके पाडून नळ्या घातल्या होत्या त्या निघेनात. तेव्हा ते भांडेच उचलले व राघवेंद्राचार्यांचे नाव घेऊन त्या नर्सच्या अंगावर धावून गेलो. नर्स ओरडून I.C.U. मधून पळत गेली. मी दारामध्ये हातात काचेचे भांडे घेऊन उभा. आंतरिक शक्तीचा परत एकदा अनुभव देत होता. डॉ. व नर्स यानी मला कॉटला बांधून ठेवले मनात विचार येत होता. आता काही खरे नाही. मधला काका माझ्यासोबत होता त्याने सर्व निरवानिरवीची भाषा बोलून घेतली व डोळे मिटून घेतले व मनातल्या मनात मी दादाना म्हटले आता काही तुम्ही मला काम सांगितले होते व काय होत आहे त्याचवेळी

आकाशवाणी झाल्याप्रमाणे त्यांचा आवाज माझ्या कानात घुमू लागला. ' तू का काळजी करतोस. सर्व काही व्यवस्थित होणार आहे. निश्चिंत रहा. त्यानंतर मला ग्लानी आली. ती अनुभवणाऱ्यालाच माहिती.

## कल्पवृक्ष दादा

*सौ. सुनीता किशोर कमलाकर.*

ती. दादा यांना मी अगदी प्रथम पाहिले ते म्हणजे मला निपाणीला कमलाकरांच्यात दाखविण्यास आणले तेंव्हा. त्यानीच पत्रिका जुळते व याच मुलीस सून करून घ्यायचे असा निर्णय दिला. एकनाड असूनही त्यानी कुंडली वरून लग्नास परवानगी दिली.

लग्नानंतर ती. दादा यांचे आमच्या घरातील स्थान याबाबत हळू हळू अनेक प्रसंगातून लक्षांत येऊ लागलं. पहिल्या पहिल्यांदा ती. दादा येणार म्हटल की मला भीतीच वाटायची कारण त्यांच्याबद्दल ह्यांच्याकडून बरेच काही ऐकले होते. माझ्या सासूबाईंना त्यानी बहीण मानले होते. दादा आले म्हणजे कधीही एकटे येत नसत त्यांच्यासोबत ३, ४ जण असायचेच. रात्रभर मग गप्पांची बैठक रंगायची. दिवसभराच्या कामाच्या दगदगीमुळे मला मात्र खूप झोप येत असे. पण सांगायचे कसे ? पण कसे कोणास ठाऊक एवढ्या सर्वातून दादांचे लक्ष माझ्याकडे जाई व ते म्हणत ' गीता तुला झोपण्यास हरकत नाही' मनांत विचार येत आपण यांना कां बरे घाबरतो. नंतर नंतर मी सुद्धा बैठकीना बसू लागले. कुणी काही प्रश्न विचारत व त्याचे समर्पक उत्तर दादांनी द्यावयाचे. त्यात काय नसे. देव कसा आहे यापासून भूत आहे की नाही. अध्यात्म म्हणजे काय पासून राजकारणाचे रंग यापर्यंत बोलणे असे दादांची वाणीच अशी आहे की त्यांचे बोलणे ऐकून कान तृप्त होतात.

जवळ जवळ २५ ते ३० वर्षे झाली असतील दादा आमच्या घरचेच झाले माझ्या सासऱ्यांचे ते मित्र. मैत्रीला वयाचे बंधन नसते. ती. दादांची अनेकांशी मैत्री होती व त्यांच्या गप्पांच्या बैठकीमधून याचे अनेक पदर आम्हास दिसत. कोण वयाने मोठा असेल, तर कोण लहान असेल, श्रीमंत, गरीब भेद नाही. पण एकदा का मित्र म्हटले की त्याच्या गुणदोषांसकट त्याना प्रिय असे. कोणत्याही परिस्थितीत ती मैत्री दादा तोडणार नाहीत. तर असे हे ती. दादा आमच्या घरचे श्रद्धास्थान होते. वडिलधारे माणूस व एकदा वडीलपणा धारण केला की त्यापाठोपाठ अनेक जबाबदाऱ्या, विवंचना झाल्याच आणि त्या एकदा स्वीकारल्यावर कोणत्याही परिस्थितीत पार पाडणे हे तर ती. दादांचे ब्रीदच !

माझे लग्न झाल्या झाल्या ३,४ महिन्यातच माझ्या सासूबाईंना कॅन्सर झाला. तेव्हाचे ४,५ महिने आठवले म्हणजे अंगावर अक्षरशः काटा येतो. त्यावेळी ती. दादांनी सर्व घरादाराला दिलेले धैर्य व त्यांच्या मानलेल्या बहिणीसाठी केलेली उपचारांची धडपड आठवते. डॉक्टरांचे सर्व उपाय थकले. रात्र रात्र सासूबाई वेदनेन तळमळायच्या तर त्यांच्यासाठी दादा संध्याकाळी संकेश्वराहून यायचे व रात्रभर जाग जागून त्याना दिलासा देत असत. त्याना इतका त्रास होत होता. पण बहीण मानली म्हणजे फुकाची नव्हे यात मानण्यापेक्षा निभावणे हेच खरे याची प्रचीती मला आली. सासूबाईंना जाताना ती. दादा यांना सर्वांना सांभाळून घेण्याची विनंती करून या जगाचा निरोप घेतला. यानंतर ती. दादा नेहमी येत सुख दुःखाच्या गोष्टी होतच राहिल्या मला वडील नाहीत पण ही उणीव मला कधीच जाणवली नाही. कारण ती. दादाच माझे वडील बनून गेले. नकळत स्नेहाचे धागे घट्ट बनत गेले.

लग्नानंतर ५,६ महिन्यात सासूबाई गेल्या व बरोबर ५ वर्षांनी यांच्या छातीत दुखू लागले. काहीही होवो. पहिली धाव दादांच्याकडेच. दादांना श्री नृसिंह सरस्वती दत्त महाराजांचा अनुग्रह. त्यानी महाराजांना विचारले त्यानी काहीही होत नाही पण गलगले येथील श्री राघवेंद्र स्वामींच्या मठांतील तीर्थ व अंगारा आणून लावणेस सांगितले. तरीही मुंबईस जाऊन डॉ. मुद्रस यांच्यातर्फे तपासणींची व्यवस्था फोन पत्रव्यवहार करून ती. दादांनी केली. माझ्या सासऱ्यांना व मला ती. दादांनी धैर्य देऊन मनास उभारी दिली. ३ वर्षे अशीच गेली व पुनः याना तोच त्रास सुरू झाला. परत दादांच्या कृपाछत्राखाली धाव. पत्रव्यवहार, डॉक्टरांची अपॉईंटमेंट, ऑपरेशन (ओपन हार्टचे) करण्याचे ठरले सर्वांचा धीर सुटलेला. याना तर काहीच सुचत नव्हते. मानसिक अवस्था तर पार कोलमडलीच होती. ती.दादांची धीर देणारी पत्रे. प्रत्यक्षात येऊन अनेक उदाहरणे देऊन. जपजाप्यकरवून घेऊन मन घट्ट करण्यास मदत केली. ती. दादा शरीराने संकेश्वरास पण मनाने आमच्या जवळच होते. स्वतःसाठी महाराजांच्याजवळ काहीही न मागणारे ती. दादा आमच्यासाठी प्रार्थना करीत होते. आणि त्यांच्या कृपाशीर्वादामुळे ऑपरेशन यशस्वी पार पडले व मोठ्या संकटातून माझी सुटका झाली. खरेच ती. दादा आमचे पाठीराखे आहेत म्हणूनच आजचे हे सुखाचे दिवस मला दिसत आहेत.

यानंतरची ३,४ वर्षे यांच्या तब्येतीविषयी चिंता, काळजी पण दादांचा आशीर्वाद आहे, काही होणार नाही असा विश्वासही. या घालमेलीत केंव्हाही मला वरील विचारांनी खूप अस्वस्थ वाटे तेव्हा नेमके बोलावल्याप्रमाणे दादा येत. मग रात्रभर काळजीचा भार दादांच्या विश्वासक शब्दांमुळे कुठल्या कुठे नाहीसा होई. माझ्या मुलाची मुंज ठरली. तेंव्हा ती. दादांनी आजोबांची, वडिलांची व मित्राची अशा तिन्ही तऱ्हेनी जबाबदारी पार पाडली. या अगोदरची ही सर्व कार्ये त्यांच्याच समर्थ हातानी पार पडली. होती हे ऐकून आता पण असा प्रत्यक्ष अनुभवायास मिळत होते कार्य पार पडले पण..... हा पणच फार कठीण

होता कार्याच्या दगदगीमुळे याना पुनः छातीत दुखू लागले. त्रास होऊ लागला. ती. दादांची पुनः धावपळ. कोल्हापूरच्या डॉ. भूपाळी यांच्या दवाखान्यात उपचार सुरू झाले. त्याना स्वतःस त्यावेळी तब्येतीचा त्रास होत होता. पण सकाळी फोन व सायंकाळी रिक्षा करून दवाखान्यात येऊन मला धीर देऊन जायचे. एक दिवस याना खूपच त्रास होऊ लागला. उलट्या व छातीत दुखणे डॉ. चे इलाज सुरूच होते माझा मात्र धीर सुटला सकाळचे ८ वाजले होते. पोटाचा व संडासचा त्रास यामुळे ते सकाळचे कुठेच जात नाहीत हे माहित होत. पण वरील सर्व प्रकारामुळे मला अस वाटून गेल की दादा आत्ता इथ हवेत. मी फोन केला फक्त फोनवर मी " दादा, येवढच बोलू शकले पुढे मला बोलताच येईना. हुंदक्यावर हुंदके, येऊ लागले. दादांनी ' मी लगेच येतो तू घाबरू नको ' असे सांगितले व दहा मिनिटातच दादा हजरही झाले. दादानी त्यांच्या अंगावरून हात फिरवला व भस्म लावले उलटीचे प्रमाण कमी होऊन यांना झोप लागली. दादा माझ्या जवळ बसून राहिले. मी शांत झाल्यावर परत संध्याकाळी येतो असे सांगून गेले. ८,१० दिवस हा प्रकार सुरू होता. पण त्यानी कधीही तक्रार केली नाही. १० दिवसानंतर आम्ही निपाणीस आलो. तब्येत सुधारण्यासाठी दादांनी यांना जप करण्यास सांगितले त्यामुळे यांची तब्येत सुधारली व वजनही वाढले.

या सर्वावरून एकच जाणवते, एकदा या दादांनी कुणालाही आपल मानल की त्याच्या संकटात, सुख दुःखात ते तन-मन-धनाने एकरूप होतात, मदत करतात, त्यांच्या याच स्वभावामुळे अनेक ओळखी आहेत. त्यांचा व्यासंग पाहिला की मन थक्क होते. अफाट वाचन व त्याचप्रमाणे स्मरणशक्तीची अमोल देणगी त्याना लाभली आहे. ज्योतिष शास्त्राचे त्यांचे ज्ञान आश्चर्यकारक आहे. त्यातच त्याना श्री नृसिंहसरस्वती महाराजांचा अनुग्रह. अनुग्रह म्हणण्यापेक्षा त्यांच्यात महाराजांचा वासच आहे. निश्चयी स्वभाव निश्चयावरून आठवले. एकदा ते निपाणीत आले असताना रात्री खूपच घाम आला. निपाणीच्या डॉक्टरनी तपासले त्याना शंका आली. ताबडतोब ती. दादांच्या सांगण्यावरून बेळगांवला डॉ. कुलकर्णी याना फोन केला. ते हृदयतज्ञ आहेत. फोन रात्री १२.३० वाजता केला. डॉ. नी ती वेळ न घालवता ड्रायव्हर नसतानही स्वतः मोटार घेऊन ३ वाजता आमच्या घरी हजर. त्यानी तपासले व माईल्ड हार्ट ॲटॅक आहे. घाबरण्याचे कारण नाही. पण बिडी सोडली पाहिजे. ते ऐकताच ती. दादांनी हातातली बिडी विझविली व आजपासून विडी बंद असा निश्चय केला व त्या क्षणापासून आजपर्यंत विडीला हात लावला नाही.

मला तर अस वाटत की ती. दादा याना कलियुगातील आदर्श पुरुष म्हणायला काही हरकत नाही.

ती. दादा हे कल्पवृक्षाप्रमाणे आहेत व त्यांच्या छायेखाली आजपर्यंत आम्हास सावली मिळत गेली आहे ती अशीच अखंड मिळावी हीच इश्वरचरणी प्रार्थना !

# माणूसवेडा माणूस

*बाळासाहेब जनवाडकर*

बोले तैसा चाले ।

त्याची वंदावी पाऊले ।

संत तुकारामाच्या या वचनाची प्रचिती मला ती. दादा नाईक यांच्यात आली. त्यांचा माझा परिचय गेले दहा बारा वर्षातला आहे. त्यांच्या सहवासात त्यांच्या अनेक गुणांचे पैलू मला पहावयास मिळाले.

वास्तविक॰ पाहता ते पेशाने शिक्षक त्या पेशात त्यानी आपल्या जीवनाचा ठसा उमटवून योग्य वेळी आपल्या त्यागी जीवनाची समाप्ती अल्प काळातच केली. शिक्षक म्हणून काम करत असताना संकेश्वरला एक आदर्श शिक्षक म्हणूनच जगले व ज्यावेळी त्याना दिसले की आपली अस्मिता पणाला लागते, ती नावारूपास आलेली संस्था जशीच्यातशी दुसऱ्याच्या स्वाधीन करून सन्मानाने बाहेर पडले. आपल्या पेशामध्ये त्यानी कोणाचेही तिळमात्रही नुकसान केले नाही. किंवा कोणाची मानहानी केली नाही. त्यांची कुशाग्र बुद्धिमत्ता. अमाप स्मरणशक्तीच्या जोरावर जेथे गेले तेथे आपला एक निराळा ठसा निर्माण करीत होते. वाङमय असो, संगीत असो, नाट्य असो किंवा तंबाखूचा व्यापार असो, ज्या क्षेत्रात त्यांनी पदार्पण केले ते त्यानी पूर्णपणे आत्मसात केले त्या त्या क्षेत्रात त्यांचे अनुयायी आणि मित्र लाभले. ते त्यांचे कायमचे मित्रच झाले. त्यांचा सल्ला हा ते वेदवाक्याप्रमाणे मानू लागले. त्यांचे अफाट वाचन, मनन आणि चिंतन या जोडीला कोणत्याही विषयावर अधिकारवाणी. बोलण्याची हातोटी ही कोणालाही साध्य होणारी नाही. त्यांची वाणी विचाराची बैठक, इतकी पक्की असायची की ते सांगतील ते शंभर टक्के मनुष्याला पटावयाचे. मग ती वैयक्तिक सल्ला मसलत असो, घरगुती अडीअडचणी असोत किंवा दुसऱ्याचा. हेवादेवा असो. दादांचा सल्ला हा निरपेक्ष बुद्धीचा आणि सोक्तच असावयाचा.

दादांच्या वाचनाची आणि समयोचित पुन्हा जसेच्या तसे सांगण्याची हातोटी फारच मोठी पाश्चात्य वाङमयापासून आधुनिक बालवाङमया पर्यंत कोणत्याही विषयावर ते अधिकारवाणीने बोलू शकतात. याचा प्रत्यय मी सदैव घेत आलो आहे. आंग्ल नाट्याचार्य शेक्सपीयर असो किंवा शंकराचार्यांचा वेदांत असो ते लीलया त्या विषयाचे उतारे पाठ म्हणून दाखवतात. हे पाहिले की कित्येकवेळा माझ्यासारखा अत्यंत किरकोळ मनुष्यसुद्धा मंत्रमुग्ध होऊन जातो.

दादानी आपल्या निर्हेतुक आचरणांनी आणि निरपेक्ष बुद्धीनी आपल्या जीवनात अनेक लोक जोडले. अनेक लोकांवर इतके उपकार केले की ते त्याना विसरणाच शक्य नाही. जेथे दादा असतील तेथे ती मंडळी एकत्र जमणारच. मनुष्य म्हटला की त्याचा स्वार्थी हेतू लपला जात नाही. त्याचा हेतू लक्षात येऊन सुद्धा दादांनी त्याला आपला मदतीचा हात पुढे केला आहे. एखाद्याला सहाय्य करावयाचे म्हटले की कोणत्याही गोष्टीचा पुढचा मागचा विचार न करता त्याच्या मदतीला उभे रहावयाचे त्याचे काम झालेच म्हणून समजावयाचे. रावापासून रंकापर्यंत त्यानी आपले वजन खर्च करून सहाय्य करावयाचे ते करत असताना परतफेडीचे कसलेही भान ते ठेवत नसत व म्हणूनच सामान्य माणसापासून मंत्र्यापर्यंत सर्व थरातील मंडळी दादांच्या संग्रही आहेत. आपल्या सज्जन-पणाचा चांगुलपणाचा फायदा दुसरा घेतो आहे याचे अवधान दादानी कधीच बाळगले नाही. आपला शब्द जेथे त्यानी टाकला. तिथे तो यश घेऊनच आला. अशी परिस्थिती आज त्यांची आहे. पण काही वेळा त्यांचे श्रम सार्थकी लागत नाहीत. पण त्याला येनकेन प्रकारेण सहाय्य करण्याचे दादानी थांबविले. असे होत नाही. मग भले तो वाईट म्हणो वा चांगले म्हणो मग तो लहान असो मोठा असो, गरीब असो श्रीमंत असो स्त्री पुरूष हा भेदाभेद न करता सातत्याने ते मेहनत करतात. त्यात त्यांचा शुद्ध हेतू असतो. तिळमात्रही त्यात त्यांची अपेक्षा नसते. आणि म्हणूनच ते सर्वांना हवेहवेसे वाटतात. घरी येणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला दुर्मुखलेला पाठविला नाही. त्या माणसाची कोणतीही समस्या असो त्याला पूर्ण उत्तर दादांकडे असणारच. एखादेवेळी गहन प्रश्न सोपा करण्यासाठी संख्याशास्त्राच्या आधारे कुंडली मांडतील. आणि त्या आधारे त्याचे प्रश्न सोपे केल्या खेरीज राहणार नाहीत. त्या माणसाचे प्रश्न गहन आणि गूढ प्रश्न सोपे करून टाकतील. त्यामुळे तो मनुष्य शांत होईल तृप्त होईल. ते चमत्कार करीत नाहीत. पण चमत्काराचे गूढ उकलण्यास मदत करतील. मनुष्याचे प्राक्तन बदलू शकत नाहीत. पण ते सुसह्य करण्यास मदत करतील. यामुळेच ते सर्व घरातील जनमानसात आपलेसे झालेले आहेत. त्याची ही सर्व संग्राहक वृत्ती त्यांच्या चांगुलपणात आणि सज्जनपणातच आहे. ते संत नाहीत किंवा साधू नाहीत किंवा ते चमत्कार करणारे बुवा नाहीत. ते फक्त मनुष्यवेडे आहेत. त्यांच्या सहवासात दररोज नानाप्रकारचे नाना धंद्यातले लोक येतात आणि जातात. जाताना ती तृप्तमनाने जातात. त्यांचे कायमचे मित्र चाहता म्हणूनच जातात. आपल्याच घरातील वडिलकीचा मान त्याना देऊन जातील. यातच त्यांचे मोठेपण आहे. त्यांच्या या मोठेपणा-मुळे त्याचे अनेक चाहते कर्नाटक आणि महाराष्ट्रात विखुरले गेले आहेत. कारण दादांनी एखाद्याला एकदा का आपले म्हटले की तो त्यांचा कायमचा सखा सोबती झाला अशी त्यांची धारणा आहे. त्यांचा साक्षेपी स्वभाव सर्वांच्या ठिकाणी एकच असल्यामुळे ते सर्वांचेच मित्र आणि आप्त आहेत असे वाटते. दुसरा मनुष्य कसा वागतो याकडे ते दुर्लक्ष करतात. त्याचा चांगुलपणा एवढाच त्यांच्या संग्रही असतो. मी त्यांना नेहमी म्हणतो की

दादा तुमचा अतीव सज्जनपणा आणि चांगुलपणा क्षुल्लक कामासाठी ही मंडळी वापरतात हे बरोबर नाही. ते शांत होतात. कारण तो त्यांचा स्थायीभाव असल्यामुळे ते माझ्याकडे लक्ष देत नाहीत. मी पण माझ्या खुज्या मनोवृत्तीचे आत्मपरीक्षण करीत स्वस्थ राहतो.

आजच्या या समाजात चांगल्या मनोवृत्तीचे दुसऱ्याच्या मनाची कणव करणारे दुसऱ्याचे सुखदु:ख आपले मानणारे सज्जन लोक विरळा. पण दादांचेकडे पाहिले की वाटत की माणुसकी अजून जिवंत आहे. सत्प्रवृत्तीचे लोक अद्याप पहावयास मिळतात. ते दुर्मिळ नाहीत. कोण्या महात्म्याने म्हटले आहे की विद्वान सर्वत्र आहेत, प्रचंड बुद्धिमत्तेचे लोक सर्वत्र आढळतील. त्याना पैशाने विकत घेता येईल. सज्जनाचा मात्र शोध घ्यावा लागेल. ते सर्वत्र विकत मिळणार नाहीत. त्या सज्जनांपैकी दादा नाईक एक आहेत. म्हणून माझी सुरुवातीची उक्ती त्यांच्या बाबतीत सत्य आहे असे वाटते.

## अदभूत आणि गूढ

*वि. के. फडके*

थोड्याच दिवसांपूर्वी कोल्हापूर येथे असेच एक गृहस्थ भेटले. त्यांचा माझा पूर्वीचा परिचय नव्हता. परंतु अशा गूढ शास्त्रांशी संबंधित असलेल्या लोकांची आणि माझी आपोआपच गाठ पडते. माझ्या कुंडलीतच तसा योग आहे ! हे लोक एकतर माझ्या घरी चालत येतात किंवा कुणीतरी या लोकांकडे मला घेऊन जातो ! पण महिन्या दोन महिन्याने अशी माणसे मला हमखास भेटणार हे अगदी ठरलेले !

त्या गृहस्थांचे नाव नाईक !

त्यांचा माझा कुणीतरी परिचय करून दिल्यानंतर त्यांना एकाएकी तंद्री लागली आणि त्यांनी एकदम विचारले, “काय हो, तुमची कुलदेवता जोगेश्वरी का ?”

‘होय.’ मी चकित होऊन मान हलविली. आजपर्यंत अनेक ज्योतिषी, तांत्रिक, मांत्रिक व चेहरा पाहून भविष्य सांगणारे मला भेटले. परंतु माझी कुलदेवता इतक्या अचूकपणे कुणीच सांगितलेली नव्हती.

त्यानंतर जोशीबुवांनी पूर्वी विचारलेला प्रश्नच त्यानी पुन्हा विचारला. फक्त तपशील अधिक होता.

त्यांनी विचारले.‘तुमच्या मुलाच्या पाठीवर जन्मखुणेचा पांढरा डाग आहे का ?’

‘होय आहे.’ मी उत्तरलो.

‘तुमचे आजोबाच त्या मुलाच्या रूपाने पुन्हा जन्माला आलेत.’

‘शक्य आहे.’

'तुमची खात्री पटावी म्हणून सांगतो, तुमच्या मुलाला शंकराच्या भक्तीची विशेष आवड असणार !'

'अगदी खरं आहे तुमच म्हणणं. आमच्या घरात दत्त आणि राम यांची उपासना आहे. परंतु हा एकटाच शंकराची उपासना करतो. मध्यंतरी 'कल्याण' मासिकातले शंकराचे पाच-पन्नास फोटो कापून त्याने घरभर लावले होते. तो गळयात 'रूद्राक्ष' देखील मोठ्या आवडीने घालतो.

'तुमचे आजोबा शिवलिंगाची 'पार्थिव पूजा' करीत होते. त्यांची ती उपासना या जन्मीही पुढे चालू आहे.' त्यांनी खुलासा केला.

त्यानंतर बोलण्याच्या ओघात मी त्यांना म्हणाले, 'काही दिवसांपूर्वी मी दत्ताच्या चांदीच्या खडावा तयार करून पूजेला ठेवल्या आहेत. त्या आधी गाणगापूरला नेऊन तेथल्या निर्गुण पादुकांना स्पर्श करवून त्यावर अभिषेक करून मी आणल्या आहेत.

त्यावर ते चटकन म्हणाले, 'पण तुम्ही त्यांची अजून 'प्राणप्रतिष्ठा' केलेली नाही ?'

'होय हे अगदी खरं ?' काही अडचणीमुळे प्राणप्रतिष्ठा करण्याचे तसेच राहून गेले. मी कबुली दिली.

त्या नुकतीच ओळख झालेल्या गृहस्थांनी माझ्या आयुष्यातील या घटना इतक्या अचूक कशा सांगितल्या ?

मी त्या गोष्टीवर खूप विचार केला.

पुढे एकदा नाईकांनीच त्याचा खुलासा केला. ते म्हणाले, 'पू. नृसिंहसरस्वती हे माझे गुरु व गुरुचरित्र वाचन ही माझी उपासना. पूर्वी मला पडद्यावर चित्रपट पहावा त्याप्रमाणे भावी घटनांची चित्रे स्पष्ट दिसायची. काही दिवसांनी ते बंद होऊन कानात संदेश येऊ लागले. पुढे तेही बंद पडले. आता व्यक्ती समोर आल्यावर एखादा विचार तीव्रतेने मनात येतो. तो विचारच मी त्या व्यक्तीला सांगतो व तो खरा असतो.'

## एक आठवण

*जी. जी. जोशी*

माझी मुलगी कु. मंगला हिची पाळीची तक्रार होती व ती अशक्तही होती. मी व डॉ. खांडेकर एकदा संकेश्वरला ती. दादा नाईक यांना भेटायला गेलो असता याबद्दल विषय निघाला तत्पूर्वी औषधोपचार करूनही तिच्यावरील तक्रारीत सुधारणा झाली नाही. ती. दादांनी खालील उपचार करण्यास सांगितले.

१) श्री देवीस्पर्शाच्या कुंकवाचा प्रयोग. त्यांनी देवी स्पर्शाचे कुंकू दिले. दररोज सकाळी स्नान करून त्या कुंकवात एक बोटास स्पर्श होईल एवढे कुंकू जिभेवर ठेवणे.

२) श्री लक्ष्मीस्तोत्र दररोज एक वेळ म्हणणे.

३) मारुतीला दररोज दिव्याकरिता तेल घालून येणे व देवळास जात असता मागे फिरून बघू नये. वरीलप्रमाणे उपचार २१ दिवस करायला सांगितले होते त्याप्रमाणे केल्यानंतर तिच्या सर्व तक्रारी नाहीशा झाल्या.

## एक आठवण

*सौ. ज्योत्स्ना राजाध्यक्ष*

श्री. दादा नाईक यांच्यातील दैवी उक्तीचा आम्हाला साक्षात्कार झाला तो अनुभव मी खाली लिहून पाठवीत आहे.

१९७७ सालची गोष्ट. हे नुकतेच इचलकरंजीला बदली होऊन गेले होते. ३/४ महिन्यांच्या वास्तव्यातच तिकडच्या तिखट खाण्यामुळे यांना म्हणजे (श्री. राजाध्यक्ष) मूळव्याधीचा त्रास सुरू झाला होता. याच सुमारास मी व माझे पती श्री. दादा नाईकांना भेटण्यास संकेश्वरास गेलो. इकडची तिकडची विचारपूस झाली. त्यानंतर श्री. दादा यांनी म्हणाले की , तुम्हाला आजकाल मूळव्याधीचा त्रास सुरू झाला आहे. मी व यांनी एकमेकांकडे आश्चर्याने बघितले, कारण ही गोष्ट आम्हा दोघांशिवाय कोणालाच माहित नव्हती. त्याच्यावर उपाय म्हणून कोल्हापूरच्या अंबाबाईच्या पायाचा स्पर्श करून आणलेले कुंकू रोज चिमूटभर घेऊन पाण्यातून प्यावयास सांगितले. व रोज देवी महात्म्य वाचन करावयास सांगितले. या दोन्ही गोष्टी यांनी मन:पूर्वक आचरणात आणल्या आणि आश्चर्य असे की, यांना १५ दिवसात गुण आला.

## अनंत आठवणी

*शहाजी पाटील*

सद्गुरू प.पू. दादा यांना शहाजीचा शि.सा. दंडवत

आता आपणास पत्र लिहिणेस कारण की, मला आपल्या कृपाक्षेत्रात येऊन अठरा-वीस वर्षे झाली. मला असे वाटते की पूर्व जन्मीच्या पुण्याईमुळेच या जन्मी आपला सहवास लाभला आहे. आमचे प्रिय मित्र नवाळे यांच्यामुळेच त्यांच्या व आमच्या गाठी

भेटी झाल्या. त्यांच्या कृपेमुळेच माझ्या जीवनाचे सार्थक झाले आहे. पहिल्या भेटीमध्येच मला दादांनी काही प्रश्न विचारले त्यांना मी सांगितले. त्या पहिल्या भेटीतच माझे मन गहिवरून आले माझे मस्तक त्यांच्या चरणावर ठेविले. माझा स्वप्नावरती विश्वास बसत नव्हता. त्यांनी मला दत्ताचे स्तोत्र म्हणणेस सांगितले स्तोत्र एकवीस वेळ एकवीस दिवस म्हणणेस सांगितले व थोडे भस्म दिले. एकविस दिवसांपर्यंत अनेक अनुभव प्रत्ययास आले. एकदा तर त्यांनी साक्षात मी झोपलो असताना मी कोण आहे बघ म्हणताच त्या ठिकाणी दादा न दिसता त्या ठिकाणी त्यांच्या रुपात त्रिमूर्ती प्रत्यक्ष महाराज (नृसिंह-सरस्वती गुरुदेवदत्त) हे दिसले. त्या दिवसापासून माझी अधिक जवळीक झाली आहे माझी त्या वेळी अत्यंत हलाखीची परिस्थिती होती. माझ्या समोर अशी संकटे होती की त्या संकटातून मी बाहेर पडेन असे वाटत नव्हते.पण त्यांच्या कृपेनेच संकटातून थोडा थोडा बाहेर पडत चाललो.त्यांच्या कृपेनेच माझ्या नोकरीचे काम झाले आहे. स्वप्नात येऊन सांगितल्यापासून झाले त्यांनी मला प्रथम भवानी सहस्त्रनाम वाचावयास सांगितले. ते वाचत असताना आमच्या गावच्या अंबाबाई देवालयात देवीच्या गाभाऱ्यात प्रत्यक्ष अष्टभुजा असलेले रूप मी व दादा देवालयात असताना ते दादांनी रुप दाखविले. मला अनेकवेळा महाराजांचे दर्शन दिले. स्वप्नामध्ये येऊन एका पौर्णिमेस दादानी सांगितल्या-प्रमाणे मारूतीला मी रूद्राभिषेक घातला. त्यानीच मला मारूती स्तोत्र म्हणण्यास सांगितले. त्यानंतर थोड्याच दिवसांनी मला आमच्या गावच्या महादेवाच्या मंदिरात महादेवाला भटजींच्या करवी अभिषेक घातला. स्वप्नात त्याप्रमाणे मी प्रत्यक्षात अभिषेक घातला अशा वेळी माझी पत्नी वरचेवर आजारी पडायची त्यावेळी मला दोन मुले होती एक मुलगा व एक मुलगी तीन वर्षाची व एक वर्षाचा मुलगा अशावेळी माझी पत्नी काविळीने आजारात गेली. त्यांनीच मला धीर दिला. व दुसरे लग्न करणेस सांगितले. अशावेळी माझ्या मनात अनेक विचार येत होते व मी अगदीच हतबल झालो होतो. या संकटातून त्यांनीच मला मार्ग दाखविला. माझी मुले वरचेवर आजारी पडायची त्यावेळी आम्हाला जप वगैरे करावयास सांगितले. ते केल्यापासून माझी मुले आजारी पडलेली नाहीत त्यांचे भस्म वगैरे ताईत करून गळ्यात बांधलेले आहेत.

मी दुसरे लग्न करताना दोन तीन स्थळे आली त्यावेळी मी दादांना म्हणालो की मी जाणार ते मुलगी पसंत करून येणार माझ्या डोक्यात दुसरे लग्न करताना विचारांचे काहूर माजले होते. माझ्या वैवाहिक जीवनाच्या सुखासाठी मुलांचे नुकसान होईल किंवा मुलावर वाईट परिणाम होतील हे सांभाळणारी स्त्री पाहिजे. असे मी दादांना म्हणालो. त्यांनी मला निराश जीवनात आधार दिला. मी मुलगी पसंत करून येणार व तुम्ही पसंत कराल तर करून घेणार असे म्हटले तसे त्यांच्या पसंतीवरून करून घेतले आहे आमचे वैवाहिक जीवन सुखी आहे मध्येच एक दोन वर्षे गेल्यानंतर माझे अचानक अंग गार होत होते. काय करावे हेच समजत नव्हते. त्यांनीच आम्हा दोघांना मेडिकल तपासणीचा सल्ला

दिला. त्यानी त्यावेळी मला अंबाबाईचा गोंधळ घालणेस सांगितले. त्यानंतर माझे वैवाहिक जीवन सुखी झाले व त्यानंतर आम्हास एक मुलगी झाली. मी त्यांना विचारल्या-शिवाय कुठलीही गोष्ट करीत नाही. ते जे बोलतील ते मी पार पाडत असतो. त्यांच्या कृपेनेच मी अनेक व्यसनापासून मुक्त झालो आहे. मला ज्या ज्या वेळी दादांची आठवण येते त्या वेळी दादा स्वप्नात येतात नाहीतर मी दादांच्याकडे जाऊन भेटून येतो. त्या खेरीज माझ्या मनास शांती वाटत नाही.

दादांच्या घरी महाराजांचा उत्सव होतो ते मला माहित नव्हते. तो उत्सव मला स्वप्नात दिसला. त्या उत्सवाचा साक्षात्कार दिसला असेच एकदा मला वाडीस उत्सवास जाणेस सांगितले. हे दोन्ही उत्सवापासून मला बहरून आलेचे भासले. त्या अनुभवाला माझे मन बहरून गेले त्या आनंदाला तोड नाही. मला दादांनी दत्तमहात्म्यांचा सप्ताह करणेस सांगितला व तो मी केला. त्यानंतर मी कोल्हापूरला एका मित्राबरोबर गेलो होतो त्याठिकाणी मांसाहारी जेवणाचा प्रोग्रॅम होता. त्या ठिकाणी श्रीनृसिंहसरस्वती महाराजांचे चित्र दिसू लागले. ते रूप पाहून माझी ते जेवण जेवण्याची इच्छा नाहीशी झाली. त्या दिवसापासून मी मांसाहारी जेवण म्हणजे आजपर्यंत पंधरा-सोळा वर्षे बंद केले आहे. त्यानंतर मला महाराजांचे फोटो समोर आल्यासारखे वरचेवर दिसणार. त्या नंतर मी दादांना विनंती केली मला यात गुंतायचे नाही मला प्रसिद्धीची हाव नाही असे म्हटल्यानंतर दिसायचे कमी झाले. दादांनी आम्हाला या मार्गामध्ये अनेक नमुन्याची माणसे दाखवून दिली आहेत.

मला अनेकवेळा महाराजांचा साक्षात्कार झाला आहे मला स्वप्नात येऊन दादांनी संकटाच्या वेळी तू घाबरू नकोस मी तुझ्या पाठीशी आहे असे म्हटले त्यांच्या कृपेनेच माझा संसाराचा गाडा व्यवस्थित चालला आहे. असेच मला एकदा पारिसवाडीला जाणेस सांगितले. त्या ठिकाणी महाराजांचा उत्सव होतो. तो उत्सव मला झोपेतून उठवून दाखविला. त्या उत्सवाला मला दादांनी बरोबर नेले. त्याठिकाणी उत्सवाचा सोहळा पाहून मन आनंदाने भरून गेले. माझी परिस्थिती गरिबीची असल्याने घरच्या कटकटीने व कोर्टकचेरीने मन नेहमी उदास असे. आम्हाला जी माणसे त्रास द्यायची रानात, घरात व गावात समाजात त्यांना दादांनी स्वप्नात व महाराजांनी हात वर करताच ती माणसे काळी होऊन गेली. हे स्वप्न मी दादांना सांगितले. यांनी मला सांगितले तुझ्यापाठीशी असलेली त्रासाची बाजू संपली. तो माणूस अटॅकने एक वर्षातच वारला. ही सारी सद्‌गुरू माऊलीची कृपा दादांची कृपा मला वाडीला गेल्यानंतर जो अनुभव तोच अनुभव मला दादांच्या सेवेतदेखील येतो. त्यांना भेटल्यानंतर मला शांती मिळते. तसेच दादांना कधी भेटेन असे होते. मला आजपर्यंत पडलेली स्वप्ने कधीही खोटी ठरली नाहीत. त्या स्वप्नात ज्याप्रमाणे काही सांगितले असते त्याप्रमाणे जप अभिषेक सप्ते हे सगळे केल्यापासून आम्हास मानसिक शांती मिळालेली आहे.

मला दादांनी गुरुचरित्र वाचणेस सांगितले तसेच वाचन चालू आहे. माझी पहिली पत्नी वारली ते देखील दादांनी मला स्वप्नात येऊन सांगितले होते.

माझे मित्र राजाराम पुणेकर त्यांच्याबद्दल मला अनेक स्वप्ने साक्षात्कार घडले आहेत. त्यांचे पहिले लग्न झाले होते त्यांच्या पत्नीला मुले होत होती व वारत होती. अशात ती वारली त्यानंतर दुसरे लग्न करण्याचा विचार चालू झाला. त्यावेळी मला दादांनी स्वप्नात येऊन सांगितले की तू चिक्कोडी भागास मुली पाहून ये किंवा पूर्व भागास तेथे काडापूर या गावची मुलगी पाहिली व दादांनी स्वप्नात सांगितले की, त्या लग्नास मी स्वत: हजर आहे त्याप्रमाणे ते लग्न झाले. त्यांना एक मुलगी व एक मुलगा झाला आहे हे सर्व त्यांच्या कृपेमुळे घडले.

जर माझे महत्त्वाचे कांही काम असेल तर मी दादांना विचारल्याखेरीज करीत त्यांनी मला आर्थिक मदतीचे काम केलेले आहे त्यांनी मला मदत केलेली कामे ताबडतोब झाली आहेत. आमच्या गावांतील एक मित्र त्याच्या बायकोस बरे नव्हते ते आम्हाला माहित नव्हते. त्यावेळी मला एक स्वप्न पडले. आमच्या गावच्या राममंदिरात (मारुतीच्या) झोपलो होतो. त्यावेळी दररोज मी अंबाबाई व मारुतीस जात असतो. दादा मला म्हणाले किती उशीर झाला तुझी वाट पहातो. मी दादांचे दर्शन घेतले स्वप्नात. त्यावेळी एक बाई स्वप्नामध्ये आली. ती. दादांना प्रदक्षिणा घालून गेली. दादा मला म्हणाले हिच्या सुनेला फार वेळ जगता येणार नाही व तिला एक वर्षात कॅन्सर झाला. मी त्यांना सांगितले की तुम्ही दादांना जाऊन भेटा. पण त्यांनी दुर्लक्ष केले. पुढे त्या मित्राची पत्नी कॅन्सरने वारली.

माझ्या मुलीचे लग्न करण्याचे आम्ही ठरविले होते. त्यावेळी एक स्थळ आले ते एकमेकांना पसंत होते. त्या मुलांच्या घरच्या नातलगात एका स्त्रीने दुसऱ्या एका जातीच्या पुरूषाशी लग्न केले आहे. त्यासाठी आमच्या घरची मंडळी तयार नव्हती हे मी दादांना जाऊन सांगितले. दादांनी मला सांगितले ' स्थळ उत्तम आहे तू देऊन टाक '. त्या वेळी मला अनेक मायापाशाने नडविले. मन खंबीर होत नव्हते. परत दादांना मी जाऊन भेटलो. दादांनी देवीस दही-भात नैवेद्य देऊन रात्री बाराच्या आत ठरवून येण्यास सांगितले व पैसे पाहिजे असतील तर घेऊन जा. त्याप्रमाणे मी ठरवून दोन-तीन दिवसात यादीवर अक्षता टाकल्या. त्याच्या घरातील वातावरण चांगले आहे. ती मुलगी पोटोशी आहे. दादा जी गोष्ट बोलतात ती आम्ही शिरवंदनीय मानून ती पार पाडतो. घार आकाशात असते पण तिचे लक्ष पिलाकडे असते असे आम्हास वाटते. असे आमच्या बाबतीत आहे जर एखाद्याचे कल्याण व्हायचे असेल. आपण प्रत्यक्ष येऊन भेटणारच ही त्यांची मनोवृत्ती आहे.

माझ्या पत्नीस बरे नव्हते. मी प्रथम तिला डॉक्टरकडे रिपोर्ट घेतला व फोटो काढला. पण त्यात काही दोष नाही असे त्यांनी सांगितले. पाच-सातशे खर्च आला या मुदतीत मी दादांना भेटलो नाही नंतर आम्ही दोघेही दादांच्याकडे गेलो. त्यावेळी त्यांनी

आम्हाला घरात बाधा आहे त्यावर उपाय करणेस  व भस्म लावणेस सांगितले व एकवीस दिवस एकशे आठ वेळा न चुकता एकवीसात वाचणे सांगितले. त्यावेळी मी एकदम घाबरून गेलो होतो पण त्यानीच मला मार्ग दाखविला. आता माझ्या पत्नीची तब्येत बरी आहे. दादांच्या बाबतीत किती लिहावे ते थोडेच वाटते. जर एकदा माणूस पाय घसरत असेल त्यास मार्गावर आणतात. माझी एक इच्छा आहे की मला दादांचा नेहमी सहवास घडावा. त्यांच्या चरणांची सेवा करावी हीच विनंती आहे.

## मी पाहिलेले प. पू. दादा

*डॉ. सुरेश अनंतराव कुलकर्णी*

प. पू. श्री. दादांचा आणि माझा परिचय पंचवीस वर्षापूर्वी झाला ! मी वैद्यकीय क्षेत्रातला. डॉक्टरीचा व्यवसाय करणारा. पण प. पू. दादांनी माझ्यावर अशी कांही जादू केली की मी नकळत त्यांच्याकडे ओढला गेलो. आमचे गुरुशिष्याचे नाते दृढ होत गेले. दादा माझे मार्गदर्शक बनले. पण आमचे संबंध एवढ्यापुरतेच मर्यादित राहिले नाहीत. दादांना मी माझ्या तीर्थरुपांच्या जागी मानले आणि त्यांनी मला मुलांच्या ठायी. हे पिता-पुत्राचे नाते अजूनी तसेच दृढ आहे. दादा मला या नात्याने जीवनाच्या हरएक पावलागणिक हात धरून चालवीत आहेत.

पारिश्वाड येथे माझ्या रहात्या घरी प. पू. श्री. बालमुकुंद यांची पुण्यतिथी उत्सव गेली अठरा वर्षे अव्याहतपणे चालू आहे. प. पू. बालमुकूंद हे माझे पणजोबा. त्यांचा उत्सव प. पू. दादांनीच घालून दिला. त्याच्या कृपाशीर्वादानेच हा उत्सव चालला आहे. प. पू. दादा हे संघजीवी आहेत. त्यांचा शिष्य परिवार खूप मोठा आहे. दादांच्या शिष्यवर्गात सामील होण्यास कोणत्याही जातीचा हुद्दा असावा लागत नाही. दादांचा कृपाकटाक्ष सर्वांच्यावर सारखाच असतो. त्यांचा साधेपणा तर वाखाणण्याजोगा.

दादांच्या बैठकीत प्रत्येक समस्येचे उत्तर मिळते. दादांचे बोलणेच तसे असते. 'सहज बोलणे हित उपदेश, करोनी सायास शिकवीती ' या उक्तीप्रमाणे दादांचे वक्तव्य असते. यामुळे प. पू. दादांचा सहवास हा नेहमीच हवा हवासा वाटणारा आणि ' न व्हावा वियोग जन्मो जन्मी ' असे वाटणारा !

दादांचे ज्ञान हे अगाध ! त्याना माहित नसणारा विषयच नाही ! त्यांच्या बैठकीत याचा अनुभव सहज अनुभवण्यास मिळतो. प. पू. दादांचे अत्यंत काटेकोरपणाचे वागणे आणि वेळेचे बंधन याही वयात पाळणे हे अनाकलनीय आहे. आम्हाला आमच्या पूर्व सुकृताने प. पू. दादारुपी कामधेनूच मिळाली आहे. परमेश्वर त्यांना दीर्घायुरोग्य देवो हीच त्या दयाघनापायी प्रार्थना.

# बाल सखा धोंडबा

*बाबू कामत*

मी तसा दैववादी नाही. पण धोंडबाविषयी मी विचार करू लागलो की जीवन हा नशिबाचा खेळ वाटतो. पाच सहा तपापूर्वी संकेश्वर व बैलहोंगल ही बेळगाव जिल्ह्यातील मोठी गावे. माझी लहानपणाची अति रम्य आठवण म्हणजे संकेश्वरला श्रीपादमामांच्या मांडीवर खेळल्याची. श्रीपाद मामा हे धोंडबाचे वडील. नंतर धोंडबा माझ्या जन्म गांवी बैलहोंगलला आल्याचे स्मरते. मी ३० साली बेळगांवच्या सेंट पॉल मध्ये नुकता इंग्रजी शिकत होतो. माझ कोवळ वय लक्षात न घेता, धोंडबाने मला शेक्सपीयरच्या कविता शिकविल्या. पुढे विठू आला; नंतर तो जे. पी. नाईक भारत सरकारचा शिक्षण सल्लागार म्हणून गाजला. त्यानेही खूप इंग्रजी ओतले ! ते समजले नाही तरी या दोघानी मजवर ज्ञानवर्षाव केला ही मधुर स्मृतीच माझे मन फुलवते !.. पुढे मी कोल्हापूरला गेल्यावेळी या दोघांना पाहिले.. त्यांचा मी असा परिचय करीत असे ' हे दोघे खालच्या वर्गात असताना वरच्या वर्गाचे क्लास घेत असत '.. नंतर मी वर्ध्याला सेवाग्रामला गेलो. नीरा- ताडगुळाचे काम पत्करले. त्यामुळे म. गांधी व नंतर विनोबांच्याकडे जाण्याचे महद्‌भाग्य मला लाभले. तसेच तेथे गजाननराव नाईक - ताडगुळाचे अध्वर्यू यांची शेवटपर्यंत सेवा करण्याची संधी मिळाली. ते नुकतेच २८-१-९१ ला निवर्तले. Harijan मधले गजाननरावांचे लेख गांधीना तपासण्याची गरज वाटत नसे. गांधीजनात किमान मानधन गजाननराव घेत. त्यांचा असीम त्याग अन्यांना दाहक असला तरी माझ्या वाट्याला निखालस प्रेम लाभले. पूर्वायुष्यांत भौतिक गरिबीत वाढलेले हे तीन बौद्धिक श्रीमंत ! पण धोंडबाची तऱ्हा वेगळी, शिक्षणानंतर त्याला अनेक व्यापांतून जावे लागले. सर्वात मोठा म्हणून घराची जबाबदारी घ्यावी लागली. देशाचा ध्यास व पर्यटनाची आस असून त्याला मात्र गांवची कास धरून रहावी लागली. कौतुकास्पद हेच की त्या इवल्याशा गावांत राहून त्याने आपली रसिकता कायम ठेवली. फुरसत असली की मी निस्संकोचपणे त्याच्याकडे जातो. पोटभर गप्पा मारून येतो. त्याचे कप्पे कधी बंद नसतात. त्याच्या मानाने माझे पाठांतर अगदी तोकडे. ग्रेची Fall many a gem of purest ray serene ही ओळ आठवते. विनोबांनी सांगितलेले आठवते. ' या भारतात खूप मोठी माणसे प्रकाशात आली, प्रकाशात न आलेली थोर माणसे ही खूप,'.. पण मला धोंडबा आठवतो तो माझा बालसखा म्हणून !

## माझे दैवत

सुकांत माने, कोगनोळी.

ती. दादांचा व माझा परिचय तसा १५ ते १६ वर्षाचा होईल परंतु त्यांच्यावर लेख लिहिण्याची योग्यता माझ्यात नाही. " दादा " या दोनच नावाने संबोधले जाणारे किंवा सर्वांना परिचित असणारे व्यक्तिमत्त्व अनेक लहानमोठ्या शब्दांच्या सहाय्याने व विविध भावभावनांच्या स्पंदनाने शब्दबद्ध करण अवघड काम आहे. तस पाहिलं तर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला संपूर्ण आविष्कार एखाद्या लेखातच संपूर्ण गौरव ग्रंथात सामावणार नाही याची खात्री आहे. कारण जे केवळ शब्दांनी सांगता येणार नाही प्रत्यक्ष अनुभूतीचा जो भाग आहे तो सर्वस्वी वेगळाच राहील म्हणून ज्ञानेश्वरांच्या ओवीप्रमाणे

शब्देविण संवादीजे, इंद्रिय नेणता भोगिजे
बोला आधी झोंबिजे स्वानंदू जैसा

तरीसुद्धा गौरवग्रंथाच्या या उपक्रमामुळे माझ्यासारख्या माणसालादेखील आपले विचार व भावना व्यक्त करण्याची संधी मिळणार आहे.

साधारणपणे १९७४ च्या दरम्यान (त्यावेळेचे माझे वय २० वर्षे) मनाच्या वैफल्यग्रस्त अवस्थेमध्ये असताना ती. दादांची व माझी भेट झाली व माझा पुनर्जन्मच झाला असे म्हणावे लागेल. कारण त्यांच्याजवळ गेल्यानंतर मला इतर कुठेही मिळाले नाही इतके अपार मानसिक व एक प्रकारचा आनंद यांचा लाभ झाला व पुढे अनेक सुखदुःखाच्या प्रसंगी मनाची शांती टिकवता आली व जीवनातील अनेक संकटांना तोंड देण्याचे धैर्य मला त्यांच्यामुळेच मिळाले. त्यांच्याबद्दल एवढच म्हणावेसे वाटते की ते प्रेम आम्हा सर्वांना मिळावे व जन्ममरणाच्या परंपरेने देखील खंडित होऊ नये. व्यवहारात तसा मी अल्पसंतुष्ट वृत्तीचा. पण या बाबतीत माझी हाव कमी नाही दादा हे मला गुरुस्थानी तर आहेतच पण ते माझे दैवत आहेत. शेवटी एवढेच म्हणावे वाटते

आपणासारिखे करीती तत्काळ
नाहीं काळवेळ तया लागी

हा सदगुरु महिमा आहे. म्हणून तत्काळ नसेनाका आमचे योग्यतेप्रमाणे यथावकाश का होईना आपणासारखे करावे. त्या साठी वाटेल तो त्याग करावा लागला तरी हरकत नाही.

# आध्यात्मिकतेचा परिस लाभलेले समर्थ व्यक्तिमत्त्व

*श्री. एस्. जी. होसमठ*

पूजनीय श्री. दादा (धोंडोपंत) नाईक यांच्या ८० व्या वर्षाच्या सार्थक व सफल जीवनानंतर त्यांच्या निकटवर्ती आत्मीय लोकांनी त्यांच्या गौरवार्थ जो समारंभ आयोजित केला आहे तो अतिशय उचितच आहे. या स्तुत्य व शुभ समारंभामध्ये भाग घेणे हे मी माझे भाग्य समजतो. त्यांनी जोपासलेल्या संकेश्वर येथील श्री दुरडुंडेश्वर माध्यमिक शाळेचा मुख्याध्यापक म्हणून काम स्वीकारल्यानंतर सुरुवातीला त्यांचे प्रेम व मार्गदर्शन मला अतिशय मोलाचे ठरले. त्यांच्या बद्दलची कृतज्ञता व प्रेम शब्दात व्यक्त करणे कठीण आहे. तरीही मी प्रयत्न करीत आहे.

त्यांच्याशी माझा प्रथम परिचय माझे परम मित्र कै. लखूनाना कित्तूर यांच्यामार्फत सुमारे ५० वर्षापूर्वी झाला. श्री. दादा श्री. लखूनानांचेही मित्र होते. श्री. लखूनाना यांचेकडे दादांचे वरचेवर जाणे असे. मी ही लखूनानांच्या घरी नेहमी जात असे. श्री. दादांशी माझा प्रथम परिचय झाला तो ते संकेश्वर येथील हायस्कूलचे हेडमास्तर म्हणून काही दिवसानंतर डॉ. सावनूर यांच्या कांही टिपणावरून श्री. दादा हे काही वैद्यकीय पुस्तक लिहित असल्याचे समजले. नंतर पाहिले तर स्वतःच ते पुस्तक टाईपही करीत होते. त्याच सुमारास दक्षिण भारतामधील छोट्या संस्थानांना आहार धान्य रेशनिंग वस्तू पुरविण्याचे काम श्री. गिरी यांना मिळाले होते. या बृहत कामासाठी बहुमुखी, प्रतिभेच्या योग्य व दक्ष प्रशासकाची जरूरी होती. श्री. गिरी यांची नजर श्री. दादांचेवर पडली. श्री. दादांच्या कुशल व दक्ष व्यवस्थापनेमुळे त्या योजनेची व्याप्ती वाढू लागली. त्या लहान संस्थानांकडून आपली आवश्यकता या योजनेमार्फत अतिशय व्यवस्थित पूर्ण होत आहे असे सरकारला कळविले गेले. सरकारी अधिकारीही त्यांच्या कार्यकुशलतेवर प्रसन्न झाले. अशा तऱ्हेने त्या योजनेची कार्यव्याप्ती वाढू लागली. या कामामध्ये श्री. दादांनी आपल्या भावंडांचे व विद्यार्थ्यांचेही सहाय्य घेऊन सर्व जनतेला समाधानकारक धान्य वाटप केले. दुसरे महायुद्ध संपताच ही धान्य वाटप योजना संपुष्टात आली. श्री. दादांच्या कार्यकुशलतेच्या सहाय्याने ही योजना दुसऱ्या चांगल्या कामासाठी उपयोगात आणता आली असती. पण काही कारणाने तसे होऊ शकले नाही. एका क्षणांत एका कामातून पूर्णपणे भिन्न असलेले दुसरेच विरुद्ध प्रकारचे काम हाती घेऊन ते समाधानकाररित्या पूर्ण करणे हे काम फार कठीण आहे. सामान्यांच्या कल्पनेच्याही पलिकडचे आहे. श्री. दादा मुख्याध्यापकाचे काम असो, वैद्यकीय पुस्तक लिहिणे व ते टाईपही करण्याचे काम असो; याप्रमाणे एकमेकाशी संबंध नसलेली अनेक कामे घेऊन ती सर्वांना पूर्ण समाधान देऊन पूर्ण करणे व तितक्याच

सहजतेने आश्चर्यकारक रीतीने ती कामे सोडून ते अलिप्त होऊ शकतात. हे कितीजणांना साध्य होईल ! श्री. दादांना कोणत्याही कामामध्ये अति उत्कृष्ट सफलता मिळाल्याशिवाय समाधान मिळत नाही. कोणतेही काम श्री. दादा अर्धेमुर्धे (Half minded) चित्त लावून करीत नाहीत. प्रत्येक काम आव्हान म्हणून स्वीकारून युद्ध पातळीवर ती योजना ते तयार करतात व त्यामध्ये स्वतःला झोकून देतात. अशा लोकांशिवाय दुसऱ्या कोणाला हे यश मिळणार !

दादांची ही बहुमुखी प्रतिभा इतरांप्रमाणे माझ्यापुढेही एक कोडेच आहे. ते म्हणजे एक ज्ञानभांडार चालते फिरते ज्ञानकोशच आहेत. साहित्य, शिक्षण, संगीत, आरोग्य, व्यापार, अध्यात्म अशा अनेक विषयावर ते अधिकारवाणीने साधार प्रतिपादन करू शकतात. सामान्यांना समजण्यासारखे व मनावर बिंबवण्यासारखे स्पष्टीकरण ते सहज देऊ शकतात. विविध विषयावरील त्यांच्या अगाध ज्ञानाने सामान्यजन मंत्रमुग्ध होतात. एका व्यक्तीमध्ये एवढे ज्ञानभांडार असणे हे मला तर आश्चर्यच वाटते. कोणत्याही विषयावरचे त्यांचे ज्ञान वरवरचे नसते. प्रत्येक विषयाच्या मुळापर्यंत जाण्यातच त्यांना समाधान मिळते. किनाऱ्यावरील शंख-शिंपल्यामध्ये ते रमणारे नाहीत, तर ज्ञानसागरामध्ये स्वच्छंद पोहून सागराच्या तळाला बुडी मारून तेथील रत्ने शोधणे हाच त्यांचा स्वभाव.

सर्वसामान्य लोकहितामध्यें मग्न असणाऱ्या साधुसंतांप्रमाणे श्री. दादा हे सर्व-सामान्यामध्यें असूनही त्यामध्ये भूमीवरील नक्षत्राप्रमाणे चमकतात. विद्यार्थीदशेमध्ये श्री. दादा प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ श्री. जे. पी. नाईक यांच्याबरोबर एका खोलीमध्ये राहात होते. श्री. नाईक साहेबांच्या निकट सहवासामुळे श्री. दादांच्या जीवनाला एक नवे परिमाण लाभले. शेक्सपियरच्या नाटकांमधील उतारे ते आजही जशास तसे ऐकवितात. नवीन प्रकाशित पुस्तके सर्वप्रथम वाचण्याचा त्यांना हव्यासच. नवीन पुस्तक घेण्यासाठी ते कोणताही त्याग करतील. जेवणही सोडतील. कॉलेजमध्ये असतांना पाठ्यपुस्तकाबरोबर संदर्भ ग्रंथही ते वर्गाच्या आधीच वाचून संपवीत असत. प्राध्यापक शिकवितेवेळी त्यांच्या शिकविण्या-मध्ये काही उल्लेख राहून गेल्यास ते ताबडतोब निदर्शनास आणीत. प्रोफेसरांच्या गैरहजेरीत कै. श्री. जे. पी. नाईक हे प्राध्यापकाप्रमाणेच वर्ग चालवीत असत. श्री. जे. पी. नाईक व श्री. दादा नाईक या दोघांमध्ये शिक्षण समाप्तीनंतर श्री. जे. पी. नाईकांना स्वतंत्र पक्षाप्रमाणे हवे ते साध्य करता आले. परंतु श्री. दादांना घर व घरची जबाबदारी घेऊनच घरामध्येच गुंतून राहावे लागले. जणू पिंजऱ्यातील बंदिस्त पक्षीच ! हाच त्यांच्या प्रतिभा विकासाला एक अडथळा झाला. आजही ते त्यामधून मुक्त, पूर्णमुक्त झालेले नाहीत.

त्या काळी इंग्लिश विषयांमध्ये B.A. डिग्री मिळाल्यानंतर सहजपणे एखादी चांगली नोकरी स्वीकारणे किंवा M.A. चा अभ्यास चालू करणे हे क्रमप्राप्तच होते. परंतु विधिवैचित्र्य हे की दैवाने त्यांना साहित्य क्षेत्रापासून तागडीसमोर नेऊन उभे केले. B.A.

नंतर घरच्या अडचणीमुळे त्यांना कापसाच्या व्यापारामध्ये जुंपावे लागले. तेथेही त्यांना परिस्थितीशी झगडावे लागले. अडचणींचे डोंगर तेथेही त्यांच्यासमोर होतेच. कापसाच्या व्यापारासाठी त्यांना गोकाक, मिरज, सांगली येथे सायकलीने जावे लागत असे.

याच सुमारास संकेश्वर येथे १९२९ मध्ये आर्यसमाज कोल्हापूरमार्फत स्थापन झालेली माध्यमिक शाळा रखडत चालली होती. कोल्हापूर कॉलेजचे प्रसिद्ध प्राचार्य डॉ. बाळकृष्ण शर्मा यांनी श्री. दादांची प्रतिभा जाणून व ते संकेश्वरचे असल्यामुळे त्यांच्या सेवेचा उपयोग करून घेण्याचे ठरविले. त्यावेळच्या माध्यमिक शाळेची सेवा म्हणजे निर्धन सेवाच ! पगाराचा प्रश्नच नाही. गुरुवर्य प्राचार्य बाळकृष्णांनी विचारण्याचा अवकाश दादांनी ते काम शिरसावंद्य मानून त्या कामास तत्पर असावे. श्री. दादा हे संकेश्वरचेच असल्यामुळे त्यांनी श्री. दुरदुंडेश्वर लजपतराय (त्या वेळचे संस्थेचे नाव) या संस्थेचे सूत्र हाती घेताच त्या शाळेचे रुपच बदलले. श्री. दादांची प्रतिभा व परिश्रमामुळे लहान असूनही ती शाळा भरभराट करू लागली. १९४२ मध्ये हायस्कूल झाले. त्यांच्या कारकीर्दीमध्ये विशेष आर्थिक टंचाई असूनही त्यांनी वाढविलेले ग्रंथालय व विज्ञान विभाग शाळा खात्याच्या प्रशंसेस पात्र ठरले. प्रथमपासून पुस्तकांचे वेड असल्यामुळे शाळेच्या ग्रंथालयाचीं पुस्तके ते स्वत: निवडत असत. ग्रंथालयामधील प्रत्येक पुस्तकाची त्यांना माहिती असे. पुस्तके विकत घेताना त्यांचेजवळ भाषाभेद नव्हता. त्यांच्यानंतर आलेल्या एका मुख्याध्यापकांनी शाळेच्या ग्रंथालयामध्ये कन्नड पुस्तके कमी असल्याचे मॅनेजमेंटकडे निवेदन केले. श्री. दादा त्यावेळी संचालक मंडळामध्ये होते. त्यांनी त्या मुख्याध्यापकांना कन्नड भाषेच्या जरुरी पुस्तकांची यादी करण्यास सांगितले. त्यांच्याकडून आलेल्या यादीमधील पुष्कळशी पुस्तके आपल्या शाळेच्या ग्रंथालयामध्ये आहेत हे पाहण्यास त्या मुख्याध्यापकांना सांगितले. खरोखरच बरीचशी पुस्तके ग्रंथालयात होती. हाच त्यांचा सर्वभाषा प्रेमाचा व अगाध स्मरणशक्तीचा आरसा होय.

आर्यसमाज कोल्हापूर यांचेमार्फत चाललेल्या श्री दुरदुंडेश्वर लजपतराय माध्यमिक शाळेला जरूर असलेली आर्थिक मदत कोल्हापूरहून होणे शक्य नव्हते. संचालक मंडळ बाहेरचे असल्यामुळे संस्थेला जरूरी आर्थिक सहाय्य स्थानिक जनतेकडून लाभले नाही. अशा परिस्थितीत स्थानिक लोकांच्या सहकार्याशिवाय शाळेची इमारत होणार नाही. ती शाळा वाढणार नाही. म्हणून ती शाळा स्थानिक मंडळीच्या स्वाधीन करण्याची समग्र योजना दादांची तयार केली. स्थानिक शिक्षण संस्था स्थापन करण्याकरिता आवश्यक घटना व नियमावली तयार करून या हस्तांतर कार्यक्रमाचे केंद्रबिंदू होऊन सर्व व्यवहार पूर्ण केले. हा त्यांचा मोठेपणा हेडमास्तरांच्या खुर्चीला चिकटून राहण्याने शाळेची प्रगती कदाचित खुंटली असती. त्यांना ते नको होते. स्वत:चे स्थान गौण मानून आपल्या गावच्या शाळेचा उत्कर्ष हेच ध्येय त्यांनी मनाशी ठेवले. ही भरभराट आपल्याच हाताने झाली पाहिजे असा त्यांचा आग्रह नाही, नव्हता. हा त्यांचा स्वार्थत्याग अपूर्वच म्हटला पाहिजे.

कितीतरी लोक स्वत:च्या स्वार्थासाठी संस्थेचाच नव्हे तर राष्ट्राचा सुद्धा बळी देतात अशारीतीने संकेश्वर येथील श्री दुरदुंडेश्वर शिक्षण संस्थेची स्थापना करून आर्यसमाज कोल्हापूर यांचेकडून स्थानिक संस्थेकडे शाळेचे अधिकार सोपविल्यानंतरही दादांचे ज्ञान व अनुभव संस्थेला आवश्यक वाटल्यामुळे दादांना नवीन संचालक मंडळामध्ये घेण्यात आले.

माझी श्री दुरदुंडेश्वर माध्यमिक शाळा संकेश्वर येथे मुख्याध्यापक म्हणून सन १९५१ साली नेमणूक झाल्यावेळी श्री. दादा हे संस्थेच्या सल्लागार समितीचे अध्यक्ष होते. कार्यकारी समितीच्या लोकांना हायस्कूलमध्ये हेडमास्तर म्हणून येण्याबद्दल माझी संमती घेतली होती. यावेळी सल्लागार समितीच्या अध्यक्षांना ही गोष्ट कळविणे जरुर होते. पण तसे झाले नव्हते. श्री.लखूनानांच्या कडून दादांना ही गोष्ट कळाली. श्री. दादांच्या माझ्या नेमणुकीला विरोध नव्हता. पण कोणतीही बाब संघाच्या नियमानुसार व्हावी इतकाच त्यांचा आग्रह असे. शाळेच्या संचालकमंडळींमध्ये असो वा नसो बोलावणे मिळाल्यानंतर शाळेच्या कोणत्याही कामासाठी वेळेवर हजर असणारे ते एकटेच होते. शाळेच्या बांधकामासाठी निधी जमा करतेवेळी व खातेदार आप्पासाहेब पाटील यांनी ममदापूर येथील देणगी दिलेल्या जमीनविक्री संबंधीच्या कामाचे वेळी इमारत बांधकामाचे वेळी व अशा अनेक महत्त्वाच्या कामामध्ये त्यांची नेहमी सक्रिय मदत असे. सुरूवातीला इमारत बांधकामासंबंधी हिशोब लोकांना वेळोवेळी दिले गेले नसल्यामुळे लोकांमध्ये थोडे असमाधान निर्माण झाले होते. त्यावेळी हिशोब रोज लिहिले जात नसत. साधारण सभेपुढे हे हिशोब ठेवण्यासाठी ते काम पूर्ण करण्यासंबंधी श्री. दादांनी रात्रंदिवस आम्हास साहाय्य केले होते. मी व माझे सहकारी संघाचे नोकर होतो. तर श्री. दादा सल्लागार समितीचे अध्यक्ष होते. आम्हाला आदेश देऊन ते स्वस्थ बसू शकले असते. परंतु सल्लागार समितीचे अध्यक्ष असतानाही आम्हा सर्वांबरोबर एकजुटीने बसून त्यांनी ते काम केले होते. त्यांच्या या कार्यपद्धती बद्दल आम्ही त्यांचेसमोर नतमस्तक झालो.

संचालक मंडळींमध्ये शाळेचा सर्व व्यवहार पूर्णपणे जाणणारे ते एकमेव सदस्य होते. सभेपुढे आलेल्या प्रत्येक विषयाची सविस्तर माहिती त्यांना पाहिजे असे. कोणत्याही प्रश्नावर उडवाउडवीची उत्तरे त्यांना चालत नसत. त्यांचे समाधान करणे काही वेळेला मला कठीण जाई. प्रत्येक सभेमध्ये त्यांच्या अपेक्षेप्रमाणे माहिती तयार करणे ही माझी परीक्षाच असते. पण त्यामुळे माझा पुष्कळच फायदा झाला. त्यांना अपेक्षित असलेली सविस्तर माहिती तयार करण्यासाठी मलाही सविस्तर अभ्यास करावा लागे. त्यांच्या उपस्थितीमुळेच प्रत्येक बाबींची सभेमध्ये सांगोपांग चर्चा होत असे. त्यांच्या उपस्थितीमधील व अनुपस्थितीमधील सभा या दोन्हींचा मला चांगलाच अनुभव आहे. त्यांच्या अनुपस्थितीमध्ये विशेष चर्चा न होता सभा संपत असे. ते हजर नसताना (पण असे प्रसंग क्वचितच) श्री. अप्पनगौडा विचारीत. की, या विषयावर श्री. धोंडोपंताचे काय म्हणणे

आहे ? संचालक मंडळामध्ये शाळेच्या सुधारणेसंबंधी श्री. दादांच्या मताला विशेष प्राधान्य असते. त्यांच्यापासून मी पुष्कळशा गोष्टी शिकलो. त्याचा मला पुढच्या काळात फार उपयोग झाला.

शिक्षकांच्या शिकविण्यामध्ये त्यांचे मार्गदर्शन अमूल्य होते. पाठ्यपुस्तकाबद्दल कोणते संदर्भग्रंथ व पुरवणी ग्रंथ वाचावेत व त्यापैकी आपल्याकडे कोणते आहेत हे त्यांना मुखोद्‌गत असे. हे ज्ञान फक्त भाषा विषयापुरतेच मर्यादित नसे. विज्ञान व समाजशास्त्र या संबंधी शाळेत असलेल्या शिक्षण साहित्याबद्दल व उपकरणाबद्दलही त्यांचेजवळ सतत सविस्तर माहिती असे. शिक्षकांच्या कोणत्याही समस्येबद्दल बोलणे त्यांना अतिशय आवडत असे. त्यासाठी चर्चा हा त्यांचा आवडीचा छंद होता. शिक्षकांच्या समस्येवर समाधानकारक उत्तर शोधण्यासाठी ते पुष्कळ संदर्भग्रंथ व ज्ञानकोशही शोधून मार्गदर्शन करीत असत. रोजच्या पाठामध्ये ऐतिहासिक वा पौराणिक उल्लेख त्यासंबंधी मूळ ग्रंथामधून सविस्तर माहिती शोधून काढून ते शिक्षकांचे समाधान करीत असत. सध्या लाखो रुपये खर्च करून शिक्षकांना सेमिनार्स, चर्चागोष्टी, रिफ्रेशनर कोर्स या द्वारे सरकारकडून जे शिक्षण व मार्गदर्शन मिळते ते ३० वर्षापूर्वी आमच्या शिक्षकांना एकट्या श्री. दादांकडून विनाखर्चाने मिळत असे. आमच्या शाळेचे स्नेहसंमेलन दोन प्रमुख पाहुणे म्हणून नेहमी साहित्यिक बोलाविले जात असत. त्या साहित्यिकांची व श्री. दादांची चर्चा नेहमीच आनंददायक असे. ते एक छोटेसे साहित्यसंमेलनच भासे. साहित्यातील बदलते ओघ बदलणारी शैली याबद्दल व त्या वर्षाच्या उत्कृष्ट साहित्यनिर्मितीबद्दल प्रदीर्घ चर्चा होत असे. सहज चहापानाचे वेळी वा जेवणाचे वेळीच ही चर्चा घडून येई. या प्रसंगी हजर असलेल्या कित्येक शिक्षकांना त्याचा फायदा झाला. कित्येकांनी M.A.P.hd वगैरेही पूर्ण केले. ही चर्चा फक्त साहित्यापुरतीच मर्यादित असे. या चर्चेमध्ये प्रमुख पाहुणेही भाग घेऊन खूश होत. या चर्चेनंतर अनेक प्रमुख पाहुण्यांनी श्री. दादांच्या सखोल ज्ञानाबद्दल आनंद व्यक्त केला होता.

श्री. दादा हे फक्त B.A. पदवीधर असले तरी निरंतर अभ्यास व चिंतन यामुळे आज ते उच्च पातळीपर्यंत पोचले आहेत. कितीतरी M.A. च्या विद्यार्थ्यांना ते मार्गदर्शन करतात. डॉक्टरेटसाठी प्रबंध लिहिणारे विद्यार्थीही त्यांचे मार्गदर्शन घेत असताना मी पाहिले आहे हे मार्गदर्शन फक्त मराठी भाषेपुरतेच मर्यादित नव्हते. शिक्षण क्षेत्रातही त्यांचे सहाय्य घेण्यासाठी विद्यार्थी येत असत. ही प्रतिभा सहजपणे साध्य झालेली नाही. त्यांच्या दीर्घ तपस्येचेच हे फळ आहे. यामध्येही त्या त्या विद्यार्थ्यांना मदत करणे ही भावना नसून कर्तव्यभावनाच प्रमुख असे. श्री. दादांनी अनेक क्षेत्रामध्ये कार्य करून अनुभवांची परिसीमा गाठली आहे. तरीही प्रसिद्धी व अधिकाराची त्यांना अपेक्षा नाही. सभा-समारंभामध्येही ते कधी व्यासपीठावर दिसणार नाहीत. कोठेतरी कोपऱ्यामध्ये बसण्याची त्यांची पद्धत. निरपेक्षबुध्दी व साधना ही अव्याहत चालली असून ते खऱ्या अर्थाने

स्थितप्रज्ञच आहेत. त्यांना व्यासपीठावर आणणे मलाच नव्हे तर त्यांच्या अनेक मित्रांनाही माझ्या- प्रमाणेच अशक्य झाले. महर्षी श्री. अरविंद, महर्षी रानडे यांच्याप्रमाणे अनेक दार्शनिकांच्या ग्रंथांचा अनेक वर्षे व्यासंग केल्यामुळे १९७० च्या सुमारास त्यांच्यामध्ये एक परिवर्तन झाले. सर्व व्यापार संघ, शिक्षणसंस्था इतर संस्था यांच्यापासून ते दूर होऊ लागले. ते सांगत नसत. परंतु बारकाईने पहाणाऱ्याला हे जाणवत असे. संस्थांमधील त्यांची आसक्ती कमी होऊ लागली. त्यापासून ते अलिप्त होऊ लागले. त्यानी आपले मन चिंतन व मनन यामध्ये गुंतविलेले दिसत होते. याचवेळी श्री दुरदुंडेश्वर शिक्षण संस्थेच्या रजत महोत्सवावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पूज्य श्री दत्ताबाळ यांचे बरोबर दादांच्या झालेल्या चर्चेच्यावेळी मी हजर असल्यामुळे दादांच्यामधील हा फरक मला किंचित जाणवू लागला. त्यांच्या अध्यात्माची उंची कोठपर्यंत गेली आहे. याची पूर्ण कल्पना मला येऊ शकली नाही. आजही मी त्या बाबतीत अनभिज्ञच आहे. ज्यांना अध्यात्मामध्ये गोडी आहे त्यांनाच ती जाणीव होईल. सामान्यांना ते कठीण आहे.

जीवनातील अनेक सुखदु:खाचा, चढ व उतारांचा अनुभव घेऊन अनेक क्षेत्रामध्ये विशेष तपस्या करून आता ते आध्यात्मिक योगसाधनेकडे गुंतले आहेत. त्यांनी केलेल्या प्रत्येक कार्यामध्ये सामान्य यश त्यांना कधी माहित नाही. त्या बाबतीत त्यांनी नेहमी जणू फर्स्टक्लासमधूनच प्रवास केला. अध्यात्म व योगसाधनेमध्येही त्यांचे स्थान वरचेच आहे. त्यांची तपस्या सामान्यांना कळणे कठीणच. त्यांच्यामध्ये हा दैवी बदल त्यांच्या अनेक वर्षांच्या तपस्येचेच फळ होय. त्यांच्या या अपूर्व साधनेला माझे मन:पूर्वक नमन.

## जीवन संजीवनी

*वाय. डी. केकलेकर*

पूज्य ती. दादांच्या घराण्याशी माझा परिचय १९५२ पासून आहे. कोल्हापूर मुक्कामी दादांच्या मावशीचे घर आहे. या घरातच दादांचे धाकटे बंधू सदानंद उर्फ आप्पा कॉलेजचे शिक्षण पूर्ण करण्यासाठी राहिलेले होते. त्याचसुमारास माझा आप्पाशी परिचय झाला. परिचयाचे मैत्रीत मैत्रीचे दृढस्नेहामध्ये रुपांतर झाले. दृढस्नेहाचा धागा आजपावेतो अखंड आहे. ही सदगुरुचीच कृपा होय.

संकेश्वरचे नाईक घराणे म्हणजे ५०-६० व्यक्तींचे एकत्र कुटुंब. दादांचे तिसरे बंधू कै. बाबूराव श्रीपाद नाईक म्हणजे राजकारण समाजकारण यास समर्पित केलेलं जीवन होय. त्यामुळे या घरात माणसांची नेहमीच वर्दळ असे. सामान्य माणसान आपल्या सुख दु:ख मांडण्याचे ठिकाण म्हणजे नाईक यांचे घर होय. आप्पाची ओळख होताच संकेश्वर मुक्कामी माझे जाणे येणे सुरू झाले. व त्यातूनच पूज्य दादांचा परिचय व सहवास घडला.

पूज्य दादांच्या सारखी व्यक्ती माझ्या जीवनात आली नसती तर दु:ख आणि संकट यांनी होरपळून, खचून गेलेल्या माझ्या मनाला जगण्याची संजीवनी कधीच मिळाली नसती. संकटाच्यावेळी मी दादांच्याकडे धाव घेतली. त्यावेळी संकटाला सामोरे जाऊन धैर्याने जीवन जगण्याची शिकवण मला दादांच्या कडून मिळाली. इथेच दादांच्या आत्मिक बलाची जाणीव मला झाली.

पूज्य दादांच्या सहवासात अनेक लोक येत असतात. त्यामध्ये, गरीब, श्रीमंत समाजकारणी, राजकारणी साहित्यिक अध्यात्मामधले विचारवंत अभ्यासू, वेगळ्या जातिधर्माचे निरनिराळ्या व्यवसायाशी निगडित असलेले लोक असतात. या लोकांच्या बरोबर चर्चा करत असताना पूज्य दादांच्या जवळ बसण्याची संधी मला अनेक वेळा मिळाली. या चर्चेतूनच त्यांच्या शांत संयमी व्यासंगी स्वभावाचे दर्शन घडले. अभिजात संगीत, साहित्य, ज्योतिष या प्रमुख विषयात त्यांची रसिकता वाखाणण्यासारखी दिसून आली. दुसऱ्याचे म्हणणे शांतपणे ऐकून घेऊन दुसरी व्यक्ती कोठे चुकत असेल तर त्या व्यक्तीची चूक योग्य तऱ्हेने दाखवून त्या व्यक्तीला योग्य मार्गदर्शन दादांच्याकडून होत असे. परोपकार हा तर त्यांचा स्थायीभाव मला दिसून आलेला आहे. याच बोलकं उदाहरण म्हणजे माझ्यावर एकदा उपासमारीचा प्रसंग आला असताना त्यांनी मला केलेलं अर्थसाह्य हे होय. त्यांच्या नानाविध स्वभाववैशिष्ठ्यांचे दर्शन त्यांच्या सहवासात मला दिसून आलेलं आहे.

पूज्य दादांनी केलेल्या गुरुसेवेमुळे त्यांना लाभलेल्या आत्मिक बलाचा वापर लोककल्याण साधण्यासाठी केला आहे. माझ्या बाबतीत त्यांनी, माझी पहिली पत्नी (जी आज हयात नाही) हिची पहिलीच. प्रसूती सुलभ होण्यासाठी केलेला आपल्या आत्मिक बलाचा वापर, तसेच माझ्या नवजात मुलग्यावरील संकट टळण्यासाठी स्वत:ची पदरमोड करून भद्राशांतीचे केलेले जप म्हणजे माझ्या कुटुंबास लाभलेला दादांचा वरदहस्त होय.

ती. दादांच्याकडून गुरुसेवेचा प्रत्यक्ष लाभ मला एक तपापूर्वी झाला. हा लाभ माझ्या प्रथम पत्नीस मिळावा. म्हणून माझे मन तळमळत होते त्यावेळी आलेला अनुभवसुद्धा या क्षणी ताजा आहे.

सकाळी पहाटे ६ चा सुमार पत्नी आंघोळ करत होती. तिने अंगावर घेतलेल्या पाण्याचा व भांड्याचा आवाज माझ्या कानावर येत असलेली जाणीव होत होती पण मी मात्र झोपेच्या आधीनच होतो. इतक्यात माझ्या कानी शब्द आले ते तसेच देत आहे.

"शिवचरित्र ३ रा अध्याय, आहारावर नियंत्रण पाहिजे बसण्याची तयारी पाहिजे. शरीर तेज:पुंज होतं." हे सर्व मला न कळल्यामुळे दादांना घडलेला प्रकार निवेदन केला त्यावेळी पहिल्या पत्नीस शिवलिलामृत ३ रा अध्याय वाचण्यास दादांनी सांगितला. अशा तऱ्हेने पहिल्या पत्नीस माझ्या तळमळीप्रमाणे सेवेचा लाभ होताच माझ्या मनाची तळमळ थांबली.

ती. दादांच्या घरी पिढ्यान पिढ्या गुरुसेवा होत आलेली आहे. त्याला अनुसरुनच गेली कित्येक वर्षे परमपूज्य वासुदेवानंद सरस्वती टेंबेस्वामी महाराज यांची पुण्यतिथी साजरी होत असते. या उत्सवाच्या रुपाने सर्व थरातील लोक एकत्र आणून गुरुसेवेचे बीजारोपण करणे हे मुख्य कार्य ते करत आहेत गुरुसेवेचे बीजारोपण व ते निकोपपणे लोकजीवनात रुजावे म्हणून गुरुसेवेच्या साहित्याचे कोणत्याही फलाची अपेक्षा न करता मुक्तपणे वाटप करत असतात या पवित्र कार्याची आठवण मी नजरेआड करणे शक्य नाही.

## ज्ञानदानाचा अनुपम्य सोहळा

*आनंद शिवराम जोशी*

प.पू. दादांची ओळख १९७८ साली झाली. झोपेत असलेल्या माणसासमोर सूर्य आणून उभा करावा तसे काहीसे झाले. 'तुका म्हणे नेत्री झाली ओळखणं' या प्रमाणे पहिल्या नजरेतच दादांनी अंतरबाह्य दृष्टी टाकली आणि कूर्म नजरेने काही आठवणींना उजाळा दिला. मी भ्रमित झालो. त्यानं पूर्वीकधी कोठे तरी पाहिल्यासारखे वाटू लागले. क्षण एक श्री नृसिंहसरस्वती स्वामी महाराजांची निजमूर्ती डोळ्यासमोर येऊन गेली. आणि मनाला थोडा दिलासा मिळाला.

शुभ्रवस्त्रामध्ये बैठकीवर विराजमान झालेले दादा,

'सलीली पय जैसे । एक होओनी मिनले असे ॥
परि निवडूनी राजहंसे वेगळे कीजे ॥

श्री ज्ञानमाऊलींच्या ओवीतल्या राजहंसासारखे क्षण भासले. माणसाताला दुर्गुण हा त्याच्या बरोबरच जन्माला आलेला पण त्यांकडे न पाहाता फक्त सद्गुणांकडे पाहून त्याच्या दुर्गुणांना आपल्या अमोघ ज्ञानाने नाश करणारे दादा, 'नीर-क्षीर' पारखणारे ज्ञानहंसच !

याचा प्रत्यय मला त्यांच्या पहिल्याच बैठकीत आला. आमच्या घरी दादा 'बैठकी' साठी आले. आणि बघता बघता त्यांचा गोतावळा जमला. रात्र कशी उलटून गेली हे समजले नाही. अनेक विषयांवर दादांनी भाष्य केले. शेक्सपियर, कीटस्, शेली पासून आजच्या नवीन लेखक कवींच्या कवितेचे, नाटकातले उतारे दादांना मुखोद्गत संगीतावर चर्चा करताना बुजुर्गांनी तोंडात बोटे घालावीत असे त्यांचे दाखले असायचे. अध्यात्म आणि व्यवहार, परमार्थ आणि संसार ही दोन्ही कशी करावीत हे दादांनीच शिकवावे.

एकदा पं. संगमेश्वर बुवांच्या गायनाचा कार्यक्रम होता. मध्यंतरामध्ये खाण्याचा कार्यक्रम ! आम्ही मित्र मंडळी चेष्टा मस्करी करीत खाण्यात मश्गूल होते. इतरत्र भांडी पसरली होती. तिच्याकडे आमचे लक्षच नव्हते. तेंव्हा दादांनी आम्हाला सांगितले,

' जिथ हक्कानी खावं- तिथं हक्कांनी कामही करावं.'

' सहज बोलणे हितउपदेश ! करुनी सायास शिकविती ' या उक्तीप्रमाणे प. पू. दादांनी सांगितलेले ते शब्द आयुष्यात मार्गदर्शक ठरले.

' अध्यात्मात चिकित्सा नको - व्यवहारात चिकित्सा हवी ' साखर विकत घेताना दराची चार ठिकाणी चौकशी करून विकत घेणारा व्यवहारात शहाणा पण अध्यात्मात एकच ध्येय आणि एकच ठिकाण ! सारखे ज्ञानोपदेश,

' देव आमच्या बाजूने होता हे विधान खोटे आहे आम्ही देवाच्या बाजूने होतो ' यासारखे विधाने यामुळे दादांच्यावर श्रद्धा दृढ झाली.

एक प्रसंग मुद्दाम नमूद करावासा वाटतो. मंगळवार पेठ टिळकवाडी येथे आम्ही राहात होतो. रात्रीची बैठक होती. थंडीचे दिवस होते रात्रीचे ११-३० वाजले होते दत्तमहाराजांच्या गुणगौरवाचा काही विषय चाललेला होता. दादा डोळे मिटून क्षणएक तल्लीन झाले. फक्त त्यांची पावले लयबद्ध हालत होती. दादांनी एक दोन वेळा भसरीका केली मात्र ... मला प्रथम जाणवलं की एक मंद अशी सुगंधाची लाट माझ्या भोवती तरळून गेली. सुवास होता मोगऱ्याचा ! मी हळूच दादांना म्हटलं ' दादा मोगऱ्याचा सुवास आला' दादा म्हणाले ' गप्प राहा इतरांचा अनुभव पाहू.... एक क्षण असाच गेला. हळूहळू इतरांनाही तोच अनुभव येऊ लागला पण प्रत्येकाला येणारा सुवास वेगळा होता ! थोडा वेळ गेला दादा म्हणाले ' आता सुवास गेला ' येवढ दादांनी म्हणायच्या आत सुगंध नाहीसा झाला होता.

दुसरा प्रसंग असाच अविस्मरणीय ! दादांच्या बैठकीत चिकोडीचे एक गृहस्थ नेहमी उपस्थित असत ! त्यांचे दादांशी नेहमी वादविवाद होत. एकदा अशाच एका बैठकीला ते हजर होते. कांही विषयावरून चर्चा वाद-विवादा पर्यंत पोहोचली. दादा त्यांना समजावण्याचा प्रयत्न करीत होते पण ते सद्गृहस्थ दादांचे म्हणणे ऐकून घेण्यास तयारच नव्हते. प. पू. दादा तक्याला टेकलेले व लांब पाय सोडून बसले होते. प. पू. दादांना कधी नव्हे ते राग आला माझे लक्ष दादांच्या तळपायाकडे गेले. त्यांच्या डाव्या तळपायात 'त्रिशूळ ' आहे हे मला माहित होते. आता तिकडेच माझे लक्ष वेधले मात्र .. मी पाहिले दादांच्या पायातला त्रिशूळ तप्त लोखंडासारखा भासत होता. जणू लोहाराच्या भट्टीतला फुलवलेला निखाराच ! पुढे जसा दादांचा राग शांत झाला तसा त्रिशूळही रंग बदलत गेला ! तो प्रसंग अजूनही माझ्या डोळ्यासमोर तसाच उभा रहातो.

दादांनी दिलेल्या भस्माचा प्रभाव, दादांनी सांगितलेल्या अनुष्ठानाचा अनुभव, दादांचा स्वप्न दृष्टांत, दादांच्या बैठकीत आपोआप मिळणारी मनातल्या प्रश्नांची उत्तरे इ. ची अनेक अनुभव मला आलेले आहेत.

दादांनी, आपल्या कृपाशीर्वादाने अनेकांचा उद्धार केलेला आहे. त्या अनेकापैकी मीही एक भाग्यवान !

केवळ दादांच्या कृपेने नेहमी माझे मन मला बजावून सांगत असते,-

‘ राजयाची कांता काय भीक मागे ।<br>
मनाचिया जोगे सिद्धी पावे ॥ ’

## श्री कृपावंत दयाघन प. पू. दादा

*- सौ. एस्. जी. देशपांडे*

त्या दिवसांत माझी प्रकृती ठीक नव्हती, मी सारखी आजारी असायची. त्याच सुमारास एके दिवशी पहाटेच्या सुमारास मला एक स्वप्न-दृष्टांत झाला. त्या स्वप्नात एक वृद्ध संन्याशी माझ्यासमोर येऊन उभे राहिले. त्या संन्याशाला पाहताच ते प. पू. योगी बालमुकुंद असल्याचे माझ्या ध्यानात आले. त्यांच्याबद्दलचे अनेक चमत्कार मी ऐकले होते. ते समोर येताच मी त्यांना म्हणाले, ‘ मी तुमची नात आहे. तुम्ही मला ओळखलंत ?’ एवढे ऐकताच ते अदृश्य झाले. या घटनेनंतर माझी प्रकृती सुधारत चालली !

१९७४ साली पहिल्यांदा प. पू. दादा आमच्या घरी आले. त्यांचा वास आमच्या घरी असतानाच म्हणजे पारीशवाड येथील प. पू. बालमुकूद यांनी निवास केलेल्या मूळ घरातच जिथे सध्या माझा लहान भाऊ सुरेश डॉक्टरी करतो तिथे, त्यांनी आम्हाला प्रश्न केला की ज्या बालयोगी बाळप्पा उर्फ बालमुकूंद यांच्या कृपेने तुमचे जीवन विनासायास चालले आहे त्यांचे स्मरण तुम्ही करता की नाही ? त्यांचा वास सध्या इथे आहे ! हे सांगत असतानाच एक चमत्कार झाला. चुलीवर आम्ही अगदी साधा तांदूळ शिजवीत होतो पण घरभर सुगंधी तांदळाचा भात होताना जसा सुवास पसरतो तसा पसरला. आम्ही सारे स्तंभितच झालो ! यानंतर रात्री जेवणानंतर बोलत बसल्यावेळी प. पू. दादा म्हणाले श्री बालमुकूंदांचा वास अजूनही या घरात आहे. आणि यावेळी ते तुमच्या घराभोवती संचार करीत आहेत. आम्हाला क्षणभर खरे वाटले नाही कारण शंभर वर्षांनंतर अजूनी त्यांचा वास कसा काय असावा ? पण दादांनी एवढे म्हणण्याच्या आतच धूपाचा सुवास दरवळू लागला. संपूर्ण धुपाचा घरभर भरून उरला ! आम्ही प. पू. दादांच्या चरणी नतमस्तक झालो !

या घटनेने भारावलेले आम्ही दादांच्या आज्ञेप्रमाणे गुरुद्वादशीच्या दिवशी उत्सव करण्यास प्रारंभ केला. प. पू. बालमुकुंद यांनी अनुष्ठान केलेल्या आणि पूजिलेल्या ईश्वर मंदिरात अभिषेक, पूजाअर्चा आणि रात्री भजन कीर्तनाचा कार्यक्रम असा पाठ सुरू केला. सुरुवातीच्या तीन वर्षात हा कार्यक्रम घरापुरताच मर्यादित होता पण नंतर दूरदूरहून संगीत सेवेत अनेक गायक कलाकारांची हजेरी लागू लागली. उत्सवाला फुलोरा येऊ लागला ! प. पू. बालमुकुंद यांच्या सेवेस पात्र होण्यास प. पू. दादांचे कृपाशीर्वाद लाभले. सध्याही गुरुद्वादशीस हा उत्सव मोठ्या प्रमाणावर पार पडतो.

यानंतरची एक घटना मात्र अविस्मरणीय आहे. या घटनेतून असा प्रत्यय आला की प. पू. दादा प्रत्यक्षातच नव्हे तर आपल्या अनाकलनीय शक्तीने आमचे रक्षण सर्वतोपरीने करीत आहेत. एकदा आम्ही सर्वजण गावाला गेलो होतो. घरात कुणीच नव्हते, ही संधी साधून काही चोर घरावरची कौले काढून घरात घुसले. घरातल्या इतर वस्तू हस्तगत केल्यावर त्यांची नजर देवघरावर पडली. सर्व चांदीच्या वस्तू, भांडी, देव तेथे होते. हे चोर देवघराच्या दरवाजात येताच त्याना तिथे पांढरे वस्त्र परिधान केलेली व्यक्ती दिसली ! धीरगंभीर आवाजात ती म्हणली, " या बाळांनो आत या, तुम्हाला ज्या वस्तू हव्या आहेत त्या घेऊन जा, आता विलंब कशाला करता " ती व्यक्ती त्यांचा धीरगंभीर आवाज ऐकताच चोराना घाम फुटला, आणि तेथून ते जीव मुठीत घेऊन पळत सुटले.

## प. पू. दादांची कृपादृष्टी !

*- श्रीमती विजया ग्रामपुरोहित*

१९७० सालची ही घटना आहे. तेव्हा मी बी. एस्. सी च्या तृतीय वर्षात शिकत होते. बेंगळूरच्या वर्किंग वुमेन्स् हॉस्टेलमध्ये रहात होते. परीक्षा जवळ येत चालली होती. पण अभ्यासात माझे लक्षच लागत नव्हते. पुस्तक हाती घेताच अभ्यासाचा कंटाळा यायचा ! माझ्या आईच्या ध्यानात ही गोष्ट आली. तिने मला वारंवार माझ्या या आळशीपणाबद्दल विचारले आणि शेवटी ' तुला अभ्यास करून पास व्हायचे आहे की नाही ?' तू परीक्षेला बसणार की नाही ? असें विचारताच मी परीक्षेला बसणार नाही असे कठोर उत्तर दिले. असे उत्तर माझ्याकडून अपेक्षित नसल्याने आईने मला रागाच्या भरात मार दिला व ती श्री राघवेंद्र स्वामींच्या मठास निघून गेली. तिथे बसून ती बरीच रडली व मन हलके होताच घरी आली. आणि अचानक प. पू. दादांच्या भेटीस जाण्याचे तिच्या मनात आले व मला सोबतीस घेऊन दादांच्या भेटीस आली. प. पू. दादांना पहाताच माझा भार हलका झाल्यासारखा वाटला. प. पू. दादांना माझी अडचण सांगताच दादांनी मला

दिवसातून तीन वेळा श्री वेंकटेशस्तोत्र वाचावयास सांगितले. दादांनी सांगितले की तू परीक्षेला जा. जर पहिला पेपर बरा गेला तरच नंतरचे पेपर्स लिही ! त्याप्रमाणे मी अभ्यास सुरू केला. परीक्षेच्या दिवशी बेंगळूरला गेले आणि परीक्षेला हजर झाले. पहिला पेपर अपेक्षेबाहेर सुंदर गेला आणि त्याचप्रमाणे नंतरचे सर्व पेपर्स ! श्री. दादांची कृपा झाली आणि मी बी. एस्. सी. प्रथम श्रेणीत पास झाले. एकेकाळी अभ्यासाचा तिटकारा करणारी मी, फर्स्टक्लासमध्ये पास झाले. दादांची कृपा माझ्यावर झाली मी धन्य झाले !

## सदगुरु सारिखा असता पाठीराखा

*श्रीमती सुशीला देशपांडे*

१९६१ च्या डिसेंबरमध्ये प. पू. दादांची प्रथम भेट झाली. सौ. लक्ष्मीबाई कौलगूड यांनी दादांच्या दर्शनास नेले आणि माझे भाग्य फळाला आले. तेथून दादांचे आणि आमचे दृढसंबंध जुळून आले. अनेक आपत्तीतून दादांनी मला अगदी हाताशी धरून पैलपार केले. याची अनेक उदाहरणे आहेत, त्यापैकी काही इथे देत आहे.

प्रथमदर्शनीच दादांनी मला माझ्या शैक्षणिक पात्रतेबद्दल प्रश्न केला. दादांना मी माझे शिक्षण इंटरपर्यंत झाल्याचे सांगितले. त्यावर दादा म्हणाले की शालेय शिक्षणाने बाह्य ज्ञान मिळाले जर तुला काही उपदेश केल्यास त्याचे पालन करशील का ? असे सांगून तुझ्या भाळी त्रिपुंडू (तीन भस्माच्या रेखा) असून तू पूर्व जन्मीची योगिनी आहेस. तुझा पूर्व जन्म लिंगायत जातीमध्ये होता. असे विशद केले. पुढे प. पू. हुरकुडली आजा यांचे दर्शन घेतले असता त्यांनी तेच पुन्हा कथन करून चिडची देवी तुला दर्शन देईल असे सांगितले. हा दादांचाच आशीर्वाद.

१९६४ ऑक्टोबरमध्ये मी दादांच्या दर्शनाला गेले. आम्ही तिरुपतीला जायचे निश्चित केल्याचे सांगितले ते ऐकताच दादा म्हणाले की, तिरुपतीला जाणारे तुम्ही कोण ? त्यानं तुम्हाला बोलावून घेतल पाहिजे ना ? याचा अर्थ मला पुढे समजला कारण ज्या दिवशी आम्ही तिरुपतीला हजर होणार होतो त्या दिवशी मी डॉक्टर मॅथ्यूज यांच्या दवाखान्यात ॲडमिट झाले होते.

१९६५ च्या जून महिन्यात पुन्हा तिरुपतीला जायचे ठरविले. यावेळी आम्हाला आमच्या लहान मुलाचे जावळ करायचे होते. म्हणून मी प. पू. दादांच्या दर्शनास गेले आणि त्यांना तिरुपतीला जाणार असल्याचे सांगितले. तेंव्हा दादा म्हणाले, " यावेळी तुम्ही जरूर जाऊन याल !" दादांचे एवढे शब्द कानी पडताच माझा उत्साह शतपटीने वाढला. मी घरी आले माझ्या मोठ्या मुलाला भाजीपाला आणण्यास मार्केटमध्ये पाठवत होते. तर

माझ्या लहान मुलाने त्याच्याबरोबर जाण्याचा हट्ट धरला. त्याला सायकलवर पुढे बसवून सायकलीस स्टँड लावून तो भाजी घेत होता. इतक्यात सायकलजवळ एक कुत्रे येऊन भुंकू लागले. लहानगा श्रीकांत बिथरला ! त्यांने चुळबूळ सुरू केली. सायकलीचा तोल गेला आणि श्रीकांत सायकलीवरून बाजूच्या मोठ्या गटारीत फेकला गेला. रस्त्यावरून जाणाऱ्या एका गवळ्याच्या ध्यानात ही गोष्ट आली. त्यांनी पोराला उचलले, आपल्या जवळच्या कपड्यात लपेटून त्याला घरी आणले. श्रीकांतला जबर मुका मार बसला होता. तो बेशुद्ध अवस्थेतच होता. त्याला उलट्या सुरू झाल्या. उलट्या थांबतच नव्हत्या ! पण मी निश्चिंत होते ! माझा दृढविश्वास होता दादांच्या शब्दावर. दादा.म्हणाले होते " तुम्ही ठरलेल्या वेळीच तिरुपतीला जाल." याच माझ्या निश्चयाने विश्वासाने दादांच्या कृपेचा आश्रय मिळाला. रात्रौ १२ वा. च्या सुमारास पोराला जाग आली. ' आई दूध दे ' हे त्याचे शब्द अजूनही कानातच घर करून आहेत. सर्व कृपा होती दादांच्या भस्माची, कृपेची आणि त्यांच्या कृपाळू कटाक्षाची !

दुसरा प्रसंग आठवतो ! तो ओढवला होता सुरेशवर ! त्यावेळी तो हुबळीच्या के. एम्. सी. मध्ये आपले वैद्यकीय शिक्षण घेत होता. तेंव्हा त्याच्या पायाच्या हाडामध्ये काही इजा झाली आणि जखम वाढतच चालली. त्याला प्लॅस्टर घातले पण त्याचे दुखणे कांही थांबेना. त्याचे विव्हळणे, कण्हणे ऐकवत नव्हते. तशातच काही वेदनाशामक घेतल्याचे निमित्त झाले आणि पायात ' पू ' भरला त्याचे दुखणे वाढतच होते. आम्ही हतबल झालो होतो ! असेच आठ एक दिवस गेले आणि एके दिवशी प. पू. दादा दत्त म्हणून घरी आले. क्षेमसमाचाराच्या गोष्टी झाल्यावर मी त्यांना सुरेशबद्दल सांगितले. तेव्हा दादांनी डॉक्टरांचा सल्ला घेतला आहे का ? असे विचारले तेंव्हा आत झोपलेल्या सुरेशने ' डॉक्टर म्हणजे कांही देव आहेत का ? 'अशी विचारणा केली. दादांचे मन द्रवले ! ते सरळ उठून आत आले. त्यांनी त्याची अवस्था पाहिली. आणि श्री तुळजाभवानीच्या नावे पाच रुपये काढून ठेवा आणि नंतर जाऊन तुळजाभवानीचे दर्शन घेण्यास सांगितले. आणि काय आश्चर्य ! सुरेशचे दुखणे हळूहळू कमी होऊ लागले तीन दिवसातच तो उठून फिरू लागला. ज्या दिवशी त्याचे ऑपरेशन होते त्याच्या दोन दिवस आधी तो नियोजित डॉक्टरांच्यापुढे हजर झाला. डॉक्टरांनी त्याच्या पायाचे एक्सरे (X Ray) काढून पाहिले. तर त्या ठिकाणी जखमेचा मागमूस नव्हता ! डॉक्टरांना कांहीच उमगले नाही, ते आश्चर्यचकित झाले !

आणखी एक प्रसंग आवर्जून सांगावासा वाटतो. माझ्या मुलीची डिलिव्हरी झाली. पण तिची प्रकृती खालावू लागली. डॉक्टरांनीही तिची आशा सोडली. पण तिला दादांच्या भेटीची तळमळ लागली होती. त्याचवेळी दादा बेळगावला आले होते. त्यांना आम्ही हुबळीच्या दवाखान्यात असल्याचे समजले. त्यांनी ती. आप्पा ती. गुरुजी यांच्यासह त्वरित आपली गाडी हुबळीस वळवली. ते तडक दवाखान्यातच आले. दादांचे दर्शन होताच

माझी मुलगी म्हणाली, " आई मी वाचले, आता मी लवकरच बरी होणार ' दर्शन देऊन दादा परत चालले तेव्हा मी त्यांना राहण्याची विनंती केली. तेव्हा दादा म्हणाले, " ज्यासाठी आलो होतो ते कार्य झाले.' आम्ही निघालो. ती त्रिमूर्ती निघून गेली. माझी मुलगी अगदी ठणठणीत बरी झाली. पुढे समजले की, दत्तमहाराजांचीच दादांना आज्ञा झाली होती. केवढे प्रसंग सांगावेत ? क्षणोक्षणी, पावलोपावली दादांनी आम्हाला हाताला धरून चालवले आहे. अशा दादांचे आम्ही जन्मोजन्मी ऋणी आहोत.

## माझी प्रॉपर्टी

*जी. व्ही. पुराणिक, बेळगांव*

मला नक्की तारीख आठवत नाही, पण साल मात्र १९७५ हे निश्चित. आम्ही बेळगांवला कपिलेश्वर भागांत रहात होतो. सकाळी ९ चा सुमार असेल. पूजा आटोपून मी गुरुचरित्र वाचत होतो, तेवढ्यात दार वाजलं म्हणून माझी पत्नी स्वातीने दार उघडल. समोर दादा उभे ! " अग ! तू अजून जिवंत आहेस ? मला वाटल तू आतापर्यंत बहुतेक मेली असावीस, पण पुराणिकांच तसं काही पत्र आलं नाही. म्हणून मुद्दाम बघून जायला आलोय." इति दादा. त्या दोघांमधील हा सुसंवाद ऐकणाऱ्याला विचित्र वाटेल. पण संदर्भ कळल्यावर मृत्यूचीही चेष्टा करणारे दादा स्वातीची मृत्यूबद्दल भीतीची टर उडवत होते. तिने त्यांना आत बोलाविले आणि समोर कोचावर बसून त्यांच्या गप्पा सुरू झाल्या. माझ गुरुचरित्र वाचून झाल. पण मन मात्र भूतकाळात रेंगाळत राहिलं.

माझ्या धाकट्या मुलीच्या जन्मानंतर शारीरिक व मानसिक तणावामुळे स्वातीची प्रकृती एवढी खालावली की औषधोपचाराचा परिणाम होईना. डॉक्टरांना योग्य निदान होईना. स्वाती मनाने पूर्ण खचली होती. घरच्या अनंत अडचणीमुळे मलाही निराशेने घेरले होतं. थोरली मुलगी तीन वर्षाची व धाकटी ४ महिन्याची. म्हातारे आईवडील आणि बेतासबात अशी आर्थिक परिस्थिती. स्वातीने स्वतः जगण्याची आशा सोडली होती. त्यामुळे पुढे काय होणार याची मला चिंता लागून राहिली होती. डॉक्टर झाले, देवधर्म, अंगारेधुपारे, नवस सायास निष्फळ ठरले. धीर देणारे कोणी नाहीतच, दादांची नुकतीच ओळख झाली होती. एक दोनदा श्री. राम कमलाकरांकडे त्यांची भेट झाली होती. पण का कोणजाणे या गृहस्थाबद्दल माझं फारसं अनुकूल मत नव्हंत. पण पुढे ऋणानुबंध वाढेल याची कल्पनाही नव्हती. त्यांनतर दादा आपणहून एक दोन वेळा आमच्या घरी आले. त्यावेळी मी त्यांच्यासमोर मनाची कोंडी फोडली. दादांनी माझं बोलण शांतपणे ऐकलं. स्वातीलाही आपल्या मनांतल दुःख दादांना सांगाव अस वाटलं असावं. बाळाला घेऊन

ती दादांच्या शेजारी बसली होती. तिला बोलता येईना ती हुंदके देऊन रडू लागली. " दादा आता मी जगत नाही माझ्या दोन्ही पोरींच कसं होणार ?" क्षणभर दादा बेचैन दिसले. पण पटकन् स्वतःला सावरून त्यांनी आपल्या पिशवीतून तुळजापूरचे कुंकू काढले आणि तिचा मळवट भरला आणि म्हणाले, " स्वाती तू इतक्या लवकर कशी मरणार ? तुझ आयुष्य खूप मोठ आहे. अजून काही गोष्टी घडायच्या आहेत. तुमच स्वतःच घर होईल व त्यानंतर मुलगा होईल." ती विषण्णपणे हसली. " दादा यांतून मी वाचले तरचा प्रश्न आहे. पुढच्या खेपेला तुम्ही येईपर्यंत मी जिवंत असणार नाही." दादा म्हणाले " बरं बरं वेडाबाई मरण म्हणजे तुला काय चेष्टा वाटली ? फार विचार करायचा नाही." त्यानंतर दादा तीन आठवड्यांनी परत आले त्यावेळी त्या दोघामध्ये काय संवाद घडला तो सुरूवातीला दिला आहे.

तू आतांच काय मरतेस ? तुला अजून मुलगा व्हायचाय्. स्वतःच घर व्हायचय अस दादांनी १९७५ साली माझ्या पत्नीला सांगितलं होतं. पुढे १९८४ साली आम्हाला मुलगा झाला. या संदर्भात एक घटना आठवते ती अशी

मला पहिल्या दोन्ही मुलीच आहेत. दुसऱ्या मुलीच्या बाळंतपणाच्यावेळी स्वातीला जो शारीरिक व मानसिक त्रास झाला त्यांतूनच ती जगते की मरते अशी स्थिती झाली आणि पुढेही खूप वर्षे तो त्रास चालू राहिला. त्यामुळे दादांनी तुला " मुलगा होणार" म्हणून सांगितलेले माझ्या दृष्टीने मूर्त स्वरूपात येणारी गोष्ट नव्हतीच. धाकटी मुलगी संगीता १२ वर्षाची झाली आणि आम्ही " मुलाची " अपेक्षाही सोडून दिली होती. माझ्या तीनही भावाना प्रत्येकी एक तरी मुलगा आहे. पण आपल्याला नाही ही खंत स्वातीच्या मनांत होती. प्रसंगी तिने मला बोलूनही दाखविली होती. पण संगीताच्या जन्मानंतर बाळंतपणाबद्दल तिला एक भीती वाटत राहिली ती कायमची. त्यामुळे दोन्ही मुलीत आम्ही रमून गेलो होतो. पण १९८३ साली हिला अचानक दिवस गेले. तिच्या मनात चलबिचल सुरू झाली. मला नकळत संगीताला घेऊन ती एक दिवस भर दुपारी दादा आल्याचे कळल्यावरून तडक शहापूरला छोटीकडे गेली. दादांना पाहून काही न बोलता रडूं लागली. दादांनी पाठावरून हात फिरवून सारं ऐकून घेतल. दादांनी तिला सांगितलं " मी पुराणिकांशी बोलतो नंतर गर्भ ठेवायचा का काढून टाकायचा हे आपण ठरवू." तिनं सांगितलं " तुम्ही काय सांगाल त्याप्रमाणे आम्ही करणार." दादांच्यावर तिचा दृढ विश्वास. दादांनी तितक्या दृढ विश्वासांनी सांगितलं, " गर्भ चांगल्या रीतीने वाढवा. काळजी घ्या. याखेपेला तुला मुलगा होणार आहे बाळंतपणाची यत्किंचितही काळजी करू नको." दादांच्या या शब्दावर तिचा विश्वास बसला. तिच्या मनाची घालमेल थांबली.तरी पण तिने दादांना विचारलेच " दादा तिसरी मुलगी होणार नाही कशावरून ?" त्या प्रश्नाला दादांनी उत्तर दिलं " तुला मुलगा होणार म्हणून मी सांगितलेय. तस झालं नाही तर पुनः हातांत

पंचांग धरणार नाही." मग पुढ मात्र सारं व्यवस्थित झालं. त्यानंतर मी एकटाच दादांना भेटायला गेल्यावेळी दादांनी मला सांगितल, " गुरुचरित्राचे ओळीने ७ सप्ते करून घ्या शिवाय तुमच्या घरी दरवर्षी करता तसा वेगळा सप्ता करा. माझ्या दृष्टीने सिझरीन होणार मानसिक तयारी ठेवा," स्वातीने पुढे काय सांगायच ते सांगितल मला जे सांगायचे ते सांगितल आणि आमच्यासाठी दादांनी महाराजांना सांकड घातल की हे सार पूर्णपणे पार पाडा अन्यथा एकजीव व एक कुटुंब उध्वस्त होणार." दादांनी सांगितलेला शब्दन् शब्द खरा ठरला. सुधर्मच्या जन्मापासून स्वातीची निराशा कमी झाली आणि ती माणसात आली. सुधर्म ७ वर्षाचा आहे. मला कितीतरी वेळां वाटतं त्यावेळी दादांचा आधार मिळाला नसता तर.... पण असं घडणार नव्हतं. दादांच्या कृपाछत्राखाली आज माझ कुटुंब सर्व संकटांना पार करून विसावलंय.

तेव्हा पंधरा वर्षापूर्वी माझ्या कुटुंबाची अशी अवस्था होती. त्यातून बाहेर पडण्यासाठी दादांनी रोज गुरुचरित्र वाचण्याची सूचना केली. घरी गुरुचरित्राची पोथी होती. माझे वडील नियमितपणे वाचत. पण " त्यावर माझा विश्वास नाही " असे मी दादांना सांगितले. त्यावर दादा म्हणाले " मी सांगतो म्हणून केवळ बाराखडी म्हणून वाच." दादांच्यावर श्रद्धा ठेवून अस्मादिकांनी गुरुचरित्राची पोथी उघडली. तिथूनच आमच्या संसाराच्या गाडीवर हळूहळू ताबा येऊ लागला. दादा प्रत्येक शनिवारी संकेश्वरहून आमच्या घरी मुक्कामाला यायचे. स्वातीला समोर बसवून आमच्या गप्पागोष्टी रात्रभर चालायच्या. घरातील सर्वांच्या कुंडल्या बघून झाल्या. साहित्यापासून तंबाखूच्या व्यापारापर्यंत सर्व विषयावर चर्चा चालायची. रात्र केव्हा संपली कळायच नाही. पहाटे पहाटे मग दादा आडवे व्हायचे. नकळत स्वातीचा आत्मविश्वास बळावला. दर शनिवारी ती दादांची वाट पाहू लागली. महिना पंधरा दिवसांत मरणार म्हणणारी बाई पुन्हा उठून बसली. कोसळणारं घर पुनः उभं राहिल. १९८३ साली मी अचानक घर बांधल. पण ही गोष्ट दादांनी १९७७ मध्ये सांगितलेली होती. हातात पैसा नसताना सुरुवात केली आणि ४ ।५ महिन्यांत घर बांधून तयार झालं. कित्येकदा माझं मला खर वाटत नाही. दादा वास्तूशांतीला आले होते. दादांना नमस्कार करायला वाकलेली स्वाती त्यांचे पाय घट्ट धरून रडत राहिली. दादांनी पाठीवर हात फिरवून सांगितल आता कसलं रडतेस. तुझे वाईट दिवस संपले. पुढ सगळं चांगल होणार आहे. गुरुचरित्राचे सात सलग सप्ते करून घ्या. तुला लवकरच मुलगा होईल. स्वतःच्या घरात जन्मणार आहे तो." आणि तसंच पुढे घडल. आज सुधर्म ७ वर्षाचा आहे. शाळेत हुशार आहे. थोरली मुलगी सुजाता एल्. आय्. सी मध्ये नोकरी करते. धाकटी संगीता पण शहाणी आहे. यंदा B. A. होईल. या साऱ्यांच करायला स्वातीची धावपळ चालू असते. तिला आतां थोरल्या मुलीचे लग्न आणि सुधर्मची मुंज करायचे वेध लागले आहेत. त्यासाठी देवधर्म, श्राद्धपक्ष, कुलधर्म सर्व करत

असते. तिला आता मरण नको आहे. मुलगा मोठा होऊन त्यांच सारं व्हायला पाहिजे म्हणून आता ती जगण्याचा अट्टाहास धरते. हे सार घडतय दादांच्या कृपेमुळं.

गेल्या जन्मी त्यांनी आमचं काय गाठोड खाल्ल होतं की आमचं सारं निस्तरावं ? पण दादांच कुटुंब फार मोठ आहे. आमच्यासारखी खूप कुटुंब दादांच्या कृपाछत्राखाली जगतात. दादा हा सारा व्याप कसं सांभाळतात हे त्यानांच ठाऊक कारण स्वतःचा संसार सांभाळताना आमची दमछाक झाली आहे. या वयात देखील; आम्ही पाठविलेल्या पत्राला कटाक्षाने उत्तर पाठवितात. भेटायला कोल्हापूरला आल्यागेल्याची विचारपूस दादा आत्मीयतेने करतात. पूर्वीसारखं सारखं बेळगांवला येण बंद झालंय. पण जेव्हां गरज होती तेव्हां दादा पदरमोड करून येऊन जात. पावलोपावली त्यांची आठवण येते. दादांच्या इतक्या वर्षाच्या सहवासान सारे प्रश्न विचारून झालेत. आता विचारण्यासारखं कांही शिल्लक ठेवलं नाही. बोट धरून चालायची आवश्यकता दादांनी शिल्लक ठेवली नाही.

दादांच्या सहवासांतली गेली सोळा वर्षं अनेक प्रसंगानी व अनुभवांनी समृद्ध आहेत. त्यातला एक अनुभव जो मी घेतला तो सांगायचा प्रयत्न केलाय. अजून खूप सांगायचं राहिलं. ते माझ्या मनातील शिंपल्यांत जपून ठेवलंय. कुठंही ओघळायला नको म्हणून. हीच माझी प्रॉपर्टी आहे. आयुष्यभर पुरणारी.

## ती. दादांच्या काही आठवणी

*सौ. सुशीलाबाई श्रीनिवास देशपांडे*

ते १९६८ साल असावे. मी तेव्हा बेंगलोरला होते. माझ्या यजमानांची A.L.C. म्हणून बेंगलोरला बदली झाली होती. मला तेथील हवामान मानवले नाही. माझी प्रकृती बिघडली. सगळे डॉक्टर झाले. पण गुण नाही.

एक दिवस पहाटे ४ वाजता स्वप्न पडले. स्वप्नात एक वृद्ध संन्यासी मांझे समोर उभे राहिले व म्हणाले, 'मी बाळाप्पाण्णा' हे त्यांचे शब्द स्पष्टपणे मला ऐकू आले. त्यापूर्वी मी माझ्या आत्याकडून बाळाप्पाण्णाबद्दल पुष्कळ कथा ऐकल्या होत्या. स्वप्नात ही माझ्या माहितीतलेच नाव कानावर पडल्यामुळे मला फार आनंद झाला. त्यावेळी मी अनंतरायाची मुलगी म्हणजे आपली नात असे सांगितले व वर पाहिले तर आजोबा दृष्टीआड झाले होते. त्यांची दिव्यदृष्टी माझ्यावर पडल्याने माझा आजार हळूहळू कमी होत आला.

माझा भाऊ डॉ. सुरेश याने बालमुकुंद अगदी सुरूवातीपासून ज्या घरात रहात असत. त्या पारिशवाड येथील घरात दवाखाना सुरू करून वैद्यकीय व्यवसाय सुरू केला.

१९७४ च्या उन्हाळ्याच्या सुटीत आम्ही सर्व मुली व मुले पारिशवाडला गेलो होतो. त्याचवेळी पूज्य दादांनाही पारिशवाडला येण्याचे निमंत्रण दिले. तेही ४ दिवसाकरिता पारिशवाडला आले.

त्यादिवशी रात्री दादांशी गप्पा मारत असताना बालमुकुंदांचा विषय निघाला. त्यांच्याबद्दलची मला माहिती असलेली माहिती मी सांगितली. बालमुकुंद लहानपणापासून विरक्त होते. प्रपंचाचा त्याग करून १२ वर्षे घोर तपश्चर्या करून वेदांताचा अभ्यास त्यांनी केला. ते उन्मत्त, पिशाच्चग्रस्त स्थितीत असायचे. त्यामुळे लोक त्यांना खुळा बाळाप्पा म्हणत. त्यांनी आपले शिष्य पंतमहाराज बाळेकुंद्री यांना आपल्याजवळची सर्व गुह्यविद्या आलिंगनाद्वारे त्यांच्याकडे सोपवून त्यांच्या मस्तकावर आपला वरदहस्त ठेवून आशीर्वाद दिला. आपल्याला कोणत्याही प्रकारच्या प्रसिद्धीची इच्छा नाही. आपले स्मारक करू नये असे सांगून अवधूत मार्गाचा प्रसार कर असा आशीर्वाद दिला.

आपले अवतार कार्य संपले, आपण श्रीशैलला जाणार आहोत. असे सांगून श्रीशैल पाताळगंगेत समाधिस्थ झाले.

एवढे सर्व ऐकल्यावर पू. दादांनी आम्हाला विचारले. आपल्या घरी इतके थोर पुरूष होऊन गेले. त्यांचे काहीच स्मारक करणार नाही का ? आम्ही नाही म्हणालो.

बाळाप्पाण्णा आजही आहेत असे म्हणण्यासारखा आपल्याला काही अनुभव आला काय ? आपला त्यावर विश्वास आहे काय ? असे अनेक प्रश्न दादांनी आम्हाला विचारले.

त्याच दिवशी रात्री एक चमत्कार झाला. घरी स्वयंपाकाची तयारी सुरू होती. भाताकरिता घरचेच साधे तांदूळ ठेवले होते. थोड्यावेळाने शिजलेल्या भाताचा सुवास सगळीकडे पसरला. सर्वांना आश्चर्य वाटले. घरी घनसाळ किंवा वासाचे कोणतेच तांदूळ नव्हते. होते ते साधे तांदूळ. मग हा वास कशाचा ? त्यानंतर रात्री जेवणं झाली व आम्ही गप्पा मारत बसलो होतो. रात्रीचे बारा वाजले असतील. एवढ्यात दादा म्हणाले, 'बाळाप्पाण्णा घराभोवती संचार करीत आहेत ? आम्हाला आश्चर्य वाटले बाळाप्पाण्णाना जाऊन १०० वर्षे होत आली. आणि आज घराभोवती कसे ? घराच्या चारही बाजूंनी धूप घातल्यासारखा सुवास येत होता. बालमुकुंदांचे अस्तित्त्व या वासावरूनच आम्ही ओळखावे असे दादा म्हणाले.

दादांनी गुरुद्वादशीस त्यांची एक आठवण म्हणून उत्सव साजरा करणेस आम्हाला सांगितले. आम्ही त्याच वर्षी तो उत्सव सुरू केला. बालमुकुंदानी पूजा केलेले ईश्वरा देवस्थान आहे. तेथेच रुद्राभिषेक व जागरण केले. पहिली तीन वर्षे घरची मंडळी व संगमेश्वरबुवा गुरव इतकेच असत. गुरुराव यांचे गायन होत असे. उत्सवाच्या पहिल्या दत्तजयंती दिवशी बालमुकुंदाच्या पादुकेची स्थापना केली. पुढे पुढे बेळगांव, कोल्हापूर-

हून, अनेक कलावंत येत. आता गेल्या ४० वर्षापासून कलावंत येऊन आपली सेवा करून जातात. गेल्या १७ वर्षापासून हा उत्सव अखंड सुरु आहे.

गुरुमुखातून आलेला संदेश कोणाचाही असो तो खरा असतो. व्यवहारात पहिल्यांदा अनुभव नंतर श्रद्धा. जसे साखर गोड आहे याचा अनुभव घेतल्याशिवाय येत नाही.

पण अध्यात्मात प्रथम श्रद्धा हवी तरच अनुभव येतो. त्याकरिता गुरुची आवश्यकता आहे. आमच्या घरी गेली १७ वर्षे हा उत्सव सुरू आहे त्याला कारण पू. दादाच आहेत. याची आम्हाला अभिमान वाटतो.

बालमुकुंदांचे आमचे घरी आजही अस्तित्व आहे,याची एक अदभुत घटना घडली त्यामुळे प्रचिती आली.

१९९० मध्ये उन्हाळ्याच्या सुटीत माझे पारिशवाड येथे राहणारे भाऊ आपल्या परिवारासह १५ दिवस परगावी गेले होते. काही दुष्टमाणसांनी एक दिवशी आमच्या घराच्या मागच्या बाजूने येऊन घरावरील काही खापऱ्या काढून मागील दार उघडून ठेवले. त्यांनी देवघरात यावे असा विचार केला असावा, कारण तेथील चांदीच्या भांड्यांकडे त्यांचे लक्ष गेले होते. तेव्हा त्यांनी तेथे एक व्यक्ती उभी असल्याचे दिसले. ती म्हणाली, 'भावांनो गडबड का करता, तुम्हाला जे जे हवे ते सावकाश घेऊन जा. हे ऐकून ते सर्वजण भीतीने घामाघूम झाले. व त्यांनी मागील दाराने पळ काढला.

अशी ही अद्‌भुत घटना म्हणजे संतकृपाच. ही सर्व दादांची कृपा आहे अशी आमची श्रद्धा आहे. दादांनी अशा अनेक चमत्काराचा अनुभव आम्हाला करून, दिला आहे., त्याचा एक स्वतंत्र ग्रंथच होईल.

## मायेची शाल

***सौ. सुहास शर्मा, दिल्ली.***

१९७० च्या फेब्रुवारीचा दुसरा आठवडा. पुण्यात पूनम नावाच्या हॉटेलमध्ये माझे यजमान, मी आणि माझी व्यंग असलेली आणि जिवावरच्या ऑपरेशनमधून उठलेली सोळा महिन्यांची मुलगी एका डी.एस. नाईक नावाच्या गृहस्थांची वाट बघत होतो. ह्यांनी त्यांच्याबद्दल मला अस सांगितले होते, की काही दिवस आधी जेव्हा हे त्यांना भेटले होते तेव्हा श्री. नाईक ह्यांनी मला पूर्वी न पाहिलेले असतानाही माझ अगदी तंतोतंत वर्णन ह्यांच्यापाशी केलेलं होते. मलाही जरा जिज्ञासा होती ही काय जादू आहे ते जाणून घ्यायची.

ह्यांनी पूनम हॉटेलच्या खोलीच दार उघडल तेव्हा समोर दादा उभे होते. त्यांच्या दिसण्याबद्दल माझ्या काही गैरसमजुती होत्या. माझ्या मिस्टरांनी मला त्यांच्याबद्दल, त्यांच्या intuitive power बद्दल, त्यांच्या साधनेबद्दल जे काही सांगितल होत त्यावरून माझ्या कल्पनेत कपाळावर चंदनाचा बुक्क्याचा टिळा लावलेले, गळ्यात कसल्या कसल्या माळा घातलेले ह्यातात पोथी पंचांग इत्यादीच बाड असा मेकप असलेले कुणी बघायला मिळणार अशी अपेक्षा होती. पण आल्या आल्या दादांनी ह्यांच्याशी कसल्याशा (मला वाटत उसाच्या) बाजार भावावर बोलायला सुरूवात केली. आणि कुणी शहा नावाचा माणूस (हे गृहस्थ कॉन्ट्रक्टर होते.) आपल्याला भेटायल येणार असल्याच सांगितल. मला जरा नवल वाटल. म्हणजे त्यांच्या बद्दलच्या आध्यात्मिक इमेजशी हे सगळ जुळेना.

एका गोष्टीची मनात जरा धाकधुक होती. हे सद्‌गृहस्थ पोचलेले वाटण्यापेक्षा मला जरी कितीही सर्वसाधारण आपल्यासारखे वाटत असले तरी बायकांच्या पाळीबद्दल त्यांच नक्कीच पथ्य असेल आणि माझी पाळी अगदी एक दोन दिवसांवर आली होती. मी हिम्मत करून दादांना माझी परिस्थिती सांगितली, ते म्हणाले,'हा अंगारा घे, मी इथे असेपर्यंत तुझी पाळी येणार नाही.' मी अंगारा घेतला खरा, पण मनात पोरकट अश्रद्धा होती. दादा त्यांच्याबद्दलच्या माझ्या सगळ्या अपेक्षा खोट्या ठरवीत होते. पुढे श्री. शहा दादांना भेटून गेले. दादा त्यांच्या कॉन्ट्रॅक्टच्या फाईलस वाचून त्यांना काही सूचना देत होते. काही अडचणी वर उपाय सांगत होते. मी अचंब्याने बघत होते, श्री. शहा भक्तिभावाने दादांनी सांगितलेले ऐकत होते आणि दादा मात्र हेडमास्तर सारखे पुढे केलेले कागद वाचून मग चष्म्याच्या वरून बघत, त्यांच्याबद्दल मत देत होते ! कुठे ती त्यांच्याबद्दलची माझी कल्पना आणि कुठे हे पैशाच्या बजेटच्या गोष्टी बोलणारे दादा- एक गोष्ट नकळत होत होती. जितका अपेक्षाभंग होत होता तितके ते जवळचे वाटायला लागले होते. त्यांना विचारावस वाटायला लागल - त्यांच्या घरात कोण कोण आहेत ? त्यांच लग्न झालय का ? मुलं असतील का ? संसारगाडा ओढणाऱ्यांसारखा वाटणारा हा गृहस्थ आम्ही ऐकली होती तशी आध्यात्मिक साधना जप जाप्य इ. कधी आणि कशी करत असेल ? ह्यांचा लोकसंग्रह बराच मोठा वाटतो. ह्याचा त्यांच्या घरच्या माणसांना किती त्रास होत असेल. (मी हे आणि ह्याहून अगदी 'व्यक्तिगत प्रश्न पुढे दादांना विचारले आणि दादांनी त्यांची मोठ्या मनाने मला जरासुद्धा अवघड वाटू न देता उत्तरं दिली ।)

पुण्यातली ही आमची तीन दिवसांची भेट एका विलक्षण घटनेमुळे माझ्या आठवणीतून कधीही पुसली जाणार नाही. चवदा फेब्रुवारीची रात्र होती. (आम्ही तिघं रोज मध्यरात्रीपर्यंत गप्पा मारत बसत होतो.) मी, माझे यजमान पै पलंगावर बसलो होतो. खाली एक गादी घालून भिंतीला टेकून दादा बसले होते. आम्ही आजारी मुलीच्या ट्रीटमेंटबद्दल बोलत होतो. दादांना ॲलोपॅथी आणि सर्जरीच कल्पनेबाहेर ज्ञान आहे.अगदी मोठमोठ्या डॉक्टरांशी चर्चा करण्याइतक हे मला पहिल्यांदा दिसत होत. मी दादांना माझ्या पैंच्या विरूद्ध तक्रार सांगत होते. त्यांच्या सारख्या दौऱ्यावर असण्यामुळे ते आमच्याकडे दुर्लक्ष

करतात. अस मला नेहमी वाटत असे. गप्पांमध्ये रात्रीचे दोन वाजून गेले असावेत हे एकदम शहारल्यासारखे हलले. थोडेसे घाबरल्यासारखेही दिसले. माझ्या आणि दादांच्याही हे लक्षात आले. आम्ही ह्यांना काय झाले म्हणून विचारलं, हे म्हणाले, 'मला आता दादांच्या जागी एक फार तेजस्वी योगी दिसला. ह्यांचे डोळे आश्चर्याने आणि थोड्या भीतीने विस्फारल्यासारखे दिसत होते, हातापायावरचे केस उभे राहिले होते, आणि आवाज कापल्यासारखा वाटत होता. हे पुन्हा म्हणाले, 'मला तुमच्याजागी एक तेज:पुंज संन्याशी दिसला आणि त्याच्यामागून एक नदी वाहात होती. त्या दोघांच्याही कदाचित लक्षात न आलेली गोष्ट माझ्या लक्षात आली. दादांचा आवाज त्या लहानशा खोलीत एखाद्या खोल गुहेत घुमावा तसा घुमला ते म्हणाले,'मी पूर्वजन्मी योगी होतो.' मला अजून आज एकवीस वर्षानंतर तो घनगंभीर कुठून तरी खूप दुरून आल्यासारखा पण तितकाच भयचकित करणारा आवाज आठवतो. मला वाटल होत. हा आवाज ह्या सद्‌गृहस्थांचा निश्चित नाही. पुढे दादा आपल्या नेहमीच्या आवाजात म्हणाले,'तुम्हाला माझ्याजागी आता जे दिसलं त्याचा अर्थ पुढे समजेल. गृहस्थधर्माचे भोग भोगण्यासाठी हा जन्म.' हा विषय त्यानंतर पुन्हा आला नाही. आम्हा आमच्या दु:खा कष्टाचा कहाण्या सांगून दादांना सतावत राहिलो. (अजूनही या कार्यक्रमात बदल नाही.) पुढे वर्षभरानंतर हे अकोल्याला दौऱ्यासाठी गेले होते. तिथून जवळच लाड कारंजे आहे तिथे का कुणास ठाऊक जावस वाटल. तिथून परत आल्यावर त्यांनी मला ह्यांनी एक चित्र दाखवल. आणि म्हणाले, 'तुला आठवत ? मला पुण्यात वर्षभरापूर्वी दादांच्या जागी एक फार सुंदर योगी दिसला होता ? त्याच हे चित्र.' प.पू. नृसिंहसरस्वती महाराजांच ते चित्र होत हे अकोल्याला कामानिमित्त त्याआधी बरेचदा गेले होते. पण लाड कारंज्याला जाव आणि श्री महाराजांच्या स्थानाच दर्शन त्यांना पुण्याच्या अनुभवानंतर घडाव याचा काय अर्थ असेल ? मी अशा घटनांना योगायोग म्हणून उडवून लावीत असे. पण पुण्यात मलाही दादांच्या विभूतीचा अनुभव आला होता. ते आमचा निरोप घेऊन जाईपर्यंत मला पाळी आली नव्हती. आणि आता ह्यांच्या अनपेक्षितपणे काही काम नसताना लाड कारंज्याला जाण्यामुळे मला स्वत:लाच मी प्रश्न केला. हे सगळेच काय योगायोग आहेत ? आमच्यात किती मोठं माणूस वावरतय हे आम्हाला कळाव हा तर ह्या सगळ्या मागचा अर्थ नसेल ? पण हा विचार माझ्या मनात क्षणभरच आला. खरोखर आमच्यासारखे स्वार्थी, दादांच्या मोठेपणाची किंमत स्वत:च्या उपयोगी समजून घेणारा आणि त्यांची जागा जाणणारा मला वाटत कुणी एखाद दुसरा असेल, नसेल. ह्या आम्हाला आलेल्या अनुभवानंतर कुणाला वाटेल मीही पैंसारखी दादांची भक्त झाले असेन. माझ्यावर ह्या सगळ्याचा परिणाम असा झाला की मी त्यांच्या आणखीनच जवळ गेले. त्यांची वडिलधारे एक अधिकारी माणूस म्हणून मनात आदराची जागा होती, ती हळूहळू कशी कधी समजत नाही बदलून ते माझे वडील आणि मित्र बनत गेले. ते फार मोठे आहेत. मला कुणीही कितीही सांगितले तरी ते मला माझे वाटतात. त्यांच्या वागण्यात जो एक गमतीदार सहजपणा आहे त्याने ते फार मोठे आहेत आणि

त्यांच्यापुढे आपण अगदी क्षुद्र आहोत अस कधीही वाटलं नाही. ते खरोखरच सर्व बाबतीत फार मोठे आहेत. त्यांना मोठेपणा देण्यात मी नेहमी माझा स्वार्थ बघितला. आणि त्यांनी फार काळजीपूर्वक मला अपराधीपण वाटू न देण्याची दक्षता घेतली. आणि मला स्वार्थ साधू दिला. सासुरवाशिणीला फक्त बापाकडूनच जे घेता येईल ते मी दादांकडून घेतलय. किंबहुना जन्मदात्याने माझ्यासाठी जे केल नाही ते दादांनी माझ्यासाठी केलं आहे त्यांनी मी जरी वडिलांसारखी मानत असले तरी त्यांच्याशी माझं वागणं बहुतेक मित्रासारखं असत. मी मित्रासारख म्हणत असले तरी ह्या माझ्या मित्रांत आणि माझ्यात कोणत्याही बाबतीत सारखेपणा नाही त्यांच्या माझ्याबाबतीतली भूमिका मी माझ्या मर्जीप्रमाणे बदलत असते. आणि त्यांची कमाल अशी की ते हे माझे बेजबाबदार वागण मानून घेतात. आणि गम्मत अशी आहे की त्यांचा अशा तऱ्हेने अन्याय फायदा घेणारे माझ्यासारखे पुष्कळ आहेत. आणि त्यांचाही दाद्दांच्या बाबतीतला माझ्यासारखाच अनुभव असणार नाही तर त्यांच्या अफाट लोकसंग्रहाच दुसर काय कारण असू शकेल ?

आज वीस- बावीस वर्षांच्या दादांच्या सान्निध्याच्या विचार केला की एक गोष्ट माझ्या लक्षात येते. त्यांनी माझ्या प्रत्येक निराशाजनक परिस्थितीत माझ्या मनावर आपल्या मायेची ऊबदार शाल घातली आहे. त्यांची जगाकडे बघण्याची जी एक (positive) पॉझिटिव्ह दृष्टी आहे, जी जीवनावर प्रेम करण्याची वृत्ती आहे ती फार सांसर्गिक आहे. आणि हे फक्त माझ्या बाबतीत नाही तर कोणत्याही अधिकाराच्या हुद्यावर नसलेल्या दादांना दुरून भेटायला लोक का येतात ? त्यांचा पत्रव्यवहार बघितला की समाजातल्या सगळ्या स्तरांवरच्या लोकांना ते आपले वाटतात.

माझ्यापुरतं मी इतकं म्हणेन कीं त्यांच्या छोटाक्का आणि अनिल बरोबर ते मलाही मोजतात याहून माझ्यासाठी दुसरी सुदैवाची गोष्ट नाही. तस बघितल तर या माणसातली खुबी आहे की प्रत्येकाला आपण त्यांचे कुटुंबीय आहोत अस वाटाव.

त्यांच्या ऐंशीव्या वाढदिवसी माझ्यासारखी त्यांच्यावर सर्वस्वी अवलंबून असणारी मुलगी त्यांच्या शतायु होण्याची प्रार्थना करील.

## जीवनाला कलाटणी देणारे दादा

*भालचंद्र कुलकर्णी, बेळगांव*

प्रिय वसंतराव,

तुमचं पत्र व सोबत पाठविलेल 'निवेदन' पोचले. तीर्थरूप दादा नाईक यांनी ८० व्या वर्षात पदार्पण केले, इतकेच नव्हे तर त्यानिमित्त त्यांचा गौरव सुहृदांकडून होत आहे, हे वाचून अतिशय आनंद झाला.

दिवस कसे बघता बघता गेले. माझ्या आयुष्यात ज्या काही थोड्या व्यक्तींनी माझ्या जीवनाला कलाटणी देऊन मला आनंद दिला त्यामध्ये ती. स्व. दादा हे एक प्रमुख आहेत. नेहमीच मला त्यांची आठवण येते. संकेश्वरच्या हायस्कूलमध्ये प्रवेश करतेवेळी, त्यांनी माझा जो 'इंटरव्ह्यू' घेतला. त्याच वेळी मी त्यांच्या प्रेमात पडलो. मराठी व इंग्रजी साहित्याचा त्यांचा अभ्यास, आदर व त्यांची जाण त्यावेळी झालेल्या चर्चेत दिसून आली, मी अगदी दिपून गेलो. अशा रसिक आणि अभ्यासू माणसाशी आपला परिचय झाला. मी भलताच खूष झालो ! आपण यापुढे त्यांच्या सहवासात येणार हा आनंद काही वेगळाच होता. पुढे त्यांच्या सहवासात आल्यावर संगीत नृत्य, आदी कलांबद्दल त्यांना किती आदर प्रेम आहे हे आढळून आले. संगीतातील तर ते चांगलेच दर्दी. मलाही संगीताची आवड नाटकाचे वेड तेव्हा त्यांच्या माझ्या मनाच्या तारा जुळायला वेळ लागला नाही. त्यांच्या बरोबर भ्रमंती करताना अनेक मैफिली कार्यक्रम पहाण्याचा योग आला. 'विद्वान सर्वत्र पूज्यते' अस जरी सांगितल जाते तरी हल्लीच्या जाहिरात बाजीच्या युगात रसिकतेची, विद्वत्तेची कर्तृत्वाची कशी परवड होत आहे हे मी सांगायला पाहिजे असे नाही. सध्या सर्वत्र चाललेले सत्कार, गौरव काय दर्शवितात ? मन विषण्ण होते. अशा वातावरणात एका रसिकमान्य, सर्वक्षेत्रात कार्य केलेल्या अधिकारी, चारित्र्यसंपन्न व्यक्तिमत्वाचा गौरव होत आहे या सारखी दुसरी घटना नाही. अशा गौरव प्रसंगी आपला हातभार लागणं ही तर भाग्याची गोष्ट !

## सतत वाढणारा ज्ञानवृक्ष

*अविनाश शिपूरकर*

एका तत्त्ववेत्त्यांनी म्हटलयं (Gurdgeff) की मनुष्यप्राणी हा कैदी आहे. आणि या कैदखान्यामध्ये अनेक काळ घालवत असल्यामुळे तो कैदी आहे हे पूर्णत: विसरून जातो. शिवाय हा तुरूंग इतका प्रचंड आहे की त्याच्या सीमारेषा मनुष्यप्राण्यांच्या दृष्टीक्षेपात येऊ शकत नाहीत. या सीमा ( subtle) आहेत. पण प्रत्येक सामान्य माणूस या सीमा दृष्टीक्षेपात येत नसल्यामुळे आपण स्वतंत्र आहोत, बंधनरहित आहोत अशा भ्रामक कल्पनेत जीवन जगत असतो.

पण या जगापलिकडील अलौकिक ( Tracedental ) दैवी अनुभूतीची ज्या व्यक्तीला चाहूल लागलेली आहे, किंबहूना ज्यांना काही अंशी त्याची अनुभूती आलेली आहे अशा फारच क्वचित ! आणि ह्याच व्यक्ती माझ्यासारख्या सामान्य माणसांना कैदखान्यात असल्याची जाणीव करून देतात. अलौकिक अनुभवाची तृष्णा निर्माण

करतात. श्री. परमपूज्य दादा ही अशी एक व्यक्ती आहे की ज्यांच्या सहवासात अलौकिक जगाची जाणीव निर्माण होते. त्यांच्या व्यक्तित्वात व्रतस्थ चिंतनाच्या सर्व खाणाखुणा स्पष्ट दिसतात. अनेक मोठी माणसं या माणसांत सामावलेली दिसतात. म्हणून दादांचा उल्लेख करताना गृहस्थ माणूस किंवा तत्सम शब्दांचा वापर करावा अस वाटत नाही.

माझ्या गेल्या काही वर्षांच्या सहवासामध्ये दादांच्याकडून मिळालं तितकं मला आत्तापर्यंतच्या काळामध्ये मिळालं नव्हतच पण कदाचित पुढच्या अनेक काळात मिळाल नसत. अलौकिक जीवनासंबंधीची तृष्णा आत्यंतिकपणे माझी वाढली, ती केवळ श्री. दादाच्या सहवासात ! म्हणून मला असा प्रश्न पडतो की बुद्ध, ख्रिस्त, शंकराचार्य यासारखी माणसं झालीच नसती किंवा दादांच्यासारखी हाताच्या बोटावर मोजता येण्यासारखी काही माणस वगळली तर आज वेगळीच परिस्थिती जगामध्ये निर्माण झाली असती.

श्री. दादांच्या ठिकाणी असलेली अलौकिक बुद्धिमत्ता, मराठी, इंग्रजी वाङमयाचे हुकूमी पाठांतर, अस्खलित वाणी, अर्थबोधक चर्चा, अमाप स्मरण संचय या सर्व समृद्धी सहजपणे आढळतात. म्हणून दादांचा सहवास व विषयबोधक चर्चा ही एक पर्वणीच म्हणावी लागले. साधकाला लागणारा बौद्धिक सहवास येथे मिळतो. प्रत्येक साधक श्रद्धा ठेवण्यास योग्य अशा वडिलधाऱ्या माणसांचा नकळत शोध घेत असतो. आणखी एकदा श्रद्धास्थान सापडले की हीच श्रद्धास्थाने कमालीची प्रेरक ठरतात. माझ्या जीवनप्रवासाचे मलासुद्धा काही श्रद्धास्थाने प्रेरक ठरली. त्यातील श्रद्धास्थान श्री. दादा होय.

श्री. दादांच्यासारखे काही तर्कनिपुण ज्ञानचक्षु असतीलही. पण बहुतेक ज्ञानियांची स्थिती झाडासारखी असते. ती ठराविक उंचीपर्यंत वाढतात आणि मग थांबतात. त्यांच्या मनाची स्वागतशीलता संपते. नवे विचार ते आत्मसात करू शकत नाहीत. पण दादांच्या बाबतीत मात्र ते उलट आहे. एखाद्या विषयातला एखादा निपुण ज्ञानी जर कोठे भेटला तर त्यांच्याकडून जास्तीतजास्त माहिती, ज्ञान मिळविण्यासाठी दादांचे प्रयत्न असतात. त्या व्यक्तीशी चर्चा ही केवळ त्याला डिवचून त्याचे ज्ञानभांडार उपसून घेण्याकडेच असते. नवे विचार, नव्या कल्पना आत्मसात करण्यामध्ये त्यांची कोणतीही बाधा नसते. अशा चर्चामध्ये केवळ श्रोता म्हणून भाग घेण्याचे भाग्य मला बऱ्याच वेळा मिळाले.

संकेश्वरसारख्या छोट्या ठिकाणी राहून ज्ञानसंपदा, एवढे शब्दभांडार दादांनी कसं मिळवल असेल याचे आश्चर्य त्यांच्याकडे येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला वाटल्याशिवाय राहात नाही. पण खेड्यात पिकते आणि शहरात विकते हा नियम प्रतिभेलाही लागू आहे. शहरामध्ये प्रसिध्दिसुलभ होते हे खरे, पण सिध्दी उगवते हेही खरे. शहरातल्या धावपळीत आणि गलक्यात चित्ताची एकाग्रता दुर्लभ होऊन बसते. पण दादा प्रसिध्दिपराङमुख असल्यामुळे केवळ दादांच्याकडे मार्गदर्शनासाठी येणाऱ्या व्यक्तीनाच त्यांची प्रतिभा जाणवते.

तार्किक प्रश्नांना सडेतोड उत्तर, मग तो विषय आध्यात्मिक असो, मानसशास्त्र असो, परामानसशास्त्र असो, संगीत असो, विषय कोणताही असो हे दादांचे वैशिष्ट्य आहे. माझे वैयक्तिक प्रश्न तर त्यांच्यापुढे सारेच संपून जातात.

दादांच्याकडे अनेक माणसे आपली विवंचना दुःखे घेऊन येतात. बहुतेक लोकांना त्यांच्याकडून केवळ सहानुभूतीची हाव व अपेक्षा असते. पण दादांना हा दुटप्पीपणा पसंत नाही ते स्पष्टवक्ते आहेत. पण या स्पष्टवक्तेपणामागे प्रामाणिकपणाची व सच्चेपणाची अशी झगझगीत शलाका असते केवळ माणसांना स्पष्टवक्तेपणाचं अंजन झोंबण्याऐवजी त्यामागची निर्मळवृत्ती दिसून येईल. ती दुःखावर घातलेली हळुवार फुंकर असते हे त्या व्यक्तीला नंतर उमजतं. माझी ओळख झाल्यानंतरच्या सुरूवातीच्या काळामध्ये. मी पनर्जन्मावर लिखाण करायचा मानस असल्याचे बोललो. दादांचे याबद्दलचे उदगार मला अजूनही आठवतात. ते म्हणाले, 'Self hypnotism is the worst disease and self realisation is the only remedy.' त्यावेळी ते शब्द मला रुचले नाहीत, पण नंतर उमगल की आपल वाचन ते किती, चिंतन ते किती, पुनर्जन्मावरची आठ दहा पुस्तक वाचून हा विषय अधिकारांनी लिहिण्यासारखा नाहीये. यासाठी खूप वाचन, चिंतन, मनन, साधना या गोष्टींची आवश्यकता आहे. आपण फार अपुरे आहोत याची जाणीव मला नंतर झाली आणि या विषयासंबंधी लिहिण्याच मी टाळलं.

प्रत्येक वेळेला रडणाऱ्यांच सांत्वन करता येतच अस नाही. पण रडणाऱ्याला त्याची जाणीव नसते. दुःखाचा खरं रूप आणि त्याची परिणती दाखवून दुःखाचे ओझे कमी करण्याच कौशल्य दादांच्याकडे आहे. विविध विषयांच ज्ञान, शब्दभांडार, भाषाशैलीतील विविधता आणि संपन्नता या सर्व घटकांचे एकजिनसी रसायन बनविण्याची किमया त्यांच्याकडे आहे.

काही लोकांना सुबत्ता असूनही कलेचा छंद, साहित्याचा छंद, विद्वत्तेचा ध्यास व संगीताचा षोक क्वचित दिसतो. दादांनी आर्थिक पुंजी फारशी जमा केली नसेल, पण ज्ञान, साधना, विचार यांच भांडार इतक मोठ आहे की हत्तीच्या पायाला तोडे घालण्याची सुबत्ता त्यांच्याकडे आहे यात तिळमात्र शंका नाही.

ज्यांच्यामध्ये कला आहे, विचारांच सामर्थ्य आहे, ज्ञानसंपदा आहे, संपन्नता आहे, जीवनाबद्दलचा एक वेगळा दृष्टिकोन आहे, ज्याच्याकडे अनेक माणस सुख दुःख मोकळ्या मनाने उघडी करतात. त्यांच्याकडे परमेश्वरी अंश असतो अशी माझी धारणा आहे. किंबहुना येथे परमेश्वरी अंश असतो तेथेच हे सारं शक्य आहे.

माझ्या जीवनात दादा हे अवचित भेटणारं वळण आहे. माणसावर आत्यंतिक प्रेम करणारा हा माणूस आहे.

## सुखद अनुभव

*दिनकर पोवार, संगीत दिग्दर्शक.*

माझा आणि ती. दादांचा परिचय तसा अलीकडचाच सात-आठ वर्षाचा प. पू. टेंबे स्वामींच्या महानिर्वाणदिनी संकेश्वरच्या विठ्ठल मंदिरात अनेक कलावंतांना एकत्र आणून ती संपूर्ण रात्र संगीत विश्वात व्यतीत करण्याचा दादांचा अनेक वर्षांचा प्रघात - माझे परममित्र श्री. अरुण जोशी यांच्यामुळे मलाही यावेळी या सोहळ्यात सामील होण्याची संधी मिळाली. सोबत माझे निकटवर्ती श्री. गणी फरास, सुचित्रा मोर्डेकर, रजनी करकरे (देशपांडे) हे ही होते. अनेक नामवंत गायक वादक तिथे उपस्थित होते. या साऱ्यांच्या कलाविष्काराने विठ्ठल मंदिरात साक्षात नादब्रह्म अवतरले होते. या आनंददायी स्वर-विश्वात ती रात्र कशी केव्हा गेली ते कळले नाही. दादा कोण आहेत हे मला आधी नीट कळले नव्हते. तसे काही कारणही घडले नव्हते. या प्रसंगाने त्यांच्यातील अभिजात रसिकतेची प्रकर्षाने जाणीव झाली. मान डोलावणे कदाचित सर्वांनाच जमत असावे. पण मनाला पटलेल्या प्रत्येक स्वराला दाद देणे हे दादांसारख्या अभिजात रसिकालाच जमते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील एका पैलूचे मला अशा प्रकारे दर्शन घडले.

दादा हे कोल्हापुरात स्थिर झाल्यानंतर मला एक दिवस त्यांचा फोन आला. "आता मी इथेच आहे. मधून मधून भेटत जा." मग मात्र वरचेवर भेटी होऊ लागल्या. चर्चा गप्पा होऊ लागल्या. केवळ या चर्चा आणि गप्पांमधूनही मला त्यांच्यापासून बरेच काही शिकता आले. त्यांचा मूळ पिंड शिक्षकाचा. एक शिस्तप्रिय, व्यासंगी, आदर्श शिक्षक म्हणून त्यांची ख्याती. शिक्षणक्षेत्रात त्यांनी केलेल्या भरीव कार्याची पावती ज्ञात्यांनी त्यांना दिलेली आहे. शिक्षण, साहित्य, अध्यात्म याचबरोबर इतर अनेक क्षेत्रांतला त्यांचा अधिकार मोठा आहे. दादांच्या प्रेमळ सान्निध्यात आलेल्या प्रत्येकाला या ना त्या स्वरूपात काही ना काही लाभ निश्चित झालेला आहे. मीही त्याला अपवाद नाही. एक श्रेष्ठ गुरु, उत्तम शिक्षक, प्रेमळ स्नेही पिता, भ्राता या सर्वच ठिकाणी तितक्याच तोलामोलाने दादा आजही ठामपणे उभे आहेत. असे सर्वांगपरिपूर्ण व्यक्तिमत्त्व क्वचितच घडत असते.

माझ्या आयुष्यातील एका अत्यंत महत्त्वाच्या घटनेचा इथे आवर्जून उल्लेख करणे माझे कर्तव्य ठरते. कारण त्या घटनेशी दादांचा अत्यंत निकटचा संबंध आहे. जुलै १९९० मधला एक दिवस ! माझ्या आयुष्यातला एक अत्यंत वाईट दिवस ! डॉक्टरांनी एका असाध्य व्याधीने मला ग्रासल्याचे सांगितले. आप्तेष्टांना चिंतेने घेरले होते. अरुण जोशीनीही घटना दादांना सांगितली. ते अस्वस्थ झाले. घरी बिछान्यावर पडून होतो. उशाशी फोन घणघणला. दादांचाच होता तो. "मी घरी येतोय, बाहेर जाऊ नका, घरीच

थांबा'. मी उलट म्हणालो,'दादा तुमची प्रकृती ठीक नाही. तुम्ही नका त्रास घेऊ, मीच तिकडे येतो. उलट उत्तर आले, 'मी येण्याने काही बिघडणार आहे का ? काही नको घरीच थांबा, मी येणारच.' या उत्तरात स्नेहपूर्ण जरब होती. ठामपणा होता. अधिकाराबरोबरच प्रेमाचा उमाळा होता. मला धन्य धन्य वाटले. थोड्याच वेळात अरुणबरोबर ते आलेही. जवळ बसले. मनापासून विचारपूस केली. धीर दिला. एव्हाना ते आपल्या पाठीशी असल्याचा केवढातरी आधार मला मिळाला होता. हायसे वाटले होते. बराच वेळ ते बसले. उपचारांची पुढील दिशा ठरवून दिली. बंधूतुल्य अरुण जोशी गणी फरास, माझे भाचे मा. एस्.आर. पाटील, दीपक चव्हाण, आणि माझे सारे कुटुंबीय यांच्यासमवेत तेवढ्याच ताकदीने आणि आपुलकीने दादा माझ्या उपचार प्रकरणी स्वतः सामील झाले ही केवढी भाग्याची गोष्ट !

दादांकडे ओळखींचा तुटवडा नाही. जाईल तिथे त्यांना मानणारे असे कुणीतरी आहेच. पुढे मला हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करणेसाठी स्वतःच्या प्रकृतीची कुरबुर न सांगता, शरीर साथ देत नसतानाही केवळ निस्सीम प्रेमापोटी ते माझ्याबरोबर अनेक योजने दूर आले. तिथे माझ्या ओळखीने माझी नीट शिस्त लावून मगच ते परत आले. मला पत्ताही नव्हता की मला उतार पडावा म्हणून त्यांनी माझेसाठी अनेक धार्मिक विधी परस्पर उरकून घेतले होते. खरंच, या प्रेमाला काही मोल आहे का ? या निखळ, निर्व्याज, प्रेमाचा उतराई होण्याची संधी परमेश्वराने याच जन्मी मला द्यावी हीच मनोमन इच्छा.

आज मी बरा आहे. तरीही पू. दादांचेकडून चौकशी. विचारपूस अखंड चालू आहे. ती अशीच चालू रहाणार आणि रहावी. मला दादा गुरुतुल्य आहेत. पितृतुल्य आहेत. हे नाते असेच अखंड रहावे. हा मायेचा झरा अखंड खळखळावा.

---

## दादांचे ऋण

*डॉ. रमेश शिपुरकर, संकेश्वर.*

---

काहीजण ज्ञानाने फार मोठे असतात. त्यांची स्मरणशक्ती इतरांना दिपवून टाकते. अशी माणसे म्हणजे चालतीबोलती विद्यापीठेच असतात; पण काही व्यक्ती याहीपेक्षा मोठ्या असतात आणि आपल्या विविध क्षेत्रातील कर्तृत्वाने आपल्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनाचा एक भाग बनून गेलेली असतात. श्री. धोंडोपंत उर्फ दादा नाईक हे अशा व्यक्तींपैकी एक आहेत.

संकेश्वरचा गेल्या ६० वर्षाचा इतिहास पाहिला, तर दादांनी त्यातील प्रत्येक गोष्टीवर आपला असा एक ठसा उमटविला आहे, असे दिसून येईल. त्यांच्याशिवाय या भागाच्या सांस्कृतिक जीवनाची कल्पनाच करता येणार नाही.

त्यांना मी प्रथम पाहिले ते निपाणीत. तेव्हा मी शाळेत शिकत होतो. अधूनमधून ते आमच्या घरी यायचे. दिलखुलास गप्पा व भक्कम खाणे यांनी तो दिवस मग भरून जायचा. बऱ्याचवेळा ते माझा मित्र सुरेश याच्या घरी दिसायचे. त्यांचे अफाट वाचन, स्मरणशक्ती व तीव्र बुद्धिमत्ता यांच्या कथा ऐकून ते आम्हाला दंतकथेतील व्यक्ती वाटायचे.

त्यांची लक्षात घेण्यासारखी गाठ पडली ती १९६७ साली. संकेश्वर येथे कॉलेज सुरू होणार होते. मीही एक उमेदवार होतो. नोकरी अर्धवेळ होती. फक्त 'नाईकसाहेबांची चिठ्ठी आणायची होती.' त्यांच्या तेवढ्या चिठ्ठीवर नोकरी मिळाली आणि मी संकेश्वरचा रहिवासीच बनून गेलो. त्यांचा मोठेपणा असा की त्यांच्यामुळे मी स्थिरावलो, याची जाणीव त्यांनी कधी करून दिली नाही.

संगीत, शिक्षण व अध्यात्म ही त्यांची खास क्षेत्रे. मी अधिक वाचावे, जाणकार बनावे. डॉक्टरेट करावी, असा त्यांचा आग्रह असे. त्या दृष्टीने त्यांनी मदत व मार्गदर्शनही केले. मी शिक्षक म्हणून थोडेफार नाव मिळविले, ते त्यांच्यामुळेच.

संगीताचा कान त्यांच्यामुळेच मिळाला. गाणे ऐकावे कसे हे त्यांच्याकडे पाहून शिकायला मिळाले. तपश्चर्या किंवा साधना या शिवाय कांही 'अस्सल' पदरी पडत नाही, हेही त्यांच्याकडे पाहून लक्षात आले.

अध्यात्माशी मात्र जुळले नाही. विभूतीपूजेचा प्रथमपासून तिटकारा वाटायचा. दादांना या क्षेत्रात फार लोक मानतात. पण त्यांनी या क्षेत्रात मला ओढण्याचा कधी प्रयत्न केला नाही. हस्तसामुद्रिक व कुंडली यात मला रस नाही, हे त्यांनी ओळखले. फक्त एकदाच सुचविले व नंतर सोडून दिले. माणसाच्या चेहेऱ्यावरूनच त्यांना तो माणूस कळत असावा व ज्याला जे झेपेल तेवढेच त्याला द्यायचे, अट्टाहास कसलाच करायचा नाही, हा तर दादांचा स्वभाव. म्हणूनच त्यांना अनेक क्षेत्रातील असंख्य माणसे जोडता आली.

पूर्वीचे लाला लजपतराय हायस्कूल आणि आताचे एस. डी. हायस्कूल. दादांचा या संस्थेशी खूप जिव्हाळ्याचा संबंध. त्यांच्यामुळे संस्था नावारूपाला आली. इतरही अनेक संस्था त्यांनी उभ्या केल्या. माणसे घडविली. पण वेळ येताच मनाने ते अलिप्तही झाले. आपणच निर्माण केलेल्या पसाऱ्यातून मनाने बाहेर पडणे फार कठीण. पण श्रेष्ठ अशा आध्यात्मिक वृत्तीमुळे दादांना ही किमया साध्य झाली असावी.

आजूबाजूच्या माणसांचे खुजेपण त्यांना जाणवत असावे. जात आणि भाषा. माणसाला कोत्या बनवणाऱ्या. गुणवत्ता मारून टाकणाऱ्या. याउलट दादांची झेप खूप मोठी. त्यामुळेच माणसे त्यांच्याजवळ जायला बिचकत असावीत. पण याची त्यांनी कधी खंत बाळगली नाही.

टेंबे स्वामीजींच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने होणारा संगीत सोहळा हा संकेश्वरच्या सांस्कृतिक जीवनातील वैशिष्ट्यपूर्ण घटक होय. केवळ दादांच्या शब्दाखातर व त्यांचे

एक साधे पोस्टकार्ड गेले की मोठे मोठे कलावंत येथे येऊन आपली कला सादर करायचे. दादांनी कौतुकाने मान डोलावली की त्यांना भरून यायचे. अनेक होतकरू कलावंत या संगीतसोहळ्यातूनच नावारुपाला आले. अलिकडे हा सोहळा होत नाही. तो बंद करायचे ठरविले, त्यावेळी दादांना किती वाईट वाटले, हे मला ठाऊक आहे.

त्यांना ७५ वर्षे पूर्ण झाली, तेव्हा त्यांच्या नावाने एक संगीताला प्रोत्साहन देणारी संस्था सुरू करावी, असा विचार पुढे आला. पण त्यांनी आपले नाव द्यावयाला निग्रहाने नकार दिला. आमच्याकडून अपेक्षित काम न झाल्याने संस्था निघाली नाही, याचे वाईट वाटते. अपराधीपणामुळे त्यांना भेटणेही अवघड वाटते.

दादा सध्या संकेश्वरात रहात नाहीत. पण त्यांच्या घराजवळून जाताना स्कूटर नकळत थबकल्यासारखी होते आणि आदराने मान नम्र होते.

## 'त्वमेव सर्वं मम देव देव'

*श्री. आर. के. नवाळे*

१९७० चा सुमार. जीवनात निराशेच्या खोल दरीत बुडालेला, स्वप्नांचा चुराडा झालेला. घोर अंध:कारातून चाचपडणारा मी. पुष्कळ ठिकाणी फिरून माझ्या प्रश्नांची उत्तरे शोधीत निराशेत भर घालीत ती. दादांच्या चरणाजवळ दाखल झालो. पहिल्याच भेटीत त्यांनी मला आपलस केल. जणु जन्मोजन्मीची ओळख आहे अस वागविल. तप्त भूमीवर सहस्त्रधारांनी वर्षाव व्हावा. कष्टी मनावर मायचे मयूरपीस फिरावं, असं झालं. आणि माझं अंतर्मन ज्याचा शोध घेत होत. ते मला मिळालं मी ती. दादांना पाहिल्याबरोबर निश्चित झालो. तेव्हा त्यांनी मला 'वरचेवर भेटत जा'. हे उच्चारलेले शब्द अजूनही कानात घुमतात आणि मी ते शक्यतो पाळत आलेलो आहे.

पहिल्याच भेटीत त्यानी मला जागं केल. माझ्या चुकांवर त्यांनी अचूक बोट ठेवलं. त्यावेळीच मला समजल की शंभर टक्के बरोबर समजणारा मी काही अंशीच बरोबर होतो. आपल्या चुका सुधारल्याशिवाय इतराना चूक म्हणण्यात अर्थ नव्हता. आणि तेव्हापासून माझी पावल बरोबर पडू लागली. ती. दादाना पुन:पुन्हा भेटण्याचा परिपाठ मी गिरवू लागलो. त्यावेळी दादा वरचेवर डॉ. नाटोलीकरांच्याकडे मुक्कामाला येत. मला ती पर्वणीच त्यांचा कागल किंवा कोल्हापूरला मुक्काम आणि तस मला पत्र, त्याबरोबर मी हजर आणि मग रात्रभर दादांचं बोलणं ऐकत बसलो तरी अपुरच वाटायचं. पुष्कळ लोक त्यांच्या बैठकीत असायचे, विविध प्रश्न विचारायचे. थोड्याफार फरकाने ते माझेच प्रश्न असायचे. त्यांना दिलेली उत्तरे आणि सांगितलेला उपदेश जणू मलाच असायचा. आणि

मी फक्त ऐकत असे. 'सहज बोलणे, हितोपदेश' हे त्यांचे नेहमीचेच कोणतीही चर्चा असली तरी हा प्रत्यय नेहमीच येतो. त्यांच्या बैठकीत तरुण लोक असावेत असा त्यांचा जास्त कटाक्ष. त्यांच्या मते अध्यात्माचा तरुणाना खरा उपयोग. त्यांच्यापुढे पुष्कळ जीवन आहे त्यानाच या मार्गाने पुष्कळ करता येण्याजोगे आहे आणि त्याच्यापासून समाजाला जास्त उपयोग होणार आहे.

ती. दादांच्यामुळे विविध प्रकृतीची स्वभावाची आणि सोन्याच्या मोलान गुण मोजाव अशी पुष्कळ माणसे भेटली आणि मग कळायला लागलं की आपण काहीच नाही. तळहातावरील फोडासारखं जपावी, त्यांची पूजा करावी. अशी महान माणसं दादांच्यामुळच भेटली. त्यातून मला माझ्यातील त्रुटी समजल्या. दिसताना सर्वसामान्य दिसणारी पण अध्यात्मात बरीच प्रगती केलेली माणस भेटली की त्यांच्यापुढं नतमस्तक व्हाव अस होऊन जाई. दादा तर या सर्वात हिमालयासारखे.

आत्मरुपी दृढु । परमात्मरुपी गूढु ।

बाह्येतरी रुढू । लौकिकू जैसा ।

बैठकीतून मला त्यांचे एकेक पैलू समजू लागले . अध्यात्म -स्नेह -संगीत- साहित्य -राजकारण- समाजकारण- गृहगृहस्थी- वेद- पुराण- कोणताही विषय त्यावरील दादांच अधिकारवाणीच बोलण कोणालाही खिळवून ठेवत असे. दादांनी एवढं केव्हा आणि कस संपादन केल असेल याचाच मी विचार करीत मंत्रमुग्ध होऊन त्यांच ऐकत असे. आयुर्वेदाचा त्याचा अभ्यास एखाद्या आयुर्वेद पंडिताला लाजविणारा असाच. इंग्रजी व वाङमयातील हजारो ओळी कविता आणि शेक्सपियरच्या नाटकातील उतारेच्या उतारे दादाना मुखोद्‌गत.दादा ते म्हणू लागले की इंग्रजी विषय घेऊन बी.ए. झालेल्या मला माझी लाज वाटायला लागायची.

स्नेह दादानीच करावा आणि त्यांचा आदर्श इतरानी गिरवावा ह्या गोष्टी क्षणोक्षणी प्रत्ययास येतात. दादानी ज्याला आपलं केल त्याच्या अडीअडचणी काढण्यातच दादांचे पुष्कळ श्रम खर्ची पडतात. कोणाची तरी थोडीशी गरज भागविणारा आणि त्याचा दिमाख दाखविणारा मी- दादांनी स्वत:जवळचे दागिने विकून दुसऱ्याना संकटातून वाचविण्या-साठी केलेले प्रयत्न पण त्याचा उच्चारही न करता दुसऱ्यांना वाचविण्यासाठी दाखविलेली निरपेक्ष तळमळ माझा दिमाख जिरवून टाकत असे.

थोड्याच कालावधीत त्यांच्याशी माझे घनिष्ट संबंध आले. त्यांनी मला घरचाच करून सोडले. तेव्हा मी माझ्या जीवनाचे सुकाणू त्यांच्याच हाती दिले. जेथे जातो तेथे तू माझा सांगाती । चालविसी हाती धरुनिया । आणि खरोखरच दादांनी माझा हात धरला म्हणूनच मी सावरलो. त्यांच्याबरोबर पुण्यामुंबईला हुबळी धारवाडला जाण्यात मला धन्यता वाटू लागली. त्या प्रवासात त्याचे स्नेही आप्तेष्ट भेटल्यावर जगात मोठी माणसे

आहेत आणि त्यांच्याच पुण्याईने जगरहाटी चालली आहे अस मला वाटू लागले. दादा त्यांच्या घरी गेल्यावर त्यांना कोण आनंद व्हायचा म्हणून सांगू. साधुसंत येती घरा । तोची दिवाळी दसरा । असे त्यांना होऊन जाई. त्या प्रवासात जी काही थोडीफार माझ्या हातून दादांची सेवा झाली तीच माझी पूजा आणि तीच माझी पुण्याई तस पाहिले तर दादांना सेवा करुन घेण आवडत नाही. पण त्यातूनही त्याच एखाद काम केल तरी धन्य वाटत.

सुरवातीच्या काळात माझ्या सांसारिक अडचणींकरता त्यांनी मला 'घोरात कष्टात' हे दत्त स्तोत्र एकवीस दिवस एकवीस वेळा वाचायला सांगितल होत. त्या दरम्यान आलेल्या तीन गुरूवारी तिच्या स्वप्नात दत्त महाराज यती वेशात येऊन तिला दर्शन झाले. त्यांनी आमच्या घरी यथेच्छ भोजन करून संतुष्ट होऊन जाताना तिने पाहिले. अर्थात ते स्तोत्र दादांनी तिच्या करिताच दिले होते. त्यावेळची स्वप्ने दादांना मी विस्ताराने लिहून पाठविली आहेत. तेव्हापासून माझ्या संसाराचा गाडा सुरळीत चालू लागला.

जीवन म्हणजे संकट परंपरा आलीच आणि ती मला तरी कशी चुकणार ? त्या संकटांना तोंड देण्याच सामर्थ्य दादांनी मला दिलं. माझा फाटका प्रपंच त्यात पूर्वापार चालत आलेली कर्ज कोर्ट केसीस हे जेव्हा दादांना समजलं तेव्हा एकदम त्यांना काय वाटल कोणास ठाऊक. माझ्या वडिलांनी जामीन होऊन एकाला दिलेले कर्ज पूर्णपणे आमच्यावर बसल  होत. त्याकरिता आमच्या घरची दोन तीन वेळा जप्ती झाली होती. सोळा एकर जमीन लिलाव होऊन गेलेली होती तरी सुमारे तेरा हजार कर्ज बाकी होत. दादांनी मला बेळगावास नेल. परचेस सेल युनियनच्या डायरेक्टरना सर्व गोष्टी समजून सांगितल्या. तडजोड करून ते प्रकरण चारहजार एकशे रुपये देऊन कायमचे मिटविले. ते पैसे पण दादांनी स्वत:जवळचेच दिले. दादांच्या उपकारात तर मी पूर्णपणे गुदमरून गेलो.

आमच्या काही कोर्ट केसीस होत्या लँड ट्रायब्यूनल मध्ये माझ्या एका केसचा निकाल विरुद्ध लागला. माझ्यावर पूर्णपणे अन्याय झाला. मी दादांच्याकडे धाव घेतली. लिहिण अप्रस्तुत आहे पण सत्य आहे. निकालारात्रीच कै. ती. बाबूराव दादा आणि ती. आपा दादांनी न्यायाधीशांचे दार ठोठावले. त्यांना माझी केस पटवून दिली. सत्य समजाविले, आणि निकाल माझ्या बाजूने देण्यास भाग पाडले आणि म्हणूनच आज जी मी माझी जमीन म्हणतो त्यावर खऱ्या अर्थाने नाईक घराण्याचाच हक्क आहे. त्यानी ती मला दिलेली देणगी आहे.

कोणत्याही क्षणी मी माझी अडचण दादांना सांगायचा अवकाश मला मदत तयार. माझ्या जन्मदात्यांनी मला जे सहाय्य केल त्यापेक्षा कितीतरी पटीन मला दादांच सहाय्य लाभल आहे. माझ्यापाठीशी ते हिमालयासारखे उभे आहेत आणि म्हणूनच कोणतीही संकट आली तरी डगमगलो नाही. मला जाणून बुजून त्रास देऊन नमविण्याचा प्रयत्न करणारे आता थकले. मी धीर कधीच सोडला नाही की डगमगलो नाही. त्याला एक खंबीर

वृक्ष दादाच. माझ्या शत्रूनी दुष्टपणा सोडला नाही त्या मोबदल्यात मी सुष्टपणा सोडला नाही. कोणाविषयी द्वेष बाळगला नाही. माझं रात्रंदिवस अहित चिंतणाऱ्यांच्या कल्याणात मला आनंद होतो. ती. दादांच्या शिकवणुकीतून मी जोपासलेला गुण.

दादांनी माझ्यावर तर स्नेहाचा वर्षाव केलाच पण माझ्याबरोबर आलेल्यांना पण तोच अनुभव आला. त्यांच्याकडे आलेली व्यक्ती पोळ्याला चिकटलेल्या मधमाशीसारखी त्यांना चिकटतेच आणि त्यांचे मधुकण वेचून संतुष्ट होते. आणि जे काही थोडे त्यांच्यापासून स्वत:हून दुरावले ते या महान सुखाला कायमचे अंतरले.

ती. दादांच्या बद्दल माझ्यासारख्याने कितीही लिहिले तरी ते ज्योतीने तेजाची आरती, असेच होणार आहे. माझ्या नजरेतून मला जेवढं दिसले ते लिहिले. टेकडीवरून पाहताना आसमंत जेवढा दिसतो तेवढा सांगितला. उंच पर्वतावर गेल्यावर क्षितिज वाढत आणि अधिक आसमंत दिसू लागतो. मी टेकडीवरून पाहिलेलं अनुभवलेलं आहे. तेवढच सांगणार. पर्वत चढण्याचा प्रयत्न आहे दादांची सोबत आहे हात धरून नेणारे तेच आहेत. मी बालक त्याचा मागोवा घेत जात आहे.

त्वमेव माता पिता त्वमेव ।
त्वमेव बंधुश्च सखा त्वमेव ।
त्वमेव विद्या द्रविणं त्वमेव ।
त्वमेव सर्वम् मम देव देव ॥

दादांच्या सहवासात आलेल्या एखादा तरी अनुभव सांगितल्याशिवाय लेखाची सांगता अधुरी वाटते म्हणून अलिकडचा एक अनुभव.

मामा बरोबर फिरायला गेलेला माझा मुलगा बेंगलोरजवळ अपघातात सापडला. दोन ट्रकच्या समोरासमोर टकरीत दोन्ही गाडीचे चालक जागीच ठार. त्यात त्याचा मामा आणि त्यामागे झोपलेला माझा मुलगा इतक्या वाईट रीतीने त्यात अडकला होता की त्यातून त्याला काढण्यास कमीत कमी दोन तास लागले. त्यात त्याचे दोन्ही पाय निकामी झाले. कसेतरी करून त्यास बेंगलोरला बोअरींग हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केले. रात्री दोनला झालेला अपघात नऊ वाजता हॉस्पिटलमध्ये दाखल. रक्तस्त्राव झालेला दोन्ही पायाची हाडं मांड्या चुराडा झालेला. बेवारशी म्हणून ॲडमिट त्याच दिवशी आम्ही दोघे शाळेच्या कामासाठी बेंगलोरला गेलेलो. मंगळवार ते शुक्रवार आम्ही बेंगलोरमध्ये आणि माझा मुलगा हॉस्पिटलमध्ये आम्हाला काहीच कल्पना नाही. विधान सभेत आम्ही फिरलो तेथून बोअरींग हॉस्पिटल पाच ते दहा मिनिटाच्या अंतरावर. पण आपला मुलगा इथं बेवारशी म्हणून ॲडमिट असल्याची कल्पनाही नाही. नंतर समजल्याप्रमाणे दुसरा कोणताही पेशंट त्या अवस्थेत असता तर डॉक्टरांनी त्याचे पाय काढले असते. पण का कोणास ठाऊक डॉ. रेड्डीनी त्यावेळी इतर डॉक्टरना सांगितल की 'This is a

challenging case. Let us try.'आणि त्याप्रमाणे इतर डॉक्टरांनी ही एक आव्हान म्हणून केस स्वीकारली. स्वतःच्या पैशानी रक्त दिले; शर्तीचे प्रयत्न केले. दरम्यान मी बेंगलोरहून आलो आणि अपघाताची बातमी समजली. पुन्हा तसाच बेंगलोरला. पहातो तो सर्व विलक्षण हॉस्पिटलमध्ये पोहोचलो तेव्हा माझ्याच मुलाचे ड्रेसिंग चालू होते. आम्हाला राहवले नाही. आमची अवस्था बघून डॉक्टरानी ओळखले की त्या बेवारशी मुलाचे आईवडील आहेत. त्यानी आमच सांत्वन केल आणि घडलेला वृत्तांत सांगितला. त्यांनी घेतलेली काळजी आणि दिलेली औषध हे जेव्हा कळल तेव्हा वाटल हे सर्व परमेश्वरी कृपेन आणि दादांच्या आशीर्वादाने घडले आहे. आम्ही बेंगलोरहून गावी आलो होतो तेव्हाच दादांनी दिलासा दिला होता काही होणार नाही, थोडे दिवस त्रास होईल पण तो बरा होईल. मुलाला बघितल्यावर तो जगेल अस कोणालाही वाटल नसत. पण दादांचे शब्द. त्याच्यावर माझा पूर्ण विश्वास होता. ' माझा मुलगा बरा होणार ' तीन महिने आम्ही बेंगलोरमध्ये काढले. त्याची पाच ऑपरेशन्स झाली. प्रत्येक वेळ जीवघेणी. पण मी धीर सोडला नाही. त्याच्या प्रकृती स्वास्थ्यासाठी मंत्र-जप करवून घेतले. त्याचे पहिले ऑपरेशन दोन वाजता झाले. ऑपरेशन थिएटर मधून बाहेर आणले त्यावेळचे ओरडणे आणि रडणे कोणाच्याही अंतःकरणाला भिडणारे - असह्य वेदना. आम्हाला अश्रू ढाळण्यापलिकडे आणि प्रार्थना करण्यापेक्षा काहीच करता येत नव्हते. दुपारी दोन पासून दुसरे दिवशी पहाटे पाच वाजेपर्यंत अखंड त्रास. त्याला झोपेची इंजेक्शनस् - गोळ्या दिल्या. पण काही उपयोग नाहीं. आम्ही रात्र अश्रू ढाळीत आणि प्रार्थना करीत काढली. पहाटे पाच वाजता तो मला एकदम म्हणाला. " बापू तुम्ही उदबत्ती लावली आहे काय ? " मी नाही म्हटल्यावर तो म्हणाला " इतका सुगंध येतोय की असली उदबत्ती तुम्ही कधीच आणली नाही." माझ्या मांडीवर झोपलेला तो. मला काहीच सुगंध येत नाही. त्याला मात्र भरपूर. तो इकडे तिकडे नजर वळवून डोळे फिरवीत पाहतोय. पाच सात मिनिटे हे अखंड चालू होते. त्याला काहींतरी भास झाला असावा, असं मला वाटल. तो फारच उल्हसित होऊन बोलत होता. खर म्हणजे चंदनाचा सुगंध सर्वत्र दरवळून गेला होता. त्यानंतर ज्या त्याच्या वेदना थांबल्या त्या सकाळी आठ वाजेपर्यंत. तो हसायला लागला. डॉक्टरांनी आठ वाजता उल्हसित आणि हसरा असा त्याला पाहिल तेव्हा त्यांना आश्चर्य वाटल्यावाचून राहिल नाही. एकतीस सें. मी. रॉड मांडीत आणि मुलगा तर आनंदी. आठव्या दिवशी जखम भरून टाके काढले. तेव्हा डॉक्टर एकमेकात बोलले. ' याच इतक्या लवकर बरे कसे काय झाले ? '

इतक्या भयानक अपघातातील मुलाला आज पाहिले जर त्याचा अपघात झाला होता यावर कुणाचाही विश्वास बसणार नाही. दादांचे आशीर्वाद पाठीशी आहेत. या दरम्यान बेंगलोरमध्ये दादांच्या भाच्याने आणि माझ्या मित्रानी केलेले सहाय्य हे परमेश्वरी सहाय्यच होते.

माझ्या जीवनाचा भार मी ती. दादांच्यावर टाकला आहे. त्यांचा आधार मला दीर्घकाळ मिळो ही ईश्वर चरणी प्रार्थना.

---

## दीपस्तंभ

---

*अरूण जोशी.*

---

ती. दादांचे विषयी लिहिताना कोणत्या विषयावर लिहावे हा एक प्रश्न माझ्यापुढे उभा राहिला. गेल्या ३०-३१ वर्षांत अनेक प्रसंग डोळ्यासमोर उभे राहतात आणि म्हणूनच वरील प्रश्न उभा राहतो.

१९५९ साली प्रथम ती. दादांची आणि माझी प्रथम ओळख झाली, ती श्रीमती गुलाबबाई कागलकर यांच्या गाण्यामुळे. ललितापंचमीला श्रीमती गुलाबबाई कागलकर यांचे गाणे संकेश्वरला ठरले. बाळ जमेनीस हे पेटीच्या साथीला होते. माझे नाव तबल्याच्या साथीसाठी माझे काका. पं. व्ही. ए. कागलकर बुवानी सुचविले आणि त्या कार्यक्रमाला मला ती. दादांनी बोलावून घेतले. कार्यक्रम झाला पण त्या कार्यक्रमाला मला माझ्या साथीचा खास ठसा उमटवता आला नाही. परंतु पुढे निपाणीला म्युझिक सर्कलचा पहिलाच कार्यक्रम पं. कागलकर बुवांचा झाला. अर्थात मीच साथीला होतो. त्यानंतर प्रत्येक महिन्याला कार्यक्रम होऊ लागले. ती. दादांनी चिक्कोडी, गोकाक येथे म्युझिक सर्कल्समध्ये मला नेले. पं. प्रभुदेव सरदार तसेच पं. बसवराज राजगुरु, पं. गजाननराव जोशी, श्रीमती प्रभा अत्रे, श्रीमती ललिता राव, श्री. विश्वनाथबुवा पोतदार, श्री. रामभाऊ विजापुरे, पं. संगमेश्वर बुवा गुरव वगैरे थोर गायक-वादकांचे कार्यक्रम झाले आणि त्यांच्या साथीला दादांनी मलाच सांगितल्यामुळे माझ्या साथीच्या म्हणजेच शास्त्रीय सुगम संगीत वाद्यांची साथ करण्याची विविधता मला या भागांतील रसिकांच्या पुढे मांडण्याची संधी दादांनीच उपलब्ध करून दिली.

काही काही मैफली तर दादांच्यामुळे चांगल्या झाल्या. निपाणी व चिक्कोडी सर्कलला पं. प्रभुदेव सरदारांचे गाणे ठरले होते. निपाणी सर्कलच्या कार्यक्रमात पं. प्रभुदेव सरदार तेवढे ' जमले ' नव्हते. ती. दादांना चिक्कोडी सर्कलच्या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याबद्दल पं. सरदारांनी विनंती केली. ती. दादा उपस्थित राहिले. कार्यक्रमाला सुरुवातीलाच जे तानपुरे होते ते अत्यंत खराब असे होते. गाण त्या तानपुऱ्यावर होऊच शकले नसते. म्हणून निपाणीहून तानपुरे आणणेसाठी गाडी पाठविली तोपर्यंत त्यांनी मला सोलो वाजविण्यास सांगितले. पुढे दादा, पं. प्रभुदेव सरदार, पं. रामभाऊ विजापुरे आणि स्थानिक विद्वान रसिक. भरपूर वेळ लेहऱ्याला पं. विश्वनाथ बुवा पोतदार सुमारे दीड तास

सोलो वाजविला. तबला अत्यंत रंगला. त्यानंतर श्री. रामभाऊ विजापुरे यांचे पेटीवादन झाले तेही अत्यंत जमून वाजवून गेले. त्यानंतर मात्र पहाटे पर्यंत पं. प्रभुदेव सरदार यांचे बहारदार गायन झाले. रंगदेवता प्रसन्न होती. तीही ती. दादांच्या मुळेच याची मला खात्री आहे.

दुसरा प्रसंग - पं. पू. वासुदेवानद सरस्वती महाराजांच्या पुण्यदिनी रात्रौ संगीत सेवा असते. अशाच एका संगीत सभेच्या वेळी माझ्या उजव्या हाताला लोखंडी खिळा लागून माझा हात खूपच सुजलेला होता. तबला वाजविणे खरोखरच अशक्य होते. आणि ही परिस्थिती सर्वच उपस्थित गायक-वादकांनी पाहिलेली होती. दुसरे कोणी तबला-वादक नव्हते. आणि सर्व चिंतेत होते. ती. दादांनी पाहिले आणि मला सांगितले, " चल, अरण्या बैस तबल्यावर महाराज आज सेवा करून घेणार आहेत तुझ्याकडून." मी दादांचा आशीर्वाद घेऊन साथीला बसलो. आणि खरोखरच महाआश्चर्य, पंधरा मिनिटांत हाताची प्रचंड सूज ओसरून गेली आणि मी रात्रभर म्हणजे सकाळी ७ वाजेपर्यंत एकट्याने पहिल्याच जोमाने - सर्वांची साथ संगत केली. रसिकवृंद तृप्त मनाने घरी गेला. आजही ती मैफल माझ्या डोळ्यापुढे उभी राहते आणि मी महाराजांची सेवा स्वीकारली आणि दादांचा आशीर्वाद लाभला म्हणून खरोखरच समाधानी आहे. आनंदी आहे.

संगीत क्षेत्रांतील कलाकार हे कितीही मोठे झाले तरी त्यांना एक शाप असतो, तो म्हणजे ते कोणत्या तरी व्यसनांत अडकून पडतात आणि सामाजिक प्रतिष्ठा गमावून बसतात. या बिघडण्याच्या वयातच ती. दादानी माझ्यावर चांगले संस्कार घडवून त्यापासून मला दूर ठेवले. संगीताच्या रियाजाबद्दल, थोर कलाकारांच्या साथी संगतीबद्दल प्रोत्साहन दिले आणि संधी उपलब्ध करून दिली. मी जो आज आहे त्याचा बराच भाग दादांचा आहे आणि म्हणूनच माझ्या खडकाळ आयुष्याच्या वाळवंटात मला लाभलेला दीपस्तंभ म्हणजे ती. दादाच आहेत.

## एक आठवण

*संगमेश्वर गुरव*

पंधरा वर्षापूर्वी म्हापसा (गोवा) येथे माझा एक कार्यक्रम ठरला होता. त्यावेळी माझा आवाज अचानक बसला होता. त्याचवेळी पू. दादा शहापूर येथे आल्याचे समजले, म्हणून मी त्यांना भेटण्यासाठी गेलो.

तेव्हा दादांनी विचारले, ' काय बुवा, आवाज असा काय झाला आहे ?'

मी म्हणालो, ' तीन दिवसांनी गोव्याचा प्रोग्राम आहे. मला काहीच सुचेनासे झाले आहे.' ते ऐकून व माझा काकुळता चेहरा पाहून दादा म्हणाले, ' घाबरू नका बुवा. श्री महाराजांचे भस्म मी तुम्हाला देतो ते रोज लावा आणि थोडे तोंडात टाका. गोव्याचा प्रोग्राम होईल. काळजी करू नका.'

त्यानंतर मी म्हापशास गेलो. स्टेजवर चढलो. तंबोरे लावले. आवाजात सुधारणा नव्हती. तंबोऱ्याच्या स्वरात आवाज लावून षड्ज लावला. दादांनी सांगितल्याप्रमाणे चमत्कारच झाला. स्वच्छ षड्ज लागून तीन तासांचे गाणे झाले. प्रोग्राम आटोपला अन् आवाज पूर्ववत् झाला. जीव भांड्यात पडला. प्रोग्राम चांगला झाला होता. माझी काळजी दूर झाली. पुढे एक महिन्यानी माझा आवाज पूर्ववत व्यवस्थित झाला. पू. दादांच्या मार्फत महाराजांची माझ्यावर अशी कृपा झाली.

---

## तस्मैः श्री गुरवे नमः ।

---

*सुधीर जोशी*

---

पू. दादांनी वयाची ८० वर्षे पूर्ण करून ८१ व्या वर्षात त्यांनी प्रवेश केला याचा मला झालेला आनंद शब्दांत वर्णन करून सांगता येणार नाही.

माझे शिक्षण अल्पसे झाले आहे. त्यामुळे एखाद्या लेखकासारखे मला लिहिता येणार नाही. पण या निमित्ताने पू. दादांच्या संबंधी कांही आठवणी सांगणे, त्यांच्या विषयीची कृतज्ञता व्यक्त करणे हे माझे कर्तव्य समजतो. याच भावनेनं हे माझे अल्पसे शब्द.

पू. दादांचा आमच्या कुटुंबियांवर वरदहस्त आहे आणि त्यामुळेच आम्ही आज समाजात सन्मानाने उभे आहोत. हे लिहिण्यास मला अभिमान वाटतो.

आमच्या कुटुंबातील सर्व सुखदुःखात पू. दादा व त्यांचे कुटुंबीय सतत सहभागी झालेले आहेत. किंबहुना त्यांच्या सल्ल्याशिवाय आमच्या घरचे कोणतेही कार्य होत नाही. आमचे कुटुंब आणि दादांचे कुटुंब असा भेद दादांनी कधीच केला नाही. माझ्या वडिलांना दादांनी त्यांच्या बंधूनी आपला भाऊच मानले आहे व आम्हा मुलांना आपली मुलेच मानले आहे. आमच्या पुरोहिताच्या कामामध्ये पू. दादानीच आम्हाला फार मोठा आधार दिला आहे.

पू. दादांनी अनेकांना दैवी उपासनेच्या संबंधी केलेल्या सूचना आणि भक्तांची सर्व अनुष्ठाने, व्रते, पूजा अर्चा आमच्याकडूनच करून घेतात. इतकी त्यांची आमच्यावर श्रद्धा

आहे. आम्ही आजपर्यंत कामे केली ती अत्यंत श्रद्धेने. त्यामुळेच दादांच्याबरोबरच अनेक भक्त मंडळी आम्हालाही अत्यंत मान देतात त्याचे श्रेय दादांनाच आहे.

माझे वडील मध्यंतरी खूप आजारी होते. त्यांना डॉ. भूपाळींचेकडे कोल्हापुरात ठेवले होते. सुमारे ३ ।४ महिने आम्ही तेथे होतो. तेव्हा पू. दादा रात्रंदिवस आमची काळजी करीत असत. या वयातही रोज एकतरी फेरी त्यांची दवाखान्यात व्हायची. अनेक पायऱ्या चढून ते यायचे माझे वडिलांचे जवळ बसायचे. त्यांना धीर द्यायचे. डॉक्टरांशी चर्चा करायचे. पू. दादांचे चिरंजीव श्री. अनिल दादा तर रोज हवे नको हे पहायला सदैव हजर असायचे.

माझ्या बहिणीच्या लग्नाकार्यात पू. दादांचा आशीर्वाद व सहकार्य होतेच पण त्याचबरोबर पू. दादांचे धाकटे बंधू कै. बाबूकाका व श्री. सदाकाका यांनी आपल्याच मुलीचे लग्न समजून लग्न पार पडेपर्यंत सर्व बाबतीत अत्यंत बारीकसारीक गोष्टीकडे लक्ष दिले.

मी ' ज्योतिष प्रवीण ' परीक्षेला बसलो आहे म्हटल्याबरोबर त्यांनी अभ्यास कसा करावा यासंबंधी मला पुस्तकेही दिली. मी पास झाल्याचे समजल्यावर त्यांना खूप आनंद झाला.

मी, माझा भाऊ, वडील, आई ही सर्व कुटुंबीय पू. दादांना प्रातःस्मरणीय समजून त्यांच्या सूचनेप्रमाणे सर्व गोष्टी करीत असतो. म्हणून मला वाटते पू. दादा म्हणजे गुरु, मार्गदर्शक, पितृ प्रेमाचे प्रतिक.

## एक आठवण

*प्रा. वसंत नगरे, नंदगड (जि. बेळगांव)*

काहींही समस्या असली की दादाजींजवळ मांडणे व मार्गदर्शन घेणे ही सर्वांची खास बाब झाली आहे. मी हे अगदी लहानपणापासून पाहतो आहे. कारण त्यांचा चि. अनिल व पुतण्या सतीश माझे वर्गमित्र. खेड्यातील मुलानी भरपूर शिकलं पाहिजे असे ते वरचेवर सांगतात. काहींही राजकीय पद नसताना अशी वर्दळ क्वचित् ! मी नंदगड मधील म. गांधी कॉलेजला अर्थशास्त्र प्राध्यापक म्हणून येत असताना त्यानी स्व. बाबूराव दलालना दिलेलं पत्र ही माझी Appointment Order ठरली. माझे जीवन सुखमय होण्यात त्यांचा वाटा मोठा आहे. त्यांचे जीवन दीपस्तंभासारखे आहे. या समयी देवाजवळ त्याना दीर्घ आयुष्य चिंतितो.

## ती.दादा-

*श्रीकांत नाईक*

तुम्ही-
एक महावृक्ष आहात
तुमच्या छायेत आम्ही
सर्वजण निश्चिंत आहोत.
तुम्ही-
सार्वभौम सम्राट आहात
तुमच्या दरबारी आलेला
कलावंत विन्मुख कधीच गेला नाही.
तुम्ही-
एक प्रसन्न मैफल आहात
या मैफलीत कोणताच सूर
कधी बेसूर झाला नाही.
तुम्ही-
" हे विश्वचि माझे घर "
म्हणता-म्हणता-
स्वतःच अवघे विश्व झालात.
तुम्ही-
एक प्रचंड नाद आहात.
सान्ता कडून - अनंताकडे
जाणारी तुम्ही एक ज्योत आहात.

# मला लाभलेला परीस

*नामदेव शंकरराव शिरढोणे*

कोल्हापुरात दर आठ पंधरा दिवसातून दादांचे येणे असायचे. दादा आले की आम्ही दादांचे सारे चाहते बैठक असेल तेथे रात्री ८ ।९ च्या सुमारास जमायचो. सारे जमलो की दादा जमलेल्यांच्या शंकाकुशंकांचे आपल्या साध्या सरळ ओघवत्या भाषेत निरसन करायचे.

बैठकीत कुणी भक्ती मार्गातले प्रश्न विचारी तर कुणी ऐहिक जीवनातील येणाऱ्या अडीअडचणी त्रासाच्या सोडवणुकी बाबतचे प्रश्न विचारत. जसा ज्याचा प्रश्न तसे त्याला समाधानाप्रत पोहोचवण्याचे कार्य दादांच्या प्रत्येक बैठकीतून चाले. दादांच्या प्रत्येक बैठकीत मी आवर्जून हजर राहात असे त्यामुळे मला ही बाब नवीन नव्हती.

मी मात्र दादांच्या बैठकीचा खरोखरीच भोक्ता झाल्यामुळे दादा केव्हा येणार याची वाट पाहात असे. दादा ज्या ज्या वेळी कोल्हापूरला यायचे त्या त्या वेळी दादा केव्हा येणार, कुठे असणार या बाबतचा कार्यक्रम पत्रातून कळवायचे. त्यामुळे मी दादांच्या पत्राची वाट पाहायचा. ज्या दिवशी पत्र यायचे त्यावेळी आज पत्र येईल असे मनी वाटायचे अन् खरोखरीच पत्र यायचे. हा माझा अनुभव कुणाला सांगितला तर खरे वाटणार नाही पण हे दादांच्या आणि माझ्यामधल अनुसंधान होतं व आजही आहे. दादा मुळातच शिस्तप्रिय. दादांची पत्र लिहायची पद्धत, लिहिलेला कार्यक्रम कधी चुकला असं कधीच घडत नसे किंबहुना आजही ही त्यांची शिस्तप्रिय जीवन जगण्याची पद्धत खूपच शिकवण देऊन जाते.

दादांनी शरीराला आणि विचाराला लावून घेतलेले वळण खरोखरीच त्यांच्या व्यक्तिमत्त्वास एक वेगळीच झालर लावून जाते. दादांच्या शरीर सवयीवर व विचारावर खूपच संयम होता. दादा बोलत तसेच वागत. ' सवयीच्या आधीन जाणारं शरीर संयमाने सवयी पासून बाजूला ठेवता येते.' अस दादा नेहमी आपल्या चर्चेतून सांगायचे. विडी हा दादांच्या शरीराला लागलेला सवयीचा भाग. विडीचं व्यसन व्यसनच असू शकत नाही हे पटवून देताना दररोज रॉयल स्पेशलची मोठी दोन बंडल विडी ओढणाऱ्या दादांनी विडी ओढण्याचे सोडून देऊन आम्हा मंडळीना चकित करून टाकले. पुड्याने विडी ओढणारे दादा गेले कित्येक वर्ष विडीला स्पर्शही करीत नाहीत.

'बोले तैसा चाले । त्याची वंदावी पाऊले' हे तुकारामाचे संतवचन दादांच्या बाबतीत मलाच काय, अनेकांना अनुभवायला मिळते आहे.

जोशी बंधूंच्या कोल्हापुरातील राधेश्याम मंगल कार्यालयात आज बैठक होणार होती. दादांच्या पत्राप्रमाणे आम्ही रात्री ९ च्या सुमारास कार्यालयात जमलो होतो. आजच्या बैठकीत दत्तसंप्रदाय आणि अवतार कार्य यावर दादा बोलणार होते.

चर्चेला सुरुवात होण्यापूर्वी दादा जमलेल्या लोकांच्या शंका-समाधानाचे कार्य करायचे, कारण दर बैठकीच्यावेळी दोन चार नवीन भक्तांची हजेरी लागलेली असायची. त्यामुळे येणाऱ्या सर्वांना समाधानाप्रत पोहोचवून मगच दादा एखादा विषय घेऊन चर्चा करायचे.

राधेश्याम मंगल कार्यालयाचे मालक वसंतराव जोशींनी आज दादाना आपल डोक्यावरच कर्ज कस फिटणार ? हा प्रश्न विचारला होता.

वसंतरावाचं मानसिक संतुलन पार बिघडून गेले होते. किंबहुना ते कार्यालयाच्या विक्रीप्रत येऊन पोहोचले होते. दादांनी त्याना पुढ घडणाऱ्या घटनांची नोंद देऊन शांत केले. लाखो रुपयाच्या कर्जाच्या धास्तीने दडपून गेलेले वसंतराव आज लाखो रुपयाच्या देणग्या देत आहेत. हा दादांच्या आशीर्वादाने घडलेला चमत्कार सत्य स्वरूपात दिसतो आहे. असे लाभ झालेले पुष्कळ लोक आजही दादांच्या सान्निध्याचा लाभ घेत आहेत.

वसंतरावांच्या समाधानानंतर दत्त संप्रदाय आणि अवतार कार्य यावर दादा बोलत होते. मला याविषयी चर्चा ऐकायची होती. कारण यातूनच माझ्या साधनेबाबतच्या वाटचालीचा अनुभव मला तपासून पहायचा होता. यातूनच मी आणि दादा यामधला संबंध समजून घ्यायचा होता पण मला यातून काही शोध लागत नव्हता. या चर्चेत पहाट व्हायची वेळ आली होती. माझे झोपेने झाकणारे डोळे मला ती चर्चा ऐकू देत नव्हते. मान झोपेने हेलकावे देत बाजूला जात होती. मी दादांकडून जरा आडवे होण्याची परवानगी घेऊन तिथेच आडवा झालो.

पहाटे महालक्ष्मीची काकड आरती व्हायची होती. पडल्या पडल्या मी केव्हा झोपी गेलो कळलेच नाही. डोळ्यावर झोपेची गुंगी होती त्याच गुंगीच्या धुंदीत मला एक दृष्य पहायला मिळाले. ते दृष्य म्हणजे मला रात्रीचे पडलेले स्वप्न होते. दादा समुदायांच्या समोर चर्चा करत बसले आहेत आणि त्यांच्या पाठीमागे कफनी घालून पंत बाळेकुंद्री महाराज उभे आहेत. मी झोपेतून जागा झालो. डोळ्यावर झोपेची धुंदी होतीच परंतु डोक्यात व डोळ्यासमोर स्वप्नातले दृष्य दिसत होते. पंत बाळेकुंद्री महाराज आणि कफनीचा वेश मला नवीनच होता. मी पंत बाळेकुंद्री महाराजांच्या उत्सवास गेले ४ ।५ वर्षे नाडगौडा कुटुंबियासमवेत जात होतो. त्या उत्सवात मी दुकानातून पंतांचे अनेक फोटो पाहिले होते. परंतु कफनीतला फोटो मला कधीच पहायला मिळाला नव्हता.

माझ कुतूहल वाढल होतं. आजच दृष्य नेहमीपेक्षा वेगळ होत. मला यातून दादांचा पंतांचा कुठेतरी संबंध असावा अस जाणवून गेल.

बिचकत बिचकत मी दादांना विचारले ' दादा ! पंत कफनी घालत होते कां ?' मी हा प्रश्न का करतो हे दादांना कळेना. ' कां ?' दादांनी विचारले.

आता अधिक तर्क वितर्क करत बसण्यापेक्षा दादाना स्पष्टच विचारावे म्हणून मी पुन्हा विचारले.

" पंतांचा तुम्ही कफनीतला फोटो केव्हा पाहिलात का ? ते कफनी घालून साधनेस बसत का ?'' तुम्हाला नेमकं काय म्हणायच ?' दादानी पुन्हा मला विचारले.

दादाना मी रात्री पाहिलेले स्वप्नातले दृष्य सांगितले. तेव्हा दादा म्हणाले, ' मला फार दिवसापूर्वी कफनीतील पंत बाळेकुंद्री महाराजाच्या फोटोची एकवीस दिवस पूजा करायला सांगितली होती तो फोटो मलाही एका मित्राकडे सहजरीत्या मिळाला व एकविसाव्या दिवशी तू आणि मी वेगळा नाही आता पूजा बंद कर असे महाराजानी सांगितले.'

तरीसुद्धा माझ्या मनात शंकेची पाल चुकचुकत होती. कफनीतील पंत पहाणाऱ्या शिष्य घराण्यापैकी नाडगौडा हे एक घराणे होते. बेळगावला पंत बाळेकुंद्री आणि नाडगौडा कुटुंबिय एकाच वाड्यात राहायला होते. आणि त्यांच्याच कुटुंबीयांच्या संगतीने पंत बाळेकुंद्री उत्सवास मी जात होतो. त्या घरातील वयोवृद्ध बाई श्रीमती हिराबाई नारायण नाडगौडा यांना पंतांच्या संदर्भात विचारावयाचे ठरविले. खरोखरीच त्यानी पंत सुरुवातीस साधना करताना कफनी परिधान करत असत असे सांगितले व त्यांचा कफनीतला फोटो माझ्या आईने आणलेला मी पाहिला आहे असे सांगितले.

आता माझी पूर्ण खात्री झाली होती रात्रीचे स्वप्न नसून त्यात कांही तरी तथ्य आहे. मी दादा आणि पंत यांच्यात कुठेतरी ऋणानुबंध असावा असे मला राहून राहून वाटू लागले. पण माझ पंत बाळेकुंद्रीस जाणे दादांची भेट होण हे कोणत्याही चमत्कारातून वा अनुभवातून घडलेल नव्हत.

पंत आणि दादा यांच्यातला संबंध लक्षात आला पण पंत दादा आणि मी याचा उलगडा मला होत नव्हता.

माझा आणि नाडगौडा कुटुंबियाच्या स्नेहातून मी पहिल्यांदा पंत बाळेकुंद्री क्षेत्रास गेलो आणि पुढे सलग ४।५ वर्षे उत्सवास जाऊ लागलो. परंतु दादांच्या आजच्या बैठकीतून माझा या क्षेत्राशी आणि दादाशी काय संबंध हे कळायला आणखी काहीं तरी घडायचे होते.

दादांच्या या बैठकीतून पंतांच्या संदर्भातील बऱ्याच घटनांची चर्चा केली. आणि याच बैठकीत पंत बाळेकुंद्री महाराजांच्या गुरूंच्या उत्सवाची घटना दादांनी सांगितली. 'यंदा गुरुद्वादशीला आपण या उत्सवास सर्वांनी जायचं ' दादा बोलून गेले.

विविध शास्त्रांचा अभ्यास केलेलं दादांच व्यक्तिमत्त्व आहे. हे त्यांच्या अनेक बैठकीतून मी अनुभवल होत. वाचनाचा जसा गाढ व्यासंग तसा गायन वादन कलेचा अभ्यासही दादांचा गाढा आहे. एखादा छोटा, मोठा कलाकार त्याना भेटायला आला की संगीत कलेच्या गायकाच्या आणि वादकांच्या कथाना बहर यायचा. मोठमोठ्या गायकांच्या मैफली आणि वादकांच्या लीला विनोद आणि चुटके सांगताना आम्ही सारे ऐकण्यात धुंद व्हायचो. अर्थात मला तशी फारशी संगीतातली माहिती नव्हती व कलाकारांची ओळखही नव्हती. फोनो-रेडिओवरून संगीत ऐकण्या पलिकडे आमची मजल गेली नव्हती पण दादांच्या बैठकीतून खूपच माहिती किस्से, चुटके, विनोद कानावरून गेले होते व अनेक गवयांच्या गाण्याच्या मैफलीत हजर राहायला मिळाले होते आणि यामुळेच अनेक कलाकारांचा परिचय घडून आलेला होता.

दादांच्या बैठकीत येणारे छोटे मोठे कलाकार होते. संगमेश्वर बुवा गुरव अनंत तेरदाळकरबुवा, पोतदारबुवा, कुलकर्णीबुवा, हार्मोनियम वादक विजापूरे, सुधांशु कुलकर्णी, अरुण जोशी, गणि फरास, सिने संगीतकार दिनकरराव पोवार, पांडुरंग मेस्त्री, डॉ. मेहता, गुलाबबाई कागलकर, खाँसाहेब (अल्लादियाखाँचे पणतू) गांधी कै. शिवाजी शिर्के, शोभा गुंटूर, रजनीताई करकरे (देशपांडे), सुचित्रा मोर्डेकर असे एक ना अनेक ज्ञातअज्ञात कलाकारांच्या संगीताचा लाभ अधून मधून मिळत होता. कधी राधेशाम मंगल कार्यालयात, कधी संकेश्वरातल्या टेंबे स्वामींच्या उत्सवात कधी निपाणीतील डॉ. मेहतांच्या बंगल्यात तर कधी बेळगावात. पण यंदा मात्र पारिश्वाडच्या उत्सवात या संगीत कलाकारांची मैफल जमायची होती.

बेळगाव पासून २० मैलावर हुबळी धारवाड रोडवर वसलेले पारिश्वाड हे लहानसे खेडेगांव. या गावी एक छोटस पुरातन महादेव मंदिर आहे या गावात कुलकर्णी कुटुंबात जन्मास आलेला एक शिवयोगी ज्याला पंत बाळेकुंद्रींच्या पोथीत 'बालमुकुंद' नावाने संबोधले जाते त्या शिवयोग्याचे हे जन्मठिकाण. बालमुकुंद महाराज हा ' हुच्च बाळाप्पा' या नावाने या गावातील लोकांना आजही परिचित आहे. परंतु हा महान योगी आपल्या घराण्यात होऊन गेल्याची नोंद वंशज असलेल्या कुलकर्णी घरातील पणतू कुटुंबियांना नव्हती.

हुबळीचे लेबर कमिशनर श्री. देशपांडेसाहेब यांची आणि दादांची भेट सौंदत्तीचे एक बाल ब्रह्मचारी शामसुंदर बेहेरे महाराज याचे समवेत घडली असता देशपांडेंच्या सुविद्य पत्नी सुशीलाताईनी दादाना पहिल्या भेटीत होणाऱ्या त्रासाची चर्चा केली. त्या पहिल्या भेटीतच दादानी पारिश्वाडातील या योग्याचे वंशज असल्याचे सांगून त्याच्या संबंधीचा शोध घ्यायला सांगितला होता. त्याप्रमाणे त्याना आपण बालमुकुंद महाराजाच्या घरातील आपले पणतू घराणे असल्याची माहिती मिळाली. त्या गावातील महादेव मंदिरात

या शिवयोग्याचे साधनेचे ठिकाण असल्याचे कळले. त्यांची शेती आजही पारिश्वाडला 'असून त्याचे पणतू डॉ. सुरेश कुलकर्णी आपला व्यवसाय करतात.

या डॉक्टरांच्या पत्नीना सर्व दृष्टांत होत त्यातूनच पारिश्वाडला गुरुद्वादशीला घरातल्या घरात उत्सव सुरू झाला होता. या उत्सवापूर्वी दादांनी या कुटुंबियाना अनेक घटना सांगून आश्चर्यचकित करून सोडले होते.

दिवसेंदिवस कुलकर्णी कुटुंबियांची भक्ती पूजा अर्चा ध्यानधारणा नित्याची चालू झाली होती. वर्षाला घरातली मंडळी उत्सव करत होते पण दरवर्षी उत्सवाची गर्दी वाढत होती. यंदाचा उत्सव हा सर्व कलाकारांच्या संगीत भक्ती गीतानी बहरून जात होता.

बैठकीत सांगितल्याप्रमाणे दादांचे गुरुद्वादशीला जाण्याबाबतचे पत्र आले. पुढील आठवड्यात गुरुद्वादशीच्या आदल्या दिवशी सर्व कलाकारांना भक्तगणांना व्यवस्थित घेऊन येण्याची जबाबदारी माझ्यावर सोपवली होती. कोल्हापूर, कोगनोळी, बेळगावातून या उत्सवास माणस येणार होती यात काही साधक, वादक, गायक, ज्योतिषी असे वेगवेगळ्या पैलूची भक्त मंडळी होती. दादांच्या सूचनेप्रमाणे चार वाहनांची तरतूद करून आम्ही कोल्हापुराहून कोगनोळी संकेश्वर बेळगाव करत करत पारिश्वाडला ठीक संध्या-काळी ८ वाजता पोहोचलो.

पारिश्वाडला गावात जायला खूपच अरूंद रस्ते आहेत. डॉ. सुरेश कुलकर्णींच्या घराकडे जायला आमच्या गाड्या वळणार तोच गावातून एक सुगंध दरवळत असल्याची जाणीव घ्राणेंद्रियाना झाली. दर्पाने सारे शरीर तरारून गेले. पारिश्वाडला पहिल्यांदाच मी येत होतो त्यामुळे काहीच माहित नव्हते गाडी ५० यार्डाचे अंतर काटून आत गेली तोच एक जुनाट महादेवाचे मंदिर दिसले. लोकांची देवळात ये जा चालू होती. पणतीचा मंद प्रकाश देवळात मिणमिणत होता. ते पाहिल्यावर कदाचित हे फार जुने मंदिर असावे असे वाटले. हे गाडीत असतानाच घडत होते. पुढे देवळामागे गाडी वळली तो डॉ. सुरेश कुलकर्णींच्या दवाखान्याची पाटी दिसली. दारात आमच्या गाड्या उभ्या राहता क्षणीच घरातील माणसे पटापट बाहेर आली. त्यांच्या चेहऱ्यावर आश्चर्य आणि आनंदाच्या छटा दिसत होत्या. दादा पारिश्वाडला आमच्या अगोदरच येऊन पोहोचले होते. त्यामुळे ही सारी मंडळी आमच्या आगमनाची वाट पाहात होती.

सर्व गाड्यातून आम्ही सारे सामान आत घेतले. तंबोरे, पेट्या, सतारी, तबले, डगे, हे पाहिल्यावर लोकांची खूपच गर्दी जमली.

कधी नव्हे ती यावेळी बरीच अनोळखी माणसे या गावात अवतरली होती. त्यामुळं त्याचही आमच्याकडे पाहाण्याच कुतूहल वाढल होत.

सर्वांनी हातपाय धुतले. सर्वांच्या एकमेकाना दादा ओळखी करून देत होते. रात्री सर्वांनी गप्पा गोष्टीत वेळ घालवला. सकाळी नेहमीप्रमाणे काकड आरतीनंतर याज्ञिकाला

सुरूवात झाली. सकाळचा पूजेचा कार्यक्रम आटोपून घेण्यात आला. दुपारचे ३ वाजून गेले होते. उत्सवाच्या प्रसादाची तयारी झाली होती. आज उत्सवाला अनेक गावाहून माणसे यायची होती.

घरात माणसांची गर्दी वाढत होती. प्रसादाचा कार्यक्रम माणसे येतील तसा चालू होताच. रात्रीचा कार्यक्रम लवकर सुरु करायचा होता. कार्यक्रम रात्रभर चालणार होता. सारी कलाकार मंडळी प्रसादाच्या भोजनाने सुस्तावलेली होती ज्याला जागा मिळेत तिथे जो तो आडवा झालेला होता. प्रवासाच्या दगदगीने शिणलेले देह सुस्तावलेले होते. पडता पडता त्याना झोपा लागल्या होत्या.

मी मात्र गायक, वादक, कलाकार यापैकी कोणीच नव्हतो. त्यामुळे मला जाग असेपर्यंत श्रोत्याची भूमिका बजावयाची होती. पण मला कोणी झोपू देत नव्हते. कारण पारिश्वाडला माझी ओळख एका वेगळ्या अर्थाने करून दिली गेल्यामुळे प्रत्येकजण माझ्या भविष्य कथनाची परीक्षा घेण्याचा प्रयत्न करत होता. पण मी आज एक विशिष्ट कारणासाठी पारिश्वाडला हजर होतो... मला गायन, भजन, संगीत भविष्य कथनापेक्षा एका वेगळ्याच गोष्टीचा शोध घ्यायचा होता.

दादानी मला कोल्हापुरातील एका उद्योगपतीना बरोबर घेऊन यायला सांगितले होते. त्या उद्योगपतीना खूपच त्रास होत होता. या कुटुंबाचं शारीरिक, मानसिक, आर्थिक सर्व तऱ्हेच संतुलन बिघडल्यामुळे ते खूपच अस्वस्थ झालेले होते. दादांनी त्या कुटुंबा-बाबत मला पारिश्वाडला काहीतरी समजेल असे सांगितले होते. रात्री भजनाला सुरूवात होण्यापूर्वी मी देवघराच्या खोलीत नमस्कार करून दहा मिनिटं डोळे मिटून बसलो. अर्थात मला जे पाहायला मिळाले ते पाहून या मंडळीना का व कशाचा त्रास होतो याचा शोध लागलेला होता.

एक उग्र चेहरा असलेल्या मांत्रिकाचे दृष्य मला पहायला मिळाले होते. त्याने आपण कोण कोठले व या उद्योगपतीना त्रास देण्यासाठी आपण xxxx सांगण्यावरून प्रयोग गेल्याचे सांगितले. त्यावरून उद्योगपतीच्या घरावर कोणीतरी करणी केली असल्याने हा त्रास होतोय असे समजल्यानंतर मी सर्व घटनेचा खुलासा दादाना व उद्योगपती कुटुंबियांना केला. थोड्याच वेळात मी अस्वस्थ झालो. काय होते आहे मला कळले नाही आणि मी ते दृष्य पाहिल्यानंतर काही तास बेशुद्ध होतो. मला काय झाले हे मलाच कळले नाही. अशा अवस्थेत सारे लोक गडबडून गेले... माझ्या बेसावध होण्याचे कारण फक्त दादाना कळले होते. कारण दादानी या कुटुंबियांना आपल्या घरावर करणी प्रयोग झाल्याचे सांगितले होते. देव्हाऱ्यातील अक्षता डोक्यावर टाकून भस्म लावल्यानंतर सर्व स्थिती पूर्ववत झालेली होती. पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे मला शिरेतले इंजेक्शन देण्यासाठी डॉ. सुरेश कुलकर्णीनी प्रयत्न केला त्याना हाताची शिर लवकर सापडली नाही.

एऱ्हवी वरवर दिसणाऱ्या शिरा सापडत नव्हत्या हा एक चमत्कारच होता. पण हा बिघाड तत्कालीक होता. आगळा वेगळा होता. या कुटुंबाला तुळजापूर, गाणगापूरला घेऊन जाणेचा आदेश झालेला होता. मी दादाना याबाबत सांगितले.

रात्रीचा गायन वादनाचा कार्यक्रम वरच्या खोलीत चालू होता. कार्यक्रमात रंगत भरलेली होती. आलेल्या कलाकारांच्या गायन वादनाला श्रोते लोक तल्लीन होऊन दाद देत होते. मी खालच्या खोलीत धुंदीत पडलो होतो. पहाटे भैरवीच्या सुराना आळवण्यात संगमेश्वरबुवा तल्लीन झाले होते. मी आता पूर्ण सावध झालो होतो. दादा अधूनमधून मैफलीतून खाली येऊन माझी चौकशी करत होते.

माझे पारिश्वाडला येण्याने खूपच गोष्टीना चालना मिळायची होती. गाणगापूरला जाऊन आल्यावर या कुटुंबियांना दादा या त्रासातून मुक्त होण्यासाठी उपाय सांगणार होते. दुसरे दिवशी आम्हाला कोल्हापूरला निघायच होतं. दादानी आमच्या बरोबर गाणगापूरला यावं अशी उद्योगपतीच्या कुटुंबियांची खूप इच्छा होती आणि मलाही दादानी याव अस वाटत होतं. पण दादांनी मला येता येत नसल्याच सांगितल्यापासून मी खूपच निराश आणि बेचैन झालो होतो.

शेवटी दादानी माझी समजूत काढली तुम्ही ' या मंडळीना घेऊन जा. मी तुमच्या बरोबर आहेच अस समजा..' हे दादांच सांगण व्यवहारी होत अस मला वाटत होत. अखेर आम्ही पारिश्वाडहून कोल्हापुरला आलो.

दिवाळीचा कार्यक्रम आटोपून वैकुंठ चतुर्दशीला तुळजापूर, गाणगापूरला आम्हाला जायचे होते. जायचा बेत पक्का केला. पौर्णिमेला गाणगापुरात पोहोचायच होतं.

अगदी जड अंतकरणाने दादांची परवानगी घेऊन आम्ही संध्याकाळी ४ चे सुमारास कोल्हापुर सोडलं. उद्योगपतीच्या घरातील मंडळी आणि मी एवढीच गाडीत होतो. बंगल्याच्या बाहेर गाडी पडली. मार्केट यार्डच्या रस्त्यावर गाडी आली. मी गाडीच्या पुढील बाजूस बसलो होतो. अजून अंधार पडायचा होता. तोच गाडीच्या पुढील भागावर एक उघडा बोडका वृद्ध देह बसल्याचा दिसत होता. ही आकृती कोणाची हे मला कळत नव्हते. आम्ही शिरोलीचा पूल ओलांडून पुढे गेलो. अस्पष्ट दिसणारी आकृती आता स्पष्ट पद्मासन घालून बसलेली दिसत होती. अंधार वाढत चालला होता. मिरज ओलांडून आम्ही शिरढोणच्या रस्त्याकडे वळलो तोच गाडीतल्या कुणीतरी चहा घ्यायची इच्छा व्यक्त केली. उद्योगपतीच स्वतः गाडी चालवत होते. त्यानी आपण शिरढोणला चहा घेऊया असे सांगितले.

गाडीच्या पुढे बसलेल्या आकृतीचे चित्र स्पष्ट दिसतच होते. हा अनुभव अजबच होता. एकाएकी मी तुमच्या बरोबर आहेच हे दादांच वाक्य आठवल.. मी त्या वाक्याचा आणि ह्या दृष्याचा संबंध कुठे असेल कां असा विचार करत होतो. पण ती आकृती तो

चेहरा दादांचा अथवा नृसिंहसरस्वतींचा मुळीच नव्हता. तो मला अनोळखी चेहरा होता. त्यामुळे मला कांहीच कळत नव्हते. हा विचार करत असतानाच शिरढोण गावाची शीव आल्याची वाहनचालकांनी आम्हा सर्वांना आठवण करून दिली. थोड्याच वेळात एस्. टी. स्थानकासमोर आमची गाडी थांबली.

गाडीच्या मागचे एक चाक पंक्चर झाले असल्याचे उद्योगपतीना दिसले. एका चाकाची हवा गेल्यामुळे पंक्चर काढून व दुसरे चाक बसवून जायला आम्हाला वेळ लागणार होता. मी गाडीच्या समोर पाहिले. गाडीच्या पुढील भागावर दिसणारी आकृती दिसत नव्हती.

आम्ही सर्वांनी चहा घेई पर्यंत नवीन चाक बसवणे व चाकाचे पंक्चर काढून घेणे होईपर्यंत जवळ जवळ दीड तास होऊन गेला होता. आमच्या गाडीची तयारी झाली. आम्ही सारे गाडीत बसलो. गाडी सुरु झाली. गाडी पंढरपूर मार्गावर लागली. कोल्हापूर पासून शिरढोण पर्यंत पाहिलेली आकृती दिसत नव्हती. पंढरपूर ओलांडून आम्ही सोलापूर रस्त्यास लागलो. थोडा वेळ गेल्यानंतर सोलापूरच्या अलिकडेच सुमारे १० किलोमिटर अंतरावर गाडी थांबली. आम्ही बाहेर जाऊन यायला म्हणून गाडीतून उतरलो. तोच रस्त्याच्या कडेला एक म्हातारा गृहस्थ बसलेला दिसला. जी आकृती मी कोल्हापूर ते शिरढोण पाहिली तीच व्यक्ती रस्त्याच्या कडेला दिसत होती. मी त्याच्याकडे पहात उभा राहिलो तोच ती आकृती बोलली. ' बाळ ! यालाच सूक्ष्म देह दर्शन म्हणतात.' मला ऐकू येत होत. अर्थात हे आमच्या दोघातल पहाण बोलणं अन्य कुणाला कळणच शक्य नव्हते. मी चक्रावून गेलो होतो. ' गुरुजी आवरा.. ' कुणीतरी आवाज दिला. त्याबरोबर मी सावध होऊन गाडीत येऊन बसलो.

थोड्याच वेळात आम्ही सोलापुरात येऊन पोहोचलो. रात्रीचे साडेबारा वाजून गेले होते. प्रवासातील मंडळीना प्रवासाचा कंटाळा आला होता. त्यामुळे रात्री लॉजवर थांबायचा निर्णय गाडीतच घेतला होता. आम्ही सोलापुरातील एका लॉजवर रात्रीस राहिलो व सकाळी उठून तुळजापूरला पोहोचलो. तेथील सर्व पूजा अर्चा, नैवेद्य दर्शन आटोपून आम्ही गाणगापूरला निघालो. गाणगापुरात प्रथम आम्ही सरकारी रेस्ट हाऊसमध्ये उतरायचा निर्णय घेतला होता. परंतु तेथे खोल्या मिळाल्या नाहीत त्यामुळे आम्ही रेस्ट हाऊसच्या माणसाच्या सांगण्यावरून आमची गाडी गुळवणी महाराजांचे मठाकडे वळवली. गाडीतून उतरून आत गेलो अन् मठाचे मोठ्या हॉलमध्ये प्रवेश केला. या हॉलमध्ये अनेक महाराजांचे फोटो लावलेले आहेत. प्रवेश द्वाराजवळ पहिलाच फोटो पाहाताक्षणीच गाडीवरील दृष्याचा चेहरा आणि फोटो एकच दिसत होता फोटो खाली रंगावधूत स्वामी नावाचा उल्लेख होता. रंगावधूत स्वामी हे नाव मला नवीनच होते. मी त्या स्वामींची माहिती येथील व्यवस्थापकाना विचारली. हा गाणगापूर प्रवासातला दुसरा

अद्‌भुत प्रसंग होता. दादांचा शब्द खरा करण्यासाठीच रंगावधूताना हे कराव लागल की काय ? हे गुढ अजूनही मला समजलं नाही. आम्ही गाणगापूरहून अत्यंत समाधानाने परतलो. दादांचा मुक्काम कोल्हापूरलाच होता.

दादांशी या सर्व घटनाबाबत चर्चा केली. तेव्हा दादा म्हणाले, ' तुम्हाला महाराजाचे संरक्षण होते. यातून तुमचा सर्व मार्ग खुला होईल. तुमच्यावर ज्या कोणी प्रयोग केलेत ते लवकरच निकामी होतील. त्यासाठी घरी नवचंडीचा होम संपुटीत पाठासह करून घ्यायला उपाय आला आहे.

करणी-प्रयोग हा विषय या उद्योगपतीना व त्यांच्या कुटुंबियांना पटण्या सारखा नव्हता पण होणाऱ्या त्रासातून मुक्त करण्यासाठी त्याना विश्वास ठेवणे भाग पाडले होते. त्यांच्या सुविद्य पत्नी व इतराना हा प्रयोग करणारा कोण आहे हे समजावून घ्यावयाचे होते. परंतु हे त्याना दाखवणे मला आणि दादानाही शक्य नव्हत. कारण या गूढ गोष्टी समजून घ्यायला शरीरक्षमता असावी लागते. दुष्ट शक्तीच्या माध्यामातून प्रयोग करणाऱ्या लोकाना समजून घेताना त्रास होतो हे मी पारिश्वाडात अनुभवल होतं. तरीपण महाराजांच्या कृपेमुळे मी त्यांच्या पत्नीला म्हणालो, ' हे पहा तुम्हाला वेळ आल्यावर सर्व कांही दिसेल. आधी यातून मुक्त होऊ या.' दादानी सांगितलेल्या उपायाची तयारी करण्याविषयी मी त्याना सुचवले.

घरात नवचंडीचा कार्यक्रम करण्याचे ठरले. पण या साठी याज्ञिक करणारे लोक कोठून आणायचे. ' नवचंडी होम ' हा कलियुगात एक महत्त्वाचा उपाय आहे. हा विधी करणारे लोक कोल्हापुरात मोजकेच आहेत पण त्यांच्या विधी करण्याबाबत आम्हाला कांहीच माहिती नसल्यामुळे याज्ञिक करणारे ब्राह्मणांची जबाबदारी दादांच्यावर सोपवून मी मोकळा झालो. दादांनी याबाबत जबाबदारी उचलली.

दिवस ठरला.. ब्राह्मण ठरले. पण दुर्दैव आड आले.. कांही दिवसांपूर्वी शरद जोशींच्या शेतकरी मोर्च्यावर निपाणीत गोळीबार झाला आणि संकेश्वर बेळगाव रस्ता वाहतूक बंद झाली. ठरलेत्या दिवशी हा विधी व्हायला हवा होता दादानी गारगोटी मार्गाने सर्व ब्राह्मणाना आणवून घेऊन विधी करवून घेतला. विधी अत्यंत चांगल्या पद्धतीने झाला. एवढ्या अडचणीतून मार्ग मोकळा झाल्याचा आनंद सर्वांना वाटत होता पण ...

अजूनही उद्योगपतीच्या पत्नीला ह्या विधीतून हवे असलेले पहायला मिळाले नव्हते. प्रयोग करणारा कोण.. आणि त्याने काय केले आहे ? ह्याचे उत्तर मिळाले नव्हते. दररोज मला त्या म्हणायच्या, ' मला तो माणूस दाखव.' मी मनात महाराजाना विनंती केली होती ' तिची ही इच्छा पूर्ण करा.'

मला अनेक गोष्टींचा उलगडा करून दाखवल्यानंतर त्या सुविद्य पत्नीला प्रत्यक्ष पाहायला मिळाल्याखेरीच दादांच्या आदेशाला व महाराजांच्या कृपेला कांही अर्थ वाटत

नव्हता अर्थात हा मानवी गुणधर्म आहे. सत्याचा प्रत्यय आल्याखेरीज मनाला समाधान मिळत नाही.

एक दिवस घरात अगदी अस्वस्थ अवस्थेत उद्योगपतीच्या पत्नी घरात झोपून होत्या. उद्योगपतींचे बंगल्या शेजारीच त्यांची सासुरवाडी असल्याने घरातील रोजच्या रोज येणे जाणे असायचे. आज मुलीची तब्बेत ठीक नसल्याचे समजल्यावरून सासुरवाडी-कडील मंडळी मुलीकडे संध्याकाळचे साडेपाचचे सुमारास सहज पाहायला आले होते. मातोश्रींनी बंधूंनी व इतरांनी उद्योगपतींच्या पत्नीस उठवले. घरातील पुढच्या खोलीत गप्पा गोष्टी करत, इकडचा तिकडचा विषय बोलत बोलत असतानाच उद्योगपतींच्या पत्नीचा चेहरा उग्र झाला आणि डोळे तारवटून घराच्या प्रवेशद्वाराकडे पाहात 'कोण तू ऽ का आला आहे ?' अशा तऱ्हेचे रागारागाने विचारत होत्या. एका एकी सरळ बोलणाऱ्या बाईचा चेहरा उग्र झाला होता. डोळ्यात रक्ताळलेल्या छटा दिसत होत्या.

आपली मुलगी कोणाशी बोलते म्हणून दाराकडे पाहिले तो दारात कोणी नव्हते. तरी सुद्धा तिच्याशी कोणीतरी बोलत असल्याचे तिचे संभाषण चालू होते. बाहेर जे कोणी होते ती व्यक्ती तिला बाहेर बोलवत असल्याचे तिच्या संभाषणावरून जाणवत होते.

'तू कोणाशी बोलतेस ?' मातोश्रींनी उद्योगपतींच्या पत्नीस विचारले.

'तो बघ ना ! मला बाहेर बोलवतोय.' नावाचा उल्लेख करीत उद्योगपतीच्या पत्नीने आईस सांगितले. बाहेरील व्यक्ती बाहेर बोलवीत होती. बाहेरील व्यक्तीस त्या बाई आत बोलवत होत्या. नाही-होय- करत दोघांचा संवाद चालूच होता. आत येण्यास मला दादा आणि गुरुजीनी बंधन घातले आहे. बाहेरील व्यक्ती बोलत होती.

माझी सर्व शक्ती संपली आहे. मी तुझ्या घरावर अग्नी अस्त्राचा प्रयोग केला आहे. सगळ घरदार जाळून काढणार होतो. पण तू ह्या दोघांच्यामुळे वाचलीस .... वगैरे वगैरे बोलत असल्याचे समोर बसलेल्या मातोश्रींना बंधूंना व इतरांना बेभान अवस्थेत सांगत होत्या. हे सार संभाषण जवळ जवळ सात वाजल्यापासून चालू होत. ...... घरातील हे दृष्य पाहणारी माणसं पार गोंधळून घाबरून गेली होती. हा प्रकार चालू असतानाच दादांनी उद्योगपतीच्या घरी आता जायला पाहिजे' अस मला सांगितले. मी आणि दादा त्याच क्षणी उद्योगपतीच्या घरी निघालो. आम्ही घरी पोहोचलो त्या वेळी ९ वाजून गेले होते. आम्ही बंगल्याच्या प्रवेशदारातून आत घरात गेलो.

पाहातो तो घरातील सर्व माणस भीतीने भेदरून गेली होती. उद्योगपतीच्या पत्नीचे केस मोकळे सोडलेल्या अवस्थेत होते, डोळे रक्ताळलेले होते, असंबद्ध बडबडणे चालू होते हे मी आणि दादा पाहातच राहिलो.

सारा प्रकार लक्षात घेऊन मी दादांच्याकडून गाणगापूरच भस्म मागून घेतलं. भस्म तिच्या कपाळी लावून आणि डोक्यावर टाकून तिला सावध करण्याचा प्रयत्न केला. तरी सुद्धा तिचे बोलणे चालूच होते. थोड्याच वेळाने त्या अवस्थेतून ती सावध झाली.

'काय झालं xxxx' मी उद्योगपतीच्या पत्नीस विचारले. आता ती सावध झाली होती. अगदी सावध अवस्थेत ती घडलेला वृत्तांत सांगत होती.

'आज सकाळपासून काय होतय हे मला कळत नव्हते. म्हणून मी झोपले होते. माझी प्रकृती बरी नाही मला बघायला म्हणून आई, भाऊ आणि ही घरातली आली म्हणून आम्ही बोलत बसलो. एकाएकी काय झाले मला कळाले नाही.

दारा समोर xxx नावाची व्यक्ती आपल्या दोन साथीदारांसह हातात करवंटी वजा भांड त्रिशूळासारख हत्यार घेऊन उभी राहिली. आणि मला बाहेर बोलवत होती. मी त्याला नाही म्हणत होते. तेंव्हा त्यान माझ्या घरावर केलेल्या करणी प्रयोगाचा उल्लेख केला. त्याला तुम्ही दोघांनी मोकळ केल्याच म्हणत त्याने आपल्या हातातल भांड उलट करत आरडाओरडा करत मागे उडी मारली. मी त्याला आत बोलवत असता मला उंबऱ्याच्या आत यायला बंधन घातलं म्हणत होता. पण जाताना त्याने आपल्याला ज्यांनी हे प्रयोग करायला लावलेत त्यांचा उल्लेख करून त्यांचा समाचार घ्यायला निघालोय हे सांगायला आल्याच सांगून. या पुढे करणी करायला लावणाऱ्यांच्या घरी वर्षात पाच जीव घेणार असल्याचे सांगितले.

आम्ही हा वृत्तांत अत्यंत मंत्रमुग्ध होऊन ऐकत होतो. भितीने भेदरलेल्या माणसांना आता दिलासा आला होता. दादा नी मी आल्यामुळे त्यांना खूपच समाधान लाभलं होतं.

खरोखरी पुढे तासाभराने हा रुद्रावतार शांत झाला. पण एक मनात समाधान होतं. आज महाराजांनी तिची करणी करणाऱ्या व्यक्तीची आणि प्रयोगाची ओळख करून दिली होती. पुढे त्या संभाषणातून सांगितल्याप्रमाणे सर्व घटना घडत गेल्या. या कुटुंबाचे सर्व त्रास कमी व्हायला लागले होते. घरातील वातावरण शुद्ध होत होतं. तरीपण या बाई मोठ्या चिकित्सक ! खरोखर ह्या करणीच्या वस्तू निकामी झाल्या म्हणतोस. तर त्या मला पहायला मिळतील का ? असा त्यांचा सवाल होता. आता माझा विश्वास दृढावत होता. 'हो ! नक्की पहायला मिळतील. ही जशी वेळ आली तशी करणीचे साहित्य काढणारी माणसं या जगात आहेत. त्या पैकी एखादा माणूस भेटला की- त्याचाही शोध घेऊ.'

पुढे दोन वर्षांनी सौंदत्तीचे बालब्रह्मचारी शामसुंदर बेहरे महाराजांना आम्हाला भेटायची इच्छा झाली.

बालब्रह्मचारी शामसुंदर बेहरेंचा आणि दादांचा परिचय झाला होता. ते निपाणीत ह्या प्रयोगाचे दर्शन आम्हाला घडवणार होते. खरोखरीच निपाणीत एका रात्रीत दोन मंडळींच्या करण्या काढण्याचा प्रयोग आम्ही पाहिला. मी दादांना या महाराजांना कोल्हापूरला घेऊन जायच अस सांगून आम्ही कोल्हापूरला आलो.

शामसुंदर बेहरे महाराज अगदी लीलया हा करणी काढण्याचा प्रयोग करायचे. कोल्हापुरात आल्यावर पहिल्यांदा या उद्योगपतींना आणि त्यांच्या पत्निला मी निरोप दिला.

आज निकामी केलेल्या करणीचे साहित्य प्रत्यक्ष पाहायचे होते. धार्मिक विधीतून दुष्टशक्तीचे परिमार्जन होते हे या प्रयोगातून मला पाहायला मिळणार होते.

प्रथम आम्ही बेहेरे महाराजांना या पतिपत्नीच्या घरी नेले व त्यांना 'त्यांच्या वर कुणी काय केले आहे का ?' असा प्रश्न विचारला.

'केला होता- पण ती करणी निकामी झाली आहे.' असे बेहेरे महाराजांनी सांगितले.

'ती काढून दाखवता का' मी म्हणालो.

'कशाला ? काय करायची ? बेहेरे महाराज म्हणाले.

परंतु उद्योगपतींच्या पत्नीला त्यांनी करणी काढण्या अगोदर त्या भंगलेल्या स्थितीत असल्याचे सांगितले होते. रात्रीच संध्याकाळी आठच्या सुमारास करणी काढण्याचा प्रयोग करायचा ठरला. ठरल्याप्रमाणे घरात मांड मांडून करणी साहित्य काढण्याचा प्रयोग झाला. बंगल्याच्या आवारात करणीसाठी वापरलेल्या पितळी मूर्ती फुटलेल्या तुटलेल्या अवस्थेत येऊन पडल्या होत्या. प्रयोगासाठी वापरलेले साहित्य सांगितलेल्या ठिकाणी येऊन पडले होते.

आज खरोखरीच मी समाधानी झालो होतो. यातूनच मी दादा, पंत आणि पारिश्वाड यातला ऋणानुबंध समजून चुकलो होतो.

आज हे कुटुंब कोल्हापुरात वास्तव्य करून सुखासमाधानाने राहते आहे. आजही दादांचा आणि या कुटुंबाचा जिव्हाळा आहे. त्या दिवसापासून दादा हे माझ्या जीवनाला लाभलेला परिसच होऊन बसले आहेत. माझ्या जीवनात मला आलेले अनुभव दादांच्या शरीरात वास करणाऱ्या दिव्यशक्तीतून घडले, लाभले अशी माझ्या मनाची धारणा आहे. दादा याचे श्रेय घेवोत वा न घेवोत मी मात्र त्यांच्या सहवासात डोळे झाकत नाहीत तोवर आजही ऐकत बसतो. झोप यायला लागली की सहवासाच्या धुंदीत तुर्यावस्थेत झोपणारा साधक बनतो. त्यामुळेच दादा नाईक माझ्या जीवनातील दिव्यभक्ती, दिव्यशक्ती, संकट-मुक्ती घडविणारा परिस आहे. हा परीस माझ्या जीवनाच सोन घडवील यात तिळमात्र मला शंका नाही.

## वंदनीय दादा

*श्री. सी. ज. तथा बाबूराव जोशी*

ज्याला कुणाचा आधार नसतो त्याला परमेश्वर पाठीराखा होतो. असे म्हणतात. याचा अनुभव मला पू. दादांच्या रुपाने आला आहे. गेली अनेक वर्षे मी त्यांच्या सहवासात आहे. मला पावलोपावली त्यांच्यातल्या या ईश्वरीरुपाचे दर्शन घडत आलेले आहे.

मी एक सामान्य माणूस आहे. मला अध्यात्म चमत्कार, साक्षात्कार या बद्दल अधिकारवाणीनं सांगता येत नाही. पण मी पू. दादांच्या ठिकाणी कांहीतरी शक्ती आहे. तिचा अनुभव मला येतो. माणुसकीचा गहिंवर मी अनुभवतो. त्यांच्या शिवस्पर्शाने माझे कौटुंबिक जीवन उजळून निघालेले आहे हे लिहितांना मला अभिमान वाटतो. पू. दादा माझे श्रद्धेय आहेत.

त्यांच्याविषयीच्या काही आठवणी सांगणे हे या लेखाचे निमित्त.

मी सन १९७६ च्या अखेरीस संकेश्वरमधील शंकराचार्य संस्थान मठातील नोकरी सोडली. नोकरी सोडली खरी पण त्याच क्षणापासून आमचे पाच जणांचे कुटुंब डोळ्यासमोर उभे राहिले. मुल लहांन यासर्वांचा उदरनिर्वाह कसा करावयाचा या विचाराने मन उद्विग्न झाले. जेवणाखाण्यावरचे मन उडाले. मनावरचा ताण असह्य होऊ लागला. जीव नकोसा व्हायचा. जगणे नकोसे वाटू लागले. प्रकृतीवर विपरीत परिणाम होऊन ती ढासळू लागली. या काळांत सर्व हवाला श्रीदत्तप्रभूंचेवर टाकून त्यांचे नामस्मरण करीत राहण्याशिवाय दुसरा मार्ग दिसेना. सतत त्यांचे नामस्मरण करू लागलो.

असेच एक दिवस पहाटे ४ ॥ ते ५ चे सुमारास एक स्वप्न पडले. एक तेजःपुंज संन्यासी माझ्यासमोर उभे राहिले. क्षणभर मला काय बोलावे ते समजेना. एवढ्यात त्यांनी मला पू. दादांची मूर्ती दाखविली व मला म्हणाले,'तुझा व तुझ्या कुटुंबाचा भार आता त्यांच्याकडे आहे. (पू. दादांच्याकडे) कोणतीही काळजी करू नकोस." असे म्हणून त्या संन्यासी स्वामींनी माझ्या मस्तकावर हात ठेवला. मी त्यांच्या चरणावर मस्तक ठेवले. आणि मला जाग आली.

त्याच दिवशी सकाळी ९ वाजता पू. दादांचा निरोप आला. मी. पू. दादांना जाऊन भेटलो. त्यांनी मला श्रीगुरुचरित्राचे सात सप्ताह करण्यास सांगितले व कांही पैसे दिले. स्वप्नाचा पडताळा ताबडतोब आल्याने मला फार भडभडून आले. मी. पू. दादांचे चरणी मस्तक ठेवले. तेंव्हा. पू. दादा म्हणाले,' मी तुझ्या पाठीशी आहे. कोणतीही काळजी करू नकोस. निश्चिंत रहा. घरी जा. अनुष्ठान सुरू कर' मी घरी आलो. अनुष्ठान चालू केले. आजतागायत त्यांच्याकृपेनेच मी माझा संसार व्यवस्थित, सुखासमाधानाने करीत आहे.

माझा मुलगा भास्कर यास स्टेट बँकेत अकस्मित हजर होण्यासाठी ऑर्डर आली. तेंव्हा भास्कर सातार्‍यास होता. अवधी अगदी थोडा होता. काय करावे प्रश्न पडला. यावेळीही पू. दादा मदतीकरीता धाऊन आले. त्यांनी आपले धाकटे बंधू श्री. सदानंद यास स्पेशल गाडी घेवून सातार्‍याला पाठविले. त्यामुळे भास्कर वेळेवर स्टेट बँकेत हजर होऊ शकला आणि त्याच्या जीवनाला वळण देणारी ही घटना असल्यामुळे ती पू. दादांनी मिळवून दिली म्हणून तो आज स्वतःच्या पायावर सन्मानाने उभा आहे.

माझी पत्नी आजारी त्याचवेळी मीही खूप आजारी पडलो. मला कोल्हापूरला डॉ. भूपाळींचेकडे पू. दादांनीच ॲडमिट केले. २, २ ॥ महिने अंथरुणावर होतो. माझे ऑपरेशन झाले. तेंव्हा त्यांनी सर्व तऱ्हेची मदत तर केलीच पण दररोज एकवेळ तरी दवाखान्यात स्वतः येऊन किंवा त्यांचे चिरंजीव अनिल यांचेकडून विचारपूस करून धीर देत असत.

माझ्या मुलीच्या विवाहासंबंधी स्थळ पाहण्यापासून तो विवाहपार पाडण्यापर्यंत सर्व जबाबदारी त्यांनीच घेतली. तसेच त्यांचे धाकटे बंधू श्री. सदानंद व कै. बाबूकाका यांनी जातीने हजर राहून कार्य पार पाडले. ते नेहमी म्हणत माझ्या उपाध्याच्या मुलीचे लग्न हे आमचे घरचेच कार्य आहे.

माझा मोठा मुलगा चि. सुधीरवर तर पू. दादांचा विशेष लोभ आहे. त्यांच्याच आशीर्वादाने तो. ज्योतिषप्रवीण व हस्तसामुद्रिक तज्ज्ञ झाला आहे.

पू. दादा व त्यांचे बंधू मला धाकटा भाऊ मानतात. आमच्या कुटुंबातील प्रत्येक गोष्टी पू. दादांच्या विचारानेच आम्ही करीत आला आहोत.

आज पू. दादा ८१ व्या वर्षांचे झाले आहेत. कधी कधी मला वाटते देव माणसांत जन्माला येतो. तो अपल्याला भेटावा. पू. दादांच्यासारखी देव माणसं क्वचित जन्माला येतात. मला धन्यता वाटते की मी पू. दादांसारख्या देवमाणसाच्या कृपेच्या सावलीत आलो.

## अंत:प्रेरणेचा प्रत्यय

*डॉ. जी. के. पाटील, कोल्हापूर*

अंदाजे दहा वर्षे झाली. माझ्या डॉक्टरमित्रांसमवेत प्रिय दादांचे बरोबर गप्पागोष्टी झाल्या. त्यापुढे या गप्पागोष्टी नियमित होऊ लागल्या. हाडाचे शिक्षक असल्यामुळे कोणताही मुद्दा समजावून सांगताना त्यांच्या अगाध वाचनाचा प्रत्यय यायचा. शेक्सपियर तर १५-१५ मिनिटे म्हणून दाखवायचे. इंग्रजी शब्दांच्या अर्थाचा बारकावा समजावून सांगायचे.

त्यांचेकडे येणाजाणाऱ्या कित्येक लोकांच्या ओळखी झाल्या. त्यामध्ये सर्व थरांतील मंडळींचा समावेश असायचा. दादांच्याकडे बहुशः आपल्या अडचणी घेऊन येणाऱ्यांचे प्रमाण मोठे होते. दादांचा मित्रपरिवार मोठा. त्यांना गुरुस्थानी मानणाऱ्यांचे प्रमाण मोठे. त्यामुळे दादांनी शब्द टाकला तर आपले काम होणार, या भावनेने लोक

आपल्या अडीअडचणी दादांना सांगायचे. दादाही शक्यतो सर्व करायचे. लहान-थोर सर्वांना प्रेमाने वागवायचे.

कुंडली पाहून, हस्तरेषा बघून अडचणीतून मार्ग काढणेसाठी विचारणा होत असे. दादापण सर्व काही समजावून सांगायचे. उपाय सांगायचे. खाजगीत दादांबरोबर या विषयावर बोलणे झाले तेंव्हा दादा म्हणायचे,'याचा उपयोग मानसिक बळ वाढवण्यासाठी होतो व लोक अडचणीला धैर्याने सामोरे जाऊ शकतात.' दादांच्या या प्रकारच्या अडचणीवर उपाय सुचविण्याच्या किंवा पुढे येणाऱ्या अडचणीची सूचना देणेच्या सवयीवर विचारले असता ते म्हणायचे,'अंतःप्रेरणा सांगेल त्या प्रमाणे मी उपाय सुचवितो किंवा अडीअडचणीविषयी लोकांना जागे करतो'. माझी पुढील आठवण आहे ती दादांच्या या अंतःप्रेरणेबद्दलची.

माझे एक स्नेही शहरातील प्रसिद्ध हॉस्पिटलमध्ये दाखल झाले होते. त्यांचे प्रकृतीचे निश्चित निदान होऊ शकत नव्हते शहरातील नाणावलेल्या डॉक्टरमंडळींचा विचार विनिमय होऊन शक्यतो पेशंट मुंबईला हलवावा असे ठरले परंतु मुंबईस हलवणे अशक्य होते. मी स्वतः त्याचवेळी दादांचेकडे गेलो व त्याना विचारले अशी परिस्थिती आहे काय करायचे ? दादांनी दहा मिनिटे आकडेमोड केली आणि सांगितले, 'काळजी करू नका तुमचा स्नेही या अडचणीतून बाहेर येतोय. मुंबईस जाणेस कारण नाही.' आणि काय आश्चर्य त्या पुढच्या दिवसापासून माझे स्नेह्यांची प्रकृती सुधारत गेली आणि १५ दिवसांनी तो बरा होऊन घरी परतला. त्यापुढील ३ महिने विश्रांतीनंतर तो पूर्वीप्रमाणे झाला.

## माझे वाटाडे

*डॉ. दत्तात्रय नागेशराव जोशी*

श्री. धोंडोपंत नाईक हे नाव कानावर पडलं होतं त्या गोष्टीला आज चाळीस वर्षांपेक्षा अधिक कालावधी लोटलाय. एस्. डी. हायस्कूल संकेश्वर या प्रशालेच्या जडणीघडणीत ज्यानी तनमनधन वेचले त्यांत त्यांचं नांव अग्रक्रमानं घ्यायला हवं एवढं माहित होतं. पण प्रत्यक्ष परिचय व्हायला १९५६ चं वर्ष उजाडायला लागलं. एक व्यासंगी व्यक्तिमत्व, शिक्षणतज्ज्ञ, रसिक श्रोता, सामाजिक कार्यकर्ता अशा विविध रूपानं छाप पाडणारं त्यांचं स्वरूप तसं स्पष्ट व्हायला १९६० ची पहिली सहामाही सरायला आली होती.

१९५६-५७ मध्ये विद्यामंदिर निपाणी या प्रशालेत सहशिक्षक म्हणून कार्य करताना त्यांचा जो कांही परिचय झाला त्यावेळी जे चित्र उभं राहिलं होतं त्यात आता खूप बदल झालाय.

' आर्ट सर्कल ' नावाच्या एका मंडळांन निपाणीच्या सांस्कृतिक जीवनांत खळबळ उडवून द्यायला प्रारंभ केला होता. त्यात श्री. दादांचा सक्रिय सहभाग होता हेही त्यावेळी जाणवलं होतं. पण त्यावेळी आम्ही तशी " खोंड " म्हणून प्रसिद्ध असणारी मंडळी शास्त्रीय संगीताचे धडे गिरवतोय हे पाहून श्री. दादांना बरं वाटायचं हे त्यांच्या बोलण्यातून जाणवायचं. पण खरं तर त्यावेळी दोघामध्यें खूप मोठी दरी असल्याचा भास व्हायचा. हेही तेवढेच सत्य होतं. वयोमानाची, ज्ञानाची, अनुभवाची, आध्यात्मिक बैठकीची, सामाजिक स्थानाची ही दरी आज पूर्वीपेक्षाही खूप रुंदावली, त्यांच्या-माझ्यात कसलेच साम्य नाही हेही सत्य आहे. मात्र आम्हा दोघातली ही वय, ज्ञान, अनुभव इत्यादि गोष्टींची दरी खूप रुंदावली असली तरी, त्यात दूरत्वाचा आभास होत नाही हेच त्यातले आगळेपण आहे. उलट ही रुंदावलेली दरी एका निराळ्या सूत्राने - सेतूमुळे जोडलेरी आहे असं वाटतंय.

१९६० साली कांही कौटुंबिक अडचणीमुळे मी कणकवली सोडून मुरगूडला येण्याचा निर्णय घेतलाय हे कळताच कै. दामूअण्णा जोशी, तसेच श्री. आर्. डी. कुलकर्णी आणि श्री. दादांनी मनाशी आडाखे बांधून टाकले. मला दापोली येथे पत्रं आली की "तिथलं सुटीतलं अध्यापन कार्य सरले की सरळ निपाणीस ये "

बेनाडीकर एज्यु. सोसायटीनं चालवलेल अकोळ इंग्लिश स्कूल जवळ जवळ बंद होण्याच्या अवस्थेत होतं, त्याची धुरा वाहण्याचं कार्य माझ्यावर सोपवायचा निर्धार या त्रयीनी केला असावा.

निपाणीस आलो आणि कै. दामूअण्णाना भेटलो. दुसरे दिवशी अकोळ येथे जाण्याचा आदेश मिळाला. श्री. आर्. डी. कुलकर्णी स्वतः अकोळपर्यंत आले. तेथल्या परिचितांशी त्यांनी माझी ओळख करून दिली अन् ते माघारी वळले. ४ दिवस तिथलं वातावरण पाहिलं आणि तिथं पुनः न जाण्याचा निर्णय घेऊन त्याप्रमाणे निपाणीतील विद्यामंदिरमध्ये उपस्थित झालो. साऱ्याना आश्चर्य वाटले.

नेमक्या त्याच दिवशी श्री. दादा निपाणीत आले होते. त्यांना हे वृत्त कळताच म्हणाले, " आम्ही आहोत ना तुझ्या पाठीशी ! तुला पूर्ण स्वातंत्र्य मिळेल असं आम्ही पाहतो. मात्र तूं तुझ्यावरील आमचा विश्वास सार्थ करायला हवास !" ते म्हणाले, "नवीन वास्तू उभी करणं सोपं असतं, मोडकळीस आलेल्या इमारतीत हवे तसे पण सुयोग्य बदल करून ती उपयुक्त ठरेल असं तिचं रुपांतर करण्यात पुरुषार्थ असतो. तुझ्यात तो आहे असं आम्हाला वाटतं, म्हणून तर तुला तिथ धाडलय ! जा, हे आव्हान स्वीकार !"

श्री. दादांनी असं कांही उत्तेजनार्थ, आव्हानात्मक बोलण केलं नसतं तर मी आज जो आहे तो झालोच नसतो. असं राहून राहून वाटतय.

२१ जून १९६० ला परत अकोळ येथे गेलो. प्रशाला उभी करायची ही जिद्द मनीं बिंबवली अन् कार्याला लागलो. शाळा ताब्यात घेणं म्हणजे काय हे अनुभवल. कोणतीच सुविधा नसताना त्यातून एक सुंदर शिल्प उभं करायचं म्हणजे दिव्यच असते. पुढच्याच आठवड्यात श्री. दादा आणि कै. दामूअण्णा जोशी अकोळ येथे आले. संस्थेची घटना लिहिण्यांचे काम आरंभले. श्री. दादा एक एक कलम विचारपूर्वक सांगत. कै. दामूअण्णांशी चर्चा करीत अन् मग ते शब्दबद्ध होताना त्यात कांही दोष राहात नाही ना याची दक्षता घेण्यासाठी विचारमग्न होत. रात्रभर अशा रीतीने काम चालले. सकाळी पुनः कामाला प्रारंभ झाला एक रात्र आणि अर्धा दिवस असं एकटाक बसून श्री. दादांनी घटना तयार करून दिली. ती रीतसर नोंदण्यासाठी पडेल ते सहाय्य केले. शाळा ताब्यात घेतली होती. परंतु ती संस्थेच्या आधिपत्याखाली यायची होती. एका संस्थेतून दुसऱ्या संस्थेत हस्तांतरित होईपर्यंत श्री. दादा स्वस्थ नव्हते. आपल्या ओळखीचा लाभ संस्थेस देऊन शाळा हस्तांतरित करण्यासाठी जे जे सारे आवश्यक ते त्यानीं केले.

माझ्या शिकवण्या संदर्भात ते समाधानी होते. पण प्रशाला चालकत्वा संदर्भात किंचित अस्वस्थ होते. याला कारण माझा चंचल स्वभाव ! पण पंधरा दिवसातून एकदा चौकशी व्हायची. मी काय करतो. सहशिक्षकांना कसे सांभाळतो हे दुरून पण बारकाईने पाहायचे. कै. दामूअण्णांना तर मी सतत शंका विचारी. श्री. दादा तिथ भेटत. चौकशी करीत. मार्गदर्शन करीत. नवीन पुस्तकं कोणती घ्यावीत, कां घ्यावीत हे सांगत.

ग्रंथालय समृद्ध हवं. शिक्षकाना केव्हाही संदर्भ उपलब्ध व्हायला हवेत. यावर त्यांचा कटाक्ष असे. आजही आहे. त्यामुळे त्यांच्याशी चर्चा करताना नेहमी दडपण यायचे. पण आपल्या ज्ञानाचा गर्व नसणारा हा वाटाड्या नेहमी लहानग्या भावाला बोट धरून चालवायला घेऊन जाणाऱ्याप्रमाणे भासत राहिला.

अफाट वाचन, तल्लख स्मरणशक्ती वाचलेली अवतरणे योग्यरीतीने वापरण्याची हातोटी. दुसऱ्याला कांही तरी भरघोस दिलं पाहिजे, देत राहिलं पाहिजे अशी वृत्ती असल्याने श्री. दादांच्या सान्निध्यात त्यांच्याशी सुसंवाद करताना एक आनंद असतो. आदरयुक्त भीती असते. आपण किती तोकडे वाचन केलंय याचं प्रत्यंतर नेहमी येतेच.

अशा या उत्तुंग व्यक्तिमत्वानं पहिली चार वर्षे शैक्षणिक क्षेत्रात येणाऱ्या अडचणी कशा निवाराव्यात याचं सढळ हाताने दान केलं, मुलांवर काय, कसे संस्कार केले जातात याकडे लक्ष पुरवलं. त्यामुळें शाळेला नाव मिळत गेले. माझी पाठ थोपटत ते प्रोत्साहन देत राहिले.

एका प्रसंगी मी शाळा सोडून परत आलो. सार्वत्रिक निवडणूक संदर्भात गदारोळ माजला असतां त्यांनी माझं डोकं जसं शांत केलं, तसंच संस्थेच्या चालकांना गोड पण योग्य शब्दात समज दिली. परिणाम असा झाला की, त्या दिवसापासून मला पूर्ण स्वातंत्र्य मिळालं. मी कांहीतरी करतोय याची कल्पना असल्यानेच श्री. दादा माझ्या पाठीशी उभे राहिले. भावनेच्या भरात मी कांहीतरी निर्णय घेईन याची त्यांना कल्पना असावी म्हणून तर ती घटना घडताच लगेच त्यांनी संस्था चालकांना समज दिली, मला समजावून सांगितले, माझं डोकं शांत केलं.

श्री. दादा असे वाटाडे म्हणून उभे राहिले नसते तर मी अकोळ सोडून अन्य ठिकाणी गेलो असतो, अन् जीवनांत जे मिळाले त्यापासून वंचित राहिलो असतो. मला माझ्या जीवनांत असा वाटाड्या मिळाला म्हणून तर काहीतरी करता आले.

कासवीप्रमाणे श्री. दादा दूर राहून प्रेमाचा वर्षाव करतात, गुणांना प्रोत्साहन देतात, दुर्गुणांना हळुवारपणे दूर सारतात. वाटचालीस हातभार लावतात.

`माझ्या शैक्षणिक वाटचालीत ते वाटाडे झाले यशाच्या वाट्यांत, मागे राहून भर कशी पडेल हे पाहात राहिले. आता अध्यात्मिक दृष्टीन मार्गदर्शक होताहेत. श्री दत्तात्रेयाचा अंश असणारे श्री. दादा असे माझे वाटाडे नाहीत तर अन्य कोण आहेत असं मी मानूं ?

## दादा नाईक - एक असामान्य व्यक्ती

*रत्नाकर दुसाने, अमरावती.*

मनुष्याच्या जीवनात अशा काही गोष्टी घडतात की, त्यामुळे मनुष्य बेचैन होतो. त्याची काहीही चूक नसताना त्याच्यावर निष्कारण आरोप केला जातो. एकदा मलाही असाच कटु अनुभव आला. त्यावेळी दैवयोगाने माझी परमपूज्य दादांशी भेट झाली. त्यावेळी त्यांनी मी काय करावे ते सांगितले. उपाय सुचविला. त्यामुळे मी त्या अत्यंत क्लेशदायी अडचणीतून मुक्त झालो.

त्यानंतर एका बाबतीत मी भविष्य विचारले. त्यांनी सांगितलेले भविष्य तंतोतंत खरे ठरले. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांनी त्यावेळी माझ्या जीवनात घडलेल्या अनेक गोष्टी सांगितल्या. अनेक सत्य घटना सांगितल्या. त्यामुळे मी आश्चर्यचकित झालो.

त्यानंतर एकदा त्यांनी नुसत्या संख्यांवरून माझी जन्म-कुंडली मांडून दाखविली.

यावरून परमपूज्य दादांना दैवीशक्ती ज्ञात आहे व परमपूज्य दादा ही सामान्य व्यक्ती नसून भूत - भविष्य जाणणारी असामान्य व्यक्ती आहे याची मला प्रचीती आली.

# तीर्थस्वरूप दादांची साधना

*प्रा. शशिकांत कुलकर्णी, कोल्हापूर.*

ती. दादा नाईक ही एक व्यक्ती नाही तर ती एक संस्था आहे. तिच्या कार्याचे अनंत पैलू आहेत. जगप्रसिद्ध अजिंठा लेण्यातील बुद्ध मूर्तीचे वैशिष्ट्य असे सांगतात की, वेगवेगळ्या अंगाने तिचे दर्शन घेतले तर तिचा भाव वेगवेगळा दिसतो. समोरून शांत मुद्रा धारण करणारी मूर्ती डाव्या बाजूने स्मितहास्य करीत असलेली दिसते तर उजव्या बाजूने तिची क्रोधमुद्रा प्रकट होते. नेमकी हीच गोष्ट दादांच्या बाबतीत आहे. ती. दादांचे व्यक्तित्व अत्यंत लवचिक आहे. त्यामुळे त्यांना एका साच्यात बद्ध करता येत नाही ! किंबहुना त्यांचे वर्णन करताना संभ्रमच निर्माण होतो.

चांगदेवाला ज्ञानेश्वरांना पत्र लिहायचे होते. पण ज्ञानेश्वरांना मायना काय लिहायचा याची निश्चिती चांगदेवास करता आली नाही. म्हणून त्याने कोरेच पत्र ज्ञानेश्वराकडे पाठविले. ती. दादांच्या बाबतीत आपली स्थिती अशीच कोरी आहे. कारण ते वयाने ज्येष्ठ आहेत. ज्ञानाने श्रेष्ठ आहेत. वाचनाने प्रकाण्डपंडित आहेत तर विविध विषय ज्ञानाच्या बाबतीत अमाप आहेत —

लहान मुलांना जादूच्या पुस्तकात जादूचा एक आरसा दिसतो. त्या आरशात त्यांना जगातील कोणतीही गोष्ट दिसते. आपले कोणतेही रूप दिसते. तसेच ती. दादांमध्ये प्रत्येकाला आपल्याच व्यक्तित्वाचे दर्शन होते. किंबहुना अशा दर्शनाचा साक्षात्कार, त्याची साधना यांची मूर्तिमंत संस्था म्हणजे ती. दादा होत !

आजकाल प्रत्येक मानवाचे जीवन अनेक प्रलोभनांनी ग्रासलेले आहे. त्यांच्या प्राप्तीसाठी प्रत्येकजण सर्व शक्तीनिशी प्रयत्न करीत असतो. या प्रयत्नांमुळे त्याला काही प्रलोभनांची प्राप्ती होते. पण त्यामुळे त्याचे समाधान होत नाही. उलट नवनवीन प्रलोभनांचे त्याला आकर्षण होते. याचा अर्थ प्रलोभनांमुळे माणसाची स्थिती पुढे गाजर बांधलेल्या गाढवासारखी होते. या सर्वांची निष्पत्ती एकच. ती म्हणजे नैराश्य ! त्यामुळे मनुष्याचे व्यक्तिमत्व विस्कटते. त्याच्या जीवनाची दिशा हरवते, माणूस ' हॅम्लेट 'बनतो ! अशा माणसाला स्वस्थचित्त करणे, त्याच्या जीवनाला निश्चित दिशा देणे हे धीरोदात्त नायकाचे काम ती. दादा करतात. किंबहुना ती. दादांच्या साधनेचे - साक्षात्काराचे हेच मर्म आहे !

ती. दादांच्या ठायी तीन गोष्टींचा सुरेख संगम झालेला आहे. ते अध्यात्माचे प्रवक्ते आहेत. ते विज्ञाननिष्ठ आहेत आणि व्यवहाराला चोख आहेत.

अध्यात्मामध्ये प्राचीन काळापासून मानवाने विकसित केलेला ज्ञानाचा संचय असतो. यामध्ये तत्वज्ञान, कर्मकांड, संस्कृती इत्यादींचा समावेश असतो. या सर्वांना

जीवनासाठी राबविण्यामध्ये ती. दादांचा हातखंडा आहे. विज्ञानाचे स्वरूप आधुनिक आहे. त्यामध्ये वस्तुनिष्ठता, अचूकता, तटस्थता इत्यादींचा समावेश असतो. विज्ञानामुळे जीवनाला वास्तवतेची चौकट लाभते. ती. दादांमध्ये जीवनाला डोळस दृष्टी देण्याची चतुराई आहे. व्यवहाराचे स्वरूप प्रत्यक्ष असते. त्याच्याशी मुकाबला केल्याशिवाय कोणालाही पुढे जाता येत नाही. पुढे पाऊल टाकता येत नाही. ती. दादांमध्ये व्यवहाराला वेठीस धरण्याचा दमदारपणा आहे.

अशाप्रकारे अध्यात्मातील सांप्रदायिकता, विज्ञानातील निर्जीवता आणि व्यवहारातील रूक्षता यांना जिवंत आणि व्यक्तिगत बनविण्याचे कार्य ती. दादांनी आपल्या जीवनात अथकपणे केलेले आहे आणि याच ' प्रसादा ' चे वाटप ते सर्वांना अव्याहतपणे करीत असतात.

• • •

१ रुपाली
पुणे - ४
२३ मे १९७९

धोंडोपंत

आपल्या मातोश्रींच्या निधनाचे वृत्त ऐकून खेद झाला. त्यांचे वय खूप झाले होते, हे खरे पण मृत्यू ही खूप उतारवयात सुटकेसारखी येणारी घटना असली तरी आई गेली हा विचार मनाला कुठल्याही वयात पोरकेपणा वाटायला लावणाराच असतो. त्या दुःखाची तीव्रता त्यालाच जाणवणार.

त्यांना दीर्घायुष्य लाभले होते आणि मुलांनी आणि नातवंडांनी स्वकर्तृत्वाने संसार उभे केलेले त्यांना पाहायला मिळाले हेच समाधान मानायचे.

तुमचा
पु. ल. देशपांडे

---

१ रुपाली,
पुणे - ४
२१-४-८१

प्रिय धोंडोपंत,

आपल्या पत्नीच्या निधनाचे वृत्त वाचून खेद झाला. आयुष्यातल्या चढउतारात संगत केलेली जोडीदारीण काळाच्या पडद्याआड जाणे हे आपल्या जीवनाचाच एक भाग नाहीसा होण्यासारखे असते. आपण सुज्ञ आहात. विचारवंत आहात. उत्तम ग्रंथांच्या चिंतन मननाने जीवनातली सुखदुःखे अलिप्तपणाने स्वीकारीत जाण्याच्या आपल्या वृत्तीच पोषण झालेले आहे. अशावेळी माझ्या सारख्याने सांत्वनाचे शब्द काय लिहावे ? देणाऱ्यानेच नेणाऱ्याचेही हक्क स्वतःपाशी ठेवलेले आहेत. तिथे कोण काय बोलणार ?

तुमचा,

पु. ल. देशपांडे

१, रुपाली
पुणे - ४.
१८-९-८४.

प्रिय धोंडोपंत

तुम्ही पाठविलेल्या सरोजिनी नायडूंच्या सुंदर कविता मिळाल्या. मनःपूर्वक धन्यवाद. अनेक वर्षांपूर्वी त्यांच्या कविता वाचल्या होत्या. त्यांच अप्रतिम भाषणही ऐकायचा योग आला होता. नव्या जमान्यांत तुमच्या आमच्या वयाच्या साहित्याविषयी आस्था वाटणाऱ्यांनाच सरोजिनीबाईबद्दल आदर उरलेला आहे. बाकी सर्व 'सर्वम् यस्य वयात् अगात स्मृतिपथम् कालाय तस्मैः नमः' ची आठवण करून देणारंच आहे.

तुमची खुशाली कळावी अशी नेहमी इच्छा असते.

तुमचा
**पु. ल. देशपांडे**

---

पुणे - ४
२०-९-८७.

प्रिय श्रीकांत नाईक,

तुमच पत्र मिळालं. तुम्ही व्यक्त केलेल्या सदिच्छांबद्दल मनःपूर्वक धन्यवाद !

तुम्ही माझे ज्येष्ठ स्नेही श्री. धोंडोपंत नाईक यांचे पुतणे हे वाचून विशेष आनंद झाला. शिक्षण ह्या विषयी तुम्ही मला चिंतनपर पुस्तक लिहिण्याची सूचना केली आहे. खरंतर अशा प्रकारचा ग्रंथ लिहायला तुम्ही धोंडोपंतांच्या मागे लकडा लावला पाहिजे. व्यापार उदीम करूनही त्यांनी ग्रंथांचा संग सोडला नाही. अध्ययन आणि सहज बोलणे तरी उपदेश या रीतीने अध्यापन आयुष्यभर चालू ठेवले.

धोंडोपंतांना माझे सप्रेम नमस्कार सांगावे.

आपला
**पु. ल. देशपांडे**

---

॥श्री ॥

पू. श्री. दादासाहेब तथा डी. एस्. नाईक यांचा व माझा परिचय ५ ।६ वर्षांपूर्वी झाला. त्यानंतर माझा संबंध थोडा आला. त्यांच्या मार्गदर्शनाने मानसिक समाधान मिळाले.

इतरही बऱ्याच बाबतीत त्यांच्या सूचनेप्रमाणे जीवनाच्या अंधारात मार्ग मिळाले. जीवनांत आनंदाची अनुभूती निर्माण झाली. हे जनकल्याण कार्य त्यांनी जातिभेद व भाषावाद बाजूला ठेवून मानवाच्या कल्याणाकरिता कोणतीही अपेक्षा न ठेवता केले. काही वेळेस त्याकरता स्वतःच्या पदरून खर्च केला. त्यांना उदंड आयुष्य लाभो व अशीच जन-कल्याणाची कामें त्यांच्या हातून घडोत ही ईश्वरचरणी प्रार्थना. अशा सत् पुरुषाच्या आठवणी प्रसिद्ध करून आपण महान पुरुषांच्या आठवणींचा कायमस्वरूपी ठेवा निर्माण करीत आहात ही फार आनंदाची गोष्ट आहे

पुरुषोत्तमदास गिंदोडिया
धुळें

आपणाशी थोडाच वेळ भेट झाली. पण त्यानंतर मनांत येणारे वाईट व भलतेसलते विचार बंद झाले.

मन थोडे प्रफुल्लित असते. आपणाशी झालेली भेट ही माझ्या आयुष्यातला अविस्मरणीय प्रसंग आहे.

आपणाशी भेट झाल्यानंतर मनाला फारच शांतता वाटत आहे. विनाकारण मनात येत होते ते बंद आहे.

---

ह. भ. प. श्री दादा यांसी-

आपण पाठविलेले पत्र व हस्तरेषेचे कागद मिळाले. मागील आयुष्याबद्दल त्यांनी जास्ती काही लिहिले नाही. पुढील आयुष्यात यातील काय घडते ते पाहूया. विशेष म्हणजे आम्ही ता. ९ मे ला युरोप अमेरिकेच्या दौऱ्यावर जात आहोत. लंडन व अमेरिकेमध्यें प्रवचनाचे कार्यक्रम होणार आहेत. श्रीमती विमला ठकार यांचे पुस्तक वाचले. खूपच आवडले.

आपल्या सात्विक सहवासाची नेहमीच आठवण होते. संकेश्वर सहवासांत आपण जी आपुलकी व प्रेम दाखवलेत याबद्दल आपला ऋणी आहे.

आपला
बाबामहाराज सातारकर
मुंबई.

जस्टीस व्ही. एस्. कोतवाल
मुंबई.
८-२-८६

आदरणीय श्री. दादासाहेब,

आपला व माझा प्रत्यक्ष परिचय झालेला नाही. परंतु श्री. आप्पासाहेब गानू यांचेमार्फत आपण एकमेकांना परिचित आहोत.

मी कोल्हापूरला दि. २२ व २३ फेब्रुवारी रोजी काही कामानिमित्त येणार आहे. आपली भेट व्हावी अशी इच्छा आहे. आपण अधून मधून कोल्हापूर येथे जात: असे समजले म्हणून आपण जर त्या सुमारास येथे जाणार असल्यास आपल्या भेटीचा योग येईल. तसे आपण मला कळविल्यास बरे होईल. श्री. गानू यांनीच आपला पत्ता दिला आहे व त्याना विचारूनच हे पत्र लिहित आहे. दुसरे काही काम नसले तरी आपणासारख्या थोर गृहस्थांची भेट होऊन सान्निध्यात काही काळ घालवता आल्यास बरे वाटेल.

आपला,
**विजय शिवराम कोतवाल**

---

जस्टीस व्ही. एस्. कोतवाल
मुंबई.
२४-३-८६

प. पू. आदरणीय दादासाहेब,

यांस शि. सा. न.

आपली कोल्हापूंरला भेट झाल्यापासून वेगळेच चैतन्य निर्माण झाले आहे.

श्री परमेश्वराची व त्याचबरोबर मानवतेची सेवा करण्यासाठीच आपल्या सारख्या थोर व्यक्तींचा जन्म असतो. आपले आशीर्वाद आमचेवर असल्यामुळे धन्य वाटते.

परमेश्वराची कृपा व आपले आशीर्वाद सदैव आमचेवर असावेत हीच प्रार्थना.

आपला
**विजय शिवराम कोतवाल**

रामचंद्र गुंडो कुलकर्णी, शिपूरकर
सारंधा प्रकाशन, निपाणी
४-१-१९९१.

स. न. वि. वि.

श्री. धोंडोपंत उर्फ दादा नाईक हे ८१ वे वर्षात पदार्पण करीत आहेत. त्याबद्दल मी त्यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे. त्यांना उत्तम आरोग्य व दीर्घायुष्य लाभो असे इच्छितो. निपाणीतील शिक्षणसंस्थांत त्यांचा मोठा सहभाग आहे.

त्यांचा स्वभाव अत्यंत शांत असून एखाद्याचे गाऱ्हाणे ऐकून घेतील व सौम्य शब्दांत ते आपले विचार सांगतील. ते अजातशत्रू आहेत. सर्वांशी प्रेमळपणाने व आपलेपणाने वागणे हा त्यांचा स्थायीभाव आहे.

त्यांचा माझा परिचय जवळजवळ पन्नास वर्षाचा आहे. माझे वडिलांची ही त्यांना माहिती होती. त्यांनी वेळोवेळी मला मदत करून योग्य सल्ला दिलेला आहे. त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

आपला
**भाऊराव शिप्पूरकर,** निपाणी

---

श्री. प्रभाकर पेंढारकर, मुंबई.
दि. १९-६-८६.

सादर नमस्कार वि. वि.

पाहता पाहता जवळ जवळ एक वर्ष संपले आणि चित्रपट पूर्ण होऊन प्रकाशित झाला. कोल्हापुरात शाहू चित्रमंदिरात चित्र २० तारखेपासून प्रकाशित होत आहे.

चित्रपट निर्मितीत आपण प्रथमपासून मार्गदर्शनासाठी आहात. जेथे जेथे अडचण आली तेथे तेथे आपण ती सोडविण्यासाठी आलात. आता चित्रपट पाहाण्यासाठी आपण यावे ही विनंती.

चित्रपट मुंबईमध्यें सुजाण व रसिक प्रेक्षकांना आवडला आहे. येथे तो व्यावसायिक दृष्ट्याही यशस्वी व्हावा ही इच्छा. पाहू. प्रयत्न करणे आपल्या हाती आहे. आपंले आशीर्वाद असावेत.

कळावे

आपला.
**प्रभाकर पेंढारकर,** मुंबई.

गडहिंग्लज
५, जुलै - ९१.

जीवेत शरदः शतम् ।

ती. स्व. दादांचे सेवेसी-

कृ. सा. न.

येत्या आठ जुलैला तुम्ही ८१ वर्षाचे होत आहात याचा आम्हाला झालेला आनंद शब्दातीत आहे. आजपर्यंत तुम्ही कुटुंबियांना आणि सुहृदांना इतक भरभरून दिलयं की - आम्ही तुम्हाला कांही द्याव अस शिल्लकच ठेवल नाही तुम्ही. तरीसुद्धा आम्ही कांही दिलं तर ते सागरातल्या थेंबान सागराला दिल्यासारखं आहे. आम्ही आज जे उभे आहोत ते- तुमच्या मायेच्या भक्कम आधारावरच !

- विंदा करंदीकरांच्या कवितेतल्या -

‘ देणाऱ्याने देत जावे
घेणाऱ्याने घेत जावे
घेता घेता एक दिवस
देणाऱ्याचे हात घ्यावेत ’

- प्रमाणे जर आम्हाला जीवनांत वागता आल तर किती आनंद होईल. तुमच्याकडे पाहून आम्ही शिकण्याचा प्रयत्न करू. स्वतःच्या सुखाचा विचार गौण मानून दुसऱ्याच्या सुखाचा विचार करणं ही अत्यंत कठीण गोष्ट ! ती तुमच्यासारख्यालाच शक्य होते. बाकी- आमच्या सारखी स्वार्थाने लिडबिडलेली माणसे अधिक.

तुम्ही शतायू झालेलं पाहायला मिळावं यासारखा दुसरा आनंद नाही. तशी परमेश्वराजवळ अनन्यभावनेनं प्रार्थना !

तुमचे,

राजा, सौ. कुंदा, योगिता,
बंड्या, चिमणी.

॥ श्री गुरवे नमः ॥ बांद्रा (मुंबई)

१९-२-१९८२.

पूज्य गुरुवर्य दादांच्या चरणी, माझे नम्र प्रणाम ।

पत्र लिहिण्याचे मुख्य कारण म्हणजे माझ्या कोल्हापुरातल्या (एस. सी. शिराली) मुक्कामांत माझ्या आवाजाकरिता आपल्या चरणीं प्रार्थना करून, आपण मजकरिता कित्येक हजार जप करून मला प्रसाद पाठविला तो २-३ दिवसामागेच पोहोचला. लगेच उत्तर पाठवू शकलो नाही. याबद्दल क्षमा करावी अशी विनंती आहे. त्या प्रसादाचे आम्ही सर्वांनी सेवन केले असून त्यादिवसापासून माझ्या अंगात एक प्रकारचे चैतन्य आले आहे. हे लिहिण्यास अतिशय आनंद होत आहे.

गेल्या कित्येक महिन्यापासून माझा आवाज बरा नव्हता. त्यामुळे मी अतिशय निराश झालो होतो. परवाच ता. १३ व १४ रोजी आमच्या गानगुरूंची पुण्यतिथी होती. त्यात मलाही माझी हजेरी गानरुपाने द्यावयाची होती. ती देतांना त्यावेळी माझा आवाज खरोखरच असा लागला की कित्येक वर्षांत तसा माझा आवाज लागला नाही व त्यादिवशी गाणं सुंदर जमून सर्व उपस्थित श्रोते खूष झाले. हे सर्व आपण मजकरिंता केलेल्या जपाचाच परिणाम अशी माझी पूर्ण खात्री आहे. हीच कृपा मजवर सदैव असावी व शुभाशीर्वाद पण असावेत अशी प्रार्थना आहे. ह्याबद्दल जो कांही खर्च आला असेल तो मला कळवून उपकृत करावे. ही प्रार्थना करून आपण मजकरिंता घेतलेल्या त्रासाबद्दल मी सदैव ऋणी असून कितीही धन्यवाद पाठविले तरी ते थोडेच. अशीच कृपादृष्टी सदैव आम्हा सर्वांवर असावी ही आपल्या चरणी प्रार्थना.

माझ्या मुलाची आपल्याशी ओळख होऊन त्याला आपल्याबद्दल नितांत श्रद्धा उत्पन्न झाली आहे हे पाहून मला खरोखरच अवर्णनीय आनंद होत आहे. शिवाय अतिशय समाधान व शांती आहे. त्याची मी काय तारीफ करू ? हीं आपल्यासारख्या गुरूंची व श्री परमेश्वराचीच कृपा असल्यामुळें त्याला सर्वदृष्ट्या आपण शुभाशीर्वाद द्यावे हीच माझी आपल्या चरणी प्रेमळ व नम्र प्रार्थना आहे. आम्हा सर्वांचे आपल्या चरणीं साष्टांग प्रणाम.

कोल्हापुरात आल्यावर आपणास जरूर भेटून आपले प्रत्यक्ष शुभाशीर्वाद घेईन. यदाकदाचित आपण मुंबईस येत असल्यास मला कळविणे व आमच्या घरीही येऊन आमचे घर पवित्र करावे ही प्रार्थना आहे. जास्त काय लिहिणार ? आपला क्षेमसमाचार कळवून माझ्यालायक जी आज्ञा असेल ती द्यावयास संकोच करू नये ही विनंती करून पत्र संपवीत आहे.

आपला,

**शुक्ल चंद्रशेखर रा. भट.**

गायक - मुंबई

**B. Shankaranand.**
Minister of Petrolium and
Natural Gas
Govt. of India.

8 Tees January Marg,
New Delhi
October 5, 1991

## DADA AS I SEE HIM

It will not be difficult for any one who has come in close contact with Dada to realise as to why God is conceived in human form. When I think of Dada, I fondly remember his younger brother Late Shri Baburao Naik and Nalavade brothers of Sankeshwar who were instrumental for my initial association with Dada some years ago. I could see in him a very kind hearted elderly figure whose words could enkindle hope in life.

Dada is saintly without saffron robes. He is simple in life and godly in living. Innumerable devotees of his look to him for his kindly lighting the path of their life. He sees in every one, a creation of God for a purposeful life. He is never wanting in his kind words and guidance for any one who approaches him and reposes confidence in him.

Dada is an eminent scholar and a philosopher. His knowledge about life is unfathamable. He is religious in life. Religion for him has been a way of life. His faith in God is not at all shaken by bitter experiences in human life. He takes pleasure in propoagating the message of Almighty to the people by words and deeds and any other media available to him.

We need great people like Dada in the service of humanity which ultimately sustains life, living and religion on this earth

*B. Shankaranand*

## A Great Asset

*K. G. Sattur*

My contact with Shri. Dhondopant Shripadrao Naik was a coincidence. He had come to see my father-in- law who knew him well as an educationist. It was in 1946 or so. Pant was working with Shri. K. M. Giri, a businessman of Belgaum at the time. He was residing with a friend in Maruti Galli and was taking meals at a hotel. One evening he was returning from the hotel and as I saw him I called him for a chat. He preferred to stand in the open, on the street to avail of the cool breeze. So we both stood on the road-side and chatted. Some how we stumbled on philosophy and lost ourselves. Hours tossed on, the night made way to dawn. The cool morning breeze put a pleasant shiver, the Municipal road-sweeper asked us to step aside to let him clean the road under our feet. Night had ended, but not our talk. This discussion was also on occultism and subjects like the souls of the dead troubling the living. In my younger days I had seen cases of persons who were mouth-pieces of the dead, to express their unsatisfied desires, and who were the victims of various sufferings, mental and physical. I have heard a similar case from him. The victim was the wife of a common friend. I heard that she was freed of this trouble due to the help of Mr. Pant. There were cases of persons who suffered mental and physical disorders who sought his help. Some yield and others not. I was shown a number of letters written by those who had obtained releif. I asked Mr. Pant to evolve a logical inference from a study of these cases so that a man of logical or rational thinking can see to what extent a man should accept the remedy suggested therefore as dependable. I do not know if this has been done. I remember also his meeting with an 'AULIA' at Miraj. This entry into field of the easy super-sensory perception, was said to have been made best by his youngest brother who has devoted his entire life to the service of Shri Swami Tembe Maharaj. I was shown the photograph of a person in the group photograph of the disciples of Swami Ramakrishna Paramahamsa, in the book of his "Gospels" as that of this brother in his previous birth. One may or may not beleive. For many a suffering that mortal frame and mind are heir to the usual panacia suggested by Pant "JAPA" which was done by professional priest on payment. There were other remedies like a "SHRAADHA" to be performed at some holy place, to appease the souls of the dead. The proof of the pudding is in the eating thereof.

Most men suffer in this world at some time or the other. The remedy is human effort coupled with prayer to the Almighty according to many. Pant had a large share of this suffering, beginning with the financial crisis during his student days. It is said that he thought he claims that his knowledge of

Sanskrit is not adequate he has gathered much of that is of importance in the books in that language. He has interest in PURANAS particularly the NAVA NATH PURANA, which he read out to his mother.
Whatever the language his study is critical, after about seventy years he can quote with authority Shakespeare and other English authors. I feel that his leaving the field of education has been a great loss to it, but who can say whether his present work is more useful to all who know him. One goes the way the hand of Destiny guides him.

He has a rare sense of humour. To a conceited custom who enquired "Have you any PAAYARI?" he replied, "Why it is below your feet." the customer wanted mangoes.

I purchased a car through him for my brother, who was then using a bicycle. He passed it on to me as it had no use for him, when he had the car. As I had a bicycle of my own I gave it to Pant and did not accept any money for it. He said that if that be the policy, he would come when a new car was purchased to receive the present car.

He had to pursue his college education on a scanty allowance of Rs. 5 per month in Kolhapur where, he had a life of luxury, before the crisis of his father's business. Tenacity of purpose has been his hall mark all along. With the enthusiasm of a pioneer he started a high school. which I belive was the first in his town. As was common in those days, differences arose and he left the school in which he had poured his soul. But the important thing is that he never expressed regret for what he had lost. He started life ancw. This detachment of mind is enviable, for want of which many a man flouders through life. Death has struck his family untimely at times and I have admired the man facing it with courage. His answer to this strength was the grace of the Swami Maharaj and the invincible faith he has in him. that he knows what the suffering is and what the releif is and when it should come. Surrender or resignation to His will is all he has to do. The rest is the look out of Swami Maharaj.

Shri Dhondopant is another name for Friendship. He has friends both young and old. They come from many walks of life. Eminent Doctors, educationists, musicians and cinema stars and men of letters, professors and Vice Chancellors, politicians, Diwans and Goverment officials, contractors and businessmen are among his friends. He has a knack of making and holdieng friends. The secret appears to be his policy of using the good will of one for the benefit of another. He has helped many a friend to get out of tight corners by his obliging nature. He is shrewed and has a good judgement of human nature and knows what is right to do in a difficult situation. I remeber his advice to me that thefoetus which obstructs the delivery should be cut to save the mother. I stuck to duty against goodwill of friends and relatives.

He does not lose his balance of mind in the most difficult situations. On the 30 th of January 1948 as we came out of the Municipal Office at Nippani we heard the tragic death of the father of the nation at the hands of an assasin and within a short time all shops and hotels etc. were closed. Buses stopped running. We were to leave for Belgaum the same night or early next morning, but were held up for want of conveyance. We could not get food from hotels and a common friend invited us to take food with him. But when we reached his house it was in a turmoil due to the stone throwing by anti Brahmin elements. We returned without food and in the evening his friend was returning to Belgaum from Bombay as the markets were closed. He stopped at a petrol bunk to get it but it was not available. We explained out predicament of being stranded indefinitely and wanted to reach Belgaum at any cost as early as may be. Hardly had we gone a furlong or two a mob of about 15-20 persons, dead drunk, stopped our car, dragged us out tried to verify if we were brahmins, and hit me in the head with a cudgel. The Sola topee I was wearing made a big noise and one of the mob who was still on his senses thought that I was killed and persuaded the mob to leave us and go to the town. Without petrol we were sure of being stranded some where on the road, and next mob may complete the attack and finish us. It was the cool headed decision of Pant that we should proceed and try for petrol at every bunk, as perhaps we may get it and reach home, as otherwise we were sure to meet death at the hands of another mad mob out to revenge the death of the Mahatma. We were lucky and got petrol through his influence and reached Belgaum, but as there was curfew we had to get the assistance of Home Guards to reach home.

He has a strong commonsense which is not so common. He is rarely sentimental. But at the same time he is sympathetic to the sufferer and does his best to releive it. He is meticulous in observing customs and manners with dignity and propriety, respects knowledge in others and pricks the baloon of the conceited. Dispassionately he takes a decision and carries it out mercilessly like a surgeon who cuts to cure.

I value my association with his as a great asset in life.

## DADA : DEDICATED AFFECTONATE DIVINE ASSET

*N. S. Bidi*

SHRI DHONDOPANT NAIK Affectionately and popularly known as DADA has been having close links with BIDI family over the past 50 years. My father who inducted Dada into our family fold had great respect and

affection for Dada. Their association in the field of education blossemed into close family relations and since then Dada has been a familiar figure in our house- hold. As the years roled by we got an insight into the great personality of Dada. He has Human qualities with Super human powers. He has been an institution by himself combining in him interests in different arts Educations. Music Drama & Astrology. He has wonderful knowledge acquired through study and application in the field of Music, Astrology Drama and educational pursuits.

The greatest thing about him are his mild and affectionate manners and interest in other's welfare. He is bestowed with Inctuitive Powers and spiritual knowledge, His knowledge and study about occult sciences and specially in Astrology has made him a person with varied interests. He has been a guiding force to our family members specially to me and my wife Nanda. He has been constantly a driving force for all our actions. His super human super powers have guided us well all through our lives. His towering personality with super powers has been showering blessing's on our family members over the last 40 years.

With great Reverence, Affection and Pleasure we pray Almighty to let Dada have peaceful time in the Evening of his life let God shower blessings on him and make him rich in Health & peace .

## PRANAMAS TO A LEARNED GURU

*Nakate Vithal Rao, Adoni.*

The Calm and serene atmosphere in the house makes the visitor feel that he is in a Ashram of a Rishi. There yonder in the hermitage, in corner, leaning over a pillow placed adjacent to a wall appears the revered octogenerain on a mat squatted, who invites his guest with a smile and asks him to sit. There is a pause. The visitor tells the house owner his personal grievences and expresses his desire to seek the Blessings of the saint. " Well, write 9 different numbers within 50 on this paper here" and stealthily a paper is put. The 9 numbers are written by the visitor. In a minute or two the saint draws the Kundali. The problem is tackled and the remedy is advised. The visitor goes away with a sigh of sure relief. The great saint is none other than Sri Dhondo Shripadarao Naik or Shri. Dada Naik who is affectionately addressed as Sri.Dada.

Sri Dada's stature is like that of Himalayan Mountains in the field of learning with the sacre river Ganga slashing waves of knowldge on different subjects, from magic to music the cure for a roga, the explanation of yoga, to geeth to the explanation of Bhagavadgeetha the songs celestial.

I feel myself as fortunate to have come in contact with Sri Dada in 1971 and have very often experienced His Grace of Learning all these 20 years. The depth of his learning coupled with his remarkable memory and his past profession as an ideal teacher and a capable Head Master make him feel at ease in driving his subject to the core of the heart of every listener. He is a poet in Marathi & English a good artist, a singer of Hindustani music an orator of class, a Philosopher, a debator, a sooth sayer, and what not and yet all sacredly bundled in him in very appropriate proportions and above all these virtues he is a compassionate and real Guru to those who intends to seek knowledge.

Sri Dada is the follower of Sri Dattatreya cult of sky in which the saints like Sripad Sri Vallabh and Sri Tembe Maharaj shine like Sun and Moon. My Guru Sri Vaman D. Gulvani Maharaj is the direct Sishya of Tembe Maharaj. Perhaps this divine aspect of link has brought me closer to Sri Dada. He is an authority on yoga. I had also the fortune to spend 7 to 10 hours piously at a stretch near his feet on number of occassions.

Sri Dada B.A.S.T.C. of the old clan is also the torch bearer of many educational institutions in and around Belgaum District of Karnataka State. His countless disciples and students who are now in different walks of their lives are spread over not only in the four corners of our country but also abroad. A Guru to the seekers of truth, a Good teacher for the taught a pious friend and above all humanist with a practical outlook and a clear cut solution for the most complicated problems. Sri. Dada's literary expressions both in Marathi & English. His quest for knowledge, as he, at his age of 80, still reads the books on different topics, his satires, his jokes have the indelible impressions on my heart which would remain ever green through out my life.

When a person enters his or her 80th year it means that this body has witnessed 1000 full moon light nights in life that have expelled 1000 dark nights of ignorances.

I pray to my Guru Sri Raghavendra Swami and through him His presiding Diety Sri Moola Rama Chandra to shower their Choicest Blessings on this great teacher to enable him to grow from strength to strength in his mental and physical energies and thus allow him to guide the countless seekers of truth.

Now I wish to conclude this respectful article with the following couplets in Hindi.

आप जुग जुग जिएँ होवें हजार साल के ।
हर दिन आप के हो जावें हजार साल के ।
देवें आशीश आप को गुरु व देव मेरे ।
उम्र हो आप की जितने हैं तारें ।

1.May thou live happily for a full 1000 years let each day be of one 1000 full years.

2.May My Guru & God grant you the long life like the countless stars in the sky.

HARI OM TATSAT

# MY REMINISCENCES

*A.G.Pai*

It was in March 1966 that I heard about Shri. Dada Naik from a professional colleague. During our very first meeting my colleague with whom I later developed a strong bond of friendship described, his own experiences with Dada and narrated about Dada's occult powers. He further described the different services rendered by Dada in helping people in resolving their worldly problems. My desire to meet such a person took me to Sankeswar within about a week. My meeting with Dada in the Shrinc room of his residenes lasted for about an hour or so during which he narrated some of the outstanding events in the life of Maharaj Narasinha Saraswati. As I was about to leave for Hubli, where I lived in those days, Dada advised me to utter the name of our kuladevata 108 times evry day after bath and observe fast on consecutive Tuesday.

On my way to Hubli a doubt came in my mind as to whether by following such advice, Dada is trying to bring me under his 'spell'. I had heard that people with Occult powers resort to such methods for their personal gains., Being a little confused I called on a friend at Hubli and narrated all the details of my meeting with Dada. My friend being an 'Archak' or 'Pujari' had experience in such matters he asked me several questions and assured me that there is absolutely nothing wrong in my following Dada's advice . He urged me to follow Dada's advices and assured me that it may do me good.

(subsequentely his friend also met Dada on several occasions)

When I met Dada in March 1966. It was more out of inquisitiveness and not because of any specific personal or professional problem. However, around september 1966 I encountered a tough personal problem of great magnitude. But for Dada's help and guidance in resolving it, I cannot imagine the course my life would have taken, Dada attributed this problem to evil influence and I was shown the proof of what he said in a vivid and clear dream seen by the affected person. It is interesting to note that the affected person was totally ignorant of what Dada told me and had the dream on the second day after Dada told me of the evil influences. The problem got totally resolved under Dada's guidances, after a visit to Narsobawadi where we were

advised to perform "Abhishek" I am gratetful to Dada for his help in relieving this problem as well as his guidence in other matters thereafter.

From 1966 to 1975 subsequently our meetings were inttermittent as I was posted in far off places. I had the privilege of observing from close quarters Dada's occult powers and his service. The solace he gives to the large number of people who constantly knock at his doors with their personal problems, his reanssurance to them and the love that he showrs on them is indeed a great qualitry. May God bless him with good health and many more years of restless service to the needy.

Looking back I cannot dismiss my meeting with Dada 25 years back as a chance occurence and prefer to attributs certain destiny to it. It is not just because of Dada's help in resolving my worldly problems but I consider my meeting as expressing an unfoldment of a new significance to my life. Sooner or later in man's life he will question to purpose of life." Who am I? From where I do come? Why am I here? whither I am going? and so forth Dada has shown me the path .

## An Experience

*A Close Associate.*

My dear Dada,

It was sometime in 1962 when I was unable to take the decision rather I was vascillating to decide whether to change my job from one firm to another. I was wary about future and rather doubtful of the prospects in the present job. During these days of anxiety I had to approach you, being a benefactor and guide of our family, to seek your advice in the matter about the future of my career. You were kind enough to suggest that I and my wife should perform every night consecutively 21 nights shree Venkateshwara stotra at midnight every day without fail. We both regularly and judiciously followed your instructions without a break and on 21 st night that being a Friday, a strange experience occured to us Around 2-00 a.m. on the 21 st night my wife suddenly got up and a fountain of 'Akshada' tricked down her navel which I could collect and which were all spread on our bed. It was indeed a strange experience and I approached you the following day to narrate the incident you said that God Has His own way of blessing the devotees and that I have been blessed with the answer to my problem by this incident. You advised me to seek a change in my career without fear. Thus I shifted to a new firm and then on things went on as per your and God's blessings.

Many such incidents did occur subsequently and they were mostly on friday evenings, and many solutions to the problems did eminate.

## Intense Feelings :

*Nitin Prabhakar Mangalekar*

From a year or so I am a devotee of respected Dada. His thinking path and appropriate guide lines on various fields attracted me and changed into his devotee. One of the heart touching incidence actually made me his devotee.

As a routine I went in the Shri Krishna Saraswati Maharaj temple in Datta Galli, Kolhapur. While performing open-eyes concentration towards one out of the two main pictures of Maharaj, I saw Dada's face instead of the aged face of Maharaj.

After two to three months during discussions with Dada, I told him the above incidence. Surprisingly Dada gave me an appropriate and intellectual explaination as this; when we get intense feelings about certain men, we exprience such incidence.

• • •

# ನೆಲದ ನಕ್ಷತ್ರ

*ಸಂಗಮೇಶ್ವರ ಹೊಸಮಠ*

ಪೂಜ್ಯರಾದ ಶ್ರೀ (ಧೋಂಡೊಪಂತ) ದಾದಾ ನಾಯಿಕ ಅವರ ಎಂಭತ್ತು ವರ್ಷದ ಸಾರ್ಥಕ ಮತ್ತು ಸಫಲ ಜೀವನದ ಶುಭ ಅವಸರದಂದು, ಸಂಕೇಶ್ವರದ ಜನತೆ ಮತ್ತು ಅವರ ಇತರ ಆತ್ಮೀಯರು, ತಮ್ಮ ಗೌರವಾದರಗಳನ್ನು ಸಮರ್ಪಿಸುತ್ತಿರುವುದು ಒಂದು ಅತ್ಯಂತ ಸ್ತುತ್ಯ ಕಾರ್ಯಕ್ರಮ. ಈ ಕಾರ್ಯಕ್ರಮದಲ್ಲಿ ಪಾಲ್ಗೊಳ್ಳುವದು ನನಗೆ ಅತ್ಯಂತ ಹೆಮ್ಮೆಯ ವಿಷಯ. ಅವರು ಕಟ್ಟಿ ಬೆಳೆಸಿದ ಸಂಕೇಶ್ವರದ ಶ್ರೀ ದುರದುಂಡೀಶ್ವರ ಮಾಧ್ಯಮಿಕ ಶಾಲೆಯ ಮುಖ್ಯಾಧ್ಯಾಪಕನಾಗಿ ನೇಮಕಗೊಂಡ ನನ್ನ ಆರಂಭದ ದಿನಗಳಲ್ಲಿ ಅವರ ಪ್ರೇಮ ಮತ್ತು ಮಾರ್ಗದರ್ಶನ ನನಗೆ ಅತ್ಯಮೂಲ್ಯವಾಯಿತು. ಅವರ ಬಗ್ಗೆ ನನಗಿದ್ದ ಗೌರವಾದರಗಳನ್ನು ಶಬ್ದದಲ್ಲಿ ಹಿಡಿದು ಕಟ್ಟುವದು ಕಷ್ಟಸಾಧ್ಯ. ಆದರೂ ಪ್ರಯತ್ನಿಸುತ್ತಿದ್ದೇನೆ.

ಶ್ರೀ ದಾದಾ ಇವರ ಪರಿಚಯ ನನಗೆ ಮೊದಲು ಆದದ್ದು ಸುಮಾರು ಐವತ್ತು ವರ್ಷಗಳ ಹಿಂದೆ, ನನ್ನ ಪರಮ ಮಿತ್ರ ದಿ. ಲಖೋನಾನಾ ಕಿತ್ತೂರ ಇವರ ಮುಖಾಂತರ. ಶ್ರೀ ಲಖೋನಾನಾ ಇವರು ಶ್ರೀ ದಾದಾ ಇವರ ಮಿತ್ರರೂ ಹೌದು. ಅವರ ಮನೆಗೆ ಶ್ರೀ ದಾದಾ ಆಗಾಗ ಬರುತ್ತಿದ್ದರು. ನಾನೂ ಹೆಚ್ಚಾಗಿ ಶ್ರೀ ಲಖೋನಾನಾ ಇವರ ಕೂಡ ಇರುತ್ತಿದ್ದೆ. ಮೊದಲು ನನಗೆ ಶ್ರೀ ದಾದಾ ಇವರ ಪರಿಚಯವಾದದ್ದು ಸಂಕೇಶ್ವರ ಹಾಯಸ್ಕೂಲಿನ ಮುಖ್ಯಾಧ್ಯಾಪಕರೆಂದು. ಮುಂದೆ ಕೆಲವು ದಿವಸಗಳಲ್ಲಿ ಇವರು ಡಾ. ಸಾವನೂರ (ಬೆಳಗಾವಿಯ ಆಗಿನ ಪ್ರಸಿದ್ಧ ಡಾಕ್ಟರರು) ಇವರು ಬರೆದಿಟ್ಟ ಟಿಪ್ಪಣೆಗಳ ಸಹಾಯದಿಂದ ಒಂದು ವೈದ್ಯಕೀಯ ಪುಸ್ತಕವನ್ನು ಬರೆಯುತ್ತಿರುವವರೆಂದು ತಿಳಿಯಿತು. ನಂತರ ಆ ಪುಸ್ತಕವನ್ನು ತಾವೇ ಟಾಯಿಪಮಾಡುತ್ತಿರುವ ವಿಷಯ ತಿಳಿಯಿತು. ಮತ್ತೆ ಕೆಲ ಸಮಯದನಂತರ ಎರಡನೆಯ ಮಹಾ ಯುದ್ಧದ ಸಮಯದಲ್ಲಿ ದಕ್ಷಿಣ ಭಾರತದಲ್ಲಿಯ ಸಂಸ್ಥಾನಗಳಿಗೆ (ಆಗ ಇನ್ನೂ ಚಿಕ್ಕ ಸಂಸ್ಥಾನಗಳಿದ್ದವು) ಆಹಾರಧಾನ್ಯ ಮತ್ತು ಇತರ ಪಡಿತರ ವಸ್ತುಗಳನ್ನು ಪೂರೈಸುವ ಕೆಲಸವನ್ನು ಬೆಳಗಾಂವಿಯ ಶ್ರೀ ಗಿರಿಯವರು ಪಡೆದಿದ್ದರು. ಅವರಿಗೆ ಆ ಬೃಹತ್ ಯೋಜನೆಯುನ್ನು ಸಮರ್ಥವಾಗಿ ನಿರ್ವಹಿಸಬಲ್ಲ ಬಹುಮುಖಪ್ರತಿಭೆಯ ಒಬ್ಬ ದಕ್ಷರ ಅವಶ್ಯಕತೆಯಿತ್ತು. ಅವರ ಕಣ್ಣು ಸಹಜವಾಗಿ ಶ್ರೀ ದಾದಾ ಇವರ ಮೇಲೆ ಬಿತ್ತು. ಶ್ರೀ ದಾದಾ ಇವರ ವ್ಯವಹಾರ ಕುಶಲತೆ ದಕ್ಷ ಆಡಳಿತ ಇವುಗಳಿಂದ ಆ ಯೋಜನೆಯ ವ್ಯಾಪ್ತಿ ಬೆಳೆಯತೊಡಗಿತು. ಚಿಕ್ಕ ಸಂಸ್ಥಾನಗಳು ತಮಗೆ ಬೇಕಾದ ಪಡಿತರ ವಸ್ತುಗಳ ಹಂಚಿಕೆಯು ಇವರಿಂದ ಸಮಾಧಾನಕಾರಕವಾಗಿ ಆಗುತ್ತಿರುವದೆಂದು ಸರಕಾರಕ್ಕೆ ವರದಿ ಮಾಡಿದರು. ಸರಕಾರಿ ಅಧಿಕಾರಿಗಳೂ ಇವರ

ಕಾರ್ಯ ವೈಖರಿಯನ್ನು ಮೆಚ್ಚಿದರು. ಇದರಿಂದಾಗಿ ಇವರ ಕಾರ್ಯಕ್ಷೇತ್ರ ಇನ್ನೂ ಬೆಳೆಯಿತು. ಈ ಕಾರ್ಯದಲ್ಲಿ ಶ್ರೀ ದಾದಾ ಇವರು ತಮ್ಮನ್ನಷ್ಟೇ ಅಲ್ಲದೆ ತಮ್ಮ ಎಲ್ಲ ತಮ್ಮಂದಿರನ್ನೂ, ಸಾಲದುದಕ್ಕೆ ತಮ್ಮ ವಿದ್ಯಾರ್ಥಿಗಳ ನೆರವನ್ನೂ ಪಡೆದು ಧಾನ್ಯದ ಪೂರೈಕೆಯನ್ನೂ ಎಲ್ಲರಿಗೂ ಸಮಾಧಾನವಾಗುವಂತೆ ನಿರ್ವಹಿಸಿದರು. ಲೆಖ್ಖಪತ್ರವು ಅಷ್ಟೇ ಚೊಕ್ಕಾಗಿತ್ತು. ಆದರೆ ದ್ವಿತೀಯ ಮಹಾಯುದ್ಧ ಮುಗಿಯುತ್ತಲೇ ಈ ಪಡಿತರ ವಸ್ತುಗಳ ಹಂಚಿಕೆಯ ಕಾರ್ಯ ಮುಕ್ತಾಯಗೊಂಡಿತು. ಶ್ರೀದಾದಾ ಇವರು ಅತ್ಯಂತ ಪರಿಶ್ರಮದಿಂದ ಬೆಳೆಸಿದ ಈ ವ್ಯವಸ್ಥೆಯು ಅನ್ಯವ್ಯವಹಾರದೊಂದಿಗೆ ಮುಂದುವರಿಯಬಹುದಿತ್ತು. ಆದರೆ ಕಾರಣಾಂತರದಿಂದ ಅದು ಮುಂದುವರಿಯಲಿಲ್ಲ. ಹೀಗೆ ಕಣ್ಣು ಮುಚ್ಚಿತೆಗೆಯುವದರೊಳಗಾಗಿ ಒಂದು ಕೆಲಸದಿಂದ ತೀರಾಭಿನ್ನವಾದ ಮತ್ತೊಂದು ಕೆಲಸವನ್ನು ಕೈಕೊಂಡು ಅದನ್ನು ಎಲ್ಲರೂ ಮೆಚ್ಚುವಂತೆ ಮಾಡುವದು ತೀರಾ ದುಸ್ತರವಾದುದು. ಇದು ಸಾಮಾನ್ಯರ ಕಲ್ಪನಾಶಕ್ತಿಗೂ ಮೀರಿದ್ದು. ಆದರೆ ಶ್ರೀ ದಾದಾ ಇವರು ಮುಖ್ಯಾಧ್ಯಾಪಕವೃತ್ತಿಯನ್ನಾಗಲೀ, ವೈದ್ಯಕೀಯ ಪುಸ್ತಕವನ್ನು ಬರೆಯುವದಾಗಲೀ, ಅಥವಾ ಅದನ್ನು ಟಾಯಿಪ ಮಾಡುವದಾಗಲೀ, ಇಲ್ಲವೇ ಪಡಿತರ ವಸ್ತುಗಳ ಹಂಚಿಕೆಯ ಆಡಳಿತಕಾರ್ಯವನ್ನಾಗಲೀ, ಇಂಥ ಹಲವಾರು ಒಂದಕ್ಕೊಂದು ತೀರಾ ವಿಭಿನ್ನವಾದ ಕಾರ್ಯಗಳನ್ನು ಕೈಗೆತ್ತಿಕೊಂಡು, ಅವನ್ನು ಎಲ್ಲರೂ ಮೆಚ್ಚುವಂತೆ ನಿರ್ವಹಿಸಿ, ಅಷ್ಟೇ ಸಹಜವಾಗಿ, ಎಲ್ಲರಿಗೂ ಅಚ್ಚರಿಯಾಗುವಂತೆ ಆ ಕೆಲಸದಿಂದ ಮುಕ್ತರಾಗಿದ್ದಾರೆ. ಇದು ಎಷ್ಟು ಜನರಿಗೆ ಸಾಧ್ಯ? ಶ್ರೀ ದಾದಾ ಇವರಿಗೆ ತಾವು ಕೈಗೆತ್ತಿಕೊಂಡ ಯಾವದೇ ಕಾರ್ಯವಿರಲಿ ಅದು A-1 ಆದಾಗಲೇ ಸಮಾಧಾನ. ಯಾವದೇ ಹೊಸ ಕೆಲಸವನ್ನು ಅವರೆಂದೂ ಅರೆಮನಸ್ಸಿನಿಂದ ಮಾಡಿದವರಲ್ಲ. ಯಾವದೇ ಕೆಲಸವಿರಲಿ ಅದನ್ನು ಆಹ್ವಾನವೆಂದೇ ಸ್ವೀಕರಿಸಿ, ಯುದ್ಧೋಪಾದಿಯಲ್ಲಿ ಅದರ ಯೋಜನೆ ತಯಾರಿಸಿ, ಅದಕ್ಕೆ ಸಂಪೂರ್ಣವಾಗಿ ತಮ್ಮನ್ನು ಅರ್ಪಿಸಿಕೊಳ್ಳುತ್ತಾರೆ. ಇಂಥವರಿಗಲ್ಲದೇ ಮತ್ತಾರಿಗೆ ಹೋಗಬೇಕು ಗೆಲುವು?

ಶ್ರೀ ದಾದಾ ಇವರ ಈ ಬಹುಮುಖ ಪ್ರತಿಭೆಯು ಇತರರಂತೆ ನನಗೂ ಒಂದು ಒಗಟಾಗಿಯೇ ಇದೆ. ಅವರೊಂದು ಜ್ಞಾನಭಂಡಾರ. ಚಲಿಸುವ ಜ್ಞಾನಕೋಶ. ಸಾಹಿತ್ಯ, ಶಿಕ್ಷಣ, ಸಂಗೀತ, ಆರೋಗ್ಯ, ವ್ಯಾಪಾರ, ಆಧ್ಯಾತ್ಮ ಮುಂತಾದ ಹತ್ತಾರು ವಿಷಯದಲ್ಲಿ, ಅವರು ಅಧಿಕಾರವಾಣಿಯಿಂದ ಆಧಾರಸಹಿತವಾಗಿ ಪ್ರತಿಪಾದಿಸಬಲ್ಲರು. ಸಾಮಾನ್ಯರಿಗೂ ಅರ್ಥವಾಗುವಂತೆ ವಿವರಿಸಬಲ್ಲರು. ಅವರ ಈ ಹಲವಾರು ವಿಷಯಗಳ ಅಗಾಧವಾದ ಜ್ಞಾನಕ್ಕೆ ಕೇಳುವವರು ಮಂತ್ರಮುಗ್ಧರಾಗುತ್ತಾರೆ. ಇಷ್ಟೆಲ್ಲ ಜ್ಞಾನಭಂಡಾರ ಒಬ್ಬನಲ್ಲಿ ಇರಬಹುದೇ ಎಂದು ನಾನೇ ಬೆರಗಾಗಿದ್ದೇನೆ. ಆದರೆ ಯಾವದೇ ವಿಷಯದಲ್ಲಿ ಇವರೆಂದೂ ಮೇಲೆ ಮೇಲೆ ಕೈಯಾಡಿಸಿದವರಲ್ಲ. ತಿಳಿವಿನ ಆಳಕ್ಕೆ ಇಳಿದಾಗಲೇ ಇವರಿಗೆ ತೃಪ್ತಿ. ಜ್ಞಾನಸಾಗರದಲ್ಲಿ ಸ್ವಚ್ಛಂದವಾಗಿ ಈಜಬಲ್ಲ ಇವರು ದಂಡೆಯಲ್ಲಿಯ ಶಂಖಚಿಪ್ಪುಗಳಿಗೆ ಕೈ ಹಾಕಿದವರಲ್ಲ. ಸಾಗರದ ಆಳಕ್ಕೆ ಮುಳುಗಿ ಮುತ್ತು ರತ್ನಗಳಿಗೆ ಕೈಹಾಕುವದು ಇವರ ಸ್ವಭಾವ.

ಶರಣರಂತೆ ಲೋಕಹಿತ ಕಾರ್ಯದಲ್ಲಿ ನಿರತರಾದ ಶ್ರೀ ದಾದಾ ಇವರು ಜನಸಾಮಾನ್ಯರ ಮಧ್ಯದಲ್ಲಿದ್ದರೂ, ಎಲ್ಲರಲ್ಲಿಯೂ ಎದ್ದು ಕಾಣುವ ನೆಲದ ನಕ್ಷತ್ರ. ವಿದ್ಯಾರ್ಥಿಜೀವನದಲ್ಲಿ ಇವರು ಖ್ಯಾತ ಶಿಕ್ಷಣತಜ್ಞರಾದ ದಿ.ಜೆ.ಓ. ನಾಯಿಕ ಇವರೊಂದಿಗೆ ಒಂದೇ ಕೋಣೆಯಲ್ಲಿರುತ್ತಿದ್ದರು. ಇವರಿಬ್ಬರ ನಡುವೆ ಆಗಾಗ ಸ್ಪರ್ಧೆಗಳಾಗುತ್ತಿದ್ದವು. ಅವು ಎಂಥ ಸ್ಪರ್ಧೆ ಗೊತ್ತೇ? ಒಂದು ಪುಸ್ತಕವನ್ನು ಯಾರು ಕಡಿಮೆ ಸಮಯದಲ್ಲಿ ಓದಿಮುಗಿಸುತ್ತಾರೆ? ಯಾರು ಹೆಚ್ಚು ಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ಓದಿ ಮುಗಿಸುತ್ತಾರೆ. ಅವರ ಈ ಸ್ಪರ್ಧೆಯ ಪರಿಣಾಮವಾಗಿ, ಶ್ರೀ ದಾದಾ ಅವರು ಆಗ ಕಂಠಪಾಠ ಮಾಡಿದ್ದನ್ನು, ಈಗಲೂ ನಿರರ್ಗಳವಾಗಿ ಹೇಳುವಾಗ ಕೇಳುವವರಿಗೊಂದು ಆನಂದ. ಶೇಕ್ಸಪಿಯರನ ನಾಟಕಗಳಲ್ಲಿಯ ಅನೇಕ ಅವತರಣಿಕೆಗಳು. ಈಗಲೂ ಅವರ ನಾಲಗೆಯ ತುದಿಯ ಮೇಲೆ ಹೊಸದಾಗಿ ಪ್ರಕಾಶವಾದ ಪುಸ್ತಕವನ್ನು ಎಲ್ಲರಿಗಿಂತ ಮೊದಲು ಓದಿ ಮುಗಿಸುವದು ಇವರ ಹವ್ಯಾಸ. ಹೊಸ ಪುಸ್ತಕವನ್ನು ಕೊಳ್ಳಲು ಇವರು ಯಾವ ತ್ಯಾಗಕ್ಕೂ ಸಿದ್ಧ. ಊಟವನ್ನಾದರೂ ಬಿಟ್ಟಾರು. ಕಾಲೇಜಿನಲ್ಲಿದ್ದಾಗ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳೊಂದಿಗೆ, ಅವುಗಳಿಗೆ ಸಂಬಂಧಿಸಿದ ಪೂರಕ ಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ಮೊದಲೇ ಓದಿ ಮುಗಿಸುತ್ತಿದ್ದರು. ಕ್ಲಾಸಿನಲ್ಲಿ ಪ್ರಾಧ್ಯಾಪಕರು ಅವನ್ನು ಉಲ್ಲೇಖಿಸುವಾಗ ಏನಾದರೂ ವ್ಯತ್ಯಾಸವಾದರೆ, ಇವರು ಕೂಡಲೇ ಎದ್ದು ಅವನ್ನು ತಿದ್ದುತ್ತಿದ್ದರು. ಶ್ರೀ ಜೆ. ಓ. ನಾಯಿಕರಂತೂ ಯಾರಾದರೂ ಪ್ರಾಧ್ಯಾಪಕರು ಗೈರು ಹಾಜರು ಇದ್ದಾಗ ಅವರ ವರ್ಗಗಳನ್ನು ಪ್ರಾಧ್ಯಾಪಕರಂತೆ ತಾವೇ ತಕ್ಕೊಳ್ಳುತ್ತಿದ್ದರು. ಆದರೆ ಶಿಕ್ಷಣದ ನಂತರ ಶ್ರೀ. ಜೆ. ಓ. ಯವರು ಸ್ವತಂತ್ರ ಪಕ್ಷಿಯಂತೆ ಬೇಕಾದಲ್ಲಿ ಹಾರಾಡುವದು ಸಾಧ್ಯವಾಯಿತು. ಆದರೆ ಶ್ರೀ ದಾದಾ ಇವರು ಪಂಜರ ಪಕ್ಷಿ. ಮನೆಯನ್ನು ಮನೆತನದ ಭಾರವನ್ನು ಎತ್ತಿಕೊಂಡೇ ಹಾರಬೇಕಾಗುತ್ತಿತ್ತು. ಇದುವೇ ಇವರ ಪ್ರತಿಭೆಯ ವಿಕಾಸಕ್ಕೆ ಒಂದು ದೊಡ್ಡ ಆತಂಕವಾಯಿತು. ಇಂದಿಗೂ ಅವರು ಇದರಿಂದ ಪೂರ್ಣವಾಗಿ ಮುಕ್ತರಾಗಿಲ್ಲ.

ಆಗಿನ ಕಾಲದಲ್ಲಿ ಇಂಗ್ಲೀಷ ವಿಷಯದೊಂದಿಗೆ, ಬಿ. ಎ. ಆನರ್ಸ ಪದವಿ ಪಡೆದು, ಸಹಜವಾಗಿ ಯಾವದಾದರೊಂದು ನೌಕರಿ ಸೇರುವದಾಗಲೀ ಇಲ್ಲವೇ ಎಮ್. ಎ. ತರಗತಿಗೆ ಮುಂದುವರಿಯುವದಾಗಲೀ ಕ್ರಮ ಪ್ರಾಪ್ತವಾಗಿತ್ತು. ಆದರೆ ವಿಧಿಯ ವೈಚಿತ್ರ್ಯವೊಂದಿದೆ. ವಿಧಿಯು ಅವರನ್ನು ಸಾಹಿತ್ಯಲೋಕದಿಂದ ತಕ್ಕಡಿಯ ಲೋಕಕ್ಕೆ ತಂದು ನಿಲ್ಲಿಸಿತು. ಬಿ. ಎ. ಆಗುತ್ತಲೇ ಮನೆತನದ ಹತ್ತಿಯ ವ್ಯಾಪಾರಕ್ಕೆ ಅಣಿಯಾಗಬೇಕಾಯಿತು. ಇಲ್ಲಿಯೂ ಅವರಿಗೆ ಕಠಿಣತೆ ಕಾದಿತ್ತು. ಈ ಹತ್ತಿಯ ವ್ಯಾಪಾರಕ್ಕಾಗಿ ಅವರು ಗೋಕಾಕ ಸಾಂಗಲಿ ಮಿರಜಗಳಿಗೆ ಸಾಯಕಲ್ ಮೇಲಿಂದ ಹೋಗಿ ಬರುತ್ತಿದ್ದರು. ಇದೇ ಕಾಲಕ್ಕೆ ಸಂಕೇಶ್ವರದಲ್ಲಿ ಆರ್ಯ ಸಮಾಜ ಕೊಲ್ಹಾಪೂರ ಇವರಿಂದ ೧೯೨೯ರಲ್ಲಿ ಪ್ರಾರಂಭವಾದ ಮಾಧ್ಯಮಿಕ ಶಾಲೆಯು ಕುಂಟುತ್ತ ನಡೆದಿತ್ತು. ಕೊಲ್ಹಾಪೂರ ರಾಜಾರಾಮ ಕಾಲೇಜಿನ ಖ್ಯಾತನಾಮ ಪ್ರಾಚಾರ್ಯರಾದ ಡಾ. ಬಾಳಕೃಷ್ಣ ಶರ್ಮಾ ಇವರು ತಮ್ಮ ಶಿಷ್ಯರಾದ ಶ್ರೀ ದಾದಾ ಇವರ ಪ್ರತಿಭೆಯನ್ನು ಅರಿತಿದ್ದು,

ಸಂಕೇಶ್ವರದವರೇ ಆದ ಇವರ ಸೇವೆಯನ್ನು ಪಡೆಯಬಯಸಿದರು. ಆಗ ಮಾಧ್ಯಮಿಕ ಶಾಲೆಯ ಸೇವೆಯೆಂದರೆ ಸೇವೆಯೇ (ನಿಜವಾದ ಅರ್ಥದಲ್ಲಿ) ಸಂಬಳದ ಮಾತಿಲ್ಲ. ತಮ್ಮ ಗುರುಗಳಾದ ಪ್ರಾಚಾರ್ಯ ಬಾಳಕೃಷ್ಣರು ಕೇಳಿದ್ದೇ ತಡ ಇವರು ಶಿರಸಾವಹಿಸಿ ಕಾರ್ಯಕ್ಕೆ ಅಣಿಯಾದರು. ಸ್ಥಳೀಯರಾದ ಶ್ರೀ ದಾದಾ ಇವರು ಶ್ರೀ ದುರದುಂಡೀಶ್ವರ ಲಜಪತರಾಯ (ಇದು ಶಾಲೆಯ ಹಿಂದಿನ ಹೆಸರು) ಮಾಧ್ಯಮಿಕ ಶಾಲೆಯ ಸೂತ್ರವನ್ನು ಕೈಗೆತ್ತಿಕೊಳ್ಳುತ್ತಲೇ, ಆ ಶಾಲೆಯ ರೂಪವೇ ಬದಲಾಯಿತು. ಚಿಕ್ಕ ಶಾಲೆಯಾದರೂ ಶ್ರೀ ದಾದಾ ಇವರ ಪ್ರತಿಭೆ ಮತ್ತು ಪರಿಶ್ರಮದಿಂದ ಅದು ಕೆಲವೇ ದಿನಗಳಲ್ಲಿ ಈ ಭಾಗದ ಒಂದು ಒಳ್ಳೆಯ ಶಾಲೆಯೆಂದು ಪರಿಗಣಿಸಲ್ಪಡುತ್ತಿತ್ತು. ಅವರ ಅಡಳಿತಾವಧಿಯಲ್ಲಿ ಹಣದ ವಿಪರೀತ ಕೊರತೆಯಿದ್ದರೂ, ಇವರು ಬೆಳೆಸಿದ ಗ್ರಂಥಾಲಯ ಮತ್ತು ವಿಜ್ಞಾನ ವಿಭಾಗಗಳು ವಿದ್ಯಾ ಇಲಾಖೆಯ ಮೆಚ್ಚುಗೆಗೆ ಪಾತ್ರವಾದವು. ಮೊದಲಿನಿಂದಲೂ ಓದುವ ಗೀಳು ಹಿಡಿದಿದ್ದ ಇವರು ಗ್ರಂಥಾಲಯಕ್ಕೆ ಉತ್ತಮ ಗ್ರಂಥಗಳನ್ನೂ ಸ್ವಂತ ಆರಿಸುತ್ತಿದ್ದರು. ಗ್ರಂಥಾಲಯ-ದಲ್ಲಿಯ ಎಲ್ಲ ಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ಇವರು ಚೆನ್ನಾಗಿ ಬಲ್ಲರು. ಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ಕೊಳ್ಳುವಾಗ ಇವರಿಗೆ ಭಾಷೆಯ ಭೇದವಿಲ್ಲ. ಇವರ ನಂತರದ ಮುಖ್ಯಾಧ್ಯಾಪಕರೊಬ್ಬರು ಶಾಲೆಯ ಗ್ರಂಥಾಲಯದಲ್ಲಿ ಕನ್ನಡ ಪುಸ್ತಕಗಳ ಕೊರತೆಯಿದೆ. ಅವನ್ನು ಕೊಳ್ಳಬೇಕಾಗಿದೆ ಎಂದು ಸಂಚಾಲಕರಿಗೆ ಸಲಹೆ ಮಾಡಿದರು. ಶ್ರೀ ದಾದಾ ಇವರು ಆಗ ಸಂಚಾಲಕ ಮಂಡಳಿಯಲ್ಲಿದ್ದರು. ಇವರು ಆ ಮುಖ್ಯಾಧ್ಯಾಪಕರಿಗೆ ತಾವು ಕೊಳ್ಳಬಯಸುವ ಪುಸ್ತಕಗಳ ಪಟ್ಟಿಯನ್ನು ತಯಾರಿಸಲು ಹೇಳಿದರು. ಅವರಿಂದ ಬಂದ ಪುಸ್ತಕಗಳ ಪಟ್ಟಿಯನ್ನು ನೋಡಿ, 'ಆ ಪಟ್ಟಿಯಲ್ಲಿಯ ಸುಮಾರು ಪುಸ್ತಕಗಳು ತಮ್ಮಲ್ಲಿ ಇವೆ ನೋಡಿ' ಎಂದು ಸಲಹೆಯಿತ್ತರು. ನಿಜವಾಗಿಯೂ, ಆ ಪಟ್ಟಿಯಲ್ಲಿಯ ಬಹಳಷ್ಟು ಪುಸ್ತಕಗಳು ಶಾಲೆಯಲ್ಲಿ ಇದ್ದವು. ಇದು ಶ್ರೀ ದಾದಾ ಇವರ ಸರ್ವಭಾಷಾ ಪ್ರೇಮಕ್ಕೆ ಮತ್ತು ಅಗಾಧವಾದ ನೆನಪಿನ ಶಕ್ತಿಗೆ ಹಿಡಿದ ಕನ್ನಡಿ.

ಆರ್ಯ ಸಮಾಜ ಕೋಲ್ಹಾಪೂರ ಇವರಿಂದ ಸಂಕೇಶ್ವರದಲ್ಲಿ ಪ್ರಾರಂಭಿಸಲಾದ ಶ್ರೀ ದುರದುಂಡೀಶ್ವರ ಲಜಪತರಾಯ ಮಾಧ್ಯಮಿಕ ಶಾಲೆಗೆ ಅವಶ್ಯವಿದ್ದ ಹಣವನ್ನು ಒದಗಿಸಲು ಸಾಧ್ಯವಾಗಲಿಲ್ಲ. ಆಡಳಿತ ಮಂಡಳಿ ಹೊರಗಿನದಾದುದರಿಂದ ಸ್ಥಳೀಯರಿಂದ ತಕ್ಕ ಪ್ರಮಾಣದ ಸಹಕಾರ ಸಹಾಯ ದೊರೆಯಲಿಲ್ಲ. ಇಂಥ ಪರಿಸ್ಥಿತಿಯಲ್ಲಿ ಸ್ಥಳೀಯ ಜನರ ಸಹಕಾರವಿಲ್ಲದೇ, ಆ ಶಾಲಯು ಬೆಳೆಯಲಾರದೆಂದು ತಿಳಿದು, ಆ ಶಾಲೆಯ ಆಡಳಿತ ಸೂತ್ರವನ್ನು ಸ್ಥಳೀಯರಿಗೆ ಹಸ್ತಾಂತರಿಸುವ ಸಮಗ್ರ ಯೋಜನೆಯನ್ನೂ, ಈ ಹಸ್ತಾಂತರಕ್ಕೆ ಅವಶ್ಯವಿದ್ದ ಸ್ಥಳೀಯ ಶಿಕ್ಷಣ ಸಂಸ್ಥೆಯ ಸ್ಥಾಪನೆಯನ್ನೂ ಕೈಕೊಂಡರು. ಈ ಸ್ಥಳೀಯ ಶಿಕ್ಷಣಸಂಸ್ಥೆಯ ಘಟನೆ ಮತ್ತು ನಿಯಮಾವಳಿಗಳನ್ನು ತಯಾರಿಸಿ, ಈ ಹಸ್ತಾಂತರ ಕಾರ್ಯಕ್ರಮದ ಕೇಂದ್ರ-ಬಿಂದುವಾಗಿ ಎಲ್ಲವನ್ನೂ ವ್ಯವಸ್ಥಿತವಾಗಿ ಪೂರ್ಣಗೊಳಿಸಿದ ಘನತೆ ಇವರದು. ಶ್ರೀ ದಾದಾ ಇವರು ತಮ್ಮ ಮುಖ್ಯಾಧ್ಯಾಪಕ ಸ್ಥಾನಕ್ಕೆ ಅಂಟಿಕೊಂಡಿದ್ದರೆ ಶಾಲೆಯ

ಪ್ರಗತಿ ನಿಧಾನವಾಗುತ್ತಿತ್ತು ನಿಜ. ಆದರೆ ಇವರಿಗೆ ತಮ್ಮ ಸ್ಥಾನ ಗೌಣ. ತಮ್ಮ ಊರ ಶಾಲೆಯ ಉತ್ಕರ್ಷವೇ ಇವರ ಪರಮ ಧ್ಯೇಯ. ಈ ಉತ್ಕರ್ಷ ತಮ್ಮಿಂದಲೇ ಆಗಬೇಕೆಂಬ ಹಟವಿಲ್ಲ. ಇಂಥ ಸ್ವಾರ್ಥತ್ಯಾಗ ಅಪೂರ್ವ. ಎಷ್ಟು ಜನ ತಮ್ಮ ಸ್ಥಾನಕ್ಕಾಗಿ ಸ್ವಾರ್ಥಕ್ಕಾಗಿ ಸಂಸ್ಥೆಗಳನ್ನಷ್ಟೇ ಅಲ್ಲ, ದೇಶಗಳನ್ನೂ ಬಲಿಕೊಟ್ಟಿಲ್ಲ! ಹೀಗೆ ಸಂಕೇಶ್ವರದಲ್ಲಿ ಶ್ರೀ ದುರದುಂಡೀಶ್ವರ ಶಿಕ್ಷಣ ಸಂಸ್ಥೆಯನ್ನು ಸ್ಥಾಪಿಸಿ, ಆರ್ಯ ಸಮಾಜ ಕೋಲ್ಹಾಪೂರ ಇವರ ಆಢಳಿತೆಯಲ್ಲಿದ್ದ ಶಾಲೆಯನ್ನು ಸ್ಥಳೀಯ ಶ್ರೀ ದುರದುಂಡೀಶ್ವರ ಶಿಕ್ಷಣ ಸಂಸ್ಥೆಗೆ ಒಪ್ಪಿಸಿದ ನಂತರವೂ ಶ್ರೀ ದಾದಾ ಇವರ ಸೇವೆ ಮತ್ತು ಅನುಭವ ಹೊಸ ಶಿಕ್ಷಣ ಸಂಸ್ಥೆಗೆ ಅತ್ಯವಶ್ಯಕವಾದುದರಿಂದ ಅವರನ್ನು ಆಡಳಿತ ಮಂಡಳಿಯಲ್ಲಿ ತಕ್ಕೊಳ್ಳಲಾಯಿತು.

೧೯೫೫ರಲ್ಲಿ, ನಾನು ಶ್ರೀ ದುರದುಂಡೀಶ್ವರ ಮಾಧ್ಯಮಿಕ ಶಾಲೆಯ ಮುಖ್ಯಾಧ್ಯಾಪಕನಾಗಿ ನೇಮಕವಾಗುವಾಗ ಶ್ರೀ ದಾದಾ ಇವರು ಆಡಳಿತ ಮಂಡಳಿಯಲ್ಲಿದ್ದರು. ಅವರು ಸಲಹಾಸಮಿತಿಯ ಅಧ್ಯಕ್ಷರಿದ್ದರು. ಕಾರ್ಯಕಾರೀ ಸಮಿತಿಯ ಸದಸ್ಯರು ನನ್ನನ್ನು ಸಂಪರ್ಕಿಸಿ ನನ್ನ ಒಪ್ಪಿಗೆಯನ್ನೂ ಪಡೆದಿದ್ದರು. ಇದನ್ನು ಸಲಹಾ ಸಮಿತಿಯ ಅಧ್ಯಕ್ಷರಿಗ ತಿಳಿಸುವದು ಕ್ರಮ ಪ್ರಾಪ್ತವಾಗಿತ್ತು. ಆದರೆ ಈ ವಿಷಯವನ್ನು ಶ್ರೀ ದಾದಾ ಇವರಿಗೆ ತಿಳಿಸಲಾಗಲಿಲ್ಲ. ಶ್ರೀ ಲಖೂನಾನಾ ಕಿತ್ತೂರರಿಂದ ವಿಷಯ ಶ್ರೀ ದಾದಾ ಇವರಿಗೆ ತಿಳಿದಿತ್ತು. ಶ್ರೀ ದಾದಾ ಇವರಿಗೆ ನನ್ನ ನೇಮಕದ ಬಗ್ಗೆ ವಿರೋಧವೇನೂ ಇರಲಿಲ್ಲ. ಆದರೆ ಯಾವದೇ ಸಂಘದ ಕೆಲಸ, ಸಂಘದ ನಿಯಮಾವಳಿಗಳ ಪ್ರಕಾರ ಆಗಬೇಕೆಂಬುದು ಅವರ ತೀವ್ರ ಇಚ್ಛೆಯಾಗಿತ್ತು.

ಶ್ರೀ ದಾದಾ ಇವರು ಆಡಳಿತ ಮಂಡಳಿಯಲ್ಲಿರಲಿ ಅಥವಾ ಇಲ್ಲದಿರಲಿ ಶಾಲೆಯ ಕೆಲಸವಿದ್ದಾಗ ಅವರಿಗೆ ಕರೆಹೋದಾಗ, ತಮ್ಮ ಎಲ್ಲ ಕೆಲಸಗಳನ್ನು ಬದಿಗಿಟ್ಟು ವೇಳೆಗೆ ಸರಿಯಾಗಿ ಬರುವವರು ಅವರೊಬ್ಬರೇ. ಶಾಲೆಯ ಕಟ್ಟಡದ ನಿಧಿಸಂಗ್ರಹದ ಕಾಲಕ್ಕೆ, ಕಟ್ಟಡದ ಕೆಲಸ ಪ್ರಾರಂಭವಾದಾಗ, ಶ್ರೀ ಸಿದ್ದಗೌಡಾ (ಅಪ್ಪಾಸಾಹೇಬ) ಖಾತದಾರ ಪಾಟೀಲ ಇವರ ಮಮದಾಪೂರದಲ್ಲಿಯ ದೇಣಗಿಕೊಟ್ಟ ಹೊಲವನ್ನು ಮಾರುವಾಗ, ಇಂಥ ಅನೇಕ ಮಹತ್ವದ ಸಮಯದಲ್ಲಿ ಇವರು ಸಕ್ರಿಯವಾಗಿ ಭಾಗವಹಿಸುತ್ತಿದ್ದರು. ಆರಂಭದಲ್ಲಿ ಶಾಲೆಯ ಕಟ್ಟಡದ ಲೆಖ್ಖವನ್ನು ಸಕಾಲದಲ್ಲಿ ಸದಸ್ಯರಿಗೆ ಒಪ್ಪಿಸದ್ದರಿಂದ ಸದಸ್ಯರಲ್ಲಿ ಸ್ವಲ್ಪ ಅಸಮಾಧಾನವುಂಟಾಗಿತ್ತು. ಪ್ರಾರಂಭದಲ್ಲಿ ಈ ಕಟ್ಟಡದ ಲೆಖ್ಖವನ್ನು ಸರಿಯಾಗಿ ಬರೆದಿಡಲಾಗಿರಲಿಲ್ಲ. ಈ ಲೆಖ್ಖವನ್ನು ಪೂರ್ಣಗೊಳಿಸಿ ಸಂಘದ ಸಾಧಾರಣ ಸಭೆಯ ಮುಂದಿಡಲು, ಅವರು ಎಷ್ಟೋ ರಾತ್ರಿ ನಮ್ಮ ಕೂಡ ಕುಳಿತು ಅದನ್ನು ಸಕಾಲದಲ್ಲಿ ಸಾಧಾರಣ ಸಭೆಯ ಮುಂದಿಡಲು ನಮಗೆ ತುಂಬಾ ಸಹಾಯ ಮಾಡಿದರು. ನಾನಾಗಲೀ ಅಥವಾ ಶಾಲೆಯ ಇತರ ಸಿಬ್ಬಂದಿಯವರಾಗಲೀ ಸಂಘದ ನೌಕರರು. ಇವರು ಸಲಹಾಸಮಿತಿಯ ಅಧ್ಯಕ್ಷರು. ಅವರು ನಮಗೆ ಆದೇಶ ಮಾಡಿ ಸುಮ್ಮನೆ ಕೂಡ್ರುವದು ಸಾಧ್ಯವಿತ್ತು. ಆದರೆ ಶ್ರೀದಾದಾ ಇವರು ಸಲಹಾಸಮಿತಿಯ

ಅಧ್ಯಕ್ಷರಿದ್ದರೂ, ಎಲ್ಲ ಸಿಬ್ಬಂದಿಯ ಕೂಡ ತಾವು ಒಂದಾಗಿ ಕೆಲಸ ಮಾಡುವದನ್ನು ನೋಡಿದಾಗ, ನಾವು ಅವರ ಕಾರ್ಯ ವೈಖರಿಗೆ ತಲೆಬಾಗಬೇಕಾಗುತ್ತಿತ್ತು.

ಆಡಳಿತ ಮಂಡಳಿಯ ಎಲ್ಲ ಸದಸ್ಯರಲ್ಲಿ ಶಾಲೆಯ ಎಲ್ಲ ವ್ಯವಹಾರವನ್ನು ಪೂರ್ಣವಾಗಿ ಬಲ್ಲವರೆಂದರೆ ಇವರೊಬ್ಬರೇ. ಅವರಿಗೆ ಸಭೆಯ ಮುಂದೆ ಚರ್ಚೆಗೆ ಬರುವ ಎಲ್ಲ ವಿಷಯಗಳ ಸವಿಸ್ತರ ಮಾಹಿತಿ ಬೇಕಾಗುತ್ತಿತ್ತು. ಇವರಿಗೆ ಯಾವ ವಿಷಯದಲ್ಲೂ ಹಾರುತ್ತರ ನಡೆಯುತ್ತಿರಲಿಲ್ಲ. ಇವರನ್ನು ಸಮಾಧಾನಪಡಿಸುವದು ಕೆಲವೊಮ್ಮೆ ಕಷ್ಟಕರವಾಗುತ್ತಿತ್ತು. ಸಭೆಯ ಮುಂದಿರುವ ಪ್ರತಿಯೊಂದು ವಿಷಯದ ಮಾಹಿತಿ ಅವರ ಅಪೇಕ್ಷೆಯಂತೆ ತಯಾರಿಸುವದು ನನಗೊಂದು ಪರೀಕ್ಷೆಯಾಗಿ ಪರಿಣಮಿಸುತ್ತಿತ್ತು. ಆದರೆ ಇದರಿಂದ ನನಗೆ ಬಹಳ ಲಾಭವಾಗಿದೆ. ಅವರಿಗೆ ಸವಿಸ್ತರ ಮಾಹಿಸಿ ಒದಗಿಸಲು ನಾನು ಚೆನ್ನಾಗಿ ಅಭ್ಯಾಸಮಾಡುವದು ಅವಶ್ಯವಾಗಿತ್ತು. ಅವರು ಆಡಳಿತ ಮಂಡಳಿಯಲ್ಲಿರುವದರಿಂದಲೇ ಎಲ್ಲ ವಿಷಯಗಳ ಸಂಪೂರ್ಣ ಚರ್ಚೆಯಾಗುತ್ತಿತ್ತು. ಶ್ರೀ ದಾದಾ ಅವರು ಇದ್ದ ಮತ್ತು ಇಲ್ಲದ ಸಭೆಗಳನ್ನು ನಾನು ಅನುಭವಿಸಿದ್ದೇನೆ. ಅವರಿಲ್ಲದಾಗ (ಇಂಥ ಪ್ರಸಂಗ ವಿರಳ) ಶ್ರೀ ಅಪ್ಪಣ್ಣ ಗೌಡರು, ಈ ವಿಷಯವನ್ನು ಶ್ರೀ ಧೊಂಡೋಪಂತರೊಂದಿಗೆ ಚರ್ಚಿಸಿದ್ದೀರಾ? ಅವರ ವಿಚಾರವೇನು? ಎಂದು ತಿಳಿಯಬಯಸುತ್ತಿದ್ದರು. ಆಡಳಿತ ಮಂಡಳಿಯ ಸಭೆಯಲ್ಲಿ ಶಾಲೆಯ ಸುಧಾರಣೆಯ ವಿಷಯದಲ್ಲಿ ಶ್ರೀ ದಾದಾ ಇವರ ಮತಕ್ಕೆ ವಿಶೇಷ ಮಹತ್ವವಿತ್ತು. ಅವರಿಂದ ನಾನು ಅನೇಕ ಸಂಗತಿಗಳನ್ನು ಕಲಿತುಕೊಂಡಿದ್ದೇನೆ. ಇದರಿಂದ ಮುಂದೆ ನನಗೆ ಬಹಳ ಅನುಕೂಲವಾಯಿತು.

ಶಿಕ್ಷಕರ ದೈನಂದಿನ ಬೋಧನೆಯಲ್ಲೂ ಇವರ ಮಾರ್ಗದರ್ಶನ ಅಮೂಲ್ಯ-ವಾಗಿರುತ್ತಿತ್ತು. ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳಿಗೆ ಪೂರಕವಾಗಿ ಯಾವ ಆಕರ ಗ್ರಂಥಗಳನ್ನು ಓದಬೇಕು ಯಾವ ಪುಸ್ತಕಗಳು ನಮ್ಮಲ್ಲಿವೆ ಇವುಗಳ ವಿವರ ಅವರ ನಾಲಿಗೆಯ ತುದಿಯ ಮೇಲಿರುತ್ತಿತ್ತು. ಈ ಮಾರ್ಗದರ್ಶನ ಭಾಷಾ ವಿಷಯಕ್ಕೆ ಮಾತ್ರ ಸೀಮಿತವಾಗಿರಲಿಲ್ಲ. ವಿಜ್ಞಾನ ಸಮಾಜ ಶಾಸ್ತ್ರಗಳಲ್ಲಿಯೂ ನಮ್ಮ ಶಾಲೆಯಲ್ಲಿದ್ದ ಶೈಕ್ಷಣಿಕ ಉಪಕರಣಗಳ ಪಟ್ಟಿ ಅವರಿಗೆ ಚೆನ್ನಾಗಿ ಗೊತ್ತು. ಶಿಕ್ಷಕರು ಯಾವದೇ ಸಮಸ್ಯೆಯನ್ನು ಇವರ ಮುಂದಿಟ್ಟರೆ ಇವರಿಗೆ ಎಲ್ಲಿಲ್ಲದ ಉತ್ಸಾಹ. ಇವರಿಗೆ ಶಿಕ್ಷಕರೊಂದಿಗೆ ಚರ್ಚಿಸಲು ತುಂಬಾ ಇಷ್ಟ. ಶಿಕ್ಷಕರ ಸಮಸ್ಯೆಗಳಿಗೆ ಸಮರ್ಪಕವಾದ ಉತ್ತರ ಹುಡುಕಲು ಇವರು ಅನೇಕ ಗ್ರಂಥಗಳನ್ನೂ ಜ್ಞಾನ ಕೋಶಗಳನ್ನೂ ಪರಿಶೀಲಿಸಿ ಉತ್ತರ ಹೇಳುವರು. ನಿತ್ಯದ ಪಾಠಗಳಲ್ಲಿ ಪೌರಾಣಿಕ ಇಲ್ಲವೇ ಐತಿಹಾಸಿಕ ಪ್ರಸಂಗಗಳ ಇಲ್ಲವೇ ಹೆಸರುಗಳ ವಿವರಣೆ ಬೇಕಿದ್ದರೆ, ಇವೆಲ್ಲಕ್ಕೂ ಸಂಬಂಧಿತ ಮೂಲಗಳಿಂದ ವಿವರಗಳನ್ನು ಕಲೆ ಹಾಕಿ ಹೇಳಿದಾಗಲೇ ಅವರಿಗೆ ಸಮಾಧಾನ. ಈಗ ಸರಕಾರದವರು ನೌಕರಿಯಲ್ಲಿಯ ಶಿಕ್ಷಕರಿಗೆ ಅವರ ಭೋಧನೆಯನ್ನು ಸುಧಾರಿಸುವ ಕುರಿತು, ಲಕ್ಷಾವಧಿ ಹಣದ ವೆಚ್ಚದಿಂದ, ಒದಗಿಸಲಾಗುವ Seminars, Workshops, Refresher Courses

ಮುಂತಾದವುಗಳು, ಶ್ರೀದಾದಾ ಇವರಿಂದ ಮೂವತ್ತು ವರ್ಷಗಳ ಹಿಂದೆಯೇ ನಮ್ಮ ಶಿಕ್ಷಕರಿಗೆ ವಿನಾಮೂಲ್ಯ, ಅವರಿದ್ದಲ್ಲಿಯೇ ದೊರೆಯುತ್ತಿದ್ದುದ್ದು ನಮ್ಮ ಶಾಲೆಯ ವೈಶಿಷ್ಟ್ಯ.

ನಮ್ಮ ಶಾಲೆಯ ವಾರ್ಷಿಕ ಸ್ನೇಹ ಸಮ್ಮೇಲನ ಎರಡು ದಿವಸ ನಡೆಯುವದು ಒಂದು ವಿಶೇಷ. ಈ ಸಮ್ಮೇಲನಕ್ಕೆ ಆಗಮಿಸುವ ಮುಖ್ಯ ಆತಿಥಿಗಳು ಸಾಮಾನ್ಯವಾಗಿ ಸಾಹಿತಿಗಳಿರುತ್ತಿದ್ದರು. ಅವರೊಂದಿಗಿನ ಶ್ರೀ ದಾದಾ ಇವರ ಚರ್ಚೆ ನಮಗೆ ಒಂದು ರಸದೂಟವಾಗಿರುತ್ತಿತ್ತು. ಅದೊಂದು ಕಿರಿ ಸಾಹಿತ್ಯ ಸಮ್ಮೇಲನದಂತೆ ನಮಗೆ ಭಾಸವಾಗುತ್ತಿತ್ತು. ಸಾಹಿತ್ಯದ ಹೊಸ ಒಲವು ನಿಲುವುಗಳು ಪ್ರಸ್ತುತ ವರ್ಷದ ಉತ್ತಮ ಸಾಹಿತ್ಯ ಕೃತಿ ಮುಂತಾದವುಗಳ ಸುದೀರ್ಘ ಚರ್ಚೆ ನಡೆಯುತ್ತಿತ್ತು. ಈ ಚರ್ಚೆಯು ಸಹಜವಾದ ಚಹಾಪಾನದ ಮತ್ತು ಊಟದ ಸಮಯದ ಹರಟೆಯಂತೆ ನಡೆಯುತ್ತಿತ್ತೇ ವಿನಃ ಅಲ್ಲಿ ಚರ್ಚೆಯ ಗಾಂಭೀರ್ಯವಿರಲಿಲ್ಲ. ಈ ಸಂದರ್ಭದಲ್ಲಿ ಉಪಸ್ಥಿತರಿದ್ದ ಅನೇಕ ಶಿಕ್ಷಕರಿಗೆ ಹೆಚ್ಚಿನಲಾಭವಾಗಿದೆ. ಅವರಲ್ಲಿ ಅನೇಕರು ಎಮ್. ಎ. ಪಿ.ಎಚ್.ಡಿ. ಪದವಿ ಮುಗಿಸಿದ್ದಾರೆ. ಈ ಚರ್ಚೆಯು ಸಾಹಿತ್ಯ ಮತ್ತು ಶಿಕ್ಷಣ ವಿಷಯಕ್ಕೆ ಸೀಮಿತವಾಗಿರುತ್ತಿತ್ತು. ಈ ಚರ್ಚೆಯಿಂದ ಇದರಲ್ಲಿ ಪಾಲ್ಗೊಳ್ಳುವ ಮುಖ್ಯ ಅತಿಥಿಗಳಿಗೂ ಆನಂದವಾಗುತ್ತಿತ್ತು. ಅನೇಕ ಮುಖ್ಯ ಅತಿಥಿಗಳು ಈ ಚರ್ಚೆಯ ನಂತರ ಶ್ರೀ ದಾದಾ ಇವರ ಆಳವಾದ ಜ್ಞಾನದಬಗ್ಗೆ ಹರ್ಷವನ್ನು ವ್ಯಕ್ತಪಡಿಸಿದ್ದಾರೆ.

ಶ್ರೀ ದಾದಾ ಇವರು ಮೇಲ್ನೋಟಕ್ಕೆ ಒಬ್ಬ ಬಿ. ಎ. ಪದವೀಧರರಂತೆ ಕಂಡರೂ, ಅವರ ನಿರಂತರ ಅಭ್ಯಾಸ ಮನನ ಚಿಂತನಗಳಿಂದ ತೀರ ಎತ್ತರಕ್ಕೆ ಏರಿದ್ದಾರೆ. ಎಷ್ಟೋ ಎಮ್. ಎ. ಓದುವ ವಿದ್ಯಾರ್ಥಿಗಳಿಗೆ ಅವರು ಮಾರ್ಗದರ್ಶನ ಮಾಡುತ್ತಾರೆ. ಪಿ.ಎಚ್.ಡಿ.ಗೆ ಸಂಶೋಧನಾ ಪ್ರಬಂಧವನ್ನು ಬರೆಯುವ ಅನೇಕರು ಇವರ ಮಾರ್ಗದರ್ಶನಕ್ಕೆ ಬರುವದನ್ನು ನೋಡಿದ್ದೇನೆ. ಈ ಮಾರ್ಗದರ್ಶನ ಭಾಷಾಅಭ್ಯಾಸಕ್ಕೆ ಸೀಮಿತವಾಗಿಲ್ಲ. ಶಿಕ್ಷಣ ವಿಷಯದಲ್ಲಿ ಪಿ.ಎಚ್.ಡಿ. ಮಾಡುವವರೂ ಇವರ ಸಹಾಯವನ್ನು ಬಯಸಿ ಬರುತ್ತಾರೆ. ಈ ಥರದ ಸಾಧನೆ ಸಹಜವಾಗಿ ಬಂದುದಲ್ಲ. ಅದು ದೀರ್ಘ ತಪಸ್ಸಾಧನೆಯ ಫಲ. ಆದರೆ ಅವರಿಗೆ ತಾನು ಅನ್ಯರಿಗೆ ಸಹಾಯ ಮಾಡುತ್ತಿದ್ದೇನೆಂಬ ಭಾವನೆಯಿಲ್ಲ. ಅದು ಒಂದು ತಮ್ಮ ಕರ್ತವ್ಯವೆಂದೇ ಅವರು ಮಾಡುತ್ತಾರೆ.

ಶ್ರೀ ದಾದಾ ಇವರು ಹತ್ತಾರು ನಿಟ್ಟಿನಲ್ಲಿ ಕಾರ್ಯನಿರ್ವಹಿಸಿ ಅನುಭವದ ಎತ್ತರಕ್ಕೆ ಏರಿದ್ದರೂ ಅವರೆಂದೂ ಅಧಿಕಾರ ಮತ್ತು ಪ್ರಸಿದ್ಧಿಯನ್ನು ಬಯಸಿದವರಲ್ಲ. ಯಾವ ಸಭೆ ಸಮಾರಂಭಗಳಲ್ಲೂ ಅವರೆಂದೂ ವೇದಿಕೆಯ ಮೇಲೆ ಬಂದವರಲ್ಲ. ಎಲ್ಲೋ ಒಂದು ಕಡೆ ಕೂತಿರುವದು ಅವರ ರೂಢಿ. ಅವರ ಈ ಸಾಧನೆ ಅವ್ಯಾಹತವಾಗಿ ನಡೆದಿದ್ದು ಅವರು ನಿಜವಾದ ಅರ್ಥದಲ್ಲಿ 'ಸ್ಥಿತಪ್ರಜ್ಞ' ರಾಗಿದ್ದಾರೆ. ಅವರನ್ನು ವೇದಿಕೆಯ ಮೇಲೆ ತರಲು ನನ್ನಿಂದಷ್ಟೇ ಅಲ್ಲ ನನ್ನಂತೆ ಅವರ ಅನೇಕ ಮಿತ್ರರೂ ಅಸಹಾಯಕರಾಗಿದ್ದಾರೆ.

ಮಹರ್ಷಿ ಅರವಿಂದೊ ಮತ್ತು ಮಹರ್ಷಿ ರಾನಡೆ ಮುಂತಾದ ಅನೇಕ ದಾರ್ಶನಿಕರ ಗ್ರಂಥಗಳ ದೀರ್ಘಕಾಲದ ಅಭ್ಯಾಸದ ಫಲವಾಗಿ ಅವರಲ್ಲಿ ೧೯೭೦ ರ ಸುಮಾರಿಗೆ ಒಂದು ಪರಿವರ್ತನೆಯಾದದ್ದು ಕಂಡು ಬಂತು. ಎಲ್ಲ ಶಿಕ್ಷಣ ಸಂಸ್ಥೆ ವ್ಯಾಪಾರ ಇನ್ನಿತರ ಸಂಘದ ಸಂಸ್ಥೆಗಳಿಂದ ದೂರವಾಗ ತೊಡಗಿದರು. ಅವರು ತಾವಾಗಿ ಎಂದೂ ಹೀಗೆ ಹೇಳದಿದ್ದರೂ ಸೂಕ್ಷ್ಮವಾಗಿ ಅವರನ್ನು ಗಮನಿಸಿದವರಿಗೆ ಇದರ ಅರಿವಾಗುತ್ತಿತ್ತು. ಎಲ್ಲ ಸಾಮಾಜಿಕ ಕಾರ್ಯಗಳಿಂದ ಅವರು ಅಲಿಪ್ತರಾಗತೊಡಗಿದರು. ಅವರು ತಮ್ಮನ್ನು ನಿತ್ಯ ಮನನ ಚಿಂತನಗಳಲ್ಲಿ ತೊಡಗಿಸಿಕೊಂಡುದು ಕಂಡು ಬರುತ್ತಿತ್ತು. ಇದೇ ಕಾಲಕ್ಕೆ ಶ್ರೀ ದುರದುಂಡೀಶ್ವರ ಶಿಕ್ಷಣ ಸಂಸ್ಥೆಯ ರಜತ ಮಹೋತ್ಸವದ ಕಾಲಕ್ಕೆ ಮುಖ್ಯ ಅತಿಥಿಗಳಾಗಿ ಆಗಮಿಸಿದ ಪೂಜ್ಯ ಶ್ರೀ ದತ್ತಾಬಾಳ ಮಹಾರಾಜ ಇವರೊಂದಿಗೆ ಶ್ರೀ ದಾದಾ ಇವರ ಖಾಸಗಿ ಚರ್ಚೆಯ ಕಾಲಕ್ಕೆ ನಾನು ಇದ್ದೆ. ಅದರಿಂದಾಗಿ ನನಗೆ ಅಲ್ಪ ಸ್ವಲ್ಪ ಅರಿವಾಯಿತೇ ವಿನಃ ಶ್ರೀದಾದಾ ಅವರ ಆಧ್ಯಾತ್ಮ ಜ್ಞಾನದ ಎತ್ತರ ನನಗೆ ಅರ್ಥವಾಗಲಿಲ್ಲ. ಇಂದಿಗೂ ಅದೇ ಸ್ಥಿತಿಯಿದೆ. ಆಧ್ಯಾತ್ಮದಲ್ಲಿ ಗಮನವಿದ್ದವರಿಗೆ ಮಾತ್ರ ಅದು ಅರ್ಥವಾಗಬಹುದು, ಅಲ್ಲದೇ ನನ್ನಂತವನಿಗಲ್ಲ.

ಅನೇಕ ಕ್ಷೇತ್ರಗಳಲ್ಲಿ ವಿಶೇಷ ಸಾಧನೆಗೈದು ಜೀವನದ ಸುಖದುಃಖಗಳನ್ನೂ ಏರಿಳಿತಗಳನ್ನೂ ಅನುಭವಿಸಿ, ಈಗ ಅವೆಲ್ಲವುಗಳಿಂದ ಮುಕ್ತರಾಗಿ, ಅವರು ಆಧ್ಯಾತ್ಮ ಸಾಧನೆಯಲ್ಲಿದ್ದಾರೆ. ಅವರು ಏನು ಮಾಡಿದರೂ ಅವರು ಎಂದೂ ತೃತೀಯ ವರ್ಗದಲ್ಲಿ ಪ್ರಯಾಣ ಮಾಡಿದವರಲ್ಲ. ಅವರ ಪ್ರಯಾಣ ಯಾವಾಗಲೂ 'First Class' ನಲ್ಲೇ. ಯೋಗ ಸಾಧನಯಲ್ಲೂ ಅವರ ಸ್ಥಾನ ಉಚ್ಚಮಟ್ಟದ್ದೇ. ಆಧ್ಯಾತ್ಮದಲ್ಲಿಯ ಅವರ ಸಾಧನೆಯನ್ನು ತಿಳಿಯುವದು ಸಾಮಾನ್ಯರಿಗೆ ಕಷ್ಟ. ಆದರೆ ಅವರಲ್ಲಾದ ಈ ದೈವೀ ಬದಲಾವಣೆಯು ಕಳೆದ ಅನೇಕ ವರ್ಷಗಳ ಸಾಧನೆಯ ಫಲ. ಅವರ ಈ ಅಪೂರ್ವ ಸಾಧನೆಗೆ ನಮ್ಮ ನಮನಗಳು.

# ನಾನು ಕಂಡ ಶ್ರೀ ದಾದಾ ನಾಯಿಕ

*ಸುಶೀಲಾ ದೇಶಪಾಂಡೆ*

೧೯೬೧ ಡಿಸಂಬರಿನಲ್ಲಿ ನಮ್ಮ ಯಜಮಾನರಿಗೆ ಲೇಬರ್ ಆಫೀಸರ ಅಂತ ಸಂಕೇಶ್ವರ ಶುಗರ ಫ್ಯಾಕ್ಟರಿಗೆ ಡೆಪ್ಯುಟೇಶನ್ ಮೇಲೆ ಮಂಗಳೂರಿನಿಂದ ವರ್ಗಾಯಿಸಿದರು.

೧೯೬೫ ಎಪ್ರಿಲ್‌ನಲ್ಲಿ ಶ್ರೀಮತಿ ಲಕ್ಷ್ಮೀಬಾಯಿ ಕೌಲಗುಡ್ಡ ಅವರು ನಮ್ಮ ಮನೆಗ ಬಂದು ಪೂಜ್ಯ ದಾದಾ ಅವರ ಅನೇಕ ಪವಾಡಗಳನ್ನು ಹೇಳಿ ನನ್ನನ್ನು ಅವರ ದರ್ಶನಕ್ಕೆ ಕರೆದುಕೊಂಡು ಹೋದರು. ಅಲ್ಲಿಯೇ ಇದ್ದು 3 ವರುಷಗಳಾಗಿದ್ದರೂ ಅವರ ದರ್ಶನದ ಭಾಗ್ಯ ಸಿಕ್ಕಿದ್ದಿಲ್ಲ. ಅಂತೂ ಅಂದು ನನ್ನ ಪೂರ್ವ ಜನ್ಮದ ಪುಣ್ಯ ಒದಗಿತು ಎಂದರೆ ಅತಿಶಯೋಕ್ತಿ-ಯಾಗಲಾರದು. ಯಾಕೆಂದರೆ ಸದ್ಗುರುಗಳು ಸಿಗುವದು ದುರ್ಲಭ. ಬ್ರಹ್ಮಾನಂದರು ಗುರುಗಳೆಂದರೆ "ಓಡಾಡುವ ಮಾತನಾಡುವ ದೇವರೇ" ಅಂತ ಹೇಳಿದ್ದಾರೆ.

ಗುರುಗಳು ಜೀವನದಲ್ಲಿ ಬರುವ ಅನೇಕ ತೊಂದರೆಗಳನ್ನು ಎದುರಿಸಲು ಮಾರ್ಗದರ್ಶನ ಮಾಡುತ್ತಾರಷ್ಟೇ ಅಲ್ಲ ಧೈರ್ಯವನ್ನು ಸಹ ತುಂಬುತ್ತಾರೆ. ಕೆಲವು ಸಲ ಮುಂದೆ ಬರುವ ಆಪತ್ತುಗಳನ್ನು ಮೊದಲೇ ತಿಳಿಸಿ ಅದರ ನಿವಾರಣೋಪಾಯು-ಗಳನ್ನು ಕೂಡ ಹೇಳುತ್ತಾರೆ.

ಇಂತಹ ಅನೇಕ ಅನುಭವಗಳು ಪೂಜ್ಯ ದಾದಾ ಅವರ ಮಾರ್ಗದರ್ಶನದಲ್ಲಿ ನನಗೆ ಬಂದಿವೆ. ೨೫ ವರ್ಷಗಳಲ್ಲಿ ನಡೆದ ಅನೇಕಾನೇಕ ಅನುಭವಗಳನ್ನು ಬರದರೆ ಒಂದು ದೊಡ್ಡ ಹೊತ್ತಿಗೆಯೇ ಆದೀತು. ಅವರು ತೋರಿದ ಪ್ರೀತಿ, ವಾತ್ಸಲ್ಯ, ಕಷ್ಟಕಾಲದಲ್ಲಿ ಅವರಿಂದ ಬಂದ ಸಹಾಯ ಇಂದಿಗೂ ಮಾಸದೆ ಅಚ್ಚಳಿಯದೆ ಉಳಿದಿದೆ.

ಅವುಗಳಲ್ಲಿ ೨-೩ ದೃಷ್ಟಾಂತಗಳನ್ನು ಇಲ್ಲಿ ಕೊಡುವೆ.

೧) ದಾದಾ ಅವರ ಪ್ರಥಮ ದರ್ಶನವಾದಾಗ ಅವರು ನನ್ನನ್ನು ಕೇಳಿದ್ದು. ನಿನ್ನ ಶಿಕ್ಷಣ ಎಲ್ಲಿಯವರೆಗೆ ಆಗಿದೆ? ನಾನು ಇಂಟರ್ ಆಗಿದ್ದೇನೆ ಎಂದು ಹೇಳಿದೆ.

ಹಾ : ಶಿಕ್ಷಣದಿಂದ ಪುಸ್ತಕ ಜ್ಞಾನ ಆಗುತ್ತದಷ್ಟೇ ಅಂದರು. ಅಧ್ಯಾತ್ಮದ ಹಾದಿ ಸುಲಭವಲ್ಲ. ಆದರೆ ನಿನಗೆ ಮಾರ್ಗದರ್ಶನ ಮಾಡಿದರೆ ನೀನು ನಡೆಯುತ್ತೀಯಾ.

ಯಾಕೆಂದರೆ ನಿನ್ನ ಹಣೆಯ ಮೇಲೆ ಮೂರು ಭಸ್ಮದ ಗೆರೆಗಳು ಕಾಣಿಸುತ್ತಿವೆ. ನೀನು ಪೂರ್ವ ಜನ್ಮದಲ್ಲಿ ಜಂಗಮಳಾಗಿದ್ದಿ. ಎಂದು ಹೇಳಿದರು. ೧೯೬೬ ಎಪ್ರಿಲ್‌ದಲ್ಲಿ ಪೂಜ್ಯ ಹುರಕಡ್ಲಿ ಅಜ್ಜ ಅವರ ದರ್ಶನಕ್ಕೆ ಹೋಗಿದ್ದೆ. ಪ್ರಥಮ ದರ್ಶನ ತೆಗೆದುಕೊಂಡು ಅವರಿಗೆ ನಮಸ್ಕಾರ ಮಾಡಲು ಹೋದೆ. ಆಗ ಅವರು ನನಗೆ ಬೇಡಬೇ. ದೇವಿಗೆ

ಮಾಡು ಅಂದರು. ನಾನು ಅಜ್ಜಾ ದೇವಿ ಎಲ್ಲರಿಗೂ ಕಾಣಲು ಸಾಧ್ಯವೇ ನಿಮಗೆ ಅವಳು ದರ್ಶನ ಕೊಡುತ್ತಾಳೆ. ಅದಕ್ಕೇ ನಿಮಗೇ ಮಾಡುವದು. ಅವರು ನನಗೆ ಏನು ನಿನಗೂ ಅವಳನ್ನು ನೋಡುವ ಆಶೆ ಇದೆಯೋ? ಇದ್ದರೆ ನಿನಗೂ ಅವಳು ಕಾಣುತ್ತಾಳೆ. ಹೋಗು ಎಂದರು. ಮುಂದೆ ನೀನು ನಾಗಲಿಂಗ ಅಜ್ಜನ ಕಾಲದಿಂದ ಸೇವೆ ಮಾಡುತ್ತ ಬಂದಿ. ಅಂದರೆ ಲಿಂಗಾಯತರವಳೆ ಎಂದು ಅವರೂ ಹೇಳಿದರು.

೨) ೧೯೬೪ರ ಅಕ್ಟೋಬರಿನಲ್ಲಿ ನಾವು ತಿರುಪತಿಗೆ ಹೋಗಿ ಅಲ್ಲಿ ನಮ್ಮ ಕಿರಿಯ ಮಗ ಶ್ರೀಕಾಂತನ ಬಾಲಕರ್ಮವನ್ನು ಮಾಡಿಕೊಂಡು ಬರಬೇಕೆಂದು ನಿಶ್ಚಯಿಸಿದ್ದೆವು. ಅದರಂತೆ ರಜೆ ಹಾಕಿದರು. ಎಲ್ಲ ತಯಾರಿಯಾಯಿತು. ದಾದಾ ಅವರಿಗೆ ಹೇಳಿ ಬರಲು ಹೋಗಿದ್ದೆ. ಅವರು ನನಗೆ ಒಮ್ಮೆಲೆ "ತಿರುಪತಿಗೆ ಹೋಗಲು ನೀನು ಯಾರು" ಃ ಅವನು ಕರೆಯಿಸಿಕೊಂಡರೆ ಮಾತ್ರ ಹೋಗುವಿ ಎಂದರು. ನನಗೆ ಅದರ ಅರ್ಥ ಸ್ವಲ್ಪವೂ ಆಗಲಿಲ್ಲ. ನಾನು ಮನೆಗೆ ಬಂದು ಯಥಾಶ್ಕತಿ ತಿರುಪತಿಗೆ ಹೋಗುವ ತಯಾರಿ ನಡೆಸಿದೆ. ಆದರೆ ಆದದ್ದೇನು? ನಾನು ಯಾವ ದಿವಸ ತಿರುಪತಿಯಲ್ಲಿರ-ಬೇಕಾಗಿತ್ತೋ ಅದೇ ದಿವಸ ಡಾಕ್ಟರ ಮೇಥು ಅವರ ದವಾಖಾನೆಯಲ್ಲಿದ್ದೆ.

೧೯೬೫ ಜೂನಕ್ಕೆ ನಮಗೆ ಬೆಳಗಾವಿಗೆ ವರ್ಗವಾಯಿತು. ಅಕ್ಟೋಬರ ರಜದಲ್ಲಿ ಮತ್ತೆ ತಿರುಪತಿಗೆ ಹೋಗಿ ಜಾವಳ ಮಾಡಿಕೊಂಡು ಬರುವದೆಂದು ಠರಾಯಿಸಿದೆವು. ದಾದಾ ಅವರಿಗೆ ತಿರುಪತಿಗೆ ಹೋಗಿ ಬರುವೆವೆಂದು ಹೇಳಲು ಹೋದೆ. ಆದರೆ ಈ ಸಲ ಅವರು ನೀವು ತಿರುಪತಿಗೆ ಹೋಗುತ್ತೀರಿ ಯಾವ ಕಾರಣಕ್ಕೂ ನಿಲ್ಲುವದಿಲ್ಲ ಎಂದು ಭರವಸೆ ಕೊಟ್ಟರು. ಮತ್ತೆ ರಜೆ ಹಾಕಿದರು ಪ್ರವಾಸದ ಎಲ್ಲ ತಯಾರಿಯಾಯಿತು. ಇನ್ನು ೪ ದಿವಸಕ್ಕೆ ಸರಿಯಾಗಿ ಹೊರಡುವದು ನಿಶ್ಚಯವಾಯಿತು.

ಹೊರಡುವದಕ್ಕೆ ನಾಲ್ಕು ದಿವಸ ಮೊದಲು ಒಂದು ದಿನ ಬೆಳಿಗ್ಗೆ ನಮ್ಮ ಹಿರಿಯ ಮಗ ರವಿ ೬ನೇಯ ಕ್ಲಾಸಿನಲ್ಲಿ ಓದುತ್ತಿದ್ದ. ಅವನು ಕಾಯಿ ಪಲ್ಲೆ ತರಲು ಬೆಳಿಗ್ಗೆ ಹೊರಟ. ಅವನ ಜೊತೆಗೆ ತಾನೂ ಹೋಗುವೆನೆಂದು ಶ್ರೀಕಾಂತ ೧½ ವರ್ಷದವ ಹಟ ಹಿಡಿದ. ಅವನನ್ನು ಕರೆದುಕೊಂಡು ಸಾಯಕಲ್ ಮೇಲ ಮುಂದಿನ ಸೀಟಿನ ಮೇಲೆ ಕೂಡ್ರಿಸಿಕೊಂಡು ಹೋದ. ಸಾಯಕಲ್ ಸ್ಟಾಂಡ ಹಚ್ಚಿ ಹುಡುಗನನ್ನು ಸೀಟಿನ ಮೇಲೇ ಕೂಡ್ರಿಸಿ ಪಲ್ಲೆ ತರಲು ಹೋದ. ಅದೇ ವೇಳೆಗೆ ಸಾಯಕಲ್ಲಿನ ಹತ್ತಿರ ನಾಯಿ ಬಂತು ಒದರುತ್ತ. ಅದನ್ನು ನೋಡಿ ಮಗು ಹೆದರಿತು. ಅದರ ಹೊಯ್ದಾಟಕ್ಕೆ ಸಾಯಕಲ್ ಬಿತ್ತು. ಸೀಟಿನಲ್ಲಿ ಕುಳಿತ ಮಗು ಚಿಮ್ಮಿ ಗಟಾರದಲ್ಲಿ ಬಿತ್ತು. ಅದು ದೊಡ್ಡ ಗಟಾರ. ಅಲ್ಲಿಯೇ ಒಬ್ಬ ಹಾಲಿನವನು ಹೋಗುತ್ತಿದ್ದ. ಅವನು ಗಟಾರದಲ್ಲಿಳಿದು ಮಗುವನ್ನು ಮೇಲಕ್ಕೆತ್ತಿದ. ಅಷ್ಟರಲ್ಲಿ ಕಾಯಿಪಲ್ಲೆ ತೆಗೆದುಕೊಂಡು ಅಣ್ಣಾ ಬಂದ. ಬಂದು ನೋಡುತ್ತಾನೆ ಕೂಸಿನ ಮೈಮೇಲೆ ಎಚ್ಚರವೇ ಇಲ್ಲ. ಮೂಕ ಪೆಟ್ಟು ಬಿದ್ದಿತ್ತು. ಹಾಲಿನವನೇ ತನ್ನ ಮೈಮೇಲಿನ ಅರಿವಿಯನ್ನು ಸುತ್ತಿ ಮಗುವನ್ನು ಎತ್ತಿಕೊಂಡು ಬಂದ. ಅಣ್ಣಾ ಗಾಬರಿಯಿಂದ ಕಕ್ಕಾಬಿಕ್ಕಿಯಾಗಿದ್ದ.

ಮುಂದೆ ಸ್ವಲ್ಪ ಹೊತ್ತಿಗೆ ಮಗುವಿಗೆ ಎಚ್ಚರ ಬಂತು ಆದರೆ ವಿಪರೀತ ವಾಂತಿ ಪ್ರಾರಂಭವಾಯಿತು. ರಾತ್ರಿಯಾದರೂ ವಾಂತಿ ಕಡಿಮೆಯಾಗಲಿಲ್ಲ. ಮಗುವು ಕಣ್ಣು ಬಿಡಲಿಲ್ಲ. ಆಗ ಡಾಕ್ಟರರು ಎಕ್ಸರೇ ತೆಗೆಯಿಸಲು ಹೇಳಿದರು. ಇಷ್ಟಾದರೂ ನನಗೆ ಮಾತ್ರ ಗಾಬರಿಯಾಗಲಿಲ್ಲ. ಯಾಕೆಂದರೆ ದಾದಾರವರು ಈ ಸಲ ನೀವು ತಿರುಪತಿಗೆ ಹೋಗೇ ಹೋಗುತ್ತೀರಿ ಎಂದು ಕೊಟ್ಟ ಭರವಸೆ ನನಗೆ ಇತ್ತು. ಒಂದು ರೂಪಾಯಿ ವೆಂಕಪ್ಪನಿಗೆ ತೊಳೆದು ಮುಡಿಪು ಇಟ್ಟೆ. ಮೈಯೆಲ್ಲ ಭಸ್ಮ ಹಚ್ಚಿದೆ. ರಾತ್ರಿ ಸರಿಯಾಗಿ ೧೨ ಘಂಟೆಗೆ ಮಗು ಅಮ್ಮ ಹಾಲು ಎಂದಿತು. ಎಲ್ಲರಿಗೂ ಜೀವ ಬಂದಂತಾಯಿತು. ವಾಂತಿಯೂ ನಿಂತು ಬೆಳಿಗ್ಗೆ ಹುಷಾರಾಯಿತು. ಮರುದಿನ ಪಲ್ಲೆದ ಪೇಟೆಯ ಅನೇಕ ಜನರು ಮಗುವು ಹೇಗಿದೆ ಎಂದು ನೋಡಲು ಬಂದಿದ್ದರು. ಅಂಥಾದ್ದು ಸರಿಯಾಗಿ ನಾವು ಮೊದಲೇ ನಿಶ್ಚಯಿಸಿದ ದಿನವೇ ತಿರುಪತಿಗೆ ಹೋಗಿ ಜಾವಳ ಮಾಡಿಕೊಂಡು ಬಂದೆವು. ಈಗ ಅವನು ಇಂಜನೀಯರನಾಗಿ ಪುಣೆಯಲ್ಲಿದ್ದಾನೆ. ಎಲ್ಲವೂ ದಾದಾರವರ ಆಶೀರ್ವಾದವೆಂದು ನಾನು ಹೇಳಬಯಸುತ್ತೇನೆ.

೩) ನಾವು ಬೆಳಗಾಂವಿಗೆ ಬಂದು ಒಂದು ತಿಂಗಳಾಗಿತ್ತು ಅಷ್ಟೇ. ಆಗ ನನ್ನ ತಮ್ಮ ಸುರೇಶ ಎಮ್.ಬಿ.ಬಿ.ಎಸ್. ಹುಬ್ಬಳ್ಳಿಯ ಕೆ.ಎಮ್.ಸಿ.ಯಲ್ಲಿ ಎರಡನೇಯ ವರ್ಷದಲ್ಲಿ ಒದುತ್ತಿದ್ದ. ಅವನ ಎಡಗಾಲಿನ ಎಲುಬಿನಲ್ಲಿ ನೋವು ಆಗಿತ್ತು. ಅದು ಬಹಳೇ ಕ್ವಚಿತ್ತಾಗಿ ಆಗುವದಂತೆ. ಅದು ಕೀವು ತುಂಬಲು ಹೊಡೆಯುತ್ತಿತ್ತು. ಅದರಿಂದ ಜ್ವರ ಬರುತ್ತಿದ್ದವು. ಊಟ ಹೋಗುತ್ತಿರಲಿಲ್ಲ. ರಾತ್ರಿಯೆಲ್ಲ ನೋವಿನಿಂದ ನರಳುವದನ್ನು ನೋಡಲಾರದೆ ಅವನನ್ನು ಅವನ ಗೆಳೆಯ ನಮ್ಮ ಮನೆಗೆ ಕರೆದುಕೊಂಡು ರಾತ್ರಿ ೧೦ ಘಂಟೆಗೆ ಬಂದ. ಕಾಲಿಗೆ ಪ್ಲಾಸ್ಟರ ಹಾಕಿದ್ದರು. ನೋಡಿ ನನಗಂತೂ ಬಹಳೇ ಗಾಬರಿಯಾಯಿತು. ಸರಿಯಾಗಿ ಮುಂದೆ ೧೫ ದಿವಸಕ್ಕೆ ಆಪರೇಶನ್ ಮಾಡುವದಾಗಿ ಹೇಳಿದ್ದರು. ಬಂದ ದಿವಸ ರಾತ್ರಿಯೆಲ್ಲ ನೋವು ಹೆಚ್ಚಾಗಿತ್ತು. ಮರುದಿವಸವೇ ದಾದಾ ಅವರು ಬಂದರು. ಅವರನ್ನು ನೋಡಿದ ಕೂಡಲೆ ನಮ್ಮೆಲ್ಲರಿಗೆ ಹಿಡಿಸಲಾರದಷ್ಟು ಆನಂದವಾಯಿತು. ಎಲ್ಲ ಕ್ಷೇಮ ಸಮಾಚಾರದ ಮಾತು ಮುಗಿದ ಮೇಲೆ, ಅವರಿಗೆ ನನ್ನ ತಮ್ಮನ ವಿಷಯ ಹೇಳಿದೆ. ಅದಕ್ಕೆ ಅವರು ಡಾಕ್ಟರರಿಗೆ ತೋರಿಸಿದ್ದೀರಾ ಎಂದು ಕೇಳಿದರು. ಅದನ್ನು ಕೇಳಿ ಅವನು ಡಾಕ್ಟರರೆಂದರೆ ದೇವರೇನು ಎಂದು ಒಳಗಿನಿಂದಲೇ ಉತ್ತರ ಕೊಟ್ಟ. ದಾದಾ ಅವರ ಮನಸ್ಸು ಕರಗಿತು ಅವರುತಾವೇ ಸ್ವತಃ ಒಳಗೆ ಹೋಗಿ ನೋಡಿ ೫ ರೂಪಾಯಿ ತುಳಜಾಭವಾನಿಯ ಹೆಸರಲ್ಲಿ ತೊಳೆದು ಇಡಲು ಹೇಳಿದರು. ಕಾಲು ನೋವು ಕಡಿಮಯಾದ ಮೇಲೆ ಒಮ್ಮೆ ತುಳಜಾಪುರಕ್ಕೆ ಹೋಗಿ ಬರಲು ಹೇಳಿದರು. ಅದರಂತೆಯೇ ನಾವು ೫ ರೂಪಾಯಿ ತೆಗೆದು ಇಟ್ಟೆವು. ಮೂರನೇಯ ದಿವಸದಿಂದ ನೋವು ಕಡಿಮೆಯಾಗುತ್ತ ಬಂತು. ಒಂದು ವಾರಕ್ಕೆ ಠಳಕವಾಡಿ ತುಂಬೆಲ್ಲ ಅಡ್ಡಾಡ ಹತ್ತಿದ. ಆಪರೇಶನ್ನಿನ ತಾರೀಖಿಗಿಂತ ೨ ದಿವಸ ಮೊದಲು ಅವನನ್ನು ಹುಬ್ಬಳ್ಳಿಗೆ ಕಳಿಸಿಕೊಟ್ಟೆವು. ಡಾಕ್ಟರರು ಎಕ್ಸರೆ ತೆಗೆದು ನೋಡಿದರು. ಡಾಕ್ಟರರಿಗೇ ನಂಬಲು ಬಾರದಷ್ಟು ಆಶ್ಚರ್ಯದ ಸಂಗತಿ ಜರುಗಿತ್ತು. ಅಲ್ಲಿ

ಕೀವಾದದ್ದೆಲ್ಲವೂ ಒಣಗಿ ಹೋಗಿತ್ತು. ಎಮ್.ಬಿ.ಬಿ.ಸ್ ಮುಗಿಸಿ ಪಾರಿಶ್ವಾಡದಲ್ಲಿ ಪ್ರಾಕ್ಟೀಸ ಮಾಡುತ್ತಾನೆ.

೪) ೧೯೭೫ ಜುಲೈ ೨೨ ರಂದು ನಡೆದ ಸಂಗತಿ.

ನಮ್ಮ ಎರಡನೇಯ ಮಗಳು ಭಾರತಿ. ತುಂಬು ಗರ್ಭಿಣಿ. ಅಂದು ಹೆರಿಗೆಯ ನೋವು ಪ್ರಾರಂಭವಾಯಿತು. ಗಲಗಲಿ ಡಾಕ್ಟರರ ನರ್ಸಿಂಗ ಹೋಮಿಗೆ ಮಧ್ಯಾನ್ಹ ಕರೆದುಕೊಂಡು ಹೋದೆವು. ಸಾಯಂಕಾಲದವರೆಗೆ ಹಾಗೂ ಹೀಗೂ ನೋವನ್ನು ಅನುಭವಿಸಿದಳು. ಡಾಕ್ಟರರು ಸಾಕಷ್ಟು ಪ್ರಯತ್ನ ಮಾಡಿದರು ಕೊನೆಗೆ ರಾತ್ರಿ ಆಪರೇಶನ್ ಮಾಡಬೇಕೆಂದು ನಿಶ್ಚಯ ಮಾಡಿದರು. ಅಂದು ಭಾನುವಾರ. ನಮ್ಮ ಯಜಮಾನರಿಗೆ ಎನೆಸ್ಥೆಸಿಯಾ ಕೊಡುವವರನ್ನು ಹುಡುಕಿ ಕರೆದುಕೊಂಡು ಬರುವದೊಂದು ಯಜ್ಞವಾದಂತಾಯಿತು. ಆಪರೇಶನ್ ಯಶಸ್ವೀ ರೀತಿಯಿಂದ ಮುಗಿಯಿತು ಗಂಡು ಮಗುವಾಯಿತು. ರಾತ್ರಿ ಸುಮಾರು ಹೊತ್ತಾದರೂ ಅವಳ ಪರಿಸ್ಥಿತಿ ನಾಜೂಕಾಗಿತ್ತು. ಇತ್ತ ಅದೇ ವೇಳೆಗೆ ದಾದಾ, ಅಪ್ಪಾಕಾಕಾ ಮತ್ತು ಗುರೂಜಿಯವರ ಸಂಗಡ ಬೆಳಗಾವಿಗೆ ಬಂದರಂತೆ. ಅಲ್ಲಿ ಅವರಿಗೆ ಹುಬ್ಬಳ್ಳಿಗೆ ಬಂದು ಭಾರತಿಗೆ ೫ ನಿಮಿಷದರ್ಶನ ಕೊಟ್ಟು ಬರಬೇಕೆಂದು ಆದೇಶವಾಯಿತಂತೆ. ಕೂಡಲೇ ಗಾಡಿಗೆ ಪೆಟ್ರೋಲ್ ತುಂಬಿಸಿಕೊಂಡು, ಹುಬ್ಬಳ್ಳಿಗೆ ಮನೆಗೆ ಬಂದರು. ನಾವು ಅಸ್ಪತ್ರೆಯಲ್ಲಿರುವ ಸಮಾಚಾರ ತಿಳಿದು ಅಲ್ಲಿಗೇ ಬಂದರು. ಅಲ್ಲಿ ಅವರು ಇದ್ದದ್ದು ಐದೇ ಐದು ನಿಮಿಷ ಮಾತ್ರ. ನಾನು ಇಷ್ಟು ಬೇಗ ಹೊರಡುತ್ತೀರಾ ಮನೆಗೆ ಹೋಗೋಣವೇ ಎಂದೆ? ಅವರು ಬಂದ ಕೆಲಸ ಆಯಿತು ಎಂದು ಹೇಳಿ ಹೊರಟೇ ಬಿಟ್ಟರು. ದಾದಾ ಅವರನ್ನು ನೋಡಿದ ಕೂಡಲೇ ಸೌ. ಭಾರತಿ ಅಮ್ಮಾ ನಾನು ಬದುಕಿದೆ ನನಗೆ ಏನೂ ಆಗುವದಿಲ್ಲ ಅಂದಳು. ದತ್ತನ ಹಾಗೆ ತ್ರಿಮೂರ್ತಿಗಳ ದರ್ಶನ ಅವಳಿಗೆ ಆಯಿತು. ಮರುದಿನ ಬೆಳಿಗ್ಗೆ ಅವಳು ಪೂರ್ತಿ ಹುಷಾರಾದಳು. ಆಶ್ಚರ್ಯದ ಸಂಗತಿಯೆಂದರೆ ಮಗುವಿಗೆ ಸಾಕಾಗುವಷ್ಟು ಹಾಲು ಬಂದವು. ತಾಯಿ ಮಗು ಇಬ್ಬರ ಹೊಟ್ಟೆಯೂ ತುಂಬಿತು. ಈಗ ಅವನು ಹನ್ನೊಂದು ವರ್ಷದವನಾಗಿದ್ದಾನೆ.

೧) ಶ್ರೀಮತಿ ವಿಜಯಾ ಗ್ರಾಮಪುರೋಹಿತ್

೧೯೭೦ ರಲ್ಲಿ ನಾನು ಬಿ.ಎಸ್‌ಸಿ. ಕೊನೆಯ ವರ್ಷದಲ್ಲ ಓದುತ್ತಿದ್ದೆ. ನಮ್ಮ ತಂದೆ ಬೆಂಗಳೂರಿನಲ್ಲಿಯೇ ಅಸಿಸ್ಟಂಟಲೇಬರ ಕಮೀಶನರ ಅಂತ ಕೆಲಸ ಮಾಡುತ್ತಿದ್ದರು. ನಮ್ಮ ತಾಯಿಗೆ ಬಹಳೇ ಅಶಕ್ತತೆಯಾದ್ದರಿಂದ ಹುಬ್ಬಳ್ಳಿಗೆ ವರ್ಗ ಮಾಡಿಸಿಕೊಂಡರು. ನಾನು ಬೆಂಗಳೂರಿನಲ್ಲಿಯೇ ಒಂದುತಿಂಗಳು ಡಿಸೆಂಬರ ಪೂರಾ ನಮ್ಮ ತಂದೆಯ ಸ್ನೇಹಿತರ ಮನೆಯಲ್ಲಿದ್ದೆ. ಮುಂದೆ 3 ತಿಂಗಳು Working women's Hostel ನಲ್ಲಿ ಇದ್ದೆ. ಬಿ.ಎಸ್‌ಸಿ. ಮೊದಲನೆಯ ಮತ್ತು ಎರಡನೆಯ ವರ್ಷ ಫಸ್ಟ್ ಕ್ಲಾಸ ಪಾಸ ಆಗಿದ್ದೆ. ನನಗೇಕೋ ನಾನು Final Year ದಲ್ಲಿ First-class ಬರಲಿಕ್ಕಿಲ್ಲ ಎಂದು

ಅನಿಸಹತ್ತಿತು. ಆದ್ದರಿಂದ ಪರೀಕ್ಷೆಗೆ drop ತೆಗೆದುಕೊಳ್ಳುವ ನಿರ್ಧಾರ ಮಾಡಿ ನನ್ನ ಎಲ್ಲ ಸಾಮಾನು ತೆಗೆದುಕೊಂಡು ಮಾರ್ಚದಲ್ಲಿ ಹುಬ್ಬಳ್ಳಿಗೆ ಬಂದೆ.

ನನಗೆ ಪುಸ್ತಕ ಹಿಡಿದು ಓದುವ ಮನಸ್ಸೇ ಆಗುತ್ತಿರಲಿಲ್ಲ. ಮಾರ್ಚ ಕೊನೆಯ ವಾರದಲ್ಲಿ ಒಂದು ದಿನ ನಮ್ಮ ತಾಯಿ ನನಗೆ ಪರೀಕ್ಷೆಗೆ ಕುಳಿತುಕೊಳ್ಳುವದಿಲ್ಲವೇ ಎಂದು ಕೇಳಿದಳು? ನಾನು ಇಲ್ಲ ಎಂದು ಒರಟಾಗಿ ಉತ್ತರಿಸಿದ್ದು ಬಹುಶಃ ಅದು ಮೊದಲನೇಯ ಬಾರಿ. ಅವಳಿಗ ಬಹಳೇ ಕೋಪ ಬಂದು ನನ್ನ ಮೇಲೆ ಕೈ ಮಾಡಿದಳು. ಅಂದು ಗುರುವಾರ ರಾಯರ ಮಠಕ್ಕೆ ಹೋಗಿ ಅತ್ತಳಂತೆ. ಅಲ್ಲಿ ಅವಳಿಗೆ ಒಮ್ಮೆಲೆ ಸಮಾಧಾನವೆನಿಸಿ ದಾದಾ ಅವರ ಕಡೆಗೆ ಹೋಗುವ ನಿರ್ಧಾರವಾಯಿತಂತೆ. ಮನೆಗೆ ಬಂದು ನನ್ನನ್ನು "ದಾದಾ ಅವರ ಕಡೆಗೆ ಹೋಗೋಣವೇ" ಅವರು ಹೇಳಿದಂತೆ ಕೇಳುತ್ತೀಯಾ? ಎಂದು ಕೇಳಿದಳು ಅದಕ್ಕೆ ನಾನು ಒಪ್ಪಿಕೊಂಡೆ.

ಮರುದಿವಸ ಬೆಳಿಗ್ಗೆ ಹುಬ್ಬಳ್ಳಿಯಿಂದ ಸಂಕೇಶ್ವರಕ್ಕೆ ಬಂದೆವು. ದಾದಾ ಅವರ ದರ್ಶನವಾಯಿತು. ಅವರು ನಾವು ಬಂದ ಕಾರಣವೇನು ಎಂದು ಕೇಳಿದರು. ನಾನು ನನ್ನ ಸಮಸ್ಯೆಯನ್ನು ಹೇಳಿದೆ. ಅವರು ನನ್ನಂತೆಯೇ ಪರೀಕ್ಷೆಗೆ ಕೂಡ್ರುವದಿಲ್ಲ ಎಂದು ಬರೆದವರ ಅನೇಕ ಪತ್ರಗಳನ್ನು ತೋರಿಸಿದರು.

ನನಗೆ ದಿನಾಲೂ 3 ಸಲ ವೆಂಕಟೇಶ ಸ್ತೋತ್ರ ಓದಲು ಹೇಳಿದರು. ಮತ್ತೂ ನನಗೆ ನಿನ್ನ ಮೊದಲನೇಯ ಪೇಪರ ಚೆನ್ನಾಗಿ ಆದರೆ ಎರಡನೇಯ ಪೇಪರ ಬರೆ. ಇಲ್ಲವಾದರ ಬಿಟ್ಟು ಬಿಡು. ಎಂದು ಹೇಳಿ ಊಟಕ್ಕೆ ಹಾಕಿ ಕಳಿಸಿಕೊಟ್ಟರು. ಎಪ್ರೀಲ್ 6 ಕ್ಕೆ ಪರೀಕ್ಷೆ. 5ನೇಯ ತಾರೀಖು ಬೆಂಗಳೂರಿಗೆ ಹೋಗಿ ಹಾಲ್ ಟಿಕೆಟ್ ತೆಗೆದುಕೊಂಡು ಪರೀಕ್ಷೆಗೆ ಹೋದೆ.

ಆದರೆ ಆಶ್ಚರ್ಯಕರವಾದ ಸಂಗತಿಯೆಂದರೆ ನನಗೆ ಎಲ್ಲ ಪ್ರಶ್ನೆಗಳನ್ನು ಉತ್ತರಿಸಲು ಬಂತು. ಹೀಗೆಯೇ ದಿನಾಲು ಉತ್ಸಾಹದಿಂದ ಪರೀಕ್ಷೆ ಮುಗಿಸಿಕೊಂಡು ಊರಿಗೆ ಬಂದೆ.

ಪರೀಕ್ಷೆಯ ಪರಿಣಾಮ ಬಂದು ಎಲ್ಲರಿಗೂ ಆಶ್ಚರ್ಯವೇ ಆಶ್ಚರ್ಯ. ಫಲಿತಾಂಶ ಫಸ್ಟ್ ಕ್ಲಾಸ್ ಬಂದಿತ್ತು. ಇದೆಲ್ಲವೂ ದಾದಾ ಅವರ ಆಶೀರ್ವಾದವೆಂದು ಹೇಳಲು ನಾನು ಬಯಸುತ್ತೇನೆ.

## “ನಾನು ಕಂಡ ಶ್ರೀ ದಾದಾ ನಾಯಿಕ”

ಎಸ್. ಜಿ. ದೇಶಪಾಂಡೆ

ನಾನು ೧೯೬೮ರಲ್ಲಿ ಬೆಂಗಳೂರಿನಲ್ಲಿದ್ದೆ. ನಮ್ಮ ಯಜಮಾನರಿಗೆ A.I.C. ಅಂತ ಬೆಂಗಳೂರಿಗೆ ವರ್ಗವಾಗಿತ್ತು. ನನಗೆ ಅಲ್ಲಿಯ ಹವಾಮಾನ ತಡೆಯಲಿಲ್ಲ. ಅನಾರೋಗ್ಯವುಂಟಾಯಿತು. ಎಲ್ಲ ಡಾಕ್ಟರರ ಔಷಧಿಗಳೂ ಮುಗಿದವು.

ಒಂದು ಬೆಳಿಗ್ಗೆ ೪ ಗಂಟೆಯ ಸುಮಾರಿಗೆ ಒಂದು ಸ್ವಪ್ನ ಬಿತ್ತು. ಆ ಸ್ವಪ್ನದಲ್ಲಿ ಒಬ್ಬ ವೃದ್ಧ ಸನ್ಯಾಸಿ ಬಂದು “ನಾನು ಬಾಳಪ್ಪಜ್ಜ ಅಂತ ಸ್ಪಷ್ಟವಾಗಿ ಹೇಳಿದರು. ನನಗೆ ನಮ್ಮ ಸೋದರತ್ತೆಯ ಮುಖದಿಂದ ಬಾಳಪ್ಪಜ್ಜನ ಅನೇಕ ಕಥೆಗಳು ಕೇಳಿ ಗೊತ್ತಿದ್ದವು. ಕಾರಣ ಚಿರ ಪರಿಚಿತ ಹೆಸರು ಕೇಳಿದಂತಾಗಿ ಬಹಳೇ ಆನಂದ ಪಟ್ಟೆ. ಆಗ ನಾನು ಬಹಳ ಖುಷಿಯಿಂದ ನಾನೂ ಅನಂತರಾಯನ ಮಗಳು. ಅಂದರೆ ನಿನ್ನ ಮರಿ ಮೊಮ್ಮಗಳು ಅಂತ ಅಭಿಮಾನದಿಂದ ಹೇಳಿಕೊಂಡು ಮುಖ ಮೇಲೆ ಮಾಡುವಷ್ಟರಲ್ಲಿ ಅಜ್ಜ ಕಣ್ಮರೆಯಾಗಿದ್ದ. ಅವರ ದಿವ್ಯ ದೃಷ್ಟಿ ನನ್ನ ಮೇಲೆ ಬಿದ್ದುದರಿಂದ ನನಗ ದಿನ ದಿನಕ್ಕೆ ಕಾಯಿಲೆ ಕಡಿಮೆಯಾಗುತ್ತ ಬಂತು. ಮುಂದೆ ಅವರ ಬಗ್ಗೆ ಮನಸ್ಸಿನಲ್ಲಿ ಅಷ್ಟು ಜಾಗ್ರತಿ ಉಳಿಯಲಿಲ್ಲ.

ನನ್ನ ತಮ್ಮ ಡಾ. ಸುರೇಶ ಎಮ್.ಬಿ.ಬಿ.ಎಸ್. ಮುಗಿಸಿ ಬಾಲ ಮುಕುಂದರು ಮೂಲತಃ ವಾಸವಾಗಿದ್ದ ಮನೆಯಲ್ಲಿಯೇ ಪಾರಿಶ್ವಾಡದಲ್ಲಿ ವೈದ್ಯಕೀಯ ವೃತ್ತಿಯನ್ನು ಬೆಳೆಸಿಕೊಂಡು ಇರುತ್ತಾನೆ ಬೇಸಿಗೆಯ ರಜೆಗೆ ನಾವು ಎಲ್ಲ ಅಕ್ಕ-ತಂಗಿಯರು ಮಕ್ಕಳೂ ಪಾರಿಶ್ವಾಡಕ್ಕೆ ೧೯೭೪ರಲ್ಲಿ ಹೋಗಿದ್ದೆವು. ಅದೇ ವೇಳೆಗೆ ಪೂಜ್ಯ ದಾದಾ ಅವರಿಗೆ ಪಾರಿಶ್ವಾಡಕ್ಕೆ ಬರಲು ಆಮಂತ್ರಣ ಕೊಟ್ಟಿದ್ದೆವು. ಅವರೂ ನಮ್ಮ ಆಮಂತ್ರಣ ಸ್ವೀಕಾರ ಮಾಡಿ ೪ ದಿವಸ ಬಿಡುವು ಮಾಡಿಕೊಂಡು ಬಂದರು.

ಅವರು ಬಂದ ದಿವಸ ರಾತ್ರಿ ಎಲ್ಲರೂ ಮಾತನಾಡುತ್ತ ಕುಳಿತಾಗ ಬಾಲ ಮುಕುಂದರ ವಿಷಯ ಬಂತು. ನನಗೆ ಅವರ ಬಗ್ಗೆ ಗೊತ್ತಿದ್ದಷ್ಟು ಮಾಹಿತಿ ಹೇಳಿದೆ. ಬಾಲ ಮುಕುಂದರು ಚಿಕ್ಕಂದಿನಿಂದಲೇ ವಿರಕ್ತರಾಗಿದ್ದು ಪ್ರಪಂಚವನ್ನು ತ್ಯಾಗ ಮಾಡಿ ೧೨ ವರ್ಷ ಕಾರಿ ಗುಡ್ಡದಲ್ಲಿ ಘೋರ ತಪಸ್ಸು ಮಾಡಿ ವೇದಾಂತದ ಶಿಖರವನ್ನೇ ಮುಟ್ಟಿದವರು. ಯಾವಾಗಲೂ ಬಾಲ-ಉನ್ಮತ್ತ-ಪಿಶ್ಯಾಚ ಸ್ಥಿತಿಯಲ್ಲಿರುವವರು ಅವರಿಗೆ ಎಲ್ಲರೂ ಹುಚ್ಚು ಬಾಳಪ್ಪ ಅಂತಲೇ ಕರಯುತ್ತಿದ್ದರು. ಅವರು ತಮ್ಮ ಶಿಷ್ಯರಾದ ಪಂತರಿಗೆ ತಮ್ಮ ಎಲ್ಲ ಗುಹ್ಯ ವಿದ್ಯೆಯನ್ನು ತಮ್ಮ ಆಲಿಂಗನದಿಂದ ಧಾರೆಯೆರೆದು ಅವರ ಮಸ್ತಕದ ಮೇಲೆ ತಮ್ಮ ವರದ ಹಸ್ತವನ್ನಿಟ್ಟು ಆಶೀರ್ವದಿಸಿದರು. ಮತ್ತು ಅವರಿಗೆ ತಮಗೆ ಯಾವ ಕೀರ್ತಿಯ ಅಭಿಲಾಷೆಯೂ ಇಲ್ಲ. ಕಾರಣ ತಮ್ಮ ಸ್ಮಾರಕವಾಗಿ ಏನನ್ನೂ ಇಡುವದು ಬೇಡ ಎಂದು ಹೇಳಿ ಅವರಿಗೆ ಅವಧೂತ

ಮಾರ್ಗವನ್ನು ಪ್ರಸಾರ ಮಾಡು ನಿನ್ನ ಕೀರ್ತಿ ಎಲ್ಲೆಡೆ ಹಬ್ಬಲಿ ಎಂದು ಆಶೀರ್ವಾದ ಮಾಡಿದರು.

ತಮ್ಮ ಕಾರ್ಯ ಮುಗಿಯಿತು ಎಂದು ಹೇಳಿ ಪಂತರಿಗೆ ತಾವು ಶ್ರೀಶೈಲಕ್ಕೆ ಹೋಗುವದಾಗಿ ತಿಳಿಸಿ ಮುಂದೆ ಶ್ರೀಶೈಲದಲ್ಲಿ ಪಾತಾಳ ಗಂಗೆಯಲ್ಲಿ ಐಕ್ಯರಾದರು.

ಇಷ್ಟೆಲ್ಲ ಕೇಳಿದ ಮೇಲೆ ಪೂಜ್ಯರಾದವರು ನಿಮ್ಮ ಮನೆತನದಲ್ಲಿ ಇಷ್ಟು ದೊಡ್ಡ ಯೋಗಿಗಳು ಆಗಿ ಹೋಗಿದ್ದಾರೆ. ಅದೇ ಮನೆತನದವರಾಗಿ ನೀವು ಅವರ ಸ್ಮಾರಕವಾಗಿ ಏನನ್ನೂ ಮಾಡುವದಿಲ್ಲವೇ ಎಂದರು. ನಾವು ಇಲ್ಲ ಎಂದು ಹೇಳಿದವು. ದಾದಾ ಅವರು ಬಾಳಪ್ಪಜ್ಜ ಈಗಲೂ ಇದ್ದಾರೆ ಎನ್ನುವುದಕ್ಕೆ ನಿಮಗೇ ಏನಾದರೂ ಅನುಭವ ಬಂದರೆ ನಂಬುವಿರಾ ಎಂದು ಕೇಳಿದರು?

ರಾತ್ರಿ ಅದೇ ವೇಳೆಗೆ ಸಾದಾ ಅಕ್ಕಿ ತೊಳೆದು ಕಟ್ಟಿಗೆಯ ಒಲೆಯ ಮೇಲೆ ಅನ್ನಕ್ಕೆ ಇಟ್ಟಿದ್ದೆವು ಅದು ಕುದಿಯುತ್ತಿತ್ತು. ಮನೆಯೆಲ್ಲಾ ಇದ್ದಕ್ಕಿದ್ದಂತೆ ಸುವಾಸನೆಯ ಅಕ್ಕಿ ವಾಸನೆ ಹಿಡುಗಿತು. ಇದು ಎಲ್ಲರಿಗೂ ಬಂದ ಅನುಭವ ಆಶ್ಚರ್ಯ : ಏಕೆಂದರೆ ಮನೆಯಲ್ಲಿ ವಾಸನೆಯ ಅಕ್ಕೀ ಕಾಳು ಸಹ ಇಲ್ಲ.

ಇದಾದ ನಂತರ ಅಂದೇ ರಾತ್ರಿ ಊಟ ಮುಗಿಸಿ ಮತ್ತೆ ಎಲ್ಲರೂ ಮಾತನಾಡುತ್ತ ಕುಳಿತೆವು ಆಗ ಸುಮಾರು 12 ಘಂಟೆಯಾಗಿರಬಹುದು. ದಾದಾ ಅವರು ಈಗ ಬಾಳಪ್ಪಜ್ಜನ ಮನೆಯ ಸುತ್ತ ಸಂಚಾರ ನಡೆದಿದೆ ಎಂದು ಹೇಳಿದರು. ತಕ್ಷಣ ಎಲ್ಲರಿಗೂ ದಿಗಿಲು ಬಾಳಪ್ಪಜ್ಜ ಆಗಿ ಹೋಗಿ ನೂರು ವರ್ಷ ಆಗುತ್ತ ಬಂತು. ಈಗ ಸಂಚಾರ ಎಂದರೇನು? ಎಲ್ಲರಿಗೂ ಮಹಾದಾಶ್ಚರ್ಯವಾಗುವಂತೆ ಒಮ್ಮೆಲೆ ಮನೆಯ ಎಲ್ಲ ಕಡೆಯಿಂದಲೂ ಧೂಪದ ವಾಸನೆ ಹಿಡುಗಿತು. ದಾದಾ ಅವರು ಅದೇ ಬಾಲ ಮುಕುಂದರ ಅಸ್ತಿತ್ವದ ದ್ಯೋತಕ ಎಂದು ಸ್ಪಷ್ಟ ಪಡಿಸಿದರು. ಈ ಅನುಭವಗಳು ನಿಜವಾಗಿಯೂ ವಿಚಿತ್ರವಾದ ಅನುಭವಗಳು ಆದರೂ ಸತ್ಯವಾದ ಅನುಭವಗಳು.

ದಾದಾ ಅವರು ನಮಗೆ ಗುರುದ್ವಾದಸಿಗೆ ಅವರ ಸ್ಮಾರಕ ಉತ್ಸವ ಮಾಡಲು ಹೇಳಿದರು. ಸರಿ ಅದೇ ವರ್ಷ ಉತ್ಸವ ಪ್ರಾರಂಭವಾಯಿತು. ಬಾಲ ಮುಕುಂದರು ಪೂಜಿಸಿದ ಈಶ್ವರನ ದೇವಸ್ಥಾನವಿದೆ. ಅಲ್ಲಿಯೇ ರುದ್ರಾಭಿಷೇಕ ಹಾಗೂ ರಾತ್ರಿಯೆಲ್ಲ ಜಾಗರಣೆ ಮೊದಲನೆಯ ಮೂರು ವರ್ಷ ನಾವು ಮನೆಯ ಜನ ಹಾಗೂ ಸಂಗಮೇಶ್ವರ ಗುರವ ಅವರು ಇರುತ್ತಿದ್ದರು. ಗುರವ ಅವರ ಗಾಯನ ನಡೆಯುತ್ತಿತ್ತು. ಉತ್ಸವದ ಮೊದಲನೆಯ ದತ್ತ ಜಯಂತಿಗೇ ಬಾಲ ಮುಕುಂದರ ಪಾದುಕಿ ಸ್ಥಾಪನವಾದವು. ಮುಂದೆ ಬರ ಬರುತ್ತ ಕೋಲ್ಹಾಪುರ ಹಾಗೂ ಬೆಳಗಾವಿಯಿಂದ ಅನೇಕ ಕಲಾದರು ಬರುತ್ತಿದ್ದರು. ಅವರು ತಮ್ಮ ಗಾಯನ ಸೇವೆಯನ್ನು ಸಲ್ಲಿಸುತ್ತಿದ್ದರು. ಈಗ ನಾಲ್ಕು ವರ್ಷಗಳಿಂದ ದಾವಣಗೆರೆಯ ಕಲಾವಿದರು ಬಂದು ಸೇವೆ ಸಲ್ಲಿಸುತ್ತಿದ್ದಾರೆ. ಅಂತೂ ೧೭ ವರ್ಷಗಳಿಂದ ಉತ್ಸವ ಅಂದರೆ ರುದ್ರಾಭಿಷೇಕ ಪ್ರಸಾದ, ರಾತ್ರಿ ಜಾಗರಣೆ ತಪ್ಪದೆ ನಡೆದಿದೆ.

ಅಂದರೆ ಯಾವುದಾದರೊಂದು ಆದೇಶ ಗುರು ಮುಖದಿಂದ ಬಂದರೇನೆ ಅದಕ್ಕೆ ಮಹತ್ವ ಹೇಗಂದರೆ ಈಗ ಸಮುದ್ರದ ನೀರು ಉಪ್ಪು ಅದನ್ನು ಯಾರೂ ಕುಡಿಯಲು ಬಳಸುವದಿಲ್ಲ. ಆದರೆ ಅದು ನೀರು ಬಿಸಿಲಿಗೆ ಕಾದು ಆವಿಯಾಗಿ ಮೇಲೆ ಹೋಗಿ ಮೋಡವಾಗಿ ಮಳೆ ಗರೆದರೆ ಸಿಹಿ ನೀರಾಗುತ್ತದೆ. ಮೋಡದಿಂದ ಸಿಹಿ ನೀರು ಬರುವಂತೆ ಗುರುಮುಖದಿಂದ ಉಪದೇಶಗಳು ಬರಬೇಕು.

ವ್ಯವಹಾರದಲ್ಲಿ ಮೊದಲು ಅನುಭವ ಆಮೇಲೆ ಶ್ರದ್ಧೆ ತಾನಾಗಿಯೇ ಬರುತ್ತದೆ. ಸಕ್ಕರೆ ಸಿಹಿ ಅಂದರೆ ಸಾಲದು ತಿಂದು ರುಚಿ ನೋಡಿದ ಮೇಲೆಯೇ ಅದು ಸಿಹಿ ಅಂತ ಅನುಭವ ಪಡೆದು ಆ ಹೇಳಿಕೆಯ ಮೇಲೆ ಶ್ರದ್ಧೆ ತಾನಾಗಿಯೇ ಬರುತ್ತದೆ. ಆದರೆ ಅಧ್ಯಾತ್ಮದಲ್ಲಿ ಮೊದಲು ಶ್ರದ್ಧೆ-ಶ್ರದ್ಧೆ ಹೆಚ್ಚಾದಂತೆ ಅನುಭವ ಸಾಧ್ಯ. ಆ ಶ್ರದ್ಧೆಯನ್ನು ಮೂಡಿಸಲು ಗುರುಗಳು ಬೇಕೇ ಬೇಕು.

ಈಗ ೧೭ ವರ್ಷಗಳಿಂದ ಉತ್ಸವ ನಡೆಯಲು ಪೂಜ್ಯ ದಾದಾ ಅವರೇ ಕಾರಣ ಎಂದು ಹೇಳಲು ನನಗೆ ಒಳ್ಳೇ ಹೆಮ್ಮೆ ಗೌರವ ಎನಿಸುತ್ತದೆ.

ಬಾಲ ಮುಕುಂದರ ಅಸ್ತಿತ್ವ ಎಂದು ದಾದಾ ಅವರು ಹೇಳಿದಂತೆಯೇ ಒಂದು ಅದ್ಭುತ ಘಟನೆಯಾಗಿದೆ.

೧೯೯೦ ರಲ್ಲಿ ಕಳೆದ ವರ್ಷ ಬೇಸಿಗೆಯ ರಜೆಯಲ್ಲಿ ನನ್ನ ತಮ್ಮ ಪಾರಿಶ್ವಾಡದಲ್ಲಿರುವವ ಅವನು ತನ್ನ ಎಲ್ಲ ಪರಿವಾರದೊಂದಿಗೆ 15 ದಿವಸ ಪರ ಊರಿಗೆ ಹೋಗಿದ್ದ ಎಲ್ಲ ಕಾಲದಲ್ಲಿ ಎಲ್ಲ ತರದ ಜನರು ಇರುವದು ಸಹಜ ಅಲ್ಲಿಯ ಕೆಲವು ದುಷ್ಟ ಜನರು ಹೊಂಚು ಹಾಕಿ ಒಂದು ದಿನ ರಾತ್ರಿ ಹಂಚು ತೆಗೆದು ಮೇಲಿನಿಂದ ಜಿಗಿದು ಹಿತ್ತಲ ಕಡೆಯ ಬಾಗಿಲನ್ನು ತೆರೆದು ಕೊಂಡಿದ್ದರು. ತುಂಬಿದ ಮನೆ ಸಾಮಾನು ಸಾಗಿಸಲು ಹಿತ್ತಲ ಬಾಗಿಲು ತೆರೆದಿತ್ತು.

ಅವರು ದೇವರ ಕೋಣೆಯ ಬಾಗಿಲಿಗೆ ಬಂದು ಆ ದೇವರ ಕೋಣೆಯಲ್ಲಿ ಕಾಲಿಡಬೇಕು ಎಂದು ಮಾಡಿದ್ದರು ಅಲ್ಲಿಯ ಬೆಳ್ಳಿಯ ಸಾಮಾನುಗಳು ಅವರ ದೃಷ್ಟಿ ಸೆಳೆದಿದ್ದವು. ಆದರೆ ಅಲ್ಲಿ ನಡೆದದ್ದು ಏನು? ಅವರಿಗೆ ಅಲ್ಲಿ ಒಂದು ವ್ಯಕ್ತಿ ಅಸ್ಪಷ್ಟವಾಗಿ ಕಾಣಿಸಿಕೊಂಡು ತಮ್ಮಗಳಿರಾ ಏಕೆ ಅವಸರ ಸಾವಕಾಶವಾಗಿ ನಿಮಗೆ ಏನು ಬೇಕೋ ಅದನ್ನೆಲ್ಲ ಒಯ್ಯಿರಿ ಎಂದು ಸ್ಪಷ್ಟವಾಗಿ ಹೇಳಿದಂತೆ ಕೇಳಿಸಿತು. ಅದನ್ನು ಕೇಳಿ ಅವರೆಲ್ಲ ಗಾಬರಿಯಿಂದ ಬೆವತು ಹಾಗೆಯೇ ಏನನ್ನೂ ಮುಟ್ಟದೆ ಹಿತ್ತಲ ಬಾಗಿಲು ತೆರೆದಿಟ್ಟು ಓಡಿ ಹೋಗಿದ್ದಾರೆ. ಈ ಪವಾಡ ಬರೆಯಲು ಅಭಿಮಾನವೆನಿಸುತ್ತದೆ.

ಇದೆಲ್ಲ ದಾದಾ ಅವರ ಪವಾಡವಿದ್ದಂತೆಯೇ ಅವರ ಪವಾಡಗಳನ್ನು ಬರೆಯುತ್ತ ಹೋದರೆ ಒಂದು ಹೊತ್ತಿಗೆಯೇ ಆಗುತ್ತದೆ. ಬೇರೆಯವರಿಗೂ ಅವಕಾಶ ಸಿಗಲಿ ಅಂತ ಇಲ್ಲಿಗೆ ಮುಗಿಸುತ್ತೇನೆ.

# “ನಾನು ಕಂಡ ಶ್ರೀ ದಾದಾ ನಾಯಿಕ”

*ಡಾ। ಸುರೇಶ ಅನಂತರಾವ ಕುಲಕರ್ಣಿ*

ಶ್ರೀ ದಾದಾ ಅವರನ್ನು ನಾನು ಕಂಡಿದ್ದು ೨೫ ವರ್ಷಗಳ ಹಿಂದೆ. ಅದು ಪೂರ್ವ ಯೋಜಿತವಾಗಿರದೆ ಅದು ಅಪೂರ್ವ ಯೋಗಾ ಯೋಗವೆಂದೇ ಹೇಳಬಹುದು. ಆಗ ನಾನೊಬ್ಬ ವೈದ್ಯಕೀಯ ವಿದ್ಯಾರ್ಥಿಯಾಗಿದ್ದೆನು. ವೈದ್ಯಕೀಯ ವಿದ್ಯೆಯು ಸಾಧಿಸಲಾರದ್ದನ್ನು ದೈವಿಕ ಬಲ ಮತ್ತು ಅಧ್ಯಾತ್ಮಿಕ ಬಲಗಳಿಂದ ಸಾಧಿಸಬಹುದು. ಎಂದು ಅವರು ನನಗೆ ಮನಗಾಣಿಸಿಕೊಟ್ಟರು. ಅದೊಂದು ರೀತಿಯ ಪವಾಡವಾದಂತಾಯಿತು. ಆಗಲೇ ಶ್ರೀ ದಾದಾ ಅವರು ನನಗೆ ಪೂಜನೀಯ ಗುರುವಾದರು. ಅಂದಿನಿಂದ ಇಂದಿನವರಗ ನಮ್ಮದು ಗುರು-ಶಿಷ್ಯರ ಸಂಬಂಧವಾಗಿರದೆ, ಒಂದು ರೀತಿಯಿಂದ ತಂದೆ-ಮಗನ ಸಂಬಂಧವೂ ಹೌದು ನನ್ನ ಜೀವನದ ಎಲ್ಲ ನೋವು-ನಲಿವುಗಳಲ್ಲಿ ಅವರು ತಂದೆಯಂತೆ ಪಾಲ್ಗೊಂಡಿದ್ದಾರೆ. ಗುರುವಿನಂತೆ ಸಮಸ್ಯೆಗಳಿಗೆ ಸಮಾಧಾನವನ್ನು ನೀಡಿದ್ದಾರೆ.

ಪಾರಿಶ್ವಾಡದಲ್ಲಿ ನಮ್ಮ ಮುತಜ್ಜಂದಿರಾದ ಪ. ಪೂ. ಬಾಲಮುಕುಂದರ (ಪ. ಪೂ. ಪಂತ ಮಹಾರಾಜ ಬಾಳೇಕುಂದ್ರಿಯವರ ಗುರುಗಳು) ಮಹತ್ವವನ್ನು ತಿಳಿಸಿ, ಅವರ ಸ್ಮರಣಾರ್ಥವಾಗಿ ಮನೆಯಲ್ಲಿ ಶ್ರೀ ಗುರು ದ್ವಾದಶಿಯ ಉತ್ಸವವನ್ನು ಆಚರಿಸಲು ಪ್ರೇರೇಪಿಸಿದವರು ಶ್ರೀ ದಾದಾ ಅವರೇ ಕೇವಲ ಬೆರಳೆಣಿಕೆಯಷ್ಟು ಜನರಿಂದ ಪ್ರಾರಂಭವಾದ ಆ ಉತ್ಸವವು ಕಳೆದ ೧೮ ವರ್ಷಗಳಲ್ಲಿ ಬೃಹದಾಕಾರವಾಗಿ ಉನ್ನತಿ ಹೊಂದಿದೆ.

ಶ್ರೀ ದಾದಾ ಅವರದು ಬಹಳ ಸಾದಾ ಜೀವನ. ಅವರನ್ನು ನೋಡಿದಾಕ್ಷಣ ಅವರ ವ್ಯಕ್ತಿತ್ವ ಅರಿವಾಗಲಾರದು. ಆಳವಾದ ನೀರಿನಂತೆ ಶಾಂತವಾದ ಮುಖ ಮುದ್ರೆ. ಅವರನ್ನು ಹತ್ತಿರದಿಂದ ತಿಳಿದಾಗಲೇ ಅವರ ಬಹು ಮುಖ ವ್ಯಕ್ತಿತ್ವದ ಅರಿವುಂಟಾಗುವದು ಆಡು ಮುಟ್ಟದ ಗಿಡವಿಲ್ಲವೆಂಬಂತೆ ಅವರು ಅರಿಯದ ವಿಷಯವೆ ಇಲ್ಲ ಎಂದರೆ ಅತಿಶಯೋಕ್ತಿಯಾಗಲಾರದು. ವೈದ್ಯಕೀಯ ಜ್ಞಾನದಲ್ಲಂತೂ ಅವರು ಎಷ್ಟೋಸಲ ವೈದ್ಯರನ್ನೇ ಮೂಕ ಮಾಡಿದ್ದುಂಟು. ಅವರ ಜ್ಞಾನದಂತೆಯೇ ಅವರ ಶಿಷ್ಯ ಬಳಗವೂ ಅಪಾರವಾದದ್ದು ಎಲ್ಲ ಕ್ಷೇತ್ರಗಳಲ್ಲಿಯ ದಿಗ್ಗಜರು ಅವರ ಶಿಷ್ಯರೇ. ಅವರೊಬ್ಬ ಸಂಘಜೀವಿ ಯಾವಾಗಲೂ ಶಿಷ್ಯರ ಬಳಗದಲ್ಲಿಯೇ ಇರುವವರು ಅವರ ಶಿಷ್ಯರಲ್ಲಿ ಜಾತಿ ಮತಗಳ ಭೇಧವಿಲ್ಲ. ಬಡವ ಬಲ್ಲಿದರೆಂಬ ಅಂತರವಿಲ್ಲ. ಯಾರೂ ಯಾವಾಗ ಬೇಕಾದರೂ ಅವರನ್ನು ಭೇಟಿಯಾಗಬಹುದು. ಅವರ ಭಾವನೆಗೆ ಅವರವರ ದರುಶನಕ್ಕೆ ಅವರಿಗೆಲ್ಲ ಗುರು ನೀನೊಬ್ಬನೇ ಎಂಬಂತೆ. ಪ್ರತಿಯೊಬ್ಬರ ಸಮಸ್ಯೆಗಳಿಗೆ ತಕ್ಕಂತೆ ಸಮಾಧಾನವನ್ನು ಹೇಳಿ

ಅವರನ್ನು ಸಂತೃಸುವದೇ ಅವರ ಗುರಿ. ಅವರಲ್ಲಿಗೆ ಹೋದ ಎಲ್ಲರಿಗೂ ಒಂದೇ ಬಗೆಯ ಆತಿಥ್ಯ ಬಹುಶಃ ಇಲ್ಲಿಯವರೆಗೆ ಯಾರೊಬ್ಬರೂ ಅವರಲ್ಲಿಂದ ನಿರಾಶರಾಗಿ ಬಂದದ್ದಿಲ್ಲ.

ಶ್ರೀ ದಾದಾ ಅವರೊಡನೆ ಹರಟುವದೆಂದರೆ ಅದೊಂದು ಬಗೆಯ ಅಪೂರ್ವ ಅನುಭವವೇ ಸೈ ಅದು ಹಾಳು ಹರಟೆಯಾಗಿರದೆ ಆಧ್ಯಾತ್ಮಿಕ ಜ್ಞಾನದ ದೃಷ್ಟಿಯದು. ಅದರಲ್ಲಿ ಮಿಂದವರಿಗೇನೇ ಅದರ ಸುಖ ಅನುಭವವಾದೀತು. ಅವರ ಮಾತುಗಳನ್ನು ಕೇಳುತ್ತಿದ್ದಂತೆ ಯಾವುದೋ ಸುಂದರ ಲೋಕದಲ್ಲಿ ವಿಹರಿಸುತ್ತಿದ್ದಂತೆ ಅನುಭವ ಈ ಆನಂದ ಯಾವಾಗಲೂ ಹೀಗೆಯೇ ಇರಬಾರದೇ ಎಂಬ ಆಶಯ. ಅವರು ಜೀವನದಲ್ಲಿಯ ಸಮಸ್ಯೆಗಳನ್ನು ಎಳೆ-ಎಳೆಯಾಗಿ ಬಿಡಿಸಿ ಅವುಗಳಿಗೆ ಸಮಾಧಾನವನ್ನು ನೀಡುವಾಗ, ಜೀವನದಲ್ಲಿ ಎಂತಹ ಪ್ರಸಂಗವನ್ನೂ ಧೈರ್ಯವಾಗಿ ಎದುರಿಸುತ್ತೇವೆ. ಎಂಬಂತಹ ಆತ್ಮ ಸ್ಥೈರ್ಯ, ನಮ್ಮೆಲ್ಲರಿಗೆ ಈ ರೀತಿಯಾಗಿ ಕಾಲದ ಅರಿವೇ ಇಲ್ಲದೆ ಅವರೊಂದಿಗೆ ದಿನಗಳಿಗೆ ಲೆಕ್ಕವೇ ಇಲ್ಲ. ಕೊನೆಗೊಮ್ಮೆ ಅವರು ಊರಿಗೆ ಹೊರಟು ನಿಂತಾಗ ಸಹಿಸಲಾಗದಂತಹ ಅಗಲಿಕೆಯ ವ್ಯಥೆ ನಮ್ಮೆಲ್ಲರಿಗೆ ಮತ್ತೆ ಯಾವಾಗ ಬೇಗನೆ ಬರುವರೋ ಎಂದು ಜಾತಕ ಪಕ್ಷಿಯ ನಿರೀಕ್ಷೆ.

ದಾದಾ ಅವರೊಡನೆ ಇದ್ದಾಗ ಜಿಹ್ವಾ ಚಾಪಲ್ಯಕ್ಕೂ ಸಮೃದ್ಧ ಆಹಾರ ದೊರೆಯುವದು ಅವರ ಪಕ್ಕದಲ್ಲಿ ಕುಳಿತು ಅವರ ಕೈಯಿಂದಲೇ ಕೊಡುವ ಬಗೆ ಬಗೆಯ ಖಾದ್ಯಗಳನ್ನು ಚಿಕ್ಕ ಮಗುವಿನಂತೆ ತಿನ್ನುವಾಗ ನಮ್ಮ ಜೀವನವೆಷ್ಟು ಸಾರ್ಥಕ ಎಂದು ಹೆಮ್ಮೆಯೆನಿಸುವುದು.

ಸಮಯದ ಪ್ರಜ್ಞೆ ಮತ್ತು ಕೆಲಸದಲ್ಲಿಯ ಅಚ್ಚುಕಟ್ಟುತನವನ್ನು ದಾದಾ ಅವರಿಂದ ನಾವೆಲ್ಲರೂ ಅವಶ್ಯವಾಗಿ ಕಲಿಯಬೇಕು.

ಇಂತಹ ಪರಮ ಪೂಜನೀಯರನ್ನು ನಮ್ಮ ನಡುವೆ ಪಡದ ನಾವು ನಿಜವಾಗಿಯೂ ಭಾಗ್ಯಶಾಲಿಗಳು ಬಹುಶಃ ಇದು ನಮ್ಮ ಪೂರ್ವ ಜನ್ಮದ ಸುಕೃತ ಫಲವೇ ಸರಿ ನಿಜವಾಗಿಯೂ ನಮಗೆ ದಾದಾ ಅವರ ರೂಪದಲ್ಲಿ ಕಾಮಧೇನು ದೊರಕಿದಂತಾಗಿದೆ.

ಇಂತಹ ಆದರ್ಶ ಜೀವಿ ಶ್ರೀ ದಾದಾ ಅವರು ನೂರು ವಸಂತಗಳನ್ನು ಕಾಣಲಿ ಎಂದು ನಾನು ಆ ದೇವರಲ್ಲಿ ಹೃತ್ಪೂರ್ವಕವಾಗಿ ಕೇಳಿಕೊಳ್ಳುತ್ತೇನೆ.

# लेखकांचे पत्ते

१) **श्री. भालजी पेंढारकर**
जयप्रभा स्टुडिओ, कोल्हापूर ४१६००२.

२) **प्राचार्य एम्. आर्. देसाई,** B. A. LL. B. M. Ed. (Leeds)
लिनाकुटी, न्यू शाहुपुरी - १
ताराबाई पार्क, कोल्हापूर ४१६००३.

३) **श्री. एम्. एन्. कुलकर्णी,** B. S. M. Ed.
C/o. Shri V. M. Kulkarni, Ist Floor, Kesharkunj, Rajaji Path,
A&P, Dombivali (East) (Dist. Thane)421 201

४) **डॉ. वसंत स. जोशी,** M. A. Ph.D.
१७३०, ई, ६ वी गल्ली, राजारामपुरी - कोल्हापूर - ४१६ ००८

५) **श्री. वि. न. वझे,** B. A. LLB.
५११ - क/कख, ई वॉर्ड, अश्विनी को. ऑप. हौसिंग सोसायटी,
स्टेशन रोड, कोल्हापूर.

६) **डॉ. उदय अनंत पुराणिक,** B. Com.
' अमल कुटी ', जयसिंगराव पार्क, कागल - ४१६ २१६

७) **श्री. जे. के. काळे,** B. Sc.
' दुर्गा व्ह्यू ', मराठा कॉलनी, धारवाड - ५८० ००८

८) **सौ. रजनी करकरे - देशपांडे** B. A. (Hon.)
३५ / जी - ३, प्रियदर्शनी सोसायटी, शालिनी पॅलेसच्या पिछाडीस,
कोल्हापूर - ४१६ ०१०

९) **श्रीमती गुलाबबाई कागलकर**
१६३९, सोमवार पेठ, कोल्हापूर - ४१६ ००२.

१०) **श्री. डी. एम्. दांडेकर**
' दुर्गाकिशव ' ८२६, राणी लक्ष्मी रोड, टिळकवाडी, बेळगाव - ५९० ००६

११) **श्री. अनंत तेरदाळ, गायक**
श्रीनिकेतन प्लॉट नं. १०, व्यंकटेश नगर, (बेळगांव - सांबरा रोड) मु. पो. मुतगे

१२) **श्री. डॉ. सुधांशु कुलकर्णी,** B. Com. Ph. D. (Music)
१५०, बुधवार पेठ, टिळकवाडी, बेळगांव - ५९० ००६

१२) श्री. डॉ. सुधांशु कुलकर्णी, B. Com. Ph. D. (Music)
१५०, बुधवार पेठ, टिळकवाडी, बेळगांव - ५९० ००६

१३) प. संगमेश्वरबुवा गुरव (गायक)
'स्वरसंगम' कल्याणनगर, धारवाड - ५८० ००७

१४) श्री. आर्. के. विजापुरे
रामनिवास, म. फुले रोड, शहापूर, बेळगांव - ५९० ००३.

१५) श्री. ज्योतिंद्र हसबे, ज्योतिषी
रेणुकासदन, गणेशनगर, मु. पो. डोंबिवली (पश्चिम) (जि. ठाणे) - ४२१ २०२

१६) श्री. के. आर्. गानू, पामिस्ट अँड न्यूरॉलॉजिस्ट
१३५१/५, बागरपट्टी कॉर्नर, मु. पो. धुळे - ४२४ ००१

१७) श्री. टी. जी. पाटील, M. A. M. Ed.
'ज्योतिप्रकाश,' कोल्हापूर क्रॉस, बेळगांव - ५९० ०१६.

१८) प्रा. र. श्री. पुजारी, M. A
९९२, सदाशिव पेठ, पेरुगेट मुलांच्या भावे शाळेसमोर, पुणे - ४११ ०३०

१९) प्रा. गं. ना. कुलकर्णी, M. A.
स. म. लोहिया (ज्यू.) कॉलेज, न्यू महाद्वार रोड, कोल्हापूर

२०) श्री. द. र. धर्माधिकारी, B. A. B. Ed.
७३ बी, जोतीबा रस्ता, कोल्हापूर

२१) डॉ. सुरेश जोशी, M. A. Ph.D.
'मानसी' मधळी आळी, मु. पो. देवरुख (जि. रत्नागिरी) - ४१५ ८०४

२२) श्री. जी. एस्. गोंधळी, B. Sc. B. T.
कमला-गोविंद निवास, राजारामपुरी - १२ वी गल्ली., कोल्हापूर - ८.

२३) प्रा. व्ही. आर. फडणीस, M. A.
६७, लक्ष्मी-निवास, गणेश कॉलनी, साक्री रोडे,. धुळे - ४२४ ००१.

२४) श्री. दिगंबर बा. जोशी, M. A. M. Ed.
२२५७ 'ए' वॉर्ड, जिवबा नाना जाधव कॉंप्लेक्स,
बाबूजमाल मशिदीमागे, कोल्हापूर - १२

| | |
|---|---|
| २५) | **श्री. पी. व्ही. जोशी - सविता पारिजात**<br>१२३७/ख,' ए ' वॉर्ड, उभ्या मारुतीजवळ<br>कोल्हापूर - ४१६ ०१२. |
| २६) | **प्रा. एन्. आर्. पालेकर,** M. A.<br>सुयोग बिल्डिंग, शिवाजी पार्क, कोल्हापूर - ४१६ ००१ |
| २७) | **पं. माधव गणेश जोशी**<br>तेली गल्ली, निपाणी - ५९१ २३७. (जि. बेळगांव) |
| २८) | **श्री. एन्. जे. जोशी ,** आय. एफ्. एस्. (रिटायर्ड)<br>११, अनुप्रिता सोसायटी,फ्लॅट नं. ३ नववा रस्ता, डहाणूकर कॉलनी,<br>कोथरूड, - पुणे - ४११ ०२९. |
| २९) | **श्री. एस्. आर्. पाटील ,** B. A रिटायर्ड, डि. टे. इंजिनियर.<br>सरदार कॉलनी, ताराबाई पार्क, कोल्हापूर |
| ३०) | **श्री. आर्. जी. काकडे ,** B. A.(निवृत्त मामलेदार)<br>संकेश्वर - ५९१ ३१३ (जि. बेळगांव) |
| ३१) | **डॉ. जी. एस्. खांडेकर**<br>हुक्केरी - ५१९ ३०९. (जि. बेळगांव) |
| ३२) | **श्री. आप्पासाहेब भिडे ,** B. Com.<br>डी. एम्. भिडे ६ कण्व, दौलत नगर, लिंक रोड, सांताक्रुझ वेस्ट, मुंबई - ५४. |
| ३३) | **सौ. सुनिता श्रीकृष्ण घोलकर**<br>घोलकर वाडा, गोरे मंगल कार्यालयाजवळ, मिरज - ४१६ ४१० |
| ३४) | **सौ. वैजयंती कुलकर्णी ,** B. A.<br>शिंत्रे कॉलनी, पाटील ब्लॉक्स , निपाणी , ५९१ २३७. |
| ३५) | **सुधाताई जोशी**<br>१९, सुर्वे कॉलनी, ताराबाई पार्क, . कोल्हापूर - ४१६ ००३. |
| ३६) | **सुकन्या -** B. Com, M. A.<br>C/o. सौ. अनिता अनिल जनवाडकर<br>जीवनप्रभा, प्रतिभानगर, को-ऑप. सोसायटी, कोल्हापूर - ८. |

| | |
|---|---|
| ३७) | **श्री. कृष्णकांत केशव मुळे**<br>गांधी चौक, संकेश्वर - ५९१ ३१३. (जि. बेळगांव) |
| ३८) | **श्री. भरत दैनी ,** B. Com.<br>प्लॉट न. ७, स्टेट बँक कॉलनी, प्रतिभानगर, कोल्हापूर - ४१६ ००८. |
| ३९) | **सुरेखा श्रीकृष्ण घोलकर**<br>घोलकर वाडा, गोरे मंगल कार्यालयाजवळ, मिरज - ४१६ ४१० |
| ४० ) | **सौ. इंदिरा नाईक (बाबी)**<br>निपाणी - ५९१ २३७. |
| ४१) | **डॉ. पी. सी. मेहता,** M. B. B. S.<br>अशोक नगर, निपाणी - ५९१ २३७. |
| ४२) | **श्री. वि. वि. बापट**<br>३४३, नारायण पेठ, अभ्यंकर वाडा, पुणे - ४११ ०३० |
| ४३) | **श्री. राम कमलाकर,** B. Com.<br>दिक्षित वाडा, दिंडी वेस, ब्राह्मणपुरी मिरज - ४१६ ४१० जि. सांगली |
| ४४) | **श्री. वसंतराव महादेवकर**<br>४ सारंग अपार्टमेंटस्, गव्हर्मेंट कॉलनी, विश्रामबाग, सांगली - १६. |
| ४५) | **सौ. अमरजा जोशी ,** B. A. TCH.<br>C/o. श्री. आनंद एस्. जोशी ,सोमवार पेठ, टिळकवाडी, बेळगांव ६. |
| ४६) | **श्री. जयंत कुलकर्णी ,** B. Sc. LLB.<br>मठ गल्ली , संकेश्वर - ५१९ ३१३, जि. बेळगांव |
| ४७) | **श्रीमती उषा मुद्रस,** B. A.<br>ए/६, २० जीवनबीमा नगर, ५९, इंद्रधनुष्य सोसायटी,<br>बोरिवली (प.) मुंबई - ४०० १०३. |
| ४८) | **सौ. वसुधा विलास कुलकर्णी , सौ. शैला अनंत कुलकर्णी ,** B. A.<br>ता. हुक्केरी, जि. बेळगांव) |
| ४९ ) | **श्री. किशोर हेमंत कमलाकर , सौ. सुनिता किशोर कमलाकर** B. A.<br>' स्वस्तिक ' - शिंत्रे कॉलनी, निपाणी - ५१९ ३३७. जि. बेळगांव |

| | |
|---|---|
| ५०) | **श्री. व्ही. बी. जनवाडकर ,** B. E.<br>प्रभा, १४ वी गल्ली , राजारामपुरी, कोल्हापूर - ४१६००८. |
| ५१) | **श्री. वि. के. फडके**<br>पुणे |
| ५२) | **श्री. शहाजी पाटील**<br>कोगनोळी, (जि. बेळगांव) |
| ५३) | **डॉ. सुरेश अनंतराव कुलकर्णी,** M.B.B.S.<br>पारिशवाड, जि.धारवाड. |
| ५४) | **श्री. वाय.डी. केकलेकर**<br>१४७९,डी वॉर्ड, उत्तरेश्वर, कोल्हापूर. |
| ५५) | **श्री. आनंद शिवराम जोशी** B. Com.<br>घ.नं.७८, सोमवार पेठ, टिळकवाडी, बेळगाव-५९०००६. |
| ५६) | **डॉ. अविनाश शिपूरकर**<br>वेंकटेश्वर अपार्टमेंट्स, ताराबाई पार्क, कोल्हापूर - ४१६ ००३ |
| ५७) | **डॉ. रमेश शिप्पूरकर ,** M.A.Phd.<br>७८,मठ गल्ली, संकेश्वर-५९१३१३ , (जि. बेळगाव) |
| ५८) | **श्री.आर.के.नवाळे ,** BA.B.Ed.<br>मु.पो.कोगनोळी, ५९१२२९. (ता.चिकोडी, जि. बेळगाव) |
| ५९) | **श्री. अरूण जोशी**<br>राधेशाम मंगल कार्यालय, जोतिबा रोड, कोल्हापूर. |
| ६०) | **श्री. सुधीर सी. जोशी ,** ज्योतिष प्रवीण,<br>६८, मठगल्ली, संकेश्वर - ५९१३१३ |
| ६१) | **श्री. एस.जी. होसमठ ,** BA.B.T.<br>सरस्वती बुक डेपो, खडेबाजार, बेळगाव |
| ६२) | **श्री. श्रीकांत नाईक** B. Com., M.A. B.Ed.<br>गांधी चौक, संकेश्वर,(जि. बेळगाव) |

| | |
|---|---|
| ६३) | **श्री. नामदेवराव शंकरराव शिरढोणे**<br>११७३, ई,१०, टेंबलाई रेल्वे फाटक, कोल्हापूर-४१६००८. |
| ६४) | **डॉ. जी. के. पाटील**<br>सातवी गल्ली, राजारामपुरी, कोल्हापूर. |
| ६५) | **श्री. सी.ज. जोशी**, ज्योतिष प्रवीण,<br>६८, मठ गल्ली, संकेश्वर - ५९१३१३ |
| ६६) | **डॉ. दत्तात्रय नागेशराव जोशी** M.A. Phd.<br>तेली गल्ली, निपाणी, जि. बेळगाव |
| ६७) | **श्री. आर. टी. दुसाने**, सिव्हिल जज्ज, सी. डिव्हिजन<br>अमरावती |
| ६८) | **प्रा. शशिकांत कुलकर्णी** M.A.<br>'राधाई', सन्मित्र हौ. सोसायटी, नवी राजारामपुरी, कोल्हापूर-४१६००८. |
| ६९) | **श्री. पु.ल. देशपांडे**<br>१, रुपाली, ७७७, शिवाजीनगर, पुणे. |
| ७०) | **श्री. पुरुषोत्तम गिंदोडिया**<br>संजय अगरवाल नगर, मालेगाव रोड, धुळे-४२४००१ |
| ७१) | **श्री. बाबामहाराज सातारकर**<br>१२७, सी, दादामहाराज वाडा, खाडीलकर रोड, गिरगाव, मुंबई-४. |
| ७२) | **श्री. प्रभाकर पेंढारकर**<br>हैद्राबाद इस्टेट, ब्लॉक एफ, आठवा मजला, नेपियन सी रोड, मुंबई - २६ |
| ७३) | **न्यायमुर्ती श्री. व्ही. एस. कोतवालसाहेब**<br>अंबर, प्लॅट नं. २६, नारायण दाभोळकर रोड, मलबार हिल, मुंबई-४००००६ |
| ७४) | **श्री. एस. सी. आर. भट**, गायक<br>ए/९, पाटकर न्यू ब्लॉक, ७५, टर्नर रोड, बांद्रा, मु. पो. मुंबई - ४०००५० |
| ७५) | **श्री. भाऊराव शिपूरकर** B.A.<br>२९६१ ढेरे गल्ली, निपाणी, ( जि. बेळगांव) |

| | | |
|---|---|---|
| ७६) | प्रा. वसंत नगरे, M.A<br>नंदगड | |
| ७७) | श्री. सुकांत माने<br>कोगनोळी ( जि. बेळगांव) | |
| ७८) | श्री. भालचंद्र कुलकर्णी M.A. B.Ed<br>हिंदवाडी, बेळगांव | |
| ७९) | श्री. नखाते विठ्ठलराव B.A.<br>श्रॉफ बझार, अडोणी ५१८ ३०१ | |



हिरण्यकेशीचा घाट व शंकरलिंग मठ, संकेश्वर.